म. ग्रं. सं. ठाणें
विषय आ. व्यो.
सं. क्र. २३८

REFBK-0008374
REFBK-0008374




# गद्य नवनीत

दा. न. शिखरे

# गद्य नवनीत

REFBK-0008374

लेखक

दा. न. शिखरे

एम. ए.

मूल्य : रु. ४—८—०

# ग द्य न व नी त

★

REFBK-0008374
REFBK-0008374

लेखक

दा. न. शिखरे

एम. ए.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
मुंबई मराठी साहित्य संघ

मूल्य : रु. ४-८-०

: प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,
७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

आवृत्ति पहिली : जून १९५४
मुखपृष्ठ चित्रकार : श्री. भाऊ खरे

: मुद्रक :
न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनिवार पेठ, पुणें २.

## लेखकाचें मनोगत

बरोबर शंभर वर्षांपूर्वी श्री. परशुरामपंततात्या गोडबोले यांचा 'नवनीत' नांवाचा काव्य-संग्रह प्रसिद्ध झाला, मान्यता पावला व मराठी भाषेच्या अभ्यासाला पोषक ठरला. त्यानंतरहि काव्य-संग्रहाचे कैक ग्रंथ प्रकाशित झाले; पण विस्मयाची गोष्ट अशी कीं, मराठी काव्याइतकेंच, किंबहुना अधिकच विपुल व वर्धिष्णु असणाऱ्या मराठी गद्याचे वेंचे फारसे प्रसिद्ध झाले नाहींत. शालेय विद्यार्थ्यांसाठीं कांहीं गद्य-गुच्छ गुंफले गेले असतील तेवढेच. ती उणीव भरून काढण्याचा हा अल्पारंभ आहे. अशीं कैक पुस्तकें निघूं शकतील इतकें मराठी गद्य संपन्न आहे.

संस्कृत भाषेंतील 'सुभाषित–रत्न–भांडार' सुप्रसिद्ध आहे; तसें मराठींत कां तयार होणार नाहीं ? साहित्य-श्रीमंत मराठी साहित्यांत कांहीं थोडथोडके नाहींत. प्राचीन संतांनीं 'साहित्य–सोनियाच्या खाणी' महाराष्ट्राच्या काव्य-प्रांतांत उघडल्या असल्या, तर अर्वाचीन राजकीय नेत्यांनीं मराठीची गद्य-शाखा टवटवीत केली आहे. ऐतिहासिक काळांतील बखरींमधील मराठी गद्य वीरश्रीनें नटलेलें आहे व आंग्लाईच्या आरंभ–काळांतील 'शतपत्रें' वगैरेंची भाषा अंतःकरणाची तळमळ व्यक्त करणारी आहे; पण मराठी गद्याची गंगोत्री म्हणजे विष्णुशास्त्र्यांची निबंधमालाच ! ज्ञानेश्वरी हा जितक्या अर्थानें मराठी पद्याचा आद्य ग्रंथ, तितक्याच अर्थानें निबंधमाला मराठी गद्याचा श्रीकार. या दोन्ही ग्रंथ-राजांपूर्वी मराठींत पद्य-गद्यांचे अंकुर उगवत होते, नाहीं असें नाहीं; पण सकस, उंचेंपुरें, भरघोस पीक येऊं लागलें, या दोन ग्रंथांनंतर— आणि या दोन ग्रंथांमुळेंच !

'निबंधमालेनें'च आपल्याला स्वभाषेच्या व स्वदेशाच्या सेवेस प्रवृत्त केल्याचे कृतज्ञतेचे उद्गार अलीकडील थोरथोर वाग्भटांनीं काढले आहेत. इतिहासाचार्य राजवाडे, लोकमान्य टिळक, कादंबरीकार हरिभाऊ आपटे, साहित्याचार्य परांजपे–केळकर–कोल्हटकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य विनोबा भावे–इत्यादि अनेकानेक विविध क्षेत्रांतील वाग्वीरांनीं 'निबंध-माले'लाच आपल्या स्फूर्तीचें श्रेय दिलें आहे. वसंतऋतूंत सर्वांगांनीं मोहरून

आलेला आम्रवृक्ष दिसल्यानें व्हावा, तसा आल्हाद प्रौढ व प्रसन्न 'निबंधमाला' वाचतांना होतो. वर्षाऋतूंत दोन्ही तटांना भिजविणाऱ्या नदीच्या पुराचे पाण्यांत जी भव्यता खेळत असते; तिचा साक्षात्कार 'निबंधमाले'च्या पानापानावर झाल्याविना रहात नाहीं.

आणि तें लो. टिळकांचें 'गीतारहस्य' !—सूक्ष्म-गहन तत्त्वज्ञानहि मराठी भाषा अचूक बोलूं शकते याचा साक्षात् पुरावाच. तसाच प्रा. वा. म. जोशी यांचा 'नीति-शास्त्र-प्रवेश' आचार्य जावडेकर यांचा 'आधुनिक भारत' किंवा डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचा 'भारतीय लोकसत्ता' हे ग्रंथ आधुनिक राज्यनीतिशास्त्रांतील नवनवे विचारहि मराठी गद्य पेलूं शकतें याची साक्ष देतात. पदार्थविज्ञान, रसायन, तर्क, मानस, अर्थ, आयुर्वेद इत्यादि बहुविध शास्त्रांचें वाहन होण्यास मराठी गद्य समर्थ बनत चालले आहे. 'जगांतील कोणताहि विचार माझ्या भाषेंतून निःशेषपणें प्रगट करतां आला पाहिजे' असा सार्थ अभिमान मराठी—भाषिकाला धरतां येण्यासारखी परिस्थिति निर्माण होत आहे.

अन्य भाषा-भगिनींना हेवा वाटावा असें तेजस्वी जडजवाहरहि मराठी गद्याच्या जामदारखान्यांत कांहीं थोडें नाहीं. चिपळूणकरांच्या लेखणींत मेकॉलेचा डौल आढळतो, तर आगरकरांच्या कलमांत नीत्शेचा त्वेष रसरसलेला दिसतो. 'ज्ञानाचीं सदावर्तें' 'दिल्लीचा ऐतिहासिक चित्रपट' इत्यादि केळकरांचे कित्येक निबंध जॉन्सन—ॲडिसनच्या पंक्तीस बसण्याजोगे आहेत तर सावरकरांचें 'सत्तावनचें स्वातंत्र्य-समर' गिबनलाहि मान डोलावयास लावील असें आहे. 'भासाची भवितव्यता' हा परांजपे यांचा एकच प्रतिभा-प्रज्वलित लेख घेतला, तरी तो मराठी भाषेची कूस धन्य करणारा आहे—मराठी गद्याला गौरव मिळवून देणारा आहे. तसाच कोल्हटकरांचा 'तिलक-विलाप.' पन्नास पृष्ठांचें तें गद्य कोणत्याहि भाषेंत एक हृदयंगम 'विलापिका' म्हणून मान पावेल. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून आचार्य अत्रे यांनीं गांधीजी, तुकाराम इत्यादि विभूतींचें गुणगान बहारीनें केलें आहे.

आपटे–फडके–खांडेकर–माडखोलकरादि कादंबरीकारांनीं मराठी भाषेमध्यें प्रसाद आणला, लालित्य ओतलें व अलंकारांचा वर्षाव केला. खाडिलकर-गडकऱ्यांच्या नाट्य-वाङ्मयानें मराठी गद्यांत विलक्षण आकर्षण निर्माण केलें. संतांच्या काव्याची सर यावी असें सुगम–मनोरम गद्य सानेगुरुजींनीं दोहों हातांनीं उधळलें. विनोबांनीं तर आपल्या वाङ्मयांत भाषेचा सोपेपणा व विचारांचा सूक्ष्मपणा यांचा कळस केला. मराठी उपनिषदेंच तीं! केवळ त्यांचे नवनवे विचार मुळांतून कळावेत, म्हणून अन्यभाषीय विद्वान् पुढेंमागें मराठी भाषा शिकूं लागतील. असें हें विस्तीर्ण व विविध, प्रसन्न व संपन्न, सामर्थ्यपूर्ण व लालित्यपूर्ण मराठी गद्य दिवसेंदिवस वाढत आहे–नव्यानव्या अंगांनीं पुष्ट होत आहे.

'मराठी काव्याला ओहोटी लागली काय?' अशी शंका यावी व चर्चा व्हावी, असें गद्याचें प्रकृतिमान कधींच बिघडलेलें नाहीं पूर्वींच्या बखरींपासून आजच्या वर्तमानपत्रांपर्यंत मराठी गद्याचा प्रवाह वाढत्या वेगानें वहात आहे. त्यांतील शब्दसौंदर्य व अर्थसौंदर्य या दोन्ही दृष्टींनीं स्मरणीय व पठनीय वाटणारे छोटे छोटे वेंचे या पुस्तकांत मीं एकत्र केले आहेत. असे किती तरी संग्रह काढतां येण्यासारखे आहेत, पण दहा वर्षांपूर्वीं मीं मनीं धरलेला संकल्प अल्पांशानें तरी या पुस्तकरूपानें सिद्धीस जात आहे म्हणून मला संतोष वाटतो.

अर्थात् ज्या 'धन्यांचा हा माल' आहे त्यांचा मी ऋणी आहें. या ग्रंथाचे वाचक या सूक्तींच्या आस्वादामुळें मूळ ग्रंथ वाचण्यास अधिकच प्रवृत्त होतील अशी मला आशा आहे. त्या दृष्टीनें मी त्या ग्रंथकारांच्या वाङ्मय-प्रचाराचेंच कार्य करीत आहें असें मला वाटतें. ज्या ज्या लेखकांच्या साहित्य-सुवर्णाचे कण मीं येथें गोळा केले आहेत, त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों आणि ज्यांच्या वाङ्मयाचा लाभ मीं वाचकांना स्थल–संकोचामुळें देऊं शकलों नाहीं त्यांची क्षमा याचितों.

'महात्मा' कार्यालय नातूबाग, पुणें २.
ता. १५ जून १९५४

दा. न. शिखरे

# विषयांचें दिग्दर्शन

[ आंकडे पृष्ठाचे ]


आई—५, ६, २६१, २८३, ४४५. ४४६.

ईश्वर—२, २४१, २५० ते २५३. ३२३, ३३७, ३८१, ४४७.

ऋतु—८०, ८१, ८२, १२१, १२२, १६५, १९६, २९५, २९६, २९९, ३००, ३०७.

कर्तव्य—२३६, २६४, २६६, २६७, ३३६.

कला—२३९, २४०, २४१, २८५

कामगार—११, १९२, ३२५.

काव्य—२३१, २३२, २३३, २७२, ३२६, ४२७, ४२८, ४४१, ४४२.

कीर्ति—२, ३६१.

कोंकण—३१ ते ३६, ३०१.

खेडें—२६, २८, २०५, २१४, ३१७, ३२२.

खेळ—२०, २४३, २४४.

गुरु— ४, २५५.

ग्रंथ—१०, १३, २२६, २२८, २५७, ४४०.

चंद्र—१०४ते१०८, ११०, १११, १३१, १३२, १३३, १८३, १८९.

जीवन—१५. १९, २२, ३६६ ते ३७४.

डोंगर—२७ २९, ३७, ३९ ते ४६, १९७ ते २०३, २०७.

तारुण्य—२६५, २७०, ३३४.

दारू—२६६, २७६.

दुष्काळ—३०.

देश—७, ९, ३४५, ३४७ ते ३५२ ३५५, ३६२, ३८४, ३८५.

धबधबा—५४ ते ५७, ५९, १७०, १८८, २२२, २२३, २२४, ३०२.

धर्म—२४७, २४८, २४९.

ध्येय—२७३, २७४, ४०२.

नदी—६०, ६२, ६३, ७५, ७६, ७७, १८७, २१६ ते २२३, ३१२.

पक्षी—७९, ९१, ११८, १२३, १९४, १९५, ३११.

पाऊस—४७ ते ५३, ५८, ५९, १४५ ते १६५, १६७, २०७.

प्रयत्न—२१, ३३०.

प्रातःकाळ–९२, ९३, ९४, ९६, १०४ ते ११८, २१२, ३०३.
प्रेम–१५, १८, १९३, ३६७, ३९५, ४१६–४२०.
फुलें– ८२–८७, ३०२, ४३४ ते ४३६.
बालक–२४३, २४४, २४६, २७१.
भरतभूमि–३४६, ३५३, ३५५, ३५८, ३७६.
भाषा–१, ३, ११३, २२५, २२७, २३६, २३८, ३३७.
मन–४२२, ४२३, ४२४.
मरण–४२५, ४२६.
महाराष्ट्र–३३७ ते ३३९, ३९५.
मित्र–१८, १९०, २६२.
मुलें–१९, १९०.
रात्र–१४१, १४२, १४३, १४४, १६९, १८९, ३०५, ३०६.
वाङ्मय–२२६, ते २२९, २३२, ३२६, ४२७, ४४०, ४४३.
शिक्षण–४, १३, २४२, २४५, ३१८, ३२९.
शेती–२३ ते २७, २९, ५७, ७८, ७९, २०५–२०९.
श्रम–१०, १२, २६५, २६७, २६९, २७०, ३२४, ३३०.
सत्य–१०, ३६०, ४०३.
समाज–३८३, ३९८, ४०१, ४०२, ४०४, ४०५, ४११.
समुद्र–६४–६९, १७० ते १८५, १८९, ३१३, ३१४.
संस्कृति–३७५, ते ३७७, ३८२.
स्त्री–१५, २५८, २५९.
संत– २३१, २९३.
संध्याकाळ–९७ ते १०३, १२३ ते १२९, १९४, ३०४, ३०५, ३२०.
स्वातंत्र्य–८, १७, ३४०, ३४१, ३४२, ३४७.
स्वावलंबन–१२, २१, ४४, ५०, २५७.
ज्ञान–२२६, २२७, २२८, २२९, ४०८, ४१३, ४४४.

माझ्या अलीकडील आयुष्यांत

प्रेमळ भावाची उणीव

भासूं न देणारे

**प्राचार्य श्री. नी. शं. नवरे**

यांस हें ' नवनीत '

**प्रेमपूर्वक समर्पण**

— दा. न. शिखरे

# गद्य

# नवनीत

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क.
(रक्षक प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. दि.

● देशाचा, धर्माचा, व आचारांचा खरा अभिमान जागृत राहण्यास बोलणें, चालणें, लिहिणें, शिकणें व विचार करणें मराठींत झालें पाहिजे. त्याशिवाय कर्तव्याचा पक्का व कायमचा ठसा आपल्या मनावर उमटावयाचा नाहीं.

● भाषा ही समाजाचें बंधन आहे; भाषा ही विचाराचें वाहन आहे; भाषा ही धर्माचें पुरस्करण आहे. भाषेशिवाय मनुष्यप्राणी संभवत नाहीं. उदार विचारांचे अंकुर ह्या अमृतवल्लीलाच तेवढे पुरतात. ह्या देवतेची मनोभावेंकरून आराधना केली असतां सर्व कांहीं प्राप्त होतें.

— इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : (लेख-संग्रह भा. ३)

## देवाचीं नाना रूपें

पवित्र नद्यांच्या रूपानें, विशाल पर्वतांच्या रूपानें, गंभीर सागराच्या रूपानें, वत्सल गाईच्या रूपानें, उमद्या घोड्याच्या रूपानें, दिलदार सिंहाच्या रूपानें, मधुर कोकिळेच्या रूपानें, सुंदर मोराच्या रूपानें, स्वच्छ व एकांतप्रिय सर्पाच्या रूपानें, पंख फडफडवणाऱ्या कावळ्याच्या रूपानें, धडपडणाऱ्या ज्वाळांच्या रूपानें, प्रशांत तारकांच्या रूपानें सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## परमेश्वराचे संदेश

वारे हे भगवंताचे दूत आहेत. हिंदुस्थानांतील कांहीं वारे वरून पवित्र हिमालयावरून येतात, तर कांहीं खालून विशाल सागराकडून येतात. ते आपणांस जागृत करतात; आपल्या कानांत गुणगुणतात. परमेश्वराचे अनंत संदेश घटकोघटकीं वाऱ्याबरोबर येत आहेत, ते ऐक.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## सृष्टीचें पुस्तक

ही अपार सृष्टि म्हणजे ईश्वराचें पुस्तक आहे. या सृष्टीच्या सुंदर पुस्तकांत सुंदर अक्षरांनीं परमेश्वर सर्वत्र लिहिलेला आहे.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## कीर्ति

सकल कार्यामध्यें अपकीर्तीचें भय बहुत वागवावें.

— रामचंद्रपंत अमात्य : ( आज्ञापत्र )

## महाराष्ट्राची भक्ति

वडिलांना ‘ तीर्थरूप ’ म्हणतात. पितृस्थान हें एक महान् तीर्थ आहे. त्या दृष्टीनें ज्या महाराष्ट्रांत आपण जन्मलों आणि ज्याच्या मांडीवर खेळलों–वाढलों; तो समग्र महाराष्ट्रच आपल्याला तीर्थरूप आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

## मराठीची महती

ज्ञानेश्वरांची गोड गोड भाषा मला चाखावयास मिळाली याची मला धन्यता वाटते. मराठी भाषेच्या प्रांतांत-महाराष्ट्रांत-माझा जन्म झाला, म्हणून मला धन्यता वाटते, कृतार्थता वाटते. धन्य ही मराठी भाषा, असें वाटतें. ज्ञानेश्वरांची गोड भाषा माझ्या तोंडांत बसावी, म्हणून पुन्हां मला जन्म प्राप्त झाला, तरी धन्यता वाटेल.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## देवमाणसांचें स्थान

आपल्या पशुवृत्तीवर जय मिळवून मनुष्यप्राणी किती उंच चढूं शकतो हें बुद्ध, ख्रिस्त, तुकाराम वगैरे कित्येक महात्म्यांनीं प्रत्यक्ष उदाहरणांनीं दाखवून दिलें आहे. पृथ्वीच्या पाठीवर सर्व देशांत, सर्व जातींत, सर्व धर्मांत आणि सर्व युगांत अशीं देवमाणसें उत्पन्न झालीं आहेत. यावरून हें निर्विवाद सिद्ध होतें कीं, जर कोणताहि मनुष्य प्रयत्न करील तर तो त्या स्थानाप्रत पोहोंचूं शकतो.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## गुरु कोण ?

गुरु ही फार थोर वस्तु आहे. मुलांतील सुप्त चैतन्य तो जागृत करितो. तो मुलांच्या अंतःकरणांत शिरून त्यांना त्यांचा दिव्य वारसा दाखवून देतो. उज्वल ध्येयें त्यांच्यासमोर तो ठेवतो.

— साने गुरुजी : ( श्याम )

## शिक्षणाचा उपयोग

शिक्षणाचा खरा उपयोग प्रत्येक धंद्यांतील माणसास आपापल्या धंद्याचें काम जास्त चांगलें करावयास समर्थ करण्याचें आहे. स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा यांबद्दल शिक्षणानें एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांचें मनांत उत्पन्न झाली पाहिजे.

— लो. बाळ गंगाधर टिळक : ( केसरी )

## शिक्षणाचें फल

प्रत्येक मनुष्याचें अंतःकरण हें एक दैवत आहे; पण तें शिक्षणानें जागृत झालें तरच त्याचा उपयोग. नाहीं-तर दगडी देवाप्रमाणें दगडी अंतःकरणाचाहि उपयोगा-पेक्षां उपद्रवच अधिक होतो.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचन-मृग )

## शिक्षणाचें उद्दिष्ट

गुरु नवीन कांहीं देत नाहीं. जे असेल तेच प्रकट होण्यास मदत करतो. कोंडलेल्या सुगंधाला बाहेर आणतो. जें बद्ध आहे तें मुक्त करणें एवढेंच गुरूचें काम !

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## ज्ञानाची लालसा

नवीन गोष्ट शिकण्याची ज्याची उमेद गेली तो म्हातारा.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## आईचें थोरपण

आईची पूजा म्हणजे वत्सलतेनें उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. माउली म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ति. उत्कृष्टांतील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. आई या शब्दाहून आणखी उंच शब्द आहे कोठें?

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## आईची थोरवी

आई मुलाला जें अंगाई-गीत गातें, त्याला पाळण्यांत हलवितांना, मांडीवर निजवितांना, कुशींत थोपटतांना, खांद्याशीं धरून फिरवितांना, ज्या गोड गोड ओव्या म्हणते—त्यांत सारा सामवेद असतो, सारा गांधर्ववेद असतो. मुलासाठीं जीं शेंकडों औषधें आई जमा करून ठेवते, तिची ती बाळकडवांच्या सामानाची यादी—त्यांत सारा आयुर्वेद सामावलेला असतो. आई मुलाला ज्या कधीं काऊ-चिऊच्या गोष्टी सांगते, राजा-राणीच्या गोष्टी सांगते, आवडती-नावडतीच्या गोष्टी सांगते, त्यांत सारें बाल—वाङ्मय असतें. आई मुलाला कधींकाळीं कळकळीनें जे चार शब्द सांगते, त्यांत सारीं उपनिषदें असतात. ती त्याला फुलें दाखविते, फुलपांखरें दाखविते, गाई-गुरें दाखविते, कावळे—चिमण्या दाखविते, झाडें—माडें दाखविते, चांदोबा दाखविते, त्यांत सारें सृष्टीशास्त्र येतें. आईच्या सभोंवतीं सारीं शास्त्रें व साऱ्या विद्या जणूं येऊन उभ्या असतात. आईच्या वात्सल्यांतून साऱ्या कला निघाल्या, साऱ्या विद्या निघाल्या, सारीं शास्त्रें निघालीं, आई म्हणजे बोधजननी, वेदजननी, आई म्हणजे ओम् !

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

**मातृप्रेमाचा चंद्र**

अनंत निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर लहानसा चंद्र मिरवितो, त्याप्रमाणें श्यामच्या स्वतःच्या कथांच्या पार्श्वभूमीवर हा मातृप्रेमाचा चंद्र मिरवीत आहे.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

**आईचें दूध**

आईच्या दुधाची चव कांहीं न्यारीच असते. तें नुसतें दूध नसतें, त्यांत प्रेम व वात्सल्य असतें. म्हणून तें दूध बाळाला बाळसें देतें—तजेला देतें.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

**आईची सर**

समुद्रांत अनंत रत्नें असलीं तरी मोत्याचें रक्षण शिंपल्यामुळेंच होत असतें. त्याप्रमाणें या जगांत कोट्यवधि बुद्धिमान् माणसें असलीं तरी आपल्या फारशा न शिकलेल्या व साध्याभोळ्या आईची सर दुसऱ्या कुणालाहि येणार नाहीं.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचन-मृग )

**आईबापांचें उदाहरण**

सूर्यचंद्रांना माहीत असो वा नसो, त्यांच्या किरणांनीं कमळें फुलतात ही गोष्ट खरी. आईबापांना व इतर लोकांना माहीत असो वा नसो, त्यांच्या कृत्यांनीं मुलांच्या जीवन-कळ्या फुलत असतात हें खरें.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

**ज्ञान देणारी आई**

मुलांच्या शिक्षणांत जास्तींत जास्त वांटा आई-बापांचा असतो, व त्यांतहि आईचा अधिक....खरी शिक्षणदात्री आईच होय. आई देह देते व मनहि देते; जन्मास घालणारी तीच व ज्ञान देणारीहि तीच.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## स्वदेशाचा चित्रपट

ज्यांतील कित्येक अत्यंत रमणीय प्रदेशांस ‘ अमरभूमि ’, ‘ नंदनवन ’, ‘ इंद्रभुवन ’, ‘ जगदुद्यान ’ अशा संज्ञा प्राप्त झाल्या आहेत, असा हा आमचा हिंदुस्थान देश आधिभौतिक संपत्तींत कोणत्याहि देशास हार जाईल, किंवा यांतील सृष्ट पदार्थांचा चित्रपट दुसऱ्या कोणत्याहि देशाच्या चित्रपटापेक्षां कमी मनोरम ठरेल असें वाटत नाहीं.

— प्रि. आगरकर : ( सुधारक )

## आमचे राष्ट्रीय पुढारी

ज्यांचे केस पांढरे होऊं लागले होते, ज्यांची सुदृढ उंचसर अंगकाठी कांहींशी वाकल्याचा भास होत होता असे तेजस्वी अंगकांतीचे व सुंदर नाकडोळ्यांचे पंडित जवाहरलाल; कांहींसे ठेंगणें, शाल पांघरलेले, राकट भासणारे, उग्र चर्येचे वल्लभभाई पटेल, देहाचं स्थूलत्व न जुमानतां एखाद्या अवखळ किशोरीप्रमाणें हालचाल करणाऱ्या, शुभ्र केसांच्या आणि गोबऱ्या चेहऱ्याच्या आपल्या मत्स्याकृति डोळ्यांच्या नजरेनं, हास्यानं आणि सतत विनोदानं उल्हास पसरविणाऱ्या सरोजिनी नायडू; आणि या सर्वांच्या घोळक्यांत एखाद्या अधिष्ठात्री देवतेप्रमाणें पाय दुमडून डावा तळवा टेकून शुभ्र गादीवर बसलेले गांधीजी.

— ना. सी. फडके : ( उजाडलं ! पण सूर्य कुठें आहे ? )

## देशभक्तीचा मार्ग

देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञान-संपन्न करणें हा होय.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंध-माला )

### स्वतंत्र भारताचें स्वप्न

स्वतंत्रतेचा उपभोग घेणाऱ्या हिंदुस्थानांत उत्तम ग्रंथकार, उत्तम कारागीर, उत्तम शिल्पकार, उत्तम अर्थशास्त्रवेत्ते, उत्तम तत्त्ववेत्ते, उत्तम चित्रकार वगैरे सर्व प्रकारचे उत्तम लोक निपजून त्यांनीं हिंदुस्थान देश उत्तमांतील उत्तम करून ठेविला असता. एशिया खंडांत स्वतंत्रतेचा संरक्षक म्हणून हिंदुस्थानची ख्याति झाली असती.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

### स्वातंत्र्याची महती

स्वातंत्र्य नसलें आणि इंद्राचें नंदनवन मिळालें तरी तें शून्य ! स्वातंत्र्य नसलें आणि ऐरावत बसायला मिळाला तरी तो शून्य ! स्वातंत्र्य नसलें आणि कुबेराची संपत्ति मिळाली तरी ती शून्य ! स्वातंत्र्य हें आमचें अस्तित्त्व आहे, स्वातंत्र्य हें आमचें धन आहे.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

### स्वातंत्र्याचा फायदा

जे स्वतंत्र असतात त्यांना स्वतंत्रता मिळविण्याच्या कामीं दुसऱ्यास मदत करण्याचा योग येतो. परंतु जे गुलाम असतात त्यांच्या कपाळीं दुसऱ्यांना गुलाम करण्याचेंच काम येतें.

— शि. म. परांजपे : ( हिंदुस्थान आणि ट्रान्सव्हाल )

### स्वतंत्र घर

" ही मठीच माझा स्वर्ग आहे. कारण येथें मी स्वतंत्र आहे. येथें मिंधेपणा नाहीं. येथें खाल्लेली मीठभाकर अमृताप्रमाणें लागेल, परंतु परक्याकडे खाल्लेली बासुंदी-पुरी नको."

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## राष्ट्राचा जिवंतपणा

राष्ट्र जिवंत आहे कीं नाहीं याचें एकच गमक आहे. जिवंत राष्ट्रांतील तरुण त्याच्यासाठीं मरायला नेहमीं तयार असतात.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचन-मृग )

## कारागृहांतील प्रवेश

थोड्याच वेळांत चढण संपून सिल्व्हर जेलचा दरवाजा आला. लोखंडी बिजागऱ्यांच्या दाढा करकरूं लागल्या व त्या तुरुंगाच्या दारांचा जबडा उघडला. मी त्यांत घुसलों तों जबडा बंद झाला, तो पुनः अकरा वर्षांनीं परत उघडला !

— वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

## अघोर अलंकारांची शोभा

मी त्या भीषण भव्य तुरुंगाच्या दोन लोखंडी फाटकांच्या मध्यंतरीं असलेल्या भागास भूषविण्यासाठीं जे अनुरूप अलंकार धारण केलेले होते ते पाहण्यांत गर्क झालेलों होतों. निरनिराळ्या प्रकारच्या हातकड्या एकांत एक गुंफून त्यांची ही हिडिस फुलें भिंतीवर लावलेलीं होतीं. मोठमोठ्या पायबेड्या, दंडबेड्या, आणि मनुष्याच्या शरीरास कष्ट देणारीं अशींच अन्य आयुधें समोरच्या भागावर ओळीनें लोंबकळत होतीं. त्या उग्रतेची एक शोभाच दिसत होती. त्या बेयॉनेट-बंदूक-बेड्या-हात-कड्यांच्या- अघोर अलंकारांनीं तो भीषण तुरुंग असा शोभूं लागे कीं, जसा एकादा मांग उत्तम कपडे घालून फांशीं द्यावयास येतांना शोभतो.

— वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

## श्रमाची पूजा

ज्या राष्ट्रांत समाज-संवर्धक, समाज-रक्षक, समाज-पोषक श्रमाची पूजा होते, तें राष्ट्र वैभवावर चढतें, बाकीचीं भिक्षेस लागतात.

– साने गुरुजी : ( श्यामची आई )

## श्रमाची मातब्बरी

देव दगडांत नाहीं, माणसांत आहे. दामांत नाहीं, घामांत आहे.

– वि. स. खांडेकर : ( हिरवा चाफा )

## श्रमाची प्रतिष्ठा

श्रमांत आत्मोद्धार आहे. फुकट घेण्यांत व फुकट देण्यांत पतन आहे. उन्हातान्हांत काम करणारा मजूर, रस्ते झाडणारा झाडू, मलमूत्र नेणारा भंगी, मेलेलीं गुरें फाडणारा ढोर, वहाणा बांधणारा चांभार हे सारे आयतेखाऊ लोकांपेक्षां पवित्र आहेत, श्रेष्ठ आहेत.

– साने गुरुजी : ( श्यामची आई )

## गीता

गीता म्हणजे आलस्याचा निरास, मोहाचा निरास, विलासाचा निरास! गीता म्हणजे नैराश्याचा, स्वार्थाचा, दंभ-मत्सराचा निरास.

– साने गुरुजी : ( श्याम )

## सत्यावरील निष्ठा

ज्याचा आग्रह धरावा अशी जगांत सत्य ही एकच गोष्ट आहे !

– वि. स. खाण्डेकर : ( सुखाचा शोध )

मजूर

## मजुरांची वस्ती

धूळ, धूर, आणि कचरा यांचें सर्वत्र साम्राज्य पसरलें होतें. कटड्याला बांधलेल्या दोरीवरून फाटकीं गोणपाटें, फाटक्या गोधड्या, वाकळा, पंचवीस ठिकाणी ठिगळ्या लावलेलीं लुगडीं, त्या गलिच्छपणाला आणखी जोड देत होतीं. कांचेची चिमणी नसलेल्या डब्यांचे घासलेटचे दिवे प्रत्येक खोलींतून धुराचे भपकारे सोडीत होते. सहज पाहिलें असतां खोलींत आग लागली आहे कीं काय, असा परक्या माणसाला भास झाला असता.

— भा. वि. वरेरकर : ( धांवता धोटा )

## गरिबाची झोंपडी

दिव्याच्या उजेडांत मनोहरला काय दिसलें ? स्वच्छ दारिद्र्य. कुडाला पाजवून आणलेले विळे, कोयते व कुऱ्हाडी लटकावल्या होत्या; शिंक्यावरून दोन-चार भोपळे, कोहळे व काकड्या ठेवल्या होत्या. मागील बाजूला कोंबड्यांचा झापा होता. कोपऱ्यांत नाचणीची बारीकशी कणंग होती. माळ्यावर दोन-चार भाताचे डबे. तें भात देखील नव्याचें होतें. कुडामध्यें लाडीनें लिंपलेला एक फुटक्या आरशाचा तुकडा होता.

— र. वा. दिघे : ( सराई )

## कामगारांचें जीवन

कुणाचीहि घागर थोडीबहुत मारामारी, निदान शिवी-गाळी झाल्याशिवाय भरलीच जात नाहीं. परळवरच्या ह्या प्रातःस्मरणाच्या भूपाळ्याच आहेत. या परळच्या कुरुक्षेत्राला नळावरच्या भांडणापासून सकाळीं सुरवात होते आणि संध्याकाळीं आकाशगंगेच्या तांबड्या पाण्याचें सेवन करून घरीं परत येणाऱ्या कामगारांच्या शिवीगाळीनें या उत्सवाची शेजारती होते.

— भा. वि. वरेरकर : ( धांवता धोटा )

## श्रीमंतांचीं दुःखें

आज गरिबांचें सुख म्हणजे श्रीमंतांचा मत्सर असें झालें आहे. त्या श्रीमंतांचा मत्सर करण्यासारखें त्यांच्याजवळ आहे तरी काय? त्यांना धड अन्न पचत नाहीं, खरें प्रेम मिळत नाहीं. ही का हेवा करण्यासारखी स्थिति आहे? श्रीमंतांनींच गरिबांचा मत्सर करावा अशी स्थिति असते. त्यांना मोकळी हवा मिळते, दगडावर पडलें तरी गाढ झोंप येते. श्रीमंतांना श्रमिकांचा हेवा वाटावा असें केलें पाहिजे.

— आचार्य विनोबा भावे : ( भाषणें )

## स्वावलंबनाचा मान

स्वावलंबन हा पाश्चिमात्य शिक्षणाचा पाया आहे. स्वावलंबनानें मान वर राहते, परावलंबनानें मान खालीं होते. श्रमाशिवाय कांहीं घेऊं नये व कोणीं श्रम केल्याशिवाय त्याला देऊं नये.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## निर्माण करा

कांहीं तरी निर्माण करा.
विचार निर्माण करा.
धान्य निर्माण करा.
स्वच्छता निर्माण करा.

कांहीं तरी मंगल असें, सुंदर असें, हितकर असें, निर्माण करा; तरच जगण्याचा तुम्हांस अधिकार आहे.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## राष्ट्रोद्धारासाठीं शिक्षण

ज्या राष्ट्राला आपलें डोकें वर काढावयाचें आहे त्याचें तें डोकें पहिल्यानें सुसंस्कृत झालें पाहिजे; म्हणजे तेथील लोक सुशिक्षित झाले पाहिजेत.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## आमचे राष्ट्रीय ग्रन्थ

महाभारत आणि रामायण हे निःसंशय अद्‌भुत ग्रंथ आहेत. रामायण हें मधुर नीति-काव्य आहे, तर महाभारत हें व्यापक समाजशास्त्र आहे.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## चरित्र-ग्रंथांचा उपयोग

शील बनविण्याच्या आणि संवर्धनाच्या कामीं अनुकरणीय स्त्रीपुरुषांच्या यथातथ्य लिहिलेल्या चरित्रांचा फार उपयोग आहे.

— धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## सत्कार्याचा मुहूर्त

चांगले विचार फार वेळ टिकत नाहींत, तेव्हां ते तीव्र असतांनाच मनुष्यानें चांगलें कार्य उरकून घ्यावें.

— धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## निश्चयाचें बळ

शब्द नकोत, कृती पाहिजे, आणि तीहि निश्चयाची कृति पाहिजे. लोकमताचें बल निश्चयांत आहे, केवळ समुच्चयांत नाहीं.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## आचाराची शुद्धता

अमुक देशांत किंवा अमुक जातींत जन्म होणें हें कांहीं मनुष्याच्या हातचें नाहीं. परंतु सदाचारानें किंवा दुराचारानें वागणें हें मनुष्याच्या हातचें आहे.

— प्रि. आगरकर : ( सुधारक )

## शुद्ध अंतःकरण

कोणत्याहि मनुष्याची योग्यता धंद्यावर अगर जातीवर अवलंबून नसून सर्वस्वीं त्याच्या अन्तःकरणाच्या शुद्धीवर अवलंबून असते.

— लो. बाळ गंगाधर टिळक
( लो. टिळक यांचीं धार्मिक मतें )

## शुद्ध मन

ज्याचें मन किंवा अन्तःकरण शुद्ध तोच पुरुष उत्तम म्हणावयाचा.

— लो. बाळ गंगाधर टिळक : ( गीता-रहस्य )

## स्वच्छता हीच पूजा

शरीर हें परमेश्वराचें मंदिर आहे. हें मंदिर स्वच्छ व सुंदर राखणें, म्हणजे देवाचीच पूजा आहे. देवानें दिलेले नीट सांभाळणें यांतच खरा धर्म आहे. देवानें जीं सेवेचीं साधनें आपणास दिलीं आहेत तीं नीट, स्वच्छ, सतेज व समर्थ राखणें हें आपले प्रथम कर्तव्य आहे.

— साने गुरुजी : ( श्याम )

## सत्संगतीचा लाभ

सत्संगति लाभावयास जशी पुण्याई लागते, त्याप्रमाणें थोर मातापितरें, थोर भावंडें मिळावयासहि पुण्याई लागते.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## स्त्रियांचे गुण

स्त्रियांसारख्या कष्टाळू स्त्रियाच. त्यांनींच शेंकडों खस्ता खाव्या. भारतीय स्त्रियांच्या कष्टाळूपणाला व क्षमावृत्तीला एक भूमातेचीच उपमा शोभेल. दुसरी नाहीं. अशा थोर स्त्रिया ज्या घरांत असतात तीं मला राऊळें, देवाचीं मंदिरेंच वाटतात. त्या स्त्रिया ह्याच मी देवता मानतों व माझा माथा त्यांच्या चरणीं नमवितों. दुसरी देवळें मला माहीत नाहींत.

— साने गुरुजी : ( श्यामची आई ).

## प्रेमाचें नातें

प्रेमाचें नातें ऐश्वर्यालाहि लाजवील. हें प्रेम जेथें नाहीं ते माड्या—महाल व दिवाणखाने म्हणजे स्मशानेंच होत.

— साने गुरुजी : ( श्याम ).

## प्रेमाचें सामर्थ्य

तलवारीशीं लढवावयाची तर ढालच. पण त्या ढालीचा सहन करण्याचा जोर तलवारीच्या मारण्याच्या जोरापेक्षां कमी पडतां कामा नये. दुश्मनाच्या सवालांत जर पांच शेर राग भरलेला असला, तर आपल्या जबाबांत पांच शेराहून कमी प्रेम नसावें.

— विनोबा भावे : ( मधुकर ).

## जीवनाचें ध्येय

खरें असेल तेंच बोलावें. उदात्त असेल तेंच लिहावें. उपयोगी असेल तेंच शिकवावें. देशाचें हित ज्यांत असेल तेंच करावें आणि परमेश्वराचें जें सत्य स्वरूप असेल तेंच चिंतीत जावें.

— शि. म. परांजपे ( काळांतील निवडक निबंध ).

## प्रत्येकाची थोरवी

शेवटीं जगांत दुसऱ्यांजवळ आहे यांतच आनंद मानावयास आपण शिकलें पाहिजे. गांधींना रवींद्रनाथ होतां येणार नाहीं, रवींद्रनाथांना रामन् होतां येणार नाहीं. आपण रडून काय होणार? शेवटीं अद्वैतांतच आसरा आहे. जगांत खाण्यापिण्याचें वैषम्य दूर करतां येईल. परंतु चित्रकाराला जर गाणाऱ्यांचा हेवा वाटेल तर त्याच्यासाठीं कोणता साम्यवाद आणावयाचा? झेंडूला जर गुलाबाचा हेवा वाटायला लागला तर काय करायचें? झेंडूला पूर्ण फुलावयास आसरा देतां येईल, गुलाबालाहि वाव मिळेल. परंतु झेंडूचें वैशिष्ट्य गुलाबाला लाभणार नाहीं, आणि झेंडूला गुलाब होतां येणार नाहीं. गुलाबानें झेंडूला म्हणावें, "तूं किती छान आहेस?" "तूंहि किती गोड आहेस?" असें झेंडूनें म्हणावें. रामराम म्हणून एकमेकांस नमस्कार करावा. रामराम म्हणजे तूंहि राम व मीहि राम. तूंहि गोड व मीहि गोड.

— साने गुरुजी : ( श्याम )

## थोरांचें ब्रीद

जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे, अशानें क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें; बोलावें व सांगावें हेंच त्यास उचित होय.

— प्रि. आगरकर : ( सुधारक )

### संतांचा धर्म

किलबिल करणें हा पांखरांचा सहजधर्म आहे. आईची आठवण होणें हा मुलांचा सहजधर्म आहे. त्याप्रमाणेंच ईश्वराचें स्मरण होणें हा संतांचा सहजधर्म आहे.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

### सज्जनांचा आनंद

सज्जनांचा स्वभावच हा ! आपला बचाव करणें हा त्यांचा धर्म नव्हे ! आपला देह कुरबान करणें हाच त्यांचा धर्म ! लोकांच्या हितासाठीं स्वतःची आहुति पडली कीं तो त्यांचा ब्रह्मानंद !

— अ. ब. कोल्हटकर : ( शेतांतलीं पिकें )

### साधुत्वाची दृष्टि

वाईटांत वाईट व्यक्तीच्या हृदयांतूनहि भलाईची प्रतीति येते. बाह्य परिस्थितीमुळें त्याच्या हातून एकादी वाईट गोष्ट होतांना दिसत असेल, परंतु वाईटांतल्या वाईट माणसांतहि एकादी तरी सद्भावना असतेच. त्याच्या हृदयांत आम्हांला भगवंताशिवाय कोणाचेंहि दर्शन व्हायला नको.

— आचार्य विनोबा भावे : ( भाषणें )

### स्वातंत्र्याचा आनंद

स्वातंत्र्याची प्रगति होत असलेली पाहून सूर्य, चंद्र आणि आकाशांतील सर्व लहान-मोठे स्वतंत्रताप्रिय तारे हे आनंदित होत असतात, आणि चोरी, दरवडे व खून यांना पाहून मध्यरात्रीचा काळाकुट्ट काळोख देखील भयानें थरथर कांपत असतो.

— शि. म. परांजपे : ( पुराणिकाचा खटला )

## मित्राचा स्वभाव

शरीरावर कोठेंहि माशी बसली कीं तिला मारायला हात चटकन् वर होतात. डोळ्यांत कांहीं जातें असें वाटलें कीं, पापण्या चटकन् लवतात. त्यांना तसें करायला सांगावें लागत नाहीं. सज्जन सुहृदांचेंहि तसेंच आहे. तो न सांगतांच मित्राचें भलें करतो. मित्र आपत्तींत पडत असेल तर तो धांवून येतो. मित्र चुकत असेल तर तो सन्मार्ग दाखवतो.

— महादेवशास्त्री जोशी : ( कल्पवृक्ष )

## प्रतिकाराचा मार्ग

विस्तव विझवावयाचा तर पाणी ओतावें,
अंधार पडला म्हणजे दिवा लावावा,

ह्या गोष्टी कोणाला समजत नाहींत ? आणि जर ह्या गोष्टी समजतात, तर क्रोधाला प्रेमानें जिंकावें, बुराईला भलाईनें जिंकावें, कंजूषपणाला दिलदारपणानें जिंकावें, खोट्याला खऱ्यानें जिंकावें, हें संतांचें म्हणणें कां समजूं नये ? त्याहि गोष्टी व्यवहाराच्याच आहेत.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## मित्राचीं कर्तव्यें

आपलें चुकतें पाऊल जो फिरवितो आणि जाणारा तोल जो सावरतो, तोच आपला खरा मित्र होय.

— ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

## नातें व प्रेम

नातें हें झाडाच्या आळ्यासारखं असतं. पण मुळांत प्रेमाचं पाणीच नसलं तर त्या आळ्याचा उपयोग काय ?

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## मुलांचीं मनें

मुलांचीं मनें हीं झऱ्याच्या पाण्याइतकींच प्रसन्न व पारदर्शी, पण त्याच्याचसारखी विकार-सुलभ असतात फार. पाणी जसें एकादी क्षुल्लकहि वस्तु त्यांत पडल्यानें विचलित व दूषित होऊन जातें, तसेंच असतें मुलांच्या मनाचेंहि.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( भंगलेलें देऊळ )

## मुलांची धांवपळ

कातोड्यांचीं चपळ पोरें शेतामधल्या ओहोळांतून व लव्हाळींतून लपतछपत पलीकडच्या गारमाळावर निघायला गेलीं. त्यांचा पांगलेला जमाव वाऱ्यावर सोडलेल्या काग-दाच्या चिठ्ठ्यांप्रमाणें पळतांना दिसत होता. सर्वांत मोठीं व चपळ मुलें आघाडीला पळालीं.

— र. वा. दिघे : ( सराई )

## लाडावलेलें जीवन

लाड हें एक अतिशय कृत्रिम जीवन आहे. त्यामुळें लाडास बळी पडलेल्या व्यक्तींच्या मनांत—मग तें मूल असो कीं स्त्री असो—जगाविषयीं खोट्या कल्पना निर्माण होतात.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## कार्याची प्रेरणा

पुढचे पडलें तर मागच्यांनीं आपलें कर्तव्य बजावणें यांतच खरें समाधान आहे, रडण्यांत नाहीं !

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## सणांचा आनंद

खरोखर दसरा, कोजागरी, दिवाळी हे सण सारे योग्य-वेळीं आहेत. पाऊस संपत आलेला. सोन्या-सारखीं पिकें तयार झालेलीं असतात. अशा वेळीं जीवनांत आनंद नि प्रकाश नाहीं आणायचा तर कधीं ?

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## मंगल भाऊबीज

दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीजेचा. त्याच्यासारखा गोड दिवस नाहीं. बहीणभावाच्या प्रेमा-सारखी मंगल पुण्यवान गोष्ट जगांत दुसरी कोणती आहे ?

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## खेळ

खेळ म्हणजे निष्ठा, खेळ म्हणजे सत्यता, खेळ म्हणजे स्वतःचा विसर.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृती )

## सौंदर्याचें दर्शन

वस्तूच्या जवळ गेल्यानें तिचें सौंदर्य प्रगट होतें, परंतु तिचें काव्य मात्र दुरूनच खुलतें. हा नियम माहीत असल्या-मुळेंच चंद्रसूर्य आणि नवलाख तारे इतक्या दूर जाऊन विचरत असतील काय ?

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

### खरा पुरुषार्थ

यश हें तर स्वतःच्या कर्तबगारीवरच अवलंबून असणार. 'सर्व काम' जर देवीनेंच बसल्या जागीं पूर्ण केलें तर माझ्या पुरुषार्थाचें तें मरणच नाहीं का? निष्क्रिय म्हणूनच नीरस जीवन मग मी कसें सासूं?

— महादेवशास्त्री जोशी : (तीर्थरूप महाराष्ट्र)

### पराजयाची भीति

एकवार हार झाली म्हणून काय झालें? प्रत्येक हार ही नव्या प्रयत्नाचें खत म्हणून समजली पाहिजे. पराभवांतून मिळणारें शिक्षण कमी महत्त्वाचें नसतें. विज्ञान-शास्त्रज्ञांच्या सफल झालेल्या प्रयत्नांचीं वर्णनें आपण वाचतों; पण हे सफल प्रयोग करण्यापूर्वीं शंभरपट निष्फळ प्रयोग त्यांनीं केलेले असतात, हें कसें विसरून चालेल? सहजासहजीं असंख्य पराभव जो जिरवतो तोच खरा पुण्यवान्.

— आचार्य कालेलकर : (हिमालयाचा प्रवास)

### निराशा टाका

अपयश आलें म्हणून निराश होण्याचें कारण नाहीं. दगडावर एकोणवीस घाव घातले तरी तो फुटला नाहीं, विसाव्या घावानें फुटला समजा, मग ते पहिले घाव कां अपेशी समजावयाचे? त्या विसाव्या घावाच्या यशाची तयारी पहिले एकोणवीस घाव करीत होते.

— विनोबा भावे : (गीता-प्रवचनें)

### वाचनाचें फल

अत्यंत शुद्ध, अत्यंत प्रतिष्ठादायक आणि अत्यंत मनोरंजनावह असें करमणुकीचें साधन एक वाचन मात्र होय.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : (निबंधमाला)

## संयमाची जरूरी

वाईट पुस्तकें नयेच वाचूं,
निंदास्तुति नयेच ऐकूं,
वाईट वस्तु नयेच पाहूं,
सदोष वस्तु नकोतच, परंतु
निर्दोष अशा वस्तूंचेंसुद्धां फाजील सेवन नको. चवचालपणा कोणताच नको. दारू-भर्जी तर नकोतच, परंतु संत्रीं-केळीं-मोसंबींहि फार नकोत.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## जगावें कसें ?

जगायचें असेल तर मनुष्य म्हणून जगूं या ! पशू-सारखे, दगडासारखे जगण्याकरितां कांहीं आपण जन्माला आलों नाहीं. आणि मनुष्य म्हणूनच आपण मरूं या !

— वि. स. खाण्डेकर : ( हिरवा चाफा )

## इमानदार रखवालदार

कुलुपासारखा रखवालदार त्रिभुवनांत सांपडणारं नाहीं. त्याच्यापुढें पैशाची तिजोरी ओतली तरी त्यानें दारास मारलेली मगरमिठी सुटायची नाहीं. पहारा करतांना त्याला डुलकी लागत नाहीं किंवा भूक-तहानेची बाधा होत नाहीं. त्याला उन्हाचा किंवा शीताचा कधीं त्रास होत नाहीं. लोहाराकडून त्याच्या हृदयावर प्रहार करून तें छिन्नभिन्न केलें तर मात्र त्याचा नाइलाज होतो. जुन्या रोमन शिपाया-प्रमाणें चाकरी बजावतां बजावतां मरण्याचें त्याचे ब्रीदच असतें.

— श्री. कृ. कोल्हटकर : ( कुलूप

## काळी आई

जमीन आमची आई. जमीन आमचा बाप.

जमीन आमचा भाऊ. जमीन आमचा देव.

आमच्या ज़मिनीची योग्यता या जगांत कोणाकोणाला यावयाची नाहीं. साल दरसाल " घ्या, खा " म्हणून माउली सारखी देत असते ! या आईची सेवा केली, तर ती कध्धीं उपाशी म्हणून मारावयाची नाहीं.

— धनुर्धारी : ( पिराजी पाटील )

## शेतकऱ्याचें शब्दचित्र

कां रे बाबा नांगऱ्या तुच्छ ? या भूमातेची सेवा करून जगाला पोसण्यासाठीं धान्य निर्माण करणारा तो कष्ट-मूर्ति शेतकरी, तो कां तुच्छ ? जो थंडी पाहात नाहीं, ऊन-वारा पाऊस-पाणी पाहात नाहीं; पहांट पाहात नाहीं, दुपार पाहात नाहीं, रात्र पाहात नाहीं; चिखल पाहात नाहीं, कांटे पाहात नाहीं; खळ्यांत पीक असलें तर रात्रीं खळ्यांतच आगटी पेटवून झोंपतो; नको पांघरायला, नको आंथरायला, पुनः इतकें सारें करून किती नम्र, किती आदरातिथ्य करणारा ! जो कोंबड्याबरोबर उठतो; सूर्य वर येतांच आपल्या कर्ममग्न हातांनींच त्याला वंदन करतो; नवीन नवीन झाडें लावतो, त्यांची निगा राखतो; बैलांना चारा आधीं घालतो मग स्वतः जेवायला जातो; गुराढोरांना पाणी पाजतो मग स्वतः पाणी पितो; कसें त्याचें गायी-गुरांवर, झाडांमाडांवर, शेताभातांवर, मुलांबाळांवर प्रेम; असा तो शेतकरी, असा जो नांगऱ्या—तो का तुच्छ व हीन ?

— साने गुरुजी : ( श्याम )

## शेतकऱ्याचा स्वभाव

दुष्काळ आले–गेले; सुग्या आल्या–गेल्या; धान्यावर किडी पडल्या; पिकें जळून गेलीं; टोळधाडी आल्या; सावकारांनीं छळलें; पाटील-तलाठ्यांनीं छळलें–सर्व प्रकारचा छळ झाला, तरी आपत्तींनीं जर्जर झालेला शेतकरी, अंगाला कपडा आहे–नाहीं अशा अर्धनग्न स्थितींत, फाटकीं लक्तरें नेसून, डोक्याला तुटकीं मुंडाशीं बांधून, भुकेनें कालवत असलेलें पोट आवळून, चिंतेच्या रेषांनीं भरलेलें कपाळ पुढें करून काळाशीं टकरा देत आहे. अशा स्थितींत धर्म, सत्य, प्रामाणिकपणा यांना बिलगून राहणारा शेतकरी हिंदुस्थानाखेरीज दुनियेच्या पाठीवर कोठेंहि मिळणार नाहीं.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## शाळूची राखण

शाळू आतां पोटऱ्याला येऊन कांहीं दिवस लोटले होते. आणि आतां या टोंकापासून त्या टोंकापर्यंत अवघें शाळूचें रान हिरव्या दाण्यांनीं खचून गेलेल्या कणसांनीं गजबजून गेलें होतें. मधून मधून स्वस्तिकाच्या आकाराचीं आणि पांढऱ्या पैरणी पेहरलेलीं तीं वाकडीं-तिकडीं बुजगावणीं उभीं होतीं आणि कणसांना टोचावयास येत असलेल्या पांखरांच्या थव्यांना पिटाळून लावण्यासाठीं ठिकठिकाणच्या माळ्यावरून गोफणीचे फडत्कार होत होते.

— श्री. म. माटे : ( त्यांचें धन हरपलें )

## दुपारची भात-कापणी

सूर्य माथ्यावर येऊं लागला. कड्यावरचें दहिंवर नाहींसें झालें. त्याऐवजीं कृषिकर्माच्या घामानें भात भिजूं लागलें. खालीं शेतांत पाणी तापलें. आणि वर उन्हाचा ताप. त्रासलेले कामकरी सपासप भात कापूं लागले. सराईची रनाळी दरीदरींत लहरी मारूं लागली. त्या स्वच्छ प्रकाशांत लांबवरची गवताची काडीन् काडी अन् पानन्-पान स्पष्ट दिसत होतें.

— र. वा. दिघे : ( सराई )

## मळणीची तयारी

भात साफ करून वारवण्याचें काम सुरूं झालें. दीपाजी भातांत पळीज फार ठेवतो म्हणून अंधूची अन् त्याची हुजत झाली. मग शेतकरी कोल्हे–हुकीची वाट पाहूं लागले. कोल्हे–हुकीला माप केलें म्हणजे वाढतें असा शेतकऱ्यांचा समज आहे. त्याच्या आधीं शेतांतील देवींची परडी अन् देवाची जत्रा झाली. मग मांडीच्या कण्याची पूजा झाली. मांडीच्या मधीं नारळ ठेवला, उदबत्या लावल्या व फुलें वाहिलीं. सर्व काम खुणांनीं चाललें होतें. कारण मळणीच्या वेळीं शांतता ठेवण्याचा प्रघात आहे. त्या शांत खलाटींत शांत खळें एक प्रकारची गूढता आणीत होतें. जणूं शांत धरित्री माता शेतकऱ्यांना बक्षिस देण्याकरितां तेथें साक्षात् येणार आहे.

— र. वा. दिघे : ( सराई )

## भूमातेचे अलंकार

चंद्र-सूर्य-ताऱ्यांचीं फुलें तिच्या खोप्यांत आहेत. समुद्राचें वस्त्र ती नेसली आहे. फुलांचे हार तिनें घातले आहेत. हिरवी चोळी तिनें घातली आहे. शेष-वासुकीचे तोडे-तोरड्या तिच्या पायांत आहेत. भव्य महान् महीमाता!

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृती )

## सुकाळांतील खेडें

हस्तामागून चित्रा व स्वाती क्वचित पडतात. त्यानंतर सुगी पिकूं लागते. बाजरी काळीशार दिसते. तिळाचीं शेतें पिवळीं दिसतात. शाळू मोत्यांचे घोस घेऊन उठतो. अठरा धान्यें पिकून बाराबलुत्यांची चंगळ उडते. हरळी, कुंदा, बाटूक जनावरांना विपुल मिळूं लागतें. तलाठ्याच्या श्राद्ध-पक्षाला व कोजागिरीला खूप दूध मिळतें. खण, लुगडीं, मुंडाशीं यांची विक्री जोरांत चालते. साळ्याचे माग चालतात. माळ्याचें माळवें विकतें. जत्रा-उरुसांना ऊत येतो. खेळ-तमाशे सुरू होतात.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## दुरून दिसणारे मळे

माळवदावरून पाहिलें कीं, नदीकांठानें व गांवाचे चौफेर संत्री-मोसंबीचे बाग हिरव्या वसाहतीप्रमाणें ठायीं ठायीं दिसतात व त्यांतून सांजसकाळीं मोटांचे 'कर्र कर्र धोः' असे आवाज व मोट हांकणारांच्या ललकाऱ्या व बैलांना व स्त्रियांना उद्देशून म्हटलेलीं अर्थशून्य गाणीं ऐकूं येतात. उन्हाळ्यांत नदीनाले आटले तरी गारवा हटत नाहीं. चुनखडीमुळें नदीचें पाणी स्वच्छ व पाचक बनतें व हिंवाळ्यांत तें इतकें स्वच्छ होतें कीं, डोहाचे तळची वाळू मोजून घ्यावी.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## उसाच्या मळयांतील चालणें

उसांच्या मळ्यांतील चालणें तें ! त्यांतील त्रासापासून एक प्रकारचें सौख्य घ्यावयाचें असतें. पुरुष पुरुष उंच वाढलेल्या उंसाच्या गर्दींतून रानवारा सोसाट्यानें आला, कीं सळसळ होणारा आवाज आमच्या पायांखालीं तुडविल्या जाणाऱ्या पाचोळ्याच्या आणि पेऱ्यांच्या आवाजाशीं मिसळला, कीं तो ऐकून मनाला एक प्रकारचा अवर्णनीय आनंद होत होता.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

•

## शेतांतील वाट

आतां मोठा रस्ता सोडून आमची गाडी कुंपणाच्या बाजूबाजूनें शेताच्या ढेंकळांतून चालली होती. तो शेतांतील ओबड-धोबड बनावट रस्ता सारखा आणि स्वच्छ थोडाच असणार ? एक चाक खालीं, एक चाक वर असें सारखें होत होतें. खडकाच्या एखाद्या मोठ्या टेंगळावरून चाक गेलें कीं मधूनच मोठा हिसका बसत होता. गाडीच्या चाकाखालीं ढेंकळांचा चूर होऊन काळी माती उधळत होती.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## डोंगरांचें मखर

वरघाटांतील दुष्काळी भागांतून पांखरें व भिकार खालीं लोटलें. खलाटींत पाखरांची बुलबुल सुरू झाली. कारण हिरव्या-निळ्या-जांभळ्या डोंगरांच्या मखरांत सराई राजकन्येप्रमाणें बसली होती.

— र. वा. दिघे : ( सराई )

## खेड्यांतील गोठा

चुन्यानं न सांधलेल्या दगडी भिंतीच्या एका कोनाड्यांत रॉकेलचं डबडं जळत होतं, त्याचा तांबूस उजेड गोठ्यांत पडला होता. गाई-म्हशींच्या बैलांच्या आणि पारड्यांच्या सांवल्या हालत होत्या. त्याकडं पाहिलं कीं वाटत होतं, बाहेरच्या झाडांच्या फांद्यांप्रमाणें या सांवल्याहि हालविण्याचा खेळ वारा करीत होता. एखाद्या जनावरानं मधूनच हासडून मारलेली लाथ, गाई-म्हशींच्या तोंडांत भरडलं जाणारा कडबा, गुरांच्या गळ्यांतल्या घंटा, एका नाठाळ खोंडाच्या मानेला बांधलेलं खालच्या फरशीवर घरंगळणारं लाकडी लोढणं, म्हशीची धार काढणाऱ्या दादूच्या कासंडींत आणि उषाच्या सासूबाई आक्कासाहेब गाय पिळीत होत्या त्यांच्या छोट्या चरवींत पडणाऱ्या धारा—यांचे आवाज गोठ्यांत भरून राहिले होते.

— ना. सी. फडके : ( उजाडलं ! पण सूर्य कुठें आहे ? )

## घरांतील गाय

ती गाय आमच्या घराची शोभाच होती, आमच्या घराची देवता होती. आमच्या घरांतील प्रेम व पावित्र्य, स्नेह व सौंदर्य यांची जणू ती मूर्ति होती.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## भारताच्या आधार-देवता

चरखा व गाय या भारतीय भाग्याच्या दोन आराध्य-देवता, आधार-देवता. या दोन देवतांची पूजा पुनरपि जोंपर्यंत सुरू होणार नाहीं, तोंपर्यंत तरणोपाय नाहीं.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## शेतकींतील आनंदीआनंद

आजूबाजूला गव्हाचीं पिकें सळसळत होतीं; कांद्याच्या पोगाऱ्यांनीं व गाजराच्या तुऱ्यांनीं शेतें चित्रविचित्र गालीच्याप्रमाणें दिसत होतीं व त्यांतून बगळे चरत होते. त्तित्तर व लावी पक्षी आपल्या पिलांचे परिवार घेऊन या शेतांतून त्या शेतांत धांवत होते. फळांना वाट धरून झाडें लावलीं होतीं. संतुष्ट शेतकरी ललकाऱ्या मारीत गुरें घरीं हांकीत चालले होते. सबंध दिवस चरून पोट भरलेले पक्षी झाडांवर परमेश्वराचीं संध्या-स्तोत्रें म्हणत होते. जिकडे तिकडे शेतकीच्या जीवनाचा आनंदी आनंद चालला होता.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## शेतांतील सौंदर्य

पाचूनें मढविल्याप्रमाणें हिरवींगार दिसणारीं शेतें, पृथ्वीवरील हिरवळीला खेळविण्याकरितां लहान माडांनीं चुडतांच्या रूपानें वांकविलेले आपले हात, गुंजारवाप्रमाणें भासणारें शेतांतल्या बायकांचें गीत; पक्ष्यांचे विविध व स्वच्छंदी सूर, पावसाच्या वेळीं क्रोधाविष्ट मनुष्याप्रमाणें दिसणारें पण आतां सौम्य मुद्रेनें पहात असलेलें आकाश, या गोष्टी आकर्षक होत्या.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## डोंगराचें टोक

मळलेल्या वाटेनें जातां जातां ते डोंगराच्या एका टोकाशीं आले. तें टोक म्हणजे पृथ्वीला आशीर्वाद देण्याकरतां पर्वतानें पसरलेला हातच आहे असा भास होत होता.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचन-मृग )

## दुष्काळाची मूर्ती

डोळे खोल गेलेले, गालफडें बसलेलीं, दातांच्या कवळ्या बाहेर आलेल्या, झिंज्या अस्ताव्यस्त सोडलेल्या, पोटाला भकाळ्या पडलेल्या, पाठीचीं हाडें बाहेर निघालेलीं, नखें वाढलेलीं, कंबर वांकलेली, हातापायांच्या काड्या झालेल्या, पावलें रक्तबंबाळ झालेलीं, सर्वांगावर वाकळा पांघरलेल्या, गळ्यांत झोळी घातलेली आणि हातांत फुटकें खापर आणि धडकी करवंटी घेतलेली, असें अक्राळविक्राळ स्वरूप धारण करून ही समष्टीरूप क्षुधादेवता जिकडेतिकडे सैरावैरा धावूं लागते.

— शि. म. परांजपे : ( रिलिफ कामें काढण्यांतील उद्देश )

## दुष्काळाची भीषणता

एकामागून एक नक्षत्रें कोरडीं गेलीं. उन्हानें जमिनी फाटून जमिनींत वीतवीत रुंद, हातहात खोल भेगा पडूं लागल्या. तलावांचें व विहिरींचें पाणी खराखरा आटूं लागलें. विहिरीच्या तळाला जाऊन भांड्यानें अर्धा तास पाणी खरडून मोट भरावी तेव्हां ती वर येई. एके ठिकाणीं मेलेल्या आईला तान्हें मूल पितांना त्यांना आढळलें. आई कितीतरी दिवसांची उपाशी होती, ती इतकी वाळून कृश झाली होती कीं, जिवंतपणीं तिला दुधाचा थेंब फुटला असता किंवा नाहीं याची शंका होती. एक गाडी रस्त्यानें गाडीवानाशिवाय चालली होती. मालक व गाडींतून जाणारें कुटुंब गाडींत मरून पडलें होतें. एक रोडका कुत्रा मात्र गाडीखालून चालत होता. गाडींतील मेलेल्या लोकांचा इमानी कुत्रा ते लोक मेल्यावरहि त्यांना सोबत करीत होता.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## दुष्काळाची दैना

झाडें पाहिलीं, पोटांत आग पडावी; मळे पाहिले, पोटांत आग पडावी; गोठा पाहिला, दुःख भडभडून यावें; घरीं गेलों, मुलें माझीं नाहींत, म्हणून गळा भरून यावा. गांव पाहिला, लोक सगळे परागंदा, म्हणून जीव कासावीस व्हावा. असा जिकडून तिकडून दुःखाचा वणवाच पेटलेला !

— धनुर्धारी : ( पिराजी पाटील )

## कोंकणांतील निसर्ग-शोभा

कोंकण आणि देश अशा जणूं कांहीं दोन झडपाच सह्याद्रीच्या दांड्यानें आमच्याकडे आपोआपच सांधल्या आहेत. कोंकणांत नारळीचीं आंणि पोफळीचीं बनेंच्या बनें थाटामाटानें आपल्या चवऱ्या आमच्या मस्तकांवर ढाळीत असतात. समोर समुद्राची रणगर्जना चालू असते आणि आम्ही राजाप्रमाणें ऐटींत आपली स्वारी काढीत असतों.

— द. वा. पोतदार : ( महाराष्ट्रांतील सौंदर्य-स्थळें )

## कोंकणची सृष्टि

शेणानें स्वच्छ सारवलेलें तें अंगण, त्यावर काढलेल्या रांगोळ्या, गेरूनें रंगवून स्वच्छ केलेल्या भिंती, त्यांच्यावर काढलेलीं मनोरम चित्रें, भरपूर खुंट्यांवरून व्यवस्थित रीतीनें ठेवलेले कपडेलत्ते, तें प्रशस्त माजघर, आरशा-सारखें निर्मल असें देवघर, स्वच्छ आणि सुशोभित अशा मडक्यांनीं सजविलेलें स्वयंपाकघर.

— भा. वि. वरेरकर : ( धांवता धोटा )

## कोंकणचें दृश्य

ज्याच्या त्याच्या बागेंत बैल-रहाट सुरू होते. बागेचें शिंपणें चाललें होतें. रहाटाचा कुऊं कुऊं आवाज ऐकावयास येत होता. बैलांच्या पाठीमागून लहानशी शिमटी हातांत घेऊन हांकलणारे मुलगे, त्यांचा आवाज ऐकूं येत होता. पाण्याचे पाट बागेंतून वहात होते. पोफळी, नारळी, केळी, अननस यांना पाणी जात होतें. प्रत्येकाचें घर व घराशेजारीं प्रत्येकाचें केळी–पोफळी–नारळाचें आगर. मोठा सुखी व सुंदर असा तो गांव होता. स्वच्छ, समृद्ध व मुबलक पाणी, सुंदर हवा, पानफुलांची रेलचेल, दाट झाडी.

– साने गुरुजी : ( शामची आई )

## कोंकणचें सौंदर्य

किनारा सपाट; त्यामुळें समुद्राच्या लाटा जणूं त्यावर लोळण घेत आहेत असें वाटतें. शेतावरून खारा वारा वाहूं लागला कीं भाताच्या रोपांची लवलव नकळत नज़र ओढून घेते. केव्हां केव्हां तर कोस कोस पसरलेल्या हिरव्या भूमीवरून जणूं एकादी समुद्राची लाटच निघून गेल्याचा भास होतो. वाऱ्याच्या खारटपणांत कित्येकदां बागांतून येणारा पुष्पगंध मिसळतो आणि त्या मिश्रणाचा एक निराळाच खुषबू नाकाशीं दरवळतो. पश्चिमेला सागरावर आणि दक्षिणोत्तर दिशांना खाड्यांवर शिडांचीं शुभ्र गलबतें पदरांत वारा भरून घेऊन सलील हंसगतीनें तरंगतांना दिसतात.

– प. महादेवशास्त्री जोशी : ( अलीबागचा पाणकोट )

## कोंकणांतील झाडें

कुंपणाकुंपणांतून वासंतिक फुलें उगवलीं होतीं. 'अवचिता परिमळू झुळकला अळुमाळू' हा ज्ञानियांच्या राजाचा अनुभव पदोपदीं येत होता. माडांचीं चुडतें फताडीं अन् पोफळींचीं अटकर; पण दोन्हींचाहि रंग सतेज, हिरवा. तीं आगरें म्हणजे सागरीं शयन करणाऱ्या श्रीविष्णूच्या निळया आस्तरणाला जणूं वेलबुट्टीची किनार ! पुढें तर आम्ही रस्ता सोडून माडांच्या बागेंतच शिरलों. आमच्यावर हिरवीं छत्रचामरें ढळूं लागलीं. एवढें राजवैभव मिळाल्यावर आम्हीं तरी चालण्याची लगबग कां करावी?

— महादेवशास्त्री जोशी : ( मुरुडचा जंजिरा )

## माडांच्या रायांतील सौन्दर्य

जिकडे तिकडे माडांच्या बागाच बागा दिसत होत्या. त्यांच्याकडे पाहिलें की अर्धांत्रीं हिरवागार गालिचा पसरला आहे असा भास होई. समोर लहानसा मोकळा मळा, त्याच्यापलीकडे वाळूच्या टेंकड्या आणि त्याच्या-पुढें क्षितिजापर्यंत टेंकलेला शांत निळा समुद्र. आम्ही टेंकडीवर गेलों तेव्हां मालाची बोट जात होती. दूर क्षितिजावर तिच्या एंजिनाचा धूर वरच्या ढगांत हळूहळू मिसळत असलेला दिसत होता. उजवीकडच्या लहानशा तळ्यांतलीं अर्धवट मिटलेलीं कमळें, शेतांकडून माडांकडे परत जाणारे पोपट आणि काजूंना आलेला नाजूक हिरवा, पिवळा मोहोर यांत अधिक सुंदर काय होतें असें कोणीं मला विचारलें असतें,तर खरोखरच त्याचें उत्तर मला देतां आलें नसतें.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## कोंकणांत शिरणारा पाऊस

पाऊस मलबारकडून पश्चिम किनाऱ्यानें समुद्राच्या लाटा खडकावर व किनाऱ्यावर आपटीत, नारळी-सुपारीच्या बागांचे शेंडे हालवीत, ताल व शाल वृक्षांना वांकवीत, रायांच्या पाचोळ्यांत आंब्यांच्या राशी पाडीत, सागाच्या जंगलांतील वाळलेल्या पानांवर कोट्यवधि टपोरे थेंब शिंपून मोठें परचक्र आल्याप्रमाणें आवाज काढीत सोसाट्यानें कोंकणांत येतो. मग त्याच्या धारांतून धुरणाऱ्या डोंगरांचीं शिखरें दिसेनाशीं होऊन बरसात सुरू होते.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## केळीं-पोफळींत शिरलेला वारा

रात्रीं हस्ताच्या पावसाची सर अचानक पडून गेली होती. कुळागारांतल्या केळींचें हात मोडून अन् पोफळींचे शेंडे पिळवटून वाऱ्यानेंहि ‘ कुंज-क्रीडा ’ केली होती. त्यामुळें आज सकाळीं बागेंत पोफळांचा नुसता सडा पडला होता.

— महादेवशास्त्री जोशी : ( वृंदा )

## दऱ्यांतील अंधार

दऱ्याच्या ज्या खोल भागांवर सायंप्रभा पसरलेली नव्हती. ते भाग झपाट्यानें काळवंडत चालले होते. भरतीचें पाणी किनाऱ्यावरील सखल भागांत जलद पसरावें, त्याप्रमाणें तमिस्रेचा गडद अंधार दऱ्यांच्या या भागांना प्रथम व्यापून टाकीत होता.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

## कोळयांचें जीवन

काहीं होड्यांतून धूर निघत होता असें मीं म्हटलें तर कोणीं भलताच संशय घेऊं नये. तो चुलींतला धूर होता. नाळीजवळ ठोकलेल्या फळ्यांवर मांडलेल्या चुलीवर त्यांची ( कोळ्यांची ) भाताची हंडी चढली होती. मागच्या अंगाला उभारलेल्या ठेंगण्या छपराखालीं त्यांची निजायची जागा होती. विश्रांतीची, पानतंबाखू खाण्याची जागाही तिथेंच डोलकाठीच्या मुळाशीं. होडी हेंच त्यांचें घर, पण स्थावर मात्र नव्हे. जाळीं आणि गळ हीं त्यांचीं उपकरणें. माशांचें महापूर पीक पिकविणारा दरिया हें त्यांचें शेत. समुद्रावरच त्यांचा जन्म जायचा.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## होड्यांनीं आणलेली कमाई

पाण्याला ओहोट होती. त्या अर्धवर्तुळाकार किनाऱ्याला मध्यभागीं सुपाच्या आकाराची जागा कोरडी झाली होती. दोन होड्या तिथें उभ्या राहून त्या जागेवर मारून आणलेल्या शिकारीची रास घालीत होत्या. एखाद्या बांधकामावर गाडीवाल्यानें 'लाभऽऽ दोनऽऽ' म्हणत विटांच्या जोड्या फेकाव्या, तसे ते कोळी माशांच्या त्याच वजनाच्या गुबगुबीत जोड्या कोरड्या जमिनीवर टाकीत होते. रास चढत होती, घरंगळत होती. जगांत जिथें जित्या जिवांची कदर उरली नाहीं तिथें मेलेल्यांचा कोण केवा ! भरतीच्या ताणावर मच्छीमारीला गेलेल्या होड्या ओहोटीच्या पाण्यावर सुखेनैव परतल्या होत्या.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## अंधारांतील खाडी

समोर पांच हातांवर पसरलेली वाघोटनची खाडी; पण तिचें पाणी अंधाराशीं एकरस झाल्यामुळें वेगळें दिसत नव्हतें. भोंवतीचें तें चिमुकलें सुंदर गांव झोंपलें होतें; पण ती खाडी मात्र जागृत होती. ती आपल्या लाटांच्या अनंत हस्तांनीं तटाला धक्के देत चुबुक् चुबुक् आवाज उठवीत होती. तिनें झोंपावें अशी जगच्चालकाची आज्ञाच नव्हती, त्याला ती तरी काय करील ! तिच्या दुसऱ्या तीरावरचे डोंगर मात्र केवळ छाया मात्र दिसत होते. जणूं भूतयोनीचे मुकादमच !

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## कोंकणचा बाजार

किती तरी वर्षांनीं मी कोंकणच्या भूमीवर पाय ठेवीत होतों. तांबड्या मातीचा रस्ता तुडवीत मुक्काम गांठायला जात होतों. खाजे म्हणजे गोडी शेव ही कोंकणची सर्व-सामान्य मिठाई. तिचीं दुकानें दुतर्फा मांडलेलीं होतीं. नारिंगी रंगाचीं ताजीं पोंफळें, आगरांतल्या विड्याच्या पानांचे पुडे, ‘ घावरसुन आला जोगी, गोवर माखून बसला अंगीं ’ म्हणून कोंकणांतल्या मुली ज्याच्याबद्दल उखाणा घालतात ते कोहळे, वाटोळीं गुबगुबीत पपनसें, पिकून गर्द जांभळीं झालेली हसाळों, चिनें, कणगरें, अळकुड्या असा खास कोंकणचा कंद-फुलांचा संभार पुढें मांडून कुळ-वाडणी रस्त्याच्या कडेनें विक्रीसाठीं बसल्या होत्या. मी तो मांड पाहूनच तृप्त झालों.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## सह्याद्रीचें सौन्दर्य

सह्याद्रीच्या हिरव्या खोऱ्यांतील निसर्गाचा सचित्र ग्रंथ चाळतांना कोणाला कंटाळा येईल? गवतांत त्याला संशाची वीण दिसे, तर पायांखालून मातीच्या रंगाच्या लाव्हऱ्या भुर्रर्र करून आवाज करीत उडत व त्याच्या विचारांची साखळी तोडीत. रानांतील निरनिराळ्या पक्ष्यांची मंजुळ साद ऐकतांना त्याचा जीव वेडा होई. कुठें मोर ओरडत, सकोत्रीं आडवीं जात, कीर-रावे-हरेळ वडाच्या झाडावर गर्दी करतांना दिसत.

— र. वा. दिघे : ( सराई )

## डोंगराची शिकवण

प्रत्येक टेकडी आम्हांला भूमीपासून उंच आणि गडाच्या जवळ नेत होती. आम्हांला धाप लागली आहे का घाम निथळला आहे तें पहाण्याची त्यांना काय गरज! उन्नतीचा मार्ग हा नेहमींच कष्टाचा असतो, खडतर असतो, हें त्या मौनानेंच आम्हांला पटवीत होत्या आणि आम्ही निमूटपणें तें पटवून घेत होतों.

— महादेवशास्त्री जोशी : ( 'प्रचंड' तोरणा )

## डोंगरावरून दृष्टिक्षेप

डोंगर चढतांना अधून मधून सिंहावलोकन करण्यांत करण्यांत मोठी गंमत असते. टप्पा-टप्प्याला नवे नवे प्रांत दिसूं लागतात. क्षितिजांचा घेर वाढतो. आपण जगापेक्षां उंच असल्याची ऐट चढते. क्षणभर विश्रांति घेतल्यानें धामावणारें हृदयही प्रकृतीवर येतें.

— महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

## सिंहगडाचें माहात्म्य

या गडाचें माहात्म्य वर्णायचें तर इथें शिवरायांचीं पदतलें उमटलीं आहेत. इथें तानाजीचा आत्मयज्ञ धगधगला आहे. इथें लोकमान्यांनीं हिंदभूच्या स्वातंत्र्याचें मनन-चिंतन केलें आहे; आणि त्यामुळें या भूमीला त्रिगुणं पावित्र्य लाभलें आहे.

– महादेवशास्त्री जोशी : ( तानाजीची वीरशय्या )

## रायगडाचें दर्शन

तो काळ्या कातळाचा रायगड आतां आमच्यासमोर आडवा पसरला होता. मला वाटलें, तो आपल्या टाचांवर उभा राहिला आहे. वास्तवापेक्षां अधिक उंच होऊन विश्वंभराकडे जणूं उडण्यासाठीं पंख मागतो आहे. चांदण्याच्या रुपेरी रसांत न्हाऊन त्याचें काळेंपण अधिक स्वच्छ झालें होतें. 'पुष्पसंगें मातीस वास लागें' म्हणतात, पण इथला प्रकार उलट होता. त्या कातळानें आपल्या अंगावरचें चांदणेंच शाम-शबल करून टाकलें होतें. त्याचें तें दर्शन छातीवर दडपण आणणारें होतें.

– महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतीची राजधानी )

## गडाची वाट

बहुतेक गड हे द्वाड असतात. आपल्याला हवी तेथून ते वाट देतीलच असा नेम नसतो. ते मोठे अन् आपण छोटे; तेव्हां त्यांच्या कलानेंच आपल्याला चढावें लागतें आणि त्यासाठीं आधीं निरर्थक कित्येक मैल तुडविणें भाग पडतें.

– महादेवशास्त्री जोशी : ( लोहगड-विसापूर )

### रंगांच्या छटा

हत्तीच्या संथ चालीमुळें जसजसे ते डोंगर चढत गेले, तसतशी पंचमढीच्या पंचक्रोशींतील गिरिकंदराची शोभा त्यांच्या डोळ्यांत भरूं लागली. आदल्या रात्रीं पावसाची जोराची सर पडून गेलेली होती. त्यामुळें जंगलांतील पांढुरक्या तांबूस जमिनीवर लाल पाचोळ्याचा थर जागो-जाग पसरला होता व एक प्रकारच्या रानगंधानें वातावरण कुंद होऊन गेलें होतें. खालीं तांबूसलाल जमीन, वर पावसानें स्वच्छ न्हालेल्या साल-वृक्षाची हिरवीगार छाया आणि त्यावर पसरलेलें साभ्र सुनील आकाश यांचें रंग-वैचित्र्य जितकें आकर्षक होतें, तितक्याच पावसानें धुऊन निघालेल्या डोंगराच्या शिलाप्रस्तरांतील काळ्या, निळ्या, जांभळ्या, किरमिजी, मोरपंखी, तांबुस वगैरे निरनिराळ्या रंगाच्या छटाहि मनाला आल्हाद देत होत्या.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

### काळा कडा

एक अक्राळविक्राळ काळा कडा काळ्या कुट्ट झाडींत डोंगराच्या निम्म्या उंचीवर, डोंगराच्या बैठकीपासून पुढें झुकला होता. एक हजार फूट उंचीचा एखादा काळा-कभिन्न कातोडी डोंगराला पाठ लावून डोकीवर उंच असलेले कपरे पकडून उभा राहिला तर त्याची छाती जशी दिसेल तसा काळा कडा दिसे. काळ्या कड्यानें डोंगराचा निम्मा बोजा न वाकतां खांद्यावर घेतला होता. पावसा-ळ्यांत काळ्या कड्यावरून एकापेक्षां एक प्रचंड धबधबे खालीं कोसळत.

— र. वा. दिघे : ( सराई )

## शिवथर घळ

अर्ध्या घाटांत आल्यावर उजव्या हाताला जणूं पाताळांत असल्यासारखी ती दिसते. गांभीर्य हेंच तिचें जातिनाम म्हटलें पाहिजे. दोन्ही अंगीं तुटलेले काळेभोरकडे अन् पायथ्याशीं दाट हिरवी झाडी, अशा स्वरूपांत ती वरून दिसते. खालच्या वरंधें गांवापासून ती सहा मैलांवर आहे, खडकांत लेण्यासारखी खोदलेली आहे. तिची लांबी सव्वाशें फूट अन् रुंदी पाऊणशें फूट आहे. एक लहानगा जलप्रपात अवखळ बालकासारखा तिच्या कुशींत जीव लोटीत आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतींची राजधानी )

## गुहेंतील वसतिस्थान

त्या काळ्या पाषाणाच्या उदरांत पोखरून पोखरून एक घुमट कोरला होता. त्या घुमटाच्या पोकळींत बारीक बारीक कोठड्या किंवा ओवऱ्या वरपर्यंत होत्या. त्या खोल्यांचे वर्तुळाकार मजले खालपासून वरपर्यंत एकाला एक लागून राहिले होते. प्रत्येक मजल्याला ओवऱ्यांच्या पुढें एक एक सज्जा होता व तो वर्तुळाकार घुमटांत फिरवला होता. त्या सज्जांत जाण्याकरितां एक जिना दगडांत कोरला होता. तळमजला सोडला तर वरच्या कोणत्याहि कोठडींत जावयाचें म्हणजे ह्या जिन्यानें जावें लागे. गुहेंत दिवसांदेखील काळाकुट्ट अंधार असे. गुहेला एकच तोंड होतें. बाहेरून आंत व आंतून बाहेर जाण्याला हा एवढाच मार्ग होता.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## डोंगरांतील आवाज

विजांचा कडकडाट, मेघांचा गडगडाट, कोसळणाऱ्या कडेकपारांचे भयंकर आवाज, वाऱ्याचें गोंगावणें, वाऱ्यानें मोडणारीं झाडें-फांद्या यांचे कर्कश आवाज, यांनीं काळ-दरी घुमूं लागली. वीज पडली किंवा दगड गडगडला किंवा कडा कोसळला कीं त्याच्या आवाजाचे पडसाद काळ-दरींतून व आसपासच्या खोऱ्यांतून कितीतरी वेळ कंप काढीत राहात. विजेच चमकारा लवला कीं अंधारांतल्या ढगाला सह्याद्रि व सह्याद्रीला ढग दिसे. ढगानें सह्याद्रीकडे पाहून हुंकारले कीं तोंडीस तोंड म्हणून सह्याद्रि पण त्या हुंकाराचे प्रतिध्वनि कड्यावरून व घळींतून घुमवी व युद्धाचें आव्हान स्वीकारी. प्रबळ शत्रूप्रमाणें कोणीहि पड खावयास तयार होईना.

— र. वा. दिघे : ( सराई )

## उंचावरून पाहिलेला देखावा

अतिशय उंच उंच वाढलेलीं झाडेंसुद्धां तेथून अतिशय खोल दिसत होतीं. आणि आपल्याकडून आकाशांत फार उंच भराऱ्या मारणारे पक्षीसुद्धां तळच्या जमिनीवरच चालत आहेत कीं काय असा त्या उंच शिखरावरून भास होई. तळचीं माणसें तेथून खुजीं दिसत, शेतकऱ्यांनीं लाविलेलीं ओबडधोबड शेतें कारागिरांनीं तयार केलेल्या नीटनेटक्या व नक्षीदार गालिच्याप्रमाणें भासत आणि विस्तीर्ण नद्या अत्यंत सूक्ष्म अशा रजतधारेची बुद्धि उत्पन्न करीत.

— शि. म. परांजपे : ( शिवाजीचें पुण्याहवाचन )

## प्रवासांतील अडथळे

प्रवासांत अशीं आडमेळीं यायलाच हवींत; त्या शिवाय त्याला रुचि नाहीं. पण ‘ आतां काय करावं ’ अशी विमूढ अवस्था येण्याच्या क्षणीं त्या दूर व्हायला पाहिजेत. चंद्रावर ढग तर वाहून यावेत, पण तो कायमचा मात्र आच्छादला जाऊं नये, यांत खरी गंमत आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( प्रचंड तोरणा )

## डोंगरदरींतील प्रवास

अरण्यांत मधेंच एकादा मठ दिसावा तशीं हीं स्टेशनं दिसत. भागवथीपूरम् स्टेशन सोडल्यापासून टेनेमलाइपर्यंत चार मोठे बोगदे लागले. तारेवर कसरत करावी त्याप्रमाणं आमची गाडी हळू जपून तोल सांवरून चालली होती. उंच प्रचंड पर्वत-शिखरांची रांग आमच्या गाडीवर डोकावून पाहात होती आणि एकाद्या खोल भयंकर दरीलीं वळसा घालून गाडी खालीं जाऊं लागली कीं ती अगदीं दरींत कलंडत असल्याचा भास होई.

— सौ. कमला फडके : ( त्रिवेंद्रमची सफर )

## घाटांतला मुक्काम

ऐन मध्यरात्र असावी. मी अंथरुणावरून उठून बसला राहिलों, खिडकी उघडली आणि बाहेर डोकावून पाहिलें. गाडी रिव्हर्सिंगवर उभी होती. आकाश अनपेक्षित ढगांनीं भरलेलें होतें. एकादी चांदणी मध्येंच लुकलुकलेली दिसत होती. एका बाजूला सह्याद्रीचा डोंगर एकाद्या अजस्र कृष्ण-छायेप्रमाणें दिसत होता. दुसऱ्या बाजूला पश्चिमेकडील वाऱ्याचा विस्तार एकाद्या झोंपीं जाऊन घोरत पडलेल्या राक्षसासारखा भासत होता.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## वणवा

आमची नजर समोरच्या डोंगरावर गेली, तर तिथें वणवा लागलेला. उभ्याआडव्या तेजाळ कांपऱ्या रेषेंत ती आग चरत चरत जात होती. मधूनच किराळें उडत होतीं. धूमरेखा आकाशाच्या पोकळींत रिंगत होत्या. उजवीकडचा भलामोठा तुकडा करपून काळा ठिक्कर पडला होता.

— महादेवशास्त्री जोशी : ( राजगड )

## कड्याच्या पायथ्याशीं

कड्याखालचें रुंद पाठीचें तें टेंकाड. जणुं पाणघोडाच. त्याच्या अंगावरचें तें मेट. डाव्या हाताच्या डोंगरावर एकाखालीं एक कुणगे आंखल्यामुळें निर्माण झालेली ती जणुं दिव्य लोकाची सोपानपरंपरा किंवा ‘ भुवनसुंदरा ’ची ‘लिवलीलत उदरशोभा’ उजव्या हाताला खडेगोटे नसलेल्या आणि सुकल्या गवतामुळें पिंवळसर दिसणाऱ्या, एकमेकींत आडव्या-तिडव्या घुसलेल्या त्या टेंकड्या जणुं मातबर जमीनदाराच्या अंगणांत येऊन पडलेल्या भाताच्या राशीच.

— महादेवशास्त्री जोशी : ( तानाजीची वीरशय्या )

## पहाडी प्रदेश

जिकडे तिकडे काळे पहाड आपल्या रुंद छात्या काढून उभे होते. मोठमोठाले तुटलेले कडे पावसाळ्यांत उतरणीवरून लोटत येऊन कशाला तरी अडकून अधांतरीं लटकून राहिले होते. ते केव्हां तुटतील याचा नेम नव्हता.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## वायूंचा संगम

तिथल्या ( ब्रह्मगिरी ) वाऱ्याच्या वाहणींत एक निराळेंच चैतन्य अनुभवायला मिळालें. विचार केल्याअंतीं तें वायूंच प्रयाग होतें. देशावरचा अन् कोंकणचा असे दोन वारे त्या ठिकाणीं उराउरीं भेटत होते. उभयतांचे द्वैत मोडत होतें. कोंकणांतल्या वाऱ्यानें हापूस आंब्याचा आणि काप्या फणसाचा स्वादुगंध आपल्या देशावरच्या भावाला उपायन म्हणून आणला असावा. देशावरच्या वाऱ्यानें कशाची बरें प्रतिभेट आणली असेल ? कोंकणचा वारा ' झूंझूं ' या शब्दानें सागरतांडवाच्या फेसाळ गोष्टी आपल्या दादाला सांगत होता. देशावरचा भाऊ गोदा-प्रवाहाचें आणि मावळभूमीचें इत्थंभूत वर्तमान त्याला निवेदीत होता.

— महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

## पठारावरील सोनें

एका बाजूला सगळा निवडुंग तर दुसऱ्या बाजूला सगळ्या पिवळ्या फुलवंती कण्हेरी हा देखावा निश्चित आश्चर्यजनक होता. तो सगळा उतार जणुं सोन्याचा झालेला मी पाहात होतों. जशा कांहीं नववधू पिवळी ' अष्टपुत्री ' पांघरून बोहल्यावर चढण्यासाठीं सजून राहिल्या आहेत.

— महादेवशास्त्री जोशी : ( मल्हारि मार्तंड )

खरोखर या जगांत दुसऱ्याच्या श्रमावर जगणें यासारखें पाप नाहीं.

- साने गुरुजी : ( श्यामची आई )

## पावसाळ्यानंतरचे डोंगर

पावसाळा संपला होता. श्रावणांतला ऊन पाऊस संपला होता, भाद्र्यांतील तापी बंद झाल्या होत्या, अश्विनाचें सोनेरी उन्ह तिरपें होऊन हिरव्या खलाटीवर पडूं लागलें. चौफेर पावसानें हिरवळलेले डोंगर, निळें आकाश डोक्यावर घेऊन उभे होते. मधून काळ नदी खळबळ करून वाहत होती.

— र. वा. दिघे : ( सराई )

## डोंगरावरील वैराग्य

समाधीनंतर व्युत्थान व्हावें त्याप्रमाणें आम्ही टेकडीवरून खालीं उतरलों. उतरतांना निराळा रस्ता पकडला. जवळ जवळ सुकून गेलेल्या पानांची शोभा चोहोंकडे दिसत होती, यामुळें जेथें तेथें वैराग्यचें सूचन होत होतें.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशाचा प्रवास )

## सरोवराकांठचा पर्वत

येथें ( झांशीच्या वाटेवर ) समोरच्या बाजूला एक एक उंच पर्वत आसमंतांतल्या जंगलास आशीर्वाद देत उभा होता आणि पाण्यांत पाहणाऱ्यांना आपलें उलटें दर्शन घडवीत होता. दाढी राखून डोकें तासणाऱ्या मुसलमानासारखें ह्या पर्वतानें आपल्या पायथ्याशीं जंगल वाढवून डोक्याची चम्पी केली होती.

— आचार्य कालेलकर : ( नदीचें सरोवर )

मृत्यूचे सर्व फायदे ज्यांत आहेत, पण तोटा मात्र एकहि नाहीं, अशी एक गोष्ट जगांत आहे आणि ती म्हणजे झोंप!

— अनंत काणेकर

## हिमालयांतील सोनें-रुपें

मीं हिमालयांत असा देखावा एकदां पाहिला होता. खालीं स्वच्छ व शुभ्र बर्फ व वर पिवळें अनंत अंबर. खालीं चांदी-रुप्याचीं शिखरें व वर सोन्याची छत्री !

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## हिमालयांतील पहाड

अरेबियन नाइट्समध्यें किंवा पंचतंत्रांत एका गोष्टींतून दुसरी गोष्ट फुटते त्याप्रमाणें या पर्वतशिखरावर मांड ठोकून बसलेला एक नवाच डोंगर उपस्थित झाला ! चार मजुरांच्या खांद्यावरील आरामखुर्चीवर एखादा अमीर बसला असावा, त्याच गंभीर भव्यतेनें आणि आपल्या महत्तेचें परिपूर्ण भान असावें अशा स्वाभाविकपणें तो पहाड विराजमान झाला होता. तो जर उभा राहिला असता तर ? तर मला वाटतें आकाशाचा चांदवा फाटलाच असता.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयांतील प्रवास )

## हिमालयांतील इंद्रधनुष्य

हिमालयाच्या हवेंत थोडी जरी आर्द्रता जमली कीं इंद्रधनुष्याचें दर्शन हें घडायचें ! ह्या वेळीं समोरच्या डोंगरावर-डोंगरावरील आकाशांत नव्हें तर डोंगराच्या वक्षस्थलावर-इंद्रधनुष्याचा एक पट्टा दृग्गोचर होत आहे. हिरव्या झाडीच्या पार्श्वभूमीवर तें निघाल्यामुळें थोडेसें कृष्ण होतें. परंतु त्यामुळें त्याच्या मोहकतेंत कोणतेंच न्यून आलें नव्हतें. पळती मोटार जसजसें आपलें तोंड फिरवी, तसतसें इंद्रधनुष्यहि स्थानांतर करीत असें.

— आचार्य कालेलकर : ( बिल्वाश्रमाचें पुनर्दर्शन )

## मेघराज आला

आणि मग पाऊस येतो. जणूं श्यामल कृष्णच इंद्र-धनुष्यानें सजून येतो. आकाशांत वाद्यें वाजूं लागतात. आला, मेघराज आला. धरित्रीला भेटायला भाऊ आला. प्रेमानं ओथंबून आला. आणि कवि म्हणतो "हा भाऊ रिकाम्या हातानें नाहीं आला. त्यानें हिरवें पातळ आणलें आहे आणि निर्झरांच्या संगीताच्या तोरड्या आणल्या आहेत."

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## ढग जमूं लागले

दूर क्षितिजाच्या एका कोंपऱ्यांत तळहाताएवढा एक काळा ढग हळूच पाण्यांतून वर डोकावून पहाणाऱ्या माशा-प्रमाणें हालचाल करीत होता. त्या ढगाकडे मी कौतुकानें निरखून पाहूं लागलों. गुलामगिरीनें गांजलेल्या राष्ट्रांत एकाद्या एकाकी देशभक्तानें आपलें अस्तित्व धैर्यानें दर्शवावें, तसा तो छोटा मेघ वाटला मला. मी पाहत होतोंच. क्षणाक्षणाला त्याचा आकार वाढूं लागला. हां हां म्हणतां त्या माशाचें मांजराच्या पिलांत आणि त्या काळ्या मांजराच्या पिलाचें मोठ्या प्रचंड हत्तींत रूपांतर झालें. तो काळा हत्ती पुढें पुढें सरकूं लागला. त्याच्यामागून अनेक लहानमोठे हत्ती दिसूं लागले. रानटी हत्तींच्या कळपानें सारें आकाश व्यापून टाकलें. आतां लवकरच पाऊस पडणार, आपल्या सोंडेंतून भरून आणलेलें स्वर्गंगेचें पाणी छोटेमोठे हत्ती तापलेल्या पृथ्वीवर उधळून तिला शांत करणार, या कल्पनेनें माझें मन आनंदित झालें.

— वि. स. खांडेकर ( कुठं आहे तो मेघ )

## गहिंवरलेलें आकाश

बाहेर एकाएकीं प्रचंड वादळ सुरू झालें. धों धों वारा वाहत होता. आकाशांत अकस्मात् ढगावर ढग आले. एका क्षणापूर्वीं तेथें अनंत तारे चमचम करीत होते, आतां एकहि दिसेना. प्रसन्न आकाश शतधारांनीं रडूं लागलें.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## काळ्या ढगांचें छत

भाद्रपदाच्या पहिल्या दिवशीं आकाशांत पावसाचें अगदीं चिन्ह नव्हतें, उलट त्या दिवशीं सकाळीं पाऊस उडवणारें धुकें दरींतून निळ्या डोंगरांना वाफारा देत होतें. परंतु त्याच दिवशीं संध्याकाळीं एक मोठा पांढरा ढग दक्षिणेच्या बाजूनें सारंग खिंडींतून हळूहळू लोटत लोटत आला व डोंगराच्या अंगानें काळ्या कड्यापर्यंत पसरला. थोड्याच वेळांत त्यानें काळ्या कड्याला दुपेटा बांधला व काडदरीच्या रानभागावर डोंगरकट्यारीवर अंधेरी केली. काळ्या कड्यापासून वर भीमाशंकर व खालीं महाबळेश्वर-पर्यंत एकाच काळ्या ढगाचें एक काळें छत तयार झालें. विजा, ढग, पाऊस, वारा यांनीं सह्याद्रिवर युद्ध पुकारलें. टपोऱ्या थेंबांच्या पावसाची एक मोठी सर सुरू झाली. पावसाचे थेंब इतके मोठे होतें कीं, पागोळ्यांत पाऊस माईना.

— र. वा. दिघे : ( सराई )

## पर्जन्याचें आगमन

वाजत गाजत गर्जत येऊन त्यानें तापलेल्या कस्तुरीच्या काळ्या वावरांत अमृताची बरसात सुरू केली कीं लाखों कमळें फुलल्याप्रमाणें मातीचा सुगंध पसरतो.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## ढगांचा तट

आमची होडी किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या रोखानें निघाली. सकाळचा पाऊस आतां नव्हता; पण ढगांनीं सूर्यापुढें उगाच तट उभारून ठेवला होता. अधूनमधून तो ढासळे आणि किल्ल्यावर प्रकाशाचा लोंढा ओते. पण पुढें तो ढगाआड झाला कीं समुद्राच्या पृष्ठभागासह उदासवाणा बने. 'तुष्टा रुष्टाः क्षणे क्षणे' अशी त्याची आणि त्याला उत्सुकतेच्या डोळ्यांनीं पाहणाऱ्या आमची अवस्था होत होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( मुरुडचा जंजिरा )

## पावसाळी आभाळ

एकदम गार वारा सुटला. पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यांनीं वर आकाशांत पाहिलें तों ढग गोळा होऊं लागले. जणूं कोणी मोठा मेंढपाळ हजारों मेंढ्या, बकऱ्या, कोंकरें घेऊन चालला होता. का आकाशांत मोठी सर्कस उतरली होती ? किती प्रकारचीं हीं जनावरें ! सिंह आहेत, वाघ आहेत, घोडे आहेत, हत्ती आहेत, ससे आहेत, कुत्रे आहेत; रानटी व माणसाळलेलीं दोन्हीं प्रकारचीं जनावरें तेथें होतीं. आणि ते पहा भुजंग ! शेंकडों फणांचे भुजंग. मध्येंच त्यांच्या फणांवर मणी जणूं चमकत व डोळे दिपत. सर्कशींत सापांचेहि खेळ आहेत वाटतें ? कोणी गारुडीहि सर्कशींत आहे वाटतें. सापांना अंगावर खेळवणारा कोणी अमेरिकन थोरो त्या वरच्या सर्कशींत होता का ?

— साने गुरुजी : ( क्रांति )

## पर्जन्य-वृष्टीचें दृश्य

पावसाची झिम्‌झिम् सुरू होती. पण पश्चिम क्षितिजावरल्या एका पांढुरक्या ढगाच्या आडून लकाकणारें सूर्यबिम्ब खिडकीच्या धूसर तावदानानें तळपत असलेल्या विद्युद्दीपाची आठवण देत होतें. त्याचा फिका प्रकाश अतिवृष्टीनें चिंब झालेल्या सृष्टीवर पडून तिला विशोभित पांढुरता आली होती. त्या प्रकाशांत छावलेल्या घरांवरील पावसानें शेवाळून बुरसलेल्या कौलारांत जो एकादाच नव्या कौलांचा लाल लाल रंग दिसे, तो एकाद्या जुन्या मलिन वस्त्राला नव्या धाग्यानें केलेल्या रफूसारखा वाटत होता.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( चंदनवाडी )

## पहिल्या पावसाची भेट

वाफ्यांत पांचूचा रोह रुजला. नीलमण्यांना अंकुर फुटल्याप्रमाणें वेलीचे ताणे पसरले. इतक्यांत वळवाचा एक पाऊस पडला. जणूं काय मोत्यांचाच वर्षाव झाला. जिकडे तिकडे मातीचा सुगंध सुटला. गारीगार झालें. आंबा मोहरास आला होता. त्याला हुशारी येऊन तो जोरानें बहरला. घमघमाट पसरूं लागला. कोकिळा ठायीं ठायीं आंब्याच्या पालवींतून टाहो फोडूं लागल्या.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

आपल्या पाणीदार डोळ्यांतील अक्कल आणि आपल्या पिळदार मनगटांतील जोर हें प्रत्येकाचें खरें सर्टिफिकीट आहे. तें विसरून साहेबांच्या सहीच्यीं चिटोरीं तसबिरींत बसविण्यांत काय भूषण आहे ?

— शि. म. परांजपे : ( सर्टिफिकीट )

(५१)

## सकाळचा पाऊस

दुसऱ्या दिवशीं सकाळ उगवली ती काळ्या ढगांचा बुरखा पांघरून. मधून मधून पाऊसाहि गुलाबपाणी शिंपडूं लागला. पूर्वेला सूर्य उगवला होता हें निश्चित, पण ढगांनीं त्याच्या दर्शनांत व्यत्यय आणला होता. चैत्रांतला पाऊस म्हणजे आवडता पाहुणा. पण तो सकाळींच आल्यामुळें बेभरंवशाचें कूळ समजून आम्ही त्याची पर्वा न करतां मार्गस्थ झालों.

— महादेवशास्त्री जोशी : ( मुरुडाचा जंजिरा )

## पावसाळ्याचें वर्णन

मृग आणि आर्द्रा हीं दोन नक्षत्रें बरसून गेल्यामुळें आकाश किंचित् निवळलें होतें. सभोंवतालच्या रखरखीत टेकड्यांवर वर्षाऋतूच्या सिंचनामुळें हिरवळीची रोमराजी थरारून उठली होती व कालव्याकांठची झाडी सगळी न्हाऊन निघाल्यामुळें तिच्या हिरव्या रंगाला मनोहर तजेला आला होता. दूर अंतरावर कुठें तरी पडत असलेल्या पावसाचे जे गर्द निळे पट्टे क्षितिजाच्या पश्चिम भागावर दिसत होते, त्यांतून सूर्याचें बिंब जेव्हां मधेंच दृष्टीस पडे, तेव्हां स्वतःच्या मस्तकावर कोसळणाऱ्या स्वर्गंगेच्या झोतांत पृथ्वी बुडून जाऊं नये म्हणून शंकरानें दयार्द्र होऊन आपला तृतीय नेत्र तिला दटावण्यासाठीं उघडला आहे कीं काय असा भास होई; व त्या दिशेनें येणाऱ्या थंड वाऱ्याच्या झुळुकेबरोबर जो पाण्याचा एखादा दुसराच टपोरा थेंब अंगावर मधूनच पडे, तो त्या दयाघनाचा करुणाश्रु असावा.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

## पावसाची सर

अगदीं लख्ख ऊन पडलेलें दिसतें बाहेर ! छत्री ही पदवी-प्रमाणें असतें; म्हणजे अनेकदां तिचा उपयोग होण्याऐवजीं तिचें ओझें मात्र माणसाला वहावें लागतें, अशा कल्पनेनें आपण तिच्याकडे तुच्छतेनें पहात ऐटीनें हात हालवीत घराबाहेर येतों; पण आपण चार पावलें चालून जातों न जातों तोंच पांढऱ्या शुभ्र मलमलीच्या सदऱ्यावर शाई ओतून घेणाऱ्या पोराप्रमाणें दिसणारा एक छोटा ढग हळूंच आपल्या डोक्यावर येतो आणि भरभर पाण्याचे तुषार आपल्या अंगावर उडवूं लागतो.

— वि. स. खाण्डेकर : ( श्रावण )

## पावसाच्या सरींत

एवढा वेळ झिम् झिम् करणाऱ्या पावसाला जोर चढला. आडव्यातिडव्या सडसडाटांनीं तो आम्हांला झोडपूं लागला. हातांतल्या छत्र्या केवळ ‘ ओझ्याला काळ ’ ठरल्या. कपडे भिजून अंगाला बिलगले. पावसाला भिऊन एकाद्या झाडाच्या आसऱ्याला जावें तर त्याचे ओथवळे पावसाच्या थेंबापेक्षांही टपोरे. शेवटीं एक एक पाऊल पुढें टाकीत राहावें हेंच श्रेयस्कर ठरलें

— महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

कोणतेंहि काम असो, त्यांत हृदय ओतलें पाहिजे. तें मन:पूर्वक केलें पाहिजे. एक टांका घालण्याचें असो किंवा महान् ग्रंथ लिहिण्याचें असो, पावलोंपावलीं परिपूर्णतेचें स्मरण माणसानें ठेवलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## शेवटची झिम् झिम्

सरल्या पावसाळ्यांतली एक विरळ सर बाहेर झिम्-झिमत होती. अगदीं निःशब्दपणें, हवेवरच तरळत, जणूं नाइलाजानेंच कृत्तिकेच्या नक्षत्रासारख्या सूक्ष्म थेंबांचा एक एक पुंजका खालीं....खालीं...घसरत होता. चार महिने वाहून वाहून पावसाच्या धारा कंटाळल्या होत्या, विमनस्क-पणें वांट्याला आलेलें काम चालू ठेवीत होत्या. वाटा वाहून न वाहिल्यासारख्या करीत; झाडांची लसलसलेलीं हिरवींगार पानेंहि त्यांच्याकडे लक्षच न दिल्यासारखें करीत.

— कुसुमावती देशपांडे : ( झिम्झिम् )

## वेगानें येणारा लोंढा

लाल व गढूळ पाण्याचा एक प्रचंड लोंढा नदीच्या कोरड्या पात्रांतून, रंधा मारलेल्या लाकडाच्या ढलप्याप्रमाणें गुंडाळत, अक्राळविक्राळ आवाज करीत, तोंड वासलेल्या सापाप्रमाणें लोटत येतो. लोंढ्याच्या तोंडाशीं असलेली पाण्याची भिंत खळखळ आवाज करीत, मुंडपत पुढें सरकूं लागली म्हणजे तिच्यांतून गवताच्या काड्या, टरबुजें, कलिंगडें, भेल्या, नदीच्या पात्रांत वाळत घातलेल्या मिरच्या, गाड्या, बैल, शेळ्या-मेंढ्या, क्वचित् माणसांचे मुडदे वरून खालीं व खालून वर जातांना दिसतात. नदीच्या पात्रांतील लोक ' नदीला जीभ फुटली, जीभ फुटली, ' असा इतरांना इशारा देत जीव घेऊन पळत सुटतात.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

### धबधब्याचें शब्द-चित्र

सकाळीं पाऊस थोडासा थांबला व धुकें नाहींसें झालें; तेव्हां काळा कडा व इतर डोंगर यांचें दर्शन झालें. धुक्याचा पडदा निवळल्यानंतर डोंगरावर पावसाचे काय परिणाम झाले तें दिसूं लागलें. भैरव नेहमींपेक्षां दुपटीनें फुगला होता. दोन-दोन, तीन-तीन मैल लांबीच्या डोंगराच्या धशी कोसळून डोंगराचा भूगर्भ उघडा पडला होता. ते डोंगर, नरसिंहानें हिरण्यकशिपूचा कोथळा फोडल्याप्रमाणें रक्तबंबाळ दिसले. रक्ताऐवजीं त्यांतून तांबड्या पाण्याचे प्रवाह निघाले होते. कोसळलेल्या डोंगराच्या ढिगाऱ्याखालीं सागाचीं जंगलेंच्या जंगलें गडप झालीं. ठिकठिकाणीं प्रचंड वृक्ष मुळांतील माती वाहून गेल्यामुळें आडवे झाले होते. कैक डोंगर गर्भांत पाणी मुरून फुगले व त्यांच्या बाजवा उकलून खालीं कोसळतात कीं काय अशी तळच्या गांवांना भीति पडली. कैक तास बिळांतून पाणी राहिल्यामुळें पुष्कळ साप बिळांतल्या बिळांत मरून गेले.

— र. वा. दिघे : (सराई)

### धबधब्याचा ठेका

आम्ही सूर्यकिरणांकडे पाठ फिरवून पुढें निघालों—तोंच एकाएकीं सहस्रधारांचा धबधबा उसळत असलेला दिसला. उंचावरून स्वच्छ पाणी घट्ट झालेल्या मातीच्या भिंतीवरून कोसळतें आणि निनाद करतें. एक लय, एक ताल यांत तें मग्न असतें. आजूबाजूला कोणी आहे कीं नाहीं हें पाहण्याची काय गरज ? काय होत आहे त्याची त्याला काय पर्वा ? धब धब धब धब अव्याहत चालूच आहे.

— आचार्य कालेलकर : (सहस्रधारा)

नं. दि

## धबधब्याचें दर्शन

समोरून थेट डाव्या टोंकाला ' राजा ' धबधबा अर्ध-चंद्राकार शिलेवरून खालीं उडी घेत होता. त्याचें पाणी पावसाळ्यांतील चिखलानें कॉफी रंगासारखें दिसत होतें. पण जास्तींत जास्त पाणी राजालाच मिळतें. छाती फुलवीत फुलवीत जेव्हां तो तीरासारखा सरळ खालीं पडतो, तेव्हां निसर्गाची शक्ति किती अतुल आहे याची कल्पना येते. ' राजा ' धबधब्याचा विस्तारहि कांहीं लहानसहान नाहीं; आणि त्याच्या दोनही अंगांस मोठमोठ्या मोत्यांचे किती तरी सर लोंबत असतात ! खरोखर हा धबधबा ' राजा ' या नांवाला पात्र आहे.

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

## धबधब्यांतील इंद्रधनुष्यें

येथील इंद्रधनुष्याची शोभा अलकेश्वराच्या मनांतहि ईर्षा उत्पन्न करीत होती. मात्र हीं इंद्रधनुष्यें स्थायी नव्हतीं. वाऱ्याची लहर जशी दिशा बदले त्याचप्रमाणें सीकरपुंज आपलें स्थान बदलीत आणि इंद्रधनुष्यें, पार्वतीसमवेत शंकरानें नाचावें तशीं, इकडून तिकडे धांवत होतीं. क्षणांत क्षीण होत तर क्षणांत मयासुराच्या प्रासादाची शोभा धारण करीत. कर्माबरोबर जसें त्याचें फळहि येतें त्याप्रमाणें प्रत्येक धनुष्याबरोबर त्याचें प्रतिधनुष्यहि आपला वर्णक्रम बरोबर उलटा करून उपस्थित होत होते. आम्हीं स्थान बदललें तर या सुरधनुष्यांनींहि आपलें स्थान बदललें.

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

### धबधब्याच्या कडेचे पर्वत

चारहि प्रपातांचें जणूं रक्षण करण्याकरितांच डाव्या व उजव्या अंगांना दोन मोठमोठे पर्वत आहेत. उभ्या उभ्या ते आणखी काय करणार ? प्रपातांची अखंड गर्जना प्रतिक्षणीं प्रतिध्वनित करीत राहणें, इंद्रधनुष्य धारण करणें व लहानमोठ्या वनस्पती अंगावर लेवून रोमांचित होत रहाणें हाच त्यांचा अविरत उद्योग होऊन बसला आहे !

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा ).

### लाल धबधबा

पाऊस थांबला तेव्हां सोनेरी उन्हांत 'भैरव' धबधबा काळ्या कड्यावरून प्रचंड जयघोष करीत खालीं काळ नदींत कोसळूं लागला. त्यांचे सोंडेंत पाणी मावत नव्हतें. सोंड मोठी फुगल्यामुळें पाणी नीट पडत होतें. माथ्यावरील तांबडमाती वाहून आल्यामुळें सोंड लालभडक झाली होती. त्या लाल सोंडेवर सोनेरी उन्हं पडून ती आणखी लाल दिसत होती. 'भैरवाचें' पाणी नेहमीं दुधासारखें स्वच्छ असावयाचें परंतु यंदा अवकळ्या पाऊस एकदम झाल्यामुळें भैरव लाल दिसूं लागला.

— र. वा. दिघे : ( सराई ).

### डोंगरांतलि प्रवाह

जेथें मेघ आड येत नसत तेथें पर्वतांच्या अंगाअंगांतून वाहणारे स्वच्छ पाण्याचे पाट दिसत. पर्वतांनीं शेंकडों जानवींच घातलीं आहेत कीं काय असें वाटे. त्या पुरांत ऋषींनीं श्रावण महिन्यांत श्रावणी केली होती कीं काय ?

— साने गुरुजी : ( श्याम ).

## धबधब्याशीं खेळणारे पक्षी

प्रथम माझें लक्ष वेधलें 'राजा'च्या गंडस्थळावर लोंबणाऱ्या मोत्यांच्या सरांनीं आणि मग प्रलयकालीं लोकांचें रक्षण करण्यास ज्याप्रमाणें शूर पाणबुडये उडया घेतात, त्याप्रमाणें या धबधब्यांत चतुराईनें घुसणाऱ्या पक्ष्यांनीं. या पक्ष्यांना धबधब्यांच्या भीषण भव्यतेची कल्पनाच येत नसेल काय? किंवा ईश्वरानें त्यांच्या हृदयांत इतका धीर सांठविला असेल? मला वाटतें कीं आगंतुक पक्षी एवढे साहस करणार नाहींत. हे जोगवासी येथेंच जन्म पावले होते आणि धब-धब्याच्या पडद्याच्या सुरक्षित जलावरणांत वाढले होते. सिंहाचे छावे सिंहिणीला भिणार नाहींत. समुद्रांतील माशांना लाटांची मौजच वाटते. त्याचप्रमाणें हे जोगपुत्र जोगशीं खेळत असावे!

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

## पावसाळ्यांतील शोभा

तळेगांवच्या पुढें गाडी सरकल्यापासून चहूं बाजूंनीं पाण्यानें तुडुंब भरलेलीं भातखाचरें आणि दूर दूर इमानी पहारेकऱ्यासारखे भर वृष्टींतहि स्थिर राहिलेले डोंगर दिसूं लागतात. घाटांत मोठमोठे पांणलोट गर्जना करीत कड्या-कड्यावरून कोसळतांना दिसतात आणि कर्जतपासून कल्याणपर्यंतच्या तळ कोंकणांत सपाट भूमिभागावर गुडघाभर पाण्यांत बुडून वर डोकें करून वांकुल्या दाख-विणारे भातांचे डोंगर व हर्षानें माना डोलावणारे उंच तालवृक्ष यांची शोभा फारच सुंदर दिसते.

— ना. सी. फडके : ( पाऊस )

## गुहेंतील जलधारा

माझें हृदय त्या धबधब्याच्या निनादाशीं एकतानता पावत होतें. इतक्यांत उजवीकडील एका तटकल्या दरडी-वरून पाण्याचे थेंब ओघळतांना नजरेस पडले. जणूं अत्यंत सौम्य आणि मूक जलतरंग किंवा वृंदगायन ! हीच खरी सहस्रधारा. एकीकडून आम्ही वर चढलों. तेथें एक खोल गुहा होती. मध्यभागीं खांबासारखा एक दगड होता. त्याला आम्हीं प्रदक्षिणा घातली. सगळीकडे सहस्रधारांचा पाऊस पडत होता. तो सगळा पर्वत वितळतो कीं काय असें वाटत होतें. आम्हीं अगदीं भिजून गेलों. तासभर झपाट्यानें चालून आल्यामुळें शरीर गरम झालें होतें; त्यामुळें हा भिजण्याचा आनंद कांहीं औरच वाटला. किती थंड होतें येथलें वातावरण !

— आचार्य कालेलकर : ( सहस्रधारा )

## कड्यानें अडविलेला पाऊस

श्रावणाच्या सरीवर सरी पडूं लागल्या. वाऱ्यानें डुलून डुलून भात मोठें होऊं लागलें. हिरवेगार भाताचे चोथे फुगले. जो ढग येई तो काळ्या कड्याला अडके व पावसाची जकात दिल्याशिवाय पुढें जाण्याचें नाकारी. सबंध दिवस-भर पावसाची अंधेरी येई. टापटाप करून पाऊस रात्रं-दिवस पडे. पानांवरून पावसाच्या सरी ताडताड आवाज करीत. रात्रीं ओढे, धबधबे धोंधों करीत.

— र. वा. दिघे : ( सराई )

## काजव्यांतील धबधबे

आंब्याच्या फळांवरून व झाडांच्या पानांवरून काजवे इतके बसतात कीं, डोंगरावरून पाहणारास खालीं हिरव्या उजेडाची पाणथळ झाली आहे असें वाटतें. त्यांच्या उजेडानें दऱ्या चम्‌चम्‌ करतात व पाणथळींतून हजारों बेडूक त्यांना खाण्याकरितां उड्या मारतात. डोंगरावरून धबधबे आवाज करीत कोसळत राहतात.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## पावसाची जादू

गार वारा सुटून पाऊस खालीं उतरला म्हणजे भूमीला किती समाधान वाटतें म्हणून सांगूं ! वृक्षांचीं पानें एकदम टवटवीत होतात; मैदानावरची सुकलेली हिरवळ तेजस्वी दिसूं लागते; भूभागावरची खेदाची व उदासपणाची धूळ दबली जाऊन तेथें ताजेपणा उत्पन्न होतो आणि दशदिशांत एक प्रकारचें मांगल्य भरल्यासारखें वाटूं लागतें.

— ना. सी. फडके : ( पाऊस )

## सोन्याचा पाऊस

बाहेर बघा कसा सुंदर प्रकाश पडला आहे. पिवळा पिवळा प्रकाश ! असा नव्हता कधीं पाहिला. साऱ्या आकाशाला जणूं सोन्याचा मुलामा दिला आहे. बाहेर अंगणांत या. बघा भव्य देखावा. इवलाही ढग कोठें दिसत नाहीं. झाडें बघ कशीं दिसत आहेत ! जणूं सुवर्णाची वृष्टि होत आहे.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## सरोवराकांठचीं झाडें

जिकडे पहावें तिकडे मोठमोठीं झाडें. जणूं काय सृष्टीनें आपलें सर्वच वैभव दाखविण्यासाठीं बाहेर काढलें असावें. वनश्री आणि जलदेवता यांचें मीलन होतें तेव्हां तेथें लक्ष्मी ही न बोलावतांच जावयाची. आम्ही तिसऱ्या प्रहरीं त्या सरोवराजवळ जाऊन पोहोंचलों. किती तरी वेळपर्यंत त्या सरोवराच्या कांठाकांठानें सहल केली. प्रत्येक कोपऱ्यांतून सरोवराची शोभा वेगळीच दिसे. रूपगर्वित झाडें सरोवराच्या आरशांत आपलें रूप न्याहाळीत होतीं.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## सरोवराचें सौंदर्य

समोरच स्वच्छ व मधुरजलाचें सरोवर पसरलें होतें. त्याच्या भोंवतालीं हिरवीगार झाडी लागून राहिली होती. त्यापैकीं कांहीं वृक्ष फुलांनीं तरारले होते, कांहींवर फळेंहि दिसत होतीं, आणि कांहींवर तऱ्हेतऱ्हेच्या लहानमोठ्या वेली पसरल्या होत्या. त्यांतूनच अनेक रंगांचे व जातींचे पक्षी बसून आपल्या मंदकर्कश आवाजानें किलबिल किलबिल करीत होते. कांहीं आकाशांत उंच भराऱ्या मारून खेळत होते. याशिवाय एकजुटीनें राहणाऱ्या पक्ष्यांचे थवे भिरं भिरं करीत चारा मिळविण्याकरितां चारी दिशांकडे जात होते.

— ना. ह. आपटे : ( रत्नगुंफा )

दूरचा नदी-प्रवाह चांदीच्या प्रवाहासारखा दिसत होता. नदीला विश्रांति माहीतच नाहीं. सारखें वाहणें तिला माहीत. तिची प्रार्थना, कर्ममय प्रार्थना सारखी चोवीस तास सुरू असते.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## तळ्यांतील आकाश

मधून मधून पाण्याचीं लहानमोठीं तळीं लागत होतीं. तळ्यांत रंगीबेरंगी ढगांनीं नटलेलें आकाश स्नान करण्यास उतरल्यामुळें पाण्याची खोली अनंतपटींनीं खोल भासत होती. कोठें कोठें चंचल कमलांमधून निःस्तब्ध बगळे उभे असलेले पाहून प्रभातवायूचें अभिनंदन करायची इच्छा होई.

— आचार्य कालेलकर : ( दक्षिण-गंगा गोदावरी )

## सरोवरावरील रंग

सरोवराचे कांठाकांठावरून पश्चिमेकडे पाहिलें असतां भिन्न भिन्न रंग पाण्यावर पसरलेले दृष्टीस पडतात. जणूं एकाद्या अद्भुत कादंबरींत नवरस गुंफलेले असावेत तसे ! पायाखालीं दाट शेवाळी रंग जणूं क्षणाक्षणाला आपणांस निमंत्रण देत असलेला भासतो. पण त्यांतहि सगळीकडे सारखेपणा नाहीं. कोठें मेंदीच्या पानाचा तर कोठें लिंबाच्या पानाचा हिरवा. अगदीं न्याहाळून पाहिलें तर वाटतें कीं, तो पाण्याचा रंग नसून पाण्यांत लपलेलें वेगळें विश्व आहे. जरा पुढें नजर फेंकली तर निराशेतून आशा प्रगट व्हावी तसा बदामी रंग दिसेल. पण त्या बदामी रंगांत धातूची चकाकी आहे. आणखी जरा पुढें, आणि तोच रंग थोड्या फरकानें नारिंगी बनून संध्येचें उपस्थान करीत असलेला दिसेल. ढगाची जांभळी छाया जर मध्यें पडली नसती तर इकडच्या नारिंगी आणि पलीकडच्या सोनेरी रंगांमधील सौंदर्य किती खुलून दिसलें असतें !

— आचार्य कालेलकर : ( संध्यारस )

## ओढ्याचें गीत

प्रत्येक ओढ्याची निराळी गुणगुण, निराळा नाद ! एवढेंच नव्हे तर तोच ओढा सर्वत्र तीच भाषा बोलत नाहीं. आपला खोंड्यांतल्या पद्मा आहेना ? तो तिकडे मळीच्या शेताजवळ आला कीं निराळीच त्याची गुणगुण. दगडावरून उड्या घेत येतांना तो खो खो हंसतो तर मग पुढें अगदीं गंभीर होतो. जणूं त्याची समाधि लागते. मघांचा तो अवखळ, खो खो हंसणारा, उड्या मारणारा, गडबड करणारा तोच का हा प्रवाह ? परंतु मोठा लबाड हो. केळकरांच्या साकवाजवळ शांतपणा धारण करणारा हा प्रवाह पुढें ओकांच्या शेताजवळ गेला कीं गाणें म्हणूं लागतो.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## नदीचा पूर

ते पहा पाळणे वाहून येत आहेत. ते रिकामे आहेत का त्यांत कोणी आहे ? तीं पहा मुलें आहेत त्यांतून. मुलें हंसत आहेत. मातेच्या विशाल पाळण्यावर त्यांचा छोटा पाळणा डोलत होता. त्यांच्या गरीब मातांना त्यांना आंदुळायाला, जवळ घ्यायला वेळ नसे. पद्मेनें तें काम उचललें. कोठें जाणार हे छोटे पाळणे ? पद्मा त्यांना आपल्या महान् पतीकडे घेऊन जाणार. रत्नाकराला ती सांगेल, 'तीं पहा अनाथ बाळें. त्यांच्या पाळण्यावर राघू नाहींत, मैना नाहींत, हीं गरिबांचीं मुलें आहेत. त्यांच्या पाळण्यांवर खेळणीं नाहींत. नाथ, मोत्यांचे गेंद यांच्या पाळण्यांवर लावा. पोंवळयांच्या वेलांचे दोर करा. सुंदर सजवा हा यांचा पाळणा.

– साने गुरुजी : ( क्रांति )

## नर्मदेचा साज

आज नर्मदामाईच्या घरीं कांहीं तरी मंगल दिनाचा उत्सव होता. तिच्या प्रवाहानें आज आपलें काळेंभोर, अथांग स्वरूप पार फेकून दिलें होतें. पश्चिमाभिमुखी नर्मदा पूर्वेच्या क्षितिजाच्या कांहींशा वर विलसणाऱ्या चंद्रबिंबापासून आज सोन्याचा साज घेऊन निघाली होती. आज तेथें नर्मदा नव्हतीच; पूर्ण चंद्रबिंबांतून आज एक नवीनच सुवर्णगंगा उगम पावली होती. कुबेराच्या ऐश्वर्यानें लवथवत्या लाटांना आपल्या पदांवर नाचवीत केवढ्या सलीलतेनें वळणें घेत घेत ती वाहात होती !

— कुसुमावती देशपांडे : ( दीपदान )

## नदींतील दिव्यांची रांग

काजव्याच्या स्फुल्लिंगाएवढा आपला प्रकाश घेऊन एकेक दीप डोलत डोलत निघाला कीं आपल्या भोंवतालच्या वीतभर लहरींना तरी व्यक्त स्वरूप देई, त्या अखंड निळ्या प्रवाहांतून त्यांना उचलून धरी. त्याच दिव्याचें तें इवलेंसें प्रतिबिंब आपल्या परीनें नदीच्या अंतरंगांत किती खोल खोल शिरायचा प्रयत्न करी. कित्येक दिवे पैलतीरावर जाऊन पोचलें होते, तिथें ते विसांवून इतरांना आपली निःशब्द हांक देत होते. त्या लुटुपुटीच्या दीपस्तंभांमुळें नदीच्या विस्ताराची, तिच्या गांभीर्याची आज जणूं नव्यानेंच जाणीव झाल्यासारखीं वाटे. कित्येक दिवे त्या अखंड वाहत्या जीवनाचें क्षितिजापर्यंत संशोधन करायला जणूं निघाले होते !

— कुसुमावती देशपांडे : ( दीपदान )

## सागराची सृष्टि

समुद्र म्हणजे ठाव न लागणारें अपरंपार पाणी एवढेंच आपण समजतों. पण तें समजणें अल्प आणि एकांगी आहे. समुद्र म्हणजे पाण्याखालची विचित्र, अगण्य, अद्‌भुत अशी एक वेगळी सृष्टि आहे. पाणी हें तिचें जीवन आणि तेंच आवरण.

– महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## समुद्राची गर्जना

समुद्रावरून येणाऱ्या थंड वाऱ्याची झुळुक लागतांच त्यांचें विचारांनीं तापलेलें डोकें शांत झालें. ते जसजसे समुद्राजवळ आले तसतसा हजारों माग चालत असलेल्या गिरणीसारखा आवाज त्यांना ऐकूं आला. ती समुद्राची गर्जना होती.

– वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## तुफान वारा

मी एकटी एकटी बसून माझ्या आवडत्या खिडकींतून बाहेर पाहते, तेव्हां अलीकडे मधून मधून तुफान वारा वाहात असतों. त्या तुफान वाऱ्यानें मारे सारीं झाडें पिंगा घालायला लागतात. काळेकुट्ट ढग दाही दिशांनीं जणूं सैरावैरा धावून येत असतात आणि तें शांत-शांत दिसणारं तळं··त्याच्याहि अंतःकरणांत खळबळ उडून साऱ्या शरीरभर लाटा उसळायला लागतात त्याच्या.

– विभावरी शिरूरकर : ( विरलेलं स्वप्न )

## समुद्रकांठची सफर

समुद्रकांठचं एकादं खेडेगांव विश्रांतीला सर्वांत योग्य ठिकाण मी समजतों. अंथरुणांत लोळत पडण्याचा कंटाळा येईल तेव्हांच उठावं, लहर लागेल तेव्हां पोहण्यासाठीं समुद्रांत शिरावं, डुंबण्याचा कंटाळा आला कीं किनाऱ्या-वरच्या मऊ मऊ रेतींत पडून जलपृष्ठावर नाचणाऱ्या मचव्यांची आणि आभाळाची अवीट शोभा पाहावी, तसं पडून राहण्याचा कंटाळा आला कीं पुन्हां पाण्यांत बुडी मारावी, किनाऱ्यालगतच्या नारळीच्या झाडांखालून हवं तेवढं भटकावं, सपाटून भूक लागेल तेव्हांच जेवावं आणि थकलेल्या शरीरानं झोपेची मागणी केल्याबरोबर शय्येवर अंग टाकावं अशा मिजासखोर, लहरी, स्वच्छंद दिनचर्येची मौज काय वर्णावी !

— ना. सी. फडके : ( घड्याळ )

## सागर-किनारीं

गोकर्णाची शोभा, त्याचें वैभव, त्याचें प्रभुत्व, सगळें कांहीं या सागराच्या सान्निध्यामुळेंच आहे. त्याचा तो उतरता किनारा भाग्यवंताच्या भालपट्ट्यासारखा वाटतो. त्याची तांबूस रंगाची स्वच्छ वाळू पायांखालीं दाबीत सारखें पुढें पुढें जावेंसें वाटतें. बैठक मारल्यावर पुढच्या भागाची 'धूळपाटी' बनविली कीं तिच्यावर कोणाकोणाचीं नामाक्षरें लिहावीं असा मधुर संभ्रम पडतो. एकादी टेंकडी पुढें घुसून तिनें किनारा तोडला कीं तिला कोसळून घालायला लाटांचा भगीरथ प्रयत्न चालतो. तो मोठा प्रेक्षणीय वाटतो.

— महादेवशास्त्री जोशी : ( गोकर्ण-महाबळेश्वर )

## सागराची सोबत

आम्ही निघालों होतों तो कलता मध्यान्ह होता. ग्रीष्म-ताप अंगांतून घामाच्या धारा काढीत होता आणि खारा वारा लागोपाठ त्या पुसूनही टाकीत होता. तांबूस रेतीच्या नागमोडी रस्त्यावरून आमची गाडी घोंगावत चालली होती. कधीं उन्हांतून तर कधीं छायेंतून. डाव्या हाताला हिरव्या झाडीचे साजरे डोंगर आणि उजव्या हाताला लहरत्या शुभ्र किनारीचा निळा दर्या, हे माझें चित्त द्विधा करीत होतें. एकादी टेंकडी आडवी आली कीं गाडीला आरोह–अवरोह करावे लागत आणि तेवढ्यांत समुद्र दृष्टी-आड होई. पण तेवढी जवनिका फिरली कीं पुन्हां तो डोळ्यांसमोर पसरे. कधीं टेंकड्यांच्या पोटांत घुसणारा, कधीं उंच खडकांना ढुशा देणारा तर कधीं पुळणीवर लोळणारा. प्रत्येक वेळीं नवें रूप, नवा आविष्कार.

— महादेवशास्त्री जोशी : ( गोकर्ण महाबळेश्वर ).

## सौंदर्याचे सागर

एका वाळूच्या उंचवट्यावर चढतांच आपण दोन सौंदर्य-सागरांच्या सीमेवर उभ्या आहोंत असें त्या दोघींना वाटलें. उजव्या बाजूला हिरव्यागार भातशेतीनें भरलेला मळा डुलत होता; डाव्या बाजूला तेजस्वी सूर्यकिरणांनीं नटलेला समुद्र झुलत होता. वाऱ्याच्या झुळकेसरशीं एकीकडे भाताचीं रोपें झुळझुळत तर दुसरीकडे जल-लहरी सळसळत. भातांना फुटूं लागलेल्या लोंगरांप्रमाणें लाटांवरला फेस सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्या प्रेक्षकाला रमवूं शकला असता.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग ).

## समुद्रावरील रंग

आमच्या उजव्या हाताला किल्ल्याच्या वरच्या भागीं सूर्याचे सुवर्णकिरण लाटांवर स्वार झाले होते. तिकडचा जलरंग सोनेरी बनला होता. किल्ल्याच्या खालच्या अंगाला सागरावर फिकट हिरवी वर्णछटा पसरली होती. त्या रंगाची सचेतन कांति डोळ्यांना भुरळ घालीत होती. तिकडील किनाऱ्यावरचे माड अन् सुरूचे वृक्ष यांच्या हिरव्या रंगाला त्यानें केव्हांच जिंकून टाकलें होतें. दक्षिणेंत कोराईलचा किल्ला धीरोदात्तपणें उभा होता. त्याच्या मागच्या अंगाला रेवदंड्याची बादशाही हिरवी असूनहि दूरत्वामुळें निळसर दिसत होती. पाठीकडे अलीबाग शहर माडांच्या शेंड्यांची छत्रचामरें मिरवीत उभें होतें आणि उत्तरेस दूरवर समुद्राच्या कुशींत शिरलेल्या एका टेंकडीच्या टोंकावर बोटींना मार्ग-दर्शन करणारा दीपस्तंभ विराजत होता. आणि त्याच्या अलीकडे किनाऱ्याला लागूनच अलीबागची वेधशाळा माडांशीं उंचीची स्पर्धा करीत उभी होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( अलीबागचा पाणकोट )

## समुद्रावरील चंद्रोदय

वद्यपक्षांतला मध्यरात्रीनंतरचा चंद्रोदय किती सुंदर असतो. निराशेनें ग्रासलेल्या मनुष्याच्या मनांत आशा जागृत व्हावी, तशी ती चंद्रकोर दिसते. समुद्रावर हें दृश्य नेहमींपेक्षांहि अधिक मोहक वाटलें असतें ! एखाद्या जादुगारानें काळ्या पाषाणाचें संगमरवरांत रूपांतर करावें तशा समुद्राच्या लाटा दिसूं लागल्या होत्या.

— वि. स. खाण्डेकर : ( सुखाचा शोध )

## समुद्रावरील लाली

सागरानें आपला रंग बदलला. पूर्वेकडे जणूं काय लाल-जांभळ्या रंगाचा धबधबा कोसळत होता. आणि आश्चर्य हें कीं, पश्चिमेकडेदेखील याच रंगाचा पडसाद उमटला होता. मात्र पश्चिमेकडे आकाशानेंच हा रंग जास्त उचलला होता. पूर्वेची प्रसन्नता वाढूं लागली. लाल रंगांत चमकेची भर पडली. कुंकुमाचा सिन्दूर बनला, आणि माझ्या मनांत आलें, 'एक क्षणभर या लाटा थांबतील आणि जहाज स्थिर होईल तर किती छान होईल!' परंतु समुद्राच्या लाटा आणि माणसाचे मनोरथ कधीं थांबले आहेत?

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## समुद्रावरील चांदणें

जोत्स्ना समुद्राच्या उसळत्या लाटांवर नाचत होती. गतकालाच्या स्मृति आणि भावि कालाच्या चिंता या जशा उत्कट आनंदाच्या उर्मीत विरून जाव्या, तसा क्षितिज आणि समुद्र यांचा लय झाला होता त्या चांदण्यांत. भरतीच्या फेसाळ पाण्यानें अद्याप न बुडालेले उंच खडक चांदण्यानें उजळलेल्या आकाशांतील ढगांच्या काळसर शकलांसारखे दिसत होते.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( भंगलेलें देऊळ )

## समुद्राचा भयंकरपणा

दिव्यांच्या किरणांत समुद्र हजार फडा नाचविणाऱ्या नागासारखा भयंकर वाटला. वल्हीं पाण्यांतून बाहेर निघालीं कीं जो आवाज होई, तो ऐकून मृत्यु आपल्या जिभल्या चाटीत आहे, अशी कल्पना माझ्या मनांत आली नि सारें अंग शहारलें.

— वि. स. खाण्डेकर : ( सुखाचा शोध )

## वाळूचें नृत्य

वायुलहरींबरोबर वाळूचे कण नृत्य करीत होते. दुरून दिसणारा किनाऱ्यावरील फेस ताक घुसळल्यानंतर वर येणाऱ्या लोण्याप्रमाणें भासत होता. समोर पाण्याचें ब्रह्मांड पसरलें होतें. आईच्या प्रेमाप्रमाणें अगर कवीच्या कल्पने-प्रमाणें त्याचा कुणालाहि अंत लागणें शक्य नव्हतें. फार दिवसांनीं प्रिय मनुष्य भेटलें म्हणजे हृदयांत जशा आनंद-लहरी उचंबळतात, त्याप्रमाणें समुद्रावरील विशाल लाटांचें दृश्य होतें.

— वि. स. खांडेकर ( कांचनमृग )

## वाळूचा खेळ

समुद्राच्या सहवासानें वाळवंटहि नाचरें झालें होतें, म्हणूनच कीं काय वाळूचे बारीक कण एकमेकांचा पाठलाग करीत हवेंत धांवत होते. सूर्यकिरणांनीं समुद्राचें पाणी तरवारीच्या धारेप्रमाणें लखलखत होतें. लाटांची क्रीडा पाहण्याचा मोह वारुणीला अनावर झाला आणि शिवमंदिरा-कडे न वळतां त्या दोघीहि पाण्यांत जाऊन उभ्या राहिल्या. पायाखालून झरझर नाहींशी होणारी वाळू, कड्यावरून उड्या टाकणाऱ्या लहान धबधब्याप्रमाणें दिसणाऱ्या लाटांच्या रांगा, लाटा किनाऱ्याकडे आल्या म्हणजे कुरळ्या केसांप्रमाणें चालणारी त्यांची क्रीडा, पोलक्याच्या झालरी-प्रमाणें वाटणारा त्या लाटांवरील फेस, या साऱ्या गोष्टी किती वेळ पाहिल्या तरी नुकत्याच आपण पाहूं लागलों आहोंत असें वारुणीला वाटलें.

वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## समुद्राच्या वाळूवरील खेळ

मऊ मऊ वाळूवरून धांवताना कुर्र कुर्र असा आवाज होई, पावलें वाजलीं कीं कुरल्या पुटकन् इवल्याशा बिळांत लपत, लाटा धांवत धांवत येत आणि पाणी उडवून सरकन् मागें जात, संध्याकाळीं आभाळांत रंगीत सिनेमा सुरू होई.

— वि. स. खाण्डेकर : ( मृगजळांतलें कमळ )

## जलचरांचे खेळ

समुद्र आज मजवर प्रसन्न होता. आपल्या जामदार-खान्यांतील कांहीं अलौकिक चिजा त्यानें आज मला दाखवायचें मनांत आणलें होतें. मध्येंच एकादा मासा डोकें पाण्यावर काढी, आपलें चांदीचें पोट लखकन् दाखवी आणि झटक्यांत उलटा होऊन पुनश्च त्या उठावांत बुडी देई. माशांना वल्हवण्याचे पंख असतात हें मीं पाहिलें होतें, पण एका विशिष्ट जातीच्या मासोळ्यांना उडण्याचेहि पंख असतात, हें दृश्य मला नवीन होतें. भिंगुरडीसारख्या दोन मासोळ्या जोडीनें पाण्यांतून वर उठल्या आणि जोडीनेंच पांच-सहा हात उडत पुढें जाऊन पुन्हां जळांत घुसल्या. दोन चार वेळां हा प्रकार मीं पाहिला. आणि मग ठरविलें कीं, यांना उडतां येत असलें तरी तें सरळ रेषेंत. आडवें-तिडवें उडण्याची कळ यांच्या पंखांत नाहीं. हरित-नील असें आणखी एका जातीचे मासे थव्या-थव्यांनीं हिंडतांना दिसत आणि बोटीचें तें अवाढव्य परचक्र अंगावर यायला म्हणून द्रुतगतीनें दूर पळत.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## समुद्रावरील पक्षी

आगबोट खडकाळ भागांतून आंग चोरीत वाट काढीत होती, मधून मधून तरते दीपस्तंभ आणि कांहीं दगडांचीं डोकीं पाण्यावर दिसत होतीं. किरी नांवाचे बरेच पक्षी समुद्रांत तिथवर येऊन त्या दगडांवर गर्दी करून बसले होते. कबुतराच्या आकाराचा हा पक्षी वर्णानें शुभ्र खरा; पण त्याला अधिक आकर्षक करण्यासाठीं विधात्यानें त्याच्या पंखावर हलूच एक निळी कुंचली ओढली आहे. मानेवरचा तुराही तसाच शबल; पण तो मोराच्या तुऱ्याप्रमाणें उभा नसून मागच्या बाजूला झुकलेला दिसतो. हा समुद्रांत लांबवर जातो, कधीं सागरपृष्ठावर घिरट्या घालीत राहतो, तर कधीं लाटांवर अलगद तरंगतो. त्याच्या सगळ्या हालचाली ऐटबाज असतात आणि त्या मत्स्यवेधासाठीं चाललेल्या असतात.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## उन्हांतील समुद्र

संध्याकाळीं चारचा सुमार असेल. आमची आगबोट निघाली. उन्ह सौम्य झालें होतें. मंद-मंद वारा वाहात होता. सूर्याच्या पाण्यावरील चांदीसारख्या चकाकीमध्यें पिवळेपणा येऊं लागला होता.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

मनुष्यांत होणारा प्रत्येक बदल वाढीचा किंवा प्रगतीचा निदर्शक असला पाहिजे.

— अनंत काणेकर

## लाटांची टक्कर

कित्येक लाटा तर त्या लांबलचक भिंतीशीं टक्कर खाऊन तिच्या डोक्यावर पाण्याच्या मोठमोठ्या सरी उडविण्यांतच मग्न असतात. लाट येऊन आदळते, भिंतीवर चढते आणि भिंतीच्या उंचीची पर्वा न करतां निघून खालीं उडी घेते. त्या होळींतील पिचकाऱ्या दुरून आपल्याकडे धांवत येतात. तो अनुभव सर्वच प्रकारांनीं उन्मादक असतो. त्या सरींतून व त्या इंद्रधनुष्यांतून बाहेर फुटणारे व पसरणारे पाण्याचे तुषार सारें वातावरण गारीगार करून टाकतात. त्यांना असें वाटतें कीं, हा लाटांचा महोत्सव पाहाण्यासाठीं आलेल्यांचें स्वागत करण्याची जबाबदारी त्यांच्या माथीं पडली आहे.

— आचार्य कालेलकर : ( लाटांचें तांडव नृत्य )

## लाटांशीं खेळणारे सोबती

तट-प्रदक्षिणा करीत असतां मीं सहज एका बुरुजावरून बाहेरच्या अंगाला डोकावलें, तर माझ्या दृष्टीला वेधच लागला. तेथें कांहीं धारदार खडक पाण्यांत मांडले होते. त्यांचा रंग प्रवाळी होता. सागराच्या क्षुद्र लहरी त्यांच्या अंगावर बागडून मोत्यांचा चुरा पसरीत होत्या. त्यांच्या अंगाला जडलेलें शेवाळ तंतुमय होतें आणि त्याचा रंग अति हिरवा होता. लाटांच्या आघातांनीं तें शेवाळ हळुवारपणें डोलें; पण जागा मात्र सोडीत नसे. एखाद्या पालीसारखें तें खडकाच्या पाठीला घांस घेऊन बसलें होतें.

— पं. महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## समुद्रांतील किल्ला

आमचा रस्ता पुन्हा उजवा वळला आणि टेंकडीच्या माथ्यावर गेला. आम्ही तिथें उभे झालों आणि समोर अनंत जलाचा विस्तार लहरतांना पाहिला. तिथेंच तो सावित्री नदीचा सागरसंगम आणि त्याच संगमावरच्या जळांत तो जंजिरा किल्ला. जणूं सरिता-सागराच्या प्रीतीचें एकमेव पुष्प ! लंब वर्तुळ आकाराचें एक सुंदर, रुबाबदार शिल्प. जणूं तें सागराच्या उदरांतच नागांनीं घडवलें आणि तसेंच वर उचलून सागरपृष्ठावर निळ्या आभाळा-खालीं उभें केलें. समुद्राची प्रत्येक लाट त्याला धडक देते आणि मागें फिरतांना खदखदा हंसते. त्याच्याभोंवतीं सदासर्वदा धारोष्ण दुधावर दिसतो तशा समुद्रफेणाचें शुभ्र कांतिमान् वलय मांडलेलेंच आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( मुरुडचा जंजिरा )

## किल्ल्याची जोपासना

सकाळीं सूर्याचा पहिला किरण त्यालाच सोनेरी मुलामा द्यायला धावतो आणि सायंकाळीं शेवटचा किरण त्याचाच निरोप घेऊन ' पुनरागमनाय च' अदृश्य होतो. दिवसभर सूर्यानें तापवावें आणि रात्रीं चंद्रानें निजवावें असा क्रम त्याच्या जन्मापासून चालत आलेला आहे. झुंजतां झुंजतां त्याला झालेल्या लहानमोठ्या जखमांवर वारा अद्याप फुंकर घालीत राहिला आहे. रात्रीं तारामंडळाचा चांदवा पसरून आकाशमाउली त्याला ' निज नीज माझ्या बाळा ' म्हणत राहिली आहे. जंजिरा एकट्या सागराचा पुत्र नाहीं; तर पंचमहाभूतांचा पुत्र आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( मुरुडचा जंजिरा )

## एकटें जहाज

सकाळीं सर्वांआधीं मी जागा झालों. त्यावेळीं अरुणोदय-देखील झाला नव्हता. आकाशांत जसा चंद्र चालत असतो तसें आमचें जहाज एकटें एकटें पाणी कापीत चाललें होतें. काय ती त्या वेळची शान्ति! आगबोटीच्या अंतरांतील यंत्ररूपी हृदय जर आपले ठोके ऐकवीत नसतें, तर बाहेरली शान्ति इतकी उठावदार झाली नसती. चोहोंकडे जणूं काय लोखंडाचा किंवा शिशाचा थंड रस पसरला असावा असा दर्या दिसत होता.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## रात्रींचा जल-प्रवास

रात्रीच्या काळोखांत पडावांत बसून बोटीकडे जाण्यांत मोठी गंमत वाटते. पाण्यावर मधून मधून नाचणारे दिव्याचे किरण, एका तालावर पाण्यांत पडणारीं वल्हीं, दूर उभ्या असलेल्या बोटीवरच्या दिव्यांचीं आरास— आपण लहान होऊन एखाद्या अद्भुतरम्य सृष्टींत फिरत आहों असा अशा वेळीं भास होतो.

— वि. स. खांडेकर : ( सुखाचा शोध )

## नौकेचें नर्तन

होडी सुरू झाली. तिची हालचाल एखाद्या नर्तकी-प्रमाणें सुंदर होती. वल्ह्यांच्या तालावर खळखळणाऱ्या जलतरंगांचे चाळ पायांत बांधून ती नृत्य करीत होती. एखाद्या वळणावरती चटकन् इतक्या नाजूकपणें वळे कीं तिच्यापेक्षां नर्तिकेची गिरकीसुद्धां कमी मनोहर वाटावी.

— वि. स. खांडेकर :( दोन ध्रुव )

२८८४४ आ.०५१ ११-५-५४

## होडीचें वर्णन

आम्ही येत आहों हें दुरूनच पाहून तिथला नित्याचा 'तारी' होडी घेऊन पुढें आलाच. काळ्या कपिलेसारखी त्याची ती चिमुकली एकसंध होडी आणि पंचपात्रीला शोभेशी पळी असावी तशी तिची नाजूकनार वल्ही. तो नावाडीही तसाच लहानसुरा. त्या पन्हळांत त्यानें आम्हां चौघांना एकदमच बसविलें. भोजनाची पंगत बसवतात तसें नव्हे, तर एकाच्या पाठीशीं दुसरा अशा पद्धतीनें.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## लाटांची वेलबुट्टी

मी डेकच्या कठड्याजवळ जाऊन उभा राहिलों. जहाज जसजसें डोलें तसतसें पाणी वर चढे आणि खालीं जाई. जिकडे पहावें तिकडे लाटा ! लाटा एकमेकींवर आदळल्या कीं त्यांच्यांतून फेस निघे. अंधारांत हा फेस चमकतो, आणि त्या चकाकीच्या वांकड्या-तिकड्या रेघा मिळून एक विचित्रच वेलबुट्टी दाखवितात.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## नदीचा मार्ग

शत्रुंजीचीं वळणें पाहावयाचीं असतील तर तिचें रक्षण करणाऱ्या त्याच नांवाच्या डोंगराच्या शिखरावरून पाहून घ्यावीं. सोन्यासारखें गवत उगवलेलें आहे, दूरवर गालिच्या-सारखीं शेतें पसरलीं आहेत आणि त्यांच्यामधून शत्रुंजी आपली वाट काढीत हळूंहळूं वाहात आहे.

— आचार्य कालेलकर : ( रेणुकेचा शाप )

## समुद्र व नदी

नदीचें पाणी शांत आग्रहानें समुद्राकडे वाहात असतें. इकडे आपली मर्यादा कधींच न सोडण्याविषयीं नांवाजलेल्या समुद्राचें पाणी चंद्राच्या चिथावणीनें घटकेंत नदीला वाट करून देतें, तर घटकेंत टक्कर देतें. नदी व सागर यांचा एकमेकांविरुद्ध सत्याग्रह चालत असतांना अनेक प्रकारचीं दृश्यें पाहावयास मिळतात. समुद्राच्या लाटा नदीच्या पाण्याला तिरक्या कापीत जाऊं लागल्या म्हणजे पाण्याचा एक फवारा एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत धावत जातो. कांहीं कांहीं ठिकाणीं पाणी गोल गोल फिरून भोंवरे निर्माण करितें. सागराचा जोर वाढतांच नदीचें पाणी मागें हटत जातें. दोन्ही बाजूंच्या कांठांवर या फुगणाऱ्या पाण्याचा फार जोर असतो.

— आचार्य कालेलकर : ( सागर-सरितांचा संगम )

## दुथडी वाहाणारी नदी

जिकडे तिकडे पाणीच पाणी. लाललाल नाचणारें भीषण पाणी. फेस उसळत आहे, लाटा नाचत आहेत. झाडेंमाडें मधूनच माशांप्रमाणें वर डोकीं काढून जात आहेत. जणूं नद्यांनीं हिरव्या पाचूचे दागिनेच घातले होते. हिऱ्यांचीं हिरवीं कुडीं घातलीं होतीं. पाणी इतकें चढलें होतें कीं मोठमोठीं उंच झाडें तींहि बुडून गेलीं होतीं. जीं फारच उंच झाडें, त्यांचा कांहीं भाग बुडालेला नव्हता. तीं उंच झाडें रक्तांबर नेसून तपश्चर्या करीत होतीं.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## गोदावरी नदीची शोभा

राजमहेंद्रीजवळ गोदावरीची शोभा कांहीं वेगळीच दिसत होती. या ठिकाणीं जें भव्य काव्य अनुभवास आलें, तें क्वचितच दुसऱ्या कोठल्याहि ठिकाणीं प्रकट झालेलें पाहिलें असेल ! पश्चिमेकडे दृष्टी फेंकली तों दूर-वर टेंकड्यांची एक सुंदर रांग दिसली. आकाश ढगांनीं झांकलें गेल्यामुळें कोठेंहि उन्ह पडलें नव्हतें. करड्या मेघांमुळें गोदावरीच्या धूलिधूसर पाण्याचा करडेपणा अधिकच वाढला होता. मग भवभूतीचें स्मरण कां होणार नाहीं ? खालवरच्या या काळिम्यामुळें एकंदर दृश्यावर वैदिक प्रभातकालाची सौम्य सुंदरता पसरली होती आणि टेंकडीवर अवतरलेले कित्येक ढवळे ढग तर अगदीं ऋषी-प्रमाणेंच दिसत होते.

— आचार्य कालेलकर : ( दक्षिण-गंगा गोदावरी )

## आटलेल्या नदीचें खोरें

तें काळनदीचें खोरें दृष्टीला वेध लावूं लागलें. नदीचा प्रवाह आटला होता; पण पात्र दिसत होतें. पावसाळ्यांत डोंगरावरून खालीं धोधावणाऱ्या पाणलोटांचे चर त्या नदीला जिथें जिथें येऊन मिळाले आहेत, तिथें तिथें त्यांच्या खोलगट खुणा दिसत होत्या. पात्राच्या दोन्ही अंगांचे जमिनीचे पट्टे काळसर वर्णानें चकाकत होते. कौलांनीं शाकारलेल्या घराच्या छपरांत उजेडासाठीं म्हणून मध्यें हिरवीं काचेचीं कौलें बसवावीं, तसे त्या कृष्ण भूभागावर अधूनमधून हिरवे कुणगे शोभत होते.

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतींची राजधानी )

## झऱ्याचे सूर

त्याची बांसरी कंप काढूं लागली. त्याचे बांसरींतून प्रेमानें झंकारलेले नाद निघूं लागले. शेजारून सराईच्या स्वच्छ पाण्यानें निवळलेला झरा खळ खळ करून क्लॅरिऑनेटच्या गळ्यांत गळा घालून त्याला केव्हां साथ करूं लागला हें त्याला कळलेंसुद्धां नाहीं.

— र. वा. दिघे : ( सराई )

## झऱ्याचें संगीत

झुळझुळ पाणी वाहूं लागलें. एकाद्या गायकानें आपल्या कंठांतून बाहेर पडणाऱ्या मधुर स्वरांत गुंग होऊन जावें, त्याप्रमाणें त्या झुळझुळ आवाजानें पर्वतराजाची समाधि लागली.

— वि. स. खाण्डेकर : ( जळलेला मोहर )

## हिरवीं कुरणें

संध्याकाळचे फाटलेल्या ढगांतून सरळ निघालेले सूर्यकिरण खलाटीवर पडले होते. त्या पिवळसर उन्हानें भातशेती उजाळली. हिरवीं कुरणें शोभायमान झालीं. त्यांतून चरणाऱ्या गुरांचे रंग लांबून स्पष्ट दिसूं लागले. समोर एक डोंगर खालवरपर्यंत हिरवट झाला होता. त्याचे रंग उन्हांत गहिरे दिसत होते. त्याचें माथ्यावरच्या मैदानांत व कड्याच्या अंगानीं हिरव्या गवतांत सोनटक्याच्या पिवळ्या फुलांचा समुद्र उसळला होता. आडवें उन्ह झाडांच्या पानांपानांतून रानाच्या अंतरंगांत शिरलें. रानें हिरव्या प्रभेनें खुललीं.

— र. वा. दिघे : ( सराई )

## सृष्टीचा नित्यक्रम

सृष्टिदेवीनें मात्र आपली कामगिरी दरसालप्रमाणें बजावली होती. भाताचा रंग दरसालप्रमाणें पिवळा होता. कुरडूचीं फुलें दरसालप्रमाणें होतीं. फुलपांखरें दरसालप्रमाणें भाताच्या सुवासाच्या दरवळींत उडत होतीं. होले, पारवे सराईच्या शांततेंत घुमत होते. मोर ओरडत होते. बुलबुल, काळे पक्षी गात होते. चास तळपत होते. सराईचें निळें आकाश डोंगरावर वितळत होतें.

— र. वा. दिघे : ( सराई )

## पावसानें वाढविलेल्या वनस्पती

पश्चिम घाटांतील पावसाचे चमत्कार सुरू झाले. पायथ्यापासून डोंगर-माथ्यापर्यंत हिरवा समुद्र पसरला. घरांच्या, देवळांच्या भिंताडांवरून वनस्पति उगवली. आठ महिने झोपलेली शेवाळ झाडांच्या शेंड्यावरून देखील जागी झाली. जिकडे पहाल तिकडे हिरवेंगार! रान-सईच्या आसपास असा एकहि रंग शिल्लक राहिला नाहीं, कीं तो डोळ्यांना खुपला असता.

— र. वा. दिघे : ( सराई )

## धीट गवत

सर्वजण मोठमोठ्या इमारतींत आपआपल्या कामांत दंग झालेले असल्यामुळें सारे रस्ते खुले होतात. मानवी श्वासाचा संपर्कहि नसलेला पावसाळी वारा अनिर्बंधपणें वागूं लागतो. नुकतेंच वर मान करणारें कोंवळें गवत आपलें पंख फडफडूं लागतें, त्या सौम्य उन्हानें जणूं धीट होऊन इकडे तिकडे पाहूं लागतें, हसूं लागतें. येऊन गेलेल्या सरीच्या थेंबांनीं झाडें–पानें चमकूं लागतात.

— कुसुमावती देशपांडे : ( मध्यान्ह )

## शारदीय शोभा

सृष्टीचा शारदीय उत्सव सुरू झाला. आकाशाच्या निळ्या रंगाला विलक्षण शोभा चढली. चांदण्या रात्री विलक्षण मनोहर वाटूं लागल्या. पक्ष्यांचा स्वैर विहार पुनः सुरू होऊन त्यांचे स्वच्छंदी हर्षस्वर ऐकूं येऊं लागले, आणि तिळाच्या व झेंडूच्या फुलांचे गडद पिवळे आणि तांबूस रंग इतस्ततः पसरलेले दिसूं लागले. मग हलकेहलके सूर्याची दिशा बदलली; वाऱ्यांत गारवा येऊं लागला. रानांत कुसळी गवत जिकडे तिकडे माजलें. हवेंतला गारठा हळूंहळूं वाढला.

— ना. सी. फडके : ( प्रवासी )

## वसन्ताचें वैभव

वसंत ऋतु आला तसा गेला. ग्रीष्म ऋतूंत रात्री लहान होऊन दिवस मोठे झाले; वाऱ्याची दिशा बदलली; जलाशयांतील पाणी आटून गेलं; आणि प्रखर सूर्यतापानं जमिनीला भेगा पडल्या. पुढें आभाळांत हलके हलके ढग जमूं लागले, वादळी वाऱ्यांना सुरवात झाली आणि विद्युल्लतेचा कडकडाट होऊन वर्षाकालास प्रारंभ झाला. रानोमाळ गवत माजलें, शेतें उंच उंच वाढलीं, लहानमोठीं झाडं पल्लव-भारानं आच्छादित झालीं, मृदु आणि उग्र वासांनीं दाही दिशा दरवळून गेल्या, तांबड्या गलिच्छ पाण्यानं नदी-नाले खवळले, आणि पंखांत चोंची खुपसून कुडकुडणारे पक्षी 'बाबा रे, थांबव आतां ही वृष्टि !' अशी वरुण राजाला प्रार्थना करण्यासाठीं चिवचिवाट करूं लागले.

— ना. सी. फडके : ( प्रवासी )

## वसंताचें स्वागत

आपल्या लाडक्या वसंताच्या पायाला खडे बोचूं नयेत, म्हणून सृष्टीनें जिकडे तिकडे गवताचे गालिचे पसरलेले होते. तो झाडाच्या फांद्यांवरून नाचूं लागला, तर त्याचें कोमल अंग खरचटेल, या भीतीनें तिनें सर्व वृक्षांच्या फांद्या नवपल्लवांनीं आधींच झांकून टाकल्या होत्या.

**— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )**

## शिशिराची शोभा

शिशिर ऋतूचे अखेरचे दिवस होते ते. रात्री मोठ्या होत्या. दिवस लहान वाटत होते. कधीं कधीं कडक थंडी पडे. रात्रीं वाहणारा वारा गारठ्यांत भरलेला असे आणि दुपारच्या वेळीं कुठें तरी जोराची वावटळ उठे. ती धूळ, पाचोळा, चिंध्या काय सांपडेल तें गोळा करून चक्राकार फिरून आकाशांत थोडीशी उंच भरारी घेई आणि पुढें जाई! गांवाच्या आसपास कुठें कुठें उभ्या असलेल्या पिकांवरहि पिवळा रंगच बहुतांशीं पसरलेला दिसे आणि हरभऱ्याचीं ठेंगणीं झुडपंच काय तीं आपला काळसर हिरवट रंग डौलांत दाखवीत. गांवांतल्या आणि आसमंतांतल्या मोठमोठ्या झाडांच्या फांद्या पर्णहीन दिसत आणि आपल्या देहावरून गळलेलीं जुनीं शुष्क पानं वाऱ्याच्या लोटाबरोबर धुळींत मिसळून इकडे तिकडे उडालेलीं पाहण्याच्या दुःखानं ते वृक्ष अधिकच उदास झाल्यासारखे वाटत.

**— ना. सी. फडके : ( प्रवासी )**

## हिवाळ्यांतील दुपार

हिवाळ्यांतली दुपार तरी काय कमी मनोरम असते? त्या वेळच्या ऊबदार हवेची गोडी अस्सल सुखवाद्यांना देखील पटेल. तिचा आस्वाद घेत उन्हांत पडलें असतांना डोळ्यांना चारी बाजूंना जणूं समृद्धीची ऊब दिसूं लागते. हेमन्ताचें सोनें सगळीकडे पसरलेलें असतें. गव्हावर सोनेरी तांबूसपणा चढायला सुरुवात होते. कडूनिंबाच्या पानांचें सोनें होऊन तीं गरागरां शिवाशिवी खेळत हिंडूं लागतात. जसजशी शिशिराची कला ओसरूं लागते, तसतशा भिगऱ्यांच्या झाडांवर निव्वळ सोनेरी शेंगाच शेंगा लटकूं लागतात, तर पिवळ्या कांचनाचें झाड एकेका फांदीवर एकाद-दुसरेंच सुवर्णमय फूल घेऊन डोलूं लागतें.

— कुसुमावती देशपाण्डे : ( मध्यान्ह )

## फुलवंतीची जादू

पळसांना, पांगाऱ्यांना व सांवरींना तांबडीं फुलें इतकीं आलीं होतीं कीं त्यामुळें रान पेटल्यासारखें दिसत होतें. झाडांना धुरकट पालवी आली होती. नव्या नवाळीचें राज्य सुरू झालें होतें. भिल्लांच्या गवताच्या व केंबळीच्या झोंपड्या रानांचे फटींतून लांब डोंगरांचे उतरणीवर किंवा टेंकड्याचे माथ्यावर दिसत होत्या; त्यांचेसमोर उंच झाडांच्या गर्द सावलींत भिल्लांचीं पोरें बागडत होतीं व ओरडत होतीं. मोहाला फुलें आलीं होतीं. मोहाचे झाडाखालीं आलें कीं, त्याचा मादक वास सायलीचें वासाला मारून टाकी.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## फुलांचे ताटवे

अंधुक चंद्र-प्रकाशांतहि त्या गोंडस टेंकड्यांच्या उतारावर गवताचा हिरवा रंग व 'हेदर'च्या रानफुलांचा जांभळा-निळा रंग लपंडाव खेळतांना दिसत. मधूनच नदीचं एकादं वळण चमकून जाई. बागेंत अतिशय नाजूक मोतिया रंगाच्या व मधुर सुवासाच्या फुलांचे ताटवे बहरलेले असत. त्या ठिकाणीं पहिलें किती तरी दिवस वाटे कीं लहानपणीं ऐकल्या-वाचलेल्या अद्भुतरम्य कथांतील एकाद्या उद्यानांत तर आपण येऊन पडलों नाहीं !

— कुसुमावती देशपाण्डे : ( मध्यरात्र )

## पिवळीं पानें

विशेषतः हिंवाळ्याच्या शेवटीं व वसंताच्या पूर्वीं या रस्त्यावर फारच शोभा दिसते. पिवळीं, लाल, किरमिजी, भुरकट वडाचीं पानें जाणाऱ्यायेणाऱ्यांवर जणूं अभिषेकच करीत असतात. टप, टप, टप; अगदीं हळुवारपणें गंमतीनें खालीं येणारे हे देवदूत तर नसतील ! त्या पिवळ्या-पिवळ्या पानांवरून चालत असतांना वाटतें कीं, आपण सोन्याच्या चुऱ्यावरून चालत आहोंत किंवा सोनेरी फुलांवरून चाललों आहोंत.

— वि. पां. दांडेकर : ( काळ खेळतो आहे. )

## फुलांचे सुवास

संध्याकाळच्या सांवल्या रानाडोंगरावरून काळोख करूं लागल्या. डोंगरमाथ्यावरचे कारवीचे मस्त मधु पराग सुवासाच्या डोंबाप्रमाणें उठले.

— र. वा दिघे : ( सराई )

### कमळांचें तळें

निळसर पाण्यावर हलूंहलूं मिटूं लागलेलीं कमळें दुरून तारकांप्रमाणें दिसत होतीं. मधून मधून पाण्यावर एखादा लहान तरंग उठे आणि एकाद्या कमळाभोंवतीं नाचे. जणूं कांहीं तो त्या कळीला लाडकेपणानें म्हणत होता, ' कमळाताई, काय ग झालं इतकं रागवायला ? हा घे माझा पापा !' तळ्याच्या तीन बाजूंना तीन टेंकड्या होत्या. त्यांच्या मध्यभागीं हिरव्या कोंदणांतल्या निळाच्या खड्याप्रमाणें तें तळें चमकत होतें.

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

### गुलाबाचें फूल

सकाळीं उठून खोलीचें दार उघडलें कीं एका ना एका झाडावर गुलाबाचें सुंदर फूल उमललेलें दिसे. पूर्वेकडल्या अरुणोदयाचें सर्व सौंदर्य जणूं कांहीं त्या चिमुकल्या पुष्पाच्या हंसऱ्या पाकळ्यांत सांठविलेलें आहे असा मला भास होई.

— वि. स. खाण्डेकर : ( जळलेला मोहर )

### गवताचें पातें

अगदीं साधारण गवत होतें तें. त्याचें एकेक पातें वीतभर लांब वाढलेलें. एकाद्या पावसाच्या सरीनें तें चकाकत नव्हतें. दवबिंदूंनीं त्यावर मुकुट चढवला नव्हता. सरळ, साधें, लपून गेलेलें एकेक पातें ! वाऱ्याची झुळूक येई; सर्व पातीं बरोबर वाकून एक निःशब्द लय आळवीत, पुनः पूर्ववत् कसली तरी वाट पाहात उभी रहात.

— कुसुमावती देशपांडे : ( गवताचें पातें )

## उन्हांत चमकणारा मोहोर

कड्लिंबाच्या फुलांचे हिरवे-पांढरे तुरे, आंब्याचा तांबूस-पिवळा मोहोर आणि चिचच्याच्या झाडाचीं पांढरीं-पिवळीं फुलें, यांच्या रंगांच्या निरनिराळ्या नाजूक छटा त्या सौम्य उन्हांत मोठ्या मजेदार दिसत होत्या. त्यांच्या संमिश्र मादक गंधानें हवा दरवळून गेली होती व त्या हवेला कंपित करणारा कोकिळाचा भेदक सूर मधून-मधून कानांवर पडत होता.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## उन्हांतलें सूर्यफूल

वेलीला दूरवर खड्या असलेल्या सूर्यफुलाचें स्मरण झालें. तिनें सळसळून खुणावलें. पण बिचारें सूर्यफूल पाहूं शकत नव्हतें ! काय व्रत वांट्याला आलें होतें बेट्याच्या ! एकटें उन्हांत उभें रहायचें !– डोईवर घागर घेतलेल्यासारखें. अन् सूर्याची स्वारी हालेल तसें तोंड वेंगाडून पाहात रहायचें ! सूर्याला कधींहि दया येत नव्हती. त्याच्या धाकानें वाढींत बदल होत नव्हता नि फुलांतहि वाढ होत नव्हती. अनेक बारक्या फुलांनीं भरलेलें नुसतें एक रंगीत तबक.

— अरविंद गोखले : ( माहेर )

खोलीच्या बाहेर येऊन मीं पाहिलें. कुणालाही ओळखूं येऊं नये म्हणून रजनीनें कृष्णवस्त्र अंगाभोंवतीं लपेटून घेतलें होतें. मात्र इतकी दक्षता घेऊनही क्षणोक्षणीं पृथ्वीकडे पाहून आपले हजारो डोळे मिचकावण्याचा मोह तिला अनावर होत होता.

— वि. स. खांडेकर : ( रहस्य )

## रंग व गंध

कारवीच्या सुवासातून आतां आणखी निरनिराळे सुवास येऊं लागले. आंब्यांच्या बहरण्यानें कहर केला. त्याचे मागून फणशीच्या कुयऱ्यांचा वास आणि त्यामागून उंबर यांचे राकट सुवास, मधून-मधून सायलीचा नाजूक दरवळ निघे. कुडा, करवंद व इतर जंगलीं झाडें यांनीं पण वसंत-पंचमी सुरू केली ! शहाजहान बादशहाच्या बागेंत असले सुगंध सुटले नसतील !

— र. वा. दिघे : ( सराई )

## सुगंधाचें साम्राज्य

पुसांत आंब्याच्या आम्राळीला मोहराच्या डिऱ्या दिसूं लागल्या म्हणजे सजलपुरांत सृष्टिदेवीनें सुगंधाचें फर्मान काढलें आहे असें वाटतें. चौफेर संत्रींमुसंबींचे बाग फुलूं लागतात. स्वच्छ निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर डाळिंबीचीं फुलें डुलतात. रानावनांत आजूबाजूला झाडांना बहर येतो. मळ्या-मळ्यांतून तळ्या-तळ्याच्या बाजूनें सुंगध दरवळून राहतो. जिकडे तिकडे फुलांचा घमघमाट सुटतो व सजलपुरावर परिमलाचें वातावरण बसून राहतें. जो श्वास घ्याल तो गंधयुक्त. फुलांच्या सुवासानें जीव वेडावून जातो.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## कळीचें सौंदर्य

उषःकालीं फुलूं पाहणारी कळी किती पवित्र दिसते ! ती हळूंच हंसते व आपल्या अंतरंगांतील सौंदर्य व सौरभ्य विनयानें वर मान करून त्या सूर्यनारायणाला अर्पण करते.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## देवाचा बगीचा

सुंठ आणि बांबू साठ वर्षांनीं फुलते, तर कारव सात वर्षांनीं फुलते. यंदा कारवीला बहर आला होता. कारव तुकतीच फुलूं लागली होती. गुलाब, चंपक, बकुल, जाईजुई, चमेली, राजाची बाग दखवून टाकतील. कवींनीं त्यांची स्तुति गाइली आहे. पण गरीब बिचारी कारव देवाजीचा बगीचा दणाणून टाकीत होती.

— र. वा. दिघे : ( सराई )

## फुलांचें सौंदर्य

कारवीच्या मधुर सुवासांतून त्याला झेंडूचा तिखट वास आला. कुंपणांचे कडेनें मखमलीचे गोंडे लागून राहिले होते. ताऱ्यांच्या उजेडांत झेंडूचे गेंद गर्दी करून उभे राहिलेले त्याला दिसले.

— र. वा. दिघे : ( सराई )

## बहरलेला पारिजात

सकस जमीन व चांगलें खतपाणी मिळालें म्हणून पारिजातक चांगला फोफावला होता. त्याला बहर आला होता. तो शततारकेच्या नक्षत्रपुंजाप्रमाणें डंवरला होता.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## फुललेली कळी

एके दिवशीं सकाळीं ती कळी फुलली ! भीत भीत तें फूल सृष्टिकडे बघत होतें; सूर्याकडे बघत होतें, विनयानें अर्धस्मित करीत होतें. थोडी मान वर, थोडी खालीं; थोडें मिटलेलें, थोडें उघडलेलें ! किती गोड गोड फूल !

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## प्रातःकाळची झुळूक

दिशा लवकरच उजळतील असें दिसत होतें. प्रातः-काळची गार वाऱ्याची झुळूक नवविचारांप्रमाणें पुनर्जीवन देण्याकरितां ढव्यांत शिरत होती.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## वाऱ्याची झुळूक

मावळत्या सूर्याच्या नाजूक छटांनीं हें समोरचं सगळं पाणी रंगून गेलं आहे. त्यावरून वाऱ्याची एकेक झुळूक किती हळुवारपणें तरंगत जाते ! भोंवतालच्या बंधाऱ्यांत अडकून पडलेलं, शेवाळानें त्रस्त झालेलं उदास पाणी-देखील तिच्या स्पर्शानें उचंबळून येतं, त्याच्यावर रोमांच उभे राहतात. ती एकेक झुळूक काय सांगते त्याला ? स्वातंत्र्याचा संदेश देते ? आपलीच अंतःशक्ति सांठवून बंधाऱ्याच्या पलीकडे उडी घ्यायचा कानमंत्र देते ?

— कुसमावती देशपांडे : ( अप्सरांची भेट )

## गार झुळूक

चन्द्र आकाशांत मध्यावर तळपत होता आणि त्याच्या प्रभेनें सारी सृष्टि उजळून गेली होती. वारा बहुतेक नव्हताच. पण लहान मुलानें झोपेंत टाकलेल्या उच्छ्वासासारखी त्याची मधूनच जी एकादी झुळूक येई, ती चन्द्रकिरणांत न्हाऊन आल्यामुळेंच कीं काय, गार गार वाटे. माळावरलीं निश्चेष्ट असलेलीं झाडें त्या झुळुकेमुळें थोडीशीं हालचाल करीत आणि मग असें वाटे कीं, सुषमेनें धुंद झालेल्या सृष्टीची अद्याप कांहीं पुरती शुद्ध हरपलेली नाहीं.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## झाडांतील झुळूक

रानांत जिकडे पाहावें तिकडे झाडेंझुडपें होतीं. गाण्याची तान ऐकतांच डुलणाऱ्या रसिकाप्रमाणें वाऱ्याची झुळूक येतांच या झाडांचीं पानें हलत. जणूं काय रसिक वृक्ष टाळ्या वाजवून वायूच्या गायनाचें अभिनंदन करीत होते. एका देशाच्या निशाणाखालीं गोळा झालेल्या अठरापगड जातींप्रमाणें निरनिराळीं झाडें त्या वनभागांत खांद्याला खांदा लावून उभीं होतीं. मधूनच दिसणाऱ्या एखाद्या आंब्यावर हिरवे घोस लटकलेले पाहून एकत्र खेळणाऱ्या बालकांच्या जमावाची कुणालाहि आठवण झाली असती.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## वनस्पतींचें राज्य

हिरव्या पान-पाचोळ्यांतून सोनें काढणारा किमयागार पश्चिमेकडील डोंगरावर कलूं लागला. जिकडे तिकडे वनस्पतींचा समुद्भव झाला होता. रानें, झाड्या, माळ, घशी, पट्ट्या, कडामेरा गवतानें, पानांनीं नाहीं तर वेलींनीं गजबजल्या होत्या. कोठेंहि तसूभर जागा वनस्पतीनें मोकळी ठेविली नव्हती. ही हिरवी वनस्पति कांहीं ठिकाणीं पिवळी तर कांहीं ठिकाणीं लाल पडली होती. झाडांचीं पानें झडण्याच्या बेतांत होतीं. गवताचें बीं गळत होतें. शेतकरी भात काढीत होते. या दरींत अन्नब्रह्माच्या निर्मितीकारितां विश्वकर्मा जणूं एक मोठा यज्ञ करीत आहे असें दिसत होतें.

— र. वा. दिघे : ( सराई )

## गवताचा गालिचा

आपल्या पाठीमागें पसरलेल्या मैदानाकडे ते पाहूं लागले. तो काळसर हिरवा गालिचा पसरत क्षितिजाच्या रेषेंत विलीन झाला होता. ते त्याच्याकडे निरखून पाहूं लागले. मंदशी वाऱ्याची झुळूक येई. नुकत्याच मावळणाऱ्या चंद्र-कोरीच्या प्रकाशांत तो सबंध गालिचा जणूं पुढें क्षितिजाकडे सरकण्याचा प्रयत्न करीत आहे, असें दिसे. लहान लहान तृणांकुरांवरून एकेक लाट सरकत दिसेनाशी होई.

कुसुमावती देशपांडे : ( गवताचें पातें )

## हिवाळ्यांतील पानें

आम्ही गेलों ते माघांतले पानगळीचे दिवस होते. शिशिरानें त्या कामावर वाऱ्याची सक्त नेमणूक केली होती. तो झाडांचीं पिवळीं पानें प्रथम मुळांत झडवीत होता आणि तेथून मग रानभर इतस्ततः लोटीत होता. मात्र वाऱ्यानें एवढी लूटमार करूनही झाडें मात्र अगदींच कफल्लक झाली नव्हतीं. कांहींची जुनी पर्णसंपदा अजून थोडीबहुत टिकून राहिली होती, तर कांहीं वृक्षांच्या अंगावर नव्या आरक्त लुसलुशीत पालवीचा साजही चढला होता.

– महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतींची राजधानी )

पावसानें जिकडे तिकडे हिरवेंचार करून सोडलें होतें. श्रावणाच्या सरी मधून मधून पडत होत्या. बाजरीच्या लिंबुरानें माळरानें काळीशार दिसत होतीं. शेतें वाऱ्यांत डुलत होतीं. हिरव्या शोभेवर संध्याकाळचें पिवळें ऊन पडलें कीं, भूवर स्वर्ग उतरला आहे असें वाटे.

– र. वा. दिघे : ( पाणकळा )

## झाडावरचा पक्षी

एक बाहिरी पक्षी आपला चिमुकला पिसारा उभारून आंब्याच्या फांदीवर थुईथुई नाचत होता. त्यानें सप्त-सुराच्या रागदारींत गिरकीचा आलाप घेतला व पाते लवतें न लवतें तों भुरेदिशीं हवेंत फिरकीचें रंगण मारलें व तो पुन्हां आपल्या जागेवर येऊन नाच करीत आलाप घेत डौलानें नाचूं लागला.

– र. वा. दिघे : ( सराई )

## आंब्यावरील कोकिळा

दूर कोठें तरी आंब्याच्या झाडावर बसून कोकिळा त्यांच्याशीं लपंडाव खेळत होती. आकाश व पृथ्वी या दोघांमध्यें यावेळीं आपलें सौंदर्य प्रगट करण्याची जणूं काय अहमहमिकाच लागली होती.

– वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## पांखरांचा थवा

चालतां चालतां डावीकडून सागरी पांखरांचा एक थवा आवाज न करतां आमच्यापुढें आला, क्षणभर खालीं-वर असा नाचला आणि एकाद्या रागिणीच्या स्वरमालेच्या आरोहावरोहांप्रमाणें 'उड्डीन' गतीनें उजव्या हाताच्या अंतराळांत भरारला. किती शिस्त होती त्यांच्या त्या संघांत ! एकहि पांखरूं घोटाळलें नाहीं कीं चुकलें नाहीं. वाटलें कीं, त्या इवल्याशा शेंकडों पक्षिशरीरांत एकच प्राण खेळतो आहे.

– महादेवशास्त्री जोशी : ( अलीबागचा पाणकोट )

## पहांटेचें वातावरण

मीं अंगावरचें पांघरूण फेंकून दिलें. उठलों व चूळ भरावयासाठीं खिडकींत गेलों. गार वाऱ्याची झुळूक अंगावरून गेली. बाहेर स्फटिकासारखें शुभ्र चांदणें पडलेलें दिसलें. कॉलेजच्या आवारांतील वेलींवरील अर्धविकसित फुलांचा मधुर वास आला. समोरच्या पिंपळावरील पक्षांची किलबिल ऐकूं आली. लांब कोठें तरी एका झोंपडयांत कोणी स्त्री गाणें म्हणून दळत होती. तिच्या गाण्याचा अस्पष्ट आवाज कानांवर आला.

— ना. सी. फडके : (कुलाब्याची दांडी)

## उषःकालाची रम्यता

सिंदूरामधून सुवर्णाचा जन्म झाला. पश्चिम किनाऱ्यावरील सूर्यास्ताची शोभा आपण अनेक वेळां पाहूं शकतों, परंतु सागर-मंथनामधून लक्ष्मी निघावी तशी उदीयमान उषेची वधमान शाभा पाहाण्याचा आनंद कांहीं औरच असतो. आकाश जसजसें हंसूं लागलें, तसतशी समुद्राच्या मुखावर आनंदलज्जेमुळें फुगलेल्या शिरांची संख्या वाढूं लागली. जणूं काय दोन समवयस्क मित्रांत थट्टा-विनोदच चालू असावा.

— आचार्य कालेलकर : (ब्रह्मदेशचा प्रवास)

पहांटेचें निर्मळ चांदणें सगळीकडे पडलें होतें. निळ्या टोपीवर शोभणाऱ्या चमक्यांप्रमाणें स्वच्छ आकाशावर चांदण्या चमचम करीत होत्या.

— ना. ह. आपटे : (रत्नगुंफा)

## पहांटेची सृष्टि

शेताच्या वक्षःस्थळावर चंद्रिकेचें क्षौम वस्त्र पसरलें होतें. तो शीतल अमृतमय प्रकाशरस झाडेंमाडें मूकपणें प्राशीत राहिलीं होतीं. पश्चिमाकाशांत कृतिका क्षितिजाखालच्या अथांग सागरांत सूर मारावी न मारावी अशा संदिग्ध मनःस्थितींत दिसत होत्या. चंद्राला मात्र विशेषशी घाई दिसली नाहीं. तो रोहिणीशीं विरहापूर्वीच्या गुजगोष्टी विश्रब्धपणें बोलत राहिला होता. सभोंवतींच्या डोंगरांना आकाशमाउली दंवबिंदूंनीं कार्तिक-स्नान घालीत होती. ताजी, टवटवीत, प्राणमय, प्रकाशमय अशी ती पहांट होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( परशुराम क्षेत्र )

## पहांटेची मोहिनी

पहांटेच्या त्या प्रशांत वेळीं सारी सृष्टि रजनीमातेला अगदीं बिलगून निजली होती. मधूनमधून ऐकूं येणाऱ्या कोंबड्यांच्या आरवण्याखेरीज दुसरा कुटलाहि आवाज ऐकूं येत नव्हता. सूर्यविकासी कमळाप्रमाणें विश्व जणूं काय यावेळीं आपल्या पाकळ्या मिटून बसलें होतें. झाडें, त्यांचीं पानें, पांखरें, दारें या सर्वांवर कुणी तरी मोहिनीमंत्र घातला आहे कीं काय, असा भास झाल्यावाचून राहात नव्हता. पहांटेचा गार वारा एकाद्या भाटाप्रमाणें कसलें तरी गीत गात गात कलिकांच्या कानाशीं लागत होता; पण झोंप पुरी न झाल्यामुळें त्या फक्त या कुशीवरून त्या कुशीवर होत होत्या.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## सूर्यकिरणांची भूपाळी

सोनेरी सूर्यकिरण शेतांच्या अंगावरची धुक्याची दुलई हलकेंच वर करून रोपट्यांना ' उठा उठा हो सकाळिक ' म्हणत होते. दंवानें न्हालेलीं कणसें वाऱ्यावर डुलत होतीं आणि त्यांच्यावरचीं पांखरेंही त्यांच्यासंगें झुलत होतीं. गाडीच्या धडधडाटानें रस्त्याच्या कडेचें एक भिरें भुरदिशीं उडालें खरें, पण रिकाम्या चोचीनें खास नव्हे. त्यांना आपल्याबरोबरच घरट्यांतल्या अजात-पक्ष पिलांचीहि काळजी होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( तुळजा भवानी )

## धुक्याचा सागर

मीं उजव्या बाजूला तोंड वळवलें आणि थबकलोंच. समुद्रच होता तो ! पण खाऱ्या पाण्याचा नव्हे, तर धुक्याचा. वासिष्ठी नदींतून तें वर उठलें होतें. तिकडची सारी सृष्टि त्यानें अज्ञातांत विलीन केली होती. ' वाढता वाढता वाढे ' अशा क्रमानें तिकडचे डोंगरसुद्धां त्यानें गिळीत आणले होते, कांहींचीं फक्त बोटभर शिखरें वर उरलीं होतीं; पण त्यांचेंही लक्षण ठीक दिसत नव्हतें. अजून लाटांचे लोट वर उठतच होते. पृथ्वी जणूं विरघळून, बाष्परूप होऊन आपल्या ' द्यौस् ' पतीला सर्वांगीं खेंव द्यायला निघाली होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( परशुराम क्षेत्र )

सकाळीं अरुणाच्या छटेनें तिचें पाणी रंगूं लागलें कीं, निळें पातळ सोडून ती गुलाबी पातळ नसली आहे असा क्षणभर भास होई.

— र. वा. दिघे : ( रानजाई )

## धुक्याची दुलई

डोंगराच्या कुसाडांतून व खोंदाडांतून धुकें बाहेर पडलें व त्याचे पांढरेशुभ्र पट्टे रानारानांतून घुसूं लागले. त्या धुक्यांत प्रचंड वृक्ष, रानें, कडे व गिरि-शिखरें बोल-बोलतां अदृश्य झालीं. प्रथम पिंजलेल्या कापसाचा एक लांबच लांब पट्टा पसरला व थोड्याच वेळांत काळा कडा पायथ्यापासून माथ्यापर्यंत पांढऱ्या दुलईंत गुडूप झाला; जणूं कोणा योगींद्रापासून गुरुमंत्र घेत आहे.

— र. वा. दिघे : ( सराई )

## तलावाचें दृश्य

गौरीशंकर ( भावनगरचा बोर तलाव ) तलावाचें दर्शन अचानक घडतें. आम्ही बगीच्यांत गेलों, झाडीचें सौंदर्य निरखिलें, चिनी मातीच्या तुकड्यांनीं बनविलेले निर्जीव हत्ती, घोडे, वाघ आणि सिंह यांची ऐट पाहून, झाडांतून बागडणाऱ्या सजीव पक्षांचा कलरव ऐकत ऐकत तलावाच्या कांठीं येऊन पोहोंचलों. पायऱ्या चढूं लागलों. गार वाऱ्याची झुळूक येऊं लागल्यामुळें मनास शांतता वाटूं लागली. तरीहि तलाव कसा असेल याची कल्पना येत नाहीं. अगदीं शेवटच्या पायरीवर पाय ठेवला म्हणजे जणूं एकाएकी आकाशाचा पट चिरून एकादी अप्सराच आपल्यासमोर अवतीर्ण व्हावी तसें सरोवराचें पाणी स्मित करीत आपणाकडे पाहात असल्याचें दृश्य दिसतें.

— आचार्य कालेलकर : ( उध्यारस

तुझें कमळ तूं फुलव. तुझा दिवा तुझे हातीं.

— साने गुरुज

## बालसूर्याचें दर्शन

इतक्यांत बालसूर्याचा घुमट आंघोळ करून पाण्यांतून बाहेर निघाला. उगवत्या सूर्याच्या बिंबावर एक विशिष्ट तरलता असते; जणूं काय थंडगार पाण्यामधून कांपत कांपत सूर्य बाहेर येत असतो. आणि पाण्यांत जो प्रकाश पसरलेला असतो तो म्हणजे जणूं काय सूर्याच्या शरीरास चर्चिलेली कृष्णागरुची उटीच धुऊन गेलेली असते.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## सूर्योदयाची शोभा

अद्यापि सूर्यबिंब दिसूं लागलें नव्हतें. पण त्याच्या आगमनाच्या स्थळीं जणूं काय झगझगीत जरतारी वस्त्रांची बिछायतच पसरल्यासारखें वाटत होतें; व त्याची प्रभा सरोवरावर, वृक्षवेलींवर व चोहोंबाजूंस सारखीच पसरलेली दिसत होती. त्यामुळें सरोवराची शोभा कांहीं अवर्णनीयच दिसत होती. त्याच्या कांठाकांठानें कमलाच्या व इतर अनेक जातींच्या अनेक जलवेली पसरल्या होत्या व त्यांमधून शुभ्रवर्णाचे बकसारादि डौलदार मानेचे पक्षी आनंदानें जलक्रीडा करीत होते.

— ना. ह. आपटे : ( रत्नगुंफा )

## सूर्याचे किरण

आम्ही एकेका पावलानें वर चढत होतों, तसा पाठीमागून सूर्यही चढत होता. त्याचे धावते किरण गडाच्या तटावर उडत होते आणि काळ्या कातळांत तरीनें खोदलेल्या गुहांतून घुसत होते—जणूं शतमुख रावणाच्या मुखांत घुसणारे रामप्रभूचे अमोघ बाणच !

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवरायाची जन्मभूमि )

## सायंकाळचे रंग

टेंकडीवरचे सुंदर रंगाचे खडे ती गोळा करीत होती. ईश्वरानें तेथें मुक्त हस्तानें विखुरलेलीं तीं माणिक-मोतीं ती गोळा करीत होती. सूर्य मावळत होता. त्याचे सुंदर रंग पसरत होते. मावळला सूर्य. मोटार निघून गेल्यावर धुळीचे लोट सुटतात; सूर्य निघून गेल्यावर सौंदर्याचा समुद्र पसरतो.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## सृष्टींतील रंग-संगति

सायंसूर्याचें कलतें सौम्य ऊन या वेळीं पठाराच्या उंचसखल भागांवर सर्वत्र पसरलें होतें. त्या तिरप्या तकतकीत उन्हांत पठारावरील रेताळ मातीचा कुठें तांबूस, कुठें अंजिरी तर कुठें पिवळा रंग, पठारावर उगलेल्या गवताचा कुठें हिरवा, कुठें करडा तर कुठें गेरवा रंग, टेंकड्यावरील पाषाणांचा कुठें काळसर, कुठें जांभळा तर कुठें लाल रंग व निरनिराळया प्रकारच्या झाडांच्या कुठें पोपटी, कुठें गर्द हिरवा तर कुठें निळसर रंग-अशा नाना प्रकारच्या रंगछटा खुलून दिसत होत्या; व पश्चिमेकडील क्षितिजावर यावेळीं जे पांढरे, काळे, भस्मी, गुलाबी आणि पिवळसर रंगाचे ढग सुस्तपणानें जागोजाग थबकले होते, तेहि सर्व सूर्यप्रभेनें उजळून गेलेले असल्यानें द्यावापृथिवीच्या वेषभूषेंत एक प्रकारची विचित्र रंगसंगति उत्पन्न झाल्यासारखी दिसत होती.

— ग. त्र्यं. माडखोलकर ( अनघा )

## पावसाळ्यांतील सूर्यास्त

संध्याकाळ. नुकतेच मृग लागले होते; त्यामुळें पावसाळ्या · सूर्यास्ताच्या प्रभेची नवलाई फुलून आली होती. ओलसर गवत, पुनः हसूं लागलेलीं झाडें प्रसन्न पिवळ्या तेजानें चमकत होतीं. पक्षी विश्वस्तपणें आपल्या घरट्याकडे परतत होते. वेळेवर पाऊस सुरू झाल्यामुळें सर्व तऱ्हेच्या मंदीनें त्रासून गेलेल्या गरिबांच्याहि चेहऱ्यावर आशेचा तजेला दिसूं लागला होता.

— कुसुमावती देशपांडे : ( भाऊ–भाऊ )

## निरोप घेणारा सूर्य

आतां आमच्यासमोर सूर्यास्ताचा देखावा मांडला होता. ढगांचें परचक्र निवारून सूर्यनारायण मोकळा झाला होता, पण तो खालीं जाण्यासाठीं, सागरांत बुडी मारण्या-साठीं. आतां समुद्र आणि सूर्य यांच्यामध्यें फक्त एका वितीचें अंतर उरलें होतें, पण त्यांत डोळे दिपवणारी प्रखरता उरली नव्हती. त्याच्या सहस्र किरणांचाहि संकोच झाला होता.

— महादेवशास्त्री जोशी : ( अलीबागचा पाणकोट )

## सायंकाळची छाया

तो गगनांगणींचा दिवा मालवला. मावळतीच्या क्षितिजा-वर गुलालाचें पाणी ओतलें. थोडा वेळ त्या बाजूला वणवा लागल्यासारखें दृश्य दिसलें आणि मग हळूंहळूं पश्चिमही पूर्वेप्रमाणेंच दुर्मुखूं लागली.

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवरायाचा प्रताप )

## सायंकाळीं सागरकांठीं

संध्याकाळ झाल्यामुळें कावळ्यांचे थवेच्या थवे घरट्यांकडे परत जात होते. जणूं कांहीं त्यांची शाळा नुकतीच सुटली होती. त्यावेळीं वाऱ्यानें वाळूचे कण कसे मजेदार उडत होते. पाहणाराला वाटावें, त्यांची धावण्याची शर्यतच लागली आहे. समुद्राच्या कांठावरल्या रानगवताला का कशाला एक प्रकारचें मोठें फूल येतें. तें सुकलें कीं वाऱ्यावर इकडे तिकडे धांवूं लागतें. तशीं चारपांच फुलें पाहून मला वाटलें कीं, वाऱ्याच्या लहरी चेंडू घेऊन खेळत आहेत.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## नदीवरील संध्याकाळ

जाई सुवर्णसीमेच्या पात्राकडे एकाग्रतेनें पाहात होती. सायंप्रकाशांत सुवर्णसीमेचा प्रवाह सोन्याच्या नागिणीसारखा वळसे घेत मैदानांतून चालला होता. गाईवासरें गायरानांतून परत येत होतीं. पक्षी घरट्याकडे टोळ्या करून उडत होते. पश्चिमेला वरुणाचा रंग पसरला होता. व त्यांत शुक्राचा तेजस्वी तारा लखाखत होता.

— र. वा. दिघे : ( रानजाई )

संध्येच्या आगमनामुळें शांत शांत होत जाणारी खलाटी, दरीच्या कोचीकोचींतून रात्रीची ;छाया येत होती तेथपर्यंत पसरली होती. त्या किर्र अशा खलाटींतून भातागवतांचे, करडूच्या फुलांचे सुवास सुटले. कारवीचा मादक गंध त्यांना रेटूं लागला. भुंगे गवतीफुलांवरून वीणावादन करूं लागले.

— र. वा. दिघे : ( सराई )

## सायंकाळचीं दृश्यें

वारा भणभणत आंत येत होता. त्याच्या प्रत्येक झोताबरोबर समोर जें पिंपळाचें मोठें थोरलें झाड होतें, त्याच्या पर्णबहुल फांद्या इतक्या जोरानें हेलकावत कीं, त्यांचा आवाज ऐकून मोटेचें पाणी धप्दिशीं कोसळल्याचा भास होई. पिंपळाची जी एक जाड उंच फांदी डोंगराच्या सुळक्याप्रमाणें वर गेली होती, तिच्या टोंकाला आलेल्या पानांच्या झुबक्यांतील आपल्या घरट्यांत बसून घार आपला कर्कश भेदक आवाज काढीत होती. मारुतीपुढच्या मोकळ्या जागेंत आट्यापाट्या खेळत असलेल्या पोरांच्या आरोळ्या आणि पलीकडच्या बाजूला पोवाडे म्हणत असलेल्या लोकांचे ' रामा हो जी जी जी !' सूर, दिवसभराच्या काबाडकष्टानंतर मिळालेली सायंकालीन विश्रांति किती मजेंत जाते, याची साक्ष देत होते.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( चंदनवाडी )

## खेड्यांतील संध्याकाळ

संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत पोपटांचे हिरवे कळप हिरव्या झाडींतून दिसेनासे होत होते. कावळ्यांचीं व बगळ्यांचीं रात्रीं बसण्याचीं निरनिराळीं झाडें ठरलेलीं होतीं. तिकडे ते विश्रांतीकरतां चालले होते. बगळ्यांच्या माळा सात, पांच, नऊ अशा व्यस्त संख्येनें ठराविक व्यूहरचना करून येत होत्या. धनगरांचे हजारों मेंढ्यांचे कळप मेंढवाड्यांत परत येत होते. कळप मेंढवाड्याजवळ आल्याबरोबर जिकडे तिकडे ' बें बें ' आवाजाचा हलकल्लोळ उठला.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

( १०१ ) १७५४

**सायंकाळचा आनंद**

जिकडे तिकडे रानांत पीक डुलत होतें. हवा अगदीं स्वच्छ होती. धुळीचे कण किंवा धूर कुठेंहि हवेंत उडतांना दिसत नव्हता. संध्याकाळचें ऊन पिकांवर पडून सोनें पिकवीत होतें. क्षणाक्षणाला सुखकर थंडी वाढत होती. गायरानें, मळे, वावरें संध्याकाळच्या प्रकाशांत उजळून दिसत होतीं. बाभळीच्या कांटेरानांत पक्षी किलबिल करीत होते. सुग्रणींच्या ( Tailor-birds ) घरट्यांतून पिलें आपल्या आया आल्या किंवा नाहींत तें डोकावून पाहात होतीं.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

**रान-माळावरील संध्याकाळ**

आतां संध्याकाळ जवळ आल्यामुळें सूर्य पश्चिम क्षितिजाकडे झुकला होता. त्याच्या प्रकाशांत तांबूस रंगाची छटा यावयास लागली होती. वारा बंधनांतून मोकळा झाल्यामुळें जोरानें वहात होता. वाऱ्यानें हेलकावे खाणाऱ्या वृक्षशाखांच्या झोंपाळ्यावर बसून चिमुकले पक्षी अस्तोन्मुख सूर्याकडे पाहून चिंव चिंव करीत होते. मधूनच वाऱ्याचा झोत आला कीं मळ्यांतील काळ्या मातीबरोबर चाललेल्या चिपाडांचा भुसा वर हवेंत उडून कांहीं वेळ तांबूस सूर्यप्रकाशांत चकाकत होता.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

लहानपणीं जें ऐकावें, जें वाचावें, तें खरें वाटतें. साऱ्या जगावर आपली तेव्हां श्रद्धा असते.

— साने गुरुजी

## सायंकाळचीं दृश्यें

वारा भणभणत आंत येत होता. त्याच्या प्रत्येक झोताबरोबर समोर जें पिंपळाचें मोठें थोरलें झाड होतें, त्याच्या पर्णबहुल फांद्या इतक्या जोरानें हेलकावत कीं, त्यांचा आवाज ऐकून मोटेचें पाणी धप्‌दिशीं कोसळल्याचा भास होई. पिंपळाची जी एक जाड उंच फांदी डोंगराच्या सुळक्याप्रमाणें वर गेली होती, तिच्या टोंकाला आलेल्या पानांच्या झुबक्यांतील आपल्या घरट्यांत बसून घार आपला कर्कश भेदक आवाज काढीत होती. मारुतीपुढच्या मोकळ्या जागेंत आट्यापाट्या खेळत असलेल्या पोरांच्या आरोळ्या आणि पलीकडच्या बाजूला पोवाडे म्हणत असलेल्या लोकांचे ‘ रामा हो जी जी जी !’ सूर, दिवस-भराच्या काबाडकष्टानंतर मिळालेली सायंकालीन विश्रांति किती मजेंत जाते, याची साक्ष देत होते.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( चंदनवाडी )

## खेड्यांतील संध्याकाळ

संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत पोपटांचे हिरवे कळप हिरव्या झाडींतून दिसेनासे होत होते. कावळ्यांचीं व बगळ्यांचीं रात्रीं बसण्याचीं निरनिराळीं झाडें ठरलेलीं होतीं. तिकडे ते विश्रांतीकरतां चालले होते. बगळ्यांच्या माळा सात, पांच, नऊ अशा व्यस्त संख्येनें ठराविक व्यूहरचना करून येत होत्या. धनगरांचे हजारों मेंढ्यांचे कळप मेंढवाडयांत परत येत होते. कळप मेंढवाडयाजवळ आल्याबरोबर जिकडे तिकडे ‘ बें बें ’ आवाजाचा हलकल्लोळ उठला.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

१५४

## सायंकाळचा आनंद

जिकडे तिकडे रानांत पीक डुलत होतें. हवा अगदीं स्वच्छ होती. धुळीचे कण किंवा धूर कुठेंहि हवेंत उडतांना दिसत नव्हता. संध्याकाळचें ऊन पिकांवर पडून सोनें पिकवीत होतें. क्षणाक्षणाला सुखकर थंडी वाढत होती. गायरानें, मळे, वावरें संध्याकाळच्या प्रकाशांत उजळून दिसत होतीं. बाभळीच्या कांटेरानांत पक्षी किलबिल करीत होते. सुगरणींच्या ( Tailor-birds ) घरट्यांतून पिलें आपल्या आया आल्या किंवा नाहींत तें डोकावून पाहात होतीं.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## रान-माळावरील संध्याकाळ

आतां संध्याकाळ जवळ आल्यामुळें सूर्य पश्चिम क्षितिजाकडे झुकला होता. त्याच्या प्रकाशांत तांबूस रंगाची छटा यावयास लागली होती. वारा बंधनांतून मोकळा झाल्यामुळें जोरानें वहात होता. वाऱ्यानें हेलकावे खाणाऱ्या वृक्षशाखांच्या झोंपाळ्यावर बसून चिमुकले पक्षी अस्तोन्मुख सूर्याकडे पाहून चिंव चिंव करीत होते. मधूनच वाऱ्याचा झोत आला कीं मळ्यांतील काळ्या मातीबरोबर चाललेल्या चिपाडांचा भुसा वर हवेंत उडून कांहीं वेळ तांबूस सूर्यप्रकाशांत चकाकत होता.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

लहानपणीं जें ऐकावें, जें वाचावें, तें खरें वाटतें. साऱ्या जगावर आपली तेव्हां श्रद्धा असते.

— साने गुरुजी

## मावळत्या उन्हांतील डोंगर

आतांपर्यंत डोंगरमाथे अस्पष्ट दिसत होते, ते जवळ आले आणि जवळूनहि ती प्रचंड पर्वतांची रांग आम्हाला साजरी दिसली. मध्यान्ह थोडी कलली होती. सूर्याचीं तिरकीं किरणं पडून, पर्वतांचे त्रिकोनी माथे व उतरणी उजळ दिसत होत्या, आणि दऱ्यांचा गडद रंग अधिक उठून दिसत होता. सूर्य जसजसा कलूं लागला तशी घाटावरची निळ्या-पांढऱ्या छाया-प्रकाशाची हालचाल अधिक विलोभनीय दिसूं लागली.

सौ. कमला फडके : ( त्रिवेंद्रमची सफर )

## संधिप्रकाशांतील रंगकाम

ती संध्याकाळची वेळ होती. सबंध दरी संध्याप्रकाशानें उजळली. रानाचे, भाताचे, गवताचे हिरवे, पोपटी, पिवळे रंग; कड्यांचे, डोंगरांचे निळे, जांभळे, काळे रंग त्या सोनेरी किरणांत निरनिराळ्या रंगांचे उठाव करीत मिसळले. त्या सोनेरी उन्हांत हिरवें रान सोन्यावर केलेल्या हिरव्या मिन्याप्रमाणें चमकत होतें. दरीचे वर आकाशांत निखारलेल्या ढगांची खार पडली. पश्चिमेकडील एका लांबच्या निळ्या डोंगरामागें सूर्य मावळत होता. संधिप्रकाश त्या निळ्या डोंगरामागून आगीच्या डोंबाप्रमाणें भडकला. तो संधिप्रकाश निखारलेल्या ढगावर पडून रंगाच्या समुद्राला उधाण यावें व तो दरीच्या आखातांत शिरावा असा देखावा दिसूं लागला.

– र. वा. दिघे : ( सराई )

## सूर्यास्ताचा देखावा

सूर्यास्ताची वेळ झाल्यामुळें झाडाच्या पानांत आश्रय घेण्यासाठीं थव्याथव्यांनीं येणाऱ्या पक्षांचा किलकिलाट सारखा चालू होता. पिंपळाच्या पारावर जो तेल, शेंदूर फासलेला उघडावागडा मारुती उभा होता, त्याच्या दर्शनासाठीं हातांत मिणमिण करणारी पणती घेऊन किंवा कणकेच्या दिव्यांची आरती पदराखालीं झांकून निघालेल्या बायकांची किनऱ्या कसण सुरांतलीं गाणीं कानावर पडत होतीं.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( चंदनवाडी )

## सायंकाळची शांतता

उघड्यावरच बांधलेलीं जनावरं तोंडांत धरलेल्या कडब्याचा आवाज करीत होतीं. त्यांच्या गळ्यांतलीं घुंगरं मध्येंच वाजत होतीं. झोंपड्यापाठीमागें वेळूचं लहानसं बेट होतं. त्यांत वाऱ्याची लकेर सळसळून वाजत होती. साऱ्या वस्तु झराझर अस्पष्ट व्हायला लागल्या होत्या. जणूं कोणाची तरी चाहूल घ्यावयासाठीं श्वसनक्रिया आवरल्याप्रमाणें दिशा स्तब्ध व्हायला लागल्या होत्या.

— ना. सी. फडके : ( झंझावात )

## सायंकाळची सृष्टि

अस्ताला जात असलेल्या सूर्याच्या फिक्या पिवळसर प्रभेचा लोट दिवाणखान्यांत पसरला होता. त्या प्रकाशांत समोरच्या एका नवीनच बांधलेल्या टुमदार बंगल्याच्या खिडक्यांचीं तावदानें लखलखत होतीं. झाडांच्या सांवल्या विरघळून जाऊन अदृश्य होत होत्या आणि त्यांची पर्णराजी मात्र झपाट्यानें काळवंडत चालली होती.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## ढगांतील चन्द्रकोर

पश्चिम क्षितिजावर तृतीयेची चंद्रकोर गुरगुरणाऱ्या ढगांच्या रांगांतून वाट काढीत होती. तिचें सौम्य गुलाबी तेज डोळ्यांना सुखवीत होतें; क्षितिजाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत मधूनच लखलखणारी वीज आपल्या तेजस्तांडवानें डोळे दिपवीत होती.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

## लखलखणारी चंद्रकोर

श्रावण महिन्यांतल्या कुंद चांदण्याची धूसर रम्यता त्यांच्यासभोंवतीं पसरली होती. सायंकाळीं जोराची सर येऊन गेल्यामुळें स्वच्छ झालेल्या पश्चिम क्षितिजावर जो एकच काळाभोर ढग आतां कडेपासून वरपर्यंत निमुळता होत पसरला होता, त्याच्या टोंकाशीं लखलखत असलेली चंद्रकला पाहून, भगवान चंद्रमौलीच्या भव्य जटाजूटाचें स्मरण होत होतें.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

## मावळती चन्द्रकोर

तृतीयेच्या चंद्राची निमुळती, पिवळसर कोर अगदीं बुडावयाच्या बेताला आली होती. भरतीमुळें वेगानें उसळत असलेलें समुद्राचें निळें पाणी तिला गिळून टाकण्यासाठीं धडपड करीत होतें जणूं कांहीं. त्या मावळत्या चंद्रकलेचें सौम्य चांदणें क्षणोक्षणीं फिकें पडत चाललें होतें, व त्याच्या मंद प्रकाशांत समुद्राच्या लाटा सर्पाच्या अंगावरील खवल्यासारख्या चमकत होत्या.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( भंगलेलें देऊळ )

## आकाशींचा चन्द्र

नक्षत्रें निस्तेज होऊन बहुतेक दिसेनाशींच झालेलीं होतीं. चंद्र मात्र आकाशाच्या मध्यभागीं एकटाच आपल्या अस्त-समयाची वाट पाहात बसलेला होता. त्याच्याकडे पाहिलें असतां स्वर्गांतील एकाद्या देवाचा हा सुवर्णमयी रथ आहे कीं काय किंवा एकादा कांचनदेही राजहंस पक्षी आकाशगंगेच्या स्वच्छ उदकामध्यें प्रातःस्नान करून पोहत बसला आहे कीं काय असा भास उत्पन्न होई.

— शि. म. परांजपे : ( शिवाजीचें पुण्याहवाचन )

## सायंकाळचा देखावा

आतां सूर्य खूपच खालीं उतरला होता. लहरत्या सागरावर त्याचा लांबच लांब प्रकाशपट्टा पसरला होता. हेमंत आपल्या शीतास्त्राचा मंत्र जपूं लागला होता. झाडा-माडांच्या छाया भुतासारख्या दिसूं लागल्या होत्या.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

## नदींतील कमळ

जाईनें श्रीकमळ दुर्गावरून खालीं पुण्यसलिला सुवर्ण-सीमेंत सोडलें, तें राजहंसाप्रमाणें तरंगत तरंगत लांब पश्चिमे-कडे वाहात गेलें. जाई त्याच्याकडे शून्य दृष्टीनें पाहात राहिली. जाईनें पश्चिमाकाशाकडे दृष्टि केली. वरुणाचलाच्या बाजूनें वरुणाचे रंग पसरले होते व त्यांत वासंतिक प्रतिपत्-चंद्रलेखा अमृताच्या पाझराप्रमाणें चमकत होती.

— र. वा. दिघे : ( रानजाई )

रात्रीच्या काळोखाचा प्रवाह उषःकालच्या प्रकाशा-कडे वहात असतो.

— वि. वा. शिरवाडकर

## झाडांतील कवडसे

त्या ठिकाणीं चांदणें पडलें होतें असें म्हणण्यापेक्षा चांदण्या पडल्या होत्या असें म्हणणेंच जास्त बरोबर होईल. कारण वृक्षांच्या दाट गर्दीतून चांदण्यांचे अनेक बारीक ठिपके इकडे तिकडे शिंपडल्यासारखे त्यावेळीं भासत होते. आणि वृक्षांच्या खांद्या जशा जशा मंदपणें हालत तशा तशा या ठिपक्यांच्या जागा भराभर बदलत, त्यामुळें यमुनेच्या प्रवाहांतील लाटांप्रमाणें, त्या जागेंत पडलेल्या चांदण्यांच्या प्रकाशाच्या लहान-मोठ्या ठिपक्यांना सारखी आंदोलनें मिळत होतीं.

— ना. सी. फडके : ( अल्ला हो अकबर ! )

## चांदण्यांतील गोपुरें

मदुरा शहरांतून फेरफटका करून आम्ही पुन्हां मीनाक्षीच्या मंदिराकडे आलों. सकाळीं सूर्यप्रकाशांत आम्हीं गोपुरांची शोभा पाहिली होती. आतां चंद्रप्रकाशांत ती पुन्हां पाहण्यासाठीं आम्ही आलों होतों. आकाशांत चांदण्याची कोवळी प्रभा फाकूं लागली होती. त्या सतेज उजळ निळ्या पार्श्वभूमीवर चारी गोपुरं अधिकच भव्य दिसत होतीं. चंद्रप्रकाशांत मीनाक्षीच्या प्रचंड मंदिराची शोभा 'स्वर्गीय वाटली. एक प्रचंड कलास्वप्न पुढं उभं असल्याचा भ्रम नेत्रांना झाला.

— सौ. कमला फडके : ( त्रिवेंद्रम्‌ची सफर )

आकाशापासून पृथ्वीपर्यंत चांदण्यांचा सागर पसरला होता. समुद्राच्या तळाशीं बुडून गेलेल्या पर्वताप्रमाणें टेंकडी दिसत होती.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## चांदण्यांचा धबधबा

वद्य पक्षांतील चंद्र काळ्या कड्यावर कैलासपर्वताच्या शिखराप्रमाणें झळकूं लागला. काळ्या कडयावरून चंद्राचे किरण भैरवाच्या सोंडींतून अशा रीतीनें पडले होते कीं, चांदण्याचा एक बिन आवाजाचा धबधबाच तेथें निर्माण झाला आहे असा भास होई.

— र. वा. दिघे : ( सराई )

## चांदण्यांचा मुलामा

वैशाखीच्या प्रखर चांदण्यानें यावेळीं सारें स्थिरचर अगदीं उजळून गेलें होतें. एरवीं कठोर, निळसर दिसणाऱ्या डोंगराच्या क्षितिजाशीं समांतर असलेल्या शिखररेषांनासुद्धां त्या धवल प्रकाशांत एक प्रकारची मृदु पांडुरता आली होती. आकाशहि आपला स्वाभाविक नीलिमा टाकून देऊन इतकें स्वच्छ, शुभ्र आणि सतेज दिसत होतें कीं, स्वर्गंगंगेला पूर येऊन तिचा तेजोरस साऱ्या द्यावापृथिवींवर ओसंडला आहे कीं काय, असा भास होत होता.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

## चांदण्याची जादू

संध्याकाळ होऊन गेली होती. दोघेहि विश्रांतीकरितां ओढ्याच्या कांठच्या एका प्रशांत जागीं जाऊन बसलीं. वरून शुक्लपक्षांतलें चांदणें अमृताचे तुषार उधळीत होते. त्यामुळें ओढ्याच्या बाजूच्या खडकांना संगमरवरी दगडांची आणि बाभळींना पारिजातकाच्या झाडांची शोभा आली होती.

— वि. स. खाण्डेकर : ( हिरवा चाफा )

## चांदण्यांतील लाटा

आम्ही खालीं उतरून वाकांवर जाऊन बसलों. चंद्र या वेळीं मध्यावर आलेला होता. त्याच्या धूसर चांदण्यांत सारी सृष्टि गुरफटून, धुरकटून गेल्यासारखी दिसत होती; त्या बंदिस्त समुद्राच्या लाटा, आंवरून धरलेल्या भावनां-प्रमाणें, जागच्या जागीं उसळून लय पावत होत्या. कचित् एकाददुसरा अश्रु जसा त्या भावनांच्या उसळीसरसा डोळ्यांतून ठिबकावा, तसे लाटांच्या धडकीसरसे त्याचे विरळ तुषार अंगावर येत.

– ग. त्र्यं. माडखोलकर : ( भंगलेलें देऊळ )

## चांदणें व सुगंध

माही पौर्णिमेची रात्र होती. शांत सजलपूरवर चांदीच्या रसाचा 'वर्षाव चालू होता. सुगंधाच्या दर्यांत तुफान चाललें होतें. त्यांत पारिजातकाच्या सुवासाची भर पडली होती. सर्व शेतकरी निद्रिस्त होते. नदींतील टिटव्या व चिंचेवरील–उंबरावरील घुबडें मात्र जागीं होतीं. तीं घू घू करीत होतीं ! खळ्यावरून पेटवलेल्या झगटी लांबून दिसत होत्या. या सुवासाचा, या सृष्टीसौंदर्याचा चंद्राशिवाय कोणी उपभोग घेत नव्हतें. तो मात्र वरून खूष होऊन हंसत होता. त्याच्या भीतीनें सांवल्यांनीं झाडांचे पाय धरले होते.

– र. वा. दिघे : ( पाणकळा )

आपलं सुख दुसऱ्याच्या दुःखावर उभारणं यासारखं दुसरं पाप जगांत नाहीं !

– वि. खांडेकर

## चांदण्यांतील नौकाविहार

चहूं बाजूला इतकें शांत आणि स्तब्ध होतें, कीं शांततेच्या समुद्रांतच पडल्यासारखें मनाला वाटत होतें. दोन्ही किनाऱ्यावरील झाडाझुडपांचा फार आल्हाददायक नाहीं व फार उग्र नाहीं असा एक विलक्षण मिश्र गंध येत होता. वारा अगदीं मंदपणें वहात होता, आणि त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या लहान लहान लाटांनीं आमची होडी इतक्या सूक्ष्मपणें हालत होती, कीं तिच्यावरून जमिनीला सूक्ष्म स्पर्श करीत पावलें टाकणाऱ्या कुशल नर्तकीची आठवण होत होती.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## चांदण्यांतील प्रवास

मध्येंच गर्द झाडी लागली कीं, चंदेरी ठिबक्यांचं कलाबूत काम ज्यावर केलेलं आहे अशा काळ्यासांवळ्या वस्त्रावरून गाडी चालल्यासारखा भास होई. पक्ष्यांची किलबिल हलके हलके मंदावत होती. सृष्टीवर पसरलेला चंद्रिकेचा थर अधिक दाट होत चालला होता. स्वच्छ निळ्या आभाळांत चांदण्या तुरळक दिसत होत्या. भोंवतालच्या वनश्रीवर चंद्रकिरणांचे झोत पडले होते आणि हिरव्या, पिवळ्या व चंदेरी रंगांच्या मिश्रणाचें सड जिकडे तिकडे उधळल्या-सारखे दिसत होते. गाडीला जोडलेल्या पांढऱ्यासफेत बैलांचीं अंगं चांदण्यांत चकाकत होतीं, व पोळ्याच्या दिवशीं रंगविलेल्या त्यांच्या शिंगांचा आतां जरा फिका झालेला लालपणा शोभून दिसत होता

— ना. सी. फडके : ( झंझावात )

## तारकांचें गाणें

चंद्र अस्ताला गेला होता का अजून उगवावयाचा होता कोण जाणें. पण तो नसल्यामुळेंच असंख्य तारकांचें सौंदर्य त्यांचें स्वाभाविक शालीन हास्य निर्भरपणें आकाशभर विलसत होतं. प्रत्येकजण आपापल्या ठायीं मनमोकळेपणीं आपल्या जीवाचं गाणं गुणगुणण्यांत तल्लीन झाली होती व तरीहि त्या सर्वांच्या स्वयंविकसित तन्मयतेंत पूर्ण एक-मेळ होता. मग काय आकाशाच्या मध्यभागीं, सप्तरंगी हिऱ्याच्या तेजानें विलसणारं मृगनक्षत्र त्या सर्वांच्या संगीताचे धागे एकत्रित करीत होतें ?

— कुसुमावती देशपांडे : ( मध्यरात्र )

## रात्रींतील ध्वनि

रात्र पडून जिकडे तिकडे शांतता वाढूं लागली. रात-किडे मात्र किर्र करून ओरडत होते व वारा आला कीं कळकीचीं बेटें एकाद्या राक्षसानें दांत खावेत त्याप्रमाणें मधून मधून कडकड असा आवाज करीत होतीं. त्या आवाजामुळें शांतता उलट वाढत होती. त्या शांततेचा शाहीर कीं काय, एक खुब्रा नदीच्या पात्रांत टर्रटटर टर्रटटर अशी तान मध्येंच मारी व एकदम आवाज काढण्याचें थांबवी.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

आतां पूर्ण फुललेलीं तीं मोगऱ्याचीं पांढरीं शुभ्र फुलें जमिनीवर पडलेल्या चांदण्यांच्या कवडशांकडे जणूं तुच्छतेनें हंसत होतीं.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

# २

● मला जर ईश्वरानें पसंत करायला सांगितलें, तर वेरूळ–दौलताबादच्या कोरीव लेण्यांपेक्षां मी निःशंक मनानें, ज्ञानदेव–एकनाथांनीं रचलेलीं, कुसरीनें तयार केलेलीं, जिवंत, जाज्ज्वल्य निष्ठा सर्वांना शिकविणारीं, वाङ्मयात्मक लेणीं पसंत करीन.

– आचार्य विनोबा भावे : ( विनोबा-विचार-दर्शन )

● साहित्यिकाला संसारापासून अलग राहणें अशक्य आहे. ज्या मानानें तो या संसारांत बुडी मारील, त्या मानानें त्याच्या हातीं माणिक-मोतीं लागतील.

– साने गुरुजी : ( श्याम खंड ३ )

## पहांट उगवली

अंधाराच्या सरोवरांतून जलबिंदूंनीं डंवरलेली पहांट अलगद वर आली—अस्फुट! ओली! ताजी! ती जमिनीवर लोळली, झाडाझाडांतून किलबिलली, बालकाच्या निरागस कुतूहलानें तिनें घराघरांत डोकावून पाहिलें. सांठलेल्या पाण्याच्या नितळ पृष्ठभागावरून तिनें हात फिरविला. आपल्या विशाल क्रीडांगणाभोंवतीं क्षितिजाची रेषा आखली. आकाशांत तरंगणारीं पांढरीं पिसें मान वर करून आश्चर्यानें पाहिलीं. पाऊस पडल्यामुळें तलम झालेल्या वातावरणांत ती वाऱ्याच्या हातांत हात घालून बागडली आणि मग धुतलेल्या पाऊलवाटेवरून धांवत टेंकडीवर चढून ती पलीकडे वांकली आणि सूर्यकिरणांना म्हणाली, “ या रे या, धांवत या. आपण सगळे खेळूं या.”

— गंगाधर गाडगीळ : ( वर्षा )

## उषा

पूर्वेला उषा प्रगटली. वरच्या दिव्य पणत्यांतलें तेल सरलें. धुक्यांत गुरफटलेल्या गिरिशिखरांवर दिनप्रभा पसरूं लागली. गडाच्या वातावरणांत चैतन्य मुसावलें.

— महादेवशास्त्री जोशी ( ‘ प्रचंड ’ तोरणा ).

* अहाहा! रसरशीत सुवर्णरस पूर्वक्षितिजावर उसळतो आहे नुसता! सूर्यबिंब यायचेंच आहे वर अद्याप. पण प्रभा पहा कशी सर्वत्र फांकली जाहे! वाटतं हें चित्र असंच रहावं न् सारखं पाहात बसावं.

— ना. ह. आपटे : ( अपेक्षा )

१५८४८ अ.क्र. ... २८/८/६८

## सृष्टीची प्रार्थना

अद्याप पुणें झोपलेलें होतें. पांखरांची किलबिल सुरू झाली होती. पारिजातकाच्या फुलांचा मंद-मधुर सुगंध येत होता. आकाशांत ठळक-ठळक तारे अद्याप प्रशांतपणें चमकत होते—जणूं ते प्रातःप्रार्थना म्हणत होते.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## पहांटेची आरती

वाऱ्याच्या गार झुळुका—दूरच्या देवळांतून ऐकूं येणारे सनईचे सूर—विश्वाला चंदनाची उटी लावीत पहांट काकड-आरती म्हणत होती.

— वि. स. खांडेकर : ( तीन जगें )

## पहांटेचें आकाश

मोकळ्या मैदानांतील चांदण्याचा देखावा कांहीं अजबच दिसूं लागला. अद्यापहि पूर्व क्षितिज अस्वच्छच होतें. शुक्राचा तारा आतां बराच वर आला होता. चंद्र पश्चिम-पर्वत-शिखरावर झरझर उतरत होता. जणूं काय त्याला आतां विश्रांतीची आवश्यकता वाटूं लागली होती.

— ना. ह. आपटे : ( सुखाचा मूलमंत्र )

## पहांटेचा गारवा

एकाद्याचें दैव अचानक खुलावें, तशी पूर्व दिशेला उषा उजळत होती. महावाक्याचा उपदेश कानांतून हृदयांत शिरावा, तशी गुलाबी थंडी कपड्यांतून अंगांत घुसत होती. भक्तवत्सल भगवंताच्या करुणेसारखा वारा झुळझुळ अंगावरून वाहात होता.

— महादेवशास्त्री जोशी : ( लोहगड—विसापूर )

## पहांटेच्या सीमेवर

नुकतें कुठें झुंजूमुंजू दिसूं लागलें आहे, अशा वेळीं फिरायला बाहेर पडण्यांत मला नेहमींच मोठा आनंद वाटतो. भोंवतालीं पहावें तों काळोख हळूंहळूं विरळ होत जात असतो. जणूं कांहीं एकादी लावण्यवती युवती आपला जाळीदार बुरखा नाजूक हातानें दूर करूनच आपल्याकडे पाहून स्मित करीत आहे ! आकाशांत कुठें तरी चार-दोन निस्तेज तारका लुकलुकत असतात. पण लहान बालकाप्रमाणें नाचत-बागडत येणारा गोडगोड पहांट-वारा कुठून तरी सुगंधाच्या झुळुका घेऊन येतो नि कानांत गुणगुणतो '—असा वर काय वेड्यासारखा पाहतोस ? पृथ्वीवरल्या तुझ्या हाताला येणाऱ्या, तुला उल्हसित करणाऱ्या तारका झाडांवर आणि वेलींवर फुलं लागल्या आहेत. चल, तिकडे चल !'

— वि. स. खांडेकर : ( नवा खिसा )

## 'उदयाचलीं मित्र आला'

हळूंहळूं काळ्या ढगांतून सूर्यबिंब वर येऊं लागलें. तें पाहून एकादी कवयित्री उद्गारली असती, 'काल संध्याकाळीं सागरांत बुडालेला सुवर्ण-कलश हातांत घेऊन रजनी वर आली असावी. पण रत्नाकराच्या तळाशीं गेलेला तो कलश शोधतां शोधतां तिच्या अंगावरले हिऱ्यामोत्यांचे अलंकार गळून पडले असतील. ते शोधायला ती पुन्हां सागरांत गेली आणि तिनें वर आणलेला हा सुवर्ण-कलश लाटांवर डौलानें तरंगत आहे.'

— वि. स. खाण्डेकर : ( शांति )

## किरणांतील शिखर

सकाळचीं सोनेरीं सूर्य-किरणें हांसत-नाचत पूर्वेच्या पडद्याआडून पुढें आलीं. पर्वताच्या पायथ्याशीं उभ्या असलेल्या बालकाचे डोळे आनंदानें चमकले. इतका वेळ त्या पर्वताचें तें उंच उंच शिखर त्याला एकाद्या कमळ-कळीप्रमाणें भासत होतें. ती कळी आतां क्षणार्धात निद्रेंतून जागी झाली. तिच्या उमलत्या पाकळ्या मोहक गीत गाऊं लागल्या.

— वि. स. खाण्डेकर : ( शिखर )

## कीं सोन्याची उभी द्वारका ?

मी खिडकीपाशीं आलों. स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! जणूं कांहीं श्रीकृष्णाची द्वारका आकाशांत हंसत होती. पूर्व, ईशान्य, उत्तर—जिकडे पाहावें तिकडे रंगी-बेरंगी ढग पसरले होते. अंजिरी, केशरी, चंदेरी, सोनेरी किती किती रंगांत न्हाऊन निघत होते ते ! सारें आकाश गुदगुल्या केलेल्या बालकाप्रमाणें हसत होतें. त्याची प्रभा परावर्तित होऊन पृथ्वीवर पसरत होती. हळदीनें रंगविलेली अष्टपुत्री नेसलेल्या नववधूसारखी धरित्री सुंदर दिसत होती.

— वि. स. खाण्डेकर : ( सुवर्ण-क्षण )

## समुद्रांतील सूर्योदय

समोर पसरलेल्या अफाट समुद्रावर लहरींचें नृत्य सुरू होतें. पूर्वेकडल्या विविध रंगांच्या सागराचें मंथन पुरें होऊन त्यांतून सुंदर रविरत्न प्रगट झालें होतें.

— वि. स. खांडेकर : ( हृदयाची हांक )

## पांखरांचा किलबिलाट

झोंप पुरी होऊन मी जागा होतों तों पांखरांच्या किलबिलाटानें. भोंवतालचें जग अजून शांतच असतें. पण आईच्या कुशींत झोंपलेलें तान्हें मूल पहांटे जागें होऊन तिच्या मंगळसूत्राशीं खेळत खेळत जसें आपल्याशींच गोड गोड बोबडे बोल बोलत असतें, त्याप्रमाणें असंख्य पांखरांची ही मधुर किलबिल मला वाटते. मी हंसत डोळे उघडून समोर पाहतों. पूर्वेकडे विविध रंगांनीं रंगलेले छोटे-छोटे ढग माझ्या दृष्टीला पडतात. माझ्या मनांत एकदम एक कल्पना चमकून जाते–सुंदर रांगोळी घालण्यांत पूर्व-दिशा मोठी चतुर आहे. आतां थोड्या वेळांत उमललेल्या रक्तकमळाप्रमाणें दिसणारें सूर्यबिंब ती रेखाटील.

— वि. स. खाण्डेकर : ( खेडें )

## कुंद हवेंतील सकाळ

मीं डोळे उघडून पाहिलें. घड्याळांत साडेसात वाजले होते. मी उठून खिडकींतून पाहिलें. नुकतं कुठं उजाडलंय असा भास होत होता. सारें आभाळ काळवंडलें होतें. होळी विझल्यानंतर तिथल्या राखेच्या ढिगाला जशी अवकळा येते तशी पूर्व दिशा दिसत होती. सूर्याचा तर कुठें पत्ताच नव्हता ! माझ्या मनांत आलें ही कुंद पावसाळी हवा पाहून भगवान सूर्यनारायणही आपल्या अंथरुणांत गुडुप पांघरूण घेऊन निजून राहिला असावा !

— वि. स. खाण्डेकर : ( अंधश्रद्धा )

* नवल दृष्टींत असतें, सृष्टींत नसतें.

— न. चिं. केळकर

## धुकें लाजलें सूर्याला !

टेंकडीपर्यंत जाऊन आम्ही परत आलों, तेव्हां सूर्य किती तरी वर आला होता. पाहुणा आला कीं लाजून घरांत पळणाऱ्या बालकाप्रमाणें धुकें अदृश्य झालें होतें. गवतावर कुठें कुठें दंवबिंदूंचीं नाजूक जाळीं स्मृतिचित्रां-प्रमाणें पुसट दिसत होतीं.

— वि. स. खाण्डेकर : ( उल्का )

## धुक्यांतील काव्य

तिच्या मनाला अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी त्या धुक्याच्या समुद्रांत कुठल्या कुठें नाहींशा झाल्या. मधून मधून धुकें किंचित् विरळ होई. जणूं कांहीं झोपी गेलेला तो निळा समुद्र हळूंहळूं जागाच होत होता. लाटांप्रमाणें भासणारी ती हालचाल सरलेला मोहक वाटली. नकळत तिच्या कल्पनेचें नृत्य सुरू झालें. एकदम तिला वाटलें—" धुकें कसलें ? पृथ्वी आणि आकाश यांच्यामध्यें धरलेला हा मोठा अंतरपाटच नाहीं का ?

— वि. स. खाण्डेकर : ( धुकें )

## थंडी

थंडीवर राज्य आलें. धुक्यानें तिचे डोळे झांकले. पालवी लपायला गेली. फुलें दडून बसलीं. फळें दिसेनाशीं झालीं.

— वि. स. खांडेकर : ( फणसाचे कांटे )

* जगांत अनंत दुःख आधींच आहे. तें दूर न करतां आलें तर निदान त्यांत भर घालूं नका.

— साने गुरुजी

## दुपारची स्तब्धता

सगळीकडे अनिमिष स्तब्धता पसरली होती. झोंप लागली होती कां सृष्टीला ? छे: ! तिच्या जिवाची लाही होत होती. तिचा ऊर दाटून आला होता. तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. क्षितिजाच्या कडेवर थोडीशीं शिंदीचीं, कांहीं आंब्यांचीं झाडें अंधुकपणें दिसत होतीं; पण त्यांची छाया कितीशी पुरी पडणार ! त्यांची त्यांनाच त्याची जाणीव असल्यामुळें तीं जणूं विमूढपणें निश्चल उभीं होतीं. एक कोरडा ठणठणीत रुंद रस्ता मात्र उन्हांत तळपत होता-त्या काळ्या माईवरचें आपलें स्वामित्व प्रस्थापीत, विजयोन्मादानें तिच्या हृदयावर नाचत होता.

— कुसमावती देशपांडे : ( मध्यान्ह )

## दुपारचा उकाडा

दुपारपासून फार उकडत होतें. अंगाला नुसत्या घामाच्या धारा लागल्या होत्या. वाऱ्याचे पुसट अस्तित्व-सुद्धां जाणवत नव्हतें. जणूं कांहीं त्याचें आणि सृष्टीचें भांडण होऊन तो कुठेंतरी रुसून निघून गेला होता. वारा नसल्यामुळें गुदमरल्यासारखें होत होतें. अजिबात वारा नसण्यापेक्षां उन्हाच्या झळासुद्धां माणसाला पुरवतात. कसलेही हक्क नसलेल्या देशांत निदान भाषणस्वातंत्र्य मिळालें म्हणजे तेवढेंच बरें वाटतें ना !

— वि. स. खांडेकर : ( कुठं आहे तो मेघ ? )

* विनयाबरोबरच निर्भयताहि हवी. निर्भयतेनें प्रगति होते आणि विनयानें संरक्षण होतें.

— महादेवशास्त्री जोशी

## उन्हाळ्याचें दृश्य

वैशाखाच्या महिन्यांत दोन प्रहरच्या वेळीं एखाद्या राजाच्या सत्तेप्रमाणें सूर्याच्या उन्हाचा कडक अंमल सर्व सूर्य-मंडळावर बसलेला असतो. एखाद्या जुलमी राजाच्या जुलुमाप्रमाणें सूर्याच्या प्रखर उन्हानें सर्व मनुष्यांच्या अंगाची लाही लाही होत असते. लढाईंत घायाळ झालेल्या शिपायांप्रमाणें सर्व लोकांच्या अंगांतून रक्ताप्रमाणें घामाच्या धारा वाहात असतात.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## दुपारचें उन्ह

वाळूंत सुखानें निर्वाह करणारे तुंग ताडवृक्ष आनंदानें डोलत होते. उन्हाच्या तापानें कासावीस होऊन ते स्वतःच स्वतःवर चवऱ्या वारीत होते कीं, आमच्यासारख्या पथिकांची कींव करून आम्हांला वारा घालीत होते, हें कोण सांगणार? दुपारचें उन्ह कर्मठ ब्राह्मणाप्रमाणें कठोर तप करीत होतें. पाय भाजत होते, डोकें तापत होतें, आणि शरीराच्या मधल्या भागाला सहवेदना देण्यासाठीं तहान आपली करामत दाखवीत होती.

— आचार्य कालेलकर : ( पिनाकिनी )

## मध्यान्हींचा देखावा

सूर्य आतां आकाशाच्या मध्यावर आला होता. परंतु वर आकाशांतल्या सूर्याचें तेज अधिक कीं रुप्याच्या तप्त रसाप्रमाणं सळसळणाऱ्या त्या जलाशयाचं तेज अधिक असा भ्रम मनाला पडत होता !

— सौ. कमला फडके : ( कन्याकुमारीचें दर्शन )

## घाम काढणारी दुपार

अंगांतून गळणाऱ्या घामाच्या धारा पाहून कुणीतरी टांचणीनें आपल्या शरीराला शेंकडों भोंकें पाडलीं असावींत असाहि विचित्र भास मधून मधून होई. दारिद्र्यानें उपाशी मरणाऱ्या जनतेला कायदे-मंडळाच्या हक्काचा जेवढा उपयोग होतो, तेवढाच मला हातांतल्या पंख्याचा होत होता. आज चुकून सूर्यानें बारा डोळे उघडले तर नाहींत ना? अशी शंकासुद्धां माझ्या मनांत आल्यावांचून राहिली नाहीं. मी गच्चींत जाऊन बाहेरच्या भणभणणाऱ्या उजेडाकडे पाहूं लागलों. जिकडे तिकडे ऊन्ह रखरखत होतें.

— वि. स. खांडेकर : ( कुठं आहे तो मेघ ! )

## उन्हांत रखरखणारी जमीन

दृष्टीच्या सीमेपर्यंत काळी, शुष्क जमीन पसरली होती. शब्दांच्या पलीकडे जिचें दारिद्र्य गेलें आहे, अशा एखाद्या स्त्रीच्या अंगावरील फाटक्या चिंध्यांप्रमाणें वाळून कोळ झालेल्या गवताचे अवशेष भाजणाऱ्या वाऱ्यानें उगीचच भुरभुरत होते. दूरवर नजर फेंकली तर मधूनच मृगजळाचें तरंग दिसत, मधूनच ती काळीभोर जमीनच तरळल्या-सारखी–खालवर हलल्यासारखी वाटे.

— कुसुमावती देशपांडे : ( मध्यान्ह )

## श्रीमंतांची मिजास

सूर्य अस्तास जाईपर्यंत त्यांना झोंप काढावी लागते. सूर्य अस्ताला जातो आहे, रात्र पडते आहे, याच्या दरम्यान, घडी अर्धी घडी, पावघडी, लढाई करणें आम्हां-सारख्या श्रीमंतांच्या प्रकृतीला मानवतें.

— कृ. प्र. खाडिलकर : ( मानापमान )

## सायंकाळीं परतणारे पक्षी

निळ्या फलकावर एकाद्या नादिष्ट चित्रकारानें हाताला चाळा म्हणून खडूनें सुबक रेषाकृति काढून त्या लगेच पुसून टाकाव्यात, त्याप्रमाणें जमावानें उडणाऱ्या पक्ष्यांच्या रांगा नाना प्रकारच्या चित्रविचित्र आकृति घेत एकामागून एक दिसेनाशा होत होत्या. क्षितिजाच्या तेजाळलेल्या कडेनें जे पक्ष्यांचे थवे सारखे उडत होते, ते त्या सोनेरी सायंप्रभेंत सूर्यावर मुठी भरभरून उधळलेल्या फुलांच्या पाकळ्यांसारखे दिसत होते.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## संगमावरील सूर्यास्त

संगमाच्या जोडीला सूर्यास्त कसा शोभून दिसतो तें पाहण्यांत आम्ही गढून गेलों होतों. सोनेरी रंग सर्वत्र शोभतो; पण हिरव्या रंगाबरोबर त्याची बादशाही शोभा कांहीं विशेषच दिसते. उंच उंच झाडांवर जेव्हां संध्येचे सुवर्णकिरण आरोहण करतात, तेव्हां ही मानवी सृष्टि नसून पऱ्यांची—अप्सरांची सृष्टि आहे असा भास होतो. समुद्र तर जणूं कांचनरसाचें सरोवर तळपत असावें तसा शोभूं लागतो !

— आचार्य कालेलकर : ( सागर—सरितांचा संगम )

## समुद्रावरील सायंप्रकाश

सायंकाल झाली होती. समुद्रावर लाल प्रकाश पसरला होता. तांबडा समुद्र जणूं तेथें नाचत होता.

— साने गुरुजी : ( तीन मुलें )

## बंदरावरील सूर्यास्त

समुद्राच्या भरतीची ती वेळ नव्हतीच. त्यामुळें पाणी ओसरून, रुसल्या बायकोसारखं, दूर अंतरावर जाऊन थबकलें होतें. जलाशयाचें शोभिवंत वस्त्र दूर केलें गेल्या-मुळेंच कीं काय जाणें, उघडी पडलेली किनाऱ्याची जमीन अगदींच कळाहीन दिसत होती. उघड्या झालेल्या त्या वालुकामय भागावर अस्तप्राय सूर्याचीं लाल किरणें पडून त्यांचें अस्पष्ट प्रतिबिंब उमटल्यासारखें दिसत होतें. लांब अंतरावर परदेशाहून आलेलीं दोन-तीन गलबतें नांगर टाकून उभीं होतीं. आणि अलीकडच्या बाजूस केवळ जल-विहारासाठीं इतस्ततः हिंडणाऱ्या लहान लहान मचव्यांचीं पांढरीं शिडें संध्याप्रकाशांत कांहीं विचित्रच दिसत होतीं.

— ना. सी. फडके : ( दौलत ).

## समुद्रांत उतरणारें नारिंग

आकाशांत पश्चिमेला ढगांचे थरावर थर चढले होते. आणि त्यामुळें इतरांप्रमाणेंच सूर्यास्त दिसेल कीं नाहीं ह्याची आम्ही काळजी करूं लागलों. पण आमचें नशीब शिकंदर होतें. अगदीं खालीं उतरल्यावर ढगांच्या फटींतून नारिंगी सूर्यबिंबाचें आम्हांला दर्शन झालें. त्याच्या-भोंवतालचे ढगदेखील नारिंगी रंगानें माखून गेले होते. ढगांच्या त्या गर्दीतून वाट काढीत सूर्यबिंब क्षितिजाच्या कडेवर टेकलें, तेथें तें एकदम मोठें झाल्यासारखें वाटलें. आणि मग अगदीं सावकाश पाण्यावर आपली नारिंगी झळाळी टाकीत तें बुडालें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत ).

## मावळतीचा सूर्य

मावळतीला सूर्य-मंडळ फक्त हातभर उंच होतें आणि कृतांतासमोर उभें राहिल्यागत थरथरत होतें. त्याच्या आंतल्या लाटा स्पष्ट दिसत होत्या.

— महादेवशास्त्री जोशी : ( प्रचंड तोरणा )

## ढगांतील किरण

फारच दाट ढग एकदम आले. अगदीं काळे ढग सायं-प्रकाशाच्या साधनानें स्वतः सुंदर होण्याऐवजीं त्या ढगांनीं तो सायंप्रकाशच संपूर्णपणें आच्छादून टाकला. परंतु त्या दाट ढगांतूनहि तें पहा सौंदर्य प्रकट होत आहे. तें पहा किरण ! जणूं किरणांचें उलटें कारंजें उडत आहे असें वाटतें. प्रकाशाच्या झारींतून किरण वरून कोणी खालीं उडवीत आहे असें वाटतें. सुंदर दृश्य !

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## सायंकाळची प्रभा

संधिप्रकाश जरी आतां बहुतेक लोपून गेला होता, तरी क्षितिजाच्या पश्चिम कोपऱ्यांत काळसर लाल रंगाच्या शलाका अद्यापहि लकाकत होत्या. जणूं जखमी झालेल्या आकाशाच्या अंगावरले ते रक्ताचे वाळलेले ओघळच होते ! त्या अस्तंगत सायंप्रभेंत उंच इमारतींच्या खिडकीचें एखाददुसरें भिंग आणि मधूनच आपले मोठाले पंख संथपणानें हालवीत उडत जाणारा बगळा आपल्या लकाकीनें झपाट्यानें काळवंडत चाललेल्या क्षितिजाला उजळीत होता.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( एका निर्वासिताची कहाणी )

## निसर्गाची गुलाल-फेंक

संध्याकाळीं आम्ही पुन्हां समुद्र-किनाऱ्यावर फिरायला गेलों. संधिप्रकाशांत तें शांत, विस्तीर्ण बंदर मोठें छान दिसत होतें. पश्चिमेला तांबडा भडक सूर्यास्त होत होता. त्या सूर्यास्ताची लाली पाण्यांतून परावर्तित झाल्यामुळें, पाण्यावर लालट छटा आली होती आणि साऱ्या वातावरणांतदेखील लालट धूळ उडत आहे असा भास होत होता.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## निळें आकाश

ती रम्य शोभा होती. मेघांमधून प्रकाश पडला होता. दूरच्या वृक्षांच्या शेंड्यांवर तो प्रकाश किती सौम्य दिसत होता. पहात रहावें असें वाटत होतें. एकाएकीं देखावा बदलला. तिकडे पिवळा रंग पसरला. आणि मधूनमधून निळ्या नभाचें दर्शन-जणूं पीत समुद्रांतलीं निळीं बेटें, जणूं पिवळ्या रेशमी वस्त्रांतून घननीळ गोपालकृष्णाचें सुंदर शरीर दिसत होतें.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## रात्रीचा प्रारंभ

वाऱ्याच्या नाजूक करांगुलीनें तळ्यांत जलतरंगाचें वादन सुरू झालें होतें. लोळत बाहेर गेलेल्या मुलाच्या अंगावर आईनें हलक्या हातानें पांघरूण घालावें, त्याप्रमाणें सृष्टि, रजनीची निळसर चादर पृथ्वीवर घालीत आहे अशी कल्पना वत्सलेच्या मनांत आली.

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

## सूर्याचें स्वागत

सूर्य आकाशांत लटकत होता. आणि पायथ्याचे डोंगर दोन हात वर करून चेंडू झेलण्याच्या तयारींत उभे असावे, असें त्याचें स्वागत करीत उभे होते. मातेच्या हाताकडे झेप घेतांना मूल ज्याप्रमाणें हंसतें आणि माता आनंदित होते तसें हुबेहुब तें दृश्य होतें. अशा वेळीं मातेच्या आनंदांत समभागी व्हावें कीं मुलाच्या निरागस हास्याचा उपयोग घ्यावा ? कुणाच्या सुखाशीं समरस व्हावें हें कळत नाहीं.

— आचार्य कालेलकर : ( सहस्रधारा )

## शेंदरी छटा

तांबड्या माळावर खुरटलेलें गवत कुठें कुठें वाढलें होतें आणि उंच ताड ठिकठिकाणीं उभे होते. एका ढगाचा पंजा सूर्यावर ठेवलेला होता. त्यामुळें सूर्यप्रकाशाचे फवारे नुसते आकाशांतच उंच उडाले होते आणि ते अंगावर उडून ढग शेंदरी झाले होते. अगदीं मावळतांना सूर्य नजरेस पडला. आपलें म्लान उन्ह त्यानें एकदां त्या तांबड्या माळावर पाडले आणि मग तो क्षितिजाखालीं बुडाला. उन्ह गेले आणि ढगांवरची शेंदरी छटा काय ती मागें रेंगाळली.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

* संध्याकाळ झाली-सूर्यकिरणंहि त्या मांडवापुढें साष्टांग दंडवत घालूं लागलीं—निरोप घेऊं लागलीं—त्या असामान्य ' भूषासुंदरी 'च्या, त्या अप्सरांच्या परत-वाटेवर जणूं कांचन-वस्त्राच्या पायघड्या घालूं लागलीं.

— कुसुमावती देशपांडे : ( अप्सरांची भेट )

## पश्चिमेचा मखमली तंबू

मावळतीच्या आकाशांतील विविध रंगांचे कल्लोळ पाहून तो स्तिमित झाला. समोरील टेंकड्यांच्या पार्श्व-भूमीवर केशरी, निळ्या व लाल रंगांच्या प्रचंड कनाती उभ्या केल्या आहेत आणि सूर्य आंत जातांच आतांपर्यंत उघडा असलेला पश्चिमेचा डेरा दारावरील मखमली पडदे सोडून आतां बंद करून टाकला आहे असें त्यास वाटलें.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## सायंकाळची पश्चिमा

सूर्यानें आतां प्लॅटिनमचा रंग धारण केला होता. चांदीची उग्र चमक आणि सोन्याची भव्य कोमलता यांचें योग्य प्रमाण जेव्हां ब्रह्मदेवाला सुचलें, तेव्हां त्यानें प्लॅटिनम धातु निर्माण केला असावा. तिचें सौंदर्य पारखण्यासाठीं कलात्मक दृष्टीचा विकास झालेला असला पाहिजे. हें दृश्य पहात असतां सूर्याचें सोनें झालें. परंतु केशराच्या फुला-विषयींची ईर्षा त्याच्या मनांत उत्पन्न झाली; त्याच क्षणीं त्याच्या सोन्याचें तांबें झालें. समभावी ढगदेखील ताबडतोब भडकले आणि त्यांनीं आकाश लाल लाल करून टाकलें. रस्त्यावर हिंडणाऱ्या संन्याशाचे भगवे कपडे या सबंध दृश्यांत मिसळून जावें ह्यांत आश्चर्य तें काय ?

— आचार्य कालेलकर : ( बिल्वाश्रमाचें पुनर्दर्शन )

* एकाद्या मिणमिण करणाऱ्या दिव्याभोंवतीं पावसाळी पांखरांची ही गर्दी व्हावी नि तो दिवा आतां जातो की क्षणांत जातो असें वाटूं लागावें, तशी पृथ्वीवर रेंगाळणाऱ्या सायंकालीन सूर्य-प्रकाशाची स्थिति झाली होती.

— वि. स. खांडेकर : ( खोटी अधेली )

### संध्येचीं पावलें

सूर्य मावळला आणि उजाड माळावर उजाड संधिप्रकाश भरकटूं लागला. रंगांची विविधता लोपली होती. छाया-प्रकाशांचा खेळ संपला होता आणि अस्फुटता सर्वत्र भरून राहिली होती. टेंकड्यांच्या रांगेपलीकडे एक टपोरी चांदणी उगवली होती आणि बरोबर त्या चांदणीच्या खालीं टेकड्याच्या माथ्यावर एक शुभ्र सुबक देवालय एकाकीपणें उभें होतें. हा विजनवासी देव कोण, असा मला प्रश्न पडला. एका सहप्रवाशानें सांगितलें कीं, तें शंकराचें देवालय आहे. कुठच्या असुरांचें निर्दालन करून तो शीघ्रकोपी कैलासनाथ तेथें एकांतांत विसांवला होता, कोण जाणे ?

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

### सायंकाळचें वातावरण

तेल संपून दिवा एकदम मंद व्हावा तसा मावळतीकडला सूर्य दिसूं लागला. संध्याकाळच्या काळसर सांवल्या भरभर सभोंवार पसरूं लागल्या. आतांपर्यंत कुठेंतरी दडून बसलेला गारठा एकदम बाहेर पडला—गार वारें वाहूं लागलें.

— वि. स. खांडेकर : ( सोन्याची गाडी )

### तळ्यासारखें आकाश

वरचें आकाश झाडींतून प्रगट होणाऱ्या लहानशा तळ्याप्रमाणें भासत होतें. त्यांत नुकत्याच चमकूं लागलेल्या तारका जणूं कांहीं उमलूं लागलेलीं कमळेंच ! वायुलहरी या तळ्यावरून आल्यामुळेंच कीं काय शीतल वाटत होत्या.

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

## पृथ्वीवरील तारका

थोड्याच अवधींत घाटासमोरचा सायंप्रवाह असंख्य, लुकलुकत्या दीपांनीं फुलून गेला. पूर्णचंद्रहि कितीतरी वर येऊन आकाशांत जणूं थबकून हें खालचें कौतुक पहात होता. त्याच्या प्रकाशांत वरच्या निळ्यांतल्या चांदण्या निस्तेज पडल्या होत्या. पण...! क्षितिजावरून चंद्रबिंब सरकल्यावर नर्मदामाईनें आपली सुवर्णशोभा टाकून आपला नेहमींचा गंभीर नीलिमा धारण केला होता व त्या निळ्यांत मात्र असंख्य मानवनिर्मित चांदण्या, त्या पूर्ण चंद्राला न जुमानतां स्वच्छंद विहरत होत्या !

— कुसुमावती देशपांडे : ( दीपदान )

## तारकांचा कर्मयोग

काळोखाचा महासागर जिकडे तिकडे पसरला होता. या काळोखांत विश्व बुडून जाऊं नये म्हणूनच कीं काय, अगणित तारका आकाशांत आपल्या प्राणांचे दीप पाजळून बसल्या होत्या. त्यांचें श्रांत शरीर मध्येंच डुलकी घेई व पळभर त्यांच्या पापण्या मिटल्यासारख्या दिसत; पण दुसऱ्याच क्षणीं ध्येयनिष्ठा जागृत होऊन त्या डोळे उघडून आपलें काम करूं लागत.

— वि. स. खांडेकर : ( हृदयाची हांक )

## तारकांचा पारिजात

सूर्य मावळला आणि तारकांचा पारिजात फुलूं लागला. जहाजावरील विजेचे सौम्य दिवे तर केव्हांचे चमकूं लागले होते.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## निखळलेला तारा

स्वर्गांत अश्रु नसतात असें कवि आजपर्यंत सांगत आले. पण हे सारे कवि लोक लबाड असतात ! हा तुटून पडलेला तारा—कुणा तरी स्वर्गस्थ विभूतीचा अश्रुबिंदुच असावा तो ! कुणा महात्म्याचा अश्रु असेल बरे तो ?

— वि. स. खांडेकर ( महात्म्यांचे अश्रु )

## हंसणारी चंद्रकोर

मध्येंच आम्हीं वर पाहिलें, तेव्हां इवलीशी चंद्रकोर तिरप्या ऐटींत आकाशांत चढलेली आम्हांला दिसली. ओठ मुरडून ती हंसली. तेवढ्यांत ढगांनीं तिच्याभोंवतीं गर्दी केली. ती बावरली आणि मग आपल्या तेजाचा फेस उधळीत ढगांतून थोडी पुढें पुढें सरकूं लागली.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## गगनाचें वैभव

तारकांकडे लक्ष गेलें म्हणजे वाटे, तारका किती किती सुंदर आहेत, अगदीं आमच्या गुरुदेवांच्या काव्य-कल्पने-सारख्या ! पण तारकांच्या तेजाचा जगाला काय उपयोग आहे ? आकाशांत बसविलेले हे हिऱ्याचे खडे-श्रीमंतीच्या वैभवाचें नुसतें प्रदर्शन आहे हें !

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## अंधाराचें प्राशन

चंद्र नुकताच उगवला होता. चांदणें अंधार पिऊं लागलें होतें.

— महादेवशास्त्री जोशी : ( शंकरशर्मा )

## चन्द्रोदय

आमचा मित्र ( चंद्र) पूर्वेच्या बाजूनें आम्हाला नकळत वर आला होता. आमचाच कशाला; अंधारांत घुसपटणाऱ्या अर्ध्या भूगोलाचा मित्र. सोळा नसल्या तरी चौदा कला त्याच्या अंगीं होत्या. सूर्य गेला, संधिप्रकाशही ओसरला; त्यामुळें आतां त्याच्या अणुरेणूंत कांति भरूं लागली होती. काळी चंद्रकळा नेसायला निघालेल्या रात्रीला तो सांगत होता,'फेकून दे तें वस्त्र, आज मी तुझ्यासाठीं सोनसळी साडी आणली आहे. मी तुझा रजनीनाथ वैभवाच्या चढत्या काळांत असतांना तुला हें शोकाचें वस्त्र चेटाळूं देणार नाहीं !'

!– महादेवशास्त्री जोशी : ( प्रचंड तोरणा )

## पिवळें चन्द्रबिंब

आज जेष्ठाची पुनव. चंद्राचें मोठेंथोरलें पिवळें गरगरीत बिंब पूर्वेच्या धूसर क्षितिजावर हळूंहळूं चढत होतें. संधिप्रकाश अद्याप कायमच होता. त्यामुळें तें बिंब फिकट, निष्प्रभ दिसत होतें. विशेषतः पश्चिम क्षितिजावर गडगडणाऱ्या काळ्याभोर ढगांत दडलेली वीज जेव्हां मध्येंच लखाखत उफाळून तळपे, तेव्हां तो क्षीण होत चाललेला संधिप्रकाश आणि तें पांडुर चंद्रबिंब हीं दोन्हीं तिच्या दशदिशांना उजळणाऱ्या लखलखाटांत लोपून गेल्यासारखीं वाटत. वाऱ्याच्या झुळुका सारख्या वाहत होत्या. पण दिवसभर तापलेल्या आणि मृगवर्षासाठीं आसुसलेल्या गिरिराजीचे मंदोष्ण उसासे वाटत होते ते !

– ग. त्र्यं. माडखोलकर : ( अनघा )

## तीन चन्द्र

तो एकंदर देखावाच मोठा रमणीय होता. सभोंवतालीं दाट अशी लहान-मोठ्या वृक्षांची गर्द राई, मध्यभागीं ती विस्तीर्ण पुष्करिणी व तिचें जल प्रफुल्लित कमलांनीं शोभिवंत् व स्वच्छ. तें स्वभावसिद्ध शुभ्र असून चंद्रप्रकाशानें विशेषच शुभ्र दिसत होतें. त्या कालचा एखादा कवि जर तो मनोरम देखावा पहाण्यास असता तर त्याच्या प्रतिभेला किती तरी स्फूर्ति झाली असती ! एका चंद्राच्याऐवजीं तीन चंद्र दिसले असते. एक आकाशांत, एक वातावरणांत आणि एक पुष्करिणीच्या जलविस्तारांत.

— हरिभाऊ आपटे : ( वज्राघात )

## पतंगाची सहल

श्यामल व बहुरंगी संध्येंतून ह्याच वेळीं फुलांतून निघणाऱ्या सुगंधाप्रमाणें चांदणें झरूं लागलें होतें व त्या चांदण्यांत केवळ स्वर्गीय क्रीडेसाठीं आकाशगामी झालेली ती सोनेरी तुऱ्याची केशरी पतंगडी एकाद्या दूरस्थ तारके-प्रमाणें विलसत होती.

— पु. भा. भावे : ( पतंग )

## चंद्राचें भूषण

कलंक हेंच चंद्राचें सर्वांत मोठें भूषण आहे. विश्व निर्माण झालें तेव्हां सर्व वस्तूंना चंद्राचा अतिशय मत्सर वाटूं लागला ! मग आपल्या लाडक्या राजाला दृष्ट लागूं नये म्हणून सृष्टिमातेनें त्याची दृष्ट काढून तीट लावली ही त्याला !

— वि. स. खांडेकर : ( चांदण्यांत )

## चांदण्यांतील वृक्ष

रस्त्यावरल्या पिंपळाच्या मोठ्या थोरल्या झाडाचीं नवीं हिरवींगार पानें चंद्रप्रकाशांत चम्‌चम् करीत होतीं. वाऱ्याच्या झुळुकांनीं त्याच्या त्या शेंकडों झुबकेदार फांद्या जो सारखा सळसळ आवाज करीत, तो ऐकून विद्याधरला भरतीच्या वेळीं सळसळत पुढें येणाऱ्या समुद्राच्या फेसाळ लाटांच्या आवाजांची आठवण झाली. अंगणांतल्या चांफ्याच्या उंच खोडाच्या शाखाग्रांना आलेलीं पांढरीं फुलें पाहून असा भास होत होता कीं, चंद्रकिरणांतून स्रवणारें सुधेचे बिंदु झेलण्यासाठीं बिचाऱ्या उघड्यावाघड्या पर्णविहीन चांफ्यानें आपल्या चिमुकल्या ओंजळी आतुरतेनें वर धरल्या आहेत.

—ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## स्वच्छ आकाशांतील चन्द्र

आकाश-गर्भांतलें सारं पाणी पृथ्वीवर पडून गेल्यामुळें आभाळ इतकं कांहीं निर्मळ झालं होतं, कीं घट्ट ताणून वाळत घातलेल्या फिकट निळ्या रंगाच्या झिरझिरीत तलम वस्त्राप्रमाणें तें दृष्टीला भासत होतं. आश्विनाच्या चांदण्या रात्रीं सुरू झाल्या, आणि या तलम निळ्या वस्त्राच्या पायघड्यांवरून मंदगतीनें जाणाऱ्या चंद्राचीं किरणं खालीं जागोजाग सुरू झालेल्या खळ्यांतल्या धान्यांवर चंदेरी मुलामा चढवूं लागलीं.

— ना. सी. फडके : ( झंझावात )

* तारकापुष्पांनीं नटविलेल्या आकाशाच्या गालिच्यावर सृष्टीचा सुधाकर हंसत बसला होता.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## चांदण्यांतील तरंग

चांदणी रात्र ओठांवर बोट ठेवून चराचराला शांत राहण्याबद्दल सूचना करीत होती. कर्परेच्या डोहांतील मरळ एकादे वेळीं पाण्यांत डुंबकी मारी तेवढाच काय तो आवाज ऐकूं येई. तलवारीप्रमाणें चमकणारे त्याचे पांढरे खवले पाण्याच्या खालीं गेले, म्हणजे पाण्यांत एक मोठें वर्तुळ उठे व कर्परेच्या डोहांत पडलेलें जलवर्ण चित्र कांपूं लागे. प्रवाहांतील जलतरंगांवर चांदणें पडून पांढऱ्या चकत्यांची धार लागली आहे असें वाटे. जणूं कर्परा नदी संध्याकाळीं माळवें विकून परत घरीं आलेल्या माळणी-प्रमाणें चांदीचा खुर्दा मोजीत आहे.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## चांदण्यांनीं फुललेलें आकाश

चांदण्यांनीं फुललेलें आकाश म्हणजे प्राजक्ताचें झाड वाटे. एकदां एक तारा तुटतांना मी पाहिला. मला खरोखरीच वाटलें कीं, कुणी तरी हें प्राजक्ताचें झाड हलविलें आणि तें फूल गळून पडलें.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## चांदण्या रात्रीं समुद्रकांठीं

चांदणें पिठासारखें स्वच्छ पडलें होतें. समोर समुद्र एकाद्या जुन्या गोड आठवणीप्रमाणें अंधुक पण रम्य दिसत होता. डावीकडले माड, उजवीकडलें तळें-जिकडे तिकडे शांतता नांदत होती. समुद्राचा शांत गंभीर आवाज देवा-लयांतील रुद्राच्या आवर्तनाप्रमाणें मला वाटला

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## चांदण्यांतलें गांव

वद्य तृतीया किंवा चतुर्थी असली व तुम्ही थोडा वेळ घाटावर धीर धरून उभें राहिलांत, तर चंद्राचें तांबडें बिंब तुम्हाला ताटली उंच फेंकल्याप्रमाणें आकाशांत कासराभर वर येतांना दिसेल व थोड्याच वेळांत सजलपूरवर चांदीच्या रसाचा वर्षाव सुरू होईल. मग त्या चांदण्यांच्या स्वच्छ उजेडांत तो उजाड गांव स्टीरिओस्कोपमधून पाहिलेल्या चित्रासारखा शांत व तटस्थ दिसेल.

— र. वा. दिघे : ( पाणकळा ).

## कोजागिरीचें चांदणें

कोजागिरीचा दिवस आला. शरद् ऋतूंतील प्रसन्न दिवस. शेतेंभातें पिकलेलीं असतात. सोन्यासारखें पीक आलेलें असतें. गुरेंढोरें धष्टपुष्ट असतात. भरपूर चारा असतो. नद्यांना पाणी आलेलें असतें. आकाश निर्मळ असतें. अशा वेळेस हा सुंदर दिवस कल्पिलेला आहे. रात्रीं दुधासारखें स्वच्छ चांदणें पडलेलें असतें. जणूं आकाशांतून दुधाच्या अनंत धारा पृथ्वीला स्नान घालीत असतात. आणि पृथ्वीवरहि या वेळेस दुधाची रेलचेल असते.

— साने गुरुजी : ( गोड शेवट ).

## चंद्राची वरात

आकाशांतील शुभ्र ढगांच्या पायघड्यांवरून पौर्णिमेच्या चंद्राची वरात नुकतीच कुठें निघाली होती.

— वि. स. खांडेकर : ( उल्का ).

* प्रेम हाच खरोखर परमेश्वर.

— साने गुरुजी.

## चांदोबाची कळशी

अंधाराच्या डोहांतून रजनीनाथ वर हळूंहळूं येऊं लागला. जणूं काळ्या पाण्यांत उपडी बुडवून खालीं धरून ठेवलेली चांदीची कळशी सोडून दिल्यामुळेंच वर उसळून आली. सृष्टिशोभा अवर्णनीय होऊं लागली. वाळवंट चांदण्यानें फुललें. कपारेच्या कांठच्या झाडीच्या काळ्या कडा पांढऱ्या चांदण्यांत कात्रीनें कापलेल्या काळ्या मखमलीच्या तुकड्याप्रमाणें दिसत होत्या.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## चांदण्यांतील सांवल्या

जिकडे तिकडे निःशब्द शांतताच पसरली होती. लख्ख पांढऱ्या चांदण्याच्या दुधानें न्हाल्यासारखीं दारें व सडका दिसत होत्या. चांदण्यांतील त्या सांवल्या फार मोहक, आकर्षक दिसत होत्या. जणूं कांहीं श्याम वर्णाच्या देव-कन्याच चांदण्यांत विहार करीत आहेत ! तसल्या त्या मध्यरात्रीच्या सांवल्यातून जात असतांना एकाद्या यक्षाच्या नगरींतून तर मी जात नाहीं ना, असें मला वाटलें.

— वि. पां. दांडेकर : ( मध्यरात्र )

## चांदण्याची किमया

बाहेरच्या चांदण्यांत आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. डोंगरमाथ्याच्या अपरिचित व अद्भुत वातावरणामुळें सर्वजण उत्साह-भरित झालेले होते. त्यांतहि पौर्णिमेच्या जवळपास आलेल्या चंद्रानें त्या वातावरणावर आपली रुपेरी किमया पसरून तें अधिकच रम्य केलेलें होतें.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## चन्द्रप्रकाशांतील धबधबा

एका डोंगरावर धबधब्याचा देखावा असा सुंदर साधला होता ! उंच उंच आकाशाला भिडलेला नीट कड्याचा डोंगर शंकरासारख्या जटा सोडून उभा आहे. त्याच्या माथ्यावर संध्याकाळीं पारव्याच्या कंठाप्रमाणें दिसणाऱ्या हिरव्या--निळ्या-तांबड्या-जांभळ्या आकाशांत जेव्हां चंद्रकोर व शुक्राचा तारा ढळे, तेव्हां डोंगराच्या जटा-जटांतून गंगावतरणाचा अभिनय चालला आहे असें वाटे. शुक्राचा तारा म्हणजे जटेंतून उडी मारणारी गंगा. माथ्यावरची चंद्रकोर म्हणजे भाळीं धरलेली चंद्रलेखा. यावरूनच पुराणांतल्या महादेवाचें वर्णन कवींना सुचलें नसेल ना ?

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## चांदण्यांतील कोरडी नदी

नदींत फारसें पाणी नव्हतें. तरी प्रेमामुळें गरिबींतही जसें सुख मिळतें त्याप्रमाणें चांदण्यानें तिला शोभा आणली होती. पाण्याच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या तरंगांच्या तारा चंद्र नाजूक करांनीं छेडीत होता. आणि त्या अव्यक्त संगितानें सर्व प्रदेश भरून गेला होता. डावीकडच्या बाजूला झाडांच्या सांवल्या व दूरवर पुलाच्या दोन तीन भव्य कमानी दिसत होत्या. भोंवताली चिटपाखरूंदेखील नसल्यामुळें दिवसा माणसांनीं फुलून जाणाऱ्या घाटानें गृहस्थाश्रम सोडून संन्यस्त वृत्तीचा स्वीकार केल्याचा भास होत होता.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## चांदण्याची रांगोळी

चंद्र मधाशींच उगवला होता. माडांच्या हिरव्यागार चुडतांतून मधूनमधून जमिनीवर पडलेलें चांदणें चित्र-विचित्र रांगोळीप्रमाणें दिसत होतें. वत्सलेनें आकाशाकडे पाहिलें. नक्षत्रांचा नुसता सडा पडला होता तिथें.

— वि. स. खाण्डेकर : ( दोन ध्रुव )

## चांदण्यांतील हिमशिखरें

समोर पर्वताचें एक मोठें शिखर अनंतकालापासून बर्फ पांघरून निजलें होतें आणि त्याच्यावर चंद्राचा शीतल प्रकाश सोन्यानें मढविल्यासारखा चमकत होता. मध्यरात्रीच्या ना शेंडा बुडखा अशा माझ्या कल्पनेला त्या पहाडांत महादेवाचें मस्तक दिसलें !

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## चांदण्यांत चमकणारे कळस

आणि तोच प्रदेश आतां रात्रीच्या या घटकेला टिपूर न्हाऊन निघत होता. डोंगरमाथ्यांच्या निळ्या-जांभळ्या अंगावर दाट चंदेरी कलाबूत पसरल्यासारखी दिसत होती. पश्चिमेच्या डोंगराच्या उताराावर असलेल्या महादेवाच्या देवळाचा कळस चकाकत होता. आणि या कळसाकडे पाहून लगेच गांवांतल्या मध्यभागीं असलेल्या मुरलीधराच्या देवळाच्या कळसाकडे दृष्टि टाकली कीं जणूं चांदण्याच्या समुद्रांत नांगर टाकून उभीं राहिलेलीं दोन गलबतें एक-मेकांना किरणांचे गुप्त संदेश धाडीत आहेत असा भास होत होता.

— ना. सी. फडके : ( झंझावात )

## चांदण्यांतील नदी

आतां रातकिड्यांचा आवाज घुमायला लागला होता. पुसट पुसट चांदणेंहि पडलें होतें. वाऱ्याच्या झुळुकेनें नदीच्या पाण्यावर बारीक बारीक लहरी उठत होत्या. चांदण्याचें प्रतिबिंब पाण्यावर पडलेंच होतें. पाण्याच्या काळ्याभोर पाठीवर ते चांदण्याचे ठसे पडल्यामुळें सापाच्या पाठीसारखें नदीचें रूप दिसत होतें! आणि एकादा अजस्त्र सर्प बसल्या जागेवरच वळवळत रहावा त्याप्रमाणें नदीकडे पाहून वाटत होतें!

— य. गो. जोशी : ( होमकुंड )

## डोंगरावरील दिव्यांची रांग

चामुंडेश्वरी हें म्हैसूरच्या राजघराण्याचें कुलदैवत! त्यामुळें त्या देवालयाला विशेष महत्त्व आलें आहे. ह्या देवालयाकडे जाण्याकरितां सुंदर डांबरी रस्ता बांधण्यांत आलेला आहे. आणि त्या रस्त्यावरच्या दिव्यांची वळसे घेत वर जाणारी रांग रात्रीं तळपूं लागली कीं, अमरपुरीला जाणाऱ्या कोणा यक्षाचीं पावलें हवेंत उमटलीं आहेत असें वाटतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## चांदण्यांतील शांतता

तो वैशाखाचा महिना होता. बाहेर स्फटिकासारख्या शुभ्र चांदण्यांतून दृग्गोचर होणारें अप्रतिम सृष्टिसौंदर्य मनाला आल्हाद देत होतें. चोहोंकडे शांतीचें साम्राज्य प्रस्थापित झालें होतें.

— नाथ माधव : ( सांवळ्या तांडेल )

## रात्रींची शांतता

आतां तर मध्य रात्र उलटून उत्तर रात्रीचा प्रारंभ झाला होता. एकादें फळ कापून त्याचा अगदीं आंतील सोलीव गाभा समोर ठेवावा त्याप्रमाणें शांततेनें आपलें अत्यंत गहन व उत्कट स्वरूप त्या पटारावर खुलें केलें होतें. ती नीरवता, अचलता पाहून जगांत जीवनाचा प्रारंभ झाला आहे कीं नाहीं कुणास ठाऊक अशी शंका यावी. या गाढ शांततेवर आकाशामधून चांदण्याचा अभिषेक होत होता. दूरवर दिसणारे डोंगरकडे, पठारावरील झाडेंझुडुपें, जवळपासचें लहान-मोठे खडक—सर्व जग जणूं चांदण्याच्या रुपेरी प्रकाशामध्यें कोणत्या तरी गहन विषयाचें एकाग्रतेनें चिंतन करीत होतें. क्वचित् एकादी वाऱ्याची अवखळ झुळुक येई व हा शांततेचा गाढ पडदा थोडासा बाजूला सारून तशीच लगबगीनें पुन्हां निघून जाई.

वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## रात्रींची स्तब्धता

रात्र पडून सर्वत्र निःस्तब्धता पसरली होती. नभोमंडळांत असंख्य नक्षत्रांत मध्यभागीं येऊन रजनीनाथानें आपल्या कोमल किरणांनीं पिठासारखा स्वच्छ प्रकाश पाडला होता. पृथ्वीवरील एकंदर निःस्तब्धता पाहून ती जणूं काय निद्रावस्थेंतच आहे असें वाटत होतें.

— नाथ माधव : ( सावळ्या तांडेल )

* मनुष्याला आपण दुसऱ्याच्या पुढें जात आहोंत याचा आनंद असतो.

— साने गुरुजी

## अंधारी रात्र

ती भयाण काळोखी रात्र सरतां सरेना. भोंवतालच्या घरांचीं उंच झाडें आपल्या वेड्यावाकड्या, विद्रुप आकृतींनीं त्या काळोखाची भयानकता वाढवीत होतीं. पूर्वेकडून पश्चिमेकडे हळूंहळूं अदृश्यतेनें जाणाऱ्या नक्षत्राकडे पाहून रात्रीच्या मंद गतीची काय कल्पना येईल, तेवढीच. अंगावर सहस्रावधि चकचकीत खवले असलेली प्रचंड नागीण जशी सुस्तप्रमाणें भुईवर सरपटत असावी, तशी ती रात्रीची नीरव, अदृश्य गति वाटली तिला. पश्चिम क्षितिजावरील ती अधोमुख झालेलीं नक्षत्रें म्हणजे काळसमुद्रावर पाणी प्यावयाला आलेल्या श्वापदांच्या रेषाकृतींच होत्या जणूं कांहीं! वारा अगदीं पडला होता. त्यामुळें गुदमरून गेलेले विश्वाचें विराट हृदय जणूं आंतल्या आंत तळमळत होतें.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## विनयी कंदील

चांगली रात्र होऊन अंधार पडला होता. पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे दिवे लागले होते. परंतु ते किती विनयशील दिवे! आकाशांतील चांदण्यापेक्षां आपला उजेड कदाचित् जास्त पडून त्या स्वर्गीय तेजो-गोलांचा आपल्याकडून अपमान होईल म्हणून ते अगदीं बेतानें तेवत होते.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

* निर्भय होणें म्हणजे मुक्त होणें.

— साने गुरुजी

## अंधारांतील तलाव

संधिप्रकाश नाहींसा होऊन आतां सर्वत्र गडद अंधार पसरला होता. शुक्र, गुरु आणि शनि यांचा सुंदर त्रिकोण टेंकडीच्या माथ्यावर झळकत होता आणि तलावाच्या शांत, निळ्या पाण्यांत पडलेलें त्याचें प्रतिबिंब मनोहर दिसत होतें. चोहोंबाजूंनीं अंधारानें घेरलेला, टेकड्या आणि झाडी यांनीं वेष्टिलेला तो तलाव;—त्याचें तें सुनील, चकाकणारें पाणी पाहून गांजलेल्या धरित्रीनें आपलें अश्रूंनीं कांठोकांठ भरलेलें हृदय जणूं चिरून समोर ठेवलें आहे, असा भास होत होता. मानवी आवाजानें अदूषित अशी ती शांतता पानांच्या, किड्यांच्या, पक्ष्यांच्या आणि गुरांच्या गळ्यांतील घंटांच्या आवाजामुळें सशब्द आणि सजीव वाटत होती.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## झोपी गेलेलें जग

जिकडे तिकडे किर्र शांतता पसरली होती. दिवसभर धडपडणारें आणि बडबडणारें तें बकाली शहर मध्यरात्रीच्या कुशींत एकाद्या बालकाप्रमाणें शांतपणें झोंपी गेलें होतें.

— वि. स. खाण्डेकर : ( दोन मोसंबीं )

* संधि-प्रकाश नाहींसा होऊन चाळणींतून भुरुभुरु पीठ पडावें त्याप्रमाणें चांदणें आमच्याकडे नाचत येत होतें. हौदांत येऊन पडणाऱ्या पाण्याचा मंदमधुर नाद कानांना आनंद देत होता.

— वि. स. खांडेकर : ( पहिलें प्रेम )

## चन्द्र-शुक्रांची युति

त्या रात्रीं चंद्र-शुक्रांची युति होती. चंद्र म्हणजे पूर्ण नव्हे; तर त्याची इवलीशी धनुकली. त्या दोन दिव्य ज्योती 'आंगडी मांगडी' घालून खालीं घसरत होत्या. शुक्र हा पश्चिम दिग्वधूच्या नाकांतील बाल म्हटला तर चंद्र तिच्या भाळीं बिजवरा शोभत होता. मूर्धाभिषिक्त सम्राज्ञीसारखा त्या रात्रीं पश्चिमेचा नोकझोंक होता. बाकीच्या तारका एकमेकींना खुणावून त्या शिणगाराकडे जणूं लुब्ध नयनांनीं पहात होत्या. त्या ज्योतींपैकीं कोणीं कोणाला ग्रासलें नव्हतें. सवाष्णींनीं एकमेकींना संक्रातीचीं वाणें वाटावीं तशा त्या दोघी आपलें तेज एकमेकींना देतघेत होत्या. आणि त्यामुळेंच त्यांचा सहभाव दुणा ठरला होता. आपण आतां थोड्याच वेळांत बुडणार याची दखल एकीलाही नव्हती. जणूं जगणें-मरणें तृणवत् लेखून त्या चालू घडी भोगून घेत होत्या. सागराची निळी छाया आधीं कोणाला आपल्या पांघरुणांत घेईल, या उत्कंठेनें मीं तिकडे टक लावलें होतें. पण शुक्रानें आधीं उडी घेतली. त्याचा पालव धरून मग चंद्रकला हळूच बुडाली.

— महादेवशास्त्री जोशी : ( जलदुर्गाचा राजा ).

* नंदादेवीनें संध्याकाळचें पीतवस्त्र धारण केलें होतें आणि ती संध्येला आशीर्वाद देऊन निरोप देत होती. चांदण्या चमकूं लागल्या; आकाश-गंगेंत हंस स्नान करीत होता. पुष्कळ देवहि जलविहार करीत होते.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## पावसाचीं चिन्हें

एकदम गार वारा सुटला. पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यांनीं वर आकाशांत पाहिलें तों ढग गोळा होऊं लागले. जणूं कोणी मोठा मेंढपाळ हजारों मेंढया, बकऱ्या, कोंकरें घेऊन चालला होता. का आकाशांत मोठी सर्कस उतरली होती ? किती प्रकारचीं हीं जनावरें ? सिंह आहेत, वाघ आहेत, घोडे आहेत, हत्ती आहेत, ससे आहेत, कुत्रे आहेत. रानटी व माणसाळलेलीं दोन्हीं प्रकारचीं जनावरें तेथें होतीं. आणि ते पहा भुजंग ? शेंकडों फणांचे भुजंग. मध्येंच त्यांच्या फणांवरचे मणि जणूं चमकत व डोळे दिपत. सर्कशींत सापाचेहि खेळ आहेत वाटतें ? कोणी गारुडीहि सर्कशींत आले वाटते ? सापांना अंगावर खेळवणारा कोणी अमेरिकन झोरो त्या वरच्या सर्कशींत होता का ?

— साने गुरुजी : ( क्रांति )

## ढगांचे राक्षस

इतक्यांत नैर्ऋत्य दिशेला त्याला तळहाताएवढा एक काळा ठिपका दिसतो. तो ठिपका वाढत वाढत जातो. वाढतां वाढतां तो क्षितिजावर पाताळांतून कंबरेइतक्या वर आलेल्या काळ्याभोर राक्षसासारखा दिसतो. थोडया वेळानें त्याच ढगाचा दुसरा राक्षस, तिसरा राक्षस असे एका-मागून एक राक्षस दिसूं लागतात. जणूं पश्चिमेला काळ्या राक्षसांनीं उठाव केला आहे !

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

* संकटंच माणसाला धीट बनवितात.

—ना. धों. ताम्हनकर

## सोनेरी ढग

उजव्या बाजूला विस्तीर्ण खोरं पसरलेलं होतं. प्रदेश डोंगराळच होता. तरी आसमंतात् ठिकठिकाणीं गर्द झाडीच्या छोट्या छोट्या जागा होत्या. दूर अंतरावर शेतं होतीं. मधेंच एक दोन ठिकाणीं कौलारं दिसत होतीं. अगदीं दूरवर डोंगरांच्या कडा विचित्र प्रकाशानं उजळल्या होत्या. क्षितिजापाशीं चौकड्या चौकड्या करून तरंगणारे ढग अगदीं भट्टींत तापलेल्या सोन्याच्या रंगाचे वाटत होते. ज्या ठिकाणीं सूर्य-बिंब होतं तिथून एकाद्या सर्चलाइट-मधून निघाल्याप्रमाणें किरणांचे दाट झोतच्या झोत बाहेर पडून वरच्या फिकट निळसर आकाश-भागांत विलीन झाले होते.

— ना. सी. फडके : ( इंद्रधनुष्य )

## काळ्या ढगांचा प्रवेश

दुपारचे दोन वाजले. स्वारी हळूच ईशान्येकडून डोकावून पाहूं लागली. मेंढीसारखा दिसणारा एक काळा ढग सावकाश पुढें आला. हां हां म्हणतां तिथें मेंढ्यांचा कळप गोळा झाला. वाऱ्याला धनगर होण्याची लहर आली असावी ! तो त्या मेंढ्या हाकूं लागला.

— वि. स. खाण्डेकर : ( सुवर्ण-क्षण )

* अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या. त्या गडगडणाऱ्या ढगांचा असा राग आला मला ! तास नि तास अर्थशून्य बडबड करणाऱ्या वक्त्याप्रमाणें, कवडीचुंबक दात्याप्रमाणें त्यांचें वर्तन चाललें होतें.

— वि. स. खाण्डेकर : ( सुवर्ण-क्षण )

## मेघराजाचें सैन्य

जेथें जेथें म्हणून कांहीं पाणी चमकत होतें, तेथून तेथून तें मेघराजानें गुप्तपणानें आपल्या बाजूला आकर्षण करून घेतलें होतें. मेघराजाची ही पूर्वतयारी तीन चार महिने चाललेली होती. परंतु आतां ती परिपूर्ण झालेली असल्यामुळें व सूर्याचा जुलूम भू–मंडळावरील लोकांना असह्य झालेला असल्यामुळें आपल्याला अवतीर्ण होण्याची हीच वेळ आहे, असें समजून, मेघराजा आकाशाच्या पृष्ठ-भागावर आपल्या सैन्याची परेड करूं लागला आहे.

— शि. म. परांजपे : ( आपण काय पेरावें ? )

## भरून आलेलें आकाश

आकाशांत देव भरून आला. कारुण्याच्या अमृतानें ओथंबून आला. आणि गडगडाट होऊं लागला. वीज चमकली. मेघांना फाडून ती बाहेर येऊं पाही. पाऊस आला, आला ! किती आनंद झाला सर्वांना ! मला संस्कृत-मधील महाकवि कालिदास याच्या मेघदूतांतील त्या सुप्रसिद्ध चरणांची आठवण झाली. तो म्हणतो " आषाढाचा पहिलाच दिवस. आणि डोंगरावर ढग उतरले. मस्त हत्ती-प्रमाणें जणूं ते दिसत होते."

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* दहा मिनिटांत काळसर अभ्रांनीं उत्तर आणि पूर्व दोन्ही दिशा झाकळून गेल्या. युद्धाकरितां सज्ज झालेल्या मत्त कुंजरांप्रमाणें भासणारे त्यांतले दोन-तीन प्रचंड मेघ मोठे प्रेक्षणीय दिसत होते.

— वि. स. खाण्डेकर : ( सुवर्ण-क्षण )

## मेघांची सभा

आभाळांत ढग आले होते तरी त्या वेळचा देखावा मनोहर होता. हत्तीसारख्या स्थूल देहाच्या शुभ्रवर्णी ढगांची पश्चिमेकडे गर्दी झाली होती. कापसाच्या अजस्र गठ्ठ्या-प्रमाणें एकावर एक रचलेल्या त्या ढगांमागें सूर्य जवळ जवळ झांकल्यासारखा झालेला होता. परंतु त्या ढगांच्या कडेकडेनें बाहेर पडणाऱ्या सूर्यकिरणांची शोभा मात्र त्यामुळें दुणावली होती. किरणांच्या तेजानें ढगांच्या कडा तळपत होत्या, आणि ढगांचे ते प्रचंड देह विजेच्या अलं-कारांनीं वेष्टिल्यांचा क्षणभर भास होत होता.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## ढगांचीं पथकें

ते दिवस आगोटीचे असल्यामुळें ढगांचीं टेहेळणी-पथकें गगनांत इतस्ततः संचरूं लागलीं होतीं. त्यांचा पुढारी शोभेल असा एक कृष्णमेघ नेमका देवळाच्या माथ्यावर रेंगाळत होता. कालिदासाच्या यक्षानें ' कुठें काय कर ' तें विज्ञापून पाठवलेला संदेशहर मेघ तो हाच असें मीं का म्हणूं नये ? आतां या प्रदोषकालीं शिवशंकर तांडव आरंभील. हा त्याच्या पाठीवर डवरून त्याची ओलें गज-चर्म पांघरण्याची गरज भागवील आणि याची ही शिव-भक्ति पाहून प्रसन्न झालेली पार्वती यांच्यावर कौतुकाचे कटाक्ष टाकील.

— महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

* जगांत तोडणें सोपें, जोडणें कठीण आहे.

— साने गुरुजी

## निसर्गाचें सडासंमार्जन

वटवृक्षाच्या पानांपानांमधून लाल-लाल फळें शोभत होतीं. जणूं लाल रुद्राक्षच त्या वटवृक्षानें सर्वांगीं धारण केले होते. सूर्य उगवला होता. आश्रमांतील कुमारांनीं झाडलोट करण्याचें आधींच सूर्यानें आपली सोन्याच्या हिरांची केरसुणी घेऊन सारा अंधार झाडून टाकला होता. दऱ्याखोऱ्यांतून, वृक्षराईतून सर्वत्र त्यानें तो सुवर्ण-झाडू फिरविला. औषधालाहि अंधाराचा केरकचरा ठेवला नाहीं. सूर्यानें अंधाराचा कचरा दूर केला. वाऱ्यानें पुष्कळसा पानपातेरा पहाटे उडून दूर केला. दव पडून सडा घातला गेला होता. फुलांचे सुगंध पसरून पावित्र्य व प्रसन्नता निर्मिली होती. पक्ष्यांनीं गोड किलबिल सुरू केली होती.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## वळवानंतरचें स्वच्छ वातावरण

हवा आतां अतिशयच प्रसन्न होती; व पावसामुळें हवेंत आलेला ओला गारठा आल्हाददायक वाटत होता. आंब्याच्या उमलत्या मोहराचा परिमल हवेंत दरवळून वाऱ्याच्या आर्द्र झुळुकांत उत्पन्न झालेल्या किंचित् कुंद शिरशिरीमुळें वसंताच्या आगमनाची चाहूल मनाला जाणवत होती. क्षितिजावरले ढग बहुतेक नाहींसे झाले होते. मात्र पूर्व-क्षितिजाच्या कडेवर मधून मधून वीज लकाकत होती. वातावरण इतकें शांत होतें कीं, बेडूक, पिंगळा, घुबड यांच्या आवाजाशिवाय दुसरा कसलाही आवाज कानांवर पडत नव्हता.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## हिरवे पडदे

पावसाची वाफ चांगली झाली होती. त्यामुळें कोट्यवधि तृणांकुरांनीं जमिनींतून आपली डोकीं वर काढलीं होतीं. जिकडे तिकडे हिरवळ वाढून पायथ्यापासून माथ्यापर्यंत डोंगर हिरवेगार झाले होते. जणूं हजारों फूट उंचीचे हिरवे पडदे 'वर्षा' या नाटकाच्या खेळाकरितां कोणी तरी वरून सोडले आहेत.

— र. वा. दिघे : (पाणकळा)

## पावसाचा प्रसाद

पावसाळ्याचे दिवस. अपार सृष्टिसौंदर्य दिसत होतें. कधींकधीं खालीं खोल दऱ्यांत कांहींच दिसत नसे. मेघांचे बुरखे घेऊन त्या दऱ्या उभ्या आहेत असें वाटत होतें. दूर मध्येंच डोंगर दिसत. जरा मेघपटलें विरळ असलीं कीं सुंदर प्रवाह डोंगरांतून पडतांना दिसत. किती पाहिलें तरी तृप्ति होत नव्हती.

— साने गुरुजी : (रामाचा शेला)

## आंब्यावरील खुर्ची

वाऱ्याची दिशा बदलतांच पिनाकिनीवरून वाहणारा गार वारा शरीरास सुखसंवेदना देऊं लागला. जवळच्या आंबराईतील एका झाडावर चढून दोन डहाळ्यांमध्यें आरामखुर्चीसारखें एक स्थान शोधून मी बसलों. दूरवर ताड डुलत होते; वयोवृद्ध आम्रवृक्ष सावली करीत होते; आणि पिनाकिनी शीतल वायु फुंकीत होती. नंदनवनांत यापेक्षां अधिक सुख मिळत असेल कां ?

— आचार्य कालेलकर : (पिनाकिनी)

## कोसळणाऱ्या धारा

अनेक प्रकारांनीं पाणी खालीं कोसळत होतें. त्या ओसाड डोंगरांतून कुठून तें फेसाळत, ईर्षेनें, सोसाट्यानें येत होतें आणि स्वतःला खालीं लोटून देत होतें, अतिशय वेगानें, घोंघावत, सतत खालीं पडत होतें. त्याच्या लड्याच्या लड्या उलगडत होत्या, गुंतत होत्या, अखेर डोहांत विरघळत होत्या. मध्येंच ते ओघ पलटा खात होते. मध्येंच त्यांना आटे पडत होते. मध्येंच त्यांच्यांतल्या असंख्य धारा गुंफल्या जात होत्या, फुटत होत्या, फांकत होत्या. पण अखेर खालीं डोहांत कोसळण्याची क्रिया अविरतपणें चालू होती. एकच घोष ऐकूं येत होता. आणि त्या कोसळण्याच्य त्वरेमुळें, पाण्याचें द्रवरूप कायम राहूनदेखील त्याला चैतन्यरूप प्राप्त झालें होतें. उन्हांत तें चकाकत होतें आणि त्यामुळें असें वाटत होतें कीं, त्याक्षणीं धबधब्याचें कोसळणें थांबलें होतें आणि त्या दृश्याचें कोरींव लेणें झालें होतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## पावसाच्या धारा

आकाशाचा चेहरा पुनः पुनः काळवंडें आणि तावा-तावानें उच्चारलेल्या शिव्याशापांप्रमाणें पावसाच्या धारा कोसळत ! क्षणभर स्वारीचा राग निवळला असाही भास होई. पण पुन्हां येरे माझ्या मागल्या. त्याच काळ्याकुट्ट आठ्या आणि तेच ताडताड शब्द !

— वि. स. खांडेकर : ( एक वेणा )

## धारांची कलाबूत

वैशाखांत अकालीं आलेला पाऊस होता तो. त्याच्याजवळ कोठलीहि मर्यादा नव्हती. आपलें अल्पकालीन आयुष्य शक्य तेवढें गाजवून घेण्याच्या ईर्षेनें तो जणूं उन्मत्त झाला होता. दोन-चांर मिनिटांतच मुसळधार पाऊस पडूं लागला. आकाश व पृथ्वी यांना जोडणाऱ्या पाण्याच्या जाड रुपेरी तारा सर्वत्र लकलकूं लागल्या. थोड्या वेळापूर्वी आकाशांत अधिराज्य गाजविणारा सूर्य मेघांच्या गर्दींत दिसेनासा झाला. खडकावरून पाणी वाहूं लागलें. झाडाच्या पानांपानांतून पाण्याच्या धारा गळूं लागल्या.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## पाऊस भूमीवर उतरला

काबाडकष्ट करणाऱ्या जीवांचें 'पाणकळा' म्हणजे विश्वसंगीत ! वाजत गाजत गर्जत येऊन त्यानें तापलेल्या कस्तुरीच्या वावरांत अमृताची बरसात सुरू केली, की लाखों कमळें फुलल्याप्रमाणें मातीचा सुगंध पसरतो, व त्यांतून मोत्यांचा पेरा सुरू होतो. पांच सात दिवस वाफसा झाला म्हणजे जिकडे तिकडे हिरवेंगार होतें. नदीकांठाकांठानें, मळ्यांतून, मैदानांतून गालीचे पसरले आहेत असें वाटतें व त्यावरून तांबड्या पाण्याच्या नद्या तांबड्यामातीच्या माळावरून मळलेल्या वाटांप्रमाणें लाल दिसतात. त्या सों सों आवाज करीत पूर्वेकडे वहात जातात. जिकडे पहाल तिकडे हिरवें ! जणूं काय हिरवा चष्मा घालूनच आपण पावसाची हिरवी जादू पाहत आहोंत !

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## शेतकऱ्याचा स्वर्ग

कधीं कधीं त्यांत विजेची कलाबूत किंवा इंद्रधनुष्याचे रंग दिसतील, तर कधीं तो स्वर्गातून सोडलेल्या झुलत्या जिन्यासारखा दिसेल. शेतकऱ्यांचा स्वर्ग याच जिन्यानें खालीं येतो. ऊन-पावसाच्या तिरपेंत, इंद्रधनुष्याच्या कमानींतून, हा स्वर्ग पावसाळ्यांत कैक वेळां पाहावयास मिळतो. याप्रमाणें एकाद्या मोठ्या झारीनें शिंपडावें तसें जिल्हेच्या जिल्हे पावसानें झोडपून निघतात.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## हत्तीचा पाऊस

मृगानंतर पुनर्वसु, पुष्य अशीं नक्षत्रें क्रमानें पडतात. मघा रब्बी व खरीपाच्या पिकांमध्यें ताजवा घेऊन उभ्या राहतात. दुष्काळ कीं सुकाळ तेथें ठरतो. शेवटीं मंगलाष्टका संपल्यानंतर होणाऱ्या वाद्यांच्या कडकडाटाप्रमाणें हस्ताचा गडगडाट होतो. जणूं हत्तींची वरात सोंडेनें पाणी शिंपडीत चालली आहे असे वाटतें. हाच खरा मोसमी पावसाचा शेवट. हस्तामागून चित्रा व स्वाति क्वचित पडतात. त्यानंतर सुगी पिकूं लागते. बाजरी काळीशार दिसते. तिळाचीं शेतें पिवळीं दिसतात. शाळू मोत्यांचे घोस घेऊन उठतो.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

* एकदां वाटें, बाहेर पृथ्वीवर स्वर्ग अभिषेक करीत आहे. मग मनांत येई, श्रीखंडाकरितां पंचांत गुंडाळून खुंटीला टांगून ठेवलेल्या दह्यांतून असेंच पाणी ठिबकत असतें.

— वि. स. खांडेकर : ( सुवर्ण-क्षण )

## मोत्यांचा सडा

पांढऱ्या शुभ्र मोत्यांच्या राशींनीं भरलेल्या मेघांच्या नौका आंतील मौल्यवान् माल कुणालाही दिसूं नये म्हणून काळ्या पडद्यानें आच्छादिलेल्या आकाशांतून जात आहेत. आपल्या हक्काचें हें ऐश्वर्य आपल्याला मिळणार नाहीं या भीतीनें पृथ्वीच्या तोंडचें पाणी पळालें आहे. इतक्यांत मूर्तिमंत न्यायदेवताच वाटणारी वीज एकदम प्रगट होते आणि त्या नौकांना भराभर भोंकें पाडून पृथ्वीवर मोत्यांचा वर्षाव करते.

— वि. स. खांडेकर : ( पुनर्जन्म )

## पावसाचे थेंब

तिनं वर दृष्टि टाकली तों ढग जमले होते, पण त्यांतून सूर्य चांगला तळपत होता. जोराच्या वृष्टीचीं चिन्हें मुळींच दिसत नव्हतीं. एखादं झाड वाऱ्यानं हाल्लून त्यावरचीं फुलं तुरळक गळावीं त्याप्रमाणें मेघांतून मोठमोठे थेंब ठिबकत होते. तळ्यांतल्या पाण्यावर त्या थेंबांचं नृत्य मोठं मजेदार दिसत होतं. उजव्या बाजूला शेतजमिनींत पडणारे थेंब लगेच शोषले जाऊन फार दिवसांची तहान भागल्या-प्रमाणें धरित्री उष्ण निःश्वास सोडीत होती. त्यांचा उग्र सुगंध दरवळत होता.

— ना. सी. फडके : ( इंद्र-धनुष्य )

## गुलाबदाणी

' पावसाची झिमझिम मला आवडते, जणुं गुलाबदाणी कोणी शिंपडीत आहे—लाखों धारांची गुलाबदाणी !

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## अचानक आलेला पाऊस

हां हां म्हणतां आकाश काळेंकुट्ट झालें. विजेचा प्रवाह बंद पडल्यामुळें एखाद्या प्रचंड नाटकगृहांतील सर्व डोळे दिपविणारे दिवे एकदम जावेत, तसें आकाश दिसूं लागलें. भणभण करीत वारा उलटासुलटा वाहूं लागला. आम्ही आसरा कुठें शोधावा याचा विचार करतों न करतों तोंच पावसाची एक मोठी सर आमच्या अंगावर येऊन कोसळली-सुद्धां !

— वि. स. खाण्डेकर : ( नवीं कौलें )

## आकाशांतील दूध

पावसाच्या धारा झपाट्यानें खालीं येत होत्या ! गाईच्या आंचळांतून दूध काढावें तसें मला वाटत होतें ! आकाश-गाईच्या आंचळांतून दूध-पाणी चरवींत सांडत होतें. सर्वत्र फेसाळलेल्या पाण्याची संततधार सुटली होती ! दूध काढतांना गाईनें लाथ झाडावी किंवा कान फडफडावें त्या-प्रमाणें सोसाट्याचा वारा मधूनमधून या अचाट गो-दोहनाला अडथळा आणीत होता.

— य. गो. जोशी : ( दुधावरची साय )

* पावसाचें दाटलेलें सौंदर्य त्या भागांत पाहायला मिळालें. डोंगरांच्या कुशीकुशींतून ढग विसांवले होते. पावसाच्या धुक्याची तलम मलमल सर्वत्र पसरली होती. पाऊस तिरप्या रेषांनीं पडत होता. शेतांतून पाण्याच्या चादरी पसरल्या होत्या. ओलावा सर्वत्र निथळत होता. बालकवींची कविता तेथें स्फुरत होती.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## पावसाची भुरभुर

हा लबाड चोरट्या चालीचा पाऊस विनोदाचें उत्तम उदाहरण आहे. कारण याची तयारी पहावी तर असें वाटतें कीं, आतां मुसळधार पाऊस पडणार; पण प्रत्यक्ष अवतार पहावा तो जसा कांहीं सुदामदेवानें आपल्या पुरचुंडींतील पोहे फुंकरून श्रीकृष्णाच्या हातावर ठेवले त्या वेळीं उडालेला कोंडाच !

— ना. सी. फडके : ( पाऊस ).

## पावसाची किमया

पाऊस उघडल्यावर तर सृष्टींत जी क्रांति झपाट्यानें झाली ती विलक्षण होती. कड्याकपारींतून पाण्याचे लहान-मोठे ओघ वहात राहिले, पण आभाळ स्वच्छ झालें, प्रकाश जिकडे तिकडे भरला, झाड्यांच्या फांद्यांना निराळेच रंग चढूं लागले, वेलीवेलींवर किती तरी तऱ्हांचीं फुलं दिसूं लागलीं, आणि पक्ष्यांचा किलबिलाट ऐकूं येऊं लागला. पुढें आंब्यांचीं झाडं मोहोरलीं, बंगल्याच्या आवारांत कोणत्या जातीचीं विलायतीं मोठालीं झाडं होतीं कुणास ठाऊक, पण त्यांपैकीं कांहींना हिरव्या, कांहींना पिवळ्या, कांहींना किंचित गुलाबी रंगाचीं नाजूक लांबट केशरांचे गुच्छच्या असलेलीं अशीं फुलं आलीं.

— ना. सी. फडके : ( शाकुंतल ).

* शिष्याच्या करामतींत गुरुचीहि कृतार्थता भरलेली असते.

— ना. धों. ताम्हनकर.

## पावसाचे थेंब

समोंवार कोसळणाऱ्या पावसाची शोभा पाहाण्यांत मी दंग होऊन गेलों. मी मनांत म्हणत होतों—ओ हो! स्वर्गांतून टपोऱ्या मोत्यांचे सरामागून सर तर आज कोसळून पडत नाहींत ना? छे! आज नंदनवनांत कसला तरी मोठा समारंभ असावा. त्या समारंभाकरितां अप्सरांनीं असंख्य सुंदर पुष्पमाला गुंफून त्यांच्या राशी रचून ठेवल्या असाव्यात. पण इंद्राचा ऐरावत चुकून नंदनवनांत शिरला असेल आणि त्या पुष्पमाला सोंडेंत घेऊन पृथ्वीवर उधळण्याची त्याला लहर आली असेल!

— वि. स. खांडेकर : ( नवीं कोलें )

## पावसाची सुट्टी

पावसानें मधली सुट्टी घेतली होती, तरी सूर्यदर्शनाचा रंग नव्हता. वाढून येणाऱ्या कृष्णमेघांनीं सगळें किरणजाल ग्रासलें होतें. एकादा वैदिक ऋषि असता तर त्यानें म्हटलें असतें, 'पणींनीं इंद्राच्या धेनु चोरल्या.' झाडें अंग झाडीत होतीं. वारा म्हणत होता, 'पावसानें तुमचीं वस्त्रें भिजवलीं का? मी आतां तीं वाळवून देतों.' त्यानें वस्त्रें वाळवलीं हें खरें, पण इकडे देह गारठला त्याची वाट काय? क्षणाक्षणाला रोमांच उठत होते.

— महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

* मुंबईच्या पावसाची सर अन् मुंबईच्या सट्टेबाजांची श्रीमंती दोन्ही सारख्या. एका क्षणीं गरजतील अन् दुसऱ्या ओसरतील.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## पावसाचीं स्वरूपें

पाऊस सर्व भागांत एकदम सुरू होत नसतो. कडकडत-गडगडत तो आज येथें पडला, तर उद्यां लांब क्षितिजावर पडलेला दिसेल व काळ्या ढगांतून पडणाऱ्या त्याच्या धारा जलवंतीच्या सुटलेल्या केशकलापाप्रमाणें दिसतील.

र. वा. दिघे : ( पाणकळा )

## चचल वर्षाकाल

मला वाटतें–ते पाण्याचे प्रवाह म्हणजे धरणीच्या आप्तेष्टांचे अश्रुच आहेत. कामुक वर्षाकाल चार महिने तिच्याबरोबर हांसला–नाचला, धरणीला आपल्या काळ्या-कुट्ट मनाची शंका येऊं नये म्हणून विजेच्या मिषानें त्यानें प्रणयचेष्टांचें प्रदर्शन केलें–धरणीचें हृदय फुलून गेलें. पण पुढें काय ? रंगेल वर्षाकाल आतां तिला सोडून गेला ! धरणीला आशा वाटत आहे. पण आणखी एक-दोन महिन्यांनीं आशेची ही हिरवळ सुकून पिवळी होईल.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## वाऱ्यांतील पाऊस

इतक्यांत चारी बाजूंनीं वाऱ्याचें थैमान सुरू झालें ! सरी स्वच्छंदपणानें नाचूं लागल्या. त्यांच्या त्या चंचल आणि मोहक हालचालींकडे पहतां पहातां मला वाटलें, स्वर्गीय अप्सरांचा मेळावाच एका उन्माद नृत्यांत गुंग होऊन गेला आहे. आपल्या पायांतले चाळ तुटून त्यांतले पैंजण भराभर गळून पडत आहेत, याचीसुद्धां त्या नर्तिकांना शुद्ध नाहीं !

— वि. स. खांडेकर : ( नवीं कौलें )

## पावसाळ्यांतील घाट

पावसाळा सरत आला म्हणजे आंबोली घाटांतील शोभा खरोखरच अप्रतिम असते. भर पावसाळ्यांतल्या देखाव्यांत अद्‌भुत-रम्यता दिसते; पण या वेळीं जिकडे तिकडे स्वाभाविक सौंदर्य विलसूं लागतें. धुकें असतें; पण अगदीं दोन हातावरलें दिसणार नाहीं इतकें कांहीं दाट नसतें तें. दरीवर व पर्वतांच्या शिखरांवर नाजूक निळ्या चवऱ्या ढाळीत असलेलें तें दिसतें. पाण्याचे लोंढेच्या लोंढे वाहतांना आढळायचे नाहींत या दिवसांत ! दूध पिऊन तृप्त झालेल्या बालकाच्या मुखावर दुधाचा एकादाच ओघळ जसा दिसावा, त्याप्रमाणें प्रत्येक खडकावर लहान लहान पाण्याचे प्रवाह वाहात असतात.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## आकाशांतील लढाई

आजचा रंग निराळा आहे. सूर्य खालीं गेला. ढग पुन्हां काळे होऊं लागले. छातीवरून सरणाऱ्या जानव्याप्रमाणें विजा दक्षिण-उत्तर चमकूं लागल्या. ‘ दक्षिण उत्तर चमके बिजली पश्चिम वाहे वात ’ हा भाडळी ज्योतिषाचा दोहरा म्हणत लोक ‘ पाणकळा आला ’ असें सर्वांना सांगत सुटले. दुखणाइताच्या पाठींत सणका चमकाव्यात व तो रात्रभर विव्हळत पडावा; त्याप्रमाणें रात्रभर विजा चमकूं लागल्या व ढग धडं गडं गुडं असा आवाज करीत राहिले. जणूं काय इंद्र व वरुण यांची आकाशांत लटकी लढाई चालली आहे !

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## शंकराचें मस्तक !

मधून काळें, मधून पांढरें दिसणारें आकाश नव्हतें तें ! भस्मचर्चित कृष्ण जटांनीं अलंकृत झालेल्या भगवान् शंकराच्या मस्तकाचा भास होत होता तिथें ! सळसळ खालीं कोसळणाऱ्या त्या काय पर्जन्यधारा होत्या ? छे ! शंकरानें कंठांत धारण केलेल्या सर्पांच्या माळाच असाव्यात त्या ! त्यामधून लखकन् चमकणारी ती वीज ! शंकराच्या तृतीय नेत्राची उघडझांप अशीच असायची !

— वि. स. खांडेकर : ( एक पैसा )

## पर्जन्यांतील सूर्य-बिंब

दूर अंतरावर कुठें तरी पडत असलेल्या पावसाचे जे गर्द निळे पट्टे क्षितिजाच्या पश्चिम भागावर दिसत होते, त्यांतून सूर्याचें बिंब जेव्हां मध्येंच दृष्टीस पडे, तेव्हां स्वतःच्या मस्तकावर कोसळणाऱ्या स्वर्गगंगेच्या झोतांत पृथ्वी बुडून जाऊं नये म्हणून शंकरानें दयार्द्र होऊन आपला तृतीय नेत्र तिला दटावण्यासाठीं उघडला आहे कीं काय असा भास होई व त्या दिशेनें येणाऱ्या थंड वाऱ्याच्या झुळुके-बरोबर जो पाण्याचा एकादुसराच टपोरा थेंब अंगावर मधूनच पडे, तो त्या दयाघनाचा करुणाश्रु असावा, असें मनाला वाटे.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( [illegible] ळा

* कामाला कळवळ्यापेक्षां कौशल्याची जरूरलची दाट
— न[illegible] मिनिटांनीं

* मनुष्य अन्नापेक्षां प्रेमाचा भुकेलेला [illegible]रला.
[illegible]ट चुकल्याचा आनंद )

## निवळूं लागलेलें आकाश

आकाश स्वच्छ होत चाललें होतें. मात्र पावसाचा एकादुसरा थेंब अजूनहि अंगावर पडत होता. ढगांचे काळसर पांढरे पुंजके, धुनकलेल्या कापसाच्या विरळ फुगीर राशीसारखे, पूर्व क्षितिजावर रेंगाळत होते; व त्यांतून झपाट्यानें वाट काढीत वर येणारें चतुर्थीच्या चंद्राचें अपुरें लालसर बिंब मोठें मजेदार दिसत होतें. त्या बिंबावरून ढगाच्या काळ्या रेषा गेल्यामुळें त्याचे तुकडे पडल्याचा भास होत होता. ढग आणि चांदणें यांची पूर्व क्षितिजावर झालेली ती सरमिसळ ज्याचे पुढले दोन-तीन दांत पडलेले आहेत अशा काळ्या माणसाच्या चेहऱ्यावरील हास्यासारखी वाटत होती.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## मोत्यांचे सर

एक दोन तासांच्या पूर्वींच त्या मैदानांत पावसाची एक सर पडून गेली होती; पण ती सर यावेळीं जरी निघून गेलेली होती तरी तिनें प्रत्येक झाडाच्या गळ्यामध्यें अनेक मोत्यांचे सर अडकवून ठेविलेले होते. झाडांच्या पानांवरून कोठें एकेकच थेंब अवशिष्ट राहिलेला होता व त्याच्यावर संध्याकाळच्या सूर्याचे किरण पडून तो थेंब एकाद्या उत्कृष्ट आणि पाणीदार मोत्याप्रमाणें चमकत होता.

— शि. म. परांजपे : ( सृष्टिसौंदर्य )

ज [illegible] ंतील जें भलें तें टिकवीत जावें; वाईटाचा
[illegible] जड.
[illegible] टापट

— साने गुरुजी

## निसर्गाचें गाणें

एकादे वेळीं ढगांवर ढग जमा होऊन सैनिकांच्या रांगा लागल्यासारख्या दिसतात, तर एकादे वेळीं पातळ ढगांची धाबळी परिधान केल्यासारखें आकाश दिसतें. एकादे वेळीं बाणाच्या वेगानें पावसाच्या धारा पडतात, तर एकादे वेळीं फुलबाजीप्रमाणें मंद मंद भुरभूर सुरू असते. पण कांहींहि असलें तरी निसर्गाचें आनंदाचें सांघिक गाणें या ऋतूंत सुरू असतें.

— वि. पां. दांडेकर : ( आनंदाचे संकेत )

## मेघाआडचे सूर्यकिरण !

पूर्वेच्या बाजूला प्रकाशाचे अंधुक अंधुक पट्टे सर्वत्र नाचत होते. जुलुमी राजसत्तेमुळें बाह्यतः माघार घ्यावी लागली तरी गुप्त राहून आपलें तेजस्वी कार्य अखंड चालू ठेवणारे देशभक्त असतात ना ! त्यांचेंच अनुकरण आज सूर्य करीत आहे असा मला भास झाला.

वि. स. खांडेकर : ( अंधश्रद्धा )

## पाऊस उघडला

मी समोर पाहिलं तो पाऊस उघडूं लागला होता. जल-धारांची दाटी विरळ-विरळ व्हायला लागली होती. शत्रूवर एकदम छापा झाडून पुढें निघून जाणाऱ्या सैन्याच्या थव्या-प्रमाणं ढग भराभरा निघून चालले होते. आकाशाचा नि- रंग पुन्हां प्रगट व्हायला लागला होता. भोंवत- झाडी पुन्हां स्पष्ट दिसूं लागली होती. दहा-पंध- सूर्यप्रकाशही पुन्हा थाटांत जिकडे तिकडे व्हे-

— ना. सी. फडके : ( व

ा )

असते.

धों. ताम्हनकर

— साने गुरुजी

## पावसाची आघाडी

इतक्यांत सोसाट्याचा वारा सुटला. दहावीस लाख माणसांच्या जत्रेंत पालखींतल्या मूर्तीवर सर्वांकडून एकसारखा अबीर–बुक्का उधळला जात असावा, तशी भिरभिरत वर उसळणारी धूळ वाटूं लागली. दाही दिशा त्या धुळीनें भरून गेल्या. डोळ्यांत धूळ जात असतांनाही माझें सारें लक्ष ढगांच्या त्या पुढाऱ्यावर–आभाळांत अगदीं पहिल्यांदा दिसूं लागून मोठ्या झालेल्या त्या मेघावर–होतें. आतां मधूनमधून त्याच्यांतून वीज चमकूं लागली होती. माझ्या मनांत आलें ही वीज नाहीं, या बंडखोर मेघांचा विजयी झेंडा असावा हा !

— वि. स. खांडेकर : ( कुठं आहे तो मेघ ? )

## पावसाळा संपल्यावर

सूर्य मावळतीकडे उतरलेला होता. आकाश अगदीं निरभ्र झालें होतें. घटकेपूर्वीं होऊन गेलेल्या पावसाचा व वादळाचा अवशेषही आकाशांत दिसत नव्हता. ग्रीष्मानें तापलेल्या भूमीवर मात्र त्या पावसाचे विविध अवशेष गतकालीन सुखाच्या स्मृतीप्रमाणें तरंगत होते. मुरुमाच्या मातींत ओलसरपणा दिसत होता व खडकावर वाहून गेलेल्या पावसाच्या खुणा होत्या. वारा येतांच झाडांच्या पानांतून अधूनमधून पाण्याचे थेंब अद्यापही खालीं ठिबकत [illegible] जणूं आतांपर्यंत आपल्या पर्णसंभारांत दडवून [illegible]हे जडजवाहर, वाऱ्याच्या दंगा-मस्तीला भिऊन, तीं [illegible]टापट त्याच्यापुढें जमिनीवर टाकून देत होतीं.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## ढग पळाले

विजेचा कारखाना एकदम बंद पडल्यामुळें काळोख्या रात्रीं गांवावर जशी अवकळा पसरावी तसें मघाशीं आभाळ दिसत होतें. पण आतां तें भराभरा उजळूं लागलें. टोळ-धाडीप्रमाणें आलेले ते लहानमोठे ढग एकाएकीं कुठें गुप्त झाले देव जाणे ! जवळ जवळ स्वच्छ होत आलेलें तें आकाश पाहून माझ्या मनांत एक निराळीच कल्पना येऊन गेली. समुद्रकांठच्या वाळवंटावर लहान लहान खेकडे नेहमीं स्वैर संचार करीत असतात. ते ढगहि आकाशाच्या वाळवंटांत तसेच खेळत असावेत. आणि ते छोटे खेकडे ( कोंकणांत कुरल्या म्हणतों आम्ही त्यांना ! किती रम्य नांव आहे नाहीं ? ) माणसाची चाहूल लागली कीं कसें पटकन् वाळूंतल्या इवल्या इवल्याशा बिळांत जातात ! मघाचे ढगही तसेच आकाशांतल्या आपआपल्या गुहेंत लपून बसले असावेत.

— वि. स. खांडेकर : ( कुठं आहे तो मेघ ? )

## पावसाची हिरवी जादू

नदीच्या शेजारचें मैदान नवीन उगवलेल्या गवतांनीं हिरवेंगार होऊन गेलेलें होतें. तेथील आसपासच्या झाडां-वरील धूळ पावसाच्या पाण्यानें धुऊन जाऊन झाडांची पालवी हिरवीगार व क्वचित् स्थळीं काळीभोर झालेली होती. वेलींना टवटवीतपणा आलेला होता व मधून मधून रानटी झाडांवरील फुलें आपल्या मंदस्मिताचा प्रकाश आसपासच्या हिरव्या रंगांच्या पर्णसमुच्चयावर पाडीत

— शि. म. परांजपे : साने गुरुजी ताम्हनकर

## लाल ओहोळ

चोहोंकडे जे उंचउंच डोंगर उभे राहिलेले होते, त्यांच्यामधून लाल मातीच्या रंगानें गढूळ झालेले पावसाच्या पाण्यांचे शेंकडों ओहोळ वहात असलेले दिसत होते, आणि त्यामुळें जबर शस्त्रप्रहाराच्या योगानें ज्याच्या अंगांतून रक्ताचे प्रवाह चालले आहेत, असे रामायणयुद्ध-कालीं मारुतीनें लंकेंतून इकडे झुगारून दिलेले हे कोणी रक्तबंबाळ झालेले राक्षस योद्धेच आहेत कीं काय, असा भास होत होता ! या ओहोळांपैकीं कित्येक पुष्कळ पाण्याचे ओहोळ अतिशय उंच कड्यावरून अतिशय खोल दऱ्यां-मध्यें जेव्हां फेसानें पांढरे होऊन फों फों करीत हजारों निरनिराळ्या धारांनीं धडाधड खालीं पडत, त्या वेळीं हें येथें जनमेजय राजाचें दुसरें सर्पसत्रच चाललें आहे कीं काय, असा भास होई.

— शि. म. परांजपे : ( गोविंदाची गोष्ट )

## श्रावणांतलें ऊन

आभाळ आलेलें पाहून बाहेर पडतांना छत्रीचें लटांबर हातांत घेऊनच आपण मंडई करायला निघतों. पण आपण चार पावलें चालून जातों न जातों तोंच ढगांच्या पडद्याआड लपलेलें ऊन हळूंच डोकावून पाहतें आणि जणूं कांहीं टाळ्या पिटीत म्हणतें, ‘ कशी फजिती झाली एका माणसाची ! ’ ... खेळकर उन्हाचा आपल्याला मुळींच राग येत नाहीं. ...असें वाटतें, तेजस्वी डोळ्यांच्या पण नाजूक गालांच्या ...रग्याला जर आपणाला पकडतां आलें असतें, तर ... त्याचे खूप खूप गालगुचे-छे, पापे घेतले असते !

— वि. स. खांडेकर : ( श्रावण )

## इंद्रधनुष्याची कमान

पूर्वक्षितिजावर जें प्रचंड इंद्रधनुष्य प्रकट झालं, त्याच्या शोभेला उपमा कुठली ? किती बहारीच्या रंगाचे रुंदच्या रुंद पट्टे दिमाखानें खडे राहिले होते ! आणि काय चमत्कार ! दुसऱ्याच क्षणीं इंद्रधनुष्याची ती सबंध प्रचंड कमान माझ्या जवळजवळ सरकत येत आहेसें मला वाटलें. अगदीं माझ्या अंगावरून गेली असली पाहिजे ती. मीं वळून पाहिलें तों ती अदृश्य झाली होती.

— ना. सी. फडके : ( वाट चुकल्याचा आनंद )

## सप्तरंगी पट्टा

इंद्रधनुष्याचा केव्हढा तरी विस्तीर्ण पट्टा आकाशाच्या या कडेपासून त्या कडेपर्यंत हलके हलके उमटूं लागला होता. प्रथम एका रंगाची कड, नंतर दुसऱ्या, नंतर तिसऱ्या, अशा रुंद रंगीत रेघा अधिकाधिक स्पष्ट होत होत्या. अखेर ती विस्तीर्ण बहुरंगी कमान अंतराळांत मोठ्या डौलानं उभी राहिली, अन् जणूं ती हवेंत हलकेंच हेलकावत आहे असा भास वासंतीला झाला.

— ना. सी. फडके : ( इंद्रधनुष्य )

* अमुक एक कठीण असें म्हणूं नये. जें कठीण वाटत असेल त्याचा पिच्छा पुरवावा.

वा )

— सा

* नशिबावर मात करायची हिंमत धरली प ताम्हनकर आपण.

— ना. धसाने गुरुजी

## स्वर्गीय स्वागत

पहा तरी ती शोभा ! अगदीं सबंध दिसतें आहे! इंद्र-धनुष्य ! देवांच्या राज्यांतील कमानी. परमेश्वर का कोणाचें स्वागत करीत आहे? कोणासाठीं उभारली आहे ही कमान? आणि तिकडे पहा सोनें उधळलें जणूं ! का सोन्यासारख्या वस्त्रांच्या बैठकी आहेत? कोण बसणार त्या भरजरी बैठकांवरून ? देवाच्या घरीं किती वैभव असेल ? कशी सुंदरता असेल ?

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## सजल सृष्टि

जिकडे पहावें तिकडे जलार्द्रता पसरलेली दिसत होती. झाडांच्या आणि वेलींच्या विशाल पर्णनेत्रांवर अश्रुबिंदु होते आणि डोंगरांतील खडकांचींदेखील अंतःकरणें झऱ्यांच्या रूपानें द्रव पावत होतीं. त्यावरून तो त्रेतांयुगींचा भगवान् श्रीरामचंद्र लक्ष्मणासहवर्तमान आपल्या प्रिय सीतादेवीचा शोध करीत नुकताच या मार्गानें गेला कीं काय, अशी भ्रांति उत्पन्न होऊन त्या रामाला पाहाण्या-करितां जों इकडे तिकडे पाहूं लागे, तों हे पावसाळ्याचे दिवस आहेत असें स्मरण होऊन तें मन उद्विग्न होत असे.

— शि. म. परांजपे ( गोविंदाची गोष्ट )

* इतक्यांत पांचपन्नास आसूड एकदम वाजावेत अशा ...जानें सुरवात होऊन वीज कडाडली आणि अशी-ही ...परपटणाऱ्या सर्पाप्रमाणें तेजानें चकाकत सरकन् ... डोळ्यासमोरच ती नाहींशी झाली !

— य. गो. जोशी : ( दुधावरची साय )

## मोराचें सौंदर्य

मोराची ती मेघाकडे असलेली दृष्टि, त्याचा तो खोल आवाज व मेघांचा धिमिधिमि गडगड आवाज होऊं लागतांच त्याचा उभारला जाणारा तो पिसारा ! अहाहा, त्या पिसाऱ्यासमोर माणसाची सारी ऐट झक मारते. बादशहा नटतो, परंतु पिसाऱ्यासमोर तो काय अधिक नटणार ? केवढा तो भव्य पिसारा ! ते सहस्र डोळे, ते नाना रंग व त्या अनंत छटा. ती अद्भुत, सुंदर, मृदु, रमणीय रचना, ती वेलबुट्टी ! पहा, पहा तो पिसारा आणि तेथें परमात्माहि पहा.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## मोराचा पिसारा

हा मोराचा पिसारा पहा. अहाहा ! एकेका पिसाची ती ठेवण ! तें रंगकाम ! ती जिवंत चमक ! तें तरल नटवेंपण ! आद्य कलावंत !! अशा अनेक सुंदर पिसांचा तो पिसारा पसरून तो तुझा मोर जों जों आनंदानें उन्मत्त होऊन नाचूं लागतो, तों तों देवा, तुझी ती ललित कलाकुसरी पाहून ' धन्य देवा, धन्य तुझी ! वारे वा ! ' असें वारंवार उद्गारत माझें हृदयहि नाचूं लागतें ! आणि असा पिसारा मनुष्यासहि तूं कां दिला नाहींस म्हणून किंचित् रुसूंहि लागतें.

— वि. दा. [illegible] वा )

* स्त्री-सौंदर्याच्या वराती नेहमीं धनवंताच्या [illegible]ताम्हनकर वळविल्या जातात.

— य.[illegible]ाने गुरुजी

## संध्याकाळची वावटळ

संध्याकाळीं वळिवाची मोठी वावटळ सुटली, आकाशांत धूळ उठली व डोंगर दिसेनासे झाले, झाडें मोडून पडलीं, आंब्या-जांभळीच्या झाडांखालीं फळांचा सडा झाला. आकाशांत उडालेली धूळ संध्या–प्रकाशांत सोन्याच्या तापलेल्या चुरांप्रमाणें लकाकत होती. त्या सोनेरी धुळींतून सोनेरी ढग कुबेराच्या वैमानिक काफिल्यांप्रमाणें जमा झाले होते व दरिद्री शेतकऱ्यांच्या भूमीवर सोन्याचा वर्षाव करीत होते. काळा कडा हें त्याचें अंतिम लक्ष होतें. काळ्या कड्यावर ढगांनीं गर्दी केली. ढगांत वीज चमकली कीं ती झाडावर नाहींतर कपारीवर कोसळे व पृथ्वीच्या गर्भापर्यंत टारटार आवाज करीत जाई.

– र. वा. दिघे : ( सराई )

## झोपलेलीं घरें

माझ्या गच्चीच्याभोवतीं तऱ्हतऱ्हेचीं घरं पसरलीं होतीं. कोणी कानटोपीप्रमाणें खोल छपरं कानशिलापर्यंत ओढून घेऊन झोपलीं होतीं. कोणी योग्याप्रमाणें समाधींतहि अगदीं ताठ, मान उंचावून डोक्यावर जटांचा मुकुट धारण करून बसलीं होतीं. दूर.–कांहीं शेतांच्या पलीकडे-लहान ऱ्हान झोपड्या एकमेकींना बिलगून निजल्या होत्या. या ॅणीं झोपेंत लोळूं नये, म्हणून जणूं काय त्यांच्यामधून ांच्या माळाच माळा लावल्या होत्या. पण या सर्व ातेवर एक अखंड, अनंत मायेची चादर पसरली होती.

–कुसुमावती देशपांडे : ( मध्यरात्र )

## धारेंतील चैतन्य

धबधब्याचें पाणी दोन-अडीचशें फूटच खालीं कोसळत होतें. म्हणजे तें दृश्य कांहीं डोळे फिरवून सोडणारें नव्हतें, पोटांत भीतीची पोकळी निर्माण करणारें नव्हतें. पण तरी त्या दृश्यांत अनपेक्षितपणा होता, विपुलतेचें वैभव होतें, घोंघावणारा, फेसाळणारा जिवंतपणा होता, अस्थिरपणांत स्थिर झालेलें सौंदर्य होतें, तृप्त करणारा तुडुंबपणा होता, खळखळणारी निर्भरता होती, धुक्याची संदिग्धता होती. ठिबकणारी, वळसा घेऊन अदृश्य होणारी हुरहुर होती. आणि हृदय आर्द्र करणारा ओलावा होता.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## खाडीच्या कांठानें

बॅक वॉटर्सच्या रुंद पट्ट्यावरून आमची लॉंच पुढें सरकत होती. दोन्ही बाजूंचा किनारा दगडांनीं बांधून काढलेला होता. किनाऱ्यावर माडांच्या दाटींतून छोट्या झोंपड्या आणि क्वचित् पांढरीं पिवळीं कौलारूं घरें डोकावत होतीं. एकाद्या चर्चचा शुभ्र मिनार डौलानें आकाशांत चढला होता. अंतरा अंतरावर लांकडें पाण्यांत पुरून छोटेछोटे धक्के तयार केलेले होते. आसपासच्या लोकांनीं आपल्या चिमुकल्या होड्या त्या धक्क्यांना बांधून ठेवल्या होत्या आणि तेथून त्यांत उतरून ते मच्छिमारीला निघत होते था )

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच ताम्हनकर

* कांहीं तरी निश्चित ध्येय ठरवून त्यांत सारी ओतायला शिकलं पाहिजे.

—साने गुरुजी

### लाटांचें नृत्य

एकेक लाट म्हणजे जणूं एकेक उसळणारी टेंकडीच! ती उत्तुंग शोभा पाहून दुसऱ्या लाटांनीं तिचें कौतुक करायला हवें; पण तें सोडून त्या दोघी एक होतात व नवाच उच्चांक गांठतात. एवढेंच काय, पण आसपासच्या लाटांना-देखील आपल्याइतकें उच्चत्वाला पोंचण्यासाठीं उत्तेजित करीत राहतात. हें नृत्य एका क्षणाचीहि उसंत न घेतां अव्याहत चालू असतें. त्यामुळें अगदीं टक लावून पाहात बसलें, तर त्यांत एक तऱ्हेचा प्रचंड ताल असल्याचा प्रत्यय येतो. जणुं शिव-तांडव-स्तोत्राचें प्रमाणिका-वृत्त आपली शक्तीच अजमावूं पाहत आहे! हृदय भरून येऊन ओघ वाढल्यामुळें पाहतां पाहतां प्रमाणिकेचें पंचचामरांत रूपांतर होतें आणि मग आपल्या प्रतिष्ठेचें भान न राहून पुष्पदंतहि तांडवनृत्यांत सामील होतो.

— आचार्य कालेलकर : ( लाटांचें तांडव-नृत्य )

### लाटांचा खेळ

भरतीचा ऐन भर असल्यामुळें लाटांवर लाटा उसळून ज्या रेषेवर येणाऱ्या-जाणाऱ्या लाटांची टक्कर होई, तेथें एकसारखा पांढऱ्या सफेत फेसाचा खेळ चालला होता. जणूं दुधाच्या घागरी घेऊन तीराकडे धांवत तरुण गोपि-कांच्या हांतून धांवपळींत घागरी पडून फुटल्या होत्या व दुधाच्या धारांचा सडा झाला होता.

— ना. सी. फडके : ( अटकेपार )

लाटा कुतूहलानें माना उंचावून माझ्या देशाकडे पहात येत होत्या आणि त्याच्या पायाशीं लोटांगण [illegible]त्या.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## सागराचा अथांगपणा

दुरून दिसणारा किनाऱ्यावरील फेंस ताक घुसळल्या-नंतर वर येणाऱ्या लोण्याप्रमाणें भासत होता. सुधाकरांनीं समोर पाहिलें. पाण्याचें ब्रह्मांड पसरलें होतें. आईच्या प्रेमाप्रमाणें अगर कवीच्या कल्पनेप्रमाणें त्याचा कुणालाही अंत लागणें शक्य नव्हतें.

— वि. स. खांडेकर :( कांचनमृग )

## समुद्राचीं रूपें

फार दिवसांनीं प्रिय मनुष्य भेटलें म्हणजे हृदयांत जशा आनंद लहरी उचंबळतात त्याप्रमाणे समुद्रावरील विशाल लाटांचें दृश्य होतें. हा देखावा पाहून एखाद्या लहान मुलाच्या मनांत सृष्टि समुद्राच्या पाठीवर कांहीं तरी वेड्या-वांकड्या रेषा काढून त्या लगेच पुशींत आहे, अशी कल्पना आली असती; तरुणाला जलदेवी अस्मानी रंगाचें पातळ नेसली असून वाऱ्यामुळें त्याच्यावर पुनः पुनः सुरकुत्या पडत आहेतअसा भास झाला असता; वृद्धांना दरक्षणीं हजारों जीवांना जन्म देणाऱ्या व तितक्यांच प्राण्यांचा विलय करणाऱ्या संसाराची आठवण झाली असती.

— वि. स. खांडेकर : ( कांचनम्
,घा )

* श्रावण-झड संपली होती. शेतें मस्त दिसत होतीं. समुद्र जरा शांत झाला होता. मी तेथें नारळीच्या झाडांमध्यें राहून दूरचा समुद्र बघत असे. सूर्याचा प्रकाश पडत रुपेरी प्रवाहच तिकडे पसरला आहे असें वाटे.

ताम्हनकर

— साने गुरुजी : ( श्यामसाने गुरुजी

## सायंकाळचा समुद्र

सूर्य समुद्रांत बुडायला लागला, त्यावेळीं केवढी गंमत दिसली. जणूं कांहीं समुद्राच्या पाण्यांत कुणी तरी सोन्याची घागर बुडवीत आहे. थोडा वेळ मी समुद्राच्या पाण्याशीं खेळलें. मोठमोठ्या दिसणाऱ्या लाटा हंसत खिदळत किनाऱ्याकडे येत. पहिल्यांदा त्यांची भीति वाटे. पण चंद्रज्योत पेटली कीं तिच्यांतून फुलें गळावींत त्याप्रमाणें लाट चटकन फुटे आणि जिकडे तिकडे फेंसच फेंस होई. जर लावलेल्या अस्मानी साडीसारख्या दिसणाऱ्या त्या समुद्राकडे किती वेळ पाहिलें तरी मला पुरे होईना.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

## समुद्राची कला

पूर्वीं मला समुद्र एकाद्या श्रीमंत मनुष्यासारखा वाटे. कुणी कितीहि पाणी नेलें, तरी तो कांहीं रिकामा व्हायचा नाहीं. आतां तो श्रीमंत नसून कलावंत आहे अशी कल्पना मनांत येते. सकाळ, संध्याकाळ चित्रें रंगवायचीं, अहोरात्र गात रहायचं, जलतुषारांनीं किनाऱ्यावर नेहमीं वेलबुट्टी काढायचीं, हीं सारीं कलावंताचींच लक्षणं नाहींत कां ?

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

* हा खाडीचा किनारा नाहीं. उघड्या समुद्राचा किनारा ाहे. येथल्या समुद्राचा आवाज अधिक गंभीर आणि कान रून टाकणारा वाटतो. निळ्या रुंद लाटांचीं मस्तकें क उन्नत वाटतात आणि वाऱ्याचा झोत अधिक ार असतो.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## भरती-ओहोटी

वैभवशाली पृथ्वीकडे पाहून मधून मधून सागराला तिचें वैभव हरण करण्याचा मोह उत्पन्न होतो. पूर्वीची आठवण विसरून जाऊन तो भराभर पुढें येऊं लागतो. त्याचें अति-क्रमण लक्षांत येतांच किनाऱ्यावरील वृक्षवेली आणि वालुका-कण उच्च स्वरानें गर्जना करून म्हणतात, 'सागरा, अगस्ति आला ! सागरा, अगस्ति आला !' सागराचें तोंड तात्काळ सुकतें, त्याच्या महत्त्वाकांक्षेची भरती नाहींशी होऊन तिला ओहोटी लागते आणि जेवढ्या वेगानें तो पुढें आलेला असतो तेवढ्याच वेगानें तो मागें जातो.

— वि. स. खांडेकर : ( सागरा, अगस्ति आला ! )

## सागरावरील रात्र

सप्तमीचा चंद्र समुद्र-बाप्पाच्या कुशींत जाऊन झोपला होता. मला केव्हां तरी रात्रीं जाग आली आणि मी उठून माडीच्या सज्यांत गेलों. प्रकाश हा अभिजातसुंदर आहे हें खरें, पण अंधारालासुद्धां त्याच्या घनतेचें एक आगळेंच सौंदर्य असतें, हें अशा वेळीं प्रत्ययाला येतें. समुद्रवलयांकित पृथ्वीला अंधारानें आपल्या पोटांत घातलें होतें. तारका त्याच्या पोटांत निरर्थक सुया टोचीत होत्या. पौषांतील ती रात्र सारखे अश्रु ढाळीत होती. पण तिचें तें मू घा ) रुदन पहायला चराचर जागें होतें कुठें ? डावीकडचा. अपरंपार सागरावर आणखी एक सागर पसरला होता ताम्हनकर तो म्हणजे गांभीर्याचा.

— महादेवशास्त्री जोशी साने गुरुजी

## वादळाचें वर्णन

वाऱ्याला तर जणूं काय त्या दिवशीं वेडच लागलें होतें. तो सूं सूं सूं करीत सोसाट्यानें एकदम राक्षसासारखा येई व निघून जाई, पण लगेच क्षणार्धांत एक चक्कर घेऊन तो पुनः जणूं काय बोटीला खाऊन टाकण्याकरितां चवताळून धांवत येई. वायूचें तांडव पाहूनच कीं काय, त्याच्या मैत्रिणी, म्हणजे समुद्राच्या लाटा, त्यांनींदेखील अकाण्डतांडव सुरू केलें. एखादी नागीण शेपटीवर उभी राहून, जीभ आंतबाहेर करीत, अंगावर चालून यावी तशा त्या प्रचंड लाटा, त्या बोटीला जणूं काय खावयाला येत होत्या. म्हशीएवढाले किंवा हत्तीएवढालेहि मासे, पाणी भयंकर घुसळलें गेल्यामुळें घाबरून जाऊन कीं काय, पृष्ठावर अधिक वेळा डोकावूं लागलेलें होते. कजाग सासूप्रमाणें विजा कडकडत होत्याच. एक बैल किंवा वाघ किंवा सिंह ओरडला म्हणजे त्याचे सजातीय जसे तितक्याच जोरानें डुरकावणी किंवा गर्जना करूं लागतात, त्याप्रमाणेंच मेघांची गर्जना—प्रतिगर्जना चाललेली होती.

— वा. म. जोशी : ( नलिनी )

## तुफानाचा परिणाम

वादळाचें स्वरूप हळूंहळूं जास्त वाढूं लागलें. झोपीं गेलेल्या लोकसमुदायाच्या मनांना ज्याप्रमाणें चांगल्या वक्त्यांची भाषणें खळबळून सोडतात, त्याप्रमाणें त्या वेळच्या त्या तुफानी वाऱ्यांनीं समुद्राची स्थिति करून सोडली होती.

— शि. म. परांजपे ( गोविंदाची गोष्ट )

## खवळलेला समुद्र

निमिषार्धात भवितव्यतेची गति बदलली ! क्षणापूर्वी शांत आणि सौम्य दिसणारा समुद्र एकाएकीं खवळला. मनाला आल्हाद देणाऱ्या वाऱ्यास झंझावाताचें स्वरूप आलें. निरभ्र नील आकाश कृष्णमेघांनीं आच्छादित होऊन त्याचा भयंकर गडगडाट सुरू झाला. वृष्टीला सुरवात होऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच मुसळधार पाऊस पडूं लागला, व आतां आकाश कोसळतें कीं काय असें जहाजावरील प्रत्येकाला वाटूं लागलें. क्षणापूर्वी वाऱ्याच्या लहरीबरोबर जें शीड आनंदानें डुलत होतें, त्याला त्या सोसाट्याच्या वाऱ्याचा असह्य मारा सहन न होऊन त्याच्या चिंधड्या फडफडूं लागल्या. दिशा अगदीं धुंद झाल्या. प्रलय वेळच ती ! जहाजाला भयंकर हेलकावे बसूं लागले. सोसाट्याच्या वाऱ्याला टक्कर देत असतां अविश्रांत श्रमामुळें समुद्राला फेंस आला, तरी देखील त्याच्या भयंकर गर्जना सारख्या चालू होत्या.

— नाथमाधव : ( सांवळ्या तांडेल )

* बोटीनें पहिलें बंदर केलें ते जयगड. पण तें येण्याच्या पूर्वींच रात्र पडली. सागर–पृष्ठावर अंधुकशी चंद्रप्रभा पसरली. किनाऱ्याकडची दृष्टि नामरूपें गोठवून एकाकार झाली. कुठेंही स्पष्ट कांहींच दिसेना. बोटीचा खळाळ तेवढा कानीं पडत होता. आतां आम्ही जणूं अव्यक्तांतील प्रवासी होतों. ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ अशी जणूं आम्हाला प्रार्थना करावी लागणार होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( जलदुर्गाचा राजा )

## समुद्रांतील नौका-प्रवास

समुद्र शांत आहे, एखाद्या सरोवरासारखा शांत आहे, आणि त्यावर, हिमावर मुलें आनंदानें थंड प्रदेशांत निसरत जातात-घसरत जातात तशी, ही आगबोट सलील विहरत चालली आहे. सूर्य पृथ्वीकडे टक लावून निरीक्षण करीत आहे. जणूं काय मनुष्यजातीनें जडावर मिळविलेला हा अपूर्व विजय पाहून तो थक्क झाला आहे! केवढा समुद्र अन् केवढी ही नाव! पण त्या नावेंतल्या एका इवल्याशा खोलींत बसलेला एक मनुष्य त्या समुद्रास माणसाळलेल्या एखाद्या हत्तीप्रमाणें सुकाणूच्या अंकुशानें वाटेल तसा वळवीत कसा अध्यां वचनांत ठेवीत आहे.

— वि. दा. सावरकर : (माझी जन्मठेप)

## नौकेशीं खेळणाऱ्या लहरी

नौका एकदां या बाजूला तर एकदां त्या बाजूला अशी अगदीं मंदपणें हेलकावे खात होती. एखादी वत्सल आई ज्याप्रमाणें आपल्या बालकाचे एकदां या गालाचा व एकदां त्या गालाचा असे पटापट मुके घेत असते; त्याप्रमाणें यमुनेच्या लाटा एकदां नौकेच्या या बाजूला व एकदां त्या बाजूला अशा चुंबीत होत्या. त्या स्पर्शामुळें होणारा आवाज किती मंजूळ आणि मोहक होता! अत्यंत कुशल सारंगी वाजविणारा आपलीं बोटें सारंगीच्या तारांवर अगदीं हळूच, ठेवली न ठेवली अशा तऱ्हेनें खेळवितो, त्यावेळीं सारंगींतून जितके मुग्ध परंतु हृदय हलवून सोडणारे नादतरंग निघतात, तितकाच गोड तो आवाज होता.

— ना. सी. फडके : (अल्ला हो अकबर!)

## शांत सागरावरील प्रवास

हेमंत ऋतु हा समुद्र-प्रवासाला सुखावह असतो. आपला गाज आणि प्रक्षोभ विसरून समुद्र त्या दिवसांत एक प्रकारचा निजानंद अनुभवतांना दिसतो.बोट हालत नाहीं, तर नुसती डोलते. एकाद्या योग्यानें तृप्तींत डोलावें तसें तें डोलणें असतें. त्या डोलण्यानें प्रवाश्यांना आंदुळल्या-गत वाटतें. आणि पडल्या पडल्या त्यांचे डोळे मिटतात. आपला पृष्ठभाग चिरीत जाणाऱ्या बोटींकडे आणि मचव्यां-कडे क्षमाशील संतांच्या दृष्टीनें पहातो.

— महादेवशास्त्री जोशी : ( जलदुर्गांचा राजा )

## सरोवराची शोभा

मांजर आरशांतल्या आपल्या प्रतिबिंबाशीं खेळत बसतें, त्याप्रमाणें दोन्हीं कांठांवरलीं झुडपें आपल्या पाण्यांतील प्रतिमांशीं खेळत होतीं. माशांकरितां टपून बसलेले बगळे आणि तसलेच कांहीं पक्षी वल्ह्यांचा आवाज ऐकतांच किंचित दूर उडून जात. त्यांना उडतांना आणि पुन्हां ध्यानस्थ बसतांना पहाण्यांतही एक प्रकारची गंमत होती. आईचा पदर धरून लडिवाळपणानें लहान मुलांनीं बागडावें त्याप्रमाणें लाटा कांठांशीं नाचत होत्या. आकाशांत नुकत्याच रंगूं लागलेल्या ढगांपैकीं एकाद्याचें पुसट प्रति-बिंब पाण्यांत दिसे.

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

* आपल्या सणांतूनहि आपल्या संस्कृतीचें प्रतिबिंब दिसत असतें.

— साने गुरुजी

## समुद्राची लीला

जहाजाच्या कडेवर उभें राहिलें म्हणजे तर त्या प्रचंड लांकडी-लोखंडी द्रोणाचें कौतुक वाटतें. त्याच्या बाजूला पहात गेलें म्हणजे ओळीनें खालील देखावे दिसतात. प्रथम फेसाळलेला प्रचंड डोह. या डोहावर लाटा उठून फुटतात, तेव्हां निळ्या मखमलीच्या रुजाम्याचा कोणी राक्षस चोळा-मोळा करून टाकीत आहे व त्यांतून सागरसुंदरीच्या गळ्यांतील अनेक लहान मोठ्या मोत्यांचे हार तुटून मोतीं घळघळून खालीं येत आहेत कीं काय असा अद्‌भुतरम्य देखावा दृष्टीस पडतो. आगबोटीच्या धारेनें तुटणाऱ्या लाटांचे तुषार क्वचित् अंगावरहि येतात व त्यांवर तिरपे सूर्यकिरण पडलें म्हणजे धांवत्या इंद्रधनुष्यांची शर्यत पहावयास सांपडते.

— न. चिं. केळकर : ( विलायतचीं बातमीपत्रें )

## धक्क्यावरून दिसणारा विजयदुर्ग

बंदर–धक्क्यावर येऊन आम्ही पुन्हां सिंधु–दुर्गाचें सिंहावलोकन केलें. तिथून तट दिसत होता आणि आंतल्या माडांचे हिरवे शेंडे, बारक्या होड्या आणि गलबतें त्याच्या परिसरांत फिरत होतीं. भोंवतीं दरिया नाचत होता. मला वाटलें, हा दुर्ग नव्हेच; हें सागरांत उमललेलें हिरव्या केसरांचें कृष्णकमळ आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

* संवय, परंपरा या माणसाच्या जीवनांतील फार मोठ्या शक्ति आहेत.

— वि. वा. शिरवाडकर

## बोटीवरून दिसणारा कोंकणकिनारा

उजवीकडे पहायचा कंटाळा आल्यावर डाव्या अंगाला वळलों. तिकडे भार्गवरामानें निर्मिलेली ती कोंकणपट्टी सारखी मागें सरकत होती. कुठें वाळवंटाचा पांढुरका पट्टा दिसे. जणूं भार्गवरामानें तिथें आपलें उत्तरीय वाळत घातलें आहे. कुठें डोंगर-टेंकड्या समुद्रांत पाय धुवायला आल्यागत वाटत. सागरबाप्पा त्यांना धडका देत म्हणे, 'चला, हटा मागें. माझ्या लाटांना लोळा-खेळायला इथें मऊ मऊ पुळण बनवायची आहे मला.' कुठें डोंगराला वळसा घालून पाऊल न वाजवतां पुढें उमटून समुद्राला भेटायला आलेल्या खाड्या दिसत. मधेंच एकाद्या खाडीच्या कांठीं डोंगर-माथ्यावर तट किंवा बुरूज असे दुर्गांचे अवशेष लक्ष वेधीत. मधेंच हिरवें रान, मधेंच डोलत्या नारळीच्या बागा, मधेंच रुक्ष मरुभूमि अशीं दृश्यें आलटून पालटून पुढें येत.

— महादेवशास्त्री जोशी : ( जलदुर्गांचा राजा )

## निसर्गाचा जन्म-मृत्यु

विश्वकर्म्यानें स्वाहा म्हटलें; पर्जन्यवात सुरू झाला, धो धो पाणी वाहूं लागलें. त्यानें पुनः स्वाहा म्हटलें; डोंगराच्या धशी कोसळल्या, माती धुपली, मळई बनली, वनस्पती पोसली. पानें, फुलें, फळें, बीं निर्माण झालीं. अन्नाचा प्रभव झाला. प्रकृतींतून अनंत रूपें निघालीं. त्याच विराट पुरुषानें पुन्हां स्वाहा म्हटलें; पानें गळूं लागलीं; गवत वाळूं लागलें; शेतकरी भात कांपूं लागले.

— र. वा. दिघे. ( सराई )

## बंदरावरील धांदल

दक्षिण आफ्रिकेहून आलेली मेल-बोट धक्क्याला नुकतीच लागली असल्यामुळें बंदरावर जिकडे तिकडे एकच गर्दी उसळली होती. दोन मैत्रिणी एकत्र याव्या व एकीला आपलें मूल कौतुकानें द्यावयाची व दुसरीला तें तितक्याच कौतुकानें घ्यावयाची घाई व्हावी, त्याप्रमाणें ती बोट व बंदराची जमीन यांची अवस्था झाली होती. अथवा एकीच्या कडेवरून झांप टाकून दुसरीच्या खांद्यावर जाणाऱ्या मुलाप्रमाणें बोटींतल्या उतारूंची स्थिति झालेली दिसत होती, असें म्हणणें कदाचित् यथार्थ ठरेल. बोट व बंदर यांना जोडण्यासाठीं जो लांकडी पुलाचा कठडा टाकण्यांत आला होता, त्याच्या तोंडाशीं पोंचण्यासाठींसाऱ्या उतारूंची झुंबड उडाली होती व थोडीशी रीघ मिळतांच जो तो त्या कठड्यावरून बंदराकडे झपाझप येत होता.

— ना. सी. फडके : ( दौलत )

## समुद्रावरील सुंदर वस्तु

अनेक असंख्य सुंदर वस्तुच नव्हे तर प्राणी निर्माण करून त्यांची रेलचेल-उधळपट्टी समुद्रतीरावर चाललेली असते. एकादा हर्षसम्राट मार्गानें गेला म्हणजे सोन्यामोत्यांचीं फुलें त्यांच्यावरून उधळून टाकलेलीं जशीं त्या मार्गभर विस्कळलेलीं पडतात त्याप्रमाणें त्या शंख, शिंपा, गारा, सौंदर्याच्या कुंचलीचा एक एक अव्यवस्थित कौशल्याचा फटकारा मारून कोणी तरी उधळ्या चित्रकार त्या समुद्राच्या तटावर प्रत्यहीं उधळून टाकीत जातो.

— वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

### सागरावरील रंगकाम

तीन बाजूंनीं निळावंती हेलावत होती, आणि या सगळ्या मनोज्ञ रंगसंगतीवर मावळतीचा कललेला सूर्यनारायण सोनेरी ओघ चढवीत होता. जगन्नाथपंडिताला गंगामैय्याच्या प्रवाहांतला मासा किंवा कांसव होऊन रहावेंसें वाटलें होतें तसेंच मलाही अन्य कोणत्या तरी रूपानें त्या रंगाच्या खुलावटींत शिरून मनसोक्त डुंबावें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

— महादेवशास्त्री जोशी : ( विजयदुर्ग )

### सागरावरील क्षितिज

मीं उठून उजवीकडे नजर वळविली तर तिकडे सगळें पाणीच पाणी. सागराच्या पाटीवर आकाशमाउलीचा मायाळू हात कुठें पडला आहे तेंसुद्धां कळूं नये, इतका त्या दोन महाभूतांचा रंग एकजीव झालेला. एकाद्या दूरवरच्या गलबतानें शिडीची उभी रेघोटी ओढून दाखवावें कीं, ' हें पहा, इथें तुमचें क्षितिज आहे. यापुढचा सगळा विस्तार अनंताचा.'

— महादेवशास्त्री जोशी : ( जलदुर्गाचा राजा )

### रात्रींचा समुद्र

भोंवतालीं अंधारून आलें होतें ! सूर्य केव्हांच मावळला होता व त्याच्या मागून लाटांवर तरंगणारी प्रकाशाची स्मृतिदेखील विरून गेली होती. अंधारून आलेल्या त्या आकाश-सागराच्या विशाल शिंपल्यांत समुद्राचा गंभीर नाद तेवढा निनादत होता.

— कुसुमावती देशपांडे : ( लहरी )

## समुद्रांतील ध्वनि

ज्या दिवशीं शीतल मतलईच्या वाऱ्याच्या झुळुका वाहतात त्या दिवशीं, समुद्राच्या किनाऱ्यावर आपण वाळूंत पडलों तर, हिरव्यागार शेतांतील काळ्या-पांढऱ्या शेळयामेंढ्यांप्रमाणें अथवा आकाशांतील लहान लहान पांढऱ्या ढगांप्रमाणें आम्हांस लहान पांढऱ्या लाटा दिसतात. प्रत्येक लाट पुढें धांवत येऊन मोडत असतां लहानसा सळसळाट होतो व त्या सळसळाटांची एकुणांत जी काय असते, ती कांहींशीं लहान पक्षांच्या कुलकुलाटानें गजबजलेल्या अरण्यासारखी असते. भरतीच्या लाटांवर लाटा तासानुतास चढत येत असतात व ओहोटी लागली म्हणजे त्या तासानुतास निखरत जातात, तेव्हां त्यांचा आवाज होतो, नद्या, नाले कड्यांवरून थडथड उड्या टाकून सळसळत व खळखळत समुद्रांत घुसतात; पाण्याप्रमाणें अनेक ताना मारीत असतात व समुद्रावरील बगळे, करकोचे, गल्ल इत्यादि पक्षी कर्कश आवाजानें करकरावत असतात. एवढेच ध्वनि का थोडे झाले ?

— ह. ना. आपटे : ( करमणूक )

* चंद्र मात्र आकाशाच्या मध्यभागीं एकटाच आपल्या अस्तसमयाची वाट पहात बसलेला होता. त्याच्याकडे पाहिलें असतां स्वर्गांतील एखाद्या देवाचा हा सुवर्णमय रथ आहे कीं काय, किंवा एखादा कांचनदेही राजहंस पक्षी आकाशगंगेच्या उदकामध्यें प्रातःस्नान करून पोहत बसला आहे कीं काय असा भास उत्पन्न होई.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## बेटाची शोभा

समुद्रांत तें बेट असें शोभें कीं, जसा एकाद्या अप्सरेचा सरोवरांत बांधलेला बंगला. खरोखरच तें बेट तटाचे मानानें इतकें चिमुकलें, आटोपशीर आणि शोभिवंत दिसे कीं, क्षण-भर बेड्या पडलेल्या मनाचेंहि मनोरंजन व्हावें. दुसरीकडे अंदमानाचे समुद्रतटास लागून लांबवर व्यवस्थेनें लावलेल्या नारळाच्या झाडांच्या पंक्ति डुलत होत्या.दूरवर आंब्यांच्या, सुपाऱ्यांच्या, पिंपळांच्या वृक्षांचे पुंज दिसत होते. जवळच घाटावर मनुष्यांचे थवेच्या थवे किलबिलाट करीत जमलेले होते. त्यावरच एका चढणीचे टोंकावर नारळाच्या झुलणाऱ्या छत्राखालीं एका वर्तुळाकृति तटाच्या आंत एक भव्य भवन दिसलें. तें किती शांत दिसलें ! त्याच्या भोंवतीं नारळांची,सुपाऱ्यांचीं आणि केळींचीं वनें चवऱ्या ढाळीत होतीं, छत्र धरून उभीं होतीं.

— वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

## समुद्रकांठावरील देखावा

समुद्रावरून येणारा शीतल पण उत्साहप्रद वारा;कष्टमय संसारांतील प्रेमस्थानाप्रमाणें शेवाळ्यानें हिरवा दिसणारा जमिनीचा मधला भाग; एका पायावर तपश्चर्या करीत उभ्या राहणाऱ्या ऋषीप्रमाणें दिसणारे दूरचे निश्चल माड; सर्व देखावा मोठा शांत व सुंदर होता. रस्त्याच्या डाव्या बाजूला कंबरेइतक्या उंचीचीं कसलीं तरी फुलझाडें होतीं. त्यांच्यावर कुंड्याच्या आकाराचीं जांभळ्या रंगाचीं फुलें हंसत होतीं.

— वि. स. खाण्डेकर : ( हृदयाची हांक )

## अनंतत्वाचा अनुभव

थिएटरच्या दारासमोरच्या विस्तीर्ण मैदानावर यावेळीं एकही माणूस दिसत नव्हतें. पश्चिमेकडून येणाऱ्या गार वाऱ्याची झुळुक अंगावरून गेली, कीं दूर देशांतून आलेल्या एकाद्या मित्राची ओझरती भेट झाल्यासारखें होऊन आनंद व उदासीनता यांचें विचित्र संमिश्रण मनांत उत्पन्न होई. अंधेऱ्या रात्री असल्यामुळें वर आकाशांत तारकांचे ढीगच्या ढीग दिसत होते. समुद्राला त्या वेळीं भरती आली होती कीं काय कोण जाणें. पण किनाऱ्याच्या दगडांवर आपटणाऱ्या लाटांच्या गर्जनेचा अस्फुट ध्वनि लांब रणांगणावर उडालेल्या तोफांच्या आवाजाप्रमाणें ऐकूं येत होता. रस्त्यावरील ती शांतता, समोरचें तें विस्तीर्ण मोकळें मैदान, डोक्यावरचे ते अगणित तारकांचे तेजःपुंज समूह आणि डाव्या बाजूनें ऐकूं येणाऱ्या सागर-वीचींचा गंभीर नाद, या सर्वांमुळें त्या क्षणीं एकाएकीं अनंतत्वाच्या कल्पनेचा माझ्या अंतःकरणाला स्पर्श झाल्यासारखें मला वाटलें.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## समुद्र व महात्मा

समुद्र पाहिला कीं मला ध्येयवादी महात्म्याची आठवण होते. स्वतःचें क्षारमय जीवन मधुर करण्याकरितां तो कधींहि धडपडत नाहीं. आकाशांतील निर्जल मेघांना मधुर जल मिळावें म्हणून मात्र याचें अंतःकरण अहोरात्र तळमळत असतें.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## सृष्टिसौंदर्याचा आनंद

भावी आशांप्रमाणें दूरवर दिसणाऱ्या मनोहर गिरिराजि, सैन्याच्या निशाणाप्रमाणें भासणारीं अंतरावरील झाडें, वारा येईल तशी पाठ देऊन पुन्हां आनंदानें चंद्राकडे पाहूं लागणारें गवत, हा सर्व देखावा पाहून सुधाकरांना फार आनंद वाटला. समुद्राच्या हजारों लाटांच्या संगीताप्रमाणें हजारों पानांचा व फुलांचा एकवटलेला सुगंध त्यांच्याभोंवतीं दरवळला होता.

— वि. स. खाण्डेकर : ( कांचनमृग )

## निसर्गाचे धडे

निसर्गाचं उदात्त आणि भव्य स्वरूप पाहिलं कीं विचारांचा आकुंचितपणा झडतो, वृत्तीला एक प्रकारची भव्यता सूक्ष्मपणें येते, अंतःकरणाची भीति व दुबळेपणा कमी होऊन साहस हवंसं वाटूं लागतें.

— ना. सी. फडके : ( शकुंतला )

## वाळूवरील पावलें

ती आजहि वाऱ्याच्या झोतानें खुरटून गेलेलीं काजूचीं झाडें, नाजूक मनावर लहानशा गोष्टीचा देखील ज्याप्रमाणें मोठा परिणाम होतो त्याप्रमाणें वाळूवर उमटलेले पावलांचे मोठे ठसे, समुद्रांत दूरवर ठिपक्याप्रमाणें दिसणारें एक गलबत इत्यादि गोष्टी पहात होती.

— वि. स. खाण्डेकर ( हृदयाची हांक )

* विद्वत्तेपेक्षां सुस्वभावाला मी नेहमीं अधिक किंमत देतों.

— न. चिं. केळकर

## नदीची शांतता

' गंडकी नदी मला आपल्या शैत्य-पावनत्वानें कृतार्थ करो ' असा संकल्प म्हणून मीं या नदींत स्नान केलें. नदीच्या पाण्याला कोठल्याही प्रकारची घाई नव्हती, कसलाहि धिंगाणा घालावयाचा नव्हता. ती शांतपणें वाहत होती—जणूं काय मरणाला जिंकल्यावर भगवान् बुद्धांनीं चालविलेलें अखंड ध्यानच !

— आचार्य कालेलकर : ( बिहारची गंडकी )

## नदीच्या उपकारांची फेड

नदीचा काठ म्हणजे मानवी कृतज्ञतेचा अखंड उत्सव ! पांढरे शुभ्र प्रासाद व उंच उंच शिखरें हीच एक अखंड उपासना आहे. पण एवढ्यानें काव्य पूर्ण होत नाहीं. म्हणून भक्तगण नदीच्या तरंगांवरून देवळांतील घंटांचे नादतरंग ऐलतीरापासून पैलतीरापर्यंत पाठवीत असतात.

— आचार्य कालेलकर : ( दक्षिणगंगा गोदावरी )

## नद्यांचें कार्यक्षेत्र

गंगा स्वर्गांत असून काय उपयोग ? खालीं मैदानांत येऊन ती ओलावा देईल तरच तिची कृतार्थता. नद्या डोंगरांतच दडून बसतील तर मळे पिकणार नाहींत, आणि त्या नद्यांचाहि विकास होणार नाहीं.

— साने गुरुजी ( क्रांति )

* निष्क्रिय जीवन म्हणजे जिवंत मरण.

— ना. ह. आपटे

* संकटाला भिण्यापेक्षां त्याला तोंड देणें मर्दपणाचें आहे.

— ना. ह. आपटे

## मुलांचें राज्य

मुलांच्या सान्निध्यांत राहणें म्हणजे देवाच्या सान्निध्यांत राहणें होय. मुलांचें राज्य म्हणजे देवांचें राज्य. मुलें म्हणजे देवाघरचा बगीचा.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## गुणांची भरती

प्रसंग हा मानवी प्राण्यांच्या गुण-सिंधूला भरतें आणणारा चंद्र होय. प्रसंगाशिवाय मनुष्याच्या अंगचे गुण, वनांत सुकलेल्या गुलाबाच्या पुष्पाप्रमाणें होत.

— बॅ. वि. दा. सावरकर : ( पेशव्यांत थोर कोण ? )

## मित्राची कामगिरी

त्याला मित्र मिळाला–हृदयांतील श्रीमंती दाखविणारा मित्र मिळाला. हृदयांतील भावनांचे झरे त्याला दिसूं लागले. तो विलासांतून विकासाकडे आला, विषांतून अमृताकडे आला, पशुत्वांतून माणुसकीकडे आला. रूढीच्या चिखलांत व खोटया कल्पनांत रुतलेला त्याचा आत्महंस वर उडाला.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

* पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि चला, मुलें आणि ओढे अवखळपणानें खळखळत नाहींत असें कधीं तरी झालें आहे काय ?

— वि. स. खांडेकर

* वृक्ष म्हणजे पृथ्वीचे हजारों हातच होत. या हातांच्या प्रेमळ वेष्टणांत गांवें सुखानें नांदत. परंतु हे हिरवे हिरवे हात काटले गेले, छाटले गेले.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## तरुणांचें ध्येय

तरुण म्हणजे मोठ्या हृदयाचे, रसरसलेल्या भावनांचे, जिज्ञासु वृत्तीचे, बुभुक्षित बुद्धीचे जीव होत. ध्येयांना मिठी मारूं पहाणारे, त्यागाला कवटाळूं पहाणारे, संसारांतील चिखलांत अद्याप न बरबटलेले असे तुम्ही आहांत. अनंत आकाश तुमच्यासमोर आहे. अपार भविष्य तुमच्यासमोर आहे. तुम्ही उद्यांचे जनक आहांत, भविष्यकाळाचे विधाते आहांत.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## थोरांत थोर

रत्न म्हटलें म्हणजे तें टाकाऊ असें नसायचेंच; परंतु त्यांतल्या त्यांत कोहिनूरची दीप्ति जशी कांहीं निराळीच; किंवा देव म्हटले म्हणजे सर्व वंद्य; पण त्यांतहि महादेव जसे सर्व जगास महावंद्य होऊन बसलें आहेत; त्याचप्रमाणें ( सर्व पेशव्यांत ) कौस्तुभ-मणीचे ठायीं शोभणाऱ्या राव माधवरावांची थोरवी कांहीं विलक्षणच !

— बॅ. वि. दा. सावरकर : ( पेशव्यांत थोर कोण ? )

## संभाषणाचे गुण

संभाषणाची आकर्षकता, मार्दव व ज्ञानपूर्णता इत्यादि गुण म्हणजे मोतीं-हिरे-माणकें इत्यादि वस्तूंप्रमाणेंच अत्यंत मोलवान आहेत.

— ह. ना. आपटे : ( करमणूक )

## उपमांचा उपयोग

त्या हंड्या-झुंबरांतील मेणबत्त्यांप्रमाणें लेखनमंदिर प्रकाशित करतात किंवा सुवासिक पुष्पाप्रमाणें तें सुगंधयुक्त करतात आणि श्रोत्यांचीं मनें प्रसन्न व प्रफुल्लित करतात.

— वा. म. जोशी : ( केळकर )

## बाजीरावाचा रुबाब

बाजीरावाच्या शरीराचा प्रत्येक भाग जणूं रेखीव होता. गोंडस चेहरा, सरळ नाक, पाणीदार डोळे, उन्नत कपाळ, धनुष्याकृति ओठ, रेखीव भिवया, मर्दानी मिशा व झोंकदार केस इत्यादिकांचा सुंदर मिलाफ विधात्यानें त्याच्या ठिकाणीं घडवून आणला होता. राजतेज झळकत असलेला त्याचा प्रफुल्लित व पाणीदार चेहरा पाहून व त्याचें ऐटदार बोलणें ऐकून कोणाही माणसाला त्याच्याकडे क्षणभर पाहात रहावेंसें वाटे; व " लाखोंमें एक ! " असे उद्गार त्याच्या तोंडावाटे बाहेर पडत.

— ना. के. बेहेरे : ( बाजीराव पेशवे )

•

## मजुरांचें महत्त्व

मजूर म्हणजे का माती ? जगांत मजूर नसतील तर तुमचीं शेतें-भातें कोण पिकवील ? तुमचे मळे कोण फुलवील ? तुमचे बंगले कोण बांधील ? तुम्हांला कोठून मिळेल अन्न ? कोठून मिळेल वस्त्र ? कोठून मिळतील दुधें-तुपें ? मजूर नसतील तर कोण हांकील नांगर ? कोण हांकील मोट ? कोण खणील रस्ता, कोण वल्हवील नावा ? गलबतांत माल कोण चढवील, कोण उतरवील ? मजूर म्हणजे जगाचा प्राण, मजूर म्हणजे जगाचें जीवन. मजूर या जगाची नाडी, जगाचीं फुप्फुसें.

— साने गुरुजी : ( तीन मुलें )

* अकलेचा आला तरी, कोरड्या दुष्काळापेक्षां ओला दुष्काळच कोणीहि पतकरील.

— न. चिं. केळकर : (केसरी )

### स्वागताचे दोन प्रकार

पैसा खर्चून सरकारला विजेचे वाटेल तितके दिवे लावतां येतील, पण पाहुण्याला पाहून प्रेमकुतूहलानें स्त्री-पुरुषांचे ओंठ फुलून गेल्यामुळें आंतून झळकणाऱ्या शुभ्र दंतपंक्तींच्या चिराखदानाची शोभा हजारों विजेच्या दिव्यां-नींहि येणार नाहीं. युनियन जॅकचीं निशाणें पैशाला पासरीभर मिळूं शकतात, व तोरणें लावण्याकरितां ओर-बाडण्यास लागणाऱ्या वृक्षपल्लवांचीहि वाण या देशांत नाहीं; पण लोकप्रिय पाहुण्याला डोळाभर पाहून घेण्या-करितां जनतेच्या भुवयांनीं ज्या कमानी उभारल्या जातात तींच खरीं तोरणें !

— न. चिं. केळकर : ( केसरी )

### डोंगर-उतारावरील वैभव

भोंवतालचें दृश्य मनोवेधक आहे. भोंवतीं निळीं उंच शिखरें आहेत. त्यांच्यामधल्या खोलार्टीत गर्द झाडी आहे. त्यांच्या उताराला बिलगलेलीं गांवें आणि शेतें मधून मधून दिसतात. आणि सूर्यप्रकाशांत बिलोरी आरशाप्रमाणें चमकणारीं तळीं तेथून दूरवर दिसतात.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

### सावल्यांचा खेळ

झाडांच्या रांगांतून सूर्यप्रकाश आमच्या रस्त्यावर पडला होता आणि त्यामुळें छायाप्रकाशांच्या पट्टयांचा एक गमती-दार जिना तेथें तयार झाला होता. त्या जिन्यावरून उतरत असतां आम्हांला वाटेंत एक चढाचा मळा लागला.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## पक्ष्यांच्या रांगा

वर स्वच्छ निळ्या आकाशांत मोठाले ढग आपल्या जांभळ्या मस्तींत वाऱ्याबरोबर वहात चालले होते, आणि सूर्यकिरण ते फोडून आंतलीं रंगांचीं भांडारें उघडीं करीत होते. पक्ष्यांच्या रांगा लष्करी शिस्तींत पश्चिमेला जात होत्या. पण ती लष्करी शिस्त फार वेळ टिकत नव्हती. मध्येंच त्या रांगांत आकर्षक बांक निर्माण होत होते आणि मध्येंच त्या विस्कटत होत्या.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## बगळ्यांची रांग

आकाशांत काळे काळे पावसाळी ढग आले असावे, जरा सायंकाळ होत आली असावी, आणि मग हे बगळे उडतात. त्या आकाशाच्या काळ्या पार्श्वभूमीवर यांचें उडणें, पांढरेशुभ्र पंख पसरून जाणें फार सुंदर दिसतें. मीं कितीदां तरी पाहिला आहे तो देखावा. जणूं काळ्या फळ्यावर पांढरी रेघ काढीत आहोंत तसें तें त्यांचें उडणें वाटतें.

— साने गुरुजी : ( गोड शेवट )

## वाऱ्याला जाग आली

वर आभाळ अगदीं निरभ्र होतं आणि क्षितिजा-कडच्या टेंकड्यांवर झगझगीत तांबूस निळसर रंग दिसूं लागला होता. संध्याकाळ जवळ येत चालली असं सुचविणारा वारा झोंप संपवून संचाराला निघाल्याप्रमाणें वाहूं लागला होता.

— ना. सी. फडके : ( इंद्रधनुष्य )

## आकाशींचीं गलबतें

जान्हवीनें सहज आकाशाकडे पाहिलें. एक करकोचांची रांग आकाशांतून चालली होती. आकाशाच्या विस्तीर्ण निळ्या समुद्रांतून पांढऱ्या शुभ्र गलबतांचें हें चिमुकलें आरमारच प्रवास करीत आहे अशी जान्हवीच्या मनांत कल्पना आली. सारे पक्षी संथपणानें, एका गतीनें, एका दिलानें चालले होते. त्यांच्या शुभ्र पंखांची हालचाल कुशल नाविकांच्या वल्ह्याप्रमाणें समानतेनें होत-होती. कितीतरी वेळ जान्हवी एकाग्र दृष्टीनें त्या रांगेकडे पहात बसली.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## रानांतले पक्षी

रानांत सागाचीं पानें खुजबुजत होतीं. त्या दरींतील नितांत शांततेंत फक्त झाडांच्या सावटींतून होले, कड्या-वरून रानपारवे घुमत होते व कुपर्णींतून बुलबुल आणि काळे पक्षी आवाज करीत होते. असंख्य फुलपांखरें, भाताच्या फुलांनीं दरवळणाऱ्या सुवासिक वातावरणांत, सराईच्या दुपारचा एक मोठा तारा लखाखत होता. तो तारा नसून पाण्याचा पाघळ होता व त्यावर उन्ह पडल्या-मुळें त्याचें पाणी चमकत होतें.

— र. वा. दिघे : ( सराई )

## डोंगरांतील लेणें

लेणें तयार करतांना शिल्पकार स्वतःला विसरला होता. त्याचे हात देवाचे हात झाले होते. तें लेणें अपौरुषेय होतें. त्या दगडांतील तो वेद अपौरुषेय हातानें लिहिला गेला होता.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## नैसर्गिक क्रीडांगण

सगळीं मुलें जमल्याबरोबर निरनिराळ्या प्रकारच्या खेळांना त्यांनीं सुरवात केली. चेंडू, विटीदांडू, खोखो, आट्यापाट्या, कुस्त्या, धांवाधांवी वगैरे अनेक प्रकारचे खेळ सुरू झाले. मुलांच्या त्या खेळण्यासाठीं जमिनीनें हिरवागार गालीचा पसरला होता; आकाशानें त्यांच्यावर छत्र धरले होतें; वायु त्यांच्यावर पंखा वारीत होता; पक्षी त्यांच्यासाठीं मंजुळ गाणें गात होते आणि सूर्य त्यांच्याकडे सहास्य मुद्रेनें पाहात होता. अशा स्थितींतील या मुलांचें तें खेळणें कोणाच्या मनांत आनंदाची परमावधि उत्पन्न करणार नाहीं ?

— शि. म. परांजपे : ( सृष्टीसौंदर्य )

## उन्हाचा प्रसाद

सूर्य वर आला होता. पर्वतीच्या टेकडीच्या माथ्यावर देवळांचे सोनेरी कळस झळाळत होते. अलीकडे दोनचार मोटमोटीं पिंपळाचीं झाडें होतीं, त्यांच्या हालत्या-डुलत्या पानांपानांत हजारों प्रकाशबिंदु असे हेलकावत होते कीं जणूं दिवसाहि ज्यांचा प्रकाश पडावा अशा काजव्यांचा थवाच्या थवा त्या वृक्षावर घोंगावत होता. कॉलेजच्या मैदानाच्या कुंपणालगत शेळ्या चरत होत्या. त्यांचीं अंगें सकाळच्या उन्हांत किती नितळ दिसत होतीं.

— ना. सी. फडके : ( इंद्रधनुष्य )

* गुरु-शिष्याचें नातें हें पिता-पुत्रांहून घनिष्ट आहे.

— महादेवशास्त्री जोशी

## हिमालयाचें विशालत्व

हिमालय हा भूलोकींचा स्वर्ग, यक्षकिन्नरांचें वसतिस्थान आहें; सर्व चिंताग्नीचें शमन करील इतका तो थंड आहे; कुबेरालाहि आश्रय देण्याइतका तो धनाढ्य आहे, आणि मोक्षाची शिडी बनूं शकेल इतका तो उंच आहे.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## सिमल्याचें दर्शन

अगणित दऱ्याखोऱ्यांचीं पुडांत पुडें बसवून हिमालयाची बनावट एखाद्या गेंदेदार दीपमालेप्रमाणें किंवा पाकळीदार फुलांच्या माळेप्रमाणें केलेली आहे. सिमल्याचा पर्वत हें या एकंदर मालेंतील शेंकडों फुलांपैकीं फक्त एक फूल आहे.

— न. चिं. केळकर : ( सिमलावर्णन )

## वाऱ्याची रखवालदारी

सोसाट्यानें आलेला पाऊस सोसाट्यानेंच आतां ओसरूं लागला होता. वादळी वारा एखाद्या रखवालदाराप्रमाणें अवेळीं येणाऱ्या ढगांच्या मागें लागून त्यांना आकाशांतून पळवीत होता. सूर्य पुन्हां दिसूं लागला होता व त्याचें सोनेरी ऊन पावसाच्या धारांत भिजून पृथ्वीवर ओलें होऊन पडत होतें.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

* आमच्यासमोरच्या बाजूला बऱ्याच अंतरावरतीं काळ्या पहाडाचा एक प्रचंड सुळका आकाशांत गेलेला होता. रणकालीचा तो उग्र पर्वत जणूं एक हात उभारून कोणा तरी अज्ञात शक्तीला 'थांब' म्हणून इशाराच देत होता.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## सिमल्याची रोषणाई

विजेची रोषणाई मात्र सिमल्याला भरपूर आहे. दुरून रात्रीं बड्या सिमल्याकडे पाहिलें म्हणजे हिरे-मोत्यांचीं ताटेंच्या ताटें भरून तीं लीलेनें वर उधळून द्यावीं असा दाट विखुरलेल्या विजेच्या दिव्यांचा लखलखाट दिसतो. आणि दूर बाजूच्या टेंकड्यांवर पसरलेले तुरळक दिवे पाहिले म्हणजे आपण एकाद्या मोठ्या बंदरांत उभे असून, समोर रात्रींच्या वेळीं समुद्रांत नांगरलेल्या शेंकडों आग-बोटींचा काफिला पहात आहों असा भास होतो.

— न. चिं. केळकर : ( सिमलावर्णन )

## शिखरांची शोभा

एकादें गिरिशिखर राजमुकुटासारखें तर एकादें टेबला-सारखें, तर एकादें खुर्चीसारखें, तर एकादें सिंहासना-सारखें दिसें व अस्मानाची कुणी तारका रात्रीं त्यावर बसून रानावनावर, दऱ्याखोऱ्यांवर शिसवाचा राजदंड हातांत घेऊन राज्य करी. जेथें डोंगराला तीक्ष्ण धार आली असें लांबून वाटे तेथें डोंगरमाथ्यावर मोठमोठीं मैदानें पसरलीं होतीं. जो सुळका सुईच्या अग्रासारखा अणकुची-दार असा लांबून पाहणाऱ्यांस वाटे. त्याच्या टोंकावर मोठाले माळ होते. हिरव्या झाडींनीं मढलेलीं गिरिशिखरें निळ्या झालरीला लावलेल्या हिरव्या लोलकांप्रमाणें दिसत. कोंकणच्या बाजूला तळांत धुकें बसून राही व धुकें, निळें आकाश व लांब दिसणारा समुद्र एक होऊन जाई. त्यांत वद्य पक्षांत चंद्राचा खंड तरंगताना दिसे.

— र. वा दिघे : ( पाणकळा )

## पर्वत-शिखरें

पर्वतांचे उच्च शिरोभाग हे बहुधा सर्व उच्च वस्तूंचे गर्भाशय असतात. स्वच्छ पाण्याचे झरे पर्वताच्या शिखरांवर उगम पावतात आणि शुद्ध व दोषरहित वारे पर्वतांच्या अग्रभागावरील वृक्षवाटिकांमधूनच निर्माण होतात. त्याप्रमाणें निर्मळ, उदात्त आणि सात्त्विक विचारांचेंही जननस्थान असल्याच पर्वतांच्या शिरोभागावर पुष्कळ वेळां आढळून येतें.

— शि. म. परांजपे : ( सह्याद्रीच्या तावडींत सांपडलेली कल्पनाशक्ति )

## सोनेरी शिखरें

निसर्गानें आपल्याला असें शिकविलें आहे कीं, हिरण्यागार पानांमध्यें पिवळीं परिपक्व फळें आपली सगळी खुमारी दाखवूं शकतात. या धड्याचा फायदा घेऊन लोकांनीं झाडामध्यें मंदिर बांधून त्यावर आकाशाचें आनंत्य दाखविणारीं सोन्याचीं बोटें उभीं केलीं आहेत. प्राकृतिक शोभा मनुष्य सुधारूं शकणार नाहीं असें मानणाऱ्यांनीं हीं शिखरें एकदां पाहिली पाहिजेत.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

## डोंगर व दरी

रस्ता पर्वताच्या पोटांत शिरून त्याचा अंत पहाण्याकरितां निघाला होता. उच्च ध्येयाप्रमाणें डाव्या बाजूला डोंगर दिसत होता; अंध स्वार्थाप्रमाणें उजवीकडे दरी आ वासून उभी होती. मनुष्याच्या मनांतील नित्यकलह येथें निसर्गांत प्रतिबिंबित झाला होता.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## डोंगरांची भेट

रानसईच्या दक्षिणेस दोन भले उंच डोंगर भरतभेटी-करितां जवळ जवळ आले होते. आतां ते कड्याला-कडा, छातीला-छाती लावून, एकमेकांना भेटणार तों त्यांचे थिजून फत्तर झाले. छातीछातीचे कडे-कोट बनले. या कड्यांत एक खिंड निर्माण झाली. याच खिंडमिधून तांबडमातीचा गाडीरस्ता पोवळ्याच्या वेलीप्रमाणें गेला होता. रानसईची प्रसिद्ध सारंगखिंड ती हीच. माथ्यावर गेलें म्हणजे या हृदयाकार सारंगखिंडींतून अनंत नीलिमेचा समुद्र परमेश्वरी मनाप्रमाणें लांब लांब पसरलेला दिसतो. जणुं अवकाशाचा अर्क काढून त्याचे हें निथळ निळें रसायन हृदयाकार कांच-पात्रांत ठेवलें आहे कीं हें निळें परब्रह्म पर्वतांच्या संयुक्त हृदयपुष्पानें झेललें आहे.

— र. वा. दिघे : ( सराई )

## डोंगरावरून दिसणारी शेतीवाडी

चौथऱ्यावरून दिसणाऱ्या रम्य देखाव्यानें आमची दृष्टि बांधून ठेवली होती. खालीं खोलवर दिसणारीं शेतें सारी-पटावरील चौकोनांप्रमाणें दिसत होतीं. लहान मुलांनीं घरकूल मांडावें त्याप्रमाणें शेलारवाडी आणि जवळचीं इतर खेडीं वाटत होतीं. वरून खप अरुंद वाटणारा शेलार-वाडीजवळच्या नदीचा प्रवाह चांदीच्या लहानशा पत्र्या-प्रमाणें लकलकत होता. या साऱ्या देखाव्या वरती मावळतीला चाललेल्या सूर्याचा मंद आणि लालसर प्रकाश भुरभुरत होता.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## किल्ल्यावर खेळणारें चांदणें

आम्ही हातपाय धुवायला तिथें गेलों त्या वेळीं चंद्रिका त्या संथ जळावर तरंगत होती. गंगासागर तिच्याशीं कसलीं तरी गुपितें करीत होता. पलीकडचा बाले किल्ला त्यांतलें कांहीं आपल्या कानांत पडतें का म्हणून स्तब्धपणें आंत प्रतिबिंबित झाला होता. पश्चिमेच्या दरींत रुपेरी रसधारा सांडत होत्या तर उत्तर बाजूच्या रानावर तेंच चांदणें एकाद्या क्षौमवस्त्रासारखें पसरलें होतें.

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतीची राजधानी )

## रायगडची मूर्ति

रायगड घाटांतून दिसतो आणि महाडहूनही दिसतो. पण त्याचें सुव्यक्त दर्शन होतें तें कोंझरजवळ पोंचल्यावर. करवतीच्या दांतासारखीं किंवा नांगराच्या फाळासारखीं तीन पुढें आलेलीं टोंकें आणि मधल्या दोन खांचा असा जो थराथरांचा, कंगोऱ्याकडदोऱ्यांचा काळकभिन्न डोंगर समोर दिसतो तो रायगड. त्याला वाटल्यास तीन शिरांचा दत्तात्रेयही म्हणावें.

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतीची राजधानी )

* तिथल्या सह्यराजींत हिरवें वस्त्र नेसलेला तो काळा किल्ला म्हणजे जणूं बिल्वपत्रांच्या संभारांतून डोकें वर काढणारें शिवलिंगच. तसाच वाटोळा आणि वर चपटा असा आकार आहे त्याचा. लिंगाणा हें नांव त्यामुळेंच मिळालें आहे. त्याच्या पायथ्याशीं वस्तीही आहे. रायगडाचा तो बंधु भरत शोभतो.

— महादेवशास्त्री जोशी : ( शिवछत्रपतीची राजधानी )

## कड्यावर पसरलेली रात्र

रात्र आपली छाया पसरूं लागली. आकाशांत असंख्य तारे लकाकूं लागले. रात्रीनें वुइयाचे चंद्रकलेच्या पदराखालीं काळ्या कड्याला झांकून घेतलें. कालियाडोहाप्रमाणें काळोख काळदरींत भरून राहिला.

— र. वा. दिघे : ( सराई )

## कड्यांमधून वाहणारा प्रवाह

घबड सोंडेच्या बरोबर खालच्या बाजूला काळ्या कड्याच्या पोकळींत आधरत होती. वाऱ्याचा मोठा सोसाटा आला तर भैरवाच्या तुषारांनी अर्धी घळ ओली होई. घळीला जावयास फक्त दोन बाजूंनीं जागा होती. ती देखील निसणीप्रमाणें नीट आणि उंच ! समोरच्या बाजूनें भैरवाचा धबधबा घळीवरून पांढरी चादर वाळत घालावी असा चंदेरी पडद्याप्रमाणें सुटला होता.

— र. वा. दिघे : ( सराई )

## सृष्टीचा राजवाडा

खालून ,पाहिलें कीं काळ्या कड्यांवर काळे कडे, तांबड्या दरडींवर तांबड्या दरडी, हिरव्या रानांवर हिरवीं रानें, महालांसारखीं निळ्या आकाशापर्यंत लागून राहिलीं होतीं. तो पर्वत मयासुराच्या राजवाड्यासारखा दिसत होता व अनंत प्रतिध्वनींमुळें असंख्य गायिका त्या राजवाड्यांत हजेरी देत आहेत असें वाटलें.

— र. वा. दिघे : ( सराई )

* बुवाबाजी म्हणजे बुद्धिचा अस्त आणि भ्रमाचा उदय.

— अनंत काणेकर

## डों राचें अंतरंग

बाहेर धरणी तापली होती. डोंगर रसरसत होते. अंगाची उकडहंडी होत होती. पण पहिल्याच गुंफेंत त्या डोंगराच्या पोखरलेल्या पोटांत जेव्हां आम्ही शिरलों, तेव्हां यंत्राच्या साह्यानें हवामान समधात राखणाऱ्या एकाद्या प्रेक्षागृहांतच जणुं आम्ही प्रवेशलों असें वाटलें.

— महादेवशास्त्री जोशी ( पाषाणपुष्पें )

## डोंगरी वाट

सकाळच्या कोमल प्रकाशानें रणकालीच्या कठोर स्वरूपांतहि कांहीं मृदुलता आलेली होती. उंच काळ्या पहाडांवरून सोनेरी प्रकाश जागोजाग पाण्यासारखा झिरपत होता आणि कुठें उन्हांतून, कुठें छायेंतून, कुठें झाडां-झुडुपांतून तर कुठें काळ्याभोर खडकांतून जाणारी नागमोडी अरुंद वाट, विविध रंगांचे रेशिम एकत्रित केलेल्या लडीसारखी डोंगराच्या शरीरावर पडलेली दिसत होती. वाऱ्याचा हळुवार आणि स्नेहमय स्पर्श सर्व चराचराला होत होता.

वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## दरींत डोकावणारा चन्द्र

पश्चिमेकडील डोंगर पांढरे दिसूं लागले, कारण काळ्या कड्यामागून चंद्रोदय होऊं लागला. यमुनेच्या प्रवाहावर गंगेचा प्रवाह पसरावा तसें दरींतील काळोखावर काळ्या कड्यामागून पडणारें चांदणें पसरलें.

— र. वा. दिघे : ( सराई )

## माडांची पलटण

मलबारची सपाट किनारपट्टी म्हणजे माडांची एक गर्द राई आहे. उंच गेलेलीं खोडें आणि वरचे झुपकेदार शेंडे ! वावभरदेखील जागा मोकळी न सोडतां ते सर्वत्र वाढत असतात. रांगा धरून त्यांच्या पलटणीच्या पलटणी सर्वत्र उभ्या असतात. घरांच्या भोंवतीं ते वाढतात, बॅक वॉटर्सच्या कडेला वाढतात, बॅक वॉटर्सच्या विस्तारांत जमिनीनें जरा कुठें डोकें वर काढलें कीं त्यावरदेखील ते एकटे दुकटे वाढतात. शेकडों माड ! हजारों माड ! नजरेचा टप्पा संपतो पण माड संपत नाहींत. दुसऱ्या वनस्पती वा झाडें नजरेंत भरत नाहींत. जवळून पाहिलें म्हणजे अलग दिसणारे त्यांचे शेंडे दूर पहावें तसतसे परस्परांत मिसळून जातात, आणि त्या शेंड्यांचा समुद्र क्षितिजापर्यंत पसरलेला दिसतो, चोहों बाजूंनीं उसळतो, आपल्याला गिळूं पहातो.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## झांवळ्यांतून खेळणारें ऊन

खालच्या झांवळ्या खोडाला घट्ट पकडून आपलीं बांकदार अंगें पेलीत असतात. एक डौलदार झुपका गुंफतात; दुसऱ्या माडांच्या झांवळ्यांवर आपलीं पिंवळसर अंगें घासतात. त्यांच्या पात्यांच्या फटींतून उन्हाचे कवडसे खालीं ठिपकत असतात. कातरलेल्या सावल्यांची पखरण जमीनीवर पसरते आणि फटींतून जाणाऱ्या किरणांचें रंगीत विणकाम त्या झांवळ्यांच्या पाल्याभोंवतीं होतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## खेड्यांतील लक्ष्मी

आपल्या खेड्यांतील सारी लक्ष्मी येथून उठून शहरांत जाते. बापाच्या घरून उठते व बाहेर चालती होते. ह्या गांवलक्ष्मीचा पाय खेड्यांत ठरत नाहीं. ती शहराकडे धांव घेते. जसें डोंगरावर पाणी भरपूर पडतें, परंतु तें तेथें टिकतें का ? तें चारी बाजूंनीं धांवत सुटतें. पुन्हां डोंगर कोरडा, उघडा, बोडका, उभा तो उभा ! खेड्यांतील लक्ष्मी अशी चार दिशांनीं धांवत सुटते, शहराकडे धांव घेते. हिला जर पायबंद घातला तर खेडें सुखी होईल.

— विनोबा भावे : ( गांवलक्ष्मीची जोपासना )

## शेतीची थोरवी

लेखणीनें चितारलेला ध्येयवाद आणि तरवारीनें गाजविलेलें व्यावहारिक शौर्य यांचा सुरेख संगम नांगरांत झालेला आहे.

— ज. के. रानडे : ( धरणीमाता )

## शेतकऱ्याची कर्तबगारी

लक्ष्मीचा एक कणहि मिळविण्याचें सामर्थ्य कोणत्याहि पंडिताच्या तोंडपाटिलकींत नाहीं; कोणत्याहि दांडगोबाच्या दंडुक्यांत नाहीं किंवा कोणत्याहि राजराजेश्वराच्या शिक्क्यांत नाहीं. विष्णूच्या कृपेचा पाऊस पडेल तेव्हांच लक्ष्मी प्रगट होईल; पण शेतकऱ्याच्या प्रयत्नाचा नांगर चालल्याशिवाय विष्णूची कृपा होणेंहि अशक्य आहे. अंगांतून घामाच्या धारा काढाव्या तेव्हांच पर्जन्याच्या धारांची वाट पहावी.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## शेतावरील गुऱ्हाळ

उंसाच्या चिपाडांचा जळण्यासाठीं तयार ठेवलेला तो प्रचंड ढिगारा, काहिलीच्या खालच्या मोठमोठ्या चुलवणांत पेटलेल्या आगीच्या त्या ज्वाला, ढिगाऱ्यांतून चिपाडं ओढण्यासाठीं चुलवणाच्या तोंडाशीं उभ्या राहिलेल्या इसमांच्या ज्वालांच्या प्रकाशांत भेसूर वाटणाऱ्या आकृती, वरच्या मोठमोठ्या काहिलींत शिजणाऱ्या रसांतून उठणारी वाफ, रस गूळ होण्याइतका तयार होण्याची वाट पहात काहिलीभोंवतीं उभे राहिलेले लोक, त्या उकळत्या रसांत हात घालून रसाची गोळी बोटावर फिरवून रवा आला कीं नाहीं याचा निर्णय देणारा एकाद्या जादूगारासारखा वाटणारा पण चर्येनं व वेषानं गबाळा असा तो " शिदबा ", काहील जंपून उतरून चौकांत आडवी करण्याच्या वेळीं त्या लोकांकडून होणारा "श्री गुरुदेवदत्त" असा जयघोष, ऊंस, गूळ, मळई, चिक्की, शेंगदाणे इत्यादींचा सारखा फराळच चालविणारीं साऱ्या गांवांतलीं जमलेलीं पोरंसोरं आणि थोर माणसें, आणि या एकंदर चमत्कृतिमय देखाव्याला पार्श्वभूमीसारखा वाटणारा अव्याहत चालू असलेला इंजिनचा " झक् झक् झक् झक्" असा आवाज, या सर्व गोष्टींचा शकुंतलेच्या मनाला विलक्षण मोह वाटला.

— ना. सी. फडके : ( शाकुंतल )

* शेतकरी राष्ट्रांतल्या अन्नाचा पुरवठा करणारा; शेतकरी मिजासी लोकांच्या हौशी पुरविणारा; शेतकरी सरकारचा पाया; शेतकरी राष्ट्राचा अभिमान; शेतकरी देशाचें सौभाग्य.

— धनुर्धारी : ( पिराजी पाटील )

## सृष्टीची उदारता

पृथ्वी तरी कांहीं कमी का उदार आहे? एकपट जर तिच्यांत पेरलें तर त्याच्या शंभरपट तुम्हांला ती परत करणार; शिवाय जेथें साधेल तेथें हिरवळीचे गालिचे पसरून आणि डोंगरांत रुपेरी पाण्याच्या माळा सोडून रसिकांना रंजविणार ती वेगळीच.

— वि. पां. दांडेकर : ( दिलदारपणा )

## हिरवा संसार

पाऊस आला म्हणून का विघ्न मानायचें? उलट हें शुभ चिन्ह कां समजूं नये? तो पाऊस अपशकुनी नव्हता. तप्त पृथ्वीला शांतवायला तो भरभरून येत होता. पृथ्वी आज शांत होत होती, प्रसन्न होत होती. तिच्या अंगावर रोमांच थरारत होते. पृथ्वीचा संसार हिरवा हिरवा होता. सुकलेले झरे वाहूं लागणार होते. सर्वत्र चैतन्यकळा फुलणार होती नद्या नाचूं लागणार होत्या. पर्वत हिरवे पोषाख चढवणार होते.

— साने गुरुजी : ( संध्या )

* ही एक निमुळती टेंकडी काळदरींतील खलाटीच्या बरोबर मध्यभागीं आहे. टेंकडीवर पायथ्यापासून शिखरा-पर्यंत हिरवीचार गर्द झाडी आहे. जेव्हां पावसाळ्यांत एकतळीं भाताची खलाटी टेबलावरील हिरव्या बनाती-प्रमाणें लुसलुसते तेव्हां ती टेंकडी टेबलावरील टांचण्या ठेवण्याच्या हिरव्या गिरदीसारखी शोभूं लागते. त्या टेंकडी-वर खूप जाळ्या माजल्या होत्या

— र. वा. दिघे : ( सराई )

## तुऱ्यांवरील लाटा

उजव्या बाजूस नदीच्या कांठावर उन्मत्तपणें वाहत असल्यासारख्या दिसणाऱ्या काश तृणाच्या शुभ्र तुऱ्यांचा प्रवाह दूरवर जातांना दिसला. नदीच्या पाण्यांत उन्माद होता, पण त्यावर लाटा नव्हत्या. या तुऱ्यांच्या प्रवाहानें वाऱ्याबरोबर संगनमत केल्यामुळें तो हव्या तेवढ्या लाटा उसळवूं शकत होता. दृष्टि पोंचेल तेथवर पाहिलें—आणि दृष्टीची पोंच येथें कमी कां असेल? पण तुऱ्यांचा प्रवाह आपला चाललाच होता! गोदावरीच्या प्रवाहासारख्या प्रवाहाबरोबर स्पर्धा करतांना त्याला संकोच वाटत नव्हता— आणि त्याला संकोच तरी कां वाटावा? गोदावरीमातेच्या विशाल पुलीनावर त्यानें तिचें थोडें का स्तन्यपान केलें आहे?

— आचार्य कालेलकर : ( दक्षिण-गंगा गोदावरी )

## गवत पसरलें चोहींकडे

सभोंवार कोथिराच्या आणि पोह्याच्या गवताचा समुद्र वाऱ्यानें लहरत होता. गवती माळानें कापलेल्या आकाश-रेषेवर कुरडूचीं फुलें डुलत होतीं. चंडोल अर्ध्या आकाशांत आलाप घेत होता.

— र. वा. दिघे : ( सराई )

* दहिंवरलेल्या गवतावर असंख्य दंवबिंदु मोत्यांप्रमाणें चमकत होते. गवतांतील झुडुपांवर हिरवेनिळे कोब रत्नांच्या झुबराप्रमाणें लकाकत होते. त्या मोत्यांच्या वाळवणांतून एक चिमकुली वाट गवत मोडीत गेली होती.

— र. वा. दिघे : ( सराई )

## भाताच्या पिकामागील कष्ट

जिच्याकरितां शेंतकऱ्यांनीं बारा महिने कष्ट केले ती ही सराई. जिच्याकरितां घरांतील पोरीबाळींनीं रानोमाळ हिंडून शेणाचा राब मिळवला, बाप्या गड्यांनीं उरापोटावर टहाळ कापला, औतकी केली, जमीन सारखी ओढून मुशी पाडल्या, खाडी भरून बांध घातले, म्हशे ठेवले, धूळपेरे केले, बेंबट पिळून नांगर हांकला, चिखलांत हात-पाय कुजून नखें उडेसतोंवर लावणी-बेणणी केली, शेतांत गवताची काडी कुठं दिसूं दिली नाहीं, आगोटीपासून पावसाच्या धूम धारेंत भिजल्या अंगानें भातशेतीची मशागत केली, ती ही सराई.

—र. वा. दिघे ( सराई )

## तृणाचें सौंदर्य

बा तृणा, तूं तपोवनांची तपोभूमि आहेस, मृगांची आरामशय्या आहेस व थकलेल्या भागलेल्या मानवांचें विश्रांतिस्थान आहेस. कंदुकक्रीडा वगैरे करणाऱ्या थोरा-मोठ्यांची तूं प्रिय वनस्थली आहेस. सर्व जगांतील उपवनें, उद्यानें व पुष्पवनें यांचा तूं राजा आहेस.

– साने गुरुजी : ( तृणाची थोरवी )

* स्वच्छ पाण्यानें भरलेल्या शेतोड्या आरशाच्या तुकड्यां-प्रमाणें चमकत होत्या. त्यांतून कडेचे हिरवे बांध आरशाच्या मखमली चौकटीप्रमाणें प्रतिबिंबित झाले होते. त्यांतून काळा कडा व इतर गिरिशिखरें यांच्या पडछाया तरंगत होत्या.

—र. वा. दिघे : ( सराई )

## धुळीचें वादळ

हिंमतपूरच्या दक्षिण, पश्चिम आणि उत्तर अशा तिन्ही दिशांना उभ्या असलेल्या उंच डोंगरांच्या भिंतींवर धडक घेऊन परतणारा वादळी वाऱ्याचा एकएक प्रचंड सुस्कारा पूर्वेकडच्या खोऱ्यावरून रागानं घोंघावूं लागला होता, आणि पाण्याच्या एका धारेचे फुटून तुषार उडावेत त्याप्रमाणें वायूच्या एकेक फूत्कारांतून कित्येक वावटळी निर्माण होऊन त्यांचे उंच उंच स्तंभ भिंगरीसारखे फिरत शीघ्र गतीनें सैरावैरा धांवत सुटले होते. पालापाचोळा, माती, केरकचरा, जें सांपडेल तें जमिनीवरून उचलून घेऊन हवेंत चक्राकार फिरवीत उंच फेंकणाऱ्या त्या अगणित वावटळींनीं सारा प्रदेश धूसर करून टाकला होता. जणूं कित्येक मस्त मोकाट हत्ती पाण्याऐवजीं धुळामातीच्या चुळा सोंडेंतून फेंकीत धांवण्याची विचित्र क्रीडा करीत सुटले होते. लहानमोठ्या वृक्षांचे माथे या हत्तींच्या सोंडांनीं मुरगळून गदगदा हालविले जात होते.

— ना. सी. फडके : ( झंझावात )

## वाऱ्यानें डोलणारीं रानें

सोनेरी भातावर सोनेरी उन्ह पडलें होतें. वाऱ्याच्या झुळुकींत खाचरांतील भाताचीं लोंबरें,। बांधावरचीं अर्धीं पांढरीं, अर्धीं लाल कडूचीं फुलें डुलक्या घेत होतीं. वाऱ्यानें वांकलेल्या गवताचे तुरे वाफ चालल्याप्रमाणें दिसत. गवताच्या लाटा, सशांचीं खिल्लारें पळावींत अशा, टेंकड्यां-वरून उठत होत्या.

— र. वा. दिघे : ( सराई )

## वावटळीचे प्रताप

या झंझावाताच्या तडाक्यांत हिंमतपुरांतील घराघरावरचीं कौलारं उस्कटलीं गेलीं होतीं. तीन मैलांवर असलेल्या स्टेशनलगतच्या गुदामावरचे पत्रे वावडीसारखे उडत येऊन हिंमतपूर गांवच्या सीमेपाशीं येऊन पडले होते. गवत, वाळत घातलेले कपडे, हिंमतपूरच्या आठवड्याच्या बाजारांत आलेल्या मिरच्या—अशा वस्तू तर कागदाच्या कपट्यांप्रमाणें एकेका वावटळीच्या मगरमिठींत सांपडून आकाशांत कोठल्या कोठें भिरकावल्या जाऊन तरंगत राहिलेल्या होत्या.

— ना. सी. फडके : ( झंझावात )

## थकलेला वारा

झंझावाताच्या या तांडव नृत्यामुळें आकाशांतल्या ढगांनाहि भ्यालेल्या सैनिकांप्रमाणें पळतां भुई ( ! ) थोडी झाली होती; आणि पळ काढणाऱ्या सैनिकांची शत्रूनं कत्तल केली कीं रक्ताच्या चिळकांड्या उडाव्या, त्याप्रमाणें बेहोष झालेल्या वाऱ्यानें जेव्हां एक एक ढग फोडायला सुरवात केली तेव्हां पाण्याच्या चिळकांड्यांचे टपोरे थेंब भूपृष्ठावर गळूं लागले होते. मग पिसाळलेला वारा शांत झाला होता. जंगलभर थैमान घातल्यानंतर श्रमून जाऊन वनराजानें गुहेंत प्रवेश करावा आणि आपल्या अंगाचें धूड जमिनीवर फेकून द्यावं त्याप्रमाणें सैरावैरा धावणारा तो वारा कोठें दूर जाऊन थकून आडवा झाला होता कुणास ठाऊक !

— ना. सी. फडके : ( झंझावात )

## हिरवी संपत्ति

आम्ही वरवर जात होतों तसतसा वनप्रदेश किती हिरवा आणि किती ओला होत होता ! डोंगरांच्या कड्यांवरून हिरवी संपत्ति खालीं दऱ्यांत कोसळली होती, उतारांवर अडकली होती, रस्त्याच्या कडेला बिलगली होती. तिचे ढीगच्या ढीग अस्ताव्यस्तपणें जिकडे तिकडे पडले होते. विद्युल्लतेच्या लत्ताप्रहारानें नीलगिरीच्या मस्तकावर कोसळलेलें हें वैभव पावसांत नहात होतें, सूर्यप्रकाशांत चमकत होतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## निवांत स्थळ

किती शांत आणि मनोहर स्थळ होतं तें ! जणूं कोणत्याहि प्रकारच्या अस्वस्थतेचा, धकाधकीचा, द्वेषाचा, आक्रोशाचा आणि दुःखाचा संपर्कहि त्या स्थळाला कधीं झाला नव्हता व आजहि होत नव्हता. भोंवतीं अगर शेजारीं असे प्रकार घडले आणि घडणार आहेत त्याची त्या स्थळाला मुळींसुद्धां जाणीव नव्हती ! एकादं मुग्ध बालक आपल्या पाळण्यांत झोपीं गेलेलं असावं त्याप्रमाणें सृष्टिशोभा डोंगरमाथ्याजवळच्या एकान्त संपुटांत मजेनं डोळे मिटून पडलेली होती.

— ना. सी. फडके : ( शाकुन्तल )

* आतां उजाडलें. सुंदर प्रकाश पसरला होता. रमणीय देखावा. सारी सृष्टि न्हाऊनमाखून विश्वंभराच्या पूजेला जणूं उभी होती.

— साने गुरुजी : ( संध्या )

## सृष्टीचें सौंदर्य

मधेंच एके जागीं तिळाच्या फुलांचा विस्तीर्ण पिवळाधमक गालिचा एका उंचवट्याच्या पायथ्याशीं पसरलेला दिसला. वांझोट्या जमिनीही पुरुष पुरुष उंच वाढलेल्या रानगवताच्या पिवळसर हिरव्या रंगांत झांकलेल्या होत्या. लहान–मोठ्या खळग्यांत साचलेल्या गढूळ–लाल पाऊसपाण्यांत कांठावरच्या झाडाझुडपांचीं प्रतिबिंबं वाईट कांचेच्या आरशांत पडावीं तशीं पुसट पुसट पडलेलीं होतीं आणि वर ढगांची धांवपळ चालू होती. त्यामुळें छायाप्रकाशाचे केवढाले तरी पट्टे चपळ, खेळकर मुलाप्रमाणें जमिनीवरच्या या रंगीबेरंगी गालिच्यावरून पुढें पुढें सरकत होते.

— ना. सी. फडके : (प्रतिज्ञा)

## गाडींतून दिसणारी सृष्टि

भाद्रपदाचे दिवस. दररोज दुपारीं ढग जमून येत व चाराच्या सुमारास पावसाला सुरुवात होई. आकाश अंधारून येई व त्या मालवत्या निळ्याखालीं शेतांतल्या रोपांच्या ओळी जास्तच गर्द हिरव्या दिसत. क्षितिजापर्यंत पसरलेल्या, पावसानें उल्हासलेल्या अशा शेतांच्या विस्तारामधून एक पॅसेंजर गाडी आपल्याच उन्मादांत चालली होती. तिचीं फिरतीं चाकें आपल्या गतीनें जणूं आपल्या खालच्या त्या हिरव्या तबकडीलाही गति देत व गोल गोल फिरायला लावीत आणि म्हणूनच आंत बसलेल्या माणसांना क्षितिजापर्यंतचा चपटा भोंवरा गिरगिरतांना दिसे.

— कुसुमावती देशपांडे : (पिठोरी अमावास्या)

**खेड्यांचें सामर्थ्य**

पाताळांत शेष आहे व त्याच्या डोक्यावर पृथ्वी आहे असें आपण समजतों. तो फणा हलवतो—भूकंप होतो असें म्हणतात. हा कोणता शेष? सात लाख खेड्यांत खालीं दडपलेला शेतकरी म्हणजे हा शेष! हा खालचा पाताळांत दडपलेला किसानांचा कोट्यवधि फणांचा शेष जर जागा होईल व जरा फूत्कार करील तर प्रचंड भूकंप होतील, साऱ्या साम्राज्यशाह्या नष्ट होतील, सारे जुलूम जमीनदोस्त होतील.

— साने गुरुजी : ( श्याम )

**उजाड गांव**

देवळांतून गांवाकडे पाहिलें तर गांवांत उभी अशी एकहि भिंत शिल्लक दिसत नाहीं. जुन्या अवशेषांवरून गांवाची मांडणी अगदीं वेडीवांकडी असावी असें वाटतें. गांवाच्या चार आळ्या किंवा पेठा मारुतीच्या देवळा-समोरील पटांगणांत येऊन मिळालेल्या दिसतात. घरांच्या जोतांच्या रांगा विराट पुरुषानें फराळ करून रिकाम्या केलेल्या नैवेद्याच्या ताटाच्या पंक्तीप्रमाणें दिसतात. त्या घरांत राहणाऱ्या मनुष्यांचा कालपुरुषानें संहार केला होता काय?

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

*पडक्या ओट्यावर कशीबशी उभी असलेली एक पडकी, जळकी भिंत आणि दरिद्री मातेच्या सभोंवार तिचा पोरवडा असावा त्याप्रमाणें त्या भिंतीच्या आश्रयानें इतस्ततः पडलेले दगडमातीचे ढीग—एवढेंच त्या घराचें आजचें स्वरूप होतें.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## कोंदणांतील तलाव

हा विस्तीर्ण तलाव गांवाच्या बाहेर, वनश्रीच्या कोंदणांत बसलेला आहे. तेथलें वातावरण निवांत आहे. दूरवर निळ्या डोंगरांची एक छोटीशी रांग आहे. तेथपासून वृक्षांच्या झुबक्यांत आणि शेतांच्या चौकोनांत अनेक छटा लेवून तलम हिरवळ पसरलेली आहे. (निदान आम्ही पाहिलें तेव्हां ती पसरलेली होती.) जवळ नजर आणावी तसतसे माड आणि इतर वृक्ष परस्परांपासून अलग होतात. तलम हिरव्या पार्श्वभूमीवर त्यांच्या खोडाचा काळा जूनपणा नजरेंत अधिकच भरतो. मग नजर त्याच्या हिरव्या पर्णसंभाराच्या दिशेनें वर चढते आणि तेथून त्या विस्तीर्ण तलावाच्या संथ हिरव्या पाण्यांत अलगपणें तेलाच्या थेंबासारखी पडते-त्याच्या पृष्ठभागावर सर्वत्र पसरते.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## लोणावळ्याचें लावण्य

लोणावळ्याची मजेदार हवा, सलगी होण्यापूर्वी एक-मेकांशीं जरा संकोचानें पण लवकरच हातांत हात घालण्याच्या इच्छेनें वागणाऱ्या बालकाप्रमाणें फार दूरदूरहि नाहीं व फार जवळजवळहि नाहींत असें बसलेले लहान-मोठे बंगले, कोणाचें भय न बाळगतां खुशाल ऊन्ह खात उघड्या मैदानावर येऊन पसरलेल्या सर्पाप्रमाणें लांबसडक लहानमोठे रस्ते, रस्त्यांच्या दुतर्फाचे वृक्ष व त्यांवर किलबिलाट करणारे पक्षी आणि सभोंवार एकदोन मैलांच्या टापूंत जिकडेतिकडे दिसणारी डोंगर-पठारांची वनश्री,

— ना. सी. फडके : ( दौलत )

## नदीचीं मुलें

लहानमोठ्या नावा म्हणजे नदीचीं मुलें. आईचा स्वभाव ओळखून घेतल्यानंतर तिच्या मांडीवर वाटेल तशी तीं नाचलीं तरी त्यांना कोण अडविणार ? पण मुलांची उपमा नावांना देण्यापेक्षां प्रवाहांत ठिकठिकाणीं फिरणाऱ्या भोंवऱ्यांना देणें अधिक योग्य होईल. ते घटकेंत दिसत, प्रचंड तुफान करण्याचा आविर्भाव करीत आणि लगेच दुसऱ्या क्षणीं हंसू लागत. ते वाटेल तेथून येत आणि वाटेल तिकडे जात.

— आचार्य कालेलकर : ( दक्षिणगंगा गोदावरी )

## प्रवाहाचा पराक्रम

डोंगरांतून रेल्वे नेण्यासाठीं त्यांत बोगदा तयार करण्यांत येतो, तसाच एका आग्रही प्रवाहानें ही सबंध टेंकडी आरपार फोडून आपला रस्ता तयार केला होता. नाहीं. ही उपमा चुकीची होईल. लांकूड किंवा पोरबंदरी इमारती–दगड कापतांना करवत खालीं खालीं उतरत जाते तशी ह्या झरण्यानें ती टेकडी कापून काढली आहे. ह्यांत युक्ति नाहीं. केवळ हा सत्यसृष्टींतील एक खेळ आहे.

— आचार्य कालेलकर : ( गुच्छुपाणी )

## वाढत जाणारा प्रवाह

संकटांतून विजय मिळवून बाहेर पडलेलें राष्ट्र जसें वैभवाच्या नवीननवीन छटा दाखवीत चहूं बाजूस समृद्धीचा फैलाव करीत जातें, तद्वतच गोदावरीचा प्रवाह पर्वतामधून निघून आपल्या पूर्ण गौरवानें येत असलेला दिसत होता

—आचार्य कालेलकर : ( दक्षिणगंगा गोदावरी )

## प्रवाहांतील बेटें

गोदावरींतील बेटें प्रसिद्ध आहेत. कित्येक बेटें जुन्या धर्माप्रमाणें स्थिररूप होऊन बसलीं आहेत. पण पुष्कळशीं कवीच्या प्रतिज्ञेप्रमाणें दरखेपेस नवीन नवीन स्थान पसंत करतात आणि नवीन नवीन रूप धारण करतात. त्यांच्यावर अनासक्त बगळ्याशिवाय दुसरें कोण उभे राहणार ?

— आचार्य कालेलकर : ( दक्षिण गंगा गोदावरी )

## उन्हांतील प्रवाह

गव्हाच्या रव्यासारख्या पांढऱ्या रेतीवरून स्फटिका-सारखें पाणी वाहत आहे आणि वरून भास्कराच्या प्रतापी किरणांचा वर्षाव होत आहे. या शोभेचें वर्णन कोणास करतां येईल ? जणुं रौप्यरसाची कोठी भट्टीचा ताप असह्य झाल्यामुळें फुटली आहे आणि आंतला रस वाट फुटेल तिकडे वाहूं लागला आहे.

— आचार्य कालेलकर : ( पिनाकिनी )

## प्रवाहांची शोभा

या हिरवळींतून पाण्याचे पांढरेशुभ्र असंख्य प्रवाह पाऱ्याची खाण लागल्यासारखे वाहूं लागले. जणुं अनंत नागकुळें वासुकीच्या भेटीकरितां पाताळाकडे निघालीं आहेत. भैरव धबधबा प्रचंड जलघोष करूं लागला. भैरवा-सारखे आणखी किती तरी लहानमोठे धबधबे रानसईच्या डोंगरावरून जलतरंग वाजवीत होते. त्यांची शोभा किती वर्णावी !

— र. वा. दिघे : ( सराई )

## फोंफावलेला पूर

तांबड्या लाटा हिंदकळत वेगानें जात होत्या. असंख्य भोंवरें भिरभिरत आडवेतिडवे सरकत होते. खोलीचा अंदाज करणं अशक्य होतंच, पण पुराचें पाणी वाढत आकाशापर्यंत चढणार कीं काय असा भास होत होता. तो कान फोडणारा आवाज अन् प्राण वाहून नेणारा प्रवाह कधींच कमी होणार नाहीं असं वाटत होतें. मोकाट सुटलेले असंख्य उन्मत्त हत्ती, पाण्याचं रूप घेऊन पळत सुटलेले विक्राळ राक्षस, मृत्युदेवानें सोडलेली शेवटची संहारक शक्ति थैमान घालीत आहे असं वाटत होतं.

— अरविंद गोखले : ( पुराचें पाणी )

## शेतांतील नदी

पावसाळ्यांत या प्रदेशांत असंख्य नदीनाले नागिणीची नुकतीच वीण झाल्याप्रमाणें पदोपदीं आडवे जातात. हिंवाळ्यांत काळ्या वावरांतून व नदीकांठच्या गाळपेरांतून तजेलदार शाळूचीं ताटें डोलतात व त्या शाळूमधून कपेरेची धार, पायांत पैंजण घातलेल्या अल्लड बालिकेप्रमाणें, छुम्-छुम् आवाज काढीत त्या नादांवर संथपणाने वाहते.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

* छिंदवीन नदी आपला करभार घेऊन ऐरावतीच्या भेटीस आली होती. दोघींचा काय तो प्रेमसंगम! रामदास आणि तुकाराम एकमेकांना भेटले असावेत किंवा बुद्धिबळें खेळणाऱ्या कालिदासाला भवभूति आपलें 'उत्तररामचरित' ऐकवीत असावा असा तो देखावा होता.

— आचार्य कालेलकर : ( ब्रह्मदेशचा प्रवास )

### गंगावतरण

एकादी जंगी मिरवणूक अरुंद गल्लींतून मोठया मैदानावर येते आणि मग जसे लोक मोकळेपणानें 'हुश्श' करीत अनेक दिशांना विखुरतात, तीच दशा हरिद्वारजवळ श्रीगंगाजीची झाली आहे. गोठ्यांतून सुटलेलीं वासरें स्वतंत्रतेचा अनुभव घेण्याकरितां जशीं इकडे तिकडे धांवतात, तशी हरिद्वारहून गंगानदी धांवते; आणि प्रत्येक प्रवाहाचा उल्हाससुद्धां बालवृत्तीच दाखवितो.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

### गंगेचा महिमा

भारतीय संस्कृति म्हणजे गंगा-संस्कृती. गंगेसारखी वाणी, गंगेसारखें निर्मळ जीवन. तुकाराममहाराज म्हणतात, " चित्त जैसें गंगाजळ." भारतीय संस्कृतींत गंगेचा अपार महिमा. गंगेनें हिंदी हृदय जोडलें आहे. मनुष्य कोठेंही असो, मरतांना तोंडांत गंगा घालतात. घरोघर गंगेची लोटी लाख लावून ठेवलेली.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

### पहाडांतील यमुना

दुहेरी हाडाची, मजबूत बांध्याची, सोळा सतरा वर्षांची सुंदरबाला, यौवनाच्या जाणिवेच्या अभावीं, धांवत उड्या मारीत असावी आणि सांखळ्या-घुंगरांच्या नादाच्या मस्तींत साऱ्या जगाला विसरून जात असावी अशी ती येथें दिसते.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

* धर्माचें अंतरंग प्रेम व बहिरंग परोपकार.

— वा. म. जोशी : ( रागिणी )

## नदींतील बाग

बागेंत गेलें म्हणजे मनुष्य पायऱ्यापायऱ्यांनीं उतरत मध्याकडे जातो. मध्यभागीं धरणांतून सोडलेलें कावेरीचें पाणी बाग दुभंगून पुढें वहात जातें–बागेचें प्रतिबिंब आपल्या हृदयांत सांठवतें–आपल्या झुळझुळत्या दर्शनानें बागेची प्रसन्नता आणि सौंदर्य वाढवतें–बागेंतून उड्या मारीत वहात येणाऱ्या पाण्याच्या असंख्य प्रवाहांना चुकलेल्या मुलांप्रमाणें आपल्या पोटांत घेते आणि बागेच्या रोषणाईसाठीं वीज निर्माण करण्याकरितां खालीं शिवसमुद्रमला जातें.

– गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## नदींतील दिवे

त्या युवती आपल्या भाग्याची परीक्षा पाहण्यासाठीं कीं काय,पळसाच्या मोठमोठ्या द्रोणांत तुपाच्या वाती ठेवून त्या कुरवंड्या नदीच्या प्रवाहांत सोडीत आहेत, आणि ते द्रोण होड्यांप्रमाणें हलतडुलत–आपल्यांतील ज्योतीचें महत्त्व त्यांना समजत आहे अशा प्रकारें डुलत-जीवनाच्या यात्रेला आरंभ करीत आहेत. मनुष्य-जीवनांत जसें घडतें तसेंच येथें ह्या दिव्यांच्या बाबतींतहि घडतें. एखादी अभागी ज्योत यात्रेच्या आरंभींच वाऱ्याच्या आहारीं जाऊन चहूंकडे विषादाचें साम्राज्य पसरविते. कांहीं पुष्कळ आशा दाखवून निराशा करतात. कांहीं आजन्म रोग्याप्रमाणें कसेंबसें दूरपर्यंत जाऊन पोहोंचतात. केव्हां केव्हां दोन द्रोण जवळ जवळ येऊन एकमेकांना लागतात आणि मग ती जोडहोडी एखाद्या दांपत्याप्रमाणें दूरदूरचा प्रवास आरंभते.

– आचार्य कालेलकर : ( लाटांचें तांडव )

## निर्जल नदी

झाडींतून दगडांशीं खेळतखेळत दक्षिणेकडे जात असलेल्या एका पर्वतकन्येचें दर्शन घडलें. ह्या वेळीं तर तिच्या पात्रांत नांवालादेखील पाणी नव्हतें. जिकडे-तिकडे वाकडेतिकडे गुळगुळीत दगडच दगड. निर्जल नदी सामान्यपणें कोणाला आवडत नाहीं; परंतु ज्या वेळीं दोन्ही तटांवर उंच उंच टेंकड्या असतात आणि सारा प्रदेश निर्जनरम्य असतो, तेव्हां कोरडी नदीदेखील भीषण-रमणीय रूप धारण करीत असते. पाण्याचा प्रवाह नसे ना का, पण हिरव्याचार जंगलांतून पांढऱ्याशुभ्र दगडांचा पट्टा डोंगरांतून आपला रस्ता शोधीत जात असतो, तेव्हां सहजच मनांत वाटतें कीं, हे दगड शाळेंतील मुलांसारखे पळण्याची शर्यत खेळत खेळतां कां बरें थांबले असावेत ?

— आचार्य कालेलकर : ( गुच्छुपाणी )

## कालव्याचे उमाळे

दुःखी मनुष्याला ज्याप्रमाणें उद्वेगाचे नवे नवे उमाळे येतात, त्याप्रमाणें कालव्याच्या पाण्यांतून उमाळे येत होते. पण सासरीं नवीनच आलेली सून जशी आपल्या सर्व भावना दाबून टाकिते तशी गंगानदीची ही पराधीन कन्या सगळ्या उमाळ्यांना दाबून टाकीत होती ! प्रथमच तिचा हा विस्तार पाहून ही कोणी गर्विष्ठ श्रीमंत पतीची राणी असें वाटत होतें; पण जवळ जाऊन पाहिल्यावर श्रीमंतीखालीं झांकलेलें पारतंत्र्याचें दुःख तिच्या मुखावर स्पष्ट दिसत होतें.

— आचार्य कालेलकर : ( नदीवर कालवा )

## खडकावर कोसळणारा धबधबा

इंद्रदेव कोपला आहे कीं वरुणदेव चिडला आहे याचा मी विचार करीत होतों, इतक्यांत वायुदेवानें साह्य केलें आणि एक क्षणभर-केवळ एक क्षणभरच-धुक्याचा तो जाड पडदा दूर झाला, आणि ज्या देखाव्यासाठीं जन्मभर तळमळ लागून राहिली होती तो अद्‌भुत देखावा दृष्टीस पडला ! महादेवाच्या डोक्यावर गंगा अवतरावी तसा एक मोठा धबधबा खालच्या कड्यामधून बाहेर पडलेल्या हत्ती-सारख्या खडकावर पडून आपटून भुगा करीत दश दिशांना त्याच्या बाणांसारख्या चिळकांड्या सोडीत आहे !

— आचार्य कालेलकर : (जोगचा धबधबा)

## झऱ्याचें पाणी

झऱ्याला चांगलें दगडी कुंड बांधलें असून झऱ्याच्या तोंडावर ठेवण्याकरितां एक जस्ताचें नळकांडें ठेवलें आहे. यामुळें त्या नळकांड्यांतून पाणी येऊन तें वर्तुलाकार खालीं कुंडांत पडे. या झऱ्याचें पाणी इतकें निर्मळ व शुभ्र आहे कीं, वर्तुलाकार पडणारें तें पाणी दुरून काचेच्या हंडी-सारखें हुबेहुब दिसलें.

— गो. चि. भाटे : (श्रीनगरचीं सुंदर उद्यानें)

## नदीचें हास्य

नदीच्या पात्रांतून दोन लहान लहान प्रवाह एखाद्या राजधानीच्या अस्तमान गतवैभवाप्रमाणें आस्ते कदम वहात होते. त्यांतलें पाणी बालकांच्या हास्यासारखें निर्मळ होतें. तें थोडेसें 'हास्य' आपणहि उदरस्थ करावें असें वाटलें.

— आचार्य कालेलकर : (गुच्छुपाणी)

## धबधब्याचें दृश्य

आम्ही राजाच्या मुकुटाप्रमाणें शोभणाऱ्या ऊन्ह ऊन्ह दगडांवर आडवें होऊन खालीं दरींत डोंकावलें; तों कधीं स्वप्नांतसुद्धां कल्पना केली नव्हती असें दृश्य पहावयास मिळालें. वरून ' राजा 'ची धारा जी पडत होती ती खालीं भुईपर्यंत पोंहचतच नव्हती. वरून आम्हांला दिसत होतें कीं, एक प्रचंड स्रोत मस्त हत्तीसारखा खालीं पडत आहे. खालीं पडतां पडतां शतधा विदीर्ण होऊन त्याच्या सहस्र धारा बनल्या आणि थोडे खालीं जातांच त्या धारांचे मोठाले जलबिंदू बनून मौक्तिकमालेची शोभा दाखवूं लागले. या मौक्तिकांचेंही पुढें चूर्ण होऊन त्याचे मोठमोठे कण झाले. आतां मात्र त्यांनीं सरळ खालीं पडावयाचें सोडून थोडा स्वच्छंद विहार चालूं केला. हे कणसुद्धां पुढें भिन्न होऊन सीकरकुंजांत परिणत झाले आणि ढगांसारखे विहार करूं लागले. तरी एवढ्यानें प्रकृतिमातेचें समाधान झालें नाहीं. या ढगांचें पुढें धुकें बनलें आणि येणाऱ्या वाऱ्याच्या संगतीं उडून उडून ते सारें वातावरण शीतल बनवूं लागले.

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

## जल गेलें सोडुनि तिजला

वासिष्ठी नदी या बाजूला अक्षरशः निर्जल होती. जणूं उथळसा मोठा चर. तिच्यांतले ओबडधोबड गोटे राख फासल्यागत पांडुरके दिसत होते.—जसे कांहीं कुंभमेळ्याला जमलेले दसनांम गोसावी.

— महादेवशास्त्री जोशी : ( परशुरामक्षेत्र )

## धबधब्याचे फवारे

वीरभद्राचा प्रपात हत्तीच्या गंडस्थळासारख्या एका विस्तृत शिलाखंडावर आपटल्याबरोबर त्यामधून दारूच्या बाणासारखे फवारे उंच उंच उडतच जातात ! हें काय शंकराचें तांडव नृत्य कीं महाकवि व्यासाच्या प्रतिभेचा नवनवोन्मेषशाली कल्पनाविलास ? कीं सूर्यबिंबाच्या पृष्ठ-भागापासून निघणाऱ्या सर्वसंहारकारी पण कल्पनारम्य ज्वाला ? कीं भूमातेच्या वात्सल्याच्या स्तन्यधारांचे फवारे ? खरोखर वीरभद्र पहाणाऱ्या डोळ्यांना मोहमूढ बनवून टाकतो.

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

## धरणानें अडविलेलें पाणी

खडकवासल्याच्या बांधावर तन्वंगी मुठेचें सुदीर्घ सरोवर बनविलें आहे. या सरोवराच्या कांठीं झाडेंहि नाहींत व देवळेंहि नाहींत. दिवसां ढग व रात्रीं तारे आपलीं चिंता-जनक प्रतिबिंबें या सरोवरांत पाडतात. येथेंच मुठेजवळून पाटाच्या रूपानें दोन प्रचंड कर वसूल करण्यांत येतात आणि पुणें व खडकी येथील लोक त्यांचें भरपूर पाणी पितात.

— आचार्य कालेलकर : ( संगम )

* कित्येक लेखक गद्यच इतकें सरस लिहितात व कित्येक लेखक पद्यच इतकें नीरस लिहितात कीं, संसारांत अनेक वेळां अनुभवाला येतें त्याप्रमाणें, दादाला अक्का व अक्काला दादा म्हटलें तर तें शोभेलहि.

— न. चिं. केळकर : ( उज्जयिनी—कविसंमेलन )

# ३

● महाराष्ट्र हा देश एका दृष्टीनें मोठा भाग्यशाली आहे. येथें श्रीज्ञानेश्वरप्रभृति संत-शिरोमणि आणि श्रीशिवछत्रपतिप्रभृति राज-शिरोमणि चमकून गेले आणि त्यामुळें साहित्य व स्वातंत्र्य या दोन थडी भरून आनंद व अभिमान यांची महानदी येथें वाहत राहिली आहे.

— म. म. द. वा. पोतदार

● देसीचिआ भासां भीतुर ही भास परमेश्वराचिआ वस्तु निरोपूंसी योग्य ।

— फादर थॉमस स्टीफन्स

( क्रिस्तपुराणाची प्रस्तावना सन १६१४ )

## ज्ञानाचा अर्क

वाङ्मय हें मनुष्याच्या ज्ञानविस्तारांतून अर्करूपानें स्रवणारे मधुबिंदुच होत.

— न. चिं. केळकर : ( सुदाम्याचे पोहे—प्रस्तावना )

## ललित वाङ्मयाचा हेतु

कादंबरींतील अगर नाटकांतील व्यक्तींचे व्यवहार आणि प्रसंग वाचतांना अगर पहातांना आपल्याला आपल्या स्वतःच्या कोणत्या तरी अनुभवाचा पुनः प्रत्यय येतो, व या पुनः प्रत्ययांत जो एक अवर्णनीय आनंद आहे, त्या आनंदासाठीं ललित वाङ्मयाकडे आपण पुनः धांव घेतों.

— ना. सी. फडके : ( साहित्य आणि संसार )

## सेवक, स्नेही व गुरु

अहर्निश अष्टौप्रहर तुमच्या सेवेला अविश्रांत सादर होणारा ग्रंथासारखा दुसरा सेवक तुम्हांला मिळणार नाहीं. तुम्हीं स्नेही या नात्यानें त्यांना जवळ ओढलें तर ते स्नेह्याप्रमाणें गोड वागतील व सर्वस्वीं निस्पृह असाच सल्ला देतील. शिष्य या नात्यानें तुम्हीं त्यांचा आदर केला तरी मानवी गुरुप्रमाणें ते तुम्हांस न शिणवितां व न सतावितां विद्या देतील. प्रतिपक्षी या नात्यानें तुम्हीं त्यांशीं वाद आरंभिला तर तुमच्या जडबुद्धीवर आपली कानस घासून ती सतेज करण्यास किंवा युक्तिवादानें तुम्हांस निरुत्तर करून तुमचा गर्वपरिहार करण्यासही त्यांची तयारी आहेच.

— न. चिं. केळकर : ( ज्ञानाचीं सदावर्तें )

## जातिवंत वाङ्मय

एकाद्या तळ्यांतल्या शांत पाण्यांत बारीकसा दगड टाकला म्हणजे जशीं एकामागून एक आणि एकापेक्षां एक मोठीं वर्तुळें निर्माण होतात, त्याप्रमाणें उत्कृष्ट वाङ्मयानें वाचकांच्या मनःसरोवरांत विचारांचीं वर्तुळें निर्माण होतात, आणि तीं वर्तुळें मोठीं होत होत त्याला विश्वाच्या कक्षेशीं एकरूप करून टाकतात.

— आचार्य अत्रे : ( हंशा आणि टाळ्या )

## सरस्वतीची गंगाजळी

प्रत्येक पिढीची अभिरुचि व स्मरणशक्ति या दोन चाळणीच होत. या जोडचाळणींतून प्रत्येक पिढींत कांहीं कांहीं लेख सरस्वतीच्या गंगाजळींत पडतात व हे सर्व गाळीव लेख मिळून जो संग्रह होतो, त्याचेंच नांव वाङ्मय.

— न. चिं. केळकर : ( बडोदा–संमेलनाचें भाषण )

## भाषेची वाढ

भाषेची खरी वाढ होण्यास ती भाषा वापरणारांचा व्यवहार अधिक वाढला पाहिजे, आणि स्वभाषेंत आपले विचार लोकांस कळवून, लोकांची प्रवृत्ति किंवा मनें फिरविण्याची जरूरहि देशांतील पुढाऱ्यांस अधिकाधिक वाटूं लागली पाहिजे.

— लो. बा. ग. टिळक : ( केसरी )

* काळ कांहीं कुणाकरितां थांबत नाहीं. दिवस-रात्रीच्या रूपानें त्याच्या पापण्यांची उघड-झांप सारखी चाललेली असते. — वि. स. खांडेकर

## साहित्यांतील प्रसाद

उत्तम नद्यांचें पाणी निवळ शंख असून पुनः खोलही असतें, त्याचप्रमाणें अवध्या जगास आल्हादप्रद झालेल्या ज्या होमर-कालिदासप्रभृति कवीश्वरांच्या कृती त्यांतही प्रसन्नार्थत्व व गांभीर्य हे गुण साहचर्यानें सांपडतात.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## ग्रंथांचें माहात्म्य

ईश्वराच्या सर्वगुणसंपन्नतेचा पृथ्वीवरील खरा प्रतिनिधी झाला तर एक ग्रंथसंग्रहच होऊं शकेल, मनुष्य होऊं शकणार, नाहीं ! जगाच्या सुखाला वैराग्याचें विरजण घालणारें आणि दुःखरोगाला बरें करणारें औषध म्हटलें म्हणजे एक ग्रंथवाचन होय.

— न. चिं. केळकर : ( ज्ञानाचीं सदावर्तें )

## कोशग्रंथांची जरूरी

कोश आणि व्याकरण हीं कोणत्याहि भाषेच्या उत्कर्षाचीं प्रधान अंगें होत. जामदारखान्यांत केवळ रत्नें पुष्कळ असल्यानें भागत नाहीं, तर ज्याप्रमाणें जामदारखान्याच्या मालकाजवळ सदर रत्नांच्या रूपाची, वर्णाची किंवा किंमतीची याद असावी लागते, तद्वतच भाषेचें शब्दभांडागार वापरणाऱ्यांची स्थिति होय.

— लो. बा. गं. टिळक ( केसरी )

## प्रतिभा-रत्न

तेज झळकविण्याचा प्रतिभा-रत्नाचा धर्म आहे, पण हें रत्न जितकें अधिक ठिकाणीं प्रज्ञेच्या निकषावर घासलेलें असेल, तितके अधिक तेजःकिरण त्यांतून निघूं शकतील.

— न. चिं. केळकर

## गीतेचें स्वरूप

गीता म्हणजे कर्म, भक्ति व ज्ञान या तीन स्वतंत्र निष्ठांची खिचडी किंवा कापूस, रेशीम व जर यांच्या चिंध्या शिवून तयार केलेली गोधडी नसून कापूस, रेशीम व जर यांचें निरनिराळे धागे यथास्थानीं योग्य रीतीनें बसवून दिल्यावर कर्मयोग नांवाचें मौल्यवान् व मनोहर असें हें गीतारूपी सणंग अव्वलपासून अखेरपर्यंत अत्यंत योगयुक्त चित्तानें सलग विणलेलें आहे, असें दिसून येईल.

— लो. बा. गं. टिळक : ( गीतारहस्य )

## गीतेचा संदेश

गीता सांगते–कर्म करा, कर्म ज्ञानपूर्वक करा, हृदयाचा जिव्हाळा ओतून करा. कर्म करण्यांतच इतके तन्मय व्हा कीं, फलाचा विचार करावयास तुम्हांस वेळ उरणार नाहीं. झाडाला पाणी घालण्यांत रमा. त्याच्यावरची किडामुंगी पहा. बकरीला येऊं देऊं नका. खत घाला. झाडाचें संवर्धन करण्यांत अहर्निश वर्षानुवर्षें रमलेत; तर फळांचे घड आज ना उद्यां वर लटकल्याशिवाय कसे रहातील ?

— साने गुरुजी : ( श्याम )

## साहित्याचे विषय

साहित्य ' कसें ' ह्यापेक्षां साहित्य ' कशाचें ' हा प्रश्न महत्त्वाचा आहे. साहित्य प्रभूच्या गुणवर्णनाचें. साहित्य देशाच्या सेवेचें. साहित्य दुःखितांच्या कळवळ्याचें. साहित्य स्वतंत्रतेच्या पूजेचें.

— विनोबा भावे ( मधुकर )

### ज्ञानदेवांचें जीवित-कार्य

आत्मानुभवाच्या पायावर भक्तिज्ञानाचें मंदिर उभारून तें कुळजातीचा विचार न करतां सर्वांना खुलें करणें आणि शुद्ध परमार्थाची वाट उजळून दाखविणें हें ज्ञानदेवांचें जीवितकार्य होय.– शं. गो. तुळपुळे : ( पांच संत-कवि )

### ज्ञानदेवांचें तेज

मराठी भाषेचा आणि शुद्ध परमार्थाचा गौरव करण्याकरितां ईश्वरी तेज ज्ञानदेवांच्या देहांतून चमकून गेलें.

– प्रा. शं. वा. दांडेकर : ( ज्ञानेश्वरी–प्रस्तावना )

### भाषेची गोडी

ज्ञानदेवांची गोड भाषा माझ्या तोंडांत बसावी म्हणून पुन्हां मला जन्म प्राप्त झाला तरी धन्यता वाटेल.

– विनोबा भावे ( गीता–प्रवचनें )

### ज्ञानेश्वरीचें वैशिष्ट्य

ज्ञानेश्वरींत कर्म आहे पण कर्माची कटकट नाहीं, ज्ञान आहे पण ज्ञानाचा रुक्षपणा नाहीं, भक्ति आहे पण ती भोळ्या अज्ञानाची नाहीं. त्यांनीं तत्त्वज्ञानाला प्रेमाची माधुरी आणली व भक्तीला ज्ञानाचा डोळा दिला.

– प्रा. शं. वा. दांडेकर : ( ज्ञानेश्वरी- प्रस्तावना )

### ज्ञानेश्वरींतील नीति-मीमांसा

ज्ञानेश्वरींतल्याप्रमाणें नीतिमीमांसा पाश्चात्य ग्रंथांतूनहि क्वचित्‌च आढळेल. उपमा, उदाहरणें व दृष्टांत देऊन विषय हृदयंगम करण्याची ज्ञानेश्वरांची शैली नीतिमीमांसेंत जितकी दृष्टीस पडते, तितकी ज्ञानेश्वरींतहि अन्यत्र क्वचितच दिसेल. – रा. द. रानडे : ( ज्ञानेश्वरवचनामृत )

## संतांची कामगिरी

ज्ञानेश्वरमहाराजांपासून एकनाथमहाराजांपर्यंतचे जे साधुसंत झाले त्यांनीं महाराष्ट्रांतील लोक हिंदुत्वांत राखले, ही तर अजब कर्तबगारी खरीच,...( त्याशिवाय ) भक्तिमार्गानें आचारशुद्धि, चित्तशुद्धि व पूर्वेतिहास-ज्ञान झालें आणि चातुर्वर्ण्य व वर्णाश्रमधर्म या उत्तमोत्तम संस्थांकडे लोकांचें लक्ष वळलें.

— इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : ( लेखसंग्रह भा. ३ )

## संतकवींचें वाङ्मय

महाराष्ट्रीय संतकवींनीं आपल्या वीर्यवती वाणीचा अद्भुत विलास प्रगट केला व त्यांचीं हृदयें भरून व भारून टाकिलीं, आणि असें अवीट आणि अक्षय्य चारित्र आणि प्रखर वाङ्मय निर्माण केलें, कीं सारें भूमंडळ डोलूं लागावें !

— द. वा. पोतदार

## संतांची साहित्य-निर्मिति

गरुड पक्षी जसा अस्मानीं राहून सूर्यावर एक टक लावतो, त्याप्रमाणें परब्रह्मरूपावर ज्यांचें लक्ष निश्चळ होऊन राहिलेलें व केवळ अंतःप्रेरणेनें ज्यांचे वनपक्षा-प्रमाणें सुस्वर निघणारे, त्यांच्या वाणींत श्लेषास कोठून जागा मिळणार !

— विष्णुशास्त्री चिपळूणकर ( निबंधमाला )

* माणसें जन्माला येतात, पण माणुसकी निर्माण करावी लागते.

— वि. स. खांडेकर

## कादंबरी व लघुकथा

कादंबरीचा आघात एखाद्या भल्या मोठ्या हातोड्याच्या आघातासारखा व्हायला हवा. लघुकथा एखाद्या तीक्ष्ण टोकाच्या सुईप्रमाणें टोंचायला हवी. एखाद्या टोलेजंग इमारतीवर विजेचे दिवे लावल्यावर जी रोषणाई दिसते तिची उपमा कादंबरीला साजेल. लघुकथेला उपमा द्यायची झाली तर लखकन् उजळून, क्वचित् काडकाड आवाज करून लुप्त होणाऱ्या विद्युल्लतेचीच शोभेल. एखाद्या गवयानं तासभर एखादी रागिणी गाऊन दाखवावी, आणि सहज बोलतां बोलतां एखाद्या रागांतली सुंदर तान घेऊन दाखवावी, यांत जो फरक आहे तोच कादंबरी आणि लघुकथा यांत आहे.

— ना. सी. फडके : ( लघुकथालेखन—मंत्र आणि तंत्र )

## गद्याचें श्रेष्ठत्व

भाषेंत गद्य ग्रंथांचा प्रचार सुरू होणें हें लोक-सुधारणुकेचें एक मोठें चिन्ह आहे—राष्ट्राच्या सज्ञान अवस्थेचें विशेष सूचक होय.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर ( निबंधमाला )

## भाषेचा जीवंतपणा

खरोखर अंतःकरणास पीळ पडला म्हणजे भाषा शिकावी लागत नाहीं. अंतःकरणाला चटका लागतो कीं नाहीं एवढाच प्रश्न आहे.

— लो. बा. गं. टिळक

काव्यवाचनानें हृदयाच्या कोमल वृत्ती जास्त तरतरीत होतात, प्रेमाचें सत्य-स्वरूप कळूं लागतें व तें द्यावें कसें आणि घ्यावें कसें हें समजतें. — ना. ह. आपटे : ( गृहसौख्य )

## जुनी व नवी कविता

पोवाडे सोडून आधुनिक कवितेकडे आपण आलों म्हणजे हिमालयावरील किंवा नर्मदाकांठच्या प्रचंड वनांतून निघून फळझाडांचें बीं विकणाऱ्या एकाद्या नर्सरीवाल्याच्या परसांतील बागेंत किंवा दिवाणखान्यांतील चिनी कुंड्यांतून खुरटलेल्या ताल-तमालांच्या हातभर पानांच्या सावलींत आपण आलों आहों असें वाटतें.

— न. चिं. केळकर : ( केसरी )

## नव-काव्याचे त्रि-दोष

माझ्या मतें नवकवितेचा मुख्य दोष हा आहे कीं, कविता इंग्रजी Lyric (वीणा काव्या )च्या चुकीच्या अनुकरणानें फारच त्रुटित असते. दुसरा दोष असा कीं, राष्ट्र आणि जनता यांच्या जीविताशीं संबद्ध असलेले किंवा त्याशीं तादात्म्य करून देणारे विषय आधुनिक कवि फारसे घेत नाहींत. तिसरा दोष ‘ शून्यसंशोधन ’ किंवा ज्याला इंग्रजींत Mysticism म्हणतात तो.

— न. चिं. केळकर : ( टिळक कविता—प्रस्तावना )

## काव्य व विनोद

कवि हा संवादित्व हुडकून काढतो, त्याचें लक्ष सौंदर्यावर असतें; उलट, विनोदी लेखक हा विसंवादित्व हुडकून काढीत असतो, त्याचें लक्ष विकृत व हास्योत्पादक गोष्टींवर असतें; परंतु दोघांचेंहि कार्य एकच म्हणजे विषय मनावर बिंबविणें हें असतें व तें घडून येतेंहि.

— न. चिं. केळकर : ( सुदाम्याचे पोहे—प्रस्तावना )

## काव्यानंदाचें बीज

विश्व आत्मरूप आहे, इतकेंच काय पण आत्मा विश्वरूप आहे असें कवीला दिसलें पाहिजे. पौर्णिमेच्या चंद्रानें त्याच्या हृदय-समुद्राला भरती आलीच पाहिजे. पण पौर्णिमेच्या अभावीं त्याच्या हृदयाला ओहोटी लागतां कामा नये. अमावास्येच्या गाढ अंधःकारांत आकाश ढगांनीं भरलेलें असतांनाहि चंद्र-दर्शनाचा आनंद त्याला लाभला पाहिजे. ज्याचा आनंद बाहेरच्या जगांत गुंतला आहे तो कवि नाहीं.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## कवीचें कर्तव्य

काव्यमय स्थानाला विलासभूमि बनविण्याऐवजीं तपोभूमि बनविणारें मनुष्यहृदयच काव्याची कदर करूं जाणे. कवीचा कलात्मा जीवनाला विलासानें उथळ बनविण्याऐवजीं संयम आणि तप यांनीं अथांग बनविण्यास कारणीभूत होईल तर त्यांतच त्याची कृतार्थता आहे.

— आचार्य कालेलकर : ( बिल्वाश्रमाचें पुनर्दर्शन )

## काव्याचें स्वरूप

भावगीत ओंजळींत घेतलेल्या अर्घ्यासारखें तर महाकाव्य म्हणजे षोडशोपचारी पूजा. तें हिऱ्याच्या लहानशा चमकेसारखें तर महाकाव्य म्हणजे नवरत्नांच्या हाराची घडणावळ. तें शिंपलींतील पाणीदार मोती तर महाकाव्य म्हणजे पोवळ्यांच्या बेटांचें कोरीव लेणें.

— पु. म. लाड

## कवीचा आनंद

कवि आत्मनिष्ठ, कवि स्वयंभू. पामर दुनिया विषय-सुखावर झुलत असते. कवि आत्मानंदांत डोलत असतो. लोकांना भोजनाचा आनंद, कवीला आनंदाचें भोजन. कवि संयमाचा संयम आणि म्हणून स्वतंत्रतेची स्वतंत्रता.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## कवीची बढाई

अप्सरांच्या गळ्यांत हात घालून आम्ही नंदनवनांतून सांजसकाळ भटकत असतों, चंद्राबरोबर आणि चांदण्यां-बरोबर फेर धरून ढगावर नाचत फिरतों आणि अमृताचं निशापाणी करून आम्ही कल्पवृक्षाखालीं रात्रंदिवस असे बेहोष पडलेले असतों.

— आचार्य अत्रे : ( पाणिग्रहण )

## विद्वत्त्व आणि कवित्व

मूळचाच जर कवित्त्वाचा अंकुर नसला तर विद्वत्व तो अंकुर उत्पन्न करूं शकणार नाहीं, हें जितकें खरें आहे; तितकेंच हा अंकुर मूळचाच असला, तर विचाराच्या उष्णतेनें व विद्वत्त्वाच्या प्रकाशानें त्याला जोम येतो व त्याची टवटवी वाढते, हेंहि खरें आहे.

— वा. म. जोशी

* जीवन हें नृत्य आहे असें तुम्ही म्हणतां ? कबूल ! पण ते नृत्य नर्तिकेचें नाहीं; शंकराचें आहे ! जीवन हें तांडव नृत्य आहे !

— वि. स. खांडेकर

## मराठीचें पितृधन

संस्कृत घालवून मराठी मिळवूं पहाणें हें पुढच्या खांदीवर बसून मागची खांदी तोडण्यासारखेंच आहे. निदान मराठी भाषेपुरता तरी संस्कृत हा अमृताचा अखंड झराच आहे. संस्कृत हें मराठीचें पितृधन असल्यामुळें त्याचा उपयोग भरपूर करूनही स्वतःचें व्यवहारचातुर्य किंवा संवेदना दाखविण्याला मराठीला पुष्कळ वाव उरतो.

न. चिं. केळकर : ( बडोदें-संमेलनाचें भाषण )

## भाषा व समाज

एखाद्या तळ्यांत सभोंवारच्या वस्तूंचें जसें प्रतिबिंब पडतें; त्याप्रमाणें प्रत्येक देशांतील लोकांच्या आचार-विचारांचें, धर्माचें, नीतीचें, तत्त्वज्ञानाचें, व्यापाराचें व समाजस्थितीचें चित्र त्यांच्या भाषेंत उतरलेलें असतें.

– लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## भाषेचें स्वरूप

भाषा ही मनुष्याच्या मनोवृत्तींचा व हृदयवृत्तींचा उद्‌गार होय; म्हणजे त्याच्या मनांत जे विचार उत्पन्न होतात किंवा अंतःकरणांत क्षोभ होऊन जे तरंग उठतात ते ज्या रूपानें प्रकट होतात तें रूप भाषा होय.

– विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

* कांहीं तरी उच्च कर्तव्य डोळ्यापुढें ठेवून त्यांत आपलें आयुष्य, धन, बळ, बुद्धी व विचार खर्च करण्यांतच जन्माचें सार्थक आहे.

– ना. ह. आपटे

## आधुनिक विद्वान

आधुनिक विद्वानांच्या ज्ञानाची लांबी-रुंदी फार विस्तृत, पण त्यांची खोली फार थोडी असते. यामुळें विद्यासमुद्राच्या तळाशीं बुडी मारून मोतीं वर आणणें हें त्याला दुष्कर होय. फार तर त्यानें सरस्वतीच्या क्रीडासरोवरांतील कमलाबरोबर उथळ पाण्यांत खेळावें.

— न. चिं. केळकर : ( संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन )

## विद्वानांचा अहंकार

ज्या मंदराचलानें अवघ्या महोदधीस गरगर फिरावयास लावून लक्ष्मी, पारिजात, चंद्र यांसारखीं रत्नें ढवळून बाहेर काढावीं त्यानें क्षुद्र नवनीताकरतां दह्याच्या माथणींत कसें शिरावें ? ज्या गजेंद्रानें सार्वभौम राजा जींत बसला आहे अशी अंबारी पाठीवर घ्यावी त्यानें क्षुद्र पशूं-प्रमाणें सामान्य व्यवहाराचीं कामें कशीं करावीं ? मोठ्या अफाट दर्यावरून भर तुफानांत चालून ज्या महानौकांनीं एका देशची संपत्ति दुसऱ्या देशांत नेऊन भरावी त्यांच्या-कडून भिकार लहान नावांची कामगिरी कशी घडावी ? तेव्हां आजपर्यंत युनिव्हर्सिटींत निपजलेल्या प्रचंड मंडळी-कडून बारीकसारीक देशहिताचीं कामें झालीं नाहींत हें नीटच आहे !

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

* हास्यविनोद हा चांगला खरा, तथापि त्याचा उपयोग व्यवहारांत मिठासारखा किंवा साखरेसारखाच करावयाचा असतो; अन्नासारखा करावयाचा नसतो.

— न. चिं. केळकर : ( सुभाषित आणि विनोद )

## विद्येचा आनंद

विद्येचा खरा भक्त म्हटला म्हणजे तिजपासून आपणास कांहीं लाभ होईल कीं नाहीं हीं कल्पनाही त्याच्या मनांत येत नसते. केवळ ज्ञानजन्य जें सुख त्यांचीच तो पर्वा करीत असतो.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## भाषेंतील जोर

ज्याला आपल्या देशबांधवांस स्वभाषेच्या द्वारें कळकळीनें उपदेश करण्याची आवश्यकता वाटत नाहीं, त्याच्या हातून स्वभाषेची सेवा तरी काय होणार ? आणि जोरदार भाषा तरी कशी निघणार ?

— लो. बा. गं. टिळक

## शब्दांचा शोध

डोंगरमाथ्याच्या अगदीं कड्यावर, धोक्याच्या जागीं फुललेल्या रानगुलाबाचे गेंद दिसावेत व मग ते हस्तगत करण्यासाठीं साहस करावें किंवा दुसऱ्याच्या परड्यांत पारिजात फुलांचा सडा पडलेला असावा व तिथें पोंचण्यासाठीं कांटेरी कुंपण तुडवीत जावें, किंवा तळयांतल्या नीलकमलांनीं मोहनी घालावी अन् त्यांच्यापर्यंत पोंचण्यासाठीं कमरेइतक्या पाण्यांत उतरणें भाग असावें, तद्वत् हवे ते शब्द हुडकावे लागतात.

— ना. सी. फडके : ( लघुकथा-तंत्र )

* जीवित-वृक्षाचें दया हें मूळ, प्रीति ही पालवी व भक्ति हीं फळें होत.

— वि. स. खांडेकर

## कलेचा हेतु

कलाविलासाच्या मागें हेतुसंशोधनाचा गुप्त पोलीस लावून दिला तर अनर्थकारक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहींत. वाङ्मयाला नैतिक प्रबंध म्हणणें आणि साखरभाताला नुसत्या साखरेचा केलेला भात म्हणणें हीं दोनहि सारख्याच समंजसपणाचीं होत. शिल्पशास्त्रांत कलेच्या दृष्टीनें निरनिराळे आकार बनविणें यांत प्रतिभा-कौशल्य दिसून येतें; पण देवळाचें उंच शिखरच सुंदर कां, तर तें आकाशांत ईश्वर आहे असें उंच बोट करून दाखवितें म्हणून, अथवा तीन तीन कमानींची जोडीच कां शोभते, तर तिजवरून त्रिमूर्ति ब्रह्माविष्णुमहेश्वराची आठवण होते म्हणून असें म्हणणें बरोबर होईल काय ? ताजमहालाच्या पांढऱ्याशुभ्र दगडांत जी रंगीबेरंगी कुसर बसविली आहे तिचा नैतिक हेतु शोधून काढणारानें ताजमहाल पाहण्यास जाण्याचे श्रम न घेतलेलेच बरें.

— न. चिं. केळकर : ( बडोदें साहित्यसंमेलन )।

## कला व नीति

कलेची आवड ठीक आहे पण कलेपायीं नीति नावडती होणें चांगलें नाहीं. गाण्यामध्यें ताना व आलाप यांचें बाबतींत गाणाऱ्याला थोडेंबहुत स्वातंत्र्य असलें तरी त्यानें 'ताल' केव्हांहि सांभाळलाच पाहिजे. त्याप्रमाणेंच कलेकरितां थोडेंबहुत स्वातंत्र्य इष्ट आहे; पण नीतीचें 'तालतंत्र' संभाळलेंच पाहिजे. कलेची तहान भागविण्या-करितां नीतीच्या रक्ताचा घोट घेणें बरोबर नाहीं.

— वा. म. जोशी ( इंदु काळे व सरला भोळे )

## कलेचें फल

पोहावयास पडणारा मनुष्य जलक्रीडा करतो ती स्नानाच्या हेतूनें नव्हे. शिकारी क्षत्रिय अरण्यांत मृगयाविलास करतो ती एक दिवस चांगलें मांस खावयाला मिळावें म्हणून करीत नाहीं ! गवई दीप-राग आळवितो तो अर्थशास्त्रदृष्ट्या मशालजीचा खर्च वांचविण्याकरतां नव्हे. तात्पर्य, 'अधिकस्याधिकं फलं' या न्यायानें, कलेच्या दृष्टीनें वाङ्मय सुंदर असून त्यांतूनच नीतिबोध निघण्यासारखा असल्यास दुधांत साखर पडेल; पण ज्याचा मूळ हेतु नीतिबोध नाहीं तें वाङ्मयच नव्हे हें म्हणणें यथार्थ नाहीं. शुद्ध निरपेक्ष आनंद हाच कलेचा हेतु व तेंच तिचें फल होय.

— न. चिं. केळकर : ( बडोदें साहित्यसंमेलन )

## कलेचें ध्येय

कला म्हणजे परमोच्च ऐक्य होय. कला सर्वांच्या हृदयांना एका समुद्रांत डुंबायला लावते. सारे एकदम हंसतात, एकदम थरारतात ! सर्वांना स्वत्वाचा विसर पाडून ऐक्यांत बुडविणारी कला धन्य नाहीं असें कोण म्हणेल ?

— साने गुरुजी : ( श्याम )

## कलेचें स्वरूप

जगाच्या बाल्यावस्थेंत कला ही देवदासी होती, त्याच्या प्रौढावस्थेंत ती राजदासी झाली व आज या भांडवलशाहीच्या युगांत ती अर्थदासी होऊन बसली आहे.

— ग. त्र्यं. माडखोलकर

**कलेचा आनंद**

कोणत्याहि कलाकृतीची निर्मिति जेव्हां कलावंत करतो, तेव्हां त्याला आपल्या मनांतील कल्पनांना मूर्त स्वरूप येत असलेलें पाहून आनंद होत असतो. चित्रकार जेव्हां मनांतील संज्ञेबरहुकूम हातांनीं आकृति काढतो, गायक मनांत आलेली स्वर-प्रणाली घशांतून बाहेर काढतो किंवा कोष्टी मनांत योजलेला वाण तंतूंनीं विणून प्रत्यक्ष सिद्ध करतो, त्या वेळीं त्यांना होणारा आनंद आणि लेखकाला आपल्या कृतीचा होणारा आनंद सारखे आहेत.

— प्रा. चिं. वि. जोशी : ( मी कां लिहितों ? )

**विनोदाचें कार्य**

जीवन-सत्त्वें शोषून घेणारे चिंतेचे आणि दुःखाचे जे अनेक जंतु आहेत, ते विनोदाच्या पिचकाऱ्यांनीं मारले जातात...समाजाला सुधारण्याचें आणि आनंद देण्याचें विनोद हें एक अत्यंत सूक्ष्म आणि प्रभावी शस्त्र आहे. उत्तम विनोदाचें हें लक्षण आहे कीं, त्यामुळें त्याच्या विषयाचा तिरस्कार न वाटतां त्याबद्दल अधिक सहानुभूति आणि जिव्हाळा वाचणाऱ्याच्या किंवा ऐकणाऱ्याच्या अंतःकरणांत निर्माण व्हावयाला पाहिजे.

— आचार्य अत्रे : ( बाळकरामाची प्रस्तावना )

**स्वच्छ मनाचा परिणाम**

आकाशाचें प्रतिबिंब सर्वत्र पाण्यांत पडलेलें असतें, परंतु निर्मळ पाण्यांत तें स्पष्ट दिसतें. त्याप्रमाणें परमेश्वराचें प्रतिबिंब निर्मळ हृदयांत स्वच्छ पडलेलें दिसून येतें.

— साने गुरुजी : ( शबरी )

## विद्येची थोरवी

विद्येवांचून मान नाहीं, विद्येवांचून द्रव्य नाहीं अन् विद्येवांचून मनुष्यपणहि नाहीं.

— महादेवशास्त्री जोशी : ( कविभूषण )

## शिक्षण व चरितार्थ

शिक्षण म्हणजे पोट कसें भरावें हें शिकविणें असा अर्थ नाहीं हें जितकें खरें आहे, तितकेंच शिक्षणानें पोट कसें भरावें तें कळूं नये असा अर्थ नाहीं हेंहि खरें आहे. आज माजलेली बेकारी ही शिक्षणामुळें माजली आहे हें म्हणणें जितकें चूक आहे, तितकेंच आजच्या शिक्षणानें बेकारींतून पुढें मार्ग कसा काढावा हें सुचत नाहीं असें म्हणणें बरोबर आहे. बेकारी व शिक्षण यांचे पाय असे एकमेकांत गुंतलेले आहेत.

— द. वा. पोतदार

## आवश्यक शिक्षण

ज्याची आयुष्यक्रमांत पदोपदीं आवश्यकता आहे असं कांहींतरी आपण विद्यार्थ्यांना शिकवलं पाहिजे. त्यांना चांगल्या संवयी शिकवल्या पाहिजेत, त्यांना प्रामाणिक बनवलं पाहिजे.

— ना. धों. ताम्हनकर : ( दाजी )

## मंदिरीं नको हें द्वैत

देवासमोर जातीव्यक्तींच्या नांवानें शून्याकार होऊं दे. तेथेंहि मोठेपणा मिरवणार का ? तेथें मातीचे कण व्हा, पाण्याचे बिंदु व्हा व त्या अनंतांत मिसळा. येऊं देत सारे. येऊं देत आईजवळ सारीं लेंकरें. पावित्र्य व प्रेम यांचा पूर येऊं दे क्षणभर ! भेदातीतता, अद्वैत सर्वांना अनुभवूं दे.

— साने गुरुजी : ( श्याम )

## खेळ खेळण्याची रीत

हारजीत गंमत माना. खेळ खेळतांना अटीतटीनें खेळावें; परंतु शेवटीं परिणाम कोणताहि होवो, तो गोडीनें घ्यावा.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जुन्या खेळांना नवें रूप

पूर्वीचे खेळ जात चालले, नवीन करमणूक अजून आली नाहीं; म्हणून सारें निर्जीव वाटतें. जुन्या कलांत नवीन अर्थ ओतून त्यांचें पुनरुज्जीवन करायला हवें. नवीन गाणीं द्या, नवीन संकेत द्या, नवीन रंगरूप द्या. नवनिर्मितीचें हें काम अजून करायचें आहे.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## पतंगांतील काव्य

मला आकाशांतील पतंग बघायला फार आवडतें. हजारों पतंग आकाशांत नाचत असावेत. जगूं हजारों फुलपांखरें-हजारों पक्षी उडत आहेत ! कधीं वाटतें कीं, हे पतंग म्हणजे मानवी आशाआकांक्षा. हे पतंग म्हणजे मानवी मनें, मानवी आत्मे. प्रत्येकाची उंच जाण्यासाठीं ही धडपड जणूं चाललेली आहे.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## कोंवळा जीव

लहान मूल या अफाट जगांत येऊन उभें रहातें. तें प्रेम, माया, सहानुभूति यांचें भुकेलेलें असतें. कोणीं मारलें तर त्याला काय बरें वाटत असेल ? एवढासा मी लहान जीव ! या जगांत आलों. कां हे मला बोलतात-मारतात ?

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

**पतंग उडविणारा मुलगा**

चिमुकला त्याचा हात. कर्दळीच्या कोंबासारखा. निमुळता व नाजूक. पतंगाला हिसके देतांना वरखालीं नाचे, आणि तोंडही किंचित् वर उचललें, अर्ध्या उमलत्या फुलांच्या गेंदाप्रमाणें. गालांवर लालभडक ठिपके. जशा कांहीं जास्वंदीच्या कळ्या चिरडलेल्या त्यांजवर. पतंग वर उडाला कीं, गालावर हंसू उमलें; खालीं आला कीं हंसू मावळें. पतंग गिरक्या खाई, तशी याची चिमुकली मानही ऐटींत हले कमळाच्या देंठासारखी मागेंपुढें.

— आचार्य अत्रे : ( साखरपुडा )

**पतंगाचा खेळ**

मनुष्यानें पतंगाचा हा खेळ आपल्या मनाच्या खेळा-वरून का शोधून काढला ? कीं या सृष्टींत पांखरें नाचत असतात, तशीं आपणहि नाचवावीं असें मानवाला वाटलें ? खेळाचा उगम कसाहि असो, तो मोठा रमणीय आहे यांत शंका नाहीं. पतंगाला दोरी नसेल तर सारें फुकट. कोठें तरी आधार हवा. मनुष्य तेव्हांच उंच जाऊं शकेल, जेव्हां जीवनांत कोठें तरी निष्ठा असेल, श्रद्धा असेल. ही श्रद्धा, ही निष्ठा मानवाला धडपड करायला शिकविते, त्याला पुन:पुन्हा उंच चढायला शिकविते.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

**पदवी म्हणजे जबाबदारी**

पदवी म्हणजे ऐषआरामाचा परवाना नसून स्वीकार-केलेली भूमिका उत्तमोत्तम प्रकारें पार पाडण्याची जबाबदारी.

— ना. धों. ताम्हनकर : ( गुजाताई )

## यशाचा मार्ग

परीक्षांचे निकाल लागल्यामुळें जिकडे तिकडे पास झालेलीं मुलें मोठ्या खुषींत आहेत; नापास झालेलीं दुःखी आहेत. वर्षभर केलेले श्रम फुकट गेले म्हणून वाईट वाटणें स्वाभाविक आहे. परंतु त्यांनीं वर्षभर श्रम केले होते का? ते श्रम पायाशुद्ध होते का? नीट समजून रोज थोडासा नियमित अभ्यास केला तर पास होणें कठीण नसतें. मुलें परीक्षा जवळ आली म्हणजे जागीं होतात आणि मग यश न मिळालें तर खट्टू होतात.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें

## मधली सुटी

शाळेला मधली सुटी झाली होती. कोंडलेलीं पांखरें बाहेर उडून आलीं होतीं. कोंडलेलीं वासरें बाहेर मोकळीं हिंडत होतीं. सूरपारंब्याचा खेळ आंब्याच्या झाडावरून मुलें खेळत असत. जणुं तीं वानरच बनत व भराभर उड्या मारीत. कोणी घरून आणलेलें फराळाचें खात होतीं. कोणी झाडावर बसून गात होतीं; कोणी फांदीवर बसून झोके घेत होतीं.

— साने गुरुजी ( श्यामची आई )

## शिक्षणसंस्थेचें कार्य

व्यक्ति अल्पायु असली तरी संस्था चिरायु असते. शिक्षणसंस्था तेलाच्या चिमण्यांनीं जरी नाहीं, तरी ज्ञानमय प्रदीपांनीं तुमचें घर प्रकाशित राखील.

— ना. धों. ताम्हनकर : ( दाजी )

## मुलांचे गुण

पांखरांची चपलता, प्रातःकालची सौम्य उज्ज्वलता, निर्झराचा खळखळाट यांचा त्रिवेणीसंगम मुलांमध्यें दिसतो.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## नवजगाची आशा

मुलें म्हणजे नवजगाची आशा. उद्यांचे जग बनविणारी थोर शक्ति म्हणजे मुलें. त्यांच्याजवळ क्षुद्र, संकुचित असें कांहीं नेऊं नये.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## शाळेंतील मुलें

झाडाच्या फांदीवर चिमण्या बसाव्यात तशीं पोरें बांकावर एकमेकाला बिलगून बसलीं होतीं. गुलाबाच्या गेंदाप्रमाणें गोजिरवाणीं त्यांचीं तोंडें, चिमणेसे ओंठ, चिमणेसे गाल आणि हरणासारखे काळेभोर टपोरे डोळे. भित्र्या डोळ्यांनीं बिळांतून ससा बघतो तसें त्यांनीं मास्तरांकडे पाहिलें. वांधावरचें कोंवळें गवत उघड्या वाऱ्यांत कांपतें, तशीं तीं कांपत होतीं.

— आचार्य अत्रे : ( साखरपुडा )

* लहानपणीं आपला आत्मा मोकळा असतो. आपल्या मनोबुद्धीला जणूं त्या वेळेस पंख असतात.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* मनुष्याच्या आयुष्यांतील अत्यंत मधुर, अत्यंत सरळ, अत्यंत पवित्र व अत्यंत रहस्यमय असा जर कोणता काळ असेल तर तो काळ बाळपणाचा.

— ना. ह. आपटे : ( झाला कारण शिक्षण )

## धर्माचें स्वरूप

दुसऱ्याचा विचार करायला जो शिकला त्याच्या जीवनांत धर्म येऊं लागला. धर्म म्हणजे समुद्रांत आंघोळ करणें नव्हे, वडावर जाणें नव्हे. धर्म म्हणजे दुसऱ्याच्या भावना ओळखायला शिकणें, इतरांचें सुखदुःख पाहणें, त्यांच्याशीं एकरूप होणें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## खऱ्या धर्माचा उदय

ज्या दिवशीं जगांतील एकूण एक मनुष्याला पोटभर खातां येईल, आनंदानें नीटशा घरांत राहतां येईल, अंगभर नीट कपडा स्वाभिमानानें घालतां येईल, थोडेंफार ज्ञान मिळवितां येईल, थोडा फार कलाविलास करतां येईल, त्या दिवशीं जगांत धर्माचा उषःकाल होईल. त्या दिवशीं दुनियेंत धर्माचा अवतार झाला असें म्हणतां येईल.

— साने गुरुजी : ( जीवनकलह )

## तारक धर्म

धर्म अफू नसून अमृत असेल तर जनतेची मरणकळा दूर करायला तो धर्म येईल. धर्म सर्वांच्या संसाराची नीट धारणा व्हावी म्हणून धडपडेल.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## धर्माची वसती

सर्वांच्या भुका—शारीरिक व मानसिक भुका-यांची नीट धारणा जेथें होते, सर्वांचा संसार जेथें सुखाचा होतो, तेथें धर्म असतो.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## धर्माचें गमक

धर्म म्हणजे माणुसकी-मानवाची मान उंच करणें म्हणजे धर्म. तरुणांनीं या मानव्याचें उपासक व्हावें. कोणाची मान ताठरलेली नको. कोणाची वांकलेली नको. जगांत दीनवाणेपणा नको. जगांत मगरूरपणा नको. जगांत सरळपणा पाहिजे आहे.

— साने गुरुजी : ( जीवनकलह )

## धर्माचें फल

धर्म हें मनाच्या रोगावरील औषध होय व त्या धर्मांत निष्णात असणारे साधु पुरुष हे व्याधिग्रस्त झालेल्या मनाचे वैद्य होत.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## खरा धर्म

स्वातंत्र्य, समता, करुणा वगैरे सर्वमान्य सद्‌गुणांचें संरक्षण व संवर्धन होऊन सर्वांची संसारयात्रा सुखावह होईल अशा धर्माचें अवलंबन करा. अशा रीतीनें लवकर वागूं लागाल तरच तराल; नाहींतर ठार बुडाल !

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## धर्माचा झरा

हृदयांत प्रेमनिर्झर असल्याशिवाय धर्मवृक्ष वाढत नाहीं. धर्मवृक्षाचें जीवन शुद्ध प्रेम, त्याचें फळ पवित्र वीर्य, कर्म व त्याचा अंगभूत सुवास म्हणजे निःश्रेयस व शांत सुख.

— वा. म. जोशी : ( रागिणी )

## धार्मिक कोण ?

तो खरा मातृपूजक, जो दुसऱ्या मातांचीहि पूजा करतो; तो खरा धर्मपूजक, जो इतर धर्मांबद्दलहि आदर दर्शवितो.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## सर्वधर्मी समानत्व

सर्व धर्मांविषयीं उदार भावना असूं दे. धर्म हा मातेसारखा आहे. मला माझी धर्म—माता प्रिय आहे. मी मातृपूजक आहें, म्हणून दुसऱ्याच्या आईची निंदा तर नाहींच करणार, उलट त्या मातेलाहि वंदन करीन.

— विनोबा भावे : ( जीवन—दृष्टि )

## परधर्मसहिष्णुता

परधर्मीय असले तरी ते माझे शेजारी. त्यांचे धार्मिक उत्सव, सण नीट साजरे व्हावेत म्हणून मलाहि आस्था हवी.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## धर्माचें बंधन

धर्म सुटला म्हणजे समाजाचीं बंधनें सुटलीं असें समजावें. समाजाचीं बंधनें तुटलीं म्हणजे आकर्षणशक्तिखेरीज आकाशांतील सूर्यादिक ग्रहमालेची किंवा सुकाणूखेरीज समुद्रावर तारवाची जी स्थिति व्हावयाची, तीच समाजाचीहि होत असते.

— लो. टिळक : ( गीतारहस्य )

## सच्चा धर्म

संसारांतील दुःखांचा विसर ज्या योगानें पडतो आणि जीवांच्या ठिकाणीं प्रसन्न वृत्तीचा परिपोष ज्या योगानें होतो तोच सच्चा धर्म होय.

— ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

## ईश्वराची प्रार्थना

प्रभो, मला हात दे. मी तुझें लेंकरूं. मला पडूं देऊं नकोस. मला नीट मार्गाला लाव. मला शिकव. प्रकाश दे. ये, देवा, माझ्या हृदयांत ये आणि पुन्हां येथून जाऊं नकोस. मला शुद्ध कर, निर्मळ कर.

— साने गुरुजी : ( नवजीवन )

## प्रार्थनेचं महत्त्व

प्रार्थनेंत दैववाद आणि प्रयत्नवाद ह्यांचा समन्वय आहे. दैववादांत पुरुषार्थाला अवकाश नाहीं, म्हणून तो बावळा. प्रयत्नवादांत निरहंकार वृत्ति नाहीं, म्हणून तो माजरा. मिळून, दोन्ही घेतां येत नाहींत. बरें, दोन्ही टाकतांहि येत नाहींत. कारण, दैववादांत नम्रता आहे; ती पाहिजे. प्रयत्नवादांत पराक्रम आहे; तो पाहिजे. प्रार्थना ह्यांचा मेळ घालते. प्रार्थना म्हणजे अहंकाररहित प्रयत्न.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## हृदयांतील हिमालय

जे झरे, जे पर्वत, जे पवित्र तारे, जे शुभ वारे तुला तेथें अनुपम आनंद देतात, त्या सर्वांचा अनुभव मी माझ्या हृदयांत घेऊं शकतों. माझ्या अंतःसृष्टींत हें सारें रमणीय दृश्य मी रोज पहात आहें. माझ्या हृदयांतील भव्य-दिव्य हिमालय सोडून तूं तिकडे बोलावलेंस तरी मी येणार नाहीं. — विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## देवाची देणगी

देव कोठली तरी संपत्ति देत असतो. कोणाला चांदी-सोन्याची, माणिक-मोत्यांची संपत्ति देतो. कोणाला कोमल भावनांची दौलत देतो. — साने गुरुजी : ( रामाचा शेला )

### विश्वाची होडी

ईश्वराच्या दृष्टीनें सारी मानवजात, एवढेंच नव्हे तर सारें विश्व एक आहे. आपण एकाच बोटींत सारे बसलेले आहोंत. दुसरा कोणी भोंक पाडूं लागला तर का आपणहि पाडायचें ? तसें करूं तर बोट लौकरच बुडेल. आपण मारक न होतां तारक व्हावें.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

### वारकरी

वारकरी पंथानें महाराष्ट्रांत एकता निर्मायला अपार मदत केली. पंढरपूरच्या वाळवंटांत तरी भेदभाव दूर केला. महाराष्ट्रांतून लाखों लोक एकत्र यायचें, पायीं यायचे, नामघोष करीत यायचे. आपण सारे एक, एका राष्ट्राचे ही भावना बळावे.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

### मानव तितका एक

मानवी मन सर्वत्र एकच आहे. वरची कातडी गोरी असो कीं काळी असो, आंतील भुका त्याच असतात. आंतील आशा–आकांक्षांचे, नाना कल्पनांचे वासना-प्रकार समानच असतात.

– साने गुरुजी : ( आस्तिक )

### दैवताचें विडंबन नको

एकादें दैवत म्हणून जर मानायचें असेल किंवा मानायला लावायचें असेल तर रागांत–थट्टेत–विनोदांतहि त्या दैवताचें विडंबन होतां कामा नये !

–य. गो. जोशी : ( होमकुंड )

## ईश्वराचें स्वरूप

सर्व जग हेंच ज्या परमेश्वराचें देऊळ त्याला त्याचे उपासक दुसरें देऊळ काय बांधणार, जगाच्या बाहेरील कोणत्या उपकरणांनीं बांधणार आणि या जगाच्या पलीकडील कोणत्या जागेमध्यें बांधणार? ज्याच्यापासून सर्व वाणी निवृत्त झाल्या, त्याचीं स्तोत्रें मनुष्य काय म्हणणार? व जो डोळ्यांना दिसत नाहीं त्याला उपासक लोक डोळे भरून काय पाहणार? अशा प्रकारच्या अनेक व्यावहारिक अडचणींच्या परिहारासाठीं ज्या मूर्तींचे अवतार झाले त्या मूर्तींची आपल्या लोकांनीं अनादि कालापासून उपासना चालविली आहे.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## ईश्वर लपलेला नाहीं

हिरेमाणकें, चांदीसोनें पृथ्वीच्या पोटांत लपलेलें असतें. मोतींपोवळीं रत्नाकर समुद्रांत लपलेलीं असतात. तसें का हें परमेश्वररूपी लाल रतन लपलेलें आहे? देव का कोठून खणून वर काढायचा आहे? हा सर्वत्र समोर देवच उभा आहे.

— आचार्य विनोबा भावे ( गीता-प्रवचनें )

## ईश्वराचा साक्षात्कार

मनुष्याचें मन परमेश्वराची जेथें कल्पना करील तेथें परमेश्वर उभा राहील आणि मनुष्याचा कंठ जेथें परमेश्वराला हांक मारील तेथें तो त्याच्या हांकेला हांक देईल.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

[library stamp, handwritten accession marks]

## आस्तिकतेचें फल

समुद्र आटेल, पर्वतांचा चुराडा होऊन जाईल, ध्रुवहि आपल्या स्थानापासून ढळेल; पण मांगल्यावर श्रद्धा असलेल्याची शांति ढळणार नाहीं. याचेंच नांव आस्तिकता.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## परमेश्वराचें अस्तित्व

अप्रतिम सृष्टिशोभा पाहून मनुष्याच्या प्रतिभेला वाचा फुटते, त्याच वेळीं त्या शोभेचा कोणी तरी सर्वशक्तिमान् कर्ता असला पाहिजे असा प्रत्यय त्याच्या बुद्धीला येतो. ईश्वराचं अस्तित्व मनाला पटलं कीं आपलं हें आयुष्य वाटेल तसं वायां घालविण्याची मोकळीक आपल्याला नाहीं असं मनुष्याचं मन त्याला सांगतं.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## खरी भक्ति

आपल्या हातून पूर्ण निर्दोष कर्म होत नाहीं म्हणून वाईट वाटणें यांत सारा धर्म आहे. हे जे अपूर्णतेचे अश्रु डोळ्यांतून घळघळतात त्यांत भक्तीचा जन्म आहे. गटे या जर्मन कवीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, " जो कधीं रडला नाहीं त्याला देव दिसणार नाहीं." स्वतःच्या अपूर्णतेचे अश्रु डोळ्यांत येऊन डोळे धुतले जातात, डोळे निर्मळ होतात, सर्वत्र भगवंत दिसूं लागतो आणि या भगवंताची सेवामय पूजा करायला अपरंपार उत्साह व उल्हास वाटतो.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## श्रद्धेची कसोटी

जें आपल्याला प्रिय आहे त्याचा सतत प्रचार करणें यांतच खरी श्रद्धा आहे. संतांना रामनाम आवडे, त्यांचा त्यांनीं सर्वत्र प्रचार केला.

– साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें–भाग १ )

## श्रद्धेचा आधार

आयुष्याची नौका कोणत्या ना कोणत्या श्रद्धेच्या जोरावरच वल्हवली जाते. श्रद्धेवांचून जीवन म्हणजे मेलेलं जगणं.

– विभावरी शिरूरकर : ( विरलेलं स्वप्न )

## ईश्वरी श्रद्धेचा आरंभ

जेथें मनुष्याच्या कर्तृत्वाची मर्यादा खुंटते तेथें मनुष्याची देवाच्या अनुकूल कर्तृत्वाविषयींची कल्पना सुरू होते.

– शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## वीराची श्रद्धा

श्रद्धा म्हणजे मरण आहे. श्रद्धा म्हणजे सुळावरची पोळी आहे. श्रद्धा स्वस्त वस्तु नाहीं. परंतु तुमची श्रद्धा ही बाजारी श्रद्धा आहे. असल्या बावळट श्रद्धेला मूठमातीच दिली पाहिजे. वीरांची श्रद्धा पाहिजे. तुमच्यासारख्या या अभिषेकी व नवशी श्रद्धेपेक्षां 'देव नाहीं' असें म्हणणारा प्रांजल कर्मवीर अधिक श्रद्धावान होय. स्वतःच्या प्रयत्नावर तरी त्याची श्रद्धा असते–पुरी पुरी असते. मागून येणारे माझें काम पुरें करतील अशी श्रद्धा त्याचीहि असते.

- साने गुरुजी : ( श्याम )

## गुरु-भक्ति

तुमचें झाड लाविलें, तोडाल तरी आतां तोडा; वाढवाल तरी वाढवा. या गोष्टीस नादर ( कंगाल ) कोण आहे ?

— पहिला बाजीराव : ( ब्रह्मेंद्रस्वामीस पत्र )

## गुरु व शिष्य

साधूंच्या दर्शनानें आपलें हृदय पवित्र व्हावें, त्यांचें वैराग्य आपल्यांत उत्पन्न व्हावें, त्यांची ईश्वरावरील निष्ठा आपल्यांत जागावी आणि त्यांच्याइतकीच तपश्चर्या करण्याचें आपल्यांत निश्चयबळ यावें, अशी इच्छा धरणें योग्य आहे; पण त्यांचा प्रसाद म्हणून आपल्याला कांहीं तरी मिळावें आणि अनायासें, विनाश्रम आपण सुखी व्हावें अशी इच्छा धरण्यांत पामरताच आहे.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## साधूंची गरज

ज्यांनीं हिंदुस्थान देशाचें पुनरुज्जीवन केलें आणि धर्माच्या पाटाचें पाणी खुलें करून स्वराज्य, समाज-सुव्यवस्था, राष्ट्रीय उत्कर्ष इत्यादि फुलझाडांना टवटवीत-पणा आणिला, त्या महा साधुपुरुषांची आज हिंदुस्थानला फार अपेक्षा आहे.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## अंधश्रद्धेच्या वेळा

थंडीच्या दिवसांत धुकें पडतें तें सकाळीं किंवा संध्याकाळीं ! मानवी मनांतही अंधश्रद्धा प्रबळ होण्याच्या वेळा दोनच असतात—पहिली बाळपण आणि दुसरी म्हातारपण !

— वि. स. खांडेकर : ( सतरा जून )

## सेवेचा प्रभाव

ज्ञानानें एकाद्याची बुद्धि जिंकतां येईल, पण हृदय जिंकायचें असेल तर तें सेवेनेंच जिंकलें पाहिजे. जसा गुरु, जसा देव सेवेनें प्रसन्न होतो, तसा जनताजनार्दनहि होतो.

— महादेवशास्त्री जोशी : ( कल्पवृक्ष )

## सेवेचें फल

हृदयांत अपार सेवा भरलेली असली कीं सर्वत्र मित्रच दिसतात. अंधार मित्र वाटतो, कांटे फुलांप्रमाणें वाटतात, संकट सखा वाटतें.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## सेवेचें सुख

सेवेकरितां राबायला लागल्याबरोबर ह्या मानवी देहाच्या अणुरेणूंतहि स्वर्गसुख सांठलें आहेसें मला वाटतें. मनोभावें राबणें म्हणजेच पृथ्वीवरचा स्वर्ग. क्षीरसागरां-तल्या सुखाला दूर सारून परमेश्वरहि मृत्युलोकाच्या ह्याच राबण्याच्या सुखासाठीं अवतार घेत असतो.

— कृ. प्र. खाडिलकर : ( मेनका )

## भक्ति व यत्न

भगवद्भक्ति आणि स्वतःचे परिश्रम हेंच धन होय, आणि हाच परिस होय. हा परिस जेथें न्यावा तेथें द्रव्याला काय तोटा ?

— शि. म. परांजपे : ( ते साधुसंत कोठें गेले ? )

## सेवेचें माहात्म्य

स्तोत्रापेक्षां सेवेनेंच ईश्वर प्रसन्न होतो.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## विद्वानाची कसोटी

संकटकाळीं ज्याची बुद्धि चमकते तोच खरा पंडित. बहुतेकांची बुद्धि संकटकाळीं भांबावते.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें-भाग २ रा )

## बोलकीं पुस्तकें

मुलांची परीक्षा त्यांच्या पुस्तकांवरून, वह्यांवरून करावी. मुलगा गबाळा आहे कीं व्यवस्थित आहे हें त्यावरून दिसेल.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## विनय शोभवी सकलां

विनय हा गुण सर्व सद्‌गुणांचा अलंकार आहे. विद्या आणि कलासुद्धां 'विनयेन शोभते' असें मोठीं माणसें सांगतात. थोर पुरुषांचें भांडवल म्हणजे विनय. त्याला ते कधींहि दूर ठेवीत नाहींत.

— महादेवशास्त्री जोशी : ( पुत्रधर्म )

## स्वावलंबी वृत्ति

भारतांतील मुलें स्वावलंबी झालीं पाहिजेत. श्रमावें, कष्टावें यांत परमानंद मानणारीं तीं व्हावींत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## घर म्हणजे जिव्हाळा

घर ही गोष्ट दगडविटांनीं बांधली जात नाहीं. जिव्हाळ्याच्या व प्रेमाच्या धाग्यांनीं जें बांधलें जातें, तेंच खरोखर घर या संज्ञेला पात्र होऊं शकतें.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## स्त्रीचें माहात्म्य

पुरुष ही परमेश्वराची कीर्ति असेल, तर स्त्री ही त्याची प्रत्यक्ष मूर्ति आहे. मातृरूपानें तुम्हांला जन्म देणाऱ्या, पत्नीरूपानें तुमची जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारूपानें तुमच्या उदरीं जन्म घेणाऱ्या—तुमच्या आयुष्यांतल्या तिन्ही अवस्थांत तुम्हांला कोंवळ्या प्रेमाची साक्ष पटवून पुत्र, पति आणि पिता या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजूं नका. विश्वांतल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजयपताका आहे !

— रा. ग. गडकरी : ( पुण्यप्रभाव )

## स्त्रियांचें शिक्षण

स्वैंपाकघर, माजघर हाच आमच्या बायकांचा खरा भूगोल आणि घरांतील गाऱ्हाणीं व शेजाऱ्यांच्या नाळस्त्या हाच त्यांचा खरा इतिहास आहे. पक्वान्नें करणें हेंच त्यांचें रसायनशास्त्र आणि कुंकूं लावणें व गोंदणें हीच त्यांची चित्रकला आहे. पतीचें हृद्गत जाणणें हें त्यांचें गणित आणि चाळणें, पाखडणें व निवडणें हें त्यांचें तर्कशास्त्र होय.

— श्री. कृ. कोल्हटकर : ( माझ्या भीष्मप्रतिज्ञेचा विजय )

## स्त्रियांची स्थिति

आम्ही डोळे असून आंधळ्या, कान असून बहिऱ्या, जीभ असून मुक्या, हात असून थोट्या आणि पाय असून लंगड्या.

— हरिभाऊ आपटे : ( पण लक्षांत कोण घेतो )

## स्त्रिया म्हणजे देवता

भारतीय स्त्रियांच्या कष्टाळूपणाला व क्षमावृत्तीला एक भूमातेचीच उपमा शोभेल, दुसरी नाहीं. अशा थोर स्त्रिया ज्या घरांत असतात, तीं मला राउळें, देवाचीं मंदिरेंच वाटतात. त्या स्त्रिया ह्याच मी देवता मानतों व माझा माथा त्यांच्या चरणीं नमवितों.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## स्त्री–पुरुषांची समता

स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या, आणि पाहिजे तेव्हां लग्नें करून हवा तसा संसार करावा अशी मोकळीक कालांतरानें सर्वांस मिळणार आहे.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## स्त्री–स्वातंत्र्य

भारतांत स्त्रियांची आजवर अवहेलना झाली. विवेकानंद स्त्रियांची दुर्दशा बघून रडले. जोवर स्त्रियांचा आत्मा मुक्त होत नाहीं तोंवर भारताला आशा नाहीं. स्त्रिया हीं आधीं माणसें आहेत. मानवतेचे सर्व हक्क त्यांना मिळाले पाहिजेत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## हिंदु स्त्रिया

पण बाबारे, आम्ही घरांत असलेलीं मुकीं जनावरें ! कोणी मारलं, मार खाल्ला पाहिजे; जा म्हटलं, गेलं पाहिजे; नको म्हटलं, थबकलं पाहिजे.

— हरिभाऊ आपटे : ( मी )

### लग्नामुळें पूर्णता

लग्न करून पुरुष कोमलता शिकतो, हृदयाचे गुण शिकतो, स्त्रीबुद्धीचे गुण शिकतो. विवाह म्हणजे हृदय व बुद्धि, भावना व विचार यांचें मधुर मिश्रण, मधुर सहकार्य होय. पुरुषांच्या हृदयांत स्त्रीगुण येणें व स्त्री-जवळ पुरुषगुण येणें म्हणजे विवाह होय. अर्धनारी-नटेश्वर हें मानवाचें ध्येय आहे. खरा पुरुष अपूर्ण आहे, स्वतः एकटी स्त्री अपूर्ण आहे. परंतु दोघे एकत्र येऊन दोन पूर्ण व्यक्ति बनतात.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

### विवाहाचा अर्थ

विवाह म्हणजे शेवटीं विलास नसून विकास आहे. परस्परांचा सर्वांगीण विकास व स्वतःच्या विकासानं समाजाचा विकास. विवाह म्हणजे सहकार्य, विवाह म्हणजे संयम; विवाह म्हणजे विकास, विवाह म्हणजे सेवा; विवाह म्हणजे दिवसेंदिवस पशुतेचा होम व ध्येयगिरीवर आरोहण.

— साने गुरुजी : ( संध्या )

### पत्नीचें कर्तव्य

मी सुमार्गानें चाललों असतां आपल्या कृपाकटाक्षानें उत्तेजन देणारी व मी उन्मार्गगामी होऊं लागलों असतां मला प्रेमरज्जूनें आवरणारी स्त्री कोठें मिळणार ?

— श्री. कृ. कोल्हटकर : ( वधूपरीक्षा )

* जगणं म्हणजे झोपाळ्यावर बसून झोके घेणें नव्हे. जीवन हें वादळांतून होडी हाकण्यासारखं आहे !

— वि. स. खांडेकर

### आईचें ऋण

आईपणा ही गोष्ट अशी आहे कीं, ज्याच्यापुढं जगानं कृतज्ञतेनं मस्तक नमवावं ! स्त्री ही माता झाली म्हणजे समाजाच्या ऋणांतून ती मुक्त होते—नव्हे समाजच उलट तिचा ऋणी होतो. आणि जिनं समाजाला ऋणी केलं, त्याची परंपरा पुढं चालू ठेवायला हातभार लावला, तिला समाजानं कमी लेखणं कृतघ्नपणाचं होणार नाहीं काय ?

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( मुक्तात्मा )

### आईचा उपदेश

कसाहि रहा, परंतु चोरी-चहाडी करूं नको, पाप करूं नको, सत्याचा अभिमान सोडूं नको. गोड बोलावें, हंसतमुख असावें. जीभ गोड तर सारें जग गोड. मित्र-मंडळी जोड. कोणाला टाकून बोलूं नको, हृदयें दाखवूं नको. अभ्यास झटून कर. आईबापांची आठवण ठेव, बहीणभावांची आठवण ठेव.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

### मातेची महति

स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत कालाची माता आहे. पत्नी ही एखाद्या व्यक्तीचें जीवन असली तर माता ही साऱ्या वंशाचें जीवन आहे.

— आचार्य अत्रे : ( घराबाहेर )

* मुलानें आईजवळ क्षमा मागितली तर आईला कसेंसेंच होतें. मुलानें आईजवळ जावें, तिला बिलगावें. आईनें कधींच क्षमा केलेली असते. तिला तुमच्या प्रेमाची अपेक्षा असते.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## खरा मित्र

त्या त्या प्रसंगीं सुमधुर प्रशंसा, धीरगंभीर शब्द, प्रेमळ उत्तेजन, सहानुभूतिमय सांत्वन आणि कठोर उपदेशवाणी ज्याच्याकडून लाभते तोच खरा मित्र होय. आपल्याला सुखविण्याचे वेळीं तो कुसुमाहून मृदु असतो, पण आपल्याला जागृत ठेवण्याचें वेळीं तो वज्राहून कठीण बनतो. — ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

## मित्र

माझे मित्र हेंच माझें अव्याज आणि अक्षय धन आहे— कोणत्याही हांकेला धावणारें माझें हुकमी भांडवल आहे.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( एका निर्वासिताची कहाणी )

## मैत्रीचें स्वरूप

हार्दिक मैत्रींतील दोन हृदयें सुखदुःखानें तुडुंब भरलेलीं असतात. एकमेकांसाठीं त्यांचा उपसा करायचा, पुनः तीं भरून यायचीं. जिवंत भावनांचे झुळझुळते झरेच त्या मैत्रीला जिवंत ठेवीत असतात.

— विभावरी शिरूरकर : ( हिंदोळ्यावर )

## स्नेहाची ओळख

रुपाया हरवला म्हणजे नाणें-खुर्दाचीहि अपूर्वाई वाटूं लागते. स्नेहाच्या बाबतींतही तसेंच. स्नेही अवतींभवतीं वावरत असला म्हणजे त्याच्याकडे आपण फारसें लक्ष देत नसलों तरी तो नजरेआड झाल्यावर त्याच्या किरकोळ गोष्टींचीदेखील वरचेवर आठवण येते, त्याचें कौतुक वाटूं लागतें.

— ना. धों. ताम्हनकर : ( दाजी )

## पत्रांची गोडी

मानवी संस्कृतीला आलेल्या विविध फळांची तुलना केली, तर पत्रांना चिमुकल्या, रसदार, मधुर काबुली द्राक्षांचीच उपमा द्यावी लागेल. काबुली द्राक्षांचें असें आहे कीं, तीं पाहिल्याबरोबर मनाला मोह होतो आणि शिवाय तीं सबंधच्या सबंध चट्दिशीं खातां येतात. आपल्याला पत्रें आलीं कीं तींदेखील विलक्षण मोह घालतात. तीं घाईनें वाचल्याखेरीज आपल्याला दुसरें कांहीं सुचत नाहीं. आणि तीं चटकन् साद्यंत संपवितां येण्यासारखीं असून त्यांतील कोणताही भाग त्याज्य नसतो. — ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

## पत्रांचा फायदा

पत्रें या आपल्या आयुष्यांतील तारकाच होत यांत शंका नाहीं. तारकांच्या तेजानें पृथ्वी कांहीं प्रकाशित होत नाहीं; पण भयंकर अंधारानें बावरून गेलेल्या मनुष्याच्या मनाला त्यांचा केवढा धीर असतो आणि आधार वाटतो. मनुष्याच्या गुप्त मनांत 'या जगांत आपण अगदीं एकटे आहों' ही कल्पना नेहमीं जागृत असते असें मला वाटतें. त्या कल्पनेनें उत्पन्न होणारा विचित्र अस्वस्थपणा आपल्या आवडत्या माणसांचीं पत्रेंच नाहींसा करूं शकतात. — वि. स. खांडेकर : ( आपलीं पत्रें )

* मनुष्याचा आनंद दुसऱ्याशीं एकरूप होण्यांत आहे. आपल्या भावनांशीं समरस होणारा कोणीच नसेल तर जीवनांत आनंद नसतो. — साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

### पत्रांचे विषय

मोठाली पत्रं लिहायची इच्छा असली कीं विषयांना तोटा नसतो. आणि ज्या व्यक्तीला लिहायचं तिच्याविषयीं मृदु भावना मनांत असल्या कीं मग तर पत्राचे विषय कांहीं केल्या संपत नाहींत. अगदीं क्षुल्लक गोष्टीदेखील लिहिण्याचा संकोच अगर आळस वाटण्याऐवजीं त्याबद्दलच्या उत्साहाला नेहमीं भरतीच आलेली असते.

— ना. सी. फडके : ( खेळणीं )

### स्मृतींचा आनंद

आयुष्यांतील महत्त्वाच्या प्रसंगांच्या आठवणींचीं फुलें— तीं कधींहि कोमेजत नाहींत, कधींहि सुकत नाहींत. जणूं कांहीं तीं नंदनवनांतलींच फुलें असतात ! त्यांचें चिंतन करीत असतां डोळ्यांत अश्रु आले म्हणजे ते पुनरुज्जीवित प्रसंग, दंव पडून उमललेल्या पहांटच्या फुलाप्रमाणें, मनाला आल्हाद देतात. — ग. त्र्यं. माडखोलकर : ( भंगलेलें देऊळ )

### हृदयाचा भाग

पत्र म्हणजे आठवण, भेट. जणूं आपण आपलें हृदय काढून देत असतों. पत्र म्हणजे हृदयाचा भाग. हृदयाची पोकळी. — साने गुरुजी : ( रामाचा शेला )

### कर्तव्याचें फल

कोणत्याहि कर्तव्याची पहिली चव कडवट असते; पण तिला कंटाळून भागणार नाहीं. पुढील अमृतोपम सुखाचा जन्म त्या कडवट कर्तव्याच्या पोटीं असतो.

— ना. ह. आपटे : ( गृहसौख्य )

## तारुण्यांतील महत्त्वाकांक्षा

पंचविशी हें एक असें वय आहे कीं, त्या वयांत क्षितिज लांब वाटत नाहीं, आकाश आटोक्याच्या पलीकडचें वाटत नाहीं, सागर अथांग वाटत नाहीं—सृष्टींतील कोणतीही वस्तु किंवा व्यक्ति आपल्याला मिळवितां येणार नाहीं अशा स्वरूपाची भासत नाहीं. लोकांना दिसणाऱ्या अडचणी दिसत नाहींत, पर्वताएवढालीं संकटें ठेंगणीं वाटतात व शत्रूंच्या छळाचा समुद्र गुडघ्याइतकाच खोल वाटतो !

— ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

## तारुण्याचा उत्साह

अवघें अठरावें वर्ष. त्या वेळीं शरीरांत आणि मनांत कोठल्या गुप्त शक्ति अंकुरित होतात कोण जाणे ! आशा, इच्छा, उत्कंठा, कुतूहल—आत्मा जणूं सहस्र नेत्रांनीं चौफेर न्याहाळूं लागतो. साऱ्या भावना सुखाचा बालेकिल्ला सर करण्यासाठीं दबून तयारीनें राहतात. त्या वेळीं ‘ उत्साह ’ हाच मंत्र असतो. आनंदाच्या ऊर्मी हृदयांत उसळत असतात.

— विभावरी शिरूरकर : ( हिंदोळ्यावर )

## श्रमाचें श्रेष्ठत्व

श्रम करणं हीच पवित्र वस्तु-प्रामाणिकपणाचा कोणताहि उद्योग तुच्छ नाहीं. भीक मागण्यापेक्षां, दुसऱ्यांवर विसंबून राहण्यापेक्षां समाजाच्या उपयोगाचा कोणताहि धंदा श्रेष्ठ आहे.

— साने गुरुजी : ( संध्या )

### तारुण्यांतील पीक

मनुष्याचें तारुण्याचें वय हें शौर्याचें उत्तम पीक देणारें एक पहिल्या प्रतीचें शेत होय.

— शि. म. परांजपे : ( उपसंहार )

### मानवी कर्तृत्वाचें फल

लोखंडाचे घण सोन्याचीं आणि हिऱ्याचींहि तक्तें फोडूं शकतात यांत कांहीं शंका नाहीं. आणि असले घणाहि नेहमीं तयारच असतात. ते घण उचलणारीं मनगटें मात्र पाहिजेत. तीं असलीं म्हणजे कोणतेंहि तक्त असलें तरी तें फुटलेंच पाहिजे.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

### कर्तव्य व प्रेम

कर्तव्य करावें, शोक करूं नये. शोकानें कर्तव्याची विस्मृति होते. प्रेम शेवटीं कर्तव्यांत परिणत झालें पाहिजे. पिकलेलें प्रेम म्हणजे कर्तव्य व पिकलेलें कर्तव्य म्हणजे प्रेम. शेवटीं प्रेम कर्तव्यरूप होतें व कर्तव्य प्रेमरूप होतें.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

### कृतीवरून किंमत

तुझी स्वतःची काय किंमत तें सांग. तूं कोणाचा कोण तें नको सांगूं. तुझ्या नसांतून कोणाचेंहि रक्त वाहत असलें तरी त्याचा रंग लालच असणार. तुझ्या रक्ताचा रंग तुझ्या कृतींतून प्रकट होऊं दे. तुझी किंमत तुझ्या कृतीवरून ठरूं दे.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## स्वानुभवाची शाळा

जीवन सखोलतेनें आणि उत्कटत्वानें ज्याला जगायचें आहे त्याला स्वानुभवाच्या शाळेंत शिकलें पाहिजे. या बाबतींत दुसऱ्याचा अनुभव व्यर्थ आहे–मग तो डोळ्यांनीं पाहिलेला असो, कानांनीं ऐकलेला असो किंवा पुस्तकांतून वाचलेला असो. या असल्या बाजारी अनुभवानें मनुष्य स्वतःला पुष्कळ वेळां आपण खूप शहाणे झालों आहों असें समजतों. पण जीवनांतल्या प्रखर प्रश्नांशीं प्रत्यक्ष सामना द्यावयाचा प्रसंग आला कीं त्यानें स्वसंरक्षणाकरितां स्वतःभोंवतीं उभी केलेली परानुभवाची दगडी भिंत पत्त्याचा बंगला ठरून जीवनाच्या एका फुंकरीनें पार कुठच्या कुठें उडून जाते.

– अनंत काणेकर

## कार्य करा

तूं करून पहा म्हणजे तुझ्यामध्यें काय सामर्थ्य आहे तें तुला दिसून येईल. चंदन घासल्यावांचून त्याच्यांतून सुगंध बाहेर पडत नाहीं आणि घर्षणावांचून लाकडामध्यें असलेली ज्वाळा दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

– शि. म. परांजपे : ( उपसंहार )

## श्रमांचा विनियोग

दुर्गुणांचें आचरण करतांना तुला कांहीं श्रम पडतातच. मग त्या श्रमाचा उपयोग सदाचाराकडे कां करीत नाहींस?

– ना. ह. आपटे : ( सुखाचा-मूलमंत्र )

* कर्माला भिणाऱ्या माणसांनीं जगण्यांत अर्थ नाहीं. कर्मवीरांनीं जगावं; कर्मभीरूंनीं मरावं. – साने गुरुजी

### उद्योगाचा महिमा

उद्योग व निश्चय हीं परमेश्वरप्राप्तीचीं दोन चाकें आहेत. दैव हें तिसरें चाक कोणी म्हणतात, पण तें मला आजपर्यंत आढळलें नाहीं. उद्योग करून यश आलें नाहीं तरीहि दोष नाहीं. दैव अनुकूल करून घेण्याकरितां पुनः उद्योग केला पाहिजे. उद्योगापुढें दैवाला केव्हां तरी माघार घ्यावीच लागते. उद्योग झाला म्हणजे परमेश्वराचा पदर धरून त्याला विचारूं ! पण त्यापूर्वीं उद्योग झाला पाहिजे.

— लो. बा. गं. टिळक : ( लो. टिळक यांचीं व्याख्यानें )

### उद्योगाची थोरवी

हैड्रोजन आणि ऑक्सिजन एक केले म्हणजे पाणी होतें आणि त्याच पाण्यांत साखर घातली म्हणजे तें गोड होतें. त्याचप्रमाणें योग्य प्रयत्न केला असतां यशहि येतें; यासाठीं आपण प्रयत्न केले पाहिजेत. प्रयत्नानें साध्य होणार नाहीं अशी गोष्ट या जगामध्यें कोणतीहि नाहीं. उद्योगासारखें अनुकूल आणि आळशीपणासारखें प्रतिकूल दैव दुसरें कोणतेंहि नाहीं.

— शि. म. परांजपे : ( मनापुढें खरा व स्पष्ट उद्देश )

### मानव म्हणजे उद्योग

धडपड हेंच मानवांचें भाग्य आहे. पशूंच्या जीवनांत धडपड नाहीं. आजच्यापेक्षां उद्यां पुढें जाऊं. आजच्यापेक्षां उद्यां अधिक पवित्र होऊं ही भावना त्याच्यांत नाहीं. जो मुक्त झाला त्याला ही धडपड नाहीं. ज्याच्या जीवनांत धडपड नाहीं तो मुक्त तरी असेल किंवा पशु तरी असेल.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## श्रमणारे कार्यकर्ते

समाज-जीवनाच्या वरच्या मजल्यावर बसून ज्यांनीं जगाचा उद्धार करण्याचा कारभार आरंभिला आहे असे लोक थोडेथोडके नसतात. त्यांचाही कांहीं उपयोग होत असेल, परंतु जास्त आवश्यकता आहे ती खांद्यावर चिरे घेऊन व हात चिखलांत घालून त्या मंदिरासाठीं नवा पाया घालणाऱ्या अगणित श्रमकर्त्यांची.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## श्रमाचें पावित्र्य

श्रमजीवी माणसाच्या अंगांतून गळणारें घामाचें पाणी हें सर्वांत थोर. तें पाणी म्हणजे जगाचें पोषण आहे. देव पाऊस पाडील; परंतु शेतकरी स्वतःच्या घामाचा पाऊस जर शेतांत पाडणार नाहीं तर काय पिकणार आहे? माणसांना दाणे मिळणार नाहींत, पांखरांना दाणे मिळणार नाहींत. सारी सृष्टि मरेल !

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## श्रमणाऱ्यापाशीं ईश्वर

जेथें आळशी आरामांत आहे तेथें राम नाहीं. जेथें दुःखीकष्टी जीव आहेत तेथें तो प्रभु रामचंद्र आहे. वेद म्हणतो, ईश्वर श्रमणाऱ्याच्या मैत्रीसाठीं भुकेला असतो. विश्वचालक परमात्मा श्रमणाऱ्याजवळ आहे.

— साने गुरुजी : ( श्रमणारी लक्ष्मी )

* तुम्ही प्रयत्नकर्ते व्हा. झटा, झगडा, निराश होऊं नका, म्हणजे यश तुमच्या आटोक्यांत आहे.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वींचा काळोख )

**यत्न व यश**

सिद्धीच्या मानस-सरोवरावर क्रीडा करण्याचें ज्या पिढीचें भाग्य असेल ते राजहंस सुखेनैव मुक्ताफळ-भोजन करून बिसतंतूंचा फराळ करोत! परंतु प्रयत्नांच्या मृत सरोवराच्या विषारी प्रदेशांतून ज्या पिढीस मार्ग कंठावयाचा आहे, तिनें प्रतिकूलाचे लोखंडाचे चणेच खावयाची व पचवावयाची संवय ठेवली पाहिजे.

– वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

**प्रयत्नाचा जोडीदार**

आपण प्रयत्न करतों, धडपडतों, परंतु कांहीं अज्ञात शक्ति असतात. त्या आपल्याला कोठें तरी खेंचून नेत असतात. मानवी जीवन म्हणजे मानवी प्रयत्न व अज्ञात शक्ति यांचें फलित होय.

– साने गुरुजी : ( रामाचा शेला )

**कर्मयोगाचें फल**

तुम्ही आपल्या कर्माचा पडदा जर स्वच्छ कांचेसारखा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसेल; तो गोणपाटाचा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसावयाचा नाहीं.

– लो. बाळ गंगाधर टिळक : ( लो. टिळक यांचीं व्याख्यानें )

**मनुष्य आणि नशीब**

मनुष्यरूपी मासा नशिबाच्या गळाभोंवतीं नेहमीं फिरत असतो हेंच खरें!

– य. गो. जोशी : ( होमकुंड )

* कोणतेंहि कर्म असो. त्यांत परमोच्च गांठीन अशी धडपड हवी. मिळमिळीत जीवनांत राम नाहीं.

– साने गुरुजी

## नशिबाचा आधार

प्रयत्नाचा प्रवास करीत असतां यशाचा मुक्काम गांठीपर्यंत दमलेल्या मनाला घडीभर विश्रांति घेण्याची नशीब ही एक धर्मशाळा आहे. उद्योग करणाराला एकादे वेळीं फळ मिळणार नाहीं. नशिबावर हवाला ठेवणाऱ्या माणसाचें मात्र तसें नाहीं होणार. त्यास फळ मिळण्याची सतत भ्रांति राहीलच; शिवाय पश्चात्ताप करण्याची पाळी त्याचेवर हटकून येईल.

— ना. ह. आपटे : ( रत्नगुंफा ).

## प्रयत्नांतीं यश

पहिल्या घावानें वृक्ष कोसळतांना दिसत नाहीं, शंभराव्या घावानें कोसळतांना दिसतो. परंतु वस्तुतः शंभरावा घाव जितका मारतो तितकाच पहिला घावहि मारतो.

— पु. भा. भावे : ( पतंग ).

## मुलांचे माळी

परमेश्वराच्या बागेमध्यें लहान मुलांच्या रूपानें आपल्या ह्या हिंदुस्थान देशांत जीं कोंवळीं लुसलुशीत झाडें उगवलीं आहेत, त्यांना नीट रीतीनें वळण लावणारे त्यांचे आईबाप हे एक प्रकारचे माळी आहेत.

— शि. म. पराजपे : ( हिंदुस्थानांतील प्रातिनिधींच्या महत्त्वाकांक्षा )

* समाजांतील विषमतेची कुरुपता ही दूर करीत सर्वांच्या संसारांत सुंदरता आणायची असते.

— साने गुरुजी

### दारूचे अनर्थ

हंसा, सर्व विप्रांनो, या मद्यपि शुक्राला हंसा ! थुंका, सर्व तपस्व्यांनो, या मद्यपि शुक्राच्या तोंडावर थुंका ! धिक्कारा, ब्रह्मयज्ञ करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनो, या मद्यपि शुक्राला धिक्कारा ! आणि अखिल दुनियेंत द्वाही फिरवा कीं, दारूमुळें बुद्धिनाश होतो, दारूमुळें शत्रूला पोटांत शिरायला मिळतें, दारूमुळें शत्रूला हृदयांत दबा धरून बसायला मिळतें; आणि दारूमुळें सर्व विद्या शत्रूच्या ताब्यांत जाऊन शत्रूच्या ओंजळींनें पाणी पिण्याची पाळी येते !

— कृ. प्र. खाडिलकर : ( विद्याहरण )

### दारूचे दुष्परिणाम

सरकारी खजिन्यांत दारूवरील कराच्या रूपानें जमा होणारा प्रत्येक पैसा कुठून येतो ? दारूबाजाच्या निढळाच्या घामांत, त्याच्या बायकोच्या अश्रूंत व त्याच्या पोरांच्या रक्तांत भिजून तो आलेला असतो ! लाखों बायका-पोरांचीं पोटें जेव्हां रिकामीं राहतात तेव्हां सरकारची तिजोरी भरते ! हजारों पतिव्रतांचीं अंगें बेफाम नवऱ्यांच्या मारानें एकीकडे सुजत असतात व दुसरीकडे सरकारी जमाबंदीची रक्कम फुगत असते !

— वि. स. खांडेकर : ( विजय कोणाचा ? )

### दारू व सुख

दारूचें व्यसन सर्रास चालू ठेवून प्रजा सुखी करूं पाहणें म्हणजे वेलीच्या मुळाशीं निखारे घालून तिच्या फुलांची अपेक्षा करीत बसण्यासारखें आहे.

— वि. स. खांडेकर : ( विजय कोणाचा )

## व्यवहाराला स्थैर्य

लौकिक व्यवहारांत रममाण होण्याची व तें उत्साहानें आणि निपुणतेनें करण्याची पात्रता ध्येयवादित्वामुळें येते. लौकिक व्यवहाराला स्थिरता यावी, त्यामध्यें कांहीं सुसंगत धोरण असावें, तो करतांना बाहूंना स्फुरण यावें, कमरेंत जोर यावा, मन प्रसन्न असावें, अशी जर अपेक्षा असेल तर माणसामध्यें कांहीं ना कांहीं तरी ध्येय-वादित्व पाहिजे.

— वा. म. जोशी

## अढळ गुण

खुर्दा जाऊं देत, मोहरा हरवूं देत, पण तेवढे दोन मोतीं मात्र गळूं देऊं नकोस. ( १ ) ध्येयावरील भक्ति, ( २ ) दुसऱ्याचें दुःख जाणण्याची शक्ति.

— वि. स. खांडेकर : ( पांढरे ढग )

## ध्येयाचें अढळ स्थान

ध्येयाला त्याच्या स्थानापासून च्युत होऊं देतां कामा नये. आराध्य देवतेप्रमाणें सदासर्वकाळ त्याची उपासना झाली पाहिजे.

— आचार्य कालेलकर :( जीवन आणि समाज )

## ध्येय-वीराची पूजा

ध्येयासाठीं धडपडणाऱ्या जीवाला सारे आघात, सारे प्रहार, सारे कटु अनुभव म्हणजे मंगल-मधुर पूजाच वाटत असते. ती महादेवाची महापूजा असते.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें भाग २ )

## निर्भय अंतःकरण

ज्या अंतःकरणामध्यें निवळ पेंढा भरला आहे तें अंतःकरण जुलमी लोकांच्या असल्या दहशतवादी उपायानें भयग्रस्त होईल; परंतु समान हक्क आणि स्वतंत्रता यांचीं तत्त्वें ज्या अंतःकरणांत एकदां ठसलीं तीं अंतःकरणें त्यांच्यापुढें जुलमाचा ब्रह्मराक्षसही मूर्तिमंत येऊन उभा राहिला तरी एक पाऊलभरसुद्धां मागें हटणार नाहींत. – शि. म. परांजपे : ( सेंट डॉमिनगोमधील एक रात्र )

## ध्येयवादी माणसें

माणसांत मी साधारण दोन फरक करतों—एक जगणारीं माणसें आणि दुसरीं जळणारीं माणसें. पहिलीं माणसें, असेल त्यांत सोय पाहून जगत असतात आणि दुसरीं, हव्या असलेल्या पण हातीं नसलेल्या सोयी मिळविण्याच्या कार्यांत धडपडत असतात आणि जळतही असतात.

– य. गो. जोशी : ( योगायोग )

## निराशेंतील धैर्य

हाल-अपेष्टांचा कळस झाला, घालवण्यासारखं जवळ कांहीं उरलंच नाहीं, कीं भीति संपते आणि कुठून तरी नवीनच सामर्थ्य—वैतागाचं सामर्थ्य का म्हणाना—माणसाला येतं.

– ना. सी. फडके : ( शाकुन्तल )

## ध्येयनिष्ठेचीं फलें

मनःस्थैर्य येण्यास ध्येय-निष्ठेशिवाय मार्ग नाहीं; मनोधैर्यही ध्येयनिष्ठेशिवाय शक्य नाहीं.

– वा. म. जोशी

## उत्कर्षाची आशा

सूर्य मावळला तर तो फिरून उगवतो. समुद्राला ओहोटी लागली तर त्याला फिरून भरती येते. चंद्राच्या कलांचा कृष्णपक्षांत क्षय झाला तरी फिरून शुक्ल पक्षांत त्यांची वृद्धि होते; पण माझ्या देशाचा सूर्योदय कधीं येईल ? त्याच्या वैभवाला ओहोटी रोजच लागलेली आहे, पण त्याला भरती कधीं येणार ? माझ्या देशांतील कलांचा कृष्णपक्ष आज कित्येक वर्षें चालला आहे, तो संपून त्याच्या शुक्ल पक्षाला सुरवात कधीं होणार ?

— शि. म. परांजपे : ( आम्रवृक्ष )

## आकांक्षा

मनुष्यमात्रानें आपल्या आकांक्षेचें अग्निहोत्र कधींहि विझूं देऊं नये. तथापि रोजच्या भाजीचे बटाटे आग्यारींतल्या किंवा अग्निहोत्रांच्या विस्तवावरच भाजून घेण्याच्या आग्रहाला मूर्खपणाचें स्वरूप येतें हेंहि विसरतां कामा नये.

— न. चिं. केळकर : ( भविष्यकथन )

## आशेची शक्ति

निराशा ही मनुष्याचे असलेले हातपाय मोडते; परंतु आशा ही परमानंदमाधवाच्या कृपेप्रमाणें लंगड्या माणसालाहि गिरीचें उल्लंघन करण्याला प्रवृत्त करते. आशा हीच मनुष्याची शक्ति आहे आणि आशा हाच मनुष्याचा जोर आहे.

— शि. म. परांजपे : ( ईश्वराची लीला अगाध आहे ! )

## समाजाचा आदर्श

सामाजिक आदर्शास खालीं ओढणें हें केव्हांहि योग्य म्हणतां येणार नाहीं. ज्या सुधारणा करावयाच्या त्या अशाच केल्या पाहिजेत कीं, ज्यामुळें सामाजिक न्याय, पवित्र्य आणि सामर्थ्य हीं वाढतील.

– आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## शंकराच्या जीवनाचें रहस्य

भगवान् शंकराच्या डोळ्यांतून निर्मळ विचारांची गंगा वाहते व शीलाचा चंद्र तेथें मिरवत असतो! कारण संयमाचा तिसरा डोळा त्याच्याजवळ आहे. तृतीय नेत्र ते उघडतात व त्या विचारांचें भस्म करतात! आणि होळींतलें तें भस्म मग अंगाला लावतात.

– साने गुरुजी : ( घडपडणारीं मुलें, भाग १ )

## दारूबाजास शासन

तक्षकाला मारण्यासाठीं जनमेजयानं त्याला पाठीशीं घालणाऱ्या इंद्रदेवालाही आगींत उडी टाकण्याला आमंत्रण केलं; त्याप्रमाणं या दारूच्या व्यसनाला घराबाहेर घालविण्यासाठीं तुझ्यासारख्या साध्वींनींसुद्धां या दारूच्या व्यसनाला पोटांत थारा देणाऱ्या पतिदेवतेला लाथेनं घराबाहेर टाकलं, तरच आजच्या संभावित समाजांतून हें दारूचं व्यसन हद्दपार होईल.

– रा. ग. गडकरी : ( एकच प्याला )

* मित्रांच्या अपेक्षा पुऱ्या करतां येऊं नयेत यासारखें दुःख नाहीं.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## सत्तेचा जुलूम

या अफाट विश्वाच्या एकंदर व्यवस्थेंत सत्तेचा जुलूम कांहीं काल बलवान् ठरला तरी अखेर त्याचा अंत झालाच पाहिजे.

– ना. सी. फडके : ( शाकुन्तल )

## जुलुमाचा प्रकार

जगांत जेथें जेथें अन्याय होत असतो, तेथें तेथें जुलूम करणारा स्वतः तर पापी असतोच, पण जुलूम सहन करणाराहि कांहीं कमी पाप करीत नसतो.

- आचार्य कालेलकर : ( जीवन आणि विज्ञान )

## माणुसकीचें पूजन

आपण ज्ञानानें श्रीमंत होऊं या, ज्ञानविज्ञानसंपन्न होऊं या व त्याजबरोबर माणुसकीहि हृदयांत व जीवनांत पुजूं या.

– साने गुरुजी : ( श्याम, खंड ३ )

## क्षमेचें सामर्थ्य

जर आपण आपली नीति कायम ठेविली तर विरोधी व्यक्तीचें हृदय आपल्या सामर्थ्ययुक्त क्षमेच्या योगें विरघळल्यावांचून राहणार नाहीं आणि मग तो आपला विरोधी न राहतां मित्र बनून जाईल.

– आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

*यंत्र म्हणजे आजच्या युगांतला देव, दैत्य आणि जादूगारही आहे. त्याचें दर्शन लोक भाविकतेनें घेतात आणि त्याच्या किमयेनें थक्क होऊन परत जातात.

– गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## आपल्यांतील 'खल'

खलपुरुष शोधून काढण्याकरितां आजूबाजूला पाहण्याची किंवा रंगभूमि धुंडाळण्याची कांहींही जरूर नाहीं, असें मला वाटतें. आपणांपैकीं प्रत्येकजण स्वतःच्या अंतःकरणांत जरा डोळे ताणून जर डोकावून पाहील, तर कितीतरी छोटेखानी खलपुरुष तिथें स्वैरपणें विहार करीत असलेले त्याच्या दृष्टीला पडतील !

— अनंत काणेकर

## दुष्टांचें वर्तन

सापाप्रमाणें दुष्ट असणारे लोक दुसऱ्यांच्या जिवावर जगतात, दुसऱ्याला खालीं दडपून त्याच्या डोक्यावर नाचतात, दुसऱ्याला गुलाम करून स्वतःची हवेली बांधतात, दुसऱ्याचें वाटोळें करून स्वतः सुखांत लोळतात.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## मुलामा दिलेला स्वार्थ

आपणांपैकीं प्रत्येकजण कमीअधिक प्रमाणांत असाच वागतो. आपल्या लहानसहान स्वार्थी कृत्यांना मोठेपणाचा मुलामा देण्याकरितां आपण कितीतरी वेळां उदात्त तत्त्वांचें चकचकीत रोगण वापरीत असतों.

— अनंत काणेकर

## मत्सरामुळें हानि

असूया व मत्सर हे सामाजिक कार्याची तर राखरांगोळी करतातच, पण ज्यांच्या अंगीं हे दोष असतील त्यांना ते सर्वांत आधीं जाळून टाकतात.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## मोठेपणासाठीं साहस

मोत्यें वेंचायला पाहिजे असलीं तर प्राण संकटांत घालून समुद्राचा तळ गांठून शोधावीं लागतात. मोठेपणा पाहिजे असल्यास सारें जीवन ढवळून पाहायला पाहिजे. त्याशिवाय खरा मोठेपणा येणार नाहीं. तें साहस ज्यांच्यांत नाहीं त्यांनीं नकली मोत्यांचें प्रदर्शन करून श्रीमंती कशाला दाखवायची ?

— विभावरी शिरूरकर : ( विरलेलें स्वप्न )

## साहसाचें बीज

सुरक्षितता ही पुरुषार्थला मारून टाकणारी वस्तु आहे. मनुष्य सुरक्षितता शोधूं लागला कीं त्याच्या मौल्यवान् वृत्ति आणि शक्ति मारल्या जातात नि जीव धोक्यांत घालण्याची बहादुरी नाहींशीं होऊं लागते.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## परोपकाराची जादू

स्वतःच्या केवळ सुखासाठीं केलेलें प्रत्येक स्वार्थी कर्म म्हणजे बोजा आहे. त्याचें जिवाला ओझें होतें, तो जोजारा होतो; परंतु हें कर्म जनतेसाठीं आहे असें म्हणा म्हणजे ओझें नाहीं. जनसागरांत बुडा, तुमच्या स्वतःचा बिंदु जनता-सिंधूंत मिसळून टाका म्हणजे मग जीवनांत संगीत आल्याशिवाय रहाणार नाहीं.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

* वैभवाचा डोंगर चढतांना मन सशक्त पाहिजे आणि मन सशक्त असायला देह सशक्त पाहिजे.

— ना. ह. आपटे : ( सुखाचा मूलमंत्र )

## कृतज्ञतेची जादू

कृतज्ञतापूर्वक केलेल्या कामाचा कधीं शीण वाटत नाहीं, त्रास वाटत नाहीं, ओझें वाटत नाहीं. कृतज्ञतेचा स्पर्श होतांच प्रचंड भार फुलांसारखे वाटतात, काट्यांची मखमल होते, रखरखलेल्या वाळवंटाची सुंदर हिरवी हिरवळ होते. कृतज्ञता म्हणजे एक जादू आहे. कृतज्ञता म्हणजे कृष्णाची वेणु आहे.

— साने गुरुजी : ( जीवनकलह, भाग २ )

## हास्य असावें संसारीं

प्रत्येक माणसानं आनंदानं व हंसत-खेळत राहिलं पाहिजे यांत मुळींच शंका नाहीं. कोणालाहि न दुखविणारं, सर्वांना सुखविणारं हास्य ही संसारांतील एक अमूल्य गोष्ट आहे.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## कुसंगतीचा धोका

एक चिंचेचें बोटूक हंडाभर दूध नासवूं शकेल; एक कडू बदाम अनेक खडीसाखरेच्या खड्यांच्या गोडपणाला दाद देणार नाहीं; एक खवचट शब्द मनाचा अत्यानंद नाहींसा करण्यास समर्थ आहे; त्याचप्रमाणें कुसंगतींत गेलेल्या एका क्षणानें कदाचित् सबंध आयुष्य कुचकामाचें होण्याचा संभव आहें.

— ना. ह. आपटे : ( सुखाचा मूलमंत्र )

* मला तरी स्वतःला झालेल्या आनंदानें दुसऱ्याला आनंदी करणें हाच माणुसकीचा मुख्य भाग वाटतो.

— अनंत काणेकर : ( स्तुति करण्याची कला )

## पावित्र्याचें सामर्थ्य

पावित्र्य हा जीवनाचा अभंग कायदा, शाश्वत कायदा. याचा भंग झाला तर सारें भंगेल. हा अभंग ठेवूं तर जीवन रंगेल. पावित्र्य म्हणजेच परमेश्वर. असें हें पावित्र्य ज्याच्याजवळ आहे तो खरा बळी, महाबळी; मग ती स्त्री असो, पुरुष असो वा मूल असो.

— साने गुरुजी : ( गोड शेवट )

## सामान्य माणसें

लहान पांखरांना उंच हवेंत फार वेळ उडवत नाहीं. तेथें पंख स्थिर ठेवून राहतां येत नाहीं. लहान जिवांचें तसेंच असतें. सामान्य माणसें क्षणभर उंच वातावरणांत जातात. जेथें वासनाविकारांची विरलता आहे अशी स्वच्छ हवा,—निर्लोभ, निर्मत्सर हवा त्यांना फार वेळ सहन होत नाहीं, तेथें ते गुदमरूं लागतात. ते झपाट्यानें खालीं येऊन पुन्हां नाचूं—बागडूं लागतात; चिखलांत बुड्या मारूं लागतात.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## गुणांचा अधिकार

निर्व्यसनी, कार्योत्सुक, विचारी, निरलस परंतु बुजणाऱ्या मनुष्यास कोणीतरी उत्साहदाता लागतो. नव्हे, प्रत्येक व्यक्तीस आपलें तेज बाहेर टाकावयास लावण्यास कोणी तरी लागतें. चंदनाला झीज पाहिजे, सोन्याला ताव पाहिजे, हिऱ्याला घाव पाहिजे, त्याचप्रमाणें मनुष्यास तेज प्रगट करण्यास प्रेमाचा, उत्तेजनाचा किंवा कठोर निर्भर्त्सनेचा शब्द पाहिजे.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वींचा काळोख )

## दुःख देऊं नका

कोणाच्या जीवनांत आशा, उत्साह न ओततां आला, तर निदान दुःख, निराशा तरी तेथें ओतूं नये. जगाचें दुःख कमी करतां येत नसेल, तर निदान त्यांत भर तरी घालूं नये.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## दानशीलता

विकासाकडे जाणाऱ्या समाजांत दानशीलता अवश्य वाढली पाहिजे.

— महादेवशास्त्री जोशी : ( पुरंदरदास )

## वास्तव शोभा

जो तो आपल्या खऱ्या परिस्थितींत शोभतो. मोराच्या दोन पिसांनीं कावळा का सुंदर दिसेल ? उलट अतिशय बावळट दिसेल, नाहीं ?

— साने गुरुजी : ( गोड शेवट )

## अजिंक्य तेज

जो स्वयंप्रकाशी आहे त्याला हतप्रभ करण्याचं सामर्थ्य कोणांतहि असत नाहीं.

— वि. वा. शिरवाडकर : ( दुसरा पेशवा )

## आशाळभूतपणानें अधोगति

जो माणूस आशेचा गुलाम झाला तो सगळ्या जगाचा गुलाम बनतो. तो हांजी हांजी करील, खोटें बोलेल, निंद्य कर्म आचरील, काय हवें तें करील. आशेखोरपणामुळें तो आपला स्वाभिमानही गमावून बसेल.

— महादेवशास्त्री जोशी : ( शंकरशर्मा )

## यशस्वी मनोराज्य

मनोराज्य करणें कांहीं वाईट नाहीं. त्यापासून मनाला उत्साह मिळतो; पण त्या उत्साहाच्या भरांतच कार्याला प्रवृत्त झालें पाहिजे म्हणजे मनोराज्यांत केलेल्या पुष्कळशा गोष्टी घडून येतात.

— ना. ह. आपटे : ( ह्याला कारण शिक्षण )

## आवश्यक चालीरीती

ज्या चालीरीती सत्याकडे नेतात, उदारतेकडे नेतात, प्रेमाकडे नेतात, सर्वांच्या सर्वांगीण विकासाकडे नेतात त्या चालीरीती ठेवाव्या; बाकीच्या दूर कराव्या.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## दारिद्र्याचा जन्म

दारिद्र्य ही मनुष्यानं निर्माण केलेली आपत्ति आहे, अन् ती दूर करणं माणसाच्या हातीं आहे, हा विचार समाजांत जितका फैलावेल तितक्या लवकर दारिद्र्य नाहींसं होईल.

— ना. सी. फडके : ( इंद्रधनुष्य )

## स्वार्थाची जादू

स्वतःच्या स्वार्थाच्या वेळीं मनुष्य पशु असतो; इतरांच्या वेळीं तो महात्मा असतो !

— य. गो. जोशी : ( होमकुंड )

## आई म्हणजे देणगी

आई म्हणजे केवढी थोर देणगी ! लहान मुलाला सारें आईजवळ मागण्यांत, तिच्याजवळून घेण्यांत आनंद असतो. तेथें त्याचा हक्क, तेथें त्याचे सारें स्वातंत्र्य !

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## लक्ष्मीचीं आकर्षणें

लक्ष्मी नेहमीं गुणांजवळ राहते. ज्या देशांत उद्योग, संघटना अधिक, सहकार्य अधिक, बुद्धि अधिक, निश्चय अधिक, बंधुभाव अधिक त्या देशांत संपत्ति राहते, तेथें लक्ष्मी राहते. आळस व विलास आले कीं लक्ष्मी पलायन करूं लागते.

— साने गुरुजी : ( शेवट गोड )

## लक्ष्मीधराची आकांक्षा

आमच्या अंगावरील मांस लोण्याच्या गोळ्याप्रमाणें मऊ आहे, हें ठीक आहे; पण हीं हाडें इतकीं कठीण कशाला ? कशीं आंतून टोंचताहेत ! देवा, आमचीं हाडें सोललेल्या केळ्यासारखीं केलीं असतीस तर चाललें नसतें का ? आंतून हे हाडांचे भाले आणि वरून हे हिऱ्यांचे खडे कसे माझ्या अंगांत खुपताहेत ! देवा, हिरे फुलासारखे कोमल कां नाहीं केलेस ?

— कृ. प्र. खाडिलकर : ( मानापमान )

## संपत्तीचा संचय

ठिकठिकाणीं पांगलेली संपत्ति एके जागीं गोळा करून पराक्रमी पुरुषाकडे ती वाहून नेण्याकरितां परमेश्वरानें उत्पन्न केलेलीं गोजिरवाणीं गाढवें म्हणजे असले लक्ष्मीपुत्र होत.

— कृ. प्र. खाडिलकर : ( मानापमान )

## उत्तम वर

मुलींना एकच उत्तम वर देवाला मागण्यासारखा असतो, आणि तोहि उत्तम वर हाच, होय ना ?

— श्री. कृ. कोल्हटकर : ( वधूपरीक्षा )

## खरा कलावंत

धंदेवाईक लेखक आणि कलावंत यांतला फरक हाच कीं, एक आपलें लिखाण शाईनें लिहितो आणि दुसरा रक्तानें लिहितो. — अनंत काणेकर

## खोट्या कल्पनांचा पराभव

मनुष्याचें ज्ञान जसजसें वाढेल तसतसा खोट्या कल्पनेला चिकटून राहण्याचा त्याचा अभिमान आपोआपच गळून पडेल. त्याच वेळीं जगावर तात्त्विक दृष्ट्या एकाच खऱ्या धर्माचें साम्राज्य नांदूं शकेल.

— दत्तो आप्पाजी तुळजापूरकर : ( माझें रामायण )

## प्रगतींतील अडथळा

एकादी गोष्ट करतांना ती कां करायची याचा आम्ही कधीं विचारच करीत नाहीं. ‘ बाबावाक्यं प्रमाणम् ’ हें आमचं ब्रीद ठरून गेलं आहे; त्यामुळेंच आमची प्रगति खुंटली आहे.

— ना. धों. ताम्हनकर : ( दाजी )

## विचारांची मालकी

जीवनाचा कोणताहि महान् विचार कोठेंहि उत्पन्न होवो, तो आपलाच आहे. देशकालानुरूप त्या विचाराची वाढ निरनिराळी होईल; परंतु तो विचारच नको म्हणणें वेडेपणाचें, आत्मघातकीपणाचें आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* पंख मोडल्यावर मैना कसली? गळा दाबल्यावर कोयल कसली? दांत पाडल्यावर नागीण नाहीं, डोळे फोडल्यावर वाघीण नाहीं. — रा. ग. गडकरी : ( राजसंन्यास )

**चांगुलपणाचें माप**

माणसाचं मोल त्याच्या रूपावर किंवा त्यानं मिळविलेल्या पदव्यांवर नसतं. त्याच्या अंतर्यामीं माणुसकी ज्या प्रमाणांत असेल, त्यावर त्याचा चांगलेवाईटपणा मोजाव-याचा असतो. — ना. धों. ताम्हनकर ( गुजाताई )

**अपजयाचा धडा**

एक डाव चुकला म्हणून सर्वच डाव चुकतात असं कशावरून ? आणि तसें चुकूं दिलें तर खेळणाऱ्याचं चातुर्य काय ? पहिला डाव कां चुकला, तो जिंकण्यासाठीं कोणती सावधगिरी घ्यायला हवी होती, हें ओळखून नव्या डावाला सुरुवात करायला पाहिजे.

— ना. धों. ताम्हनकर : ( गुजाताई )

**निराशेचें कारण**

कृतीच्या मानानं मनुष्य सुखाची अपेक्षा नेहमीं मोठी धरतो आणि तें तितकं मिळालं नाहीं म्हणजे हातांत आलेल्या सुखाचाहि भोग न घेतां निराशेंत सांपडून दुःखी होतो.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वीचा काळोख )

**समाधानाचा जन्म**

दगड म्हणून अमर होण्यापेक्षां, पशु म्हणून सुखानें जगण्यापेक्षां मनुष्य म्हणून मरण्यांत अधिक आनंद आहे !

— वि. स. खांडेकर : ( समाधीवरलीं फुलें )

* आपण व्यवहार आणि तत्त्वज्ञान यांची फारकत केली म्हणून वाईट दिवस आले.

— साने गुरुजी ( सुंदर पत्रें )

## महत्कार्याचीं साधनें

महत्कार्य करायला साधनसामुग्रीपेक्षां मनाची तळमळ अधिक साहाय्य करते. पैशावांचून आणि पदव्यांवांचून करतां येण्यासारख्या किती तरी गोष्टी जगांत असतात. त्या शोधल्या पाहिजेत, केल्या पाहिजेत. कांहीं साधतील, कांहीं फसतील. साधतील त्याच्यापुढच्या गोष्टींचा शोध करायचा, फसतील त्यांचा नाद सोडायचा. साधल्याबद्दल हुरळून जायचं नाहीं, फसल्याबद्दल नाउमेद व्हायचं नाहीं.

— ना. धों. ताम्हनकर : ( गुजाताई )

## शहाणपणाचा भ्रम

ज्यांची अधिक कींव केली पाहिजे अशीं दुसरीं माणसं आहेत. तीं कोणतीं म्हणाल तर ज्यांची बौद्धिक उंची बेताचीच असते, परंतु ती असामान्य आहे असा स्वतःचा भ्रम ज्यांनीं करून घेतला आहे तीं ! या माणसांचा हा भ्रम कांहीं केल्या दूर होत नाहीं आणि तीं स्वतः दुःखी होण्यापेक्षां आपल्या जुलमानं दुनियेस मात्र दुःखी करतात. भलती बौद्धिक उंची फक्त त्या उंच माणसाला दुःखी करते. पण बौद्धिक उंचीचा भ्रम ज्याला झाला आहे तो माणूस साऱ्या दुनियेला दुःखी करतो. उंचीपेक्षां उंचीचा भ्रम फार वाईट ! — ना. सी. फडके : ( उंच असणं फार वाईट )

* प्रकाशाशिवाय अंधार कसा जाणार ?
सूर्योदयाशिवाय धुकें कसें जाणार ?
औषधाशिवाय रोग कसा हटणार ?
प्रेमाशिवाय कलह कसे मिटणार ?
आणि ज्ञानाशिवाय भीति कशी जाणार ?

— साने गुरुजी : ( क्रांति )

## कणांतील सामर्थ्य

निर्मळ सेवेचा एक कण सारें पाप धुऊन टाकतो. स्नेहाचा एक बिंदु पसरतो व सुंदर रंग दाखवितो. एक लहानसा स्वच्छ किरण खंडोगणती अंधाराला प्रकाशमान करूं शकतो. सुगंधी असें एक फूल जवळ ठेवलें तर अनंत घाणीचा विसर पडतो.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## पावित्र्याची कार्य-पद्धति

पावित्र्य हें न बोलतां बोलतें, न शिकवितां शिकवितें. दिव्याची ज्योत निःस्तब्धपणें अंधार हरण करीत असते.

— साने गुरुजी : ( शबरी )

## संसारांतील बदल

संसारांतील आनंद, दुःख, चिंता, उत्साह, खेद यांपैकीं कोणतीच गोष्ट कायमची अगर दीर्घकाल टिकत नाहीं. हवेंत जसे सतत बरेवाईट बदल व्हावयचे तसंच संसाराचं आहे. — ना. सी. फडके : ( झंझावात )

## आचरणाचा परिणाम

समाजाच्या चालीरीति पालटण्यास समाजाच्या खऱ्या पुढाऱ्यांचें आचरण जितकें कारण होतें, त्याच्या शतांश, नव्हे सहस्रांशहि कायद्याचा उपयोग होत नाहीं.

— लो. बाळ गंगाधर टिळक : ( केसरी )

* ऐषआराम हा जीवनाचा गंज आहे, प्रतिभेचें मरण आहे, सर्व शक्तींचा ऱ्हास आहे.

— आचार्य कालेलकर : ( समाज आणि जीवन )

## सद्गुणाचा जय

पाप क्षणभर हंसतें व कायमचें रडतें. पाप थोडा वेळ डोकें वर काढतें परंतु कायमचें धुळींत मिसळतें. पापाला तात्पुरता मान, तात्पुरतें स्थान. जगांत सद्गुणच शुक्राच्या ताऱ्याप्रमाणें शांत व स्थिर सदैव तळपत राहतात.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## बुद्धिवादाचा प्रकाश

एखाद्या दिवाळखोर कर्जबाजाऱ्यास ज्याप्रमाणें आपल्या प्राप्तीचा आंकडा आपल्या खर्चाच्या आंकड्याशीं ताडून पहाण्याचें धैर्य होत नाहीं, किंवा ज्यांची जीविताशा फार प्रबल झाली आहे त्यांना आपल्या रोगाची चिकित्सा सुप्रसिद्ध भिषग्वर्याकडून करवत नाहीं, त्याप्रमाणें श्रद्धाळू धार्मिकास आपल्या धर्मसमजुती व त्यांवर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशींत घालण्याची छाती होत नाहीं.

प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## पश्चात्तापाचा परिणाम

पश्चात्तापाच्या आगींत पाप टिकतच नाहीं. आपल्याला ज्या क्षणीं पश्चात्ताप होतो त्याच क्षणीं पापें जळतात अन् देवाच्या दयेला आपण पात्र होतों.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## तेजाचा प्रभाव

तेज आहे तिथें प्रत्येकाची आदरभावना गेलीच पाहिजे. तेजस्विता हा एक मोठा सद्गुण आहे.

— महादेवशास्त्री जोशी : ( कविभूषण )

## प्रगतीला अडथळा

इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्र-जीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठीण झालेल्या लाकडाप्रमाणें किंवा हाडकाप्रमाणें शेंकडों वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रि. गो. ग. आगरकर ( सुधारक )

## उत्तेजनाचे परिणाम

उत्तेजन हें अमृतासारखं तारक आणि विषासारखं मारक आहे. तें कोणता परिणाम घडवून आणणार हें निश्चित माहीत नसतांना कुणी कुणाला उत्तेजन देऊन भरीस पाडूं नये. त्या उत्तेजनानं मद चढून आपला क्षीण-भाग विसरून पुढें पळावं तों कुणाच्या नशिबीं सिंहासन आणि कुणाच्या नशिबीं स्वतःलाच पुरून घ्यायला खोल खड्डा खणलेला आढळतो !

— विभावरी शिरूरकर : ( विरलेलीं स्वप्नें )

## प्रपंच आणि परमार्थ

सशास्त्र भट्टींत ज्याप्रमाणें धूर न होतां धुराचीं मूल-द्रव्यें चांगलीं पिचून शुद्ध प्रकाश व उष्णता वाढवितात, त्याचप्रमाणें परमार्थाच्या भट्टींत शिरलेल्या मनांतले सर्व प्रकारचे दुष्ट विकार व अहंकारादि तामस भावना पिचून जाऊन त्यांपासून सात्त्विक भावना उलट अधिकच प्रज्वलित झाल्या पाहिजेत.

न. चिं. केळकर : ( अवतारकृत्याचा पोरखेळ )

## विकासाचा मार्ग

ज्याप्रमाणें झाड आपलीं मुळें सर्व दिशांत पसरून ओलावा मिळवितें व स्वतःची वाढ करून घेतें त्याप्रमाणें मानवानेंहि जेथें जेथें प्रकाश मिळेल, चांगुलपणा मिळेल तेथून तेथून तो घेऊन स्वतःचा विकास करावा.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## बीज पाहून पेरा

आपण जें जें पेरतों त्याच्यांतून कांहीं उगवणार असेल, त्याच्यांतून पीक येणारच असेल तर तें पीक अफूचें आहे कीं गव्हाचें आहे हें पाहिलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## जिवंत संपत्ति

पचेल तेवढें अन्न, बाकीचें सगळें विष; हें जसें माणसाला समजतें त्याचप्रमाणें माणसाला जेव्हां हें समजूं लागेल कीं, मेहनतीनें मिळविलेली संपत्ति हीच तेवढी जिवंत संपत्ति व बाकीची मुरदाड संपत्ति होय आणि ज्या संपत्तीचा सदुपयोग समाजासाठीं होतो तेवढीच पौष्टिक व बाकीची विषारी संपत्ति होय, त्याच दिवशीं समाजाची स्थिति सुधारेल.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

* हातांत कापूस घेऊन सूत कांततांना प्रत्येक तसूतसूंत आपलें चित्त कांतलें जातें, त्याप्रमाणें अशा पहाडी यात्रेंत पावलोपावलीं आपलें चित्त तिच्यांत विणलें जातें आणि त्यामुळेंच यात्रेचा आनंद सघन बनत जातो.

— आचार्य कालेलकर ( गुच्छुपाणी )

## परिस्थितीचा राजा

बाहेर कसलीहि परिस्थिति असो, तिच्यावर स्वार होण्यासाठीं धडपडणें हें मानवी आत्म्याचें जन्मसिद्ध कर्म आहे. कसलें शुभ नि कसलें अशुभ ! शुभाशुभांचा जन्मदाता मी आहे. मी मानलें तर हें शुभ आहे; मी मानलें तर हें अशुभ आहे. मी मानलें तर हें दुःख आहे, नाहीं तर सुख आहे.

– साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें, भाग २ )

## श्रीमंतीचा प्रभाव

सांपत्तिक विषमतेमुळें दारिद्र्याचं लक्तर पांघरून बसलेल्या गुणांकडे कुणाचं लक्षच जात नाहीं. उलट सुवर्णाच्या कांतीनें गुणहीनांवरसुद्धां गुणांचा आरोप केला जातो. समाजांत प्रत्येक गुणी मनुष्य आपलें शिर वर ठेवायचा अस्खलित प्रयत्न करीत असतो; पण संपत्तीच्या जोरावर सर्वांना मागें टाकून त्यांच्याच खांद्यांवर आपलें ओझें उभें करून समाजाच्या डोळ्यांत गुणहीन श्रीमंत भरू शकतो.

– विभावरी शिरूरकर : ( विरलेलीं स्वप्नें )

## उच्च दर्शन

राष्ट्राच्या सर्व खुरटलेल्या संसारांत उंच कांहींतरी दिसणें किती आशादायी असतें, स्फूर्तिदायी असतें ! उंच मनुष्य, उंच मन, उंच विचार, उंच ध्येयें असें उच्च दर्शन एक प्रकारच्या उंच वातावरणांत घेऊन जातें.

– साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें, भाग १ )

## विचारांचा निश्चय

माणसाचें मन म्हणजे अद्भुत चीज आहे. रोज नवे बेत करतां येतात; परंतु निश्चित कांहींच झालें नाहीं तर सारे मनोरथ हवेंतच रहायचे.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## निश्चयाचें बळ

जगांत मताला किंमत नाहीं, निश्चयाला असते. मत खरें कोणाचें ? जो आपल्या मताकरितां मरणास तयार होतो त्याचें.

– बा. गं. टिळक : ( लो. टिळक यांचीं गेलीं ८ वर्षें )

## अनुभवाची मातब्बरी

कल्पना म्हणजे वारा ! अनुभव म्हणजे पारा ! तो गोळा करणें कठीण ! घरीं आरामखुर्चीवर पडून कल्पना करण्या-इतकें तें सोपें नाहीं. पण अनुभवाचें वजन कल्पनेच्या शतपट असतें !

– वि. स. खांडेकर : ( उल्का )

## पवित्र भूमि

संतांची मृत्युतिथि तशीच त्यांची मृत्युभूमि महत्त्वाची असते. अवताराची जन्मभूमि, वीरपुरुषांची कर्मभूमि आणि संतांची मृत्युभूमि महत्त्वाची असते.

– विनोबा भावे : ( मधुकर )

* मनुष्याची मुद्रा म्हणजे त्याचा जीवनग्रंथ. जीवनाच्या अनेक अनुभवांच्या रेषा तेथें उमटलेल्या असतात. कांहीं रेषा अस्पष्ट असतात, कांहीं खोल व स्पष्ट असतात. डोळे म्हणजे तर जीवनांतील अनुभवांचे भरलेले डोह.

– साने गुरुजी : ( आस्तिक )

## डोंगरमाथ्याचें सौंदर्य

आम्हांला तिरप्या सूर्यप्रकाशांत उटकमंडचें दर्शन झालें. सभोंवतीं नीलगिरीच्या शिखरांचे उंचवटे आणि मध्यें खोलाटींतलें मैदान, अशा भव्य नैसर्गिक ॲम्फिथिएटर-मध्यें उटकमंड वसलेलें आहे. मधल्या मैदानांत पांढरें लांकडी कुंपण असलेला वर्तुळाकार रेसकोर्स आहे. त्याच्या एका बाजूला स्टेशन व मोटारस्टॅंड आहेत, दुसऱ्या बाजूला बाजार आहे आणि सभोंवतालच्या उतारांवर घरांच्या उतरंडी रचलेल्या आहेत. एकाद्या स्टेडियमच्या उतरत्या पायऱ्यांवर प्रेक्षक बसलेले असावे; तशीं तीं पांढरींपिवळीं घरें दिसत होतीं आणि सकाळच्या तिरप्या उन्हांत त्या प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर असतें तसलें औत्सुक्यदेखील त्या घरांवर चमकत होतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## रखरखणारें उन्ह

उन्ह एकसारखें रखरखत होतें आणि त्या रखरखणाऱ्या उन्हांत एखाद्या योग्यानें विस्तवावर चालावें त्याप्रमाणें तीं हिरवींपिवळीं कोंवळीं पिंपळपानें भर उन्हांत नाचत बागडत होतीं का उन्हाला, सूर्याला हिणवीत होतीं— वांकुल्या दाखवीत होतीं,—देव जाणे !

— य. गो. जोशी : ( भिकोबा आणि धनाजी )

## सुखाची वांटणी

आपला आनंद आपल्या मनांत मावत नसतो. दुःखाला वांटेकरी हवा; तसा सुखालाहि.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## वसंत आला

पिंपळाच्या झाडांवर मध्येंच एकाद्या शाखेला नवपल्लव फुटलेला दिसे आणि सूर्यप्रकाशांत तीं लालसर छोटीं छोटीं पानं हललीं कीं मोठी गंमत वाटे. आम्रवृक्षांना नवतीचा कोंवळा मोहोर फुटूं लागला होता आणि त्याच्या किंचित् आंबट पण मधुर सुगंधाची बातमी दूर दूर पसरविल्या-वांचून वाऱ्याला रहावत नसे. गांवच्या सीमेवरच्या राईंत मधूनच 'कुहू' करणाऱ्या कोकिळेचं संगीत कधीं कधीं कानावर पडे आणि कोठून तरी येणारीं आणि कुठें तरी जाणारीं लहान लहान पाखरं आपल्या थव्यांच्या निर-निराळ्या आकृती बनवीत अंतराळांतून जातांना जो चिवचिवाट करीत तो ऐकला कीं वाटे,'यांना वसंताच्या आगमनाची बातमी खचित समजली आहे.

— ना. सी. फडके : ( प्रवास )

## खेड्यांतील उन्हाळा

उन्हाळा कडकूं लागला. गव्हाचा हंगाम संपला. घरोघर पोत्यांच्या ठिक्या लागल्या. कणग्यांत टाकोटाक गहूं भरून शेतकऱ्यांनीं त्यांचीं तोंडें लिंपून टाकलीं. शेताशेतांतून निचीतीनें नांगरणी सुरूं झाली. जमीन दांत वासून ऊन खाऊं लागली. चरोली व मनोली या दोन गांवांमधून वाहणाऱ्या बाणगंगेचें पाणी ढोपरांना लागू लागलें.

— ग. ल. ठोकळ : ( गोफणगुंडा )

* सुखाची आठवण होणें हा शरिराचा धर्म आहे; पण जरूर तेव्हां त्याचा त्याग करायला शिकणें हा मनाचा धर्म आहे.

— वि. स. खांडेकर

## ग्रीष्माचें स्वरूप

नीच प्रकृतीच्या मंत्रिमंडळाची चिथावणी मिळाली कीं ज्याप्रमाणें एखाद्या जुलमी राजाच्या छळाला भर यावा त्याप्रमाणें ग्रीष्मांतल्या चंडांशूचा ताप साऱ्या सृष्टीला असह्य झालेला असतो व सृष्टीचा जीवनरसाचा सांठा संपत आलेला असतो. संत्रस्त प्रजेनें एखाद्या उद्धारक महात्म्याची वाट पहावी तद्वत् सारी सृष्टि जलधारांसाठीं आ वासून बसलेली असते. आईच्या सहवासाला फार दिवस अंतरल्यावर बालकाचें तोंड सुकावें तद्वत् वृक्षशाखांवरचीं चिमुकलीं पानें म्लान आणि दीन दिसत असतात. सौभाग्यचिन्हांनीं भरलेला असला तरच सुंदर दिसणारा सुवासिनीचा हात त्यावांचून रिकामा आणि अशुभ वाटावा तशी नदीच्या पात्रांची अवस्था झालेली असते. राजमार्गांतून आणि मातीच्या ढेकळांनीं विखुरलेल्या शेताभातांतून वाफा निघत असतात, त्या जणूं काय जलवृष्टीसाठीं धरणीनें केलेल्या आर्तस्वरांच्या प्रार्थनाच वाटत असतात !

— ना. सी. फडके : ( पाऊस )

## मनापासून केलेलें काम

मनापासून आपण जें करतों त्यांत अपार शक्ति असते.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## अमोल दान

जें जगाला द्याल तें फुकट नाहीं जाणार; आणि हृदय ओतून जें द्याल त्याची तर किंमतच नाहीं.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## पाण्याचा लोट

धरणाच्या अगदीं कडेला मोटार थांबली आणि खालीं उतरतांच आम्हांला त्या अजस्र आधुनिक सहस्रार्जुनाचें दर्शन झालें. आपल्या काळ्या पत्थराच्या रुंद छातीनें त्यानें पाण्याचा केवढा तरी लोट अडवून धरला होता. आणि तो अडवलेला पाण्याचा लोट अगतिकपणें मार्ग वळून जमीन बुडवीत दूरवर वेडावांकडा पसरला होता. किंचितसें हेलावणारें आणि उन्हाची लकाकी पृष्ठभागावर नाचविणारें तें पाणी अगदीं शांत, निरुपद्रवी वाटत होतें, आणि तिरप्या झेपा घेऊन त्या पाण्यांतले मासे वेंचूं पाहणारे पक्षी, दिशा झटकन् बदलत आकाशांत चढत होते, पुन्हां संथपणें अदृश्य वर्तुळें रेखाटत होतें. मुरडत मुरडत, कोलमडत त्या पाण्याच्या लाटा कृष्णसागराची काळी भिंत चाटत होत्या.—चुळ्ळुक चुळ्ळुक असा आवाज करीत चुबकून निघत होत्या.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## धबधब्याची झेंप

जरा पुढें सरकलों आणि सगळा धबधबाच दृष्टिपथांत आला. धबधब्याला पुरेसें पाणी होतें. माझ्या नजरेसमोर तें फेंसाळत दोन अडीचशें फूट स्वतःला खालीं लोटून देत होतें—कोसळत होतें, आणि खालीं निर्माण झालेल्या संथ हिरव्या डोहांतून कावेरी फेंसाळत, झिरझिरत पुढें वहात चालली होती—अेक वळण घेऊन अदृश्य झाली होती. पुढें सगळा रुक्षपणाच पसरलेला दिसत होता.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## कारंजाचे तुषार

एका कारंज्याच्या कुंडाशेजारीं आम्ही बसलों. त्या कुंडांत कोसळणाऱ्या तुषारांनीं फेसाचीं फुलें फुलत होतीं. वाटलें कीं तीं फुलें वेचावीं आणि वासंतीला माळायला सांगावीं. थंड ओल्या वाऱ्याच्या फडफडणाऱ्या हातरुमालानें तोंड पुसलें जात होतें आणि जवळच पाण्याचे प्रवाह वहात होते, त्यांची बुरबुर बोबड्या कानगोष्टी करीत होती. पायऱ्यापायऱ्यावरून फेसाळत कोलमडणाऱ्या एका प्रवाहला पाहून वाटत होतें कीं, असंख्य शुभ्र यक्षबालकें कोलांट्या उड्या मारायचा खेळ बेभानपणें खेळत आहेत.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## नदीचा प्रवास

आम्ही जात होतों त्या रस्त्याच्या कडेनें एक लहानशी नदी वहात होती. कधीं वळसे घेत तर कधीं सरळ; कधीं वेगानें तर कधीं संथपणें; कधीं तिच्या पाण्यांत हिरवें प्रतिबिंब थरथरत होतें तर कधीं सूर्याचे किरण डुंबत होते; कधीं खडकांतून तिचें पाणी खळाळत होतें तर कधीं झाडांच्या सांवलींत लपलेल्या डोहांत विसांवा घेत होतें. जमिनींत पाळेंमुळें घट्ट रोवून स्वतःला सांवरीत किनाऱ्यावरचीं झाडें त्या प्रवाहावर झुकलीं होतीं, आणि गर्द कमानींतून उन्हाचे कवडसे टिपीत ती नदी वळसे घेऊन अदृश्य होत होती. ती कुठच्या यक्षभूमीकडे चालली होती बरें ?

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## पावसाळ्याचा प्रवेश

मेघांच्या पालखींतून मिरवत आणि विजेच्या चवऱ्या ढाळून घेत वर्षादेवी ज्या वेळीं पृथ्वीवर उतरूं लागते; त्या वेळीं तिच्या आगमनाची ग्वाही वाराच फिरवीत नाहीं का?

— वि. स. खांडेकर : ( काव्यलहरी )

## पावसाचे शिंतोडे

मृगाचे शिपकारे सुरू झाले. शेतकऱ्यांनीं पेरणीला सुरवात केली. दोनचार पाऊस खाल्ल्यावर जमिनीनें कात टाकली. चोहींकडे हिरवेंगार दिसूं लागलें. वाणगंगेनें बाळसें धरलें. तिचा फिकटपणा जाऊन ती लालसर दिसूं लागली. पावसामुळें खासेरावाच्या फिरण्यांत खंड पडूं लागला. बऱ्याच दिवसांनीं उघाड पडली. आकाश ठिगळें लावलेल्या निळ्या गोधडीप्रमाणें दिसत होतें.

— ग. ल. ठोकळ : ( गोफणगुंडा )

## झिरपणारा नभ-घट

पावसाळा सुरू झाला. बरसातीच्या प्रारंभींच्या जोराच्या सरी पडून गेल्या आणि अष्टौप्रहर टिकणारी कंटाळवाणी झिमझिम सुरू झाली. एकादे वेळीं दिवसाच्या कित्येक घटकान् घटका सूर्यदर्शन घडत नसे, साऱ्या दिशा धुंद झाल्यासारख्या वाटत आणि या टोंकापासून त्या टोंकापर्यंतचें आभाळ म्हणजे एक अजस्र धुरकट मातीचें भांडें असून तें हलकें हलकें झिरपत आहे असा भास होई.

— ना. सी. फडके : ( प्रवासी )

## पावसाळ्याचा प्रारंभ

आकाशाच्या निर्जन मैदानांत मेघांच्या रोज नवीन नवीन टोळ्या जमत होत्या. त्यांच्या मंद गर्जना पृथ्वी-तलाच्या किनाऱ्यावर हळुहळु ऐकूं येऊं लागल्या होत्या. विजांच्या तोफांचे लखलखाट आणि कडकडाट यांना किंचित् किंचित् प्रारंभ होऊं लागला होता. खवळलेले वारे आपल्या शयन–गुहेंतून जागे होऊन गगन–तलाच्या पटांगणावर आपले घोडे हळुहळु फेकूं लागले होते.

– शि. म. परांजपे : ( तें झाड अजून आहे ना हो ? ).

## पावसाच्या ललकाऱ्या

आकाश विजांनीं फाटत होतें ! समुद्र लाटांनीं दुभंग होत होता ! दिशा दिसेनाशा झाल्या होत्या आणि सर्व सृष्टि खिन्न, उदास आणि रडवलेली झाली होती ! आणि थोड्याच वेळांत पावसाची मुसळधार सुरू झाली !

– शि. म. परांजपे : ( गोविंदाची गोष्ट ).

## पाण्याचीं फुलें

इतक्यांत पाऊस जोराचा येऊं लागला. सरीवर सरी येऊं लागल्या. टपोऱ्या मोगऱ्याच्या कळ्यांचे हारचे हार आकाशांतून पृथ्वीवर सोडल्यासारखें दिसत होतें. इतक्या जोरानें येत होत्या पावसाच्या धारा जमिनीवर, कीं खालीं सर्वत्र बुडबुड्यांचीं फुलेंच फुलें नाचत होतीं. आणि पृथ्वीची आतुरता वाफांच्या रूपानें प्रकट होत होती. पावसानें भूमातेला संतुष्ट केलें. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. केवढें मजेदार दृश्य दिसूं लागलें.

– प्रो. वि. पां. दांडेकर : ( पोरकटपणा

## वसंतांतील कोंकण

वसंतानं त्या रानांत पाऊल घातलंन् कीं अवघी सृष्टि जणूं धुंदारायची ! गाडग्याएवढाल्या कैऱ्यांनीं कलमं लावायचीं. काजूच्या बोंडूंचा धुंद गंध अवघ्या शिवारांत कोंदायचा. मुळांपासून तों शेंड्यापर्यंत लटकलेल्या फणसांच्या भारानं एवढाल्या फणशी पण कशा करकर बोलायच्या. कोकमांचीं नीटस, उंच झाडं तांबूस, पिकलेल्या कोकमांनीं नुसतीं बहरून निघायचीं.

— गो. नी. दांडेकर : ( शितू )

## ज्येष्ठांतील कोंकण

ज्येष्ठ महिना लागला. अनंत अन् मोगरी फुलल्या. मोरांनीं ओरडून सगळं रान गाजावलं. सरड्यांचीं डोकीं तांबडीं झालीं. दरियावर मासली पागायला गेलेलीं होडगीं कोलिमांनीं भरभरून येऊं लागलीं. काजव्यांच्या लुक-लुकत्या दिवट्यांनीं रात्री चमकायला लागल्या. गांवभरचे पिंपळ पालवले. खाडींतल्या माशांचे डोळे काळे झाले अन् शेवटीं खाडीला फूल आलं. तिचं पाणी निळसर झालं.

— गो. नी. दांडेकर : ( शितू )

## कोंकणचे गुण

कोंकणच्या सह्याद्रि पर्वतापासून टिळकांनीं आपल्या आकांक्षांचा उत्तुंगपणा घेतला होता. कोंकणी खडकाळ कातळापासून त्यांना निश्चयी मनाचा कठोरपणा मिळाला होता. खडक फुटेल, पण टिळकांचा निश्चय ढळणार नाहीं याचा अनुभव सर्वांसच असे.

— न. चिं. केळकर : ( टिळक-चरित्र )

**उमललेलीं कमळें**

इकडे गांवोगांव तळीं आहेत. लाल कमळें ठायीं ठायीं दिसत व दृष्टि ओढून घेत. शुभ्र कमळेंहि नयनमनोहर सूर्याकडे पहात हंसत असत. मला कमळ पाहून नेहमींच उचंबळून येत असतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

**मोहोरलेला आंबा**

थंडी पडूं लागली कीं आंबे मोहरूं लागतात. जणूं थंडीचा कांटा अंगावर फुलतो त्यांच्या. किती तरी आंबे मोहोरले आहेत. शिवरात्रीपर्यंत कैऱ्या तयार होतील. मोहोरलेलें आंब्यांचें झाड किती सुंदर दिसतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें, भाग २ रा )

**आकाशींचीं फुलें**

सायंकाळ झाली. सूर्यास्ताचे रंग हळुहळू मंद झाले. अंधाराच्या छाया पसरूं लागल्या. गंभीर होतें तें दृश्य. दूर काळा किनारा सर्पाप्रमाणें दिसत होता. आकाशांत शुक्र दिसूं लागला. हळुहळू मृग नक्षत्र व खालीं व्याध दिसूं लागला. आकाशाची बाग गजबजली. कृष्णपक्ष होता. ताऱ्यांना स्वातंत्र्य होतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* सात्त्विक अंतःकरणामध्यें अंतर्गत आनंदाच्या चंद्र-प्रकाशाच्या अखंड ऊर्मि उसळत असतात.

— शि. म. परांजपे

* तुझ्या हृदयाचा डोह अथांग असूं दे. तिथं अनंत पाणी असूं दे. — साने गुरुजी

## गवतावरील दंव

सकाळची वेळ. दंव अपरंपार पडलें होतें. जणूं तें गवत आमचे पाय प्रक्षाळीत होतें. उंच गवतांतून जातांना तीं कुसेंहि बोंचत. वारा आला म्हणजे गवत डोले आणि त्यांच्या अंगावरचीं देवाचीं मोतीं खालीं गळत. सूर्य उगवला नि भुरुभुरु दंव उडूं लागलें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## सूर्याचें आगमन

सूर्याच्या आगमनानें शोभेंत एकदम नवा रंग भरला. भोंवतालचा भाग, झाडीं, जाण्यायेण्याच्या वाटा व खालचीं शेतं जास्त स्पष्ट, जास्त सुंदर दिसूं लागलीं. दूरदूरचा धूसरपणा कमी झाला व काळ्यानिळ्या झाडींत लपलेली नगराची विशालता इथं तिथं डोकावूं लागली. माणसां-जनावरांची वर्दळ वाढली आणि सूर्याचीं कोंवळीं किरणें सावल्यांना स्पष्ट रूप देऊं लागलीं.

— ना. ह. आपटे : ( अपेक्षा )

## सृष्टीच्या रंग-खाणी

सकाळीं उठलों तों समोर प्रभातकाळचा लालसर प्रकाश किती रमणीय दिसत होता ! मी तन्मय होऊन बघूं लागलों. वेदामध्यें सकाळच्या उषादेवीचीं किती सुंदर स्तोत्रें आहेत ! उषादेवीला ऋषींनीं " मघोनी " म्हणजे देणग्या देणारी असें म्हटलें आहे. सोनें, चांदी, तांबें, रुपें यांच्या अनंत खाणी उषा-उघडते त्यांची जणूं सृष्टीवर वृष्टि करते. दंवबिंदूंनीं न्हाऊन-माखून ही उषा किरणांचे हार घालून येत असते असें ऋषि म्हणतो.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें, भाग २ रा )

## नदीकांठचें दृश्य

कृष्णेचें तें प्रशान्त, शीतल आणि पावन उदक मंद गतीनें वहात होतें. घाटावर स्त्री-पुरुषांचा समूह स्नान करीत होता. कृष्णाबाईच्या पूजेकरितां भाविक स्त्रियांनीं प्रवाहामध्यें सोडलेलीं फुलें तरंगत चाललीं होतीं. मंद वायूनें प्रचलित झालेल्या पाण्याच्या लहान लहान लाटांवर सूर्याचीं कोमल किरणें पडून सर्व नदीचें पात्र आल्हादकारक दिसत होतें. पलीकडच्या तीरावर असलेल्या झाडांचीं प्रतिबिंबें पाण्यांत पडलेलीं होतीं व त्यांच्या आसपास उगवलेल्या गवतावर गाई आणि वासरें अत्यंत आनंदानें इकडेतिकडे चरत होतीं व त्यांचे गोवारी सर्व एकत्र जमून आपले बाळपणाचे खेळ खेळण्यामध्यें गुंतून गेलेले होते.

— शि. म. परांजपे : ( पितृतर्पण )

## सरत्या वर्षाची सायंकाळ

एका दगडावर बसून सूर्यास्ताची शोभा मी पाहूं लागलों. जुन्या वर्षाचा निरोप सूर्य घेत असतांना दिसत होता आणि हें हृदयस्पर्शी दृश्य आकाशांत जमा होऊन विविध रंगांचे ढग पहात होते. क्षितिजापासून वर आकाशांत ढगांच्या बिछायतीवर सूर्यकिरणांचा प्रकाशमार्ग होता. जुन्या वर्षांतून निर्माण होणारें नवें वर्ष जणूं काय असेंच प्रकाशमय, तेजोमय, स्फूर्तिमय निघणार अशी ग्वाही किंवा सूचना त्या प्रकाशमार्गावरून मिळत होती.

— प्रो. वि. पां. दाण्डेकर : ( शेवटीं पायींच प्रवास )

* मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानांतून जातो.

— रा. ग. गडकरी

## पौर्णिमेची सायंकाळ

सृष्टींतील महाकाव्य म्हणजे हा समुद्र ! कन्याकुमारी-जवळ अनेक समुद्र एकत्र मिळतांना दिसतात. नद्यांचे संगम आपण कल्पूं शकतों. हा तर सागरांचा संगम. आणि पौर्णिमेच्या दिवशीं सायंकाळीं तेथें पूर्वेच्या बाजूला चंद्र वर येतांना दिसतो, तर पश्चिमेकडे सूर्य मावळतांना दिसतो. जणूं विराट विश्वंभर सायंकाळीं दोन हातांत दोन चेंडू घेऊन खेळत आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें, भाग २ रा )

## वनाची शोभा

सायंकाळच्या कोंवळ्या आरक्त सूर्यकिरणांनीं नटलेले हे तरुवर—कोणत्या नागरिक मनुष्याला असली शोभा पहावयास मिळेल ? तांबूस सूर्यकिरणांनीं आच्छादिलेला हा नदीचा प्रवाह—उगीच नाहीं त्यांना यमुनातीर इतकें आवडलें तें ! आणि गाईंचीं हीं खिल्लारें ! मदिरेप्रमाणें धनहि मादक आहे म्हणून म्हणतात; असें म्हणणारांनीं या गोधनाकडे पहावें.

— कृ. प्र. खाडिलकर : ( स्वयंवर )

## आकाशांतील लपंडाव

रात्रीं आकाशांतील गंमत बघतों. ढग येतात आकाशांत परंतु ते दाट नसतात, झिरझिरीत असतात. आपण अंगावर अर्धवट पातळसें पांघरूण घ्यावें त्याप्रमाणें आकाशांतील तारका क्षणभर ढगाचें झिरझिरित पांघरूण अंगावर घेतात . तर दुसऱ्याच क्षणीं फेंकून देतात व हंसूं लागतात.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## अंधारांतील दौड

वेळ अगदीं संध्याकाळची. झाडी किर्र. पाऊलवाट जेमतेम दिसते न दिसते इतक्याच बेताची. त्या वाटेनें दोन माणसें झपूझप् चाललीं होतीं. एक माणूस मोठा असून खूप झपाट्यानें चालला होता व दुसरा लहान पोऱ्या होता. त्यांचे मनांतून थोड्याच वेळांत कोणता तरी गांव गांठावा असें होतें, असें दिसलें. क्षणोक्षणीं अंधःकार त्यास गांठीत होता. आणि तेहि जणूं काय अंधःकारास मागें सारण्याकरितां जीव घेऊन धांवत होते.

— हरिभाऊ आपटे : ( उषःकाल )

## वाऱ्यांतील अद्‌भुतता

वारा म्हणजे अद्‌भुत वस्तु ! तो दिसत नाहीं, परंतु त्याचें अस्तित्व सारखें भासतें. कोठून येतो तो? कोठें त्याचें घर ? तो दरींत रहातो कीं डोंगरांत ? आकाशांत कीं पाताळांत ? वाऱ्यावर आपलें जीवन अवलंबून आहे. हवा म्हणजे वाराच ना ? हवा अधिक चलनवलन करूं लागली म्हणजे आपण तिला नाना नांवें देतों. वारा झाडामाडांशीं खेळेल, फुलांजवळ गोष्टी करील, लाटांजवळ धिंगामस्ती करील. मनुष्य घामाघूम झालेला असावा, वाऱ्याची झुळूक आली तर परमानंद होतो.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* नदी ज्याप्रमाणें ओलावा देत वहात रहाते, त्याप्रमाणें तुझी जीवनसरिता सर्वांच्या जीवनाला ओलावा देत वहात राहो. — साने गुरुजी

* ध्येयासाठीं जगणें, ध्येयासाठीं मरणें याहून अधिक धन्यतेचें दुसरें काय आहे ? — साने गुरुजी

## गळणारीं पानें

थंडीच्या दिवसांत झाडांचीं पानें गळून पडतात. पुढें त्यांना नवीन वस्त्रें मिळायचीं असतात. वर्षभर अंगावर घातलेले कपडे आतां झाडें दूर फेकीत असतात. जमिनीवर वाळलेल्या पिंवळ्या पानांचे थरच्या थर असतात. आपल्याला जन्म देणारी भूमाता थंडीनें गारठेल म्हणून का आपल्या पानांची पासोडी झाडें तिला पांघुरवीत असतात ?

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## दहिंवर कीं गहिंवर ?

तो पौष महिना होता. थंडी बरीच पडत असे. अंगाला आणि जमिनीला भेगा पाडणारा वारा साऱ्या दिवसभर सुटत असे. त्या वाऱ्यामुळें सर्व झाडांवरील बहुतेक पानें गळून पडलेलीं होतीं...सर्व पानांवर सकाळच्या दहिंवराचे थेंब पडून ते खालीं गळत असल्यामुळें तो वृक्ष आपल्या सांप्रतच्या विपर्यस्त स्थितीबद्दल दुःखाश्रुच गाळीत आहे असा मला भास झाला.

— शि. म. परांजपे : ( आम्रवृक्ष )

## परमेश्वराचें भावगीत

ढग दोन आले होते. रिते होऊन ओलावा देऊन गेले. ते जातांच पुन्हां चंद्र दिसूं लागला. मी खिडकींतून त्याच्याकडे बघत होतों. निळ्या आकाशांतून तो हंसत होता. चंद्र म्हणजे विश्वंभराचें मुकें भावगीत आहे !

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* ज्या मानानें जीवनांत सत्य, शिव आणाल त्या मानानें त्यांत सुंदरता येईल. — साने गुरुजी

## घाटांतील प्रवास

संथ डुलत्या चालीनें, वळसेदार मार्गानें गाडी घाट चढली. बोगद्यांच्या काळ्या पडद्यांपलीकडे नवीन ठश्यांचा अनपेक्षित पट उलगडत होता. दृष्टि डोंगरमाथ्यावरून खोल दऱ्यांत कोसळत होती. उतारावरून चढत पुन्हा गाडी बोगद्यांतून जात होती. मग ती दरी अदृश्य होऊन पलीकडल्या बाजूला दुसरी दरी आपलें गुह्य उघडें करीत होती. त्या दरींतल्या टेकाडावर चार आवळींजावळीं घरें तोल सावरून बसलीं होतीं. खालीं नदीच्या प्रवाहाची कृश रेषा वळसे घेत दूरवर पुसट होत गेली होती. तिचा पाठलाग करतांना नजर एकदम एका उंच डोंगरावर आदळली आणि ती वेधून वर गेल्यावर एका ठिसूळ, छोट्याशा दिसणाऱ्या दगडी पुलाच्या कमानींत थबकली.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## मुंबापुरींतील दीपोत्सव

हें चर्चगेटसमोरचें लाल प्रकाशाचें दृश्य बघ. जणूं अंगावर पिंजर उधळलेले, गुलाल उधळलेले नवरदेव उभे आहेत ! आणि ही पलीकडची इमारत; तिच्या शेंड्यावर पायलीचा कंदील दिवाळींत आपण लावतों व तो वाटोळा फिरतो त्याप्रमाणें फिरते वाटोळे दिवे लावले आहेत. मौज ! ज्यानें त्यानें आपली हौस, आपली कला प्रकट केली आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* आपण चांगल्याकडे बघावें व आशेनें आपलें उद्योग करीत राहावें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## सुरूचीं झाडें

ह्या झाडांना येथें अनेक आकार दिलेले आहेत. त्यांतलीं कांहीं चर्चच्या मिनारांप्रमाणें उंच व निमुळती होत गेलेलीं आहेत. कांहीं छोटीं घुमटाच्या आकाराचीं आहेत. त्यांतलीं कांहीं अगदींच डुबरीं आहेत. कांहीं जरा उंच आहेत, कांहीं जास्त डेरेदार आणि गोल आहेत तर कांहीं कमी डेरेदार आणि टोंकदार शेंड्यांचीं आहेत. अनेक आकार त्या झाडांना देण्यांत आलेले आहेत, आणि कोन साधून तीं अशा प्रकारें लावण्यांत आलेलीं आहेत कीं त्यामुळें अनेक रेखीव आकृत्या निर्माण व्हाव्या. ह्या सुबक हिरव्याचार आणि नाजूक भुरभुरीत कांड्यासारख्या पानांच्या झाडांनीं ह्या बागेला कांहीं विशिष्ट शोभा आणलेली आहे.

— गंगाधर गाडगीळ ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## निसर्गांतील पुष्पपात्रें

जिकडे तिकडे मोहरलेले आम्रवृक्ष दिसत होते. कोणाचा पिंवळसर मोहोर, कोणाचा शेंदरी लालसर, कोणाचा जरा नीलवर्णी ! आंबे मोहरले म्हणजे किती सुंदर दिसतात ! जणूं वनदेवतेच्या दिवाणखान्यांतील सजवून ठेवलेलीं पुष्पपात्रें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## निष्पाप जीवन

झाडें म्हणजे प्रभूचीं हिरवीं मंदिरें असें मला वाटतें. या हिरव्या मंदिरांत दंभ नाहीं, पैशांनीं येणारीं व्यसनें नाहींत, श्रेष्ठ–कनिष्ठपणाचे खोटे भेद नाहींत.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## अग्नीच्या ज्वाला

अंगणाजवळचें पर्णगृह तर संपूर्णतः कोसळून भस्मसात् झालें होतें. जळून कोळसा होत असलेल्या बांबूंची, वाशांची व पानांची एक मोठी थोरली रास तेथें तडतडत होती. खुद्द घराची इमारतही नष्टप्राय होण्याच्या मार्गास लागली होती. छप्पर आंतल्या बाजूस अर्धवट कोसळून पडलें होतें व भिंतीही खचूं लागल्या होत्या. इमारतीचे सर्व भाग अखेरचा नाश होण्यापूर्वीं परस्परांकडे धांव घेऊन एकमेकांना मिठ्या मारीत आहेत असा भास होत होता. त्यांच्या त्या संमिश्र समुदायांतून उसळणाऱ्या केशरी लाल ज्वाला अग्निनारायणाच्या ध्वजाप्रमाणें मोठ्या दिमाखानें आकाशांत फडफडत होत्या.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## शमलेली तहान

कोसळणाऱ्या एका झोताच्या अगदीं कडेला मी जाऊन बसलों. त्या वेगानें धांवणाऱ्या प्रवाहांत माझे डोळे सोडून दिले. माझा हात त्या झोतांत बुडवला. त्याच्या वेगाचा हाताला बसणारा झटका अनुभवला. त्याच्या ओलेपणानें आणि थंडपणानें मी सुखावलों. त्यांतल्या पाण्यानें मीं तोंड धुतलें आणि चुळके भरभरून मी तें प्यालों. कड्यावरून निर्भरपणें स्वतःला खालीं लोटून देणाऱ्या पाण्याला असें वाट चुकून माझ्या काळोख्या गरम पोटांत जाऊन काय वाटलें असेल कोण जाणे. पण माझ्या अंगाअंगांतून मात्र तृप्तीचे ओहोळ वाहूं लागले. डोक्यावरचा सूर्याचा ताप उचलला गेला. — गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## मोराची मोहकता

हा मोराचा पिसारा पहा. अहाहा ! एकेका पिसाची ती ठेवण, तें रंगकाम, ती जिवंत चमक, तें तरल नटवेंपण ! आद्य कलावंत ! अशा अनेक सुंदर पिसांचा तो पिसारा पसरून तो तुझा मोर जों जों आनंदानें उन्मत्त होऊन नाचूं लागतो; तों तों देवा, तुझी ती ललित कलाकुसरी पाहून 'धन्य देवा, धन्य तुझी ! वा रे वा !' असें वारंवार उद्‍गारत माझें हृदयहि नाचूं लागतें आणि असा पिसारा मनुष्यासहि तूं कां दिला नाहींस म्हणून किंचित् रुसूंहि लागतें !

— वि. दा. सावरकर

## उडतीं फुलपांखरें

मी एकदां बडोद्यास याच दिवसांत जात होतों. रस्त्याच्या दुतर्फा ठायीं ठायीं कमळें आणि पिंवळीं पांढरीं लाखों फुलपांखरें ! जगूं नाना रंगांचे कागद फाडून कोणी वारेमाप फेंकीत आहे असें वाटे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें, भाग २ रा )

## देवाघरचें चांदी-सोनें

चंद्र वरती असतो. भरती येऊन गेलेली. ओलसर वाळवंटावर चंद्राचा प्रकाश पडून सारें चांदीसारखें दिसतें अन् वाटतें, जावें नि चांदी भरून आणावी; परंतु देवाघरचें हें चांदी-सोनें बघायचें असतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* हृदयाचा उन्हाळा पण डोळ्याचा पावसाळा— वैऱ्यावरसुद्धां असा प्रसंग आणूं नये देवानं !

— वि. स. खांडेकर

## झेलमचा उगम

नसानसांतून व रोमारोमांतून चेतना उत्पन्न करणारा शीतल मधुर वारा जेथें वाहतो, जेथें वनश्री आपल्या यौवनाचा पुरेपूर उन्माद प्रकट करते, जेथें पर्वत आपल्या सौंदर्यानें हा खरोखरच पर्वत आहे कीं रंगभूमीवरील पडदा आहे अशी शंका मनांत उत्पन्न करतो आणि जेथील शांति चैतन्यानें गजबजलेली असते, अशा ठिकाणीं झेलम नदीचा उगम झाला आहे.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## यमुनेचें जन्मस्थळ

तें स्थळ म्हणजे यमराजाच्या भगिनीचें उगमस्थान होय. उंचीवरून बर्फ वितळून मोठा धबधबा खालीं पडत आहे; आसमंतात् गगनचुंबी नव्हे तर गगनभेदी जरठ महावृक्ष आडवे पडून कुजत आहेत; उत्तुंग पहाड यम-दूताप्रमाणें रक्षण करण्यास उभे आहेत; घटकेंत पाणी थिजून त्याचें बर्फ व लगेच बर्फाइतकें थंड पाणी होत आहे—अशा ठिकाणीं भुईंतून विलक्षण रीतीनें उकळणारें पाणी उसळून वर येतें.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## हिमालयाचें श्रेष्ठत्व

जगतांतील सर्व दुःखांना सामावून घेईल इतका तो थंड आहे; कुबेरालाहि आश्रय देण्याइतका तो धनाढ्य आहे, आणि मोक्षाची शिडी बनूं शकेल इतका तो उंच आहे.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## समुद्राचें सामर्थ्य

हाच समुद्र पहा. केवढी ही अतर्क्य, अगम्य राक्षसी शक्ति ! त्याच्या अंगावर ही नाव निसरत, गंमत करीत चालली आहे–तो चालू देतो म्हणून ! जसा एकादा प्रचंड राक्षस एकाद्या घुंगुरुटाचें धाष्ट्र्य क्षणभर चालू देतो आणि पटकन् चापटी मारून करून टाकतो त्यास होतें कीं नव्हतेसें ! तसें हें तुम्हां घुंगरुट मनुष्याचें धाष्टर्य. ही प्रचंड सामुद्रिक शक्ति खवळेल तर एका बिंदूच्या, एका तुषारावर ही तुझी नावच नव्हे तर हें खंडच्या खंड उचलून चुरून सुपारीसारखें झटकन् गिळून टाकील ! तर पत्ता लागूं देणार नाहीं कीं इकडे कोणी आशिया-खंड होतें कीं नव्हतें ! यःकश्चित् हा मनुष्य !

— वि. दा. सावरकर

## लाटांची क्रीडा

सूर्य समुद्रांत बुडायला लागला त्या वेळीं केवढी गंमत दिसली ! जणुं कांहीं समुद्राच्या पाण्यांत कुणी तरी सोन्याची घागर बुडवीत आहे ! जर लावलेल्या अस्मानी साडीसारख्या दिसणाऱ्या या समुद्राकडे किती वेळ पाहिलें तरी मला पुरें होईना.

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

* गरुड पक्ष्याप्रमाणें आकाशांत उंच भराऱ्या मारल्या म्हणजे तेथून सपाट व मऊ दिसणारी पृथ्वी खरोखरीच तशी मऊ नसते किंवा आपण तिच्यापासून उंच उडून गेलों म्हणजे ती तशी मऊ किंवा सपाट बनतहि नाहीं.

— दत्तो अप्पाजी तुळजापूरकर : ( माझें रामायण )

## होडीनें कापलेलें पाणी

हालत-डुलत वल्ह्यांच्या आघाताबरोबर हिसक्या-हिसक्यानें पुढें सरकत आमची होडी चालत होती. वल्ह्यांच्या रुंद हातांनीं पाणी फेसाळत, ढवळत मागें ढकललें जात होतें आणि उलगडणारी नागमोडी रेषा मागें सोडीत होडी पुढें चालली होती. तलावाच्या मध्यभागीं सारें अधिकच शांत आणि स्तब्ध वाटत होतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## निसर्गाची योजना

मानवानें आनंदावें, क्षणभर तरी काळजी त्यानें दूर ठेवावी म्हणून ही फुलें, हीं पांखरें, हीं झाडेंमाडें, नद्यानालें, पर्वत-पहाड, आकाश, चंद्र सूर्य, तारे, ढग, नाना रंग यांची मौज सभोंवार विश्वंभरानें ठेवली आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## कडाडणारी वीज

इतक्यांत एकदम पांचपन्नास आसूड एकदम वाजवावेत अशा आवाजानें सुरवात होऊन वीज कडाडली आणि अशी—ही अशी—सरपटणाऱ्या सूर्याप्रमाणें तेजानें चकाकत सर्रकन् माझ्या डोळ्यासमोरून ती नाहींशी झाली.

— य. गो. जोशी

## फुलांचे ताटवे

फुलें म्हणजे सृष्टींतील महान् काव्य आहे. मन कितीहि अप्रसन्न असलें तरी फुलांचे ताटवे बघून प्रसन्न होतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें, भाग २ रा )

### उत्सवाचा हेतु

संघशक्ति, कर्तव्यजागृति व बंधुभाव यांचें संवर्धन करणें हाच उत्सवाचा हेतु असला पाहिजे.

— ना. धों. ताम्हनकर : ( दाजी )

### उत्सव म्हणजे आनंद

उत्सवप्रिय मनुष्य क्षणभर अडचणी दूर ठेवतो, दुःखें दूर ठेवतो. मनुष्याला आनंद हवा असतो.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

### पाडव्याचा संदेश

नवें वर्ष म्हणजे नवे संकल्प करण्याची वेळ. जुनें जावो, नवें येवो; जें जें वाईट, बुरसटलेलें, काळाला न शोभेसें असेल तें तें जावो. नवीन काळाला शोभेसें येवो.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें भाग २ )

### व्यायामाचें मोल

व्यायाम ही अमृतवल्ली आहे. तिचा हा गुण सगळ्या जगानें अनुभवून पहावा.

— ना. ह. आपटे : ( सुखाचा मूलमंत्र )

### हिरवळीची कोवळीक

त्या वेळीं पृथ्वीवर जो सर्वत्र हिरवा रंग पसरलेला दिसत होता, तो परमेश्वराच्या सदय अंतःकरणाचा कोवळेपणा व लुसलुशीतपणाच पर्जन्याच्या धारांबरोबर आकाशांतून ह्या मृत्युलोकावर उतरून चोहोंकडे पसरला आहे कीं काय असें वाटत होतें.

— शि. म. परांजपे : ( प्रभाकरपंतांचे विचार )

## ही खरी दिवाळी !

बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयांतील घाण दूर करून द्वेष, मत्सर, सूड, स्वार्थ, लोभ दूर करून तेथें प्रेमाच्या पणत्या लावणार का ? तेथें भावनांच्या अमर ज्योति पाजळणार का ? गांधीजींनीं प्रेमाचा अमर नंदादीप पेटवून ठेवला आहे. त्या दिव्यावर आपल्या लहानमोठ्या पणत्या लावून घेऊं या. आपआपल्या जीवनांत प्रकाश आणूं या. सुधामाई, ही खरी दिवाळी.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## नागपंचमीचीं दृश्यें

नागपंचमी आली. लोकांनीं फांद्याफांद्यांवर झोके बांधले. गारुड्यांच्या पुंग्या वाजूं लागल्या. झोक्यांबरोबर नागांच्या फडा झुलूं लागल्या. बायकांनीं धरलेले फेर पहाण्यासाठीं ढगांच्या खिडकींतून सूर्याचे किरण बाहेर डोकावूं लागले.

— ग. ल. ठोकळ : ( गिरणबाबू )

## सृष्टिदेवतेची कृपा

मुलांच्या त्या खेळण्यासाठीं जमिनीनें हिरवागार गालिचा पसरला होता. आकाशानें त्यांच्यावर छत्र धरलें होतें. वायु त्यांच्यावर पंखा वारीत होता. पक्षी त्यांच्यासाठीं मंजुळ गाणीं गात होते आणि सूर्य त्यांच्याकडे सहास्यमुद्रेनें पहात होता.

— शि. म. परांजपे : ( प्रभाकरपंतांचे विचार )

## खेड्यांतील जनता

राष्ट्र जगायला हवें असेल तर राष्ट्राच्या मुळाला पाणी घालावयाला सर्वांनीं उठलें पाहिजे. कमळाला फुलवावयाचें असेल तर खालचा देंठ शाबूत हवा. पांढरपेशांचीं मुखकमळें अजून टवटवीत आहेत. हीं मुखकमळें कोट्यवधि खेड्यांतील जनतेच्या जीवनावर लटकलेलीं आहेत. हा खेड्यांतील जनतारूपी देंठ चिखलांत, शेवाळांत धडपडत आहे. तेथला ओलावा कमी होत आहे. हा देंठ सुकेल, गळून पडेल आणि हीं वरचीं हंसणारीं पांढरपेशीं कमळें ? तींहि धुळींत पडतील !

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## उध्वस्त खेडीं

त्या खेड्यांतील कित्येक घरें ओस पडलेलीं होतीं ! कित्येकांवरचीं छपरें नाहींशीं झालीं होतीं. कित्येक घरांच्या दगडी विटा आल्यागेल्यांनीं वाहून नेल्या होत्या. कांहीं घरांचे चौथरे आणि दगडी पायेच फक्त शिल्लक राहिले होते. ठिकठिकाणीं फड्या निवडुंग माजलेला होता. कित्येक ठिकाणीं कोरांटी–कोरफड उगवली होती. कांहीं पडीक घरांतून औदुंबराचे वृक्ष उभे होते, तर कांहीं घरांतून बाभळी वाढल्या होत्या. कावळ्यांची कावकाव कर्कशपणानें ऐकूं येत होती !

— य. गो. जोशी : ( संसार–प्रवेश )

* खरे भूदेव हीं जनावरें आणि खरे संत हे शेतकरी ! जमीन ही भू आणि हीं जनावरें देव आणि तीं बाळगणारे शेतकरी संत ! — धनुर्धारी : ( पिराजी पाटील )

## खेड्यांतील लग्न

गांवोगांवचे लोक लग्नाला लोटले. बैलगाडयांची रीघ लागली. धूमधडाक्यानें लगीन लागलें. खंडीखंडी गव्हाचा भरडा शिजून निघाला. लापशीचे डोंगराएवढे ढीग पडले. पंगतीवर पंगती उठल्या. वाढून वाढून गांवकऱ्यांच्या कमरा खिळखिळ्या झाल्या. पडगांवला हें लगीन चांगलेंच गाजलें. लालझेंडा झाल्यावर आडगांवचें लग्नाचें वऱ्हाड परत फिरलें. नवरीच्या पाठराखणीला तीन करवल्या निघाल्या. घुंगुरमाळांच्या तालावर बैल मोठ्या हिरीरीनें धांवत सुटले.

— ग. ल. ठोकळ : ( म्होतूर )

## कुस्त्यांचा फड

पहिलवानांच्या कुस्त्या सुरू झाल्या. सलामी झाली रे झाली कीं त्यांचीं तुळतुळीत शरिरें एकमेकांना भिडत व डावपेचांना सुरवात होई. दंडावर दंड, मांडीला मांडी किंवा छातीला छाती घासतांना शेराचे फोक एकमेकांवर घासल्यासारखा आवाज होई. चीतपट करणाऱ्या पहिलवानास त्याच्या कुंवतीप्रमाणें मुंडासें अगर चांदीचें कडें मिळे. ढोलकीं जोरजोरानें वाजत होतीं. लोकांचा जमाव अधाशीपणानें कुस्त्या पहात होता. एखाद्या पहिलवानाची पाठ जमिनीला लागली कीं ते कसून टाळ्या पिटीत व एकच गलका होई.

— ग. ल. ठोकळ : ( म्होतूर )

*जुन्या लोकांतील एक प्रेमळ समाधानी वृत्ति आज दिसेनाशी झाली आहे. — साने गुरुजी

## खेड्यांतील कुस्त्या

मराठे गड्यांच्या पैरणी आखाड्याच्या मातीनं लालसर रंगाच्या झालेल्या दिसत होत्या, अन् पुष्कळांच्या उंचसर भरीव मानेभोंवतीं चांदीच्या अगर सोन्याच्या ताइतांचे काळे रेशमी दोरे शोभत होते. एका कोंपऱ्यांत गांवच्या खंडोबाच्या देवळांतले वाजंत्री बसले होते. त्यांच्या डोक्यांवर तांबडीलाल पागोटीं होतीं, कमरेला घोंगड्या कसलेल्या होत्या आणि कपाळावर भंडारा अन् उघड्या पिळदार अंगाला लाल माती पसरलेली होती. हे लोक मधूनच आपल्या ढोलाचा पडघम् आवाज काढीत आणि कर्कश सुराच्या सनया वाजवूं लागत. आणि त्यांतच शिंगाची उंच कर्णभेदक आरोळी उठली कीं, कांहीं एका विलक्षण स्फूर्तिदायक लढाऊ वृत्तीच्या लहरी वातावरणांत उत्पन्न होत. कुस्त्या सुरू झाल्या व एकामागोमाग निकालांत निघूं लागल्या, तेव्हां साऱ्या प्रेक्षकांचा उन्माद वाढूं लागला.

— ना. सी. फडके : ( उन्माद )

## दोन पहिलवान

एक काळाझार, दुसरा पिवळाधमक असे दोन नागच जणूं काय फुसफुस करीत एकमेकांशीं भिडले होते... झिंग्याची पोलादी छाती लोहाराच्या भात्याप्रमाणें खालींवर होऊं लागली. हरबालाहि चांगलाच दम लागला होता. दोघांचीं शरीरें घामानें न्हाऊन निघालीं. ओल्या अंगाला ठिक-ठिकाणीं मातीं चिकटल्यामुळें हरबा बिबळ्या वाघासारखा दिसत होता.

— ग. ल. ठोकळ : ( म्होतूर )

## खेड्यांतील लग्न

गांवोगांवचे लोक लग्नाला लोटले. बैलगाड्यांची रीघ लागली. धूमधडाक्यानें लगीन लागलें. खंडीखंडी गव्हाचा भरडा शिजून निघाला. लापशीचे डोंगराएवढे ढीग पडले. पंगतीवर पंगती उठल्या. वाढून वाढून गांवकऱ्यांच्या कमरा खिळखिळया झाल्या. पडगांवला हें लगीन चांगलेंच गाजलें. लालझेंडा झाल्यावर आडगांवचें लग्नाचें वऱ्हाड परत फिरलें. नवरीच्या पाठराखणीला तीन करवल्या निघाल्या. घुंगुरमाळांच्या तालावर बैल मोठ्या हिरीरीनें धांवत सुटले.

— ग. ल. ठोकळ : ( म्होतूर )

## कुस्त्यांचा फड

पहिलवानांच्या कुस्त्या सुरू झाल्या. सलामी झाली रे झाली कीं त्यांचीं तुळतुळीत शरिरें एकमेकांना भिडत व डावपेचांना सुरवात होई. दंडावर दंड, मांडीला मांडी किंवा छातीला छाती घासतांना शेराचे फोक एकमेकांवर घासल्यासारखा आवाज होई. चीतपट करणाऱ्या पहिलवानास त्याच्या कुंवतीप्रमाणें मुंडासें अगर चांदीचें कडें मिळे. ढोलकीं जोरजोरानें वाजत होतीं. लोकांचा जमाव अधाशीपणानें कुस्त्या पहात होता. एखाद्या पहिलवानाची पाठ जमिनीला लागली कीं ते कसून टाळ्या पिटीत व एकच गलका होई.

— ग. ल. ठोकळ : ( म्होतूर )

*जुन्या लोकांतील एक प्रेमळ समाधानी वृत्ति आज दिसेनाशी झाली आहे. — साने गुरुजी

## खेड्यांतील कुस्त्या

मराठे गड्यांच्या पैरणी आखाड्याच्या मातीनं लालसर रंगाच्या झालेल्या दिसत होत्या, अन् पुष्कळांच्या उंचसर भरीव मानेभोंवतीं चांदीच्या अगर सोन्याच्या ताइतांचे काळे रेशमी दोरे शोभत होते. एका कोंपऱ्यांत गांवच्या खंडोबाच्या देवळांतले वाजंत्री बसले होते. त्यांच्या डोक्यांवर तांबडीलाल पागोटीं होतीं, कमरेला घोंगड्या कसलेल्या होत्या आणि कपाळावर भंडारा अन् उघड्या पिळदार अंगाला लाल माती पसरलेली होती. हे लोक मधूनच आपल्या ढोलाचा पडघम् आवाज काढीत आणि कर्कश सुराच्या सनया वाजवूं लागत. आणि त्यांतच शिंगाची उंच कर्णभेदक आरोळी उठली कीं, कांहीं एका विलक्षण स्फूर्तिदायक लढाऊ वृत्तीच्या लहरी वातावरणांत उत्पन्न होत. कुस्त्या सुरू झाल्या व एकामागोमाग निकालांत निघूं लागल्या, तेव्हां साऱ्या प्रेक्षकांचा उन्माद वाढूं लागला.

— ना. सी. फडके : ( उन्माद )

## दोन पहिलवान

एक काळाझार, दुसरा पिवळाधमक असे दोन नागच जणूं काय फुसफुस करीत एकमेकांशीं भिडले होते... झिंग्याची पोलादी छाती लोहाराच्या भात्याप्रमाणें खालींवर होऊं लागली. हरबालाहि चांगलाच दम लागला होता. दोघांचीं शरीरें घामानें न्हाऊन निघालीं. ओल्या अंगाला ठिक-ठिकाणीं मातीं चिकटल्यामुळें हरबा बिबट्या वाघासारखा दिसत होता.

— ग. ल. ठोकळ : ( म्होतूर )

## शेतकऱ्याची संध्याकाळ

संध्याकाळची वेळ जवळ जवळ येत चालली असल्यामुळें दूरवरच्या डोंगराच्या कड्यांतून शेतकीच्या कामाकरितां गेलेले शेतकरी लोक आपल्या घराकडे येण्याकरितां निघालेले होते व त्यांच्यामागून टोपलीमध्यें एखाद्या रकट्याखालीं झांकून ठेविलेलीं आपलीं तान्हीं मुलें डोक्यावर घेऊन–आपली इहलोकची सर्व संपत्ति आपल्या डोक्यावर घेऊन–त्यांच्या स्त्रिया त्यांच्यामागून चालल्या होत्या; व ज्यांना मुलें नव्हतीं अशा स्त्रिया आपल्या पोटच्या मुलाइतकीच ज्यांच्यावर त्यांची ममता आहे अशा आपल्या घरच्या गाईच्या वांसरांसाठीं कोंवळ्या कोंवळ्या गवताचे भारे डोक्यावर घेऊन तोंडापुढें आलेल्या त्या गवताच्या पातींमधून वाटेनें जाणाऱ्या एखाद्या तरुणाकडे कुतूहलकटाक्ष फेंकीत फेंकीत आपल्या घराकडे चालल्या होत्या. नांगरकीचें काम आटपून आपले नांगर आपल्या खांद्यावर टाकून शेतकरी लोक आपल्या शेताकडे पाठ फिरवून निघाले होते व त्यांचीं मुलें मधून मधून गाणीं म्हणत आणि मधून मधून बैलांच्या पाठीवर हात टाकीत आपल्या बैलांना घराकडे हाकून आणण्यांत गुंतून गेलेलीं होतीं.

– शि. म. परांजपे : ( प्रभाकरपंतांचे विचार )

*मानवी मन अजून संकुचितच आहे. एखादे राममोहन, एखादे विवेकानंद, एखादे रवींद्रनाथ, एखादे गांधीजी, एखादे रोमा रोलां, एखादा आइनस्टाइन मानवाला मानव म्हणून ओळखतांना दिसतो, हीच काय ती आशा.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## खेडेगांवची सुधारणा

खेड्यापाड्यांतून शास्त्रीय दृष्टि घेतलेले शेंकडों तरुण जायला हवेत. परिस्थितीला अनुरूप असे उपाय सुचवून, प्रयोग करून सारें जीवन त्यांनीं बदलून टाकायला हवें आहे. शनिमाहात्म्याचा रडका धर्म नष्ट होऊन कर्तृत्वाचा पुरुषार्थशाली धर्म यायला हवा आहे. रोग हटत आहे; स्वच्छता येत आहे, पाण्याची सोय होत आहे, पिकें वाढत आहेत, बागा फुलत आहेत, जातिभेद जाऊन मानवता येत आहे; सहकारी ग्रामोद्योग वाढत आहेत; दुभतें वाढत आहे; मोकळीं, स्वच्छ, स्वस्त घरें बांधलीं जात आहेत; ज्ञानविज्ञानकला यांचें संगोपन होत आहे; अशीं भारतीय खेडीं व्हायला हवीं आहेत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## खेड्यांची सुधारणा

पुन्हां खेडीं कशीं गजबजतील ? तेथेंच छोटे उद्योग-धंदे नेऊं तर हें होईल. शेतीच्या धंद्याभोंवतीं दुसरे शेत-धंदे उभारूं तर तरुण तेथेंच रहातील, उत्पादन वाढेल, उत्साह वाढेल, पुन्हां संस्कृतीला कळा चढेल.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## गांवाचा सेवेकरी

सेवामय वृत्तीनें भारतांत प्रेमस्नेहाचा पाऊस पाडणारे हजारों मेघ हवे आहेत. आठदहा गांवांच्यामध्यें असा एकेक सेवेकरी हवा.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## गांवाचें दृश्य

वासंतीनं खिडकींतून बाहेर पाहिलं तों घरांचीं वांकडीं-तिकडीं छपरं तिला दिसलीं. मधेंच देवळाच्या एका शिखरानं मान उंच केली होती अन् त्याचा कळस झळकत होता. पलीकडे एका अरुंद रस्त्यानें धुतलेल्या काळ्याभोर लठ्ठ म्हशींची रांग सावकाश चालली होती अन् त्यांच्या गळ्यांतल्या घंटांचा ध्वनि हवेंत तरंगत होता. दूरच्या एका तिमजली घराच्या उंच छपरावर एक माकड बसलं होतं. त्यानं कांहीं वेळ आपली कमर खाजविली, कपाळाला आंठ्या घालून इकडे तिकडे पाहिलं अन् त्यानं कसला विचार केला कुणास ठाऊक, एकदम झेप घेऊन तें जें उठलं तें छपराछपरांवर उड्या टाकीत पार दिसेनासं झालं. — ना. सी. फडके : ( इंद्रधनुष्य )

## खेड्यांत चला

आपल्या हिंदुस्थानचें काळीज खेडेगांव असून नगर ही देहरचना आहे. तेव्हां काळजांत सांठलेलें अज्ञानी रक्त शुद्ध होण्यास तेथें सुशिक्षितांनीं येऊन गर्दी केली पाहिजे. म्हणजे ताजें रक्त निर्माण होऊन तें नव्या जोमानें खळाळूं लागेल. तें देहभर पसरण्यास मग वेळ नाहीं.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वीचा काळोख )

## चिरंजीव ग्रामसंस्था

समाधानाच्या बळावर सुखानें नांदणारीं आणि टिकून राहिलेलीं आमचीं ग्रामें हींच आमच्या राष्ट्रपुरुषाच्या शरीरांतील चित्केंद्रें होत. — द. वा. पोतदार

## शहरें व खेडीं

खेडीं सुधारतील तेव्हांच देश सुधारेल. शहरें हीं हिंदमातेचीं वस्त्रें मानलीं तर खेडीं हीं तिचीं हाडें आहेत. हीं हाडें एकसारखीं झिजत असतांना नुसतीं सुंदर वस्त्रें परिधान करून तिच्या मुखावर तेज येणार नाहीं.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## शहराची ओढ

शहराची वाट ! किती भयंकर शब्द होता तो ! मला तो लागला. खेडीं ओस पडणें अन् शहरें अतोनात फुगणें हें काय बऱ्याचें लक्षण ? आपली समाजरचना बिघडली असल्याचें हें द्योतक नव्हे काय ? कुठें तरी भुंगा आंतून पोखरतो आहे; त्याच्यावर ताबडतोब इलाज झाला पाहिजे. खेड्यांच्या नाड्या ठीक असल्या तरच शहरांची धडगत !

— महादेवशास्त्री जोशी : ( राजगड )

## मुंबईचा वृक्ष

रंगनाथाला वाटलें, मुंबई म्हणजे एक झाड, भुलेश्वर ही एक फांदी, समोरची इमारत हें मधाचें पोळें आणि हे सटोडिये म्हणजे मधमाशांचा थवा.

— ग. ल. ठोकळ : ( वाघाचा डोळा )

## स्वच्छतेचें माहात्म्य

स्वच्छ घरांत परमेश्वर येतो; स्वच्छ हृदयांत परमेश्वर येतो. गांवांत पंच असतात ना ? आरोग्य, उद्योग, ऐक्य, ज्ञान व प्रेम हे पांच पंच आहेत. हे पांच पंच जेथें असतील तेथें परमेश्वर असतो.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

### खादीचें तत्त्वज्ञान

चरखा व माग यांच्या नादाबरोबर विचारांचा नादहि सुरू झाला पाहिजे. खादी मुकी नको. खादी म्हणजे संघटना; खादी म्हणजे स्वाभिमान; खादी म्हणजे स्वावलंबन; खादी म्हणजे निर्भयता; खादी म्हणजे प्रेम; खादी म्हणजे दुसऱ्याचें दुःख जाणणें व दूर करावयास धांवणें; खादी म्हणजे स्वराज्य; खादी म्हणजे स्वातंत्र्य.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

### चरख्याचें तत्त्वज्ञान

चरख्याचे जे अनेक सहचारी भाव आहेत त्यांपैकीं गरिबाविषयीं सहानुभूति, गरिबीची कदर किंवा आवड हा एक महत्त्वाचा भाव आहे. गरिबा-अमिरांची एकी करण्याचें सामर्थ्य चरख्याइतकें दुसरें कशांत नाहीं.

— विनोबा भावे : ( मधुकर )

### चरख्यांतील कला

लाखों दरिद्री लोकांच्या जीवनांत माधुर्य आणणारा चरखा, त्यांच्या मुलाबाळांच्या तोंडावर गुलाबी रंग चढवणारा चरखा, त्यांच्या दुःखी जीवनांत संगीत नेणारा चरखा. त्याच्यांत कला नसेल तर कोठें रे असेल ? चरखा म्हणजे कलानिधि. — साने गुरुजी : ( क्रांति )

* हे मॅझिनीचे लेख म्हणजे स्वतंत्रतेच्या अमृताचे झरे आहेत, स्वतंत्रतादेवीचीं मंदिरें आहेत, स्वातंत्र्य-लक्ष्मीचीं तीं पावन स्तोत्रें आहेत, स्वातंत्र्याचा अंगांत संचार करून देणारे हे जागरूक असे महामंत्रच आहेत.

— शि. म. परांजपे : ( मॅझिनीचें आत्मचरित्र )

### मजुराचा राग

त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. मस्तकावरच्या शिरा ताड्ताड् उडत होत्या. डोळे रागाच्या बेफाम आवेशानें बाहेर फुटून निघतील कीं काय असें वाटत होतें. बेफाम रागाच्या अनावर वाऱ्यानें चढून वळवळणारी हाताची मूठ त्यानें केव्हां उगारली व तिचा ठोसा सुपरिंटेंडेंटच्या छातींत केव्हां दिला हें कुणाला कळलेंदेखील नाहीं. — भा. वि. वरेरकर : ( धांवता धोटा )

### कारखान्यांतील कामगार

त्या खात्यांत शेंकडों रहाट यंत्रानें चालले होते; व त्या प्रत्येक रहाटापाशीं उभ्या राहून बायका सुताचा गुंडाळा तयार करीत होत्या. त्यांच्या डोक्यावर कापसाचे बारीक बारीक तंतु जमले होते. उन्हानें गिरण तापून गेली होती. त्यांतच फरशीवर टाकलेल्या पाण्याच्या वाफा निघून, रहाटाशीं काम करणाऱ्या बायकांना घामाच्या धारा लागल्या होत्या. — ग. त्र्यं. माडखोलकर : ( चंदनवाडी )

### गवतावरील पाण्याचे थेंब

जमिनीवरील गवतावर पडलेल्या जलबिंदूंमध्यें ईषदारक्त सूर्यरश्मि प्रविष्ट झाल्यामुळें, ते सर्व बिंदु थोडथोडे लाल दिसत होते. ते पाहून कोणी तरी कृपावत्सल अंतःकरणाच्या मनुष्यानें डाळिंबें फोडून ताजे व लाल दाणे आपल्याकरितां या तृणभूमीवर फेकले आहेत असें वाटून आसपासच्या झाडांवरील पोपट ते टिपून खाण्यासाठीं जवळ येऊन हिरमुसलेले होऊन अनेक वेळां माघारे जात होते. — शि. म. परांजपे : ( प्रभाकरपंतांचे विचार )

## साहित्य व मानवहित

मनुष्यजातीच्या अधिकांत अधिक हितास साधण्यासाठीं झटेल तेंच साहित्य श्रेष्ठ, तेंच सुप्रासंगिक. आनंद नी करमणूक हीं मानवहितास कांहीं प्रमाणांत हितकारकच असल्यामुळें त्यांचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणात वरील ध्येयांत होतोच. पण केवळ करमणूक हें कांहीं कर्तव्य नव्हे. घरांत आई मरणांतिक वेदनांनीं अंथरुणास खिळली असतां, जर एखादा बहकलेला कलावंत बंगल्यांत नायकिणीच्या नाचांत रमूं शकला तर त्यास कलावंत म्हटलें तरी कुलदीपक कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं !

— वि. दा. सावरकर

## काव्याची प्रचीति

लहानपणीं काव्य फक्त पुस्तकांत असतं, तरुणपणीं तें नुसत्या संसारांत दिसतं, पण पन्नाशी जवळ आली कीं तें जगांतल्या लहानसहान साऱ्या गोष्टींत भरलं आहे असा अनुभव येतो. — वि. स. खांडेकर : ( पहिलें प्रेम )

## कविता व स्त्री

सुंदर स्त्रियांनीं कवितेला वरच्या दर्जाला चढविलें आहे, तसेंच कवितेनें सुंदर स्त्रियांना चढवून ठेविलें आहे. कवितेनें किती तरी लोकांना शुद्ध वेडें केलें आहे तर शुद्ध वेड्यांनीं किती तरी कविता केली आहे !

— रा. ग. गडकरी : ( कवींचा कारखाना )

* व्यायाम केल्यानंतर मनुष्याच्या अंगांतून जसा घाम निघतो तसें वाङ्मय हें लेखकाच्या जीवनांतून सहज निघालें पाहिजे. — य. गो. जोशी

## तत्त्वज्ञानाचा उपयोग

तत्त्वज्ञान म्हणजे बंदुकीच्या दारूसारखें आहे. दारू ठांसून भरली कीं, काडवात लागतांच जसा तिचा बार उडतो त्याचप्रमाणें तत्त्वज्ञान मनांत ठसलें, कीं प्रसंगाची ठिणगी लागतांच त्याचा कृतींत परिस्फोट होतो.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## विनयानें ज्ञान

विहिरींत अपरंपार पाणी आहे; परंतु भांडें जर वांकणार नाहीं तर त्या भांड्यांत त्या अनंत पाण्यांतील एक थेंबहि शिरणार नाहीं. तसेंच ज्ञानाचे जे सागर असतात त्यांच्याजवळ जोंपर्यंत आपण वांकणार नाहीं, निमूटपणें त्याच्या चरणांजवळ बसणार नाहीं तोंपर्यंत ज्ञान मिळणार नाहीं. भरण्यासाठीं वांकावयाचें असतें, वाढविण्यासाठीं नमावयाचें असतें.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## ज्ञानासाठीं नम्रता

रिकाम्या भांड्यानें वांकलें पाहिजे. खरें रिकामें भांडें वांकेलच. मी जर रिता असेन तर मला नम्र होऊं दे. नम्रता हा ज्ञानाचा आरंभ आहे. मी नम्र होईन तर थोडें फार तरी कांहीं माझ्या जीवनाच्या भांड्यांत शिरेल.

— साने गुरुजी : ( जीवनकलह भाग २ )

* मनुष्याचा व्यवहार सुरळीत चालण्यास व उत्तरोत्तर त्याचें पाऊल पुढें पडत जाण्यास ज्ञानवृद्धि आणि ज्ञान-प्रचार यासारखें साधन नाहीं.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## ज्ञानासाठीं जन्म

आज तुम्ही विद्यार्थी आहां. अशा वेळेस मनाला मोकाट सोडणें योग्य नाहीं. स्वतःशीं कठोर झालें पाहिजे. कोंडलेला मनुष्य हवेसाठीं, बुडणारा कांठासाठीं, कृपण कवडीसाठीं धडपडतो, त्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं ज्ञानासाठीं तडफडलें पाहिजे. ज्ञान, प्रेम व सामर्थ्य मिळवा.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें, भाग १ )

## शास्त्रांची प्रगति

आजचें प्रत्येक प्रगत शास्त्र हा मानवी बुद्धीचा गगनचुंबी विजयस्तंभ आहे. प्रत्येक यंत्र ही मानवानें निसर्गावर मिळविलेल्या प्रचंड विजयाची पताका आहे.

— वि. स. खांडेकर : ( क्रौंचवध )

## शिक्षणानेंच देशोद्धार

गांजून, पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## लोक-शिक्षणाचें फल

ज्यांना आपल्या देशाचें पाऊल उत्तरोत्तर पुढें पडत जाऊन अखेरीस त्याला पहिल्या प्रतीच्या देशांत स्थान मिळावें अशी उत्कट इच्छा असेल, त्यांनीं मोठ्या कष्टानें संपादिलेल्या विद्येचा संकुचित स्वार्थ—साधनाकडे व्यय न करतां आपणांकडून होईल तितकें लोकशिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## शिक्षणाचा उद्देश

शिक्षणानें हृदयाचा विकास होण्याऐवजीं संकोचच होत होता. शिक्षणानें आंतरदृष्टि येण्याऐवजीं अधिकच बहिर्दृष्टि मी होऊं लागलों होतों. वस्तूंच्या अंतरंगांत जाण्यास शिक्षणानें तयार होण्याऐवजीं वस्तूंच्या बाह्य रूपरंगावरच भुलूं लागलों होतों. जें शिक्षण मनुष्याला इतरांच्या हृदयांत नेत नाहीं ते शिक्षण नव्हे. शिक्षणानें मला प्रत्येक वस्तु, प्रत्येक व्यक्ति म्हणजे ज्ञानमंदिर वाटलें पाहिजे. ह्या सर्व बाह्य आकाराच्या आंत जी दिव्य व भव्य सृष्टि असते तिचें दर्शन मला झालें पाहिजे.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## ज्ञानाची विविधता

गुलाबदाणींतल्या कारंज्यांतून निघाल्याप्रमाणें आधुनिक विद्वानाच्या मुखांतून प्रसंगोपात्त विद्येच्या सहस्र धारा एकाच वेळीं स्रवत असून शिवाय प्रत्येक धारेस निरनिराळ्या शास्त्रांचा निरनिराळाच सुगंध येत आहे, हा अजब चमत्कार पाहून जुन्या काळचा पंडित आश्चर्यानें थक्क व्हावयाचा; पण हें सर्व दिखाऊ आहे हें त्या बिचाऱ्यास काय माहीत ?

— न. चिं. केळकर : ( संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन )

## विचारांचा प्रसार

विचार किंवा मतें हीं मधाप्रमाणें होत. एका अंतःकरणांतून दुसऱ्या अंतःकरणांत त्यांचें प्रसरण व्हावयास उशीर लागतो.

— ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

### यत्नदेवाची पूजा

*यत्नदेवाची* भक्ति करावयाची म्हणजे सदोदित बेहद्द कष्ट करावयाचे. 'कष्टचि नाहीं तें निर्फळ' असें समर्थांनीं स्वच्छ लिहिलें आहे. कष्टाच्याच जोडीला आशा, उत्साह, जोम, तरतरी हे सर्व गुण असल्याशिवाय यत्न-देवाच्या पूजेची सांगता होत नाहीं. या सर्वांच्याहि आधीं सत्त्वाचें अधिष्ठान पाहिजे हें सांगण्यास नको.

— द. वा. पोतदार : ( श्रीयत्नदेवाची पूजा )

### प्रयत्नाचें सामर्थ्य

तूं करून पहा, म्हणजे तुझ्यामध्यें काय सामर्थ्य आहे तें तुला दिसून येईल. चंदन घासल्याशिवाय त्याच्यांतून सुगंध बाहेर पडत नाहीं आणि घर्षणावांचून लाकडा-मध्यें असलेली ज्वाळा दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

### प्रयत्नाची मातब्बरी

हैड्रोजन आणि ऑक्सिजन एक केले म्हणजे पाणी होतें, आणि त्याच पाण्यांत साखर घातली म्हणजे तें गोड होतें. त्याचप्रमाणें योग्य प्रयत्न केला असतां यशहि येतें. यासाठीं आपण प्रयत्न केले पाहिजेत. प्रयत्नानें साध्य होणार नाहीं अशी गोष्ट या जगामध्यें कोणतीहि नाहीं. उद्योगासारखें अनुकूल आणि आळशीपणासारखें प्रतिकूल दैव दुसरें कोणतेंहि नाहीं.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

* भाग्याचीं पिकें हीं निढळाच्या घामानेंच पोसावीं लागतात.

— लो. टिळक : ( केसरी )

## यत्नदेवाचा प्रसाद

यत्नदेवाची आराधना करणाऱ्यांना कशाचीहि वाण पडत नाहीं. यत्नदेवाचा प्रसाद झाला म्हणजे दुर्बलांचे सबळ होतात. यत्नदेवाची कृपा झाली म्हणजे लहानांचे थोर होतात. यत्नदेवाची तृप्ति झाली कीं करंट्यांचे कर्तबगार होतात. यत्नदेवाचा वरदहस्त डोक्यावर पडला कीं भाग्यहीनांचे भाग्यवंत होतात. यत्नदेवाचा संतोष झाला कीं अज्ञानांचे सज्ञान होतात, आंधळ्यांचे डोळस होतात, परतंत्रांचे स्वतंत्र होतात, सामान्यांचे असामान्य होतात, फार काय पण दगडांचे देव होतात.

— द. वा. पोतदार : ( श्रीयत्नदेवाची पूजा )

## प्रयत्नाचा महिमा

अलौकिकता म्हणजे नव्याण्णव टक्के प्रयत्न व एक टक्का ईश्वरी देणगी. प्रयत्नहीन इच्छा म्हणजे पंखहीन पांखरूं.

— साने गुरुजी : ( श्याम खंड ३ )

## विचारांचे दुष्काळ

अन्नाचे आणि पाण्याचे दुष्काळ सरकार दूर करील, परंतु हिंदुस्थानांतील उत्तम विचारांचे दुष्काळ कोणीही साहेब दूर करूं शकणार नाहींत. ते आपणच दूर केले पाहिजेत.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## प्रसन्नतेचें महत्त्व

प्रत्येक लहान वा मोठी गोष्ट करतांना मन प्रसन्न असावें असें मला वाटतें. प्रसन्नता म्हणजे परमेश्वराचा आशीर्वाद.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## गरिबीचा संसार

सुमारें आठ वाजून गेले, कृष्णी अंथरुणावर जागीच होती; पण गोविंदा केव्हांच झोंपीं गेला होता. एक रॉकेलचा दिवा, ज्याचा धूर सगळा इकडे तिकडे होतो आहे असा भिंतीशीं ठेवला होता; आणि त्याच्याजवळ यशवंतराव खालीं बुक ठेवून अगदीं मान वाकवून मनन करीत होतासें दिसलें. गंगाबाई अंथरुणावरच पाय असे ताठ करून व एका हातावर एक कानशील ठेवून बसली होती, कृष्णी आईची चौघडी पांघरून पण जागींच आपल्या दादाकडे पहात होती. इतक्यांत दादाच्या पापण्यावरून ओघळून येऊन एकदम एक थेंब टपकन् त्याच्या बुकावर पडला.

— हरिभाऊ आपटे : ( यशवंतराव खरे )

## कोल्हाट्यांची वस्ती

गांवाबाहेरच्या मैदानांत कोल्हाटी लोक मेखा ठोकून त्यांना दोर बांधून पालें उभीं करीत होते. त्याच मेखांना शेळ्या, बोकड आणि एडके बांधले होते. पलीकडच्या बाजूला बैलगाड्या सोडल्या होत्या. आजूबाजूच्या झाडांना घोडे बांधले होते. बैलांच्या आणि घोड्यांच्या पुढ्यांत वैरण टाकली होती. कुत्रीं इकडे तिकडे भटकत आणि भुंकत होतीं. कोंबड्या फडफड करीत दाणे टिपीत होत्या.

— ग. ल. ठोकळ : ( कडू साखर

* जो मोठी दृष्टी घेईल तो मोठ्या मानाचा. तो मानवतेला तारणारा, तो तिचा उद्धारकर्ता !

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जगाचें ऐक्य

हजारों मैलांवरील भूकंपाचे धक्के हवामानाच्या कचेरींतील नाजूक यंत्रांतील सुईला भलें मोठें चक्कर घ्यावयाला लावतात, त्याप्रमाणें जगाच्या एका टोकांतील संघटित वासनेची उठावणी दुसऱ्या टोंकाच्या संघटित व्यवहाराला गदगदा हालवूं लागली आहे.

— न. चिं. केळकर : ( सह्याद्रि )

## ऐक्याचें महत्त्व

खलाशी आपआपसांत तंटा करूं लागतील तर त्यांच्या हातांत असलेलें तारू कधींहि नीट चालावयाचें नाहीं; पण त्यांच्यांत सख्य असूनहि त्या सर्वांची, विशेषतः त्यांतील तांडेलादि अधिकाऱ्यांची होक्यावर नीट नजर नसेल तर त्यावर येणाऱ्या दुर्घट संकटापासून त्याचा निभाव लागणार नाहीं.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## ऐक्याचें बळ

हा समुदाय जें मनांत आणील तें करील. लाख लोकांच्या नजरेला काय अदृश्य असणार? लाख लोकांच्या एकवटलेल्या बुद्धीला काय अगम्य असणार? लाख लोकांच्या पायांना काय अनुल्लंघनीय असणार? आणि लाख लोकांच्या हातांना काय अप्राप्य असणार?

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

* ध्येयाचा वारा आपल्या जीवनांत भरपूर शिरूं दे. आपलीं जीवनेंहि मग सतेज दिसतील.

— साने गुरुजी : ( श्याम )

## भावनांचा आवेग

मस्तकाच्या शिरांतून रक्त इतकें आवेशानें वर चढत होतें कीं, त्याचा सळसळ असा आवाज कानांना स्पष्ट ऐकूं येत होता. डोळ्यापुढें प्रकाशाच्या आडव्या-उभ्या रेषा नाचत होत्या, आणि हातांतील पत्रावरील अक्षरें रेघोट्यांच्या गर्दीसारखीं वाटत होतीं. तोंडाला कोरड पडली होती. एक अक्षर उच्चारण्याइतकीदेखील शक्ति जिव्हेंत उरली नव्हती. थंडीच्या दिवसांत दाट धुकें पडून सारा प्रदेश दृष्टीला अगम्य व्हावा, त्याप्रमाणें अनेक भावनांच्या धुक्यांत माझ्या मनांतील कोणताच विचार माझा मलाच स्पष्ट कळेना.

— ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

## निद्रेची संजीवनी

निद्रा म्हणजे पृथ्वीवरचें अमृत आहे. जगांत निद्रा आहे म्हणून शांति आहे, समाधान आहे, थोडी विश्रांति आहे. दुःख, क्लेश, मानसिक यातना, अपमान, सर्वांवर रामबाण उपाय म्हणजे निद्रा. निद्रा म्हणजे सुधा-सिंचन. निद्रा म्हणजे आरोग्यदायिनी देवता. निद्रा म्हणजे प्रभूचें परम कारुणिक स्वरूप.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## तारुण्याचा गुण

तारुण्य हें अत्यंत सुंदर आहे. कारण मृत्यूलाहि भीक न घालणारं काळीज एक फक्त तारुण्याजवळच असूं शकतं.

— सौ. मालतीबाई दांडेकर

## सुधारणांचें क्षेत्र

ज्याप्रमाणें समुद्राला नद्यांचा, चितेला प्रेतांचा, लोभ्याला द्रव्याचा, दुर्वासाला अन्नाचा, कर्णाला दानाचा व धर्माला शांतीचा कंटाळा कधीं येत नाहीं किंवा आला नाहीं, त्याप्रमाणें खऱ्या सुधारकाला सुधारणेचा वीट येण्याचा कधींच संभव नाहीं.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## संकटांचा उपयोग

आपलें सत्यस्वरूप सिद्ध करण्यास सुवर्णाला अग्नींत शिरून दिव्य करावें लागतें व हिऱ्याला घणाचे घाव सोसावे लागतात.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## सुधारणेचा आरंभ

मनुष्य कधीं सुधारणार असा प्रश्न न करतां मी कधीं सुधारणार असा करायला हवा—आपआपलें जीवन तरी चांगलें करणें हें बरेंचसें आपल्या स्वाधीन आहे. आपल्याकडून तरी जगाच्या दुःखांत भर न पडो असें प्रत्येकानें मनांत ठरवून वागावें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## समाजाचें पुढारीपण

पिनल कोड हा मारका मास्तर होय; पण कीर्तनकार हे सामोपचारानें शिक्षण देणारे गुरु होत. कीर्तन-संस्था कांहीं सामान्य संस्था नव्हे; शाळेंतील शिक्षक किंवा वर्तमानपत्रकार यांच्यापेक्षांहि कीर्तनकाराचा अधिकार मोठा आहे.

— बा. गं. टिळक : ( पहिलें कीर्तन-संमेलन )

## सत्त्वशीलतेचें महत्त्व

स्वार्थत्याग अवश्य करा, पण सत्त्वत्याग मात्र मुळींच करूं नका.

— मा. त्र्यं. पटवर्धन

## शीलाची शुद्धता

ज्याप्रमाणें शुभ्र वस्त्र वापरण्याची संवय असलेल्या माणसाला त्यास थोडाहि डाग पडलेला खपत नाहीं, त्याचप्रमाणें नेहमीं शील शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसाला पापी विचार अगर आचार यांचा संपर्कहि दुस्सह होतो. — आचार्य जावडेकर

## मानवाची पात्रता

समुद्र हा जरी सर्व उदकांनीं संपूर्ण असला तरी ज्याच्या-पाशीं जेवढें भांडें असेल तेवढेंच तो त्याच्यामधून भरून घेणार ! आणि म्हणूनच जशी लोकांची किंमत असेल त्या मानानें त्यांचे देव बनलेले असतात.

— शि. म. परांजपे : ( काळातील निवडक निबंध )

## खरे अलंकार

सदाचार हा माणसाचा खरा अलंकार आहे. स्वातंत्र्य व सत्संस्कृति हा राष्ट्राचा अलंकार आहे. समानता व प्रेमाचें ऐक्य निर्माण करणें यांत माणुसकी आहे.

— साने गुरुजी : ( श्याम )

## कर्तव्याचें पुण्य

कर्तव्य करीत असतांना कोठेंहि आणि केव्हांहि मृत्यु आला तरी तो काशीक्षेत्रांतील मरणाप्रमाणें मोक्षप्रदच होतो.

— बा. गं. टिळक : ( लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका )

# ४

● मज रघुनाथजीवेगळें कोणी जिवलग नाहीं.

— रामदास : ( रघुनाथास पत्र )

● भाषारूप उपवनास आपल्या ज्ञानोदकाचें सेचन निदान आरंभीं तरी त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें केलें पाहिजे. कालेंकरून त्यांच्या श्रमाचा परिपाक कीर्तिरूप सुमनांनीं व अर्थरूप फलांनीं प्रकट होईलच होईल.

- विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

● आम्ही सुखसंवाद करूं तेहि मराठींत आणि दुःखविलाप करूं तेहि मराठींत आणि आम्ही प्रतिभाविलास करूं तेहि मराठींतच ! आम्हीं शोकगीतें गाऊं तींहि मराठींत आणि विजयघोष करूं तेहि मराठींतच !

— द. वा. पोतदार

## महाराष्ट्राचे गुणविशेष

महंत राष्ट्र म्हणोनि महाराष्ट्र। महंत म्हणजे थोर
महाराष्ट्र सात्त्विक ।
तेथचे जडचेतन पदार्थ तेहि सात्त्विक। तेथ असतां शरीर।
मानसिक कव्हणीचि उपद्रव नुपजति। आणिके देशीं शरीर।
मानसिक उपद्रव उपजता असे, तो महाराष्ट्रीं असतां शमे।
महाराष्ट्र निर्दोष सगुण। तेथ असतां अनाचार करावे
यांची बुद्धि नुपजे। आणि उपजली तर करूं न ल्हाइजे।
आपण अनाचार न करी, आणिकांसि करूं नेदीति तें महाराष्ट्र।
धर्म सिद्धी जाए तें महाराष्ट्र ॥

— आचार–स्थळ : ( हरिव्यास–शके १३२५ )

## महाराष्ट्रधर्म

भागवतधर्म हा वृक्ष मानला तर महाराष्ट्रधर्म हें त्यावर आलेलें फूल आहे आणि या महाराष्ट्रधर्माच्या फुलापासूनच पुढें महाराष्ट्र-स्वातंत्र्य हें फळ निर्माण होणारें आहे.

— वि. ल. भावे : ( महाराष्ट्र सारस्वत )

## महाराष्ट्रीय पाडवा

तान्हाजी मालुसऱ्यांनीं सिंहगडाच्या किल्ल्यावर जें निशाण लाविलें, चिमाजी आप्पांनीं वसईच्या किल्ल्यावर जो ध्वज उभारला, किंवा राघोबादादांनीं अटकेच्या किनाऱ्यावर जो भाला रोविला तें खरें ध्वजारोपण, तो खरा पाडवा, तें आपलें खरें तोरण आणि तो आपला खरा वर्षप्रतिपदेचा दिवस !

— शि. म. परांजपे : ( परमेश्वराचें अभिवचन )

## कृष्णेकांठची संस्कृति

महाराष्ट्राचें साधुत्व व वीरत्व, महाराष्ट्राची न्याय-निष्ठा व मुत्सद्दीपणा, धर्म व सदाचार, देशसेवा व विद्या-सेवा, स्वतंत्रता व उदारता हीं सर्वच कृष्णेच्या वात्सल्यांत वाढलीं आहेत. – आचार्य कालेलकर : ( लोकमाता )

## कृष्णा व गोदा

साम्राज्यें उभारलीं गेलीं आणि भंगलीं, महाप्रजा उन्नतीस चढल्या आणि पडल्या, पण या ऐतिहासिक भूमींत कृष्णा व गोदावरी या दोन नद्या भूतकालाच्या गौरवशाली इतिहासाच्या जशा साक्षी आहेत तशाच त्या भविष्यकालीन महान् आशांच्याहि प्रेरक आहेत.

– आचार्य कालेलकर : ( लोकमाता )

## पराक्रमी पांडव

ते धर्मराज महर्षि रानडे, तो अर्जुनासारखा तिखट आणि कडवा विष्णुशास्त्री, तो धैर्याची गदा लीलेनें पेलणारा तिलक भीम आणि ते गोपाळ गणेश आगरकर व गोपाळ कृष्ण गोखले असे दोघे नकुल–सहदेव, हे महाराष्ट्राचे पांच पराक्रमी पांडव होत. – अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## आयुष्यांतील मीठ

आशेवांचून आयुष्य अळणी आहे हें तत्त्व आम्हांस मान्य आहे. आम्हीं कांहीं इंग्रजींत ज्यास ‘ पेसिमिस्ट ’ किंवा आमच्या भाषेंत ‘ रड्ये ’ म्हणतात त्या पक्षाचे नाहीं.

– लो. बा. गं. टिळक : ( विश्ववृत्त )

स्वातंत्र्य हा मोक्ष : पारतंत्र्य हा बंध ॥

चक्रधर ( सूत्रपाठ )

## स्वातंत्र्याचें पावित्र्य

स्वदेश-स्वातंत्र्याच्या पवित्र वाटेमध्यें झिजणाऱ्या चरणांमध्यें जो पावनपणा आहे तो प्रत्यक्ष भागीरथीच्या उदकामध्येंही नसेल !

– शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## स्वातंत्र्य-बुद्धि

महाराष्ट्राची भूमीच कदाचित् अशी असेल कीं, तिच्यांत स्वातंत्र्य-बुद्धीचें पीक सदा पिकावें.

– न. चिं. केळकर : ( मराठे व इंग्रज )

## स्वातंत्र्याचा महिमा

बोअर लोक जेव्हां निजतील तेव्हां स्वातंत्र्य त्यांना जागें करील व ते जेव्हां पराभव पावतील तेव्हां स्वातंत्र्य त्यांना फिरून लढण्याला हिंमत देईल. ते खळग्यांत सांपडले असले तरी जी स्वातंत्र्याची टेंकडी त्यांच्या पायाखालीं आहे ती त्यांना उंच जागेवर नेऊन ठेवील. जेव्हां त्यांची अन्नसामग्री सरेल तेव्हां स्वातंत्र्य हें आपल्या आशेवर त्यांना उपास काढण्यास समर्थ करील आणि जेव्हां त्यांना पाणी मिळणार नाहीं तेव्हां स्वातंत्र्य हें त्यांना थंडगार करील.

– शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

* जो संयम पाळील त्यालाच स्वातंत्र्य शोभेल. स्वातंत्र्येच्छु माणसानें संयमी असलें पाहिजे.

– साने गुरुजी : ( श्याम )

## स्वातंत्र्याची तळमळ

सप्त ऋषि आकाश-गंगेच्या प्रवाहांत स्नान करून तुमच्या स्वतंत्रतेकरितां ध्रुववृक्षाच्या पारासभोंवतीं प्रत्यहीं प्रदक्षिणा घालून तपश्चर्या करीत आहेत. अरुंधतीसारख्या पवित्र स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या तेजाचीही तुमच्या देश-कार्याला मदत आहे. शत्रूशीं नेटानें टक्कर देणारे त्या अश्विनी नक्षत्राजवळील मेषासारखे योद्धे तुमच्यामध्यें आहेत. सर्व पशूंचा राजा आणि बलानें अतिबलाढ्य असा जो सिंह त्याचेंही साहाय्य तुम्हांला आहे. इतकी सामग्री जवळ असतां तुमच्या स्वातंत्र्य-प्राप्तीचे बेत अजून कायम होत नाहींत, हें मोठें आश्चर्य आहे. याच्या निम्मी सामग्री माझ्या हातीं येती, तरीदेखील मीं आपला देश केव्हांच स्वतंत्र करून सोडला असता.

— शि. म. परांजपे : ( शिवाजीची एक रात्र )

## स्वातंत्र्याचा अर्थ

स्वातंत्र्य म्हणजे परसत्ता जाणें एवढाच अर्थ नव्हे. सर्वांचे संसार सुखाचे होतील तोंवर संपूर्ण स्वातंत्र्य नाहीं.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## स्वातंत्र्याचा मार्ग

लुळ्यापांगळ्या मानवतेला जो पायावर अुभा करून स्वतःबरोबर चालवूं शकेल तोच स्वातंत्र्याचा दरवाजा अुघडूं शकेल. आणि अशा रीतीनें जें स्वातंत्र्य मिळेल तेंच खरोखर देशाचं कल्याण करील.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## शिवाजीचा यज्ञ

शिवाजीनें आरंभिलेलाही एक रणयज्ञच होता. शिवाजी हा त्या यज्ञांतील यजमान आणि त्याची भवानी तरवार ही यजमान-पत्नी होय. सर्व महाराष्ट्र देश हें त्या यज्ञाचें स्थंडिल व्हावयाचें होतें. श्रीसमर्थ रामदास आणि श्री साधुवर्य तुकारामबाबा हे त्या रणयज्ञाचें कर्म निर्दोष रीतीनें कसें चालवावें, ह्याविषयीं उपदेश करणारे व्हावयाचे होते. त्या रणयज्ञाच्या होमकुंडामधून निघणाऱ्या ज्वालांमध्यें हिंदुस्थानचें दुःख, दारिद्र्य आणि पारतंत्र्य यांचें हवन करावयाचें होतें, आणि हिंदुस्थान देशाचें स्वातंत्र्य हें फळ यज्ञभोक्ता आणि यज्ञस्वरूपी जो नारायण त्याच्यापासून सर्व हिंदुस्थानाकरितां संपादन करून घ्यावयाचें होतें.

— शि. म. परांजपे : ( शिवाजीचें पुण्याहवाचन )

## स्वातंत्र्याचें रक्षण

अरे, हे मृगशीर्ष नक्षत्रांतील व्याधा, मी तुला असा हा बाण मारतांना किती तरी दिवस पहात आहें ! . . . तुझ्या हातांत परमेश्वरानें जे धनुष्यबाण दिले आहेत ते या गरीब मृगांना मारण्याकरतां नव्हेत तर तुझ्या स्वतंत्र-तेचे जे शत्रु असतील त्यांना मारण्याकरितां ते आहेत.

— शि. म. परांजपे : ( शिवाजीची एक रात्र )

* माझ्या प्रिय मायभूमीवर या अनंत तारकांची आणि ग्रहांची तेजस्वी दृष्टि सतत लागलेली आहे. तिच्यावर पाशवी अत्याचारांनीं अंधार कितीहि दाट पसरला तरी स्वातंत्र्याच्या प्रकाशाचें बीज कधींहि नष्ट होणार नाहीं.

— ना. सी. फडके : ( शाकुन्तल )

## पारतंत्र्याच्या यातना

आम्ही नवकोटनारायण होतों ते आम्ही भिक्षेकरी झालों. आम्ही राजवाड्यांत रहात होतों त्या आम्हांला झोंपड्याहि मिळेनाशा झाल्या. आम्ही समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य संपादून शत्रूंच्या छातीवर नाचत होतों त्या आम्हांला दुसऱ्यांच्या लाथा खातां खातां पुरेसें झालें आहे. आम्ही हजारों सहस्रभोजनें घालीत होतों आणि लक्षावधि ब्राह्मणांना अग्रहार देत होतों त्या आम्हांला मध्यान्हकाळ आला म्हणजे हातांत चौपदरी घेण्याची वेळ आली आहे. आम्ही पराक्रमानें दुसऱ्यांच्या माना खालीं वांकवीत होतों ते आम्ही यत्किंचित् लाभासाठीं दुसऱ्याची खुशामत करूं लागलों आहों. आमच्या घरांतून सोन्याचा धूर निघत होता आणि आमच्या घरांत मोत्यें आणि माणकें हीं अधोलीनें मोजलीं जात होतीं त्या आम्हांला एक तांब्याचा पैसादेखील नजरेस पडेनासा झाला आहे. ह्यापेक्षां आणखीं दुःखें तीं काय भोगावयाचीं आहेत ?

— शि. म. परांजपे : ( परमेश्वराचें अभिवचन )

## गर्वाचा प्रताप

कोणाच्या ठायीं कोणताही गुण असो, त्याची अंमळ प्रशंसा झाली कीं पुरे, तेथें गर्व जडलाच. गर्व जडला कीं उद्योगाचें मान कमी झालेंच. . . . . विद्या-पर्वताची चढण अगोदर कठीण, मग त्यांत पायथ्यापासूनच 'ग'— महाराज पाठुंगळीस चिकटल्यावर मोठा खंबीर चढणारा असला तरी त्याची किती मजल होणार ?

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## परतंत्र राष्ट्राची दुर्दशा

या वृक्षाच्या पानांप्रमाणें माझ्या देशाचेही सर्व चांगले गुण झडून गेलेले आहेत ! माझ्या देशांत जे पूर्वीं शहाणे, शूर आणि गुणी लोक होते ते या वृक्षावरील पक्षांप्रमाणें आतां कोणीकडे उडून गेले कोण जाणे ! या वृक्षाचीं पानें ज्याप्रमाणें दहिंवराचे थेंब खालीं टाकीत आहेत त्याप्रमाणेंच माझ्या देशांतील लोक, कोणी अन्नासाठीं तर कोणी वस्त्रासाठीं, कोणी थंडीसाठीं तर कोणी वाऱ्यासाठीं अश्रु टाकीत आहेत. ह्या वृक्षाप्रमाणें माझ्या देशाच्याही खांद्या आपला भात शिजविण्यासाठीं कोणीं तोडून नेल्या आहेत ! येथल्याप्रमाणें माझ्या देशांतही जेथें आरामाच्या जागा होत्या तेथें हल्लीं वाळलेला पातेरा पडलेला आहे, त्यावर हल्लीं धुरळा बसलेला आहे आणि तेथें हल्लीं मुंग्यांचीं मोठमोठीं वारुळें वाढलेलीं आहेत ! ह्या वृक्षाच्या बुंध्याप्रमाणें माझाही देश हल्लीं चोहोंकडून सोलला गेला आहे ! ह्या वृक्षाच्या खांद्यावरून जसे अनेक विषारी प्राणी खेळत आहेत, त्याचप्रमाणें माझ्या देशांतील लोकांच्या खांद्यांवर अनेक विषारी आणि प्राणघातक व्यसनें स्वतंत्रपणानें खेळत आहेत ! आणि ह्या सगळ्या वृक्षाच्या अग्रभागीं जसें हें घुबड दिवसाढवळ्या बसून आपला भयसूचक शब्द करीत आहे त्याचप्रमाणें माझ्या देशांतील सर्व विचारांच्या अग्रभागीं नास्तिकपणाचें घुबड बसून निर्भयपणें दिवसाढवळ्या भयंकर शब्द उच्चारीत आहे !

— शि. म. परांजपे : ( आम्रवृक्ष )

## जन्मभूमीविषयीं आदर

लायकी-नालायकीचा प्रश्न फक्त जननी आणि जन्म-भूमि यांच्या प्रेमाचा वारसा मिळवितांनाच काय तो पुढं येत नाहीं. एक पुत्र बेचाळीस कुळं उद्धरणारा असतो, आणि एक पुत्र बेचाळीस कुळं बुडविणारा असतो; पण जन्मदात्रीकडे बोट करून दोघांनाहि सारख्याच हक्कानं म्हणतां येतं कीं, ही माझी आई ! तीच गोष्ट जन्मभूमीची आहे ! ऋषीश्वरांच्या यज्ञकर्मांची यागभूमि, शिवाजी-गौतमांसारख्या महात्म्यांची त्यागभूमि,प्रतापशाली वीरांची जी कर्मभूमि, युधिष्ठिर-अशोक यांसारख्या पुण्यश्लोकांची जी धर्मभूमि, तीच आपली ही जन्मभूमि !

— रा. ग. गडकरी : ( एकच प्याला )

## राष्ट्राची आकांक्षा

मानस सरोवरांमध्यें आकंठ बुडालेले असून आपण तृषाक्रांत झालेले आहोंत. कल्पवृक्षाच्या झाडाखालीं बसलेले असतांही आपण प्रत्यहीं हताश होत आहों. अन्नपूर्णेच्या सन्निध असून आपण उपाशीं मरत आहों. सूर्याची आपल्यावर कृपादृष्टि असतांनाही आपण थंडीनें कुडकुडत आहों. अश्विनीकुमार आपल्याला अनुकूल असूनही आपण व्याधिग्रस्त झालों आहों. आणि अमृताच्या डोहांत पोहत असतांनाही आपण मरणोन्मुख झालों आहों.

— शि. म. परांजपे : ( आपलें सुख काय झालें ? )

* हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे आणि आत्यंतिक राष्ट्रीय सुख हा त्या राष्ट्रावर उगवणारा एक प्रकारचा सूर्य आहे.

— शि. म. परांजपे : ( जुनीं मढीं आणि नवीं अंतःकरणें )

## भारताचें गुण-गान

या हिंदुस्थान देशास पूर्वी ‘ सुवर्ण-भूमि ’ असें जें नांव होतें तें अत्यंत अन्वर्थक होतें. या भूमीचा वर्ण अत्यंत सुंदर आहे. येथील वर्णव्यवस्था अत्यंत सुंदर होती. येथील वर्णमालिका अजूनहि अत्यंत सुंदर ठरत आहे. आणि सुवर्णाचे निधि, सुवर्णाचे प्रासाद, सुवर्णाचीं अद्रिशृंगें आणि सुवर्णतंतूंनीं भूषविलेलीं येथील लोकांचीं महावस्त्रें यांनीं तर या देशांतील सुवर्णाचा सुकाळ सर्वांचे दृष्टोत्पत्तीस आणलेला होता.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## भरतभूमींतील पीक

परमेश्वरानें तुला भरतभूसारखी शेती दिली आहे. या विस्तीर्ण शेतीला गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी, सिंधु व ब्रह्मपुत्रा हे अखंड कालवे देवानें तयार करून ठेवले आहेत. या दिव्य शेतींत या अखंड कालव्यांच्या पाण्यानें तुझ्या पूर्वजांनीं धान्यच नव्हे तर प्रत्यक्ष सोनेंहि पिकविलें आहे...तूंच शेती करशील तर हींत सोनें पिकेल ही देवाची शर्त तूं पाळलीस कीं हिंदुस्थाना, पुढच्या हंगामांत तुझ्या या दिव्य शेतींत पाऊस पडो वा ना पडो—कोहिनूर पिकतील, मयूरासनें पिकतील, कालिदास पिकतील, शिवाजी पिकतील !

— वि. दा. सावरकर : ( लंडनचीं बातमीपत्रें )

* सुखी अस. आनंदी, उदार, कामसू, अभ्यासू हो. सदैव मनानें, बुद्धीनें वाढती रहा.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## राष्ट्रभक्तीचें महत्त्व

उत्तम नदी ती कीं, जी अत्यंत गोड व विमल पाणी देते; उत्तम शेत तें कीं, जें धान्याच्या कणसांनीं सदैव आंदोलन घेत असतें व उत्तम वृक्ष तोच कीं, ज्याचीं फळें अत्यंत मधुर व रसाळ असतात; त्याचप्रमाणें उत्तम देश तो होय कीं, ज्याच्या पुत्रांचे अंगीं कांहीं तरी असामान्यता असते. — वि.दा. सावरकर

## जन्मभूमीचें वात्सल्य

देशाभिमान हा शब्द नवा आहे. आपण अभिमान हा दोष मानतों. त्यापेक्षां देशभक्ति हा थोडा चांगला शब्द आहे. पण आपला जुना शब्द म्हटला म्हणजे जन्मभूमिवात्सल्य. तो किती सुंदर वाटतो ! या वात्सल्याचें कित्येक कवींनीं दुबळेपणा म्हणून वर्णन केलें आहे खरें, पण श्रीकृष्णाच्या जीवनांत गोकुळवृंदावनाविषयींची जी भावना मोठेपणीं दिसून येते ती या देशभक्तीचीच घरगुती आवृत्ति आहे. — आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## देशाभिमानाचीं स्थानें

हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता; हिंदुस्थानवासी हेंच आम्ही सर्वांचें बंधुत्वाचें नातें, आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक परिस्थिति सुधारण्याच्या एकनिष्ठपणानें स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा नूतन राजधर्म.

— लो. बा. गं. टिळक : ( लो. टिळक यांचीं धार्मिक मतें )

* स्वातंत्र्यासारखें महान् ध्येय बलिदानाशिवाय कधींहि साध्य होत नाहीं. — वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## देशभक्ताची इच्छा

मला जर अश्वाचा जन्म मिळेल तर जे देशभक्त घोडेस्वार शत्रूंचा पाठलाग करतील त्यांना आपल्या पाठीवर वाहून नेण्याची तरी निदान मला संधि मिळावी. तिर्यग्योनीमध्यें मला जन्म मिळाल्यास त्यांत, हे परमेश्वरा, मला खबूतराचा तरी जन्म दे, म्हणजे मी आपल्या देशभक्तांच्या एका छावणींतील बातम्या दुसऱ्या छावणीमध्यें पोंचविण्याच्या कामीं तरी आपला देह झिजवीन ! मला वृक्षावर्गामध्यें ढकलून द्यावयाचें असेल तर ज्या वृक्षापासून निशाणाच्या काठ्या करितात त्या वृक्षाचा तरी, हे परमेश्वरा मला जन्म दे.

– शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## राष्ट्राचा उत्कर्ष

ज्या देशांतील लोक उत्साही, उद्योगी आणि करारी असतील तोच देश तपस्वी आहे असें म्हणतां येईल. तपाच्या मागोमाग प्रत्येक प्रकारची समृद्धि, प्रत्येक प्रकारचें सामर्थ्य आणि या दोहोंमुळें होणारा विकास हीं सर्व यावयाचींच.

– आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## परतंत्र हिंदुस्थान

हिंदुस्थान देश ही परदेशांतील दरवडेखोरांची उतारपेठ, परदेशांतील वाटमाऱ्यांची धर्मशाळा, परदेशांतील लुटारूंचें सदावर्त आणि परदेशांतील चांचे लोकांचें अन्नछत्र, अशी स्थिति पुष्कळ दिवसांपासून चालत आलेली होती.

– शि. म. परांजपे : ( मनोराज्य )

## देशभक्ताची प्रार्थना

मला स्वर्गसुख नको, नंदनवनांतील सुखोपभोग मला नकोत, पादशहाचे जाचांतून विजयनगरास मुक्त करण्याचें कार्मी माझें सर्व पुण्य खर्चे होऊं दे. पुढील जन्मीं पुढारी-सरदार होण्याइतकें जर माझें पुण्य नसेल तर मराठ्यांचें जें सैन्य विजापूरची राखरांगोळी करील, त्या सैन्यांतल्या अतिशय क्षुल्लक दर्जाच्या नोकराचे जन्माला मला देवा घाल. परमेश्वरा, मनुष्यकोटींत पुनः घालण्याची जर माझी योग्यता नसेल तर ज्या घोड्यावर स्वार होऊन मराठे विजापूरचा दरवाजा फोडतील त्या घोड्याच्या तरी जन्माला मला जाऊं दे. हा मानहि पुढील जन्मीं मला मिळावयाचा नसेल तर विजापुरावरील मराठ्यांच्या स्वारीची सामग्री वाहून नेणारा बैल तरी निदान मला कर.

– कृ. प्र. खाडिलकर : ( कांचनगडची मोहना )

## देशभक्ताची मनीषा

माझा हाच निश्चय, हीच प्रतिज्ञा कीं, तलवारीच्या तीक्ष्ण धारांनीं माझ्या शरिराचे तुकडे तुकडे होवोत, भाल्यांच्या माऱ्यामुळें माझ्या शरिरांतून रक्ताचे हजारों प्रवाह वाहोत. बंदुकीच्या गोळ्यांच्या तडाक्यानें माझ्या मस्तकाचे कळपे कळपे तुटून पडोत. ही माझी भयंकर तलवार वज्राप्रमाणें शत्रूसैन्यावर पडेल आणि ह्या चोरांची राखरांगोळी झालेली ह्या डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय किंवा कानांनीं ऐकल्याशिवाय प्रतापरावांचीं हाडें कांचनगडच्या मैदानावर कधींच पडावयाचीं नाहींत.

कृ. प्र. खाडिलकर : ( कांचनगडची मोहना )

## स्वदेशीचा मंत्र

आपला न्याय आपला आपण करून घेणें हें स्वदेशीचें ब्रीद आहे.

व्यापाराच्या उन्नत्यर्थ देशांतील सर्व धर्मांच्या, भाषांच्या, वंशांच्या व पेशांच्या कायमच्या रहिवाश्यांनीं एकजुटीनें झटलें पाहिजे, हें या मंत्राचें कीलक आहे.

सुयंत्र संधीकरण ह्या मंत्राची शक्ति होय.

जुल्म-परिहारार्थ, ‘ स्वदेश ’ ह्या त्र्यक्षरी मंत्राचा सततोच्चार करणें हा जप समजला आहे.

ह्या मंत्राचा व्यापार-स्वातंत्र्य हा छंद आहे.

देशभक्ति ही मंत्र-देवता समजतात. आणि शिवाजी हा ह्या मंत्राचा ऋषि कल्पितात. ह्या मंत्रांत प्रतिनिधिक सुंदर राज्यपद्धतीचें ध्यान करावयाचें असतें. आणि बहिष्कार-योगानें समाधि लावावयाची असते.

— इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : ( संकीर्ण निबंध )

## राष्ट्रीय चारित्र्य

परंपरेचें स्वरूप बदलेल, व्रतें वदलतील; परंतु त्यांतून राष्ट्रीय चारित्र्य सतत घडत राहिलें पाहिजे. आज देशाला सोन्यापेक्षां, डॉलरांपेक्षां चारित्र्याची जरूर आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## राष्ट्रीय गुण

अंतर्गत जोम, कडकडीत स्वाभिमान व स्वार्थत्याग हे गुण ज्या राष्ट्रांत जागृत असतात; तें राष्ट्र कितीहि संकटें आलीं तरी उदयास येतें.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## भुकेची आग

प्रत्येक गरीबाची भूक त्याच्या झोंपडीच्या पडक्या भिंतींच्या आंत आहे तोंपर्यंत ठीक आहे; पण सर्व गरीबांची भूक रस्त्यावर येऊन उभी राहिली आणि ओरडूं लागली म्हणजे मात्र ती काय करील आणि काय न करील, याचा नेम नाहीं. राज्यावर आलेलें परचक्र पुरवेल, पण राज्यांत उत्पन्न झालेली भूक पुरवणार नाहीं. शत्रूच्या सैन्याला अन्नसामग्री ज्या प्रमाणानें जास्त त्या प्रमाणानें तें सैन्य जास्त भयंकर. परंतु भुकेची गोष्ट त्याच्या अगदीं उलट आहे. कारण भुकेला अन्नसामग्री ज्या प्रमाणानें कमी, त्या प्रमाणानें ती अधिक भयंकर होते.

— शि. म. परांजपे ( रिलीफ कामें )

## प्राणार्पणाची तयारी

कांहीं तरी उदात्त कल्पनासृष्टि डोळ्यांसमोर उभारणें आणि मग त्यासाठीं प्राणहि अर्पण करण्यास सिद्ध होणें या मनुष्यस्वभावांतल्या चमत्कारिक विशेषाविषयीं मला निरतिशय आदरच वाटतो. माणसाच्या माणुसकीची आणि मानवी जीवनाच्या प्रगतीची किल्ली, मला वाटतें या विशेषांतच आहे.

— अनंत काणेकर

## राष्ट्राची सेवा

मिरचीचें बीं पेरून गोड उंसाची अपेक्षा धरली असतां ती कधींहि परिपूर्ण होणार नाहीं. आपण आपल्या देशाच्या शेतामध्यें असें बीं पेरावें कीं, ज्याच्यापासून त्याच्यामध्यें आपल्या देशाचें खरें सुख उगवेल !

— शि. म. परांजपे : ( आपण काय पेरावें ? )

## क्षुधा–देवतेचें रूप

ही समष्टिरूप क्षुधादेवता अशा वेळीं फारच भेसूर स्वरूप धारण करते. डोळे खोल गेलेले, गालफडें बसलेलीं, दांतांच्या कवळ्या बाहेर आलेल्या, झिंज्या अस्ताव्यस्त सोडलेल्या, पोटाला भकाळ्या पडलेल्या, पाठीचीं हाडें बाहेर निघालेलीं, नखें वाढलेलीं, कंबर वांकलेली, हाता-पायांच्या काड्या झालेल्या, पावलें रक्तबंबाळ झालेलीं, सर्वांगावर वाकळा पांघरलेल्या, गळयांत झोळी घातलेली आणि हातांत फुटकें खापर किंवा धडकी करवंटी घेतलेली, असें अक्राळविक्राळ स्वरूप धारण करून ही समष्टिरूपी क्षुधादेवता जिकडे तिकडे सैरावैरा धावूं लागते. ती वखवखलेली देवता आपल्यापुढें जें येईल तें भक्षिण्यासाठीं आपला जबडा पसरून हें खाऊं कां तें खाऊं, असें करीत जेव्हां श्रीमंतांच्या दारावर धक्के मारू लागते, तेव्हां तिला पाहून कोणाची पांचांवर धारण बसणार नाहीं व कोणाच्या अंगावर शहारे उभे राहाणार नाहींत ?

— शि. म. परांजपे : ( रिलीफ कामें काढण्यांतील उद्देश )

## प्रदेशाच्या खुणा

हीं पर्वतपठारं, या नद्या, हीं सरोवरं। मुरुमानें भरलेलें अफाट माळ, येथील शेती येथील शेतकरी, दारिद्र्यानं आणि अज्ञानानं शरणागत झालेली येथील हीनदीन मानवता—या साऱ्या गोष्टी तुझ्या नजरेसमोर आल्या पाहिजेत ! तरच या देशाची सेवा तुझ्या हातून खरोखरी होऊं शकेल !

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## समुदायाचें सामर्थ्य

हा मनुष्यांचा जमाव नव्हे, तर हा सामर्थ्याचा पर्वत होय. हा समुद्राप्रमाणें ज्याच्यावर वळेल त्याला सफाई बुडवून टाकील आणि पर्वताप्रमाणें ज्याच्यावर कोसळेल त्याला सपशेल चिरडून टाकील. हा समुदाय जें मनांत आणील तें करील. लाख लोकांच्या नजरेला काय अदृश्य असणार? लाख लोकांच्या एकवटलेल्या बुद्धीला काय अगम्य असणार? लाख लोकांच्या पायांना काय अनुल्लंघनीय असणार? आणि लाख लोकांच्या हातांना काय अप्राप्य असणार?

— शि. म. परांजपे : (एका खेडेगांवच्या मनुष्याचे विचार)

## राजकारण

प्रधान म्हणजे राजमदजानित अन्यायसागराची मर्यादा, प्रधान म्हणजे हस्तीचे अंकुश, किंबहुना प्रधान म्हणजे इहलोकीं राज्यकृत्य-संपादनामुळें नृपाची विश्रांत, धर्मप्रतिपालनामुळें परलोकपंथींची दीपिका.

— रामचंद्रपंत अमात्य : (आज्ञापत्र)

## भारताचा संदेश

समुद्रांत हजारों प्रवाह येतात म्हणून समुद्र पवित्र, त्याप्रमाणें भारतवर्ष हें पवित्र तीर्थ आहे. मानवी जीवनाचें विविधतेंतील ऐक्य पाहावयास जगांतील यात्रेकरू या भारतभूमींत येतील. भारताला ऐक्याचा संदेश जगाला द्यावयाचा आहे.

— साने गुरुजी : (धडपडणारीं मुलें)

## समुदायाचें सामर्थ्य

लाखों लोकांनीं मनावर घेतलें तर जेथें समुद्राचे खळगे आहेत तेथें दुसरें पर्वत रचतील, आणि जेथें पर्वतांचे उंचवटे आहेत तेथें समुद्राएवढाले खोल खळगे ते खणतील. जेथें जंगलें आहेत तेथें शहरें उभारतील, आणि शहरांचीं जंगलें करून सोडतील. अशा समुदायांच्या अद्भुत सामर्थ्याला कोण भिणार नाहीं ? आणि अशा सामर्थ्यवंत समुदायाला संतुष्ट ठेवण्यासाठीं आपल्या हाडाचीं काडें कोण करणार नाहीं ?

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## आशियांतील ऐक्य

आशिया खंडांतील लोकांमध्यें एक प्रकारचें विलक्षण विचारैक्य प्राचीन काळापासून चालत आलेलें आहे. हिमालय पर्वत आड आल्यानेंहि जर तें नाहींसें झालेलें नाहीं तर अन्य कारणानें ते नाहींसें होणें शक्य नाहीं, बुडविलेल्या भोंपळ्याप्रमाणें तें पाण्याच्या सपाटीवर तरंगून दृक्प्रत्ययास येईल हें निश्चित आहे.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## जग जोडणारें जीवन

आपले संत तर, ‘ हें विश्वचि माझें घर ’ असें म्हणत. अशा संतांच्या भूमींत ‘ हा माझा जिल्हा, हा त्याचा जिल्हा ’ करणारे लोक असावेत याचें वाईट वाटतें. आपण आपलें लहानसें जीवन तपासूं तर साऱ्या जगाशीं आपण जोडलेले आहोंत असें दिसेल.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## भारतीय संस्कृति

हा हिमालय, ही गंगा, ही यमुना—यांच्या आश्रयानें माझ्या अभिमानाचें स्थान असलेली ही संस्कृति जन्मली, नांदली व विकासली. मथुरेच्या वाळवंटाहून सुंदर वाळवंटें जगांत पुष्कळ असतील; परंतु मथुरेचेंच वाळवंट मला विशेष प्रिय कां? तर येथें कृष्णाची बांसरी वाजली. म्हणून माझ्या पूर्वजांची स्मृति या वस्तूंशीं निगडीत झाली आहे. माझें वेदवाङ्मय येथें जन्म घेतें झालें; माझे वाडवडील येथें जन्मले व मेले; माझ्या ऋषिमुनींच्या पदरवानें ही भूमि पुनीत झाली आहे. माझ्या संस्कृतीचा भूत तसाच भविष्यकाळहि ह्या भूमीशीं निगडीत झाला आहे.

— वि. दा. सावरकर

## देशाभिमानाची पायरी

घराचे वरचे मजले बांधून तयार केले तरी खालचे मजले ज्याप्रमाणें काढून टाकतां येत नाहींत, किंवा तरवार हातांत पडली म्हणजे कुदळीची अगर सूर्य असला म्हणजे अग्नीची जरूर ज्याप्रमाणें नाहींशी होत नाहीं, तद्वतच सर्व भूतहिताच्या शेवटल्या पायरीवर पोंचलें तरी देशाभिमानाचीच नव्हे तर कुलाभिमानाचीहि आवश्यकता नाहींशी होत नाहीं.

— लो. बा. गं. टिळक : ( गीतारहस्य )

## भारतीयांचें कर्तव्य

कोणत्याहि हिंदी पुरुषानें किंवा स्त्रीनें भीतीनें किंवा लोभानें मातृभूमीशीं निमकहरामी करण्यास तयार होऊं नये. — दत्तो आप्पाजी तुळजापूरकर : ( माझें रामायण )

## जनतेची संघटना

बोलण्यानें व लिहिण्यानें जागृत झालेल्या लोकांस ताबडतोब सुयंत्रगेंत घातलें पाहिजे. नाहीं तर वाफ निघून जाईल व सुट्या व्यक्ति सामर्थ्यहीन राहतील.

— इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : ( संकीर्ण निबंध )

## क्रांतीची किंमत

कुठलीहि क्रांति अश्रूंनीं होत नाहीं; क्रांतीला एकच नैवेद्य आवडतो—आणि तो म्हणजे भक्तांचें रक्त !

— वि. स. खांडेकर : ( क्रौंचवध )

## क्रांतीचें बीज

अन्नाच्या भुकेंत विचारांची भूक येऊन मिळाली म्हणजे क्रांति होते. साधी अन्नाची भूक भीक निर्माण करते; परंतु विचारांची जोड मिळालेली अन्नाची भूक साम्राज्यें धुळीस मिळवितें.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## राजकारणाचीं तीन तोंडें

चंचीला जसे कप्पे किंवा कपाटाला जसे खण तशीं जगांतील राजकारणाला तख्त, तागडी व तरवार हीं तीन तोंडें आहेत.

— न. चिं. केळकर : ( केसरी )

## पापी राजसत्ता

खून, अन्याय व पाप यांच्या पायावर उभारलेल्या सत्तेचा वरून परमेश्वर व खालून लोक धिक्कार करीत असतात.

— कृ. प्र. खाडिलकर : ( भाऊबंदकी )

## लोकशाहीचा प्राण

मनुष्यानें सर्वांच्या हृदयांत सहानुभूतीनें शिरलें पाहिजे. सर्वांचा विचार करणें म्हणजेच लोकशाही.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## लोकशाहीचें गमक

नुसतें सर्वांना मत देऊन लोकशाही येत नाहीं. सर्वांचा दर्जाहि समान लेखायला हवा. मानवता सर्वत्र एकच आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## नागरिकाचे गुण

व्यवस्थितपणा म्हणजेच सुंदरता. कोणतेंहि काम वेळच्या वेळेस करणें, कोणतीहि वस्तु नीट जागेवर ठेवणें, पैशांचा व्यवस्थित हिशेब ठेवणें, दिलेल्या शब्दाप्रमाणें वागणें, तिकटें रांगेंत नीट उभें राहून घेणें, क्यूंत नीट उभें राहून बसमध्यें शिरणें—शेंकडों गोष्टी व्यवस्थितपणांत येतात.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## ना कर, ना डर

लोकगंगेच्या रागालोभाला भ्यावं लागतचं, पण जों-पर्यंत आपण कुमार्ग पत्करला नाहीं तोंपर्यंत त्या रागा-लोभाला डरायचं कारण नाहीं.

— ना. घों. ताम्हनकर : ( गुजताई )

## शिलकी संपत्ति

माझी प्रापंचिक गरज उत्तम प्रकारें भागल्यावर उरलेला पैसा हा लोकांचा ठरतो; फक्त त्याचा व्यवस्थापक मी. लोकांच्या या ठेवीचा विनियोग लोकहिताच्या दृष्टीनेंच व्हावा.

— ना. घों. ताम्हनकर : ( दाजी )

## भारताची मागणी

आज भारताला अन्नवस्त्राहूनहि चारित्र्यसंपन्न माणसांची जरूरी आहे. प्राण गेला तरी खोटें बोलणार नाहीं, अनीतीनें पैसे मिळवणार नाहीं, लांच मागणार नाहीं, दुसऱ्यास सतावणार नाहीं, अशा वृत्तीचीं निःस्पृह, निर्मळ, सेवापरायण माणसें राष्ट्राला हवीं आहेत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## नवराष्ट्रांतील कार्य

तुम्ही आतां स्वतंत्र राष्ट्रांतील मुलें. तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. नवीन राष्ट्र बनवावयाचें आहे. नवीन मन नसेल तर नवीन राष्ट्र कसें होईल ? आपण नव्या कालखंडांत जात आहोंत. जें जें जुनाट झालें, निरुपयोगी झालें, जें जें संकुचित आहे तें तें तुम्ही दूर भिरकावून दिलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## महत्त्वाकांक्षा

राजाचा चाकर झाल्यापेक्षां चाकरांचा राजा होण्याची बाणेदार महत्त्वाकांक्षा कोणीं धरली तर ती अगदींच टाकाऊ म्हणतां येणार नाहीं.

— न. चिं. केळकर : ( केसरी )

* कागदावर घटना लिहून काय उपयोग ? घटना हृदयांत हवी. अस्पृश्यतानिवारणाचा कायदा झाला; परंतु खेड्यांतून अजून काय आहे ? नुसते कायदे करून काम संपत नाहीं. माणसें सुधारायचीं आहेत. मानवतेच्या कायद्याचे आपण उपासक झालें पाहिजे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें भाग २ रा )

समता

## जमिनीवरील हक्क

हवा, पाणी, प्रकाश यांवर सर्वांची सत्ता; त्याप्रमाणें जमीनहि सर्वांच्या मालकीची हवी.

— साने गुरुजी : ( नवजीवन )

## जिवंत राष्ट्राची नाडी

ज्या राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ति आपल्या जीवनाचा कसून उपयोग राष्ट्राच्या कामासाठीं करीत असते त्या राष्ट्राचा विकास होतो. तीं राष्ट्रें जागीं समजावीं. जिवंत समजावीं.

— साने गुरुजी : ( गोड शेवट )

## निधर्मी राज्य

जातिधर्मनिरपेक्ष याचा अर्थ सर्व जातिधर्म यांना येथें संरक्षण आहे. येथें समता आहे, धार्मिक समता आहे. हाच खरा धर्म, मानवधर्म.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## दंडुक्याचें राज्य

निरनिराळ्या राज्यसत्ता दंडुक्यानें, कायद्यानें प्रेम मिळवूं पहातात. अशानें का प्रेम मिळतें? दंडुका प्रेम नसतो निर्मित. दंडुका हें दास्याचें चिन्ह आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* आमच्याकडे एखाद्या विषयाला जीवनेंच्या जीवनें देणारे लोक हवे आहेत. तूंहि डोळ्यांसमोर कांहीं ध्येय ठेव. कशासाठीं जगायचें ते ठरव. देशांतील कोट्यावधि लोकांचे संसार सुखी करायचे आहेत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## सत्याग्रहाचा आत्मा

सत्याग्रहांत मनाच्या दौर्बल्याला किंवा भित्रेपणाला मुळींच वाव नाहीं. कारण कोणत्याहि गोष्टीबद्दलचा 'आग्रह धरणें' हें भित्र्या किंवा भेकड माणसाचें कामच नव्हे ! जो आग्रह धरूं शकतो तो भित्रा कसला ? कोणत्याहि गोष्टीचा आग्रह धरणें ह्याचा अर्थच अंगीं कांहीं तरी धैर्य असणें असा आहे.

— दत्तो आप्पाजी तुळजापूरकर : ( माझें रामायण )

## यज्ञाचा अर्थ

राष्ट्रामध्यें जो खड्डा पडला आहे तो भरून काढण्यासाठीं रोज नियमानें उपासनाबुद्धीनें जें कार्य करावयाचें त्याला यज्ञ म्हणतात. यज्ञ हा राष्ट्राच्या मुख्य जरूरीचें जें काम तें सर्वांना सुलभ करणारा प्रतिनिधि आहे.

— विनोबा भावे : ( यज्ञ )

## बळाचें सामर्थ्य

सामर्थ्याशिवाय सारें व्यर्थ. संसारांत सामर्थ्य हवें. सामर्थ्यानें सारें मिळतें. सामर्थ्यवंताला सारें शोभतें. सामर्थ्य म्हणजे सौंदर्य. बळाची उपासना करा.

— साने गुरुजी : ( यज्ञ )

## शक्तीचा आधुनिक उपयोग

आज मात्र मनुष्याच्या हातीं कोठल्याही प्रकारची शक्ति आली कीं लागलीच तो दुसऱ्या मनुष्यावर सरशी करण्याचाच प्रयत्न करितो. मग ती सरशी त्यांना मारून मिळो, गुलाम बनवून मिळो अथवा त्यांना अर्धपोटीं ठेवून मिळो.

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

## कीर्तीची महति

मरणाहून अपेश वोखटें—सत्कीर्ति करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे ?

— रघुनाथ यादव : ( पानिपतची बखर )

## कीर्तीची गुरुकिल्ली

मोठ्या ध्येयासाठीं निःस्वार्थपणें स्वतःला वाहून घेणें हीच सत्कीर्ति मिळवण्याची गुरुकिल्ली आहे.

— महादेवशास्त्री जोशी

## कीर्तीची चढण

डोंगराजवळ आल्यावर जशीं त्याचीं शिखरें स्पष्ट दिसून येतात, त्याचप्रमाणें उन्नतीची चढण चढावयाचें मनांत आणल्यावर त्यामध्यें येणारीं संकटें आपल्या आजू-बाजूला जमा होतात. आतां एवढें खरें कीं, या डोंगराच्या शिखरावर आल्यावर जसें आपणास रम्य वाटतें तसेंच किंवा त्याहूनहि जास्त उन्नतीच्या शिखरावर आपण गेलों, कीर्तिमंदिरांतील नगारा आपल्या नांवानें वाजूं लागला म्हणजे आपणाला आनंद होतो, यांत शंका नाहीं.

— ना. ह. आपटे : ( सुखाचा मूलमंत्र )

## गणिती दृष्टि

गणित व शास्त्र विषय तुझे चांगले आहेत. आजकालच्या हिंदुस्थानला याच विषयांची जरूर आहे. साऱ्या जीवनांतच गणिती दृष्टि; शास्त्रीय दृष्टि हवी आहे. मी गणिती दृष्टि म्हणजे कांहींही फुकट न दवडण्याची वृत्ति म्हणतो.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## खोटी स्तुति

सर्व जन स्तुतिही करितें, तथापि त्यावर न जावें. नित्यानित्य स्वकीय गुण-दोष-विचारणा करीतच असावें.

— रामचंद्रपंत अमात्य : ( आज्ञापत्र )

## स्तुतीचा हेतु

स्वतःला झालेल्या आनंदांत आपणाला ज्यामुळें आनंद झाला, त्यालाही समभागीं करणें हाच विशुद्ध स्तुतीचा हेतु असतो.

— अनंत काणेकर : ( स्तुति करण्याची कला )

## प्रगतीचा प्राण

जें राष्ट्र निर्भय आहे तें मुक्त आहे. तें सर्व क्षेत्रांत जाईल, प्रयोग करील, पुढें जाईल. साऱ्या इतिहासाची ही शिकवण आहे. भित्र्याला मरण आहे. निर्भय असेल तोच खरा जिवंत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## देशद्रोह

अधिकाराच्या अथवा द्रव्याच्या मोहाला बळी पडून त्याकरितां वाटेल तें देशद्रोहाचें नीच काम करण्यास तयार होणाऱ्या लब्धप्रतिष्ठित शिष्ट माणसापेक्षां स्वाभिमानी व चांगल्या दानतीचा माणूस हजारपटीनें चांगला.

— दत्तो आप्पाजी तुळजापूरकर : ( माझें रामायण )

* मुलांच्या वह्यांतील चुका तांबड्या शाईनें दुरुस्त करतां येतात; पण समाजाच्या चुका स्वतःच्या रक्तानेंच दुरुस्त कराव्या लागतात.

— वि. स. खांडेकर : ( पांढरे ढग )

## तीर्थक्षेत्राचें शब्दचित्र

अनेक जन्मांचें पुण्य कीं, असें वृंदावन दृष्टीस पडलें, तेणेंकरून भगवंताच्या मूर्ती व भगवद्भक्त यांचे दर्शनें-करून नेत्र पवित्र झाले. पादेंकरून चालत गेलों, तेणें-करून पायांचें सार्थक जाहालें. हस्तेंकरून नमस्कार करितां जाहलों, तेणेंकरून हस्त पवित्र झालें. मुखेंकरून नामस्मरण केलें, तेणेंकरून मुख पवित्र झालें. कर्णेंकरून भगवत्कथाश्रवण केलें, तेणेंकरून श्रोत्र पवित्रता पावले. स्नानेंकरून सर्व देह पवित्र झाला.

— नाना फडणवीस : ( आत्मचरित्र )

## वार्धक्याचें विनोदी वर्णन

कानगांव तों बंद जाहलें। दोनीं वेशींचीं कवाडें लागलीं। नाकापुरास वाहन सुटलें। तोंडापुर तो तफरका ( = हैराण ) झालें। दंताळवाडी ओस पडली। दिवे-लावणीदेखील राहिली नाहीं। केसगांवची पांढर जाहली। शिरापूरचे लोक दरोबस्त थरथरां कांपूं लागले। हातगांव कसाल्यानें ( = पीडेनें ) जर्जर जाहलें। त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं। पायगांवचीं गेटें ( = चौक्या ) बसलीं। ढोरापुराची राहटी राहिली। चरणगांवची चाली सरली। ऐशी परगण्याची कीर्ति बुडाली।

— एकनाथ : ( भारूड )

* भरीव सहानुभूतीची भीक मागून मिळत नसते. तुमच्या मुक्या दुःखांनींच आयुष्याचा लढा लढत असाल तरच तुमच्याबद्दल प्रेम, आदर, कळवळा रहात असतो.

— विभावरी शिरूरकर : ( हिंदोळ्यावर )

## कर्तृत्वशाली काळ

रावणानें सीतेला चोरून नेलें आणि दुःशासनानें द्रौपदीला भर सभेंत नग्न करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळीं रामाच्या आणि भीमाच्याहि आधीं मोठ्यानें गर्जना करून ' सूड ! सूड ! ' हे शब्द हाच ओरडला. हिरण्यकशिपूचें पोट त्यानेंच फोडलें, बळीचें डोकें यानेंच ठेचलें आणि रावणाचे गळेहि यानेंच कापिले.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

## शर्यत जिंकणारा काळ

मनुष्य आणि काळ यांची या जगांत शर्यत चालली आहे. विशींत मनुष्य काळाच्या पुढें असतो, तिशींत तो त्याच्या बरोबरीनें धांवतो आणि चाळिशी लागली, कीं बहुधा तो काळाच्या मागं पडतो.

— वि. स. खांडेकर : ( समाधीवरलीं फुलें )

## बदलते युग

कुठं हरिणाच्या वेगानं धावणारं हें विसावं शतक आणि कुठं कासवाच्या गतीनं त्याला गांठूं पाहणारीं आम्ही हिंदी माणसं ! कधीं बदलेल हें सारं ? धड जुन्या-विषयीं निष्ठा नाहीं, धड नव्याविषयीं प्रेम नाहीं ! असे आपण त्रिशंकूसारखे नेहमींच रहाणार आहों का ? स्वातंत्र्य आलं ! आपल्या पायांतल्या शृंखला गळून पडल्या ! पण मनाच्या ? — डॉ. सुमति क्षेत्रमांडे : ( हें चित्र )

* माणूस निश्चय करतो व ते ऐकून सर्वसाक्षी व दूरदर्शी काल हंसत असतो.

— ना. सी. फडके : ( शाकुन्तल )

## तत्त्वज्ञानाचें मंदिर

तत्त्वबोध हें एक निबिड व घोर अरण्याच्या मध्यभागीं असलेलें देवालय आहे. या देवालयाचें दर्शन घडण्याचें सुदैव फार थोड्यांचेंच असतें. कारण हें अरण्य अज्ञानांधःकारानें व्याप्त झालेलें आहे. ऋषिवचनें, शास्त्रें, काव्यें इत्यादिकांचा प्रकाश नभोमंडळांतील तारकागणाच्या प्रकाशाप्रमाणें या अरण्यांत अस्पष्ट व अंधुक पडतो. अशा या अरण्यांत संशयपिशाच्चें भ्रमण करीत आहेत व त्यांच्या किंकाळ्यांनीं हें अरण्य भयानक झालें आहे.

— प्रिं. वा. म. जोशी : ( रागिणी )

## स्थिर नीतितत्त्वें

दिशा दाखविणारें होकायंत्र किंवा ध्रुव तारा यांचेकडे दुर्लक्ष करून अफाट समुद्रावर लाटा आणि वारा या दोहोंचें तारतम्य पाहून गलबतावरील खलाशी दर वेळीं आपल्या गलबतावरचें सुकाणूं धरूं लागले तर त्यांची जी स्थिती होईल तीच नीतिनियमांचें परमावधीचें स्वरूप लक्षांत न आणितां केवळ देशकालाप्रमाणें वागणाऱ्या मनुष्यांची झाली पाहिजे.

— लो. बा. गं. टिळक : ( गीतारहस्य )

## प्रसन्नतेची जादू

जीवनांत अनेक गुंतागुंतींत जो मेळ घालूं शकतो त्याचें जीवन प्रसन्न असतें; आणि हेंच तर बहुतेकांना जमत नाहीं. मग मन गोंधळतें, बावरतें, अशान्त होतें. साऱ्या सृष्टीचें रहस्य मेळ, सुसंवाद हें आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

### लढण्यासाठीं जन्म आपुला

लढाईला तोंड दिल्यावर यशापयशाचा विचार पाहिजे कशाला? आमच्याकडे सेनापतित्व आलें किंवा शिपायाचें काम आलें तरी आम्हीं गलितधैर्य असतां कामा नये; उत्साहानें झगडलें पाहिजे.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वीचा काळोख )

### आयुष्य हाच काथ्याकूट

हें आयुष्य हा स्वतःच एक काथ्याकूट आहे. पंचमहाभूतांस पिळूनवळून हें आयुष्याचें चऱ्हाट वळावयाचें, तेंच ते तंतु जोडून जोडून लांबवीत बसावयाचें व शेवटीं सडत आलें कीं, मृत्यूच्या 'मोगरी'नें कुटून पुन्हां काथ्या करून पंचमहाभूतांच्या ढिगांत मिसळून द्यावयाचें !

— वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

### जीवनाचें स्वरूप

आयुष्य हा महाल नाहीं, तें मंदिर आहे. जीवन ही क्रीडा नाहीं, ती सेवा आहे. संसार ही विलासभूमि नाहीं, ती कर्मभूमि आहे.

— वि. स. खांडेकर

### जीविताचें ध्येय

सत्य, सौजन्य व सौंदर्य यांची उपासना हेंच जीविताचें ध्येय आहे.

— वा. म. जोशी : ( नीतिशास्त्रप्रवेश )

*जीवनांत दुःखें आहेत, सुखें आहेत; परंतु सुखांवर, आनंदावर दृष्टि देऊन आशेनें माणसानें वागावें.

— साने गुरुजी : ) सुंदर पत्रें )

## जीवनांतील अर्थ

जगांत खरें स्वातंत्र्य एकच आहे. तें म्हणजे आपल्या सदसद्विवेक बुद्धीप्रमाणें वागण्याचें. मानवाजवळ ही गोष्ट आहे म्हणून त्याच्या जीवनाला अर्थ आहे.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## समाजाचे आधार

निर्भय, निःस्पृह, स्वावलंबी, स्वाभिमानी, प्रेमळ, उदार, व्रती जीवन ! अशीं जीवनें समाजाला आधार असतात, समाजाला आंतून ओलावा देत असतात.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जीवन म्हणजे आशा

शेजारच्या बागेंत अगदीं सुकलेला मोगरा परंतु पाणी मिळूं लागतांच लगेच पानें फुटून कळे आले. खरोखर जीवन किती धडपडणारें असतें, आशेनें कसें वाट पहात असतें, नाहीं ?

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जीवन म्हणजे ठेव

आपलीं जीवनें आपलीं नाहींत; ती ठेव आहे. प्रभूची ठेव. जीवनाचा मळा पिकवून तेथें प्रेम, स्नेह, सहानुभूति यांचीं फुलेंफळें पिकवून तें पीक प्रभूच्या, त्या विश्वंभराच्या चरणीं समर्पावयाचें.

– साने गुरुजी : ( नवजीवन )

* भारतांत परस्परांवर प्रेम करणारीं माणसें सर्वत्र दिसोत. जीवनांत हा ओलावा कधींहि नष्ट न होवो.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## सार्थ जीवन

जोंवर आपल्या जगण्यानें एकाद्या तरी माणसाच्या जीवनांत आनंद निर्मितां येत असेल, तोंवर आपल्या जीवनांत अर्थ आहे असें समजावें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जीवनाची पणती

तुझें जीवन हें तुझें शेत. तेथें सद्‌गुणांचें, सत्कर्मांचें सोनें पिकव. तूं तुझ्या जीवनाची पणती लहानशी असली तरी मंगल प्रकाशानें पेटत ठेव.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## सौंदर्याची निर्मिती

सौंदर्य कशानें निर्माण होतें ? मेळ साधल्यानें, प्रमाण साधल्यानें. जगांतील सारी गोडी मेळ घालण्यानें निर्माण होते. संगीताच्या सात सुरांत आपण मेळ घालतों आणि सुंदरता उत्पन्न होते.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## प्रसिद्धीला विन्मुख

रानावनांत कानाकोपऱ्यांत असें एखादें रमणीय व सुगंधी फूल फुललेलें असेल कीं, ज्याचा पत्ता कोणाला लागलेला नाहीं. समुद्राच्या पोटांत अशीं गोलबंद व पाणीदार मोतीं असतील कीं, ज्यांची जगास वार्ता नाहीं. पृथ्वीच्या पोटांत ताऱ्यांसारखे तेजस्वी हिरे असतील, परंतु मानवजातीस त्यांचें अद्याप दर्शन नाहीं. वर अनंत आकाशांत असें अनंत तारे असतील कीं, जे पल्लेदार दुर्बिणींतूनहि अजून दिसले नाहींत.

— साने गुरुजी

## जीवन म्हणजे झगडा

जीवन म्हणजे झगडा. जीवन म्हणजे एकसारखी लांबत जाणारी एकपदरी माळ नव्हे. जीवन म्हणजे परस्परविरुद्ध प्रवृत्तींचा ना आदि ना अंत असा दोन-पदरी गोफ ! प्रगत जीवन—मोठें जीवन म्हणजे मोठा लढा, —तीव्र झगडा. मोठ्या लढ्यांत जखमा मोठ्याच होणार; पण या लढ्यांतला विजयही मोठा. आणि या विजयाचें सुखहि मोठेंच नाहीं काय ? पूर्वींच्या मानवांपेक्षां आम्हा आजच्या मानवांना मोठ्या दुःखाशीं लढण्याचा मोठा मान मिळाला आहे. झालें तर. हीच आमची प्रगति !

— अनंत काणेकर : ( दोन-पदरी गोफ )

## जीवनाचा प्रवाह

सांचलेल्या पाण्याची खात्री करून घेतल्याशिवाय तें पिऊं नये; वाहतं पाणी निःशंकपणानं खुशाल प्यावं असं म्हणतात. या समजुतीमागें रसायनशास्त्राचं अथवा वैद्यक-शास्त्राचं कोणतं तत्त्व आहे त्याची मला कल्पना नाहीं, परंतु पाण्याविषयींचा जो हा संकेत रूढ आहे तो आपल्या मानवी जीवितालासुद्धां लागू करतां येईल असं माझ्या मनांत पुष्कळदां येतं. जें जीवित अडलं, सांचलं, स्थिर झालं तें जगण्यांत मौज रहात नाहीं. जीवित प्रवाही असेल तरच त्यांत खरी गंमत वाटते.

— ना. सी. फडके : ( मैफल )

* तुम्हीं तेज मिळवा, चमकदार व्हा. तेजस्वी पुरुष जगतो तेंच खरें जीवन. तेजोहीन जगणें हें जगणेंच नव्हे.

— महादेवशास्त्री जोशी : ( कविभूषण )

## जीवनाचा कलश

जीवन म्हणजे एक मातीचा कलशच आहे. ज्याप्रमाणें रित्या घड्याला महत्त्व नाहीं त्याप्रमाणें रित्या जीवनाला महत्त्व नाहीं. घडा भरलेला असला म्हणजे त्याला आपण डोक्यावर घेतों, त्याप्रमाणें तुमच्या जीवनाचा कलश जर प्रेमानें भराल, सत्कृत्यांनीं भराल, ज्ञानानें भराल तरच लोक तुम्हांला डोक्यावर घेतील. रिकामी घागर अमंगल आहे; भरलेली घागर मंगल आहे.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## याला जीवन ऐसें नांव

जीवनांत दिवस आणि रात्र, संयोग आणि वियोग, सुख आणि दुःख यांची खिचडी आहे. जगांत केवळ सुख नाहीं, केवळ दुःख नाहीं; सारें संमिश्र आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जीवनांतील निर्भयता

निष्पाप असेल तोच निर्भय असतो. निर्भयता हा मनाच्या आरोग्याचा, अनघतेचा प्रसाद आणि प्रभाव आहे. जीवितांतला तो प्रसाद, तो प्रभाव निघून गेल्यावर मग तें खुरटें, भित्रें जीवन जगण्यांत काय स्वारस्य आहे?

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( नवे संसार )

## जसें ध्येय तसें जीवन

ज्याचा आपण दावा करतों त्याप्रमाणें वर्तन हवें. तुम्हीं विद्यार्थी; विद्या मिळविण्यांत तुमचा बराचसा वेळ न जाईल तर तुम्ही विद्यार्थी कसचे? जें ध्येय, तदनुरूप जीवन हवें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जीवनांतील प्रसन्नता

जीवनांत सुंदरता कशानें येईल ? सत्यानें येईल; सेवेनें, प्रेमानें येईल. आपण ज्या वेळेस खोटें बोलतों त्या वेळेस आपण सुंदरता गमावितों; मुखावरची प्रसन्नता जाते. हृदय वांकडें होतांच तोंडहि वांकडें होतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## मानवी जीवन

संध्यारागांत ज्याप्रमाणें प्रकाश आणि छाया यांची सरमिसळ झालेली असते, त्याप्रमाणें सुखदु:खांच्या सम-प्रमाण मिश्रणानें मानवी जीवनाला एक प्रकारची उदास माधुरी येते.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( मुक्तात्मा )

## हास्य व जीवन

निर्मल हास्य म्हणजे प्रसन्न आत्म्याचा प्रकाश. महात्माजींचें हास्य विश्वविख्यात आहे. जीवनांतील सारी सरळता; मधुरता, निष्पापता, परमप्रेमता जणूं त्या हास्यांतून प्रकट होई. निर्मळ जीवनसिंधूवरचा फेंस म्हणजे तें हास्य.!

— सानें गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## जीवनाचा विकास

प्रेम, ज्ञान, शक्ति यांचा विकास जीवनांत हवा. प्रेम म्हणजे हृदयाचा विकास, ज्ञान म्हणजे बुद्धीचा विकास व शक्ति म्हणजे शरिराचा विकास. शरीर, मन व बुद्धि या तिहींची वाढ जीवनांत हवी.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## जीवनांतील आनंद

आईच्या पोटांतून बाहेर आल्यावर बालक रडूं लागतें.
कोण रडवितें त्याला ? — भूक !
तरुण-तरुणींचीं हृदयेंसुद्धां मूक रुदन करतात.
कोण रडवितें त्यांना ? — भूक !
वृद्धांच्या डोळ्यांतूनसुद्धां अश्रुधारा वाहतात.
कोण रडवितें त्यांना ? — भूक !

जीवन म्हणजे काय ? या तीन भुकांसाठीं चाललेली धडपड. सुख म्हणजे काय ? या तीन भुकांची तृप्ति. या तीन भुकांच्या तृप्तीचा त्रिवेणी संगम म्हणजेच आनंदमय जीवन !

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

## खरें जीवन

जीवन म्हणजे आशा-निराशेचा गोफ, भुलावण आणि सावधतेचा खेळ. अल्प काळ मनाला भुलावण चारून ती उतरल्यावर दीर्घकाल तिच्याबद्दल पश्चात्ताप करीत बसण्यापेक्षां साऱ्या आयुष्याला बुडवून टाकणारी भुलावण जो शोधून काढील तोच जोमांत जगूं शकेल.

— विभावरी शिरूरकर ( विरलेलें स्वप्न )

## जीवन व समाज

तुम्हीं आपलीं काव्यें वाटेल तेव्हां रचा, तुमच्या मूर्ति वाटेल तेव्हां घडवा; पण त्या काव्यांतील ललित अनुभव, त्या मूर्तींचा साक्षात्कार हें सर्व तेव्हांच अनुभवास येतें; जेव्हां आपण जीवनाला संकटाच्या सहाणेवर घांसून तीक्ष्ण करीत असतों.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## जीवनांतील काव्य

काव्यांत जीवन नाहीं तर जीवनांत काव्य आहे. समुद्रांत बुडाल्यावांचून रत्नें लाभत नाहींत. पृथ्वीच्या उदरांत शिरल्यावांचून उपयुक्त धातु लाभत नाहींत, गगनचुंबी नारळीवर चढण्याचें धाडस केलें नाहीं तर अडसरांचें अमृततुल्य पाणीही मिळत नाहीं. जीवनांतल्या संकटांना टक्कर देणारांनाच त्यांतलें खरें काव्य कळतें.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

## जीवनांतील आधार

मनुष्याचं सगळं आयुष्य म्हणजे मायेच्या व श्रद्धेच्या दोरखंडांनीं साऱ्या बाजूंनीं खेंचून जमिनीवर उभ्या केलेल्या खांबासारखं असतं. आई, वडील, इष्टमित्र यांच्याबद्दल कमी-अधिक माया आणि परंपरा, चालिरिती इत्यादिवरील श्रद्धा या तणाव्यांमुळें आपोआप खेंचला जाऊन उभा राहिलेला माणूस हे सर्व तणावे ढिले पडल्यावर गदगदां हालत राहतो जागच्या जागीं.

— विभावरी शिरूरकर : ( विरलेलें स्वप्न )

## संकटाचें स्वागत

संकट जर एकदां आलें तर मनुष्य दीन बनून जातो; जर अनेक वेळां आलें तर त्यांचें निवारण करण्याचा उपाय तो शोधून काढतो आणि जर तें नेहमींचेंच होऊन बसलें तर त्याला जीवनाचा नियम समजून आपल्या राहणींतच तो कायमचा फेरफार करून घेतो; आणि मग तें संकट न राहतां जीवन-विकासाचें साधन बनतें.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## पांढरपेशा जीवनाचा पाया

पांढरपेशांचें जीवन या चांदण्यासारखेंच नाहीं का? दिसायला किती सुंदर, किती शांत. पण सूर्यच नसेल तर चंद्राला प्रकाश कुठून मिळणार? रक्ताचें पाणी करणारे कामकरी नसतील तर पांढरपेशांच्या चैनी चालतील का? कला, सौंदर्य, संस्कृति हे सोन्याचे कळस दिसायला छान; पण खालचें सगळें देऊळ कणखर दगडांचेंच बांधावें लागतें. त्या सोन्याइतकेंच किंबहुना त्याच्याहूनही अधिक या दगडांकडे लक्ष द्यायला हवें.

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

## जीवन आणि कला

जीवन म्हणजे जमीन—झाळी, उंचसखल, ओबड-धोबड; पण तिच्यांतूनच पिकं निघतात. कला ही आकाशासारखीं! आकाशांत नक्षत्र चमकलीं तरी फळं जमिनीवरच पिकतात!

— वि. स. खांडेकर : ( दोन ध्रुव )

## जीवन हा फुलबाग

हृदयांत सद्विचारांचीं रोपें लावा, सत्कल्पनांच्या वेली लावा, स्फूर्तीचीं कारंजीं नाचवा. बाहेर फुलें फुलवा, आंत फुलें फुलवा.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

* जीवनाच्या कळीलाहि जप. जीवनाच्या कळीलाहि मोहाचे किडे खाणार नाहींत, वासनांचे भुंगे पोखरणार नाहींत याबद्दल जप.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

## संस्कृतीची व्याख्या

कोणत्याहि विषयावरील उत्तमोत्तम विचार याचें नांव संस्कृति. तिला लोकरीच्या अंगावरील फुलाची उपमा देतां येईल. — न. चिं. केळकर : ( केसरी )

## संस्कृतीचा उगम

संयम हें संस्कृतीचें मूळ आहे. दुर्बलतेच्या, विलासितेच्या किंवा अनुकरणाच्या वातावरणांत कधींहि संस्कृतीचा उदयहि होत नाहीं व विकासहि होत नाहीं.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## सुसंस्कृत मानव

संस्कृतीचा उपासक साऱ्या जगांतून ज्ञान घेईल आणि मानवसमाज सुखी, समृद्ध, प्रगतिशील असा करण्यासाठीं धडपडेल. — साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## हिचें नांव संस्कृति

संस्कृति म्हणजे जीवनाला जें जें उजाळा देतें, सुंदरता देतें, समृद्ध करतें, उदात्त करतें, पुढें नेतें तें तें संस्कृतीच होय. संस्कृति म्हणजे संयम. मानवाला सुसंस्कृत व्हायचें असेल तर मानवानें संयम राखला पाहिजे. मी मोठा, माझा धर्म मोठा, माझी जात मोठी, माझा प्रांत मोठा, माझें राष्ट्र मोठें, माझें तेवढें चांगलें-बाकीचें त्याज्य असें म्हणणाऱ्याला संस्कृति कळली आहे असें मला वाटत नाहीं. संस्कृति जगांतील जें जें चांगलें तें तें घ्यायला तयार राहील. संस्कृति सहकार करील, संस्कृति संगम करील; असें न करणारी ती संस्कृति नसून विकृति होय.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## संयम व संस्कृति

संयमामध्येंच नव्या नव्या संस्कृति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें. साहित्य, स्थापत्य, संगीतकला आणि विविध धर्म-विधि या संयमामागोमागच येतात. संयम हा प्रथम प्रथम कर्कश व नीरस वाटतो; पण त्यामधूनच आपल्याला संस्कृतीचीं मधुर फळें चाखावयास मिळतात.

**— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )**

## सुसंस्कृत मनाचीं लक्षणें

स्वराज्याचा अर्थहि आम्हांला अजून कळला नाहीं. आपल्या करणीपासून दुसऱ्याला त्रास नाहीं ना होणार, दुसऱ्याचें नाहक नुकसान नाहीं ना होणार हा विचार जोंवर मनाला शिवत नाहीं तोंवर तें मन असंस्कृत आहे, रानटी आहे असेंच समजावें.

**— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )**

## भारतीय संस्कृतीचा उपासक

वेदांतील सरस्वती–सूक्तांतील सरस्वती म्हणते, " अहं राष्ट्री संगमनी जनानाम् " " मी सर्व राष्ट्राची आहें. लोकांचे भिन्न प्रवाह जोडणारी, त्यांचा संगम करणारी आहें." हें ध्येय आज ज्याच्या डोळ्यासमोर असेल, तदर्थ जो रात्रंदिवस धडपडत असेल तो भारताचा सत्पुत्र, तो भारतीय संस्कृतीचा खरा उपासक.

**— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )**

* बाह्य क्रियेला महत्त्व नाहीं; तुमच्या अंतःकरणांतील वृत्तीला महत्त्व आहे. मनांतील जिव्हाळ्यामुळें कार्यांत प्राण येतो.

**— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )**

## संयमांतून संगीत

तारा नुसत्या जमिनीवर ठेवा. त्या तारांवरून बोट फिरवा. त्या तारांतून ध्वनि बाहेर पडणार नाहीं. त्या तारांतून संगीत बाहेर पडणार नाहीं. परंतु त्या तारा सतारीच्या खुंटीला बांधा; मग त्या बंधनांत घातलेल्या तारांतून डोलवणारें संगीत स्रवूं लागतें. त्या जड तारा चिन्मय होतात. त्यांच्यांतून अपरंपार माधुरी पाझरूं लागते. संयमांतून संगीत प्रगट होतें.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## संस्कृतीचें मूळ

जे लोक कलेचा पक्ष घेऊन संयमाची हेटाळणी करतात ते कलेला भ्रष्ट करतात नि संस्कृतीच्या मुळावर घाव घालतात.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## शास्त्रीय दृष्टि

शास्त्रीय दृष्टि म्हणजे बुद्धीला पटेल तेंच मानावयाचें. सारा बावळटपणा, बाष्कळपणा फेंकून द्यावयाचा. आंधळ्या रूढींना, मृत विधिविधानांना काडी लावायची.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## अहंकार हेंच दुखणें

या जगांत निराशा, उपासमार, अप्रतिष्ठा किंवा वियोग हीं खरीं दुःखें नाहींत; पण अहंकार हेंच सर्वांत मोठें दुःख आहे. अहंकार-रोग मोठ्या धन्वंतऱ्यासही दूर करवणार नाहीं.

— आचार्य कालेलकर : ( जोगचा धबधबा )

**भावनेचें अमृत**

भावना म्हणजे एक अपूर्व वस्तु आहे. त्याच त्या साध्या वस्तु असतात; परंतु भावनेच्या योगानें तेथें आपण नवें विश्व उभारतों, नवी दुनिया रचितों. साध्या वस्तूंच्या-भोंवतीं आपण तेजोवलय, सौंदर्यवलय निर्मितों. तीच वडी, तोच लाडू, तीच भाकर, तीच भाजी, सारें तेंच, परंतु त्या वस्तु कोणीं आपल्याला दिल्या, यांवर किती अवलंबून असतें ! मनुष्य शेवटीं भावनामय नि विचारमय आहे.

— साने गुरुजी ( संध्या )

**बुद्धि आणि भावना**

बुद्धि ही प्रातःकाळीं गात गात आकाशांत उंच उडणाऱ्या चंडोल पक्ष्यासारखी आहे. भावना ही आंबराईंत लपून 'कुहू कुहू' करणाऱ्या कोकिळेसारखी आहे. जीवनाच्या विकासाला या दोन्ही शक्ति आवश्यक आहेत. भावनेवांचून बुद्धि म्हणजे मुठीवांचून तरवार. ती तशीच उचलायला गेलें तर स्वतःचा हात कापला जाण्याचा संभव अधिक ! बुद्धिवांचून भावना म्हणजे पुढें तरवार नसलेली नुसती मूठ ! लढणाऱ्याला जशी गंजलेली तरवार चालत नाहीं तशी मोडकी मूठही त्याचा अवसानघात केल्यावांचून राहात नाहीं.

— वि. स. खांडेकर : ( क्रौंचवध )

* विचार किंवा मतें हीं मधाप्रमाणें होत. एका अंतःकरणांतून दुसऱ्या अंतःकरणांत त्यांचें प्रसरण व्हावयास उशीर लागतो. भावना किंवा विकार मात्र तैलबिंदुप्रमाणें शीघ्रगामी असतात. — ना. सी. फडके : ( सुहास्य )

## चित्तशांतीचा झरा

पाप उद्भवतें तें त्याचें निर्मूलन होण्यासाठीं; गैरसमज होतात ते दिलसफाईच्या आनंदासाठीं; उन्हाळ्यामध्यें धरती तापते ती आकाशांतील पाऊस खेचून वनस्पति-सृष्टीला उगविण्यासाठीं; मनुष्य स्वार्थी बनतो तो तशा प्रकारच्या जीवनाच्या वैफल्याची खातरी करून घेण्या-साठीं; परमात्मा अनेक रूपांनीं प्रगट होतो तो आपल्या अखंड एकतेचा अनुभव घेण्यासाठीं; हें ज्याच्या मनावर पूर्णपणें बिंबलें आहे त्याच्या हृदयाच्या शांतीचा भंग कोण करूं शकेल ?

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## शांतीमागील संताप

माणूस वरून दिसतो शांत, दिसतो साधा; परंतु जर का त्याच्या जीवनांत वादळ सुटलें तर हृदयाच्या बिळांतून सापच साप बाहेर पडतात, डोळे आग पाखडूं लागतात, जीभ नागिणीप्रमाणें दंश करते, हात सापाप्रमाणें वळवळत असतात. लहानसा माणूस, परंतु त्याच्याजवळ सापांचें केवढें भांडवल असतें.

— साने गुरुजी : ( क्रांति )

## भावनांचें सामर्थ्य

कापूस पिंजल्याशिवाय त्याचें सूत निघत नाहीं. पण भावनांचें अगदीं उलटें असतें. त्या जों जों पिंजीत जावें तों तों त्यांचें स्नेहबंधन निर्माण करण्याचें सामर्थ्य नाहींसें होत जातें.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( भंगलेलें देऊळ )

### जीवनांतील शांति

परीक्षेचा दिवसहि नेहमींच्या दिवसाप्रमाणें वाटावा. जीवनांतील सहजता कधीं नष्ट होऊं नये. आनंद व शांति नष्ट होऊं नयेत. पुस्तकाचें पान जर कांठोकांठ छापलेलें असेल तर बरें वाटणार नाहीं. जीवनांत मोकळे-पणाचा समास सोडलेला असावा.

— साने गुरुजी : ( श्याम )

### घरांतील शांति

ज्या घरांत स्वच्छता कशाला म्हणतात हें माहीत नाहीं; तरुण मुलांना व्यायामाची आवश्यकता कां आहे हें कळत नाहीं; त्यांच्या मनाला भुरळ पाडणारीं दुर्गुणांचीं नाकीं कोणतीं आहेत याचा अदमास नाहीं आणि मुलांच्या जिवंत परंतु कुसंगतीच्या अडथळयानें सहजीं वक्र होणाऱ्या मनोवृत्ति सद्‌गुणाकडे कशा वळवाव्यात याची अटकळ नाहीं; त्या घरांत आरोग्य, सौख्य आणि शांति हीं निर्माण होणें कालत्रयीं शक्य नाहीं.

— ना. ह. आपटे : ( सुखाचा मूलमंत्र )

### सुखाचा मार्ग

ज्याच्या डोक्यांत ज्ञान आणि हृदयांत ध्येय आहे त्याला या जगांत सुखाचा मार्ग मिळतोच मिळतो. नाहीं तर रिकाम्या डोक्यांत सैतान आपला कारखाना उघडतो आणि रिकाम्या हृदयांत व्यसनांचा नंगा नाच सुरू होतो.

— वि. स. खांडेकर : ( कांचनमृग )

* विद्या म्हणजे ज्ञान —जेणेंकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो. — लोकहितवादी

## आशा

अत्यंत उन्हाळा होऊं लागतांच पावसाळा जवळ आला आहे असें समजावें. अत्यंत हिंवाळा होऊं लागला कीं उन्हाळा जवळ आहे असें समजावें. अमावास्येचा काळाकुट्ट अंधार भरला म्हणजे बिजेची चंद्रकोर लवकरच दिसणार असें समजावें. अत्यंत विरोधाच्या पोटांतून विकास बाहेर पडत असतो.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## मनांतील आनंद

लहान मुलांची निर्व्याज वृत्ति ज्याच्या अंतःकरणांत सदैव असते त्याच्या दृष्टीला संसारांतील दुःखें आकाशांत क्षणभर उसळणाऱ्या जलहीन मेघाप्रमाणें दिसतात. त्या ढगांची भीति वाटण्याऐवजीं त्यामुळें क्षितिजांच्या देखाव्यांत वैचित्र्याची भर पडल्यासारखें वाटलें पाहिजे अशी त्याची समजूत असते.

— ना. सी. फडके : ( बालवृत्ति )

## थोरपणाची कसोटी

सन्मार्ग किंवा सदाचरण ही एक ऐरण आहे. या ऐरणीवर घणाचे घाव सोसून जो अभंग राहील त्यालाच लोक हिरा म्हणून मस्तकीं धारण करतील.

महादेवशास्त्री जोशी : ( दिव्यदेही संधिमान )

## परमेश्वरी कृपा

गांजणारांनीं आणि गांजलेल्यांनीं दोघांनींहि परमेश्वरालाच शरण गेलें पाहिजे. कारण ह्या जगामध्यें त्याची कृपा हाच दिग्विजय आणि त्याची अवकृपा हीच उतरती कळा होय.

— शि. म. परांजपे : ( ईश्वरी सूत्र )

## सद्वर्तनाचा प्रारंभ

दुर्वर्तनापासून आपण परावृत्त व्हावें अशी मनुष्याला इच्छा उत्पन्न झाली म्हणजे तोच त्याच्या सद्वर्तनाचा प्रारंभ होय.

— शि. म. परांजपे : ( गोविंदाची गोष्ट )

## दुर्गुणांचें भस्म

होळीचा अर्थ काय ? काय जाळायचें ? तीं लांकडें, त्या गोंवऱ्या म्हणजे काय ? खरें म्हणजे आपल्या मनांत लपून बसलेल्या सर्व वाईट गोष्टी आज बाहेर काढून त्यांचें भस्म करायचें असतें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## दुर्गुणांवर मात्रा

दुर्गुणासारखें दुसरें वाईट भूत नाहीं आणि सद्‌गुणासारखा त्याजवर दुसरा चांगला मंत्र नाहीं !

— शि. म. परांजपे : ( गोविंदाची गोष्ट )

## सज्जन कोणाला म्हणावें ?

सज्जन कोणाला म्हणावें ? जे कर्तव्याला तत्पर असतात, जे हातून होईल तेवढें दुसऱ्याचें भलेंच करतात, जे कशाहि प्रसंगीं सन्मार्ग सोडीत नाहींत आणि जे ईश्वरावर दृढनिष्ठा ठेवतात त्यांना.

— महादेवशास्त्री जोशी : ( दिव्यदेही संधिमान )

## शासनसंस्थेचें स्वरूप

प्रत्येक जिवाचा विकास होईल अशी समाजरचना हवी. त्या विकासास वाव देईल अशी शासनसंस्था हवी.

— साने गुरुजी : ( नवजीवन )

## परहिताची जाणीव

कोणीहि केवळ स्वतःसाठीं जगत नसतो. हें तत्त्व ज्या मानानें जीवनांत येईल, त्या तत्त्वाचा जसजसा जीवनांत साक्षात्कार होत जाईल, त्या मानानें आपलें जीवन सुंदर होईल, थोर होईल. — साने गुरुजी : ( गोड शेवट )

## समाजासाठीं जगा

दगड अलग पडला तर त्याला महत्त्व नाहीं; परंतु तो इमारतींत संयमपूर्वक बसेल तर त्याला अमरता येते, त्याला महत्त्व येतें. आपण या समाजाच्या सुंदर इमारतींत योग्य ठिकाणीं बसलें पाहिजे व तेथें शोभलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## समाजसुखाचें मर्म

व्यक्तीची चैन पाहूं नका, समाजाचें हित पहा. गरज आणि पात्रता यांचा मेळ घालून संपत्ति विभागली तरच समाज सुखी होतो. — ना. धों. ताम्हनकर : ( दाजी )

## पराचें सुख

फार मोठें ओझें पेलण्याची कुवत आपणांत नसेल तर शेजारपाजारच्या चार मंडळींना सुखी करण्याचें ध्येय ठेवावें. दुसऱ्यामध्यें स्वतःला मिसळून घ्यावें म्हणजे सुख-दुःखें तीव्र होत नाहींत.

— ना. धों. ताम्हनकर

* व्यक्तीच्या सुखदुःखानें ऐतिहासिक मूल्यें, ऐतिहासिक घडामोडी अजमावयाच्या नसतात. स्वतःच्या वैयक्तिक जीवनाची फूटपट्टी घेऊन महान् आंदोलनें मोजतां कामा नये. — साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## राष्ट्राचे सेवक

लोक-कार्याशीं एकरूप झालेल्या हजारों युवयुवतींनीं ही भरतभूमि गजबजून जाईल तरच हें मृतप्राय राष्ट्र सजीव होण्याची कांहीं आशा आहे.

— धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## राज्य-वैभव

दूत म्हणजे राजाचे नेत्र होत. साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा.

— रामचंद्रपंत अमात्य ( अज्ञापात्र )

## संपूर्ण इतिहास

इतिहास म्हणजे केवळ राजेराण्यांचीं चरित्रं नव्हत कीं पुढाऱ्यांनीं घडवून आणलेल्या लढायांची हकीकत नव्हे. कोट्यवधी मानवांची यात्रा कोणत्या मार्गानें जात होती आणि कुठें जात होती हें ज्या इतिहासावरून समजणार नाहीं तो इतिहास अपूर्ण होय !

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## उच्च ध्येयाचें फल

तुमचें ध्येय विशाल असूं द्या. तें जगताच्या मंगलाचें असावें-लोककल्याणाचें असावें. उच्च ध्येयाचीं माणसें त्या प्रयत्नांतच स्वत: उच्च होतात आणि लोकांच्या आदराचें स्थान बनतात.

— महादेवशास्त्री जोशी

* सदिच्छेलाहि किंमत आहे. किंबहुना बाहेरच्या देणग्या देत असतांना मनांत सदिच्छा नसेल, प्रेमस्नेह नसेल तर काय उपयोग ?

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## उदार वृत्ति

आपल्या राष्ट्राला नवजीवन प्राप्त होत आहे. अशा वेळीं स्वतंत्र विचारांना वाव देऊन एकमेकांच्या धर्म-विचारांकडे उदार वृत्तीनें व थोर मनानें पहाण्यांतच सर्वांचें कल्याण आहे. — धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## खरा वर्णाश्रम

स्वातंत्र्याचे, समानतेचे, न्यायाचे विचार देणारे ब्राह्मण बना; स्वातंत्र्यासाठीं लढणारे क्षत्रिय बना; देशाचा व्यापार वाढवून सर्वांना पोटभर अन्नवस्त्र मिळेल अशी व्यवस्था निर्मिणारे वैश्य बना; देशाची मनापासून सेवा करणारे शूद्र बना. — साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## पुण्याजवळचा प्रदेश

पुण्याच्या आसपास प्रसन्न हिरवळ आहे. भाजी-पाल्याची लागवड आहे. पाणी मधून मधून झुळझुळतें. पण पुढें सपाट काळा माळ अस्ताव्यस्तपणें पसरलेला आहे. तेथें सह्याद्रींतले चढउतार नाहींत आणि तेथली हिरवी झाडी पण नाहीं. नाहीं म्हणायला एक ठेंगण्या टेकड्यांची रांग गाडीबरोबर दूरवर निरोप द्यायला येते.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## लग्न-समारंभ

या थेंबांचीं—सौंदर्याच्या या मोत्यांची बिनसराची मुंडावळ तुला कपाळीं शोभते आहे ! समोर संध्याकाळचा होम पेटला आहे; त्याचीच लगीनमाळ करून, डोंगर-लाटेच्या बोहल्यावर, मावळत्या देवाच्या साक्षीनें, मरणाचा मुहूर्त साधून, रायगडचा राजा, मनाच्या मुक्त्या मंत्रानें तुळशी, तुझ्याशीं लग्न लावीत आहे !

— रा. ग. गडकरी : ( राजसंन्यास )

## जगाचा अनुभव

कॉलेजांत पाऊल टाकतांना मनुष्य गरुड असतो, संसार सुरू झाला कीं तो पोपट होतो आणि जगाचा अनुभव त्याची किंमत पतंगाहून अधिक नाहीं हें सिद्ध करतो. — वि. स. खांडेकर : ( पतंग )

## जगाचें स्वरूप

जग हें वाईट माणसांनीं भरलेलें आहे, असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव मला असें सांगतात कीं, जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ती ओढवतात व तंटेभांडणें उत्पन्न होतात. दुःखें जगांत आहेतच, दुष्टपणा पण आहे; परंतु प्रयत्न केला तर जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे. — वा. म. जोशी

## जगाचा बाजार

जग हा बाजार आहे एक. या बाजारांत लबाड माणसांचीं बोरें द्राक्षाच्या भावानें जातात; पण प्रामाणिक माणसांचीं द्राक्षें करवंदाच्या दरानेंसुद्धां खपत नाहींत.

— वि. स. खांडेकर : ( सुखाचा शोध )

## जग म्हणजे बाजार

आजचं युग बाजाराचं आहे, क्रयविक्रयाचं आहे. चरितार्थासाठीं प्रत्येकाला कांहीं ना कांहीं विकावं लागतं. कोणी श्रम विकतात, कोणी बुद्धि विकतात, कोणी प्रामाणिकपणाहि विकतात.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## उद्यांचें जग

फार थोडया काळांत पूर्वपश्चिम सुधारणांतील अत्यंत हितकारी भाग जींत सामील झाले आहेत अशा एका नामी सुधारणेची येथें स्थापना होऊन, भारतीय आर्य अननुभूतपूर्व अशा आधिभौतिक व आध्यात्मिक सुखाचा उपभोग घेऊं लागतील असा आमचा तर्क आहे !

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## जग म्हणजे सोडत

जग ही एक फार मोठी सोडत आहे ! माझ्या वांट्याला सुखवस्तु जीवनाचें बक्षीस आलें हा केवळ योगायाग आहे. पण या सोडतींत ज्यांना बक्षिसें मिळालीं नाहींत, त्यांनीं काय तिकिटांकरितां पैसे खर्च केलेले नसतात ?

— वि. स. खांडेकर : ( एक तास )

## जिवंत जग

दगडधोंड्याचें जग मला नको. ज्यांच्यावर मी प्रेम करूं शकतों किंवा ज्यांचा मी द्वेष करतों अशीं कां होईनात, पण हाडामांसाचीं, गरम रक्ताचीं माणसें ज्यांत आहेत, ज्यांत एकमेकांचे रसरसीत हात आम्ही घेऊं शकतों, एकमेकांचे काळेगोरे,कुरूप-सुरूप चेहरे पाहून दुःखी किंवा सुखी होतों, आणि जेथें माणसांच्या उष्ण श्वासांनीं गरम झालेल्या वातावरणांत आम्ही श्वासोच्छ्वास करूं शकतों असेंच जग मला हवें.

— अनंत काणेकर : ( माणसाचें जग )

* देशांतील सर्व जनतेनें अंगिकारली असतां यशस्वी होणार नाहीं अशी चळवळच नाहीं.

— न. चिं. केळकर

### जगाचा अनुभव

कॉलेजांत पाऊल टाकतांना मनुष्य गरुड असतो, संसार सुरू झाला कीं तो पोपट होतो आणि जगाचा अनुभव त्याची किंमत पतंगाहून अधिक नाहीं हें सिद्ध करतो.

— वि. स. खांडेकर : ( पतंग )

### जगाचें स्वरूप

जग हें वाईट माणसांनीं भरलेलें आहे, असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव मला असें सांगतात कीं, जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ती ओढवतात व तंटेभांडणें उत्पन्न होतात. दुःखें जगांत आहेतच, दुष्टपणा पण आहे; परंतु प्रयत्न केला तर जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे.

— वा. म. जोशी

### जगाचा बाजार

जग हा बाजार आहे एक. या बाजारांत लबाड माणसांचीं बोरें द्राक्षाच्या भावानें जातात; पण प्रामाणिक माणसांचीं द्राक्षें करवंदाच्या दरानेंसुद्धां खपत नाहींत.

— वि. स. खांडेकर : ( सुखाचा शोध )

### जग म्हणजे बाजार

आजचं युग बाजाराचं आहे, क्रयविक्रयाचं आहे. चरितार्थासाठीं प्रत्येकाला कांहीं ना कांहीं विकावं लागतं. कोणी श्रम विकतात, कोणी बुद्धि विकतात, कोणी प्रामाणिकपणाहि विकतात.

— वि. वा. शिरवाडकर : ( जान्हवी )

## उद्यांचें जग

फार थोडया काळांत पूर्वपश्चिम सुधारणांतील अत्यंत हितकारी भाग जींत सामील झाले आहेत अशा एका नामी सुधारणेची येथें स्थापना होऊन, भारतीय आर्य अननुभूतपूर्व अशा आधिभौतिक व आध्यात्मिक सुखाचा उपभोग घेऊं लागतील असा आमचा तर्क आहे !

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## जग म्हणजे सोडत

जग ही एक फार मोठी सोडत आहे ! माझ्या वांट्याला सुखवस्तु जीवनाचें बक्षीस आलें हा केवळ योगायाग आहे. पण या सोडतींत ज्यांना बक्षिसें मिळालीं नाहींत, त्यांनीं काय तिकिटांकरितां पैसे खर्च केलेले नसतात ?

— वि. स. खांडेकर : ( एक तास )

## जिवंत जग

दगडधोंड्याचें जग मला नको. ज्यांच्यावर मी प्रेम करूं शकतों किंवा ज्यांचा मी द्वेष करतों अशीं कां होईनात, पण हाडामांसाचीं, गरम रक्ताचीं माणसें ज्यांत आहेत, ज्यांत एकमेकांचे रसरसीत हात आम्ही घेऊं शकतों, एकमेकांचे काळेगोरे,कुरूप-सुरूप चेहरे पाहून दुःखी किंवा सुखी होतों, आणि जेथें माणसांच्या उष्ण श्वासांनीं गरम झालेल्या वातावरणांत आम्ही श्वासोच्छ्वास करूं शकतों असेंच जग मला हवें.

— अनंत काणेकर : ( माणसाचें जग )

*देशांतील सर्व जनतेनें अंगिकारली असतां यशस्वी होणार नाहीं अशी चळवळच नाहीं.

— न. चिं. केळकर

## रामाचें व्यक्तिमत्त्व

अयोध्येंत असा प्राणी नाहीं, ज्याचें मन रामानें दुखविलें आहे. अयोध्येंत असें दुःख नाहीं, जें माझ्या रामानें हलकें केलेलें नाहीं. अयोध्येंत असें सुख नाहीं, जें माझ्या रामामुळें प्रफुल्लित झालेलें नाहीं. अयोध्येंत असा पराक्रम नाहीं, ज्याचें तेज माझ्या रामामुळें चोहोंकडे फाकलेलें नाहीं. अयोध्येंत असा मोक्ष नाहीं, ज्यांत माझ्या रामाची मूर्ति प्रत्यक्ष नाहीं—अशा माझ्या रामाला कैकेयी, वनवासाला कां पाठवितेस ?

कृ. प्र. खाडिलकर : ( सवतीमत्सर )

## श्रीकृष्णाचें जन्मकार्य

माझा धंदा राजांचा आहे. उत्तम गवळी ज्याप्रमाणें गाईंना सहज वळवितो, त्यांना बांधतो, त्यांचें दूध काढतों त्याप्रमाणें मी राजांना सन्मार्गावर आणतों, नीतिबंधनांनीं राजांना बांधून ठेवतों आणि सौख्यशांतीच्या दुधाचे रतीब सर्वांच्या घरीं मी घालतों.

– कृ. प्र. खाडिलकर : ( स्वयंवर )

## पतित कोण ?

पतितांना अस्पृश्य समजून आपले धर्मोपदेशक स्वतः अस्पृश्य बनले आहेत आणि त्यांनीं हिंदुधर्माचें पतितपावनत्व बुडवून टाकलें आहे. गुहक आणि शबरीला आपलें म्हणणाऱ्या रामचंद्राची ही भरतभूमि राहिली नाहीं.

– आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

*मतापेक्षां मनाकडे पहा. पक्षभेद असले तरी पक्षद्वेष करूं नका.

– वा. म. जोशी

## शिवाजीच्या काळाची थोरवी

ब्रह्माहूनहि कठीण व कुसुमाहूनहि मऊ अशीं मनें या कालांत सांपडतात. राष्ट्रांतील सर्व लोकांना ममत्वबुद्धीनें पहाणारे थोर पुरुष त्या काळांत आढळतात. स्वामिभक्तीनें स्वजीविताला तृणवत् लेखणारे वीर त्या काळांत नांदत होते. अलौकिक धाडसाचीं कृत्यें करून दाखविणारे व नंतर तीं लोकांकडून करविणारे पुढारी त्या काळीं अवतीर्ण झाले. व्यक्तिधर्म, कुलधर्म, समाजधर्म व महाराष्ट्र-धर्म यांचीं बीजें खडान्खडा जाणणारे विचारवंत बृहस्पति त्या काळीं निपजले. विश्वामित्राशीं समबुद्धीनें वागणारे साधुसंतही त्या काळी जन-मनःक्षोभ शांत करते झाले.

— इतिहासाचार्य वि. का. राजवाडे : ( लेखसंग्रह भा. ३ )

## शिवाजीची थोरवी

त्या शिवरायाची स्मृति हीच आमची स्मृति, त्याचं गुणश्रवण हीच आमची श्रुति, त्याचा इतिहास हींच आमचीं पुराणं आणि त्याची प्रत्येक कृति हेंच आमचं मानवधर्मशास्त्र.

— भा. वि. वरेरकर : ( संन्याशाचा संसार )

## मानवतेची जाणीव

कोणतेंहि कृत्य करतांना या माझ्या कृत्यानें मानवतेला बट्टा नाहींना लागणार, माझ्या देशाचें नांव कलंकित नाहींना होणार, हा विचार मनांत आणून आपण वागायला हवें.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## शिवाजीचें शब्द-चित्र

डोळे अतिशय पाणीदार व फार मोठे; परंतु त्यांचा विशेष त्यांची विशालता नसून त्यांत तळपणारें अद्वितीय तेजच होय. त्याचें नाक मोठें असून गरुडाच्या चोंचीसारखें होतें. तो शरिरानें फार भव्य होता असें नाहीं. त्याची मूर्ति बरीच ठेंगणी असावी असें स्पष्ट दिसत होतें. तारुण्याची पताका अद्यापि त्याच्या ओंठावर व हनुवटीवर विशेषशी झळकूं लागली नव्हती. त्याचा पोषाख अगदीं साधा, एक पायघोळ अंगरखा आणि मराठेशाही पायजमा असून डोक्याला त्या वेळचें तें लहानसें कांहीं मराठेशाही थाटाचें पागोटें होतें. त्याचे चंचल नेत्र एकसारखे जिकडे तिकडे फिरत असून जणूं काय सर्व दिशांकडे काय चाललें आहे त्याचें तो एकदमच रसग्रहण करीत होता असें दिसलें.

— हरिभाऊ आपटे : ( उषःकाल )

## संतिणीचें चित्रण

अशा वेळीं छावणीच्या अगदीं दुसऱ्या टोंकाला ओढ्याच्या कांठीं एक संतीण बसून देवाचें भजन-पूजन करीत होती. तिचें वस्त्र अगदीं शुभ्र, गळ्यांत तुळशीची माळ आणि हातांत चिपळ्या. ती या वेळीं परमेश्वराचें भजन करण्यांत अगदीं तल्लीन होऊन गेली होती. प्रथमतः तिनें आपल्या पडशींतून विठोबारखुमाईच्या मूर्ति बाहेर काढल्या. नंतर आपण स्नान करून त्यांचें यथासांग पूजन केलें. धूपदीप सर्व दाखविल्यानंतर तिनें आपली एकतारी छेडण्यास आरंभ केला व धुंगरू लावलेल्या लहानशा मत्स्याकृति चिपळ्यांचा मंजुळ ध्वनि काढण्यास सुरवात केली.

— हरिभाऊ आपटे : ( केवळ स्वराज्यासाठीं )

## ईश्वराची करणी

परमेश्वराची इच्छा कांहीं निराळीच होती. त्याच्या मनांतून ह्या माडावर चढणाऱ्या मुलांना राज्यपदावर चढवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर या डोंगरापासून त्या डोंगरापर्यंत वाऱ्याप्रमाणें भटकत फिरणाऱ्या या मुलांना त्यांच्या हातांत विजयश्रीचे भगवे झेंडे देऊन साऱ्या हिंदुस्थानभर फिरवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धन हें नांव अन्वर्थक करावयाचें होतें. कारण, त्यानें येथील हीं मुलें हातीं धरून साऱ्या हिंदुस्थानच्या विजयश्रीचें वर्धन केलें.

— शि. म. परांजपे : ( दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण )

## पेशव्यांचें कर्तृत्व

दैवाच्या मनांत नसतें तर विश्वनाथभटाचीं मुलें श्रीवर्धनच्या वाळवंटामध्यें नाचतबागडतच पडलीं असतीं. तीं फार उंच चढलीं असतीं तर एखाद्या माडाच्या झाडावर चढलीं असतीं; सिंहासनावर चढलीं नसतीं. त्यांनीं फार मजल मारली असती व आपल्या पंचक्रोशींतील अगदीं शेवटच्या गांवाला ते गेले असते, पण अटकेपर्यंत गेले नसते; व त्यांनीं फार फार जिंकलें असतें तर एखादा भाऊबंदकीचा वाद जिंकला असता; हिंदुस्थान देश जिंकला नसता.

— शि. म. परांजपे : ( दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण )

* अब्रूप्रमाणें सुखही कांचेसारखं आहे. ती कांच एकदां फुटली कीं पुन्हां सांधणें शक्य नाहीं.

— ना. सी. फडके

## न्या. रानडे यांची कामगिरी

महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंडया गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणीं मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे...घाटांतून एकदां कुशल इंजिनियरनें आगगाडीची लाइन मारल्यानंतर त्यांत सुधारणा करणारे जरी पुष्कळ लोक निघाले, तरी ज्याप्रमाणें मूळ इंजिनियरच्या कल्पकपणास कमीपणा येत नाहीं, तद्वतच रावसाहेब रानडे यांची स्थिति होती.

– लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## उदार मनाचा दुष्काळ

भारतांत मोठें मन दुर्मिळ झालें आहे. देशांत अन्नधान्याचा दुष्काळ, वस्त्रांचा दुष्काळ, त्याचप्रमाणें उदार वृत्तीचा, मानवतेचाहि दुष्काळच आहे.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्र )

*मनुष्य सर्वरस हवा. नवीन नवीन शिकायला नेहमीं हुरूप हवा. To grow is to be happy. सदैव वाढत राहणें–ज्ञानानें, कर्मानें, भावनेनें–ही सुखाची गुरुकिल्ली आहे. त्याला मग कंटाळा कधीं येत नाहीं.

– साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## मालाकारांचें कर्तृत्व

विष्णुशास्त्री चिपळूणकर महाराष्ट्राच्या सार्वजनिक सेवेंत पडल्याबरोबर महाराष्ट्र-भाषा सुरस झाली, वाङ्मयांत तेज आलें, निःस्वार्थतेला किंमत आली, स्वावलंबन संचरलें, शिक्षण स्वयंप्रेरित झालें, इतिहास नामांकितपणास चढला, काव्य आनंदप्रद झालें,स्वाभिमान शिगेस चढला व स्वदेशभक्ति उल्लसित झाली. विष्णुशास्त्री प्रकाशमान् झाल्याबरोबर काय काय उत्कर्ष पावलें नाहीं ?

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## प्रि. आगरकरांचे गुण

परिस्थितीचा गुलाम न बनतां परिस्थितीला यथासंभव, यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें तें ज्याच्या अंगांत आहे आणि दुःखाची अथवा संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां आपल्या ठायीं असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## सहकारासाठीं त्याग

गवंडी जर दगडाचीं नाकें थोडथोडीं छिन्नीनें छाटणार नाहीं तर इमारत कशी उभी राहील ? त्याप्रमाणें सार्वजनिक जीवनाची सुंदर इमारत उभी रहावी यासाठीं सर्वांनीं आपआपलीं नाकें थोडीं छाटून घेतलीं पाहिजेत. प्रत्येकानें थोडथोडी मुरड घातली पाहिजे.

— साने गुरुजी : ( श्याम )

## लो० टिळकांची गुणमाला

टिळक सद्वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें. ते विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला. स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या उद्योगाचें चीज झालें. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचें चीज झाले. पराक्रमामुळें धैर्याचें चीज झालें व टिळक स्वतः धैर्यवान् होते म्हणून लोकांना उपदेश करण्याची त्यांना पात्रता आली.

— न. चिं. केळकर

## लोकमान्यांचें स्थान

लोकमान्य हे आमच्या पित्याच्या ठिकाणीं होते. मातेची वत्सलता त्यांच्या अंगीं होती. भावाचा पाठीराखेपणा तें करीत असत. ते आमचे गुरु होते. ते पंतोजीप्रमाणें हाताला धरून वळण देत. शिक्षकाप्रमाणें छड्या मारीत, प्रोफेसराप्रमाणें ज्ञान देत. ते आमच्यांतील ज्येष्ठ पुरुष होते, श्रेष्ठ पुरुष होते. ते आपल्या पक्षांतील पुराणपुरुष होते. ते आमच्या गळ्यांतील ताईत होते, दंडांतील अनंत होते. ते आमच्या मस्तकावरील वैभवाचा मुगुट होते. लोकमान्य हे आमच्या देव्हाऱ्यांतील 'बाण' होते. ते आमच्या देवालयांतील दत्तात्रय होते.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## व्यापकतेचा धडा

मर्यादित संसारांत राहून अमर्याद हो; बंधनांत राहून बंधनातीत हो; संसारांत राहून संन्यासिनी हो; या लहानशा देहांत राहून विश्वाला मिठी मारायला शीक.

— साने गुरुजी : ( संध्या )

## शिष्याचा विलाप

लोकमान्य ! तुम्हांला आतां कोठें पाहूं ? तुमची सावळी मूर्ति कोठें अवलोकन करूं ? तुम्हांला कोठें शोधूं ? तुम्हांला कोठें धुंडाळूं ? आमचा जीव तुमच्या जीवाशीं गोठवलेला होता, आमचा प्राण तुमच्या पंचप्राणांचा भाग होता, आमचें अस्तित्व तुमच्या अस्तित्वांत गुरफटून गेलें होतें, आमचें जीवन तुमच्या जीवनांत गुंतलेलें होतें. लोकमान्य ! आतां तुम्ही कोठें सांपडाल ? तुम्ही कोठें दिसाल ? तुम्ही जात असतांना आमच्या जिवाला ओढणी लागलेली आहे, आमच्या प्राणांना क्लेश पडत आहेत. काट्यांच्या जाळ्या-वरून रेशमी वस्त्राला फराफरां ओढावें त्याप्रमाणेंच आमच्या हृदयाच्या चिरफळ्या झालेल्या आहेत.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## हाडाचा मराठा

जो शिवाजीला व शिवाजीपासून बाजीरावापर्यंत झालेल्या इतिहासप्रवाहाला विसरेल तो हाडाचा मराठाच नव्हे ! ती शक्ति, ती स्फूर्ति, तो देशाभिमान, तें शौर्य जर महाराष्ट्रीयांच्या अंगीं सळसळलें तर ते ' मराठा ' ह्या नांवाला योग्य, नाहीं तर ह्या महाराष्ट्रांत त्यांनीं राहूं नये, कृष्णेच्या पाण्याला शिवूं नये, सह्याद्रीकडे पाहूं नये, विष्णुशास्त्र्यांनीं नटविलेल्या मराठी भाषेचा उच्चार करूं नये !

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

* बर्फाच्या राशी सूर्याच्या किरणांनीं वितळतात, त्याप्रमाणें अहंकाराच्या राशी प्रेमाच्या स्पर्शानें वितळतात.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## मुत्सद्याचे गुण

राजकारणी माणसाच्या अंगांत दोन गुण पाहिजेत. एक तर त्याच्या हृदयांत प्रखर आग पेटलेली पाहिजे आणि दुसरा म्हणजे त्या हृदयाच्या वरच्या बाजूस डोकें बर्फासारखें थंड असलें पाहिजें. हे दोनहि गुण एकसमयावच्छेदेंकरून ज्या पुरुषाजवळ उत्कटतेनें वास करीत असतील तो पुढारी होण्यास योग्य होय.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## वीर कोण ?

जो जो मनुष्य स्वाभिमान सोडून व स्वार्थत्याग करून जगांत आहे त्यापेक्षां अधिक सुख, अधिक आनंद, अधिक सौंदर्य, अधिक रमणीयता, अधिक ज्ञान, अधिक पावित्र्य, अधिक तेज, अधिक उदारबुद्धि, अधिक उदात्तता आणील तो तो आपल्या परीनें वीरच होय.

— वा. म. जोशी : ( रागिणी )

## पुढारी व लोकमत

सतारीची अगर तंबूरीची तार नुसती वाजविल्यानें जसा तिजपासून आवाज निघत नाहीं, पण तीच तार भोपळ्यावर चढविली म्हणजे तिजमधून कर्णमधुर ध्वनि बाहेर पडतो, तद्वत्‌च देशांतील पुढारी विद्वानांचा व लोकमताचा संबंध आहे.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

* मानवी जीवनांतील प्रत्येक घटका किंबहुना प्रत्येक क्षण ही एक सुखाची दीपमाळ असते !

— वि. स. खांडेकर

**समाजाची सतार**

सतार ही काय असते? एक भोपळा, दोन बांबू, चार लांकडाच्या फळ्या आणि कांहीं तारा—यांच्यापेक्षां सतारीमध्यें आणखी जास्त काय असतें? पण त्याच वस्तु एकत्र जमा झाल्या म्हणजे त्या काय सुंदर आवाज उत्पन्न करतात! मात्र कोणी कुशल वाजविणारा भेटला पाहिजे. तसाच कुशल वाजविणारा जर कोणी भेटेल तर ह्या लाखों लोकांच्या समुदायानें बनलेल्या सतारीमधूनहि तो असे कांहीं सुंदर आवाज काढील कीं तें ऐकून सर्व जग थक्क होऊन जाईल.

— शि. म. परांजपे : ( एका खेडेगांवच्या मनुष्याचे विचार )

**पुढारीपणाचे गुण**

समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षां सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरूर लागत असते.

— लो. बा. गं. टिळक

**थोर पुरुष**

जों जों अडचणी येतील तों तो ज्यांना स्फुरणच चढत जाणार; जों जों विघ्नें येणार, तों तों ज्यांच्या निश्चयाचीं मुळें अधिकाधिकच मनांत गढत जाणार, असे पुरुष अत्यंत विरळ. खरे महात्मे ते!

— हरिभाऊ आपटे : ( मी )

*मोठेपणा याचा अर्थ जगाला माहीत असणें, असा मी करीत नाहीं. मी निर्दोष होत आहे, हळूंहळूं उन्नत होत आहे, ही ज्याला जाणीव आहे तो मोठाच होत आहे.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## समाजांतील वर्ग

विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते कायमचे नव्हत. हळूहळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावीं लागून, साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे; व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागेल.

— प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## हल्लींची समाज-व्यवस्था

या लोकांचे ( पांढरपेशांचे ) कपडे इतके पांढरे कसे राहतात, आहे का ठाऊक? एक अद्‌भुत साबण मिळाला आहे त्यांना. शेतकरी आणि मजूर यांचीं घरें धुऊन जें पाणी येईल तें एका मोठ्या कढईत आटवायचें. या कढईचें नांव समाज-व्यवस्था. पाणी भराभर आटावें म्हणून खालीं रूढीच्या गोंवऱ्या आणि धर्माचीं लांकडें हीं एकसारखीं पेटवायचीं. एकादे वेळीं लांकडें पेटत नाहींत असें वाटलें तर त्याच्यावर कायद्याचें रॉकेल भरपूर ओतावें. हें पाणी आटलें कीं अगदीं तेलासारखें होतें. या तेलांत शिक्षणाचा सोडा आणि संस्कृतीचा सुगंध टाकला कीं झाला अद्‌भुत साबण तयार !

— वि. स. खांडेकर : ( उल्का )

* दारू म्हणजे राक्षस, दारू म्हणजे सत्यानाश. दारूपायीं माणूस माणुसकी गमावून बसतो.

— साने गुरुजी : ( प्रतिज्ञा )

## विभूतींचा अवतार

अवतार अकस्मात् होत नाहीं. धूमकेतूसारखा तो कोठून तरी येतो असें नाहीं. लाखों लोकांच्या अस्पष्ट प्रयत्नांतून स्पष्ट ध्येय देणारा अवतार सृष्टीच्या नियमानुसारच उत्पन्न होत असतो.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## सत्पुरुष

सत्पुरुषांचें वास्तव्य नसेल तर केवढेंही मोठें क्षेत्र पोरकें भासतें. मूर्तीला माहात्म्य चढत नाहीं. ते सत्पुरुष हें क्षेत्राचे प्राण आहेत. — महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

## सौजन्याचे लाभ

विद्वत्त्वाचा व सौजन्याचा संबंध कसाहि असो, सौजन्यविरहित विद्वत्ता आत्म्याला शांति देत नाहीं; पण विद्वत्त्वरहित सौजन्य आत्म्याला शांति देऊं शकतें असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

— वा. म. जोशी : ( नीति-शास्त्र-प्रवेश )

## मत व माणूस

नारळाची कवची फोडून अगदीं आंतून खोबरें घ्यावें त्याप्रमाणें मनुष्याचें मत, चुकीचें वाटल्यास खोडून आंतला माणूस ग्रहण करतां आला पाहिजे. नदीचें वळण वाकडें असलें तरी ज्याप्रमाणें पाणी वाकडें असत नाहीं, किंवा भाकरी वाटोळी असली तरी तिची गोडी वाटोळी असत नाहीं, त्याप्रमाणें मनुष्याचें मत जरी कदाचित् दूषित असलें, तरी आंतला माणूस दूषित नसतो.

— विनोबा भावे : ( मधुकर )

## थोर पुरुष

अद्वैत अनुभवणारे महात्मे हीच मानवजातीची आशा आहे. मनुष्यजातीला किती उंच जातां येतें हें महापुरुष दाखवीत असतात. आकाशांत कोट्यवधि अंशांच्या उष्णतेनें सूर्य जळत असतो, तेव्हां आपल्या अंगांत ९८ अंश उष्णता असूं शकते. भगवान् बुद्धासारखे महात्मे वाघिणीवरही प्रेम करतात तेव्हां कोठें मनुष्य शेजारच्या माणसांवर थोडी दया करावयास सिद्ध होतो. समाज पुढें जावा, वर जावा, यासाठीं विश्वप्रेमी पुरुषांची नितांत आवश्यकता असते.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## विघ्नांचें भय कोणाला ?

लहानसा दिवा उगीच कोठें वाऱ्याची झुळूक आली कीं पटकन् मालवतो. रानांत पेटलेला अग्नि वावटळीनें अधिकच भडकतो. साधारण लोक आणि धैर्यशाली लोक यांच्यांत अंतर हेंच.

— हरिभाऊ आपटे : ( मी )

## थोरांचें कर्तृत्व

सूर्य मावळल्यावर त्याची संधिप्रभा जशी जगाला कांहीं काळ प्रकाशित करीत रहावी आणि त्याच्यापासून तेज उसनें घेतलेल्या ग्रहमालेनें जसें नंतर जग रात्रभर उजळावें; त्याप्रमाणें राष्ट्रजनकांचें कर्तृत्व हें भावी पिढ्यांना स्फूर्ति देत कालसमुद्राच्या भीषण लाटांवर चांदण्याप्रमाणें शेंकडों वर्षें तळपत राहतें.

— ग. त्र्यं. माडखोलकर : ( अभिनव भारताचा द्रष्टा )

## मनुष्यतेचें सुख

मनुष्यतेचें ऐहिक सुखसंवर्धन ह्या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणास न भितां आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हें त्यांस उचित आहे.

— प्रिं. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## संतपणास आवाहन

ज्यानें त्यानें सत्कर्म आचरलें पाहिजे, कर्तव्य केलें पाहिजे. संतांवर बोजा घालून कार्यभाग होत नसतो. प्रत्येकाच्या हृदयांतील संतत्व जागृत व्हावयाला हवें, कर्मांत प्रकट व्हायला हवें.

— साने गुरुजी : ( नवजीवन )

## महापुरुष

त्या त्या काळाला अनुरूप संदेश देणारे पुरुष त्या त्या काळांतील खळबळींतून जन्मत असतात. लाटेवर जसा फेंस त्याप्रमाणें त्या त्या काळांतील वैचारिक लाटेवरचा स्वच्छ फेंस म्हणजे महापुरुष होत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## समाजांतील विषमता

या जगांत जोंपर्यंत एकाचा स्वर्ग शंभरांना नरकांत ढकलीत आहे तोंपर्यंत नरकांत राहण्यांतच माणुसकी आहे...ज्या दिवशीं हा ( कृत्रिम ) स्वर्ग नाहींसा होईल त्याच दिवशीं जगांतला नरकहि नाहींसा होईल.

— वि. स. खांडेकर : ( स्वर्ग आणि नरक )

### ध्येय हाच देव

ध्येय हें असो नाहीं तर दुसरें एकादें असो, मोठेंव्यापक असो कीं लहानशा खेडेगांवची किंवा संस्थेची किंवा कुटुंबाची अथवा स्वतःची उन्नति करावयाची अशा प्रकारचें आकुंचित स्वरूपाचें असो, त्याच्यावर दृढ श्रद्धा असली म्हणजे तो सश्रद्ध, तो आस्तिक, तो धार्मिक असें माझें मत आहे.

— वा. म. जोशी : ( ध्येय हाच देव )

### ध्येयमय जीवन

मनुष्य एकाद्या ध्येयानें वेडा झाला म्हणजे तो निराळा होतो. त्या ध्येयाच्या प्रकाशांत त्याचे सर्व व्यवहार मग सुरू होतात. त्याच्या जीवनांत हेतुमयता येते. त्याच्या सर्व आचारविचारउच्चारांत एक प्रकारची सूत्रमयता येते. त्या ध्येय-सूर्याभोंवतीं साऱ्या अंतर्बाह्य क्रिया प्रदक्षिणा घालूं लागतात. — साने गुरुजी ( गोड शेवट )

### समाज-सुधारकाचे गुण

भाष्य लिहायला बुद्धिवैभव लागतें, स्तोत्रें रचायला भक्ति नसली आणि फक्त कल्पनेचा उल्हासच असला तरी चालतो; पण अत्यंत प्राचीन काळापासून चालत आलेली घातकी रूढि कडव्या समाजाच्या विरुद्ध जाऊन एकदम बंद करायला लावावयाची यासाठीं तपस्तेज, धर्म-निष्ठा आणि हृदयसिद्धीच लागते.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

* काळवंडलेलें आकाश पृथ्वीवरील दीपोत्सवानें कधीं उजाडतें का ? त्याला प्रकाशित करायला वीजच हवी.

— वि. स. खांडेकर

## सत्याचा दीप

बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर आनंदमय होऊन एका प्रकारें ज्याचें देहावसान सुटतें असा एखादा महात्माच आईबापांची, गणगोताची, धनद्रव्याची, जातीची, देशाची, किंबहुना समग्र मनुष्यतेची पर्वा न ठेवतां अंतरोत्थित अमर्याद प्रेरणा बलाच्या भरंशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तें तडीस नेतो!

— प्रि. गो. ग. आगरकर : (सुधारक)

## सत्य व शक्ति

लक्ष्मणा, माझ्या बाहूंतील शक्ति म्हणजे सत्याची शोभा होय.—मनुष्य मेल्यावर त्याच्या शरिरावरचे वस्त्रालंकार जसे टाकाऊ ठरतात त्याप्रमाणेंच सत्य सोडल्यावर शक्ति टाकाऊ ठरते. सत्य सोडून शक्तीचा नाद धरणें म्हणजे प्रेतावरील कपड्याकरितां टपून बसणें होय. प्रसंग आला तर अलंकार काढून ठेवावेत; पण प्राण देऊन आत्महत्या करूं नये.

— कृ. प्र. खाडिलकर ( : सवतीमत्सर )

## असत्याची घसरगुंडी

क्षुद्र स्वार्थासाठीं मनुष्य असत्याचा आश्रय करतो आणि हळूहळू घसरूं लागतो. एक असत्य पचवण्यासाठीं त्याला दुसरें असत्य उभारावें लागतें. तें लपवण्यासाठीं तिसरें आणि ही परंपरा कुठेंच थांबत नाहीं. आणि मग सगळेंच जीवन पापमय होतें. सत्याचा अवलंब केल्यानें क्षणभर नुकसान झाल्यासारखें वाटेल, पण परिणामीं तेंच लाभदायक ठरतें.

— महादेवशास्त्री जोशी

## समाजसेवेंतील कौशल्य

समाजसेवेंत फारच कुशलता लागते. ती एक प्रकारची कसरत आहे. आपलेंहि पतन होणार नाहीं आणि समाजहि निष्प्राण आणि परावलंबी बनणार नाहीं, हा आदर्श सांभाळूनच समाजसेवा करणें योग्य. नाहीं तर धर्म करतां अधर्माची भर व्हायची.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## दैवी संपत्ति

द्वेषाची लाट आली आहे; प्रेमाचा सिंधु घेऊन चला. संकुचितपणा येत आहे; विशालता घेऊन चला. क्षुद्रता घेरूं पहात आहे; उदारता घेऊन चला. अंधार येत आहे; प्रकाशाचे झोत आणा. घाण येत आहे; सुगंध पसरा. मरणाचा सुकाळ होत आहे; जीवनाची वृष्टि करा. बंधनें वेढूं पहात आहेत; तोडा तीं बंधनें. मुक्त करा म्हणजे मुक्त व्हाल.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## आनंदाचें बीज

आनंद हें एक मनाचें पौष्टिक अन्न आहे, आणि तो आनंद हस्तपादादिक बाह्य कर्मेंद्रियांवर अवलंबून नसून मन ह्या अंतरिंद्रियावरच सर्वस्वी अवलंबून असतो.

— शि. म. परांजपे : ( गोविंदाची गोष्ट )

## सुधारकाचें ध्येय

क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें. त्यांतच जगाचें हित आणि जन्माची सार्थकता आहे.

— प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## समतेची लाट

आतां अमक्याच्या पोटीं अमक्याचा जन्म झाला म्हणून तो श्रेष्ठ ही कल्पना आर्ष मानली जाणार व बुद्धिबलानें जो पुढें सरेल तोच श्रेष्ठ ठरेल, या जबरदस्त विचार-ओघाची गति अविचार-बांधानें थांबूं शकणारी नाहीं. नको नको म्हणतां हिचा तुमच्यावर परिणाम झाला आहे, होत आहे व पुढेंहि झाल्यावांचून राहणार नाहीं.

— प्रि. गो. ग आगरकर : ( सुधारक )

## समाजांतील विषमता

ईश्वराचीं लाखों लेंकरें अन्नान्नदशेंत असतांना त्या दगडाच्या देवाला अन्नकोट रुचतील का ? लाखों लेंकरांना पांघरायला नाहीं, देवाला पीतांबर रुचतील का ? तुमचे ते पीतांबर देवाला सापासारखे वाटतील. तुमचे ते मुकुट देवांना कांट्याप्रमाणें वाटतील. — साने गुरुजी : ( श्याम )

## जुलमाचा प्रतिकार

जुलूम, दांडगाई किंवा अरेरावी, गोऱ्यांनीं केली काय अगर काळ्यांनीं केली काय सारखीच गर्ह्य होय; आणि अशा प्रकारच्या जुलमाचा किंवा शिरजोरपणाचा जागच्या जागींच प्रतिकार करणें हें खऱ्या राष्ट्रभक्ताचें पहिलें कर्तव्य होय. —लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## हक्क व कर्तव्य

आसुरी संपत्ति म्हणते, " हक्काचें रक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे. " दैवी संपत्ति म्हणते, " कर्तव्य करीत राहणें हा माझा हक्क आहे. "

— विनोबा भावे : ( मधुकर )

## स्वार्थत्यागाचा महिमा

जेथें जोम व नेट आहे, जेथें जूट आहे आणि राष्ट्रांतील प्रत्येक स्त्रीपुरुष देशासाठीं परमावधीचा स्वार्थत्याग करण्यास तयार आहेत ‘ तत्र श्रीर्विजयो भूतिः ’ असें आमचेंच काय पण परमेश्वराचेंहि सांगणें आहे.

— लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## त्यागाचें फल

स्वच्छ होण्यासाठीं फाटावें लागतें, पवित्र होण्यासाठीं जळावें लागतें आणि अंकुरित होण्यासाठीं गाडून घ्यावें लागतें.

— वा. म. जोशी

## त्यागाचा अभ्यास

त्यागाचीहि संवय करावी लागते. तोहि एक अभ्यास आहे. चिंधीचा तुकडा का असेना, त्यांतहि आपली अपरंपार आसक्ति ओतलेली असते. मनाला कांहींहि न वाटतां हे अंगावरचे कपडेच काय, ते दागदागिनेच काय, परंतु हें शरीरहि वाटेल तेव्हां हंसत हंसत फेंकून देतां आलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( जीवनकलह, भाग २ )

## जगाची जाणीव

व्यवहारापुरती मनुष्यानें कितीहि संकुचित दृष्टि ठेवली तरी जगाचा आणि आपला किती जिव्हाळयाचा संबंध आहे ही गोष्ट त्यानें विसरून जातां कामा नये. कळत अगर नकळत आपण जगाशीं संबंध ठेवतों. कळत अगर नकळत आपणाला जग हवें आहे.

— अनंत काणेकर : ( जगाशीं संबंध )

## त्याग व दान

त्याग अगदीं मुळावर घावघालणारा आहे,दान वरून-वरून पालवी खुडण्यापैकीं आहे. त्याग पोटांत घेण्याची दवा आहे, दान कपाळावर फासण्याची सुंठ आहे. त्यागांत अन्यायाची चीड आहे, दानांत लौकिकाची भीड आहे. त्यागानें पापाचें मुद्दल फिटतें, दानानें पापाचें व्याज चुकतें. त्यागाचा स्वभाव दयाळू आहे, दानाचा स्वभाव मायाळू आहे. त्यागाची वस्ती धर्माच्या माथ्यावर आहे, दानाची वस्ती धर्माच्या पायथ्याशीं आहे.

विनोबा भावे : ( मधुकर )

## ज्ञान व याग

त्यागाशिवाय ज्ञान नाहीं. आसक्ताला ज्ञान कोठून असणार ? ज्ञान म्हणजे अद्वैताची अनुभूति. ही अद्वैताची अनुभूति जसजशी अधिकाअधिक जीवनांत येते,तसतसा अधिकाधिक त्याग होऊं लागतो.

– साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## उत्कर्षाचीं साधनें

ज्ञानवृद्धीसारखें आणि ज्ञानप्रसारासारखें मनुष्य-सुधारणेचें दुसरें प्रशस्त साधन नाहीं. हिंदुस्थान देशाला कधींकाळीं सुदशा प्राप्त झाली तर तीहि ह्याच साधना-मुळें होणार आहे. – प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

*पाप असें हळूंच न कळत शिरत असतें. एकच प्याला ! हा एकच प्याला फेंकून दिला पाहिजे. पहिलें चुकीचें पाऊल, तेंच पडूं न देण्याची दक्षता व सावधानता घेतली पाहिजे. – साने गुरुजी ( भारतीय संस्कृति )

## ज्ञान व कर्म

विचारवंत जर उन्हांत, मोकळ्या हवेंत, सृष्टीच्या सान्निध्यांत मेहनत करील तर त्याचे विचारहि तेजस्वी होतील. शारिरिक रोगाचा जसा मनावर परिणाम होतो त्याप्रमाणें शारीरिक आरोग्याचाहि परिणाम होतो ही अनुभवाची गोष्ट आहे. — विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

## ज्ञानाची जोपासना

" आम्ही शेतकरी लोक. आम्हीं बीं पेरलें, झाड लावलें तर तें मरूं देत नाहीं. तें पेरलेलें फुकट जाऊं नये, लावलेलें मरूं नये म्हणून आम्ही जपतों. तुम्ही आज आमच्या मनांत कांहीं विचार पेरलेत. त्याला पाणी घालायला कोणी येणार आहे का ? नाहीं तर नुसती पेरणी करून गेलात नि त्याची काळजी नाहीं घेतलीत तर तें पाप नाहीं का ? " त्या वृद्ध शेतकऱ्याचें म्हणणें किती यथार्थ, नाहीं ? — साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## ज्ञानोपासकांची आवश्यकता

भारतांत आज ज्ञानोपासना नाहीं. आपलें सारेंच जीवन उथळ झालें आहे. कोणतेंहि क्षेत्र घेऊन त्यांत जींवनेंच्या जीवनें देणारे लोक आज हवे आहेत.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

*चालू जगांत श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यास शक्तींपेक्षांहि ज्ञानाचें साहाय्य जास्त पाहिजे आहे. लोकांतील वाढतें ज्ञान अनेक संशोधकांना, पराक्रमी पुरुषांना, राजकारण-पटूंना जन्म देईल.

ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वींचा काळोख )

## इतिहासाचा संदेश

कांहीं झालें तरी सत्त्वच्युत होऊं नका, असें भारतीय इतिहास शेंकडों शतकांतून गर्जून सांगत आहे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## इतिहासाचे फायदे

इतिहास हा मनास उन्नति व प्रसन्नत्वही देणारा आहे. म्हणजे त्याच्या निरंतर वाचनानें चित्त शांत व स्थिर रहातें आणि थोर होतें.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## इतिहासाची निर्मिति

मी इतिहास घोकायला नाहीं जन्मलों; मी तो निर्माण करायला जन्मलों आहें.

— विनोबा भावे : ( जीवन-दृष्टि )

## आमचा इतिहास

गंगेच्या कांठीं, सरस्वतीच्या कांठीं, हिमालयाच्या शिखरावर, विंध्याचलाच्या गुहेंत, नर्मदेच्या पाण्यांत, कावेरीच्या लाटांत, रामेश्वराच्या सेतुबंधनांत, गंगोत्रीच्या पहाडांत, प्रतिष्ठान शहरांत, धारा नगरांत, काशी-विश्वेश्वराच्या पुरींत, लाहोरांत, अयोध्येंत, पाटलीपुत्रांत, नागपुरांत, पुण्यनगरींत, साताऱ्यांत, रायगडावर, विजय-नगरांत, जिंजीच्या किल्ल्यांत, तंजावरच्या शहरांत आणि तिरुमल नाइकाच्या राज्यांत आपल्या पूर्वजांच्या आनंदाचे डोह भरलेले होते.

— शि. म. परांजपे : ( आपलें सुख काय झालें ?

## इतिहासाचें स्वरूप ०

दुनियेंत प्रत्येक वस्तूला मरण आहे. फक्त एक मरत नाहीं भूतकाळ. भूतकाळ चिरंजीवी आहे. महासागराला ओहोटी लागते, चंद्राचा क्षय होतो, कुबेर निर्धन बनतो, पर्वत धुऊन जातात, साम्राज्यें स्मृतिपटावरूनहि पुसलीं जातात; पण भूतकाळाला क्षय नाहीं. भूतकाळ दिवसें-दिवस समृद्ध होत जातो पण तुम्ही त्याला राखून ठेवूं शकणार नाहीं. कारण तुम्ही वर्तमानकाळांत आहां. भूतकाळाचा वृक्ष तुमच्या अंगणांत लावावयाचा असेल तर तुमच्याजवळ अमाप स्मृतिजल असलें पाहिजे.

— आचार्य कालेलकर : ( हिमालयाचा प्रवास )

## इतिहासाची वाचा

जुन्या इमारती सद्‌गुणी स्त्रियांप्रमाणें भलत्याशीं कधीं बोलत नसतात. त्या जरी सर्व दगड, विटा आणि चुना यांनीं बनलेल्या असतात तरी त्यांना योग्य मनुष्य भेटला म्हणजे त्याच्यापाशीं त्या हजारों तोंडांनीं बोलूं लागतात आणि प्रत्येक दोन दगडांच्या सांध्यामध्यें जणुं काय एक एक जीभ त्यांना फुटते असा भास होतो.

— शि. म. परांजपे :

( जुन्या इमारतींचें नव्या राजांनीं काय करावें ? )

* भविष्यकाळ दूर असल्यामुळेंच आपल्याला सुंदर दिसतो ! तें सौंदर्य तैलचित्राचें असतें—दुरून साजऱ्या दिसणाऱ्या डोंगराचें असतें—मृगजळाचें असतें—कांचनमृगाचें असतें !

— वि. स. खांडेकर : ( पुढें-पुढें )

## सुधारकाचें धोरण

स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भितां, त्याच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून तर कधीं लाडीगोडी लावून अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नसून केवळ शृंखलांतर करतात.

— प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## समाज-सेवेची श्रद्धा

समाज-सेवा हा आमचा देव आणि अशा सेवेच्या उपयुक्ततेविषयीं खात्री ही आमची श्रद्धा. आमच्या हातून जें थोडे काहीं घडेल ती आमची देवापुढें ठेवण्याची भेट.

— धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ

ज्याच्या अंतःकरणांत सौंदर्य असेल त्याच्या दृष्टीत सुंदर वस्तु पडतात; ज्याच्या अंतःकरणांत संगीत असेल त्याला मधुर स्वर ऐकूं येतात; ज्याच्या अंतःकरणांत स्नेह असेल त्याला मित्र मिळतात; ज्याच्या अंतःकरणांत प्रेम असेल त्याला प्रेमिकांची जोड होते. माणसाच्या अंतरंगाचीं प्रतिबिंबेंच त्याच्या भोंवतालच्या वस्तूंत अन् व्यक्तींत पडत असतात. जग म्हणजे एक विलक्षण आरसेमहाल आहे !

— ना. सी. फडके : ( आरसेमहाल )

## सहकार्य

शब्द एकत्र येतात, सारस्वतें बनतात. फुलें एकत्र येतात, हार गुंफले जातात. सूर एकत्र येतात, दिव्य संगीत निर्माण होतें. शेंकडों हाडें एकत्र येतात, हा देह बनतो. या देहांत केवढें सहकार्य, किती प्रेम! पायाला कांटा बोंचला तर वरच्या डोळ्याला पाणी येतें! या लहानशा देहांत सारा वेदान्त भरलेला आहे. सारीं शास्त्रें ओतलेलीं आहेत; परंतु कोण पाहातो!

— साने गुरुजी

## वर्तमानकाळाचें महत्त्व

भूतकाळ मनुष्याला स्मृतीचा आनंद देतो; भविष्य-काळ त्याला स्वप्नाचा आनंद देतो; पण प्रत्यक्ष जीवनाचा आनंद जर त्याला कुणी देत असेल तर तो वर्तमान-काळच! ‘ One today is worth two tomorrows ’ या उक्तीचें मर्म हेंच आहे, नाहीं कां? उद्यां फुलणाऱ्या कळ्या कितीहि सुंदर असल्या तरी आज फुललेल्या फुलांचा सुवास त्याच्यापासून कसा मिळणार?

— वि. स. खांडेकर : ( पुढें-पुढें )

## एकतेचीं रूपें

विविधता हें वैभव आहे; परंतु त्या विविधतेच्या पाठीमागें एकता मात्र हवी. एका वृक्षाच्या फांद्या, एका नदीचे प्रवाह, एका सागरांतील लाटा, एका अंबरांतील तारे, एका सतारीतील बोल!

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## विचाराची महति

विचार हा तरवारीपेक्षां बलवान् आहे. राष्ट्रांत सर्वत्र विचारांचे वारे घों घों करूं लागले पाहिजेत. एक वेळ जेवा, परंतु विचारांचें जेवण आधीं मिळवा. शक्य तर *नवीन पुस्तकहि घ्यावें. मनुष्य शेवटीं भाकरीनें जगत* नसून विचारानें जगतो. विचारांची भाकर अधिक मोलवान्. तुम्हीं विचारांची भरपूर पौष्टिक भाकर मिळविल्याशिवाय लाखों लोकांना धान्याची भाकर तुम्हांला देतां येणार नाहीं.

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें, भाग १ )

## विचार व आचार

जगाचे विचार फार झपाट्यानें सुधारत आहेत, पण वागणूक मात्र तितक्याच झपाट्यानें बिघडत आहे.

— य. गो. जोशी : ( एक स्वभावचित्र )

## विचारांची प्रखरता

विचार नवजीवन देतो. ‘वान्हि तो पेटवावारे’ विचारांचा वन्हि पुन्हां प्रखरतेनें पेटविल्याशिवाय कश्मलें जळून जाणार नाहींत.

— साने गुरुजी ( भारतयि संस्कृति )

## साधुत्वाचा मार्ग

रंजल्यागांजलेल्यांनीं जग भरलं आहे. त्यांचे क्लेश कमी करणं हें केवळ पैशानंच साधतं असं नाहीं. पैसा नसला तरी कळकळ आणि सेवेची हौस असल्यावर लोकांच्या जीवनांत आनंद घालणं शक्य आहे.

— ना. धों. ताम्हनकर

## रूढीचीं बंधनें

रूढिपिशाच्चिके ! तूं कसल्या शृंखलांनीं या हिंदु समाजाला जखडून टाकलें आहेस? वरून धर्माचें पांघरूण घेऊन अधर्म हाच धर्म असें तूं अज्ञ हिंदु समाजाला भासवीत आहेस ! डोळे असून तूं त्याला आंधळे करून सोडलें आहेस ! हातापायांतील शृंखलांना हीं हस्तपाद-भूषणें म्हणून तो कवटाळीत आहे व हें पाहून आपल्या पराक्रमाचें कौतुक करीत तूं आनंद-सागरांत डुलत आहेस ! धिक्कार असो या तुझ्या कृतीला !

– धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## बदलत्या रूढी

समाज जेव्हां बदल करीत नाहीं तेव्हां तो फार मोठी चूक करीत असतो हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. जुन्या जीर्ण–शीर्ण रूढी आज कशा चालतील? लहानपणचा अंगरखा मोठेंपणीं मुलाला कसा येईल? अंगरखा तरी मोठा करा नाहीं तर मला तरी सदैव लहान ठेवा, असें त्या मुलाला म्हणावें लागेल. रूढीचे कपडे हे सदैव बदलत असावेत. उन्हाळ्यांतील कपडे थंडींत चालणार नाहींत हा नियम आहे. असा बदल न कराल तर थंडींत गारठून मराल व उन्हाळ्यांत उकडून मराल.

– साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## अपयशाची संवय

यश हा आयुष्यांतला अपघात आहे आणि अपयश हें माणसाचं जीवन आहे.

– य. गो. जोशी : ( सुरवात आणि शेवट )

### एकीचें फळ

लाखों लोकांनीं मनावर घेतलें तर जेथें समुद्राचे खळगे आहेत तेथें दुसरे पर्वत रचतील आणि जेथें पर्वतांचे उंचवटे आहेत तेथें समुद्राएवढाले खोल खळगे ते खणतील. जेथें जंगलें आहेत तेथें शहरें उभारतील आणि शहरांचीं जंगलें करून सोडतील. अशा समुदायांच्या अद्भुत सामर्थ्याला कोण भिणार नाहीं ? आणि अशा सामर्थ्यवंत समुदायाला संतुष्ट ठेवण्यासाठीं आपल्या हाडाचीं काडें कोण करणार नाहीं ?

— शि. म. परांजपे : ( एका खेडेगांवच्या मनुष्याचे विचार )

### एकाग्रतेचें फल

डोंगरावर पडलेलें पाणी जर बारा वाटे फांकून गेलें तर नदी होणार नाहीं; परंतु सारें एका दिशेनें वाहत जाईल तर धारेचा ओहोळ होईल, ओहोळाचा प्रवाह होईल, प्रवाहाची नदी होईल, नदीची गंगा होऊन ती समुद्राला मिळेल. संस्कारांचा पवित्र प्रवाह सतत जीवनांत वहात राहील तरच शेवटीं मरण महानंदाचें निधान वाटेल.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

### सामर्थ्यातून स्वातंत्र्याकडे

सामर्थ्यावांचून शौर्य नाहीं, शौर्यावांचून पराक्रम नाहीं, पराक्रमावांचून वैभव नाहीं आणि वैभवावांचून स्वातंत्र्य नाहीं.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वीचा काळोख )

* संसारांत रडण्याचं दुःख कधीं वाटत नाहीं; पण ऐन वेळीं अधिकारानं आसवं पुसायला कोणी नसतं म्हणून वाईट वाटतं. — रा. ग. गडकरी

## रूढीचीं बंधनें

रूढिपिशाचिके ! तूं कसल्या शृंखलांनीं या हिंदु समाजाला जखडून टाकलें आहेस ? वरून धर्माचें पांघरूण घेऊन अधर्म हाच धर्म असें तूं अज्ञ हिंदु समाजाला भासवीत आहेस ! डोळे असून तूं त्याला आंधळे करून सोडलें आहेस ! हातापायांतील शृंखलांना हीं हस्तपाद-भूषणें म्हणून तो कवटाळीत आहे व हें पाहून आपल्या पराक्रमाचें कौतुक करीत तूं आनंद-सागरांत डुलत आहेस ! धिक्कार असो या तुझ्या कृतीला !

— धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## बदलत्या रूढी

समाज जेव्हां बदल करीत नाहीं तेव्हां तो फार मोठी चूक करीत असतो हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. जुन्या जीर्ण–शीर्ण रूढी आज कशा चालतील ? लहानपणचा अंगरखा मोठेंपणीं मुलाला कसा येईल ? अंगरखा तरी मोठा करा नाहीं तर मला तरी सदैव लहान ठेवा, असें त्या मुलाला म्हणावें लागेल. रूढीचे कपडे हे सदैव बदलत असावेत. उन्हाळ्यांतील कपडे थंडींत चालणार नाहींत हा नियम आहे. असा बदल न कराल तर थंडींत गारठून मराल व उन्हाळ्यांत उकडून मराल.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## अपयशाची संवय

यश हा आयुष्यांतला अपघात आहे आणि अपयश हें माणसाचं जीवन आहे.

— य. गो. जोशी : ( सुरवात आणि शेवट )

### एकीचें फळ

लाखों लोकांनीं मनावर घेतलें तर जेथें समुद्राचे खळगे आहेत तेथें दुसरे पर्वत रचतील आणि जेथें पर्वतांचे उंचवटे आहेत तेथें समुद्राएवढाले खोल खळगे ते खणतील. जेथें जंगलें आहेत तेथें शहरें उभारतील आणि शहरांचीं जंगलें करून सोडतील. अशा समुदायांच्या अद्भुत सामर्थ्याला कोण भिणार नाहीं ? आणि अशा सामर्थ्यवंत समुदायाला संतुष्ट ठेवण्यासाठीं आपल्या हाडाचीं काडें कोण करणार नाहीं ?

— शि. म. परांजपे : ( एका खेडेगांवच्या मनुष्याचे विचार )

### एकाग्रतेचें फल

डोंगरावर पडलेलें पाणी जर बारा वाटे फांकून गेलें तर नदी होणार नाहीं; परंतु सारें एका दिशेनें वाहत जाईल तर धारेचा ओहोळ होईल, ओहोळाचा प्रवाह होईल, प्रवाहाची नदी होईल, नदीची गंगा होऊन ती समुद्राला मिळेल. संस्कारांचा पवित्र प्रवाह सतत जीवनांत वहात राहील तरच शेवटीं मरण महानंदाचें निधान वाटेल.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

### सामर्थ्यांतून स्वातंत्र्याकडे

सामर्थ्यावांचून शौर्य नाहीं, शौर्यावांचून पराक्रम नाहीं, पराक्रमावांचून वैभव नाहीं आणि वैभवावांचून स्वातंत्र्य नाहीं.

— ना. ह. आपटे : ( पहांटेपूर्वींचा काळोख )

* संसारांत रडण्याचं दुःख कधीं वाटत नाहीं; पण ऐन वेळीं अधिकारानं आसवं पुसायला कोणी नसतं म्हणून वाईट वाटतं. — रा. ग. गडकरी

## प्रेमाची जादू

प्रेमानें पाषाणांचीं फुलें होतात, तरवारीचे हार होतात, कांट्यांचे मुकुट होतात, मरणाचें जीवन होतें. प्रेम म्हणजे यंत्र. प्रेम म्हणजे जादू. प्रेम म्हणजे किमया.

— साने गुरुजी : ( तीन मुलें )

## प्रेमाचें लक्षण

ज्याच्यावर आपलं प्रेम असतं त्याच्या सुखानं आपण सुखी होतों; त्याच्यांत आपण स्वत्व जणूं विसरतों.

— साने गुरुजी : ( संध्या )

## प्रेमाची किल्ली

प्रेमामध्यें हृदय आणि बुद्धि दोहोंचे गुण आहेत. प्रेमाची किल्ली हातांत घेऊन जाऊं तर दुसऱ्याचीं हृदय-कपाटें खुलीं होतात.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## प्रेमाचे प्रकार

प्रेम हें जीवनाचें जीवन आहे. जें प्रेम स्थिर आहे, भरपूर आहे तें जीवनाच्या वृक्षाला पोसतें. वृक्षाच्या पाना-पानांत, फांद्याफांद्यांत, सर्व खोडांत आमूलाग्र जसा जीवन-रस भरलेला असतो तसें प्रेम पाहिजे. सोडावॉटरची बाटली ओतली कीं, फस्फस् पाणी बाहेर येते. असलें क्षणभर उतूं जाणारें परंतु दुसऱ्या क्षणीं न दिसणारें प्रेम जीवनाला टवटवी, सौंदर्य, उल्हास, उत्साह देऊं शकत नाहीं.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

* सृष्टीचें अंतिम स्वरूप प्रेम आहे, युद्ध नाहीं. सहकार्य आहे, द्वेष—मत्सर नाहीं.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## प्रेमाची पाणपोई

उदार बना. सारे जवळ या. एकमेकांना प्रेम द्या. माणुसकी जीवनांत आणा. सर्वांची मान उंच करा. कोणी दीन,—दरिद्री नको. कोणाच्याहि भावनांचा कोंडमारा नको.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## प्रेमाचें प्रगटीकरण

प्रेमाची सदैव आवश्यकता आहे. तें सदैव सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें प्रकट होत राहिलें पाहिजे. जें फूल सुगंध देत नाहीं, जी नदी ओलावा देत नाहीं, जी सतार संगीत स्रवत नाहीं त्यांचा काय उपयोग ? प्रेम सदैव देत असतें— देण्यासाठीं अधीर असतें.

— साने गुरुजी : ( जीवनकलह—भाग २ )

## प्रेमाचा झरा

माता ज्या बुद्धीनें मुलाचे लाड पुरविते ती बुद्धि त्याच्या अंतरात्म्याच्या अंतरात्म्याला जाऊन भिडते व तेथें प्रेमाचा झरा उत्पन्न करते. हा प्रेमाचा झरा विद्वत्तेच्या किंवा सदुपदेशाच्या कठोर कुदळीनें खणून किंवा मार-हाणीचे सुरुंग लावून अंतःकरणक्षेत्रांतून काढतां येत नाहीं.

वा. म. जोशी : ( नीतिशास्त्रप्रवेश )

## प्रेमाचीं रूपें

कुठें वासनेचा फाटका झगा घालून, कुठें भक्तीच्या पुष्पमाळा लेवून, कुठें लज्जेचीं वसनें नेसून, कुठें मुग्धतेचा बुरखा पांघरून, असें नाना रूपांनीं आणि नाना आकारांनीं प्रकट होऊन प्रेम आपलें अस्तित्व धन्य करून घेत असतें.

— गो. नी. दांडेकर : ( शितू )

## सहानुभूतीची आस

सहानुभूतीनें मीठभाकरीला अमृताची चव येतें. सहानुभूतीनें साधेंसें घर नंदनवनाहून आनंदमय होतें. सुकलेलें गवत चार पाण्याच्या थेंबांसाठीं, चार दवबिंदूंसाठीं हपापलेलें असतें, त्याप्रमाणें दारिद्र्यानें भग्न झालेला हा विराट् भारतीय संसार सहानुभूतीच्या स्पर्शासाठीं आसावलेला असतो.

— साने गुरुजी : ( श्याम-खंड ३ )

## सहानुभूतीचें स्वरूप

कुणाचं दुःख पाहिलं तर—पुरुष असो कीं स्त्री असो—अंतःकरण हें हाललंच पाहिजे. आणि तसं अंतःकरण हाललं कीं रडूं आल्यावांचून कसं राहील? रडूं येणं ही ईश्वरी वृत्ति आहे. आलेलं रडूं दाबून ठेवणं ही आसुरी वृत्ति आहे. — भा. वि. वरेरकर : ( गोदू गोखले )

## खरी सहानुभूति

वंचना करून मिळविलेल्या सहानुभूतीची किंमत भिक्षा मागून आणलेल्या अन्नापेक्षां जास्त नाहीं. संकटाला तोंड देऊन त्यांतून पार पडण्यानें लोकांच्या मनात आदर उत्पन्न होऊन त्यांची जी सहानुभूति मिळते तीच खरी सहानुभूति. केविलवाणी मुद्रा करून किंवा मुळूमुळू रडून सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न करणें हें निव्वळ बायकीपणाचें लक्षण आहे. — दत्तो आप्पाजी तुळजापूरकर : ( माझें रामायण )

* व्यक्तिगत प्रेमाला विश्वप्रेमाचीं फुलें लागलीं पाहिजेत. एका व्यक्तीवर प्रेम करून पुढें समाज, राष्ट्र, सारें जग यांवर प्रेम करायला आपण शिकलें पाहिजे.

साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## हृदयाची श्रीमंती

आपण पानांचें सोनें वांटतों ! या सोन्याचा का कधीं दुष्काळ पडेल ? पिवळें सोनें कमी होईल, परंतु हें हिरवें सोनें भरपूर आहे. हृदयाची श्रीमंती असेल तर सारें सोनेंच आहे. – साने गुरुजी : ( गोड शेवट )

## हृदयाची विशालता

मोठा प्रसंग असला म्हणजे मोठी दृष्टि येते. महान् आनंद वा महान् संकट–त्यावेळेस केवळ हिंदुस्थानचें एक हृदय होतें असें नाहीं तर सर्व मानवजातीचें हृदय एकच आहे असा अनुभव येतो. – साने गुरुजी : ( क्रांति )

## हृदयाची भाषा

जिभेच्या भाषा अनेक असल्या तरी हृदयाची भाषा सर्वत्र एकच असते. आणि ज्याची माणुसकी शाबूत आहे त्याला ती कळायला उशीर लागत नाहीं.

– महादेवशास्त्री जोशी : ( तीर्थरूप महाराष्ट्र )

## खरी भूतदया

ज्यांच्याजवळून कोणत्याहि प्रकारच्या लाभाची किंवा स्वार्थाची अपेक्षा नाहीं, अशांच्याविषयीं जर आपण आपलेपणा दाखविला, त्यांच्याविषयीं जर हृदयामध्यें अनुकंपा बाळगली तरच तिला भूतदया असें म्हणतां येईल. – आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## मानवांतील देव

आपण प्रेमानें एकमेकांस पाहतों, प्रणाम करतों तेव्हां आपण देवच जणूं असतों. आपल्या हृदयांत तेव्हां प्रभु असतो. आपण जणूं त्याचें मंदिर बनतों.

– साने गुरुजी : ( रामाचा शेला )

## हृदयाचें स्थान

आपला नुसता हात धरल्यामुळें आपलें हृदय ज्याप्रमाणें माझ्या हातीं लागल्यासारखें होत नाहीं, त्याप्रमाणें नुसतें माझे पाय धरल्यामुळें आपल्याला माझें मस्तकहि मिळायचें नाहीं. कारण हातापासून हृदय दोनच हात दूर असेल तर पायांपासून डोकें साडेतीन हात अंतरावर असतें !

— रा. ग. गडकरी : ( भावबंधन )

## मधुर जीवनाचा आधार

मधमाशांजवळ जपून वागूं तरच मध मिळतो, जर त्यांना दुखवूं तर आपणहि दुखवले जाऊं. मानवी संबंध गुण्यागोविंदाचे मधुर असे रहायला हवे असतील, तर प्रेमाचा पहिला शाश्वत कायदा सर्वांनीं पाळला पाहिजे.

— साने गुरुजी : ( नवजीवन )

## मनांचा सांधा

प्रेमाची शक्ति अपूर्व आहे. दोन दगड सिमिटानें, चुन्यानें जोडले जातात. पूर्वीं म्हणे चुन्यांत गूळ घालीत असत. त्या चुन्यानें इमारती भक्कम व्हायच्या, भिंती पडायच्या नाहींत. मानवी हृदयें जोडायला प्रेमासारखी अपूर्व वस्तु नाहीं. आपल्याजवळ प्रेमाचा तुटवडा नसो. बाकी कशाचा तुटवडा पडला तरी हा नको. प्रेम असेल तर सर्व कांहीं आहे; प्रेम नाहीं तर कांहीं नाहीं.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## निर्भयता हाच देव

निर्भयता हें देवाचें स्वरूप आहे. राम असत्यासमोर, अन्यायासमोर ठाणमाण मांडून उभा आहे. तुम्ही सत्याचे, प्रेमाचे उपासक बना, म्हणजे असत्यासमोर छातीठोकपणें उभें राहतां येईल. — साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें )

### सुखदु खांचा सहवास

या जगांत सारेंच नश्वर आहे. येथें व्यक्ति येतात आणि जातात त्याप्रमाणेंच सुखदु:खेंहीं उत्पन्न होतात आणि अंत:करणाला कमीअधिक पीळ पाडून नाहींशीं होतात. नदीच्या पाण्यांत सांपडलेली गवताची काडी पात्रांतील एखाद्या भोंवऱ्याखालीं कांहीं वेळ गिरक्या घेते, त्यांतून निसटते, पुन्हां दुसऱ्या भोंवऱ्यांत सांपडते आणि थोड्या वेळानें पुन्हां त्यांतून सुटून पुढें जाते. तद्वतच या सृष्टीच्या ओघांत पडलेल्या जीवात्म्यांचें आहे. सुख-दु:खांच्या भोंवऱ्यांभोंवतीं कांहीं काळ घुटमळणें आणि पुन्हां भवनदीच्या ओघाबरोबर पुढें जाणें हाच त्याचा क्रम आहे. — ना. सी. फडके : ( कुलाब्याची दांडी )

### दु:खासाठीं ढाल

सुखाच्या वसंतऋतूंत माणसाला वेदान्ताची आठवण होत नाहीं; दु:खाच्या शिशिरऋतूंत तेवढे वेदान्तविचाराचे गरम कपडे अंगावर चढवावेसे त्याला वाटतात. संसारांतील सुखांचा मनसोक्त उपभोग घ्यावयास माणूस उत्सुक असतो, आणि दु:खाचा ताप कमी करण्याचें साधन म्हणून केवळ तो वेदान्त वापरतो.

— ना. सी फडके : ( संसार )

### उदात्त विचार

कोठून तरी उंचून पाणी आल्याशिवाय कारंजें उडत नाहीं. त्याप्रमाणें हृदयाचें कारंजेंहि उच्च भावनांचें, उदात्त विचारांचें पाणी जोरानें आलें तरच उडतें.

— साने गुरुजी : ( रामाचा शेला )

**मनाचें स्वरूप**

मन वांकवितां येणें हें शिव-धनुष्य वांकविण्यापेक्षांही कठीण काम आहे. — वा. म. जोशी

**मनाचें स्वरूप**

माणसाचें मन हा एक गोलघुमट आहे. विजापूरच्या गोलघुमटापेक्षांहि त्याची रचना अधिक आश्चर्यकारक आहे. त्या गोलघुमटांत माणसाचा आवाज अनंतपटींनीं मोठा होऊन येतो; पण या गोलघुमटांत तो अनंत काळपर्यंत राहतो. — वि. स. खांडेकर

**मनाचे रंग**

इंद्रधनुष्यांतले सात रंग ओळखणं फार सोपं आहे. पण माणसाच्या मनांतले रंग? छे: ! भलभलते रंग मिसळून दर वेळेला त्यांच्या कांहीं निराळ्याच छटा तिथं दिसायला लागतात. दया आणि दुष्टपणा; प्रेम नि मत्सर; उदारपणा आणि क्षुद्रपणा—माणसाच्या मनांत कसलं मिश्रण होईल याचा नेम नाहीं. मनुष्याच्या अंतःकरणांत सात रंग नसतात; सातशें रंग असतात.

— वि. स. खांडेकर : ( रिकामा देव्हारा )

**विश्व-विजयाचें शस्त्र**

मनावर विजय मिळविणें याहून थोर विजय कोणता? मनोजयी होईल तोच विश्वजयी होईल. जगाची ज्याला सेवा करावयाची आहे त्यानें स्वतःला जिंकलें पाहिजे. स्वतःचा स्वार्थ, स्वतःच्या सुखेच्छा, क्षुद्र मानापमानाच्या कल्पना, अहंकार या सर्वांना त्यानें जिंकून घेतलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( गोड शेवट )

## मनाची तेजस्विता

तेजस्वी पुरुष हालअपेष्टा सोशील, प्रतिकूल परिस्थितीशीं झगडेल, झुंजेल; वेळ पडल्यास सर्वस्वाचें बलिदानहि करील, पण आपलें स्वत्व गमावणार नाहीं.

— महादेवशास्त्री जोशी : ( कविभूषण )

## मानवी मन

मानवी अंतःकरणांचा समुच्चय हा एकाद्या जलाशया-सारखा आहे. त्याच्या एका भागांत जे तरंग उठतील त्यांची प्रतिक्रिया घडून इतर भागांतही ते उठलेच पाहिजेत.

— ना. सी. फडके : ( गुजगोष्टी )

## मनाचा विशालपणा

विचारानें क्षुद्रबुद्धि निरस्त होऊन मन विस्तृत झालें आणि 'वसुधैव कुटुंबकम्' अशी वृत्ति त्यांत उत्पन्न झाली म्हणजे जो आनंद होतो तो कांहीं अनिर्वाच्य असतो. प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## चंचल मन

माणसाच्या मनाहून वारासुद्धां बरा ! त्याला मुरलींत कोंडलें कीं मंजूळ सुर निघूं लागतात. 'चंचल, चंचल' म्हणून ज्याला हिणवितात तो पारासुद्धां माणसाच्या मना-पेक्षां निश्चल असतो. थर्मामिटरमध्यें कोंडून घातल्यावर बिचारा मुकाट्यानें तापकऱ्यांच्या वेदना डॉक्टरांच्या कानांत सांगण्याचें काम करूं लागतो; पण माणसाचें मन—त्याला कोंडतां येत नाहीं, बांधतां येत नाहीं.

— वि. स. खांडेकर :( पहिलें प्रेम )

## सर्वगामी मन

मनुष्य आपलें लहानसें जीवन भावना नि विचार यांच्या शक्तीनें विश्वात्मक करूं शकतो. मनुष्य कुठेंहि असो, तो आपलें मन तिन्ही काळांत नेऊं शकतो.

साने गुरुजी : ( सुंदर पत्रें, भाग २ रा )

## मानवाचे विकार

देवीनें पुराणकाळीं दैत्य निर्दाळले खरे, पण ते आतां लिंगदेहानें माणसाच्या हृदयांत शिरून बसले. जनांत होते ते मनांत आले. तो मोहाचा महिषासुर, ते काम-क्रोधांचे शुंभ-निशुंभ, तो अहंकाराचा मुंजा, तो दंभाचा झोटिंग, त्यांचा पुरता निकाल लावायचा तर अंबा पुन्हां प्रगटली पाहिजे—तुळजापुरांत नव्हे, तर प्रत्येकाच्या हृदयपुरांत. — महादेवशास्त्री जोशी : ( तुळजाभवानी )

## दुःखांतील हंसूं

त्या दुःखाच्या आणि यातनांच्या भयप्रद भुयारांतहि मनुष्य हंसल्यावांचून राहत नसे. किंबहुना भयप्रद भुयारांतील दुःखाचें हंसूच सर्व हंसण्यांत विकट असतें. दुःखाचा भार असह्य झाला किंवा निगरगट्टपणाच्या खांद्यावर तो अलगत फेंकून देतां येऊं लागला कीं दुःखदेखील हंसू लागतें. आनंद अमर्याद झाला म्हणजे जसा रडतो, तसाच शोकही हंसत असतो.

— वि. दा. सावरकर : ( माझी जन्मठेप )

* उमर फत्तराला असते फुलाला नसते !

— रा. ग. गडकरी : ( राजसंन्यास )

१६८४४

## मरणाचा अर्थ

मातीनें पान व्हावें, पानानें फूल व्हावें, फुलानें फळ व्हावें, फळांतून पांखरूं निघावें, पांखरानें काजवा व्हावें, लहान काजव्यानें चांदणी व्हायचें, चांदणीचें चंद्र व्हावयाचें, चंद्रानें सूर्य व्हावयाचें त्यालाच मरण म्हणतात.

— कृ. प्र. खाडिलकर : ( सत्त्वपरीक्षा )

## मृत्यु

मरण म्हणजे मेवा. जीवनाला मरणाचें फळ येतें व मरणाला जीवनाचे कोंब फुटतात. मला तर मृत्यु म्हणजे देवाकडे जाण्याचें द्वार वाटतें. एकाद्या मोठ्या राजवाड्याला अनेक प्रवेशद्वारें असतात त्याप्रमाणें मृत्यूचीं अनंत प्रवेश-द्वारें ओलांडीत ओलांडीत सिंहासनावर बसलेल्या त्या राजराजेश्वराचें दर्शन घ्यावें लागतें.

— साने गुरुजी : ( श्याम )

## मृत्यूंतील जीवन

मरतां-मरतांच नव्या परिस्थितीचे नवे ताजे कोश धारण करून मी जगत आहें, याचा प्रत्यय मला पुनः पुन्हां येत असतांना त्या विनाशाचं दुःख मीं काय म्हणून करावं ? होय, मी मनाशीं अशीच समजूत धरली पाहिजे कीं, अंशतः मेल्यावांचून जगतां येत नाहीं. जें लयाला जात आहे त्याला कवटाळून अश्रु गाळण्यापेक्षां जें उदयाला येत आहे त्याचं माणसानं स्वागत केलं पाहिजे ना ? राष्ट्राचा नव्हे, तर व्यक्तींचा जिवंतपणादेखील यावरच अवलंबून आहे.

— ना. सी. फडके : ( नव्या इमारती )

## मरणाचें महत्त्व

मरण म्हणजे जीवनाच्या व्यापारांतील नफा-तोटा पहाण्याचा क्षण. साठ-सत्तर वर्षें दुकान चालवलें. त्याचा आढावा घेण्याची वेळ म्हणजे मरण. त्या नफ्यातोट्याच्या अनुभवानें शहाणे होऊन आपण पुन्हां दुकान थाटतों. आईची अनुज्ञा घेऊन पुन्हां व्यापार करावयास आरंभ करतों.

— साने गुरुजी : ( भारतीय संस्कृति )

## मृत्यूचें मरण

मरणाला शरण न जातां जरी मरण आलें तरी तें मरण नव्हे. तें जीवनच होय. मरण तेव्हांच मारतें, जेव्हां तें मला रडवतें, मला विवश करतें, मला दुबळें करतें. ज्या मरणाला मी हंसत मिठी मारली त्या मरणानें मला न मारतां तें मरणच मीं मारिलें असा स्वच्छ अर्थ आहे !

— साने गुरुजी : ( धडपडणारीं मुलें, भाग २ )

## संघर्षाचा हेतु

संघर्ष तरी कशासाठीं? जीवनाची बाग फुलावी म्हणूनच ना ? विषमता, दारिद्र्य, अन्याय, द्वेषमत्सर जावे म्हणूनच ना ? हे संघर्षहि उच्च पातळीवरून चालवले म्हणजे झालें. जनतेला सुसंवादी तत्त्वज्ञान देणें, नव-उदार श्रद्धा देणें अशी आपली निष्ठा असली म्हणजे पुरे.

— साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

* अत्यंत परिश्रम केल्याशिवाय ज्याप्रमाणें बाह्य कार्य होत नाहीं, त्याप्रमाणें प्रेरणाशक्तीदेखील परिश्रमाशिवाय तीक्ष्ण होत नाहीं.

— आचार्य कालेलकर : ( जीवन आणि समाज )

## साहित्य म्हणजे प्रतिप्राण

देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देऊनसुद्धां मला जितका धक्का बसला नसता तितका सरकारनें माझा प्रतिप्राण असणारें दहा वर्षांतलें वाङ्मय जप्त करून दिला. हाच माझा तरुणपणचा जीवंत मृत्यु होय.

– शि. म. परांजपे

## लेखनाची कला

वाक्यरचना सरळ असावी, अर्थ चांगला खुलासेवार मजेदार रीतीनें लिहिलेला असावा—असा कीं, तो सहज मनांत भरून वाचण्याची सारखी हौसच वाटत जावी आणि एकंदर लिहिण्यांत आवेश किंवा झोकदारपणा असावा.

– विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## कवींचें ऐश्वर्य

राजाधिराजांचें जसें ऐश्वर्य दृष्टीस पडतें, कीं चंदनाचा महाल तर जिकडे तिकडे चंदनच, बिलोरी महाल तर येथून तेथून बिलोरच, संगमरवरी दगड तर चोहोंकडे तोच, त्याप्रमाणें लघ्वक्षर रामायण म्हटलें कीं सारी एक-मात्रक अक्षरांचींच गर्दी; निरोष्ठ रामायण म्हटलें कीं खुशाल विडा खाऊन वाचावें; दाम रामायणांत पाहावें तों आर्यार्धाचे शेवटले वर्ण व पुढच्याचे आद्य वर्ण शेवट-पर्यंत सारखे गुंफलेले; याप्रमाणें ह्या त्या तऱ्हेवर ज्या नाट्याचार्यानें वाग्देवीस नर्तकीप्रमाणें नाचवावी, त्याचे काव्यचातुर्य काय वर्णावें ?

– विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## कला, सत्य व नीति

जीवनांत कला नसेल तर तें बेचव, नीरस, कलाहीन होईल हें खरें, पण सत्य नसेल तर तें लुळें, आंधळें, पांगळें होईल आणि नीति नसेल तर तें रोगट, कुजकें, नासकें होईल. — वा. म. जोशी

## कवितेची मोहिनी

गीर्वाण वाणीच्या सुवर्णसूत्रांनीं जागोजाग विणून काढलेलें व अनुप्रासानें स्थलविशेषीं विचित्रित केलेलें असें उज्ज्वल वस्त्र परिधान केलेली अभिनव कविता जनमनःप्रांगणीं जेव्हां नटीप्रमाणें अवतीर्ण झाली असेल; तेव्हां तिचा अलंकारांचा थाटमाट पाहून व चरणांत रुणझुणणाऱ्या यमकरूप पैंजणांचा कर्णमनोहर नाद ऐकून जोशीबुवांसारखी मंडळी तल्लीन होऊन गेली यांत काय आश्चर्य ? — विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## कारंजांचे फवारे

ह्या सबंध बागभर कारंज्यांचे ताटवे नुसते फुलून राहिलेले आहेत. कारंज्यांचीं बनें नाचत उभीं राहिलीं आहेत. कारंज्यांच्या कुंडांत पाण्याचीं फुलें फुललेलीं आहेत. कारंज्यांचे फवारे उंच जाऊन आपले पिसारे वाऱ्यावर डोलवीत आहेत. कारंज्यांच्या फवाऱ्यांतून झुलत्या कमानी निर्माण झाल्या आहेत. तरळते घुमट बांधले गेले आहेत आणि पाण्याचे छोटे छोटे प्रवाह ठिकठिकाणीं वहात आहेत.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## निसर्गाचा प्रश्न

वज्रकाय पाषाणांना भेदून पाणी निघून जातें तेव्हां आश्चर्यचकित झालेल्या मनापुढें असा प्रश्न उभा राहातो कीं, या दोघांमध्यें अधिक समर्थ कोण? धीरोदात्त पर्वत आणि त्याची प्राचीन पत्थराची अभेद्य भिंत कीं एका क्षणाचाहि विचार केल्याशिवाय आपले बलिदान देण्यास तयार झालेलें हे चंचल नीर?

– आचार्य कालेलकर : ( गुच्छुपाणी )

## सृष्टिदेवीचा प्रासाद

बंगल्याच्या चार भिंती निसर्गापासून दुरावलेल्या मानवासाठीं आहेत. येथें तर सृष्टीचा विशाल प्रासाद, चार दिशा ह्या त्या प्रासादाच्या चार भिंती आणि आकाश हाच त्याचा घुमट. रात्र होण्यापूर्वीं चंद्र-तारकांचे छत घुमटांत नियमानें ताणण्यांत येतें. हवा बिघडल्यानें हे छत मलीन होऊं नये म्हणून केव्हां केव्हां त्याला ढगांची गवसणीहि घातली जाते. आचार्य कालेलकर : ( गुच्छुपाणी )

## मुसुंबीचीं फळें

मुसुंब्यांच्या झाडांवर फळें तयार झालीं होतीं. अल्लाउद्दीन जेव्हां राक्षसाच्या गुहेंत शिरला तेव्हां त्याला जशीं रत्नांचीं झाडें दिसलीं त्याप्रमाणें मळ्यांत शिरल्याबरोबर झाडांच्या आंखलेल्या रांगांवर दुतर्फा पिवळीं, तांबडीं व गहिरीं अशीं मुसुंब्यांचीं घट्ट व कठीण फळें दिसलीं. फळांनीं गजबजलेलीं तीं झाडें पेटवलेल्या रत्नांच्या झुंबरांप्रमाणें दिसत होतीं.

– र. वा. दिघे

## कोंडलेलें पाणी

सारा शांतपणा किती फसवा होता. आपल्या वजनानें धरणाच्या भिंतीवर रेटून पाणी ती लोटून टाकूं पहात होतें. प्रवाहाच्या जोरानें आणि लाटांच्या हबक्यानें तें ती काळीं भिंत झिजवूं पहात होतें. जमिनींतून खालीं झिरपून त्याचा पाया उखडूं पहात होतें — त्यांत कुठें भेग सांपडते का तें सारखें चांचपून, शोधून पहात होतें. पुढें समुद्राकडे जाण्याची त्याची कोंडलेली प्रवृत्ति त्याला स्वस्थ बसूं देत नव्हती.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## भग्न भिंत

मानवाला वाटतें, पर्वतांचें हृदय भेदून जाणाऱ्या पाण्याला आपण दोन भिंतींच्या द्वारा अडवून धरूं शकूं ! माझा भाव समजतांक्षणींच तो विजयी धबधबाहि म्हणूं लागला, " आणि मीदेखील त्यामुळेंच हंसत आहें." पर्वताचें भग्न हृदय दुभंगलेलें होतें तरी भव्य दिसत होतें; परंतु मनुष्यनिर्मित ही भग्न भिंत त्यांच्या मनोरथासारखीच हास्यास्पद व तिरस्करणीय भासत होती. एकाद्या उद्दाम माणसाच्या तोंडांत बसली असतां त्याचे बाजूला झालेलें तोंड जसें दयनीय दिसतें तशा दिसणाऱ्या ह्या भिंती फार वेळ पाहण्याची इच्छाहि होत नव्हती. एकाद्याची फजिती बराच वेळ पाहात राहणें बरेंहि नव्हे.

— आचार्य कालेलकर : ( गुच्छुपाणी )

* भूतकाळच्या यमुनेवर भविष्यकाळचा ताजमहाल उभा असतो.

— साने गुरुजी

## सोंडेच्या आकाराचा झोत

एक झोत आपला हत्तीच्या सोंडेसारखा सरळ खालच्या डोहांत कोसळत होता आणि त्याचा पृष्ठभाग फोडून त्याच्या पोटांत लुप्त होत होता. आणि असें वाटत होतें कीं, भूमीचा भेद करून पाताळांत पोहोंचल्याशिवाय त्याची तृप्त होणें शक्य नव्हतें. धाराधारांचा, रेषारेषांचा बनलेला कापुसलेला आणि एकाद्या खांबासारखा बांधीव, किंचित् फुटणारा आणि तुषारांना टिचक्या मारणारा असा तो ओघ होता. पाठीमागच्या कड्यापासून तो अलग झालेला होता आणि तरी त्याला भिजवीत होता. डोहांत बुडतांना तो उमलणाऱ्या फेसाची झालर त्यावर पसरीत होता, आणि तुषारांचें विरणारें धुकें, पायानें धूळ उडावी, तसें उडवीत होता. — गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## कोसळणारा झोत

दुसरा एक ओघ फुगीर, खडबडीत टेपाडावरून पसरत, घसरत, फाटत येत होता. एकाद्या फाटक्या पारदर्शक वस्त्रासारखा त्या टेपाडावर पसरला होता आणि खालच्या डोहांत सावकाशपणें वळसा घेऊन पडत होता. दुसरे दोन ओघ त्याच उतरत्या कड्यावरून त्याला चिकटूनच खालीं कोसळत होते, मध्येंच एकाद्या दगडावर आपटून उड्या घेत होते, खडकाच्या पोकळींत थबकत होते, एकाद्या कपारीच्या टोंकावर फाटत होते. निरनिराळ्या धारांनीं खालीं पडत होते आणि पुन्हां एकाद्या उताराच्या ओंजळींत त्या धारा एकत्र येऊन पाण्यांत पडतांना पुन्हां फाटत होत्या.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## डोहांत विसावणारें जल

थोड्या वेळानें मी बसलों होतों तेथून उठलों आणि पुढें सरकून त्या कड्यावर झोपून, खालच्या डोहाकडे डोकावून पाहूं लागलों. खालीं डोहांत हिरवें स्वच्छ पाणी तुडुंब भरून डुंबत होतें —आपली सारी तृप्ती त्या फुटक्या पण कधीं रित्या न होणाऱ्या डोहांत सांठवून ठेवत होतें. आणि अंमळ विसांवल्यावर, अंमळ डुंबल्यावर फेसाळत, खेळत बागडत आपल्या खडकाळ पात्रांतून पुढें जात होतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## उजळलेले फवारे

धीरे धीरे होडी चालूं लागली. समोर दिव्यांची यक्ष-सृष्टि आणि तिचें पाण्यांतलें पुसट हलतें प्रतिबिंब ! आणि मध्यें फ्लडलाईटनें उजवलेल्या कारंज्याचा सर्वांत उंच फवारा. तो आपला तेजाळ पिसारा हवेंत डोलवीत होता आणि त्याचा कोसळत्या तुषाराचा उंच पडदा तयार झाला होता. त्या पडद्याला भेदून आमची होडी पलिकडे गेली आणि तुषारांचा शिडकाव आमच्या अंगावर झाला.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## तळ्यांतलें प्रतिबिंब

मळ्याखालीं तो शांत डोह पुसून ठेवलेल्या बिलोरी आरशाप्रमाणें दिसे आणि त्यांत आजूबाजूचा नदीकांठ याचें प्रतिबिंब पडे. तें जलवर्णाच्या चित्राप्रमाणें दिसे.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

* हृदयांतील प्रेमाच्या गुलाबदाणींतील पाणी प्रत्येक कर्मावर शिंपडीत जा. — साने गुरुजी : ( गीतारहस्य )

## माडाचे शेंडे

एकाद्या माडाला अमळ कमरेंत पोंक असतें. एकादा तर साफ झोंपून एकदम कुठेंतरी आपलें डोकें वर काढतो. पण सगळ्यांचीं किडकिडीत काळीं खोडें सरळसोटपणें वर गेलेलीं असतात—सूर्यकिरणांचा शोध करीत आणखी वर जात असतात. ह्या माडांच्या नव्या हिरव्या झाव-ळ्यांची ओंजळ नेहमीं आकाशाकडे वळलेली असते. सूर्यकिरणांचा वर्षाव आपल्या संपुटीत झलीत असते.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## वनस्पतींची दिवाळी

वसंताच्या वैभवाची खरी कल्पना इथं आल्यावरच मला आली. या ऋतुसारखा बडा जादुगार अलम् दुनियेंत मिळणार नाहीं ! सध्यां इथले सारे बागबगीचे, घरांतल्या कुंड्या, टयुलीप, डॅफोडिल, गुलाब, चेरीब्लॉसम वगैरे फुलांनीं बहरुन गेल्या आहेत. पुष्पसृष्टि जणुं आपली दिवाळीं साजरी करीत आहे. प्रकाश किती निर्मळ—जसं कांहीं बालकाचं निरागस हास्यच ! सारं वातावरण मोठं प्रसन्न आहे.

— डॉ सुमति क्षेत्रमाडे : ( हें चित्र आणि तें चित्र )

## कमळाच्या कळ्या

जगन्नाथ उन्हांतून पद्मालयाला गेला. त्याचें तोंड लाल झालें. पद्मालयाला कोणी नव्हतें. समोरचें तळें शांत होतें. लाल कमळें फुललेलीं होतीं. त्यांचे मुके कळे पाण्यावर येऊन हात जोडून सूर्यनारायणाला प्रार्थीत होते.

— साने गुरुजी : ( गोड शेवट )

## फुलांचा मेळावा

फुलांची विखुरलेली शोभा आम्हीं बागेंत सर्वत्र पाहिली. पण जेव्हां आम्ही तेथल्या फुलांच्या जोपासना—गृहांत ( Nursery ) गेलों, तेव्हां अनेक रंगांचें भांडारच आमच्या नजरेसमोर खुलें झालें. बावरून फडफडणारीं असंख्य फुलपांखरें एकत्र कोंडलीं आहेत असें वाटत होतें. बालकांचीं निर्व्याज हास्यें, प्रीतीच्या लाजऱ्या छटा तेथें पुष्परूपानें गोठल्या होत्या. इंद्रधनुष्यानें लाजावें अशीं रंगांचीं मनोहर मिश्रणें तेथें झालीं होतीं. चौफेर उधळलेलें तें सौंदर्य पाहून माझें भान हरपलें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## अंधारांतील सुगंध

गडद वाढूं लागलं. रात्रीच्या अंधारांत मुसंबीचीं फुलें झाडांच्यावर तारकांच्या जाळीप्रमाणें दिसत होतीं. मधु-बन मोहरानें फुललें होतें. फुलांच्या सुगंधानें काळाकाळा अंधार कस्तुरी वाळत घातल्याप्रमाणें जिकडे तिकडे पसरल्यासारखा दिसत होता व मधून मधून वायूच्या लहरी आल्या म्हणजे वाऱ्यानें कस्तुरी उडत आहे असें वाटे.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

*मोठमोठे वृक्ष क्षणांत उगवत नाहींत. क्षणांत उगवणारीं झाडें क्षणांत मरतात. भराभरा जन्मणारे जीवजंतु मरतातहि भराभरा. मोठीं ध्येयें, मोठे विचार वाढीस लागायला वेळच लागणार. सृष्टीचा हा नियमच आहे. तो लक्षांत ठेवून धीरानें वागलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## सुगंधाची लयलूट

एकदां सुरवात झाली कीं बारमहा सुगंधाची खैरात चालते व दररोज निरनिराळ्या प्रकारच्या सुवासांचा अनुभव मिळतो. असे निरनिराळे सुवास सुटूं लागले कीं, निसर्गानें कानपुरी अत्तरवाल्याचें सोंग घेतलें आहे व तो शेमल्यांत खोंवलेल्या निरनिराळ्या अत्तरांचे फाये काढून गिऱ्हाइकांना पटवीत आहे असें वाटूं लागतें. आंबेबार, मृगबार व हत्तीबार या मोसमांत संत्रीं-मोसंब्यांच्या बागा चढाओढीनें एकमेकांवर ताण करीत फुलूं लागल्या कीं, सजलपूरच्या अंतराळांत सुगंधाचा दर्या उसळतो आणि तशांत या फळझाडांच्या सुवासाबरोबर जाई, जुई, नेवाळी, कुंद, मोगरा, गुलाब किंवा शेवंती यांचें सुवास वाऱ्याच्या झुळकीबरोबर रात्रीच्या प्रशांत समयीं अंतराअंतरानें येऊं लागलें कीं सुगंधाची अखंड रागदारी चालली आहे. असें वाटतें.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## सुवासाचा वणवा

सराईतील संध्यारंगांनीं आकाश भरलें. सप्तरंगांचे सप्तसमुद्र काडदरीवरील निळ्या आकाशांतील विखुरलेल्या ढगांवर भरती आल्याप्रमाणें पसरले. आतां कारवीच्या वासानें रान पेटलें. त्या सुवासाच्या वणव्यांतून सयाजीचा मुलगा मुकुट आडवीकडून पांवा वाजवीत गुरें घेऊन आला. पांव्याच्या मंजुळ आवाजानें दरी भरली.

— र. वा. दिघे : ( सराई )

## फुलांचा मेळावा

फुलांची विखुरलेली शोभा आम्हीं बागेंत सर्वत्र पाहिली. पण जेव्हां आम्ही तेथल्या फुलांच्या जोपासना–गृहांत ( Nursery ) गेलों, तेव्हां अनेक रंगांचें भांडारच आमच्या नजरेसमोर खुलें झालें. बावरून फडफडणारीं असंख्य फुलपांखरें एकत्र कोंडलीं आहेत असें वाटत होतें. बालकांचीं निर्व्याज हास्यें, प्रीतीच्या लाजऱ्या छटा तेथें पुष्परूपानें गोठल्या होत्या. इंद्रधनुष्यानें लाजावें अशीं रंगांचीं मनोहर मिश्रणें तेथें झालीं होतीं. चौफेर उधळलेलें तें सौंदर्य पाहून माझें भान हरपलें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## अंधारांतील सुगंध

गडद वाढूं लागलं. रात्रीच्या अंधारांत मुसंबीचीं फुलें झाडांच्यावर तारकांच्या जाळीप्रमाणें दिसत होतीं. मधु-बन मोहरानें फुललें होतें. फुलांच्या सुगंधानें काळाकाळा अंधार कस्तुरी वाळत घातल्याप्रमाणें जिकडे तिकडे पसरल्यासारखा दिसत होता व मधून मधून वायूच्या लहरी आल्या म्हणजे वाऱ्यानें कस्तुरी उडत आहे असें वाटे.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

*मोठमोठे वृक्ष क्षणांत उगवत नाहींत. क्षणांत उगवणारीं झाडें क्षणांत मरतात. भराभरा जन्मणारे जीवजंतु मरतातहि भराभरा. मोठीं ध्येयें, मोठे विचार वाढीस लागायला वेळच लागणार. सृष्टीचा हा नियमच आहे. तो लक्षांत ठेवून धीरानें वागलें पाहिजे.

— साने गुरुजी : ( आस्तिक )

## सुगंधाची लयलूट

एकदां सुरवात झाली कीं बारमहा सुगंधाची खैरात चालते व दररोज निरनिराळ्या प्रकारच्या सुवासांचा अनुभव मिळतो. असे निरनिराळे सुवास सुटूं लागले कीं, निसर्गानें कानपुरी अत्तरवाल्याचें सोंग घेतलें आहे व तो शेमल्यांत खोंवलेल्या निरनिराळ्या अत्तरांचे फाये काढून गिऱ्हाइकांना पटवीत आहे असें वाटूं लागतें. आंबेबार, मृगबार व हत्तीबार या मोसमांत संत्रीं-मोसंब्यांच्या बागा चढाओढीनें एकमेकांवर ताण करीत फुलूं लागल्या कीं, सजलपूरच्या अंतराळांत सुगंधाचा दर्या उसळतो आणि तशांत या फळझाडांच्या सुवासाबरोबर जाई, जुई, नेवाळी, कुंद, मोगरा, गुलाब किंवा शेवंती यांचें सुवास वाऱ्याच्या झुळकीबरोबर रात्रीच्या प्रशांत समयीं अंतराअंतरानें येऊं लागलें कीं सुगंधाची अखंड रागदारी चालली आहे. असें वाटतें.

— र. वा. दिघे : ( पाणकळा )

## सुवासाचा वणवा

सराईतील संध्यारंगांनीं आकाश भरलें. सप्तरंगांचे सप्तसमुद्र काडदरीवरील निळ्या आकाशांतील विखुरलेल्या ढगांवर भरती आल्याप्रमाणें पसरले. आतां कारवीच्या वासानें रान पेटलें. त्या सुवासाच्या वणव्यांतून सयाजीचा मुलगा मुकुट आडवीकडून पांवा वाजवीत गुरें घेऊन आला. पांव्याच्या मंजुळ आवाजानें दरी भरली.

— र. वा. दिघे : ( सराई )

## कमळाची तपश्चर्या

आमच्या गांवांतील तळ्यांतून निरनिराळीं कमळें आहेत. लाल कमळें आहेत, शुभ्र कमळें आहेत आणि निळसर पाकळ्या असलेलीं लहान कमळें आहेत. सकाळच्या वेळीं हीं कमळें सूर्याला प्रणाम करीत असतात; पाण्यांतून माना वर काढून बसत असतात. कमळ हें भारतीय संस्कृतीचें प्रतीक आहे. ते पाण्यांत—चिखलांत पाय रोंवून तपश्चर्या करते, प्रकाशासाठीं तहानलेलें असतें. हृदय मधानें भरलेलें. — साने गुरुजी : ( सुंदर पत्रें )

## वेलींचीं फुलें

रस्त्याच्या कडेला अनेक वेली आणि झुडपें माजलीं होतीं. आणि त्यांच्यावर चिमुकलीं रंगीबेरंगी फुलें फुललीं होतीं. तीं फुलें मला बालकवींच्या कवितेंतील शब्दांसारखीं वाटलीं. ह्या वृक्षराजीच्या सान्निध्यामुळेंच कीं काय, अर्धवट वाळलेल्या रस्त्यावरच्या ओलाव्यांतूनही झाडांच्या आकृती निर्माण झाल्या होत्या. तीं ओलाव्याचीं पर्णहीन, वेडीं-वांकडीं झाडें मी किती तरी वेळ न्याहाळत होतों.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## फुललेलें झाड

फुलें पहा कशीं नागासारखीं आहेत. झाडांवर कसे त्यांचे घोंसच्या घोंस आहेत. जणूं कानांत दागिने घालूनच उभीं आहेत झाडें. फार छान. — साने गुरुजी : ( गोड शेवट )

* अन्यायाचा प्रतिकार टाळणारे लोक शेवटीं पापी ठरतात. — आपटे गुरुजी : ( शिष्टाचार )

## डोंगरावरील बाग

उटकमंडची ही बाग डोंगराच्या उतारावर वसवलेली आहे. निरनिराळे गगनचुंबी वृक्ष ही त्या बागेची मुख्य शोभा! आपल्या पानांच्या हिरव्या लोकरीची शाल पांघरून सुरूच्या जातीचीं उंच झाडें तेथें उभीं होतीं. त्यांच्या त्रिकोणी पर्णसंभारांचे हिरवे मिनार मधून मधून वाऱ्यावर डुलत होते. युकॅलिप्टस्च्या पांढऱ्या खोडांच्या झाडांचीं नाजूक पांढुरकीं पानें विगलितपणें खालीं लोंबत होतीं आणि औषधी गंध हवेंत सोडत होतीं. कांहीं झाडें नुसतीं सरळसोट खूप उंच गेलीं होतीं, आणि फक्त त्यांच्या डोक्यांवर पर्णसंभारांचे झुपके दिसत होते. कांहीं झाडांच्यां फांद्या छाटलेल्या होत्या आणि हात तुटलेल्या योद्धयासारखीं तीं दिसत होतीं.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## बागेंतील दीपोत्सव

थोड्या वेळानें ज्याची उत्सुकतेनें वाट पहात होतों तें झालें. दाटणाऱ्या काळोखांत पांढऱ्या दिव्यांचें एक मोहोळ चमकूं लागलें. धरणावरची ती दिव्यांची रांग, बाजूलाच दिव्यांनीं झगमगणारें म्हैसूर सरकारचें राजेशाही वृंदावन हॉटेल आणि बागेतलें हें दिव्यांचें मोहोळ! कारंज्यांतलें पाणी संपून त्यांतून नुसतें तेजच उधळलें जाऊं लागलें. पाण्याच्या प्रत्येक तुषाराला तेजाचा गर्भ राहिला आणि यक्षनगरीचें अद्भुत वातावरण सगळीकडे पेटलें. पलिकडच्या बाजूला लाल, हिरवे, पिवळें, निळे असे रंगीबेरंगी दिवे चमकूं लागले.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## विशाल वृक्ष

मन प्रसन्न करणारी, फुलांनीं सुशोभित केलेली हिरवळ येथें सर्वत्र पसरलेली आहे. आणि उतारावर उभे राहून आकाशाला मस्तक भिडविणारे भव्य वृक्ष नीलगिरीच्या राजवैभवाची साक्ष येथें देत असतात. निळ्या शिखरांच्या आणि निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर ते निश्चल वृक्ष पाहिले कीं मनाचीं क्षितिजें रुंदावतात, दृष्टि निर्मल होते, कल्पनेची ईर्षा चढते, विचारांना धार येते.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## बागेंतील झाडें

जागोजाग तेथें हिरव्या गवताचे गालिचे अंथरलेले होते. ठेंगण्या, ठुसक्या, झुपकेदार झुडपांचे वाफे आणि कुंपणें तेथें होतीं. त्यांच्या नाजूक नक्षीदार पानांचे झुपके मोठे गोंडस वाटत होते. यक्षबालकांच्या हातांसारखीं तीं पानें वाटत होतीं. त्यांतलीं कांहीं छोटीशीं लालचुटुक पानें तर फुलांच्या सौंदर्याशीं स्पर्धा करीत होतीं.

— गंगाधर गाडगीळ ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## वृक्षराजींतून झिरपणारा प्रकाश

सगळें हिरवें होतें. सगळें ओलें होतें. नीलगिरीचा नीलिमा सर्वत्र सांकळला होता आणि त्या नीलिम्यांतून मावळत्या सूर्याची झळाळी पोपटी रंगाची दिसत होती. असा पोपटी सूर्यास्त मीं कुठेंच पाहिला नव्हता. पर्वतांचें आणि वृक्षराजींचें असें विपुल वैभवही मीं कधीं न्याहाळलें नव्हतें.

— गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

## वृक्ष व वेली

लहान मुलांचे व मुलींचे केस जसे हलतात तसे लता-वृक्षांवरचे कोमल पल्लव हलत होते. बालकांच्या कोमल रक्तहस्ताप्रमाणें लतांचीं कोंवळीं लाल पानें सूर्यकिरणांनीं अधिकच लाल झालीं होतीं. वृक्षांच्या कांहीं कोमल शाखा डुलत होत्या, नाचत होत्या व कांहीं जणुं काय माना डोलवून पांखरांना खेळावयाला बोलावीत होत्या.

— वा. म. जोशी : ( रागिणी )

## वेरूळची वाट

ते वृक्ष म्हणजे जसे कांहीं यादवांचे अतिरथी-महारथी, नुकतेच अल्लाउद्दिन खिलजीच्या सैन्याशीं मुकाबला करून आले होते. पुढच्या मार्गावर वडाच्या फांद्यांनीं हिरव्या दाट कमानी उभारल्या होत्या. उजव्या हातास ओसाड डोंगरांची रांग उंटांच्या काफिल्यासारखी अविच्छिन्न उभी होती.

— महादेवशास्त्री जोशी : ( वेरूळचा घृष्णेश्वर )

## हिमालयावरील झाडें

सावरीच्या उंच व पर्णहीन झाडांवरील ज्या लाल फुलांवर अस्तगामी सूर्याचीं तिरपीं किरणें पडलीं होतीं, तीं साहेबाच्या मुलांच्या गालाप्रमाणें लाल दिसत होतीं व बाकीचीं शोकाकुल मधुर युवतीच्या कपोलाप्रमाणें काळसर लाल दिसत होतीं. तेथील कांहीं चंपक वृक्षावरील पांढरीं फुलें, झाडांवर सुरपारंब्या खेळण्याकरितां बसलेल्या मुलांप्रमाणें आनंदानें डुलत व हंसत होतीं. तेथील आम्र-वृक्ष कांहीं पिंवळसर पांढऱ्या व कांहीं तांबडसर मोहरानें फुललेले होते व ते आपला सुवास सर्व दिशांना पसरवीत होते.

— वा. म. जोशी : ( रागिणी )

### वाङ्मयाचें कार्य

क्षुद्र जीवनाचा विसर व उच्च जीवनाचा अनुभव याचें नांव वाङ्मय. — वा. म. जोशी

### कवींची योग्यता

कवि हे नाकांतील नथा आहेत, खुद्द नाक नव्हत. राष्ट्रकर्ते पुरुष हेच राष्ट्राचे नाक होत. ज्या राष्ट्रांत राष्ट्रकर्ते पुरुष जास्त उत्पन्न होतात त्याच राष्ट्राचें नाक वरतीं रहातें. — अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

### ललित लेखन

जो लेखक जीवनाकडे पाठ फिरवून वाचनालयाकडे तोंड फिरवून बसतो त्याला ललित लेखन कधीं करतां यावयाचें नाहीं. तो फार तर दहा पुस्तकें वाचून अकरावें पुस्तक लिहूं शकेल; पण त्या लेखनांत जीवनाचा जिव्हाळा येणार नाहीं. जीवनांत जो उडी घालतो तो उत्तम ललित लेखन करूं शकतो.

— आचार्य अत्रे : ( हंशा व टाळ्या )

### ग्रंथांचा उपयोग

महान् महान् तत्त्ववेत्ते, इतिहासकार, शास्त्रज्ञ, कवि आपापले विचार पुस्तकरूपी नौकेंत घालून न ठेवते तर ते कालमहार्णवांत कधींच बुडून जाते व त्यांचा यत्किंचित् मागमूस आम्हांस न लागता; पण त्यांनीं तसें केलें नाहीं, त्यामुळें विचाररूपी मालानें भरलेल्या या ग्रंथ-नौका पाहिजे त्याला हव्या त्या किनाऱ्यावर उतरून घेऊन त्यांतील मालास हात घालतां येतो.

— प्रि. गो. ग. आगरकर : ( सुधारक )

## काव्याची मोहिनी

वाहत्या पाण्याच्या धबधब्याचा झोत पाहून कोणाचे डोळे विटले आहेत? गोड आम्रफळें खातां खातां त्याची कोणाच्या जिभेला शिसारी आलेली आहे? गंधर्वांच्या गाण्यानें आणि कोकिळेच्या स्वरानें कोणाच्या कानठळ्या बसल्या आहेत आणि कपाळ उठलें आहे? तसेंच मुक्तेश्वराचें गोड काव्य वाचीत असतां कोणाला त्याचा कंटाळा वाटला आहे?

— वि. ल. भावे : ( महाराष्ट्र–सारस्वत )

## ज्ञानेश्वरीचें महिमान

ही ज्ञानदेवाची कृति ज्ञानेश्वरीही आहे, वागेश्वरीही आहे, इतकेंच नव्हे तर ती धर्मक्षेत्र आहे व काव्य-गंगाही आहे......

ईश्वरी शक्तीनें मानवी देहांत शिरून कांहीं ग्रंथ असे निर्माण केले आहेत कीं, त्या एकेका ग्रंथांकरतांच ती ती भाषा अवश्य सबंध शिकावी आणि अशा ग्रंथापैकींच ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निःसंशय आहे.

— वि. ल. भावे : ( महाराष्ट्र–सारस्वत )

## रामदासाचा गौरव

'निराश होऊं नका, निराश होऊं नका' असे म्हणून स्वातंत्र्याच्या आशेनें सर्व महाराष्ट्राला चेतविणाऱ्या एका बहाद्दर शाहीराची परळी ही तुतारी आहे. इथें स्वातंत्र्याचे चौघडे आहेत, स्वातंत्र्याच्या रणभेरी आहेत, स्वातंत्र्याचे धमामे आहेत.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## प्राचीन कवि

प्राचीन कवि हे गूढ ज्ञानाचे दीप, हे राष्ट्र-कर्तव्याचे मेरु-मणि, हे अगाध विश्वप्रेमाचे सागर होते.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## अर्वाचीन कवि

अर्वाचीन कवींची कविता म्हणजे एकाद्या सुंदर पैठणीवर काढलेली जरीची बुट्टी आहे. ती लहान लहान प्रमाणांत सर्वत्र चमकत असावयाची. परंतु बुट्टी म्हणजे कांहीं पैठणी नव्हे. ती एकाद्या महावस्त्रावर सुंदर दिसते, परंतु ती स्वतः कांहीं महावस्त्राप्रमाणें नेसावयाच्या उपयोगीं पडत नाहीं.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

## शब्दार्थाचें नातें

अर्थ अगदीं सामान्य किंवा पोरकट आहे, आणि तो मोठमोठ्या शब्दांनीं व्यक्त करण्याचा घाट घातला तर गाढवावर मखमली झूल घातल्याप्रमाणें किंवा चार वर्षांच्या पोऱ्यानें आपणांस न झेपेसें मोठें पागोटें डोक्यास घातल्या-प्रमाणें हास्यास्पदतेचा प्रकार होतो.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## भाषेची वाढ

भूगर्भांत ज्याप्रमाणें उष्णता व दडपण यांच्या योगानें ओबडधोबड पण सतेज हिऱ्याचे दगड बनतात, तसेंच प्रतिभेची उष्णता व छंदोबद्धतेचें दडपण यांच्या योगानें काव्यांतहि शब्द–हीरक बनतात.

— न. चिं. केळकर : ( वाग्वैजयंती–प्रस्तावना )

## भाषेचें महत्त्व

भाषा हें राष्ट्राचें हत्यार होय; आणि हें हत्यार जो तयार करून देतो त्याचे राष्ट्रावर कांहीं लहानसहान उपकार नाहींत.

— बा. गं. टिळक : ( विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र )

## इतिहासाचा उपयोग

तरुण पिढी तेजस्वी निपजण्यास जुन्या कागदपत्रांच्या साहाय्यानें लिहिलेल्या खऱ्या इतिहासाचा फार उपयोग होतो. — लो. बा. गं. टिळक : ( केसरी )

## विनोदाचा उपयोग

हास्यविनोदी माणसें अधिक कष्टाळू असतात. ज्याला ओंगण मधून मधून घातलें जातें असाच गाडा मजल गांठावयाचा; करकरतें रुक्ष चाक मध्येंच मोडून पडावयाचें.

— न. चिं. केळकर : ( हास्य–विनोद–मीमांसा )

## अवतरणांचा उपयोग

दागिन्यांचा किंवा उंची वस्त्रांचा अतिशय थाटमाट हे जसें खऱ्या आभिजातेचें लक्षण नव्हे, त्याचप्रमाणें अवतरणें फार घेतल्यानें साधेपणास बाध येतो.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## वाङ्मयांतील समता

वाग्देवीच्या मुलुखांतला कायदा असा आहे कीं, त्यांत पाऊल ठेवतांच सर्वांचीं वयें सारखीं होऊन जातात, साऱ्यांचे हुद्दे एक होतात व उचनीचभावाला तेथें कोणताच थारा रहात नाहीं.

— विष्णुशास्त्री चिपळूणकर : ( निबंधमाला )

## ज्ञान म्हणजे रामनाम

प्रकाशाशिवाय अंधार कसा जाणार? सूर्योदयाशिवाय धुकें कसें जाणार? औषधाशिवाय रोग कसा हटणार? प्रेमाशिवाय कलह कसे मिटणार? आणि ज्ञानाशिवाय भीति कशी जाणार? रामनाम म्हटलें म्हणजे भुतें जातात. जीवनांत रात्र झाली म्हणजे कोणता सैतान उभा राहील? ज्ञान म्हणजे रामनाम. स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव म्हणजेच रामनाम. — साने गुरुजी : ( क्रांति )

## पैशाचा भस्मासुर

विनिमयाला एक सोयीस्कर मध्यस्थ म्हणून नाणें निर्माण झालें आणि त्या दिवसापासूनच मनांत संग्रहाची, राखून ठेवण्याची वासना निर्माण झाली. जें साधन होतें तें साध्य बनलें. 'लोभमूलानि पापानि' म्हणतात, तसा तिथूनच सगळ्या पापांचा उगम झाला. 'दाम करी काम' हा आजच्या युगाचा बीजमंत्र. त्या काळीं 'घाम करी काम' अशी धारणा होती. श्रमल्यावांचून, कांहीं तरी निर्माण केल्यावांचून त्या काळीं अन्य कांहीं मिळवतांच येत नसे. व्यवहाराच्या सुलभतेसाठीं पैसा निर्माण केला गेला; पण माणसानें जन्माला घातलेला हा भस्मासुर माणसाच्याच टाळूवरून हात फिरवून विकट हास्य करतो आहे. — महादेवशास्त्री जोशी : ( भीमाशंकर )

## सामान्यांचीं चरित्रें

लोकोत्तर स्त्री-पुरुषांचीं व त्यांच्या खालोखाल विशेष सामर्थ्याच्या मनुष्यांचीं चरित्रें हीं बंडोपंती अथवा बिवलकरी कित्त्यांप्रमाणें होत......घोटकित्त्याप्रमाणें आमचीं चरित्रें सामान्य विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडतील.

— धों. के. कर्वे : ( आत्मवृत्त )

## मातेचें वात्सल्य

मातेचें सारें मुलासाठीं. मुलासाठीं तिचा जीव. मुलासाठीं ती वाटेल तें करील. मुलांची सेवाचाकरी करतांना ती थकणार नाहीं, बसणार नाहीं. तिला कोठें कांहींही मिळो, स्वतःच्या लेंकरासाठीं ती तें घेऊन येईल. मुलांचें जरा कांहीं दुखलें-खुपलें कीं ती कावरीबावरी होते. तिला मग अन्न रुचत नाहीं. झोंप येत नाहीं. ती दिवस म्हणत नाहीं, रात्र म्हणत नाहीं, ती सारखीं सेवाचाकरी करते. मुलाला वाईट म्हटलेलें तिला कधीं खपणार नाहीं. कितीहि वाईट मूल असो, तिला तें सोन्याचें वाटतें; तिला तें मंगल वाटतें; पवित्र वाटतें, गोड वाटतें, सुंदर वाटतें. सारें जग मुलाला लोटील, परंतु माता लोटणार नाहीं. आपल्या पंचप्राणांचें पांघरूण घालून ती त्याला सांभाळील. स्वतः उपाशी राहून ती मुलाला वाढवील. स्वतः उघडी राहून ती मुलाला पांघरूण घालील. स्वतः मरून ती मुलाला जगवील.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## आईबापांची योग्यता

परमेश्वराच्या बागेमध्यें लहान मुलांच्या रूपानें आपल्या ह्या हिंदुस्थान देशांत जीं कोंवळीं टुसटुशीत झाडें उगवलीं आहेत, त्यांना नीट रीतीनें वळण लावणारे त्यांचे आईबाप हे एक प्रकारचे माळी आहेत.

— शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

* आईबापाजवळ सोन्याचें धन जरी अल्प असलें तरी अनुभवाचें आणि प्रेमाचें धन फार मोठें असतें.

— आपटे गुरुजी : ( कुटुंबजीवन )

C 3588

## आईत काय नाहीं ?

आई ! या दोन अक्षरांत श्रुतिस्मृति आहेत, सारीं महाकाव्यें आहेत. या दोन अक्षरांत माधुर्याचा सागर आहे. पावित्र्याचा आगर आहे. फुलांची कोमलता, गंगेची निर्मलता, चंद्राची रमणीयता, सागराची अनंतता, पृथ्वीची क्षमता, पाण्याची रसता जर तुम्हांस पहावयाची असेल तर आईजवळ क्षणभर बसा. सारें तुम्हांस मिळेल. सारीं दैवतें आईत येऊन गेलीं. आई हें दैवतांचें दैवत आहे.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## बालकांचें स्थान

मुलें म्हणजे राष्ट्राचें खरेंखुरें भांडवल. मुलें उद्यांचा भव्य भविष्य ! मुलें म्हणजे देवाघरचा संदेश आणणारे प्रेषित. मुलें म्हणजे मोदमूर्ति, आनंदाचीं माहेरघरें. मुलें म्हणजे चैतन्याचें कोंब. स्फूर्तीची कळा. मुलें म्हणजे सुगंधी फुलं पहाणाऱ्या सुंदर कळ्या. देवाला सर्वांत जास्त प्रिय कोणी असेल तर तीं मुलें.

— साने गुरुजी : ( श्याम )

## समसमां संयोग

सुवर्ण-पात्रांतील दुग्ध सुवर्ण-पात्रांतच ओतून घेतलें पाहिजे, हिऱ्याचा खडा रत्नाच्याच कोंदणांत बसविला पाहिजे, स्वर्गांतील अमृत देवांच्याच मुखांत पडलें पाहिजे, कर्पूराचें धवलत्व शंकराच्याच अंगीं उतरलें पाहिजे, धवल कीर्तीचा शेला वीरांच्याच खांद्यावर ठेवला पाहिजे, तें पवित्र भगवन्नाम नारदांच्याच ब्रह्मविणेंतून प्रस्फुट झालें पाहिजे.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

**सर्वत्र देवच**

गंभीर सागरांत त्याला देवाचा विलास दिसतो, गाईंत त्याला देवाची वत्सलता दिसते, पृथ्वींत त्याची क्षमता दिसते, निरभ्र आकाशांत निर्मळता दिसते, रवि–चंद्र–ताऱ्यांत त्याचें तेज व भव्यता दिसते, फुलांत त्याची कोमलता व सुगंध दिसतो, दुर्जनांत कसोटी पहाणारा तो देव दिसतो. – विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

**ईश्वराचीं प्रतीकें**

तें लालभडक आकाश, ते काळे डोंगर, त्या उंच झाडांच्या काळ्या छायाकृति ! ह्या साऱ्याच गोष्टींना त्या वेळीं प्रतीकांचें स्वरूप आलें होतें. तें लालभडक आकाश जगाला गति देणाऱ्या, विझत जळणाऱ्या आदि-शक्तीचें प्रतीक दिसत होतें. तसेंच त्या वेळीं अंधारांत डोंगर डोंगर राहिले नव्हते, वृक्ष वृक्ष राहिले नव्हते. विश्वांत जें चिरंतन आहे त्याचीं तीं प्रतीकें झालीं होतीं. आणि तीं प्रतीकें पाहून अपुरेपणाची मनांतली जाणीव जागृत होत होती, ओरबाडत होती, मन विद्ध करीत होती आणि मोठेंही करीत होती.

– गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

**ईश्वरावर भरंवसा**

या सत्यमतप्रसाराच्या कामीं आमच्यावर लहान-मोठीं, बरीं-वाईट कोणतींहि संकटें आलीं, तरी त्यांतून आम्हांला सोडविणारा आमचा परमेश्वर पूर्ण समर्थ आहे ! आमचा वकील परमेश्वर ! आमची फी परमेश्वर ! आमचा जामीन परमेश्वर आणि आम्हांला संकटांतून सोडविणाराहि परमेश्वरच ! – शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

C 3548

## आईंत काय नाहीं ?

आई ! या दोन अक्षरांत श्रुतिस्मृति आहेत, सारीं महाकाव्यें आहेत. या दोन अक्षरांत माधुर्याचा सागर आहे. पावित्र्याचा आगर आहे. फुलांची कोमलता, गंगेची निर्मलता, चंद्राची रमणीयता, सागराची अनंतता, पृथ्वीची क्षमता, पाण्याची रसता जर तुम्हांस पहावयाची असेल तर आईजवळ क्षणभर बसा. सारें तुम्हांस मिळेल. सारीं दैवतें आईंत येऊन गेलीं. आई हें दैवतांचें दैवत आहे.

— साने गुरुजी : ( श्यामची आई )

## बालकांचें स्थान

मुलें म्हणजे राष्ट्राचें खरेंखुरें भांडवल. मुलें उद्यांचा भव्य भविष्य ! मुलें म्हणजे देवाघरचा संदेश आणणारे प्रेषित. मुलें म्हणजे मोदमूर्ति, आनंदाचीं माहेरघरें. मुलें म्हणजे चैतन्याचें कोंब. स्फूर्तींची कळा. मुलें म्हणजे सुगंधी फुलं पहाणाऱ्या सुंदर कळ्या. देवाला सर्वांत जास्त प्रिय कोणी असेल तर तीं मुलें.

— साने गुरुजी : ( श्याम )

## समसमा संयोग

सुवर्ण–पात्रांतील दुग्ध सुवर्ण–पात्रांतच ओतून घेतलें पाहिजे, हिऱ्याचा खडा रत्नाच्याच कोंदणांत बसविला पाहिजे, स्वर्गांतील अमृत देवांच्याच मुखांत पडलें पाहिजे, कर्पूराचें धवलत्व शंकराच्याच अंगीं उतरलें पाहिजे, धवल कीर्तीचा शेला वीरांच्याच खांद्यावर ठेवला पाहिजे, तें पवित्र भगवन्नाम नारदांच्याच ब्रह्मविणेंतून प्रस्फुट झालें पाहिजे.

— अ. ब. कोल्हटकर : ( संदेश )

### सर्वत्र देवच

गंभीर सागरांत त्याला देवाचा विलास दिसतो, गाईंत त्याला देवाची वत्सलता दिसते, पृथ्वींत त्याची क्षमता दिसते, निरभ्र आकाशांत निर्मळता दिसते, रवि–चंद्र–ताऱ्यांत त्याचें तेज व भव्यता दिसते, फुलांत त्याची कोमलता व सुगंध दिसतो, दुर्जनांत कसोटी पहाणारा तो देव दिसतो. – विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

### ईश्वराचीं प्रतीकें

तें लालभडक आकाश, ते काळे डोंगर, त्या उंच झाडांच्या काळ्या छायाकृति ! ह्या साऱ्याच गोष्टींना त्या वेळीं प्रतीकांचें स्वरूप आलें होतें. तें लालभडक आकाश जगाला गति देणाऱ्या, विझत जळणाऱ्या आदि-शक्तीचें प्रतीक दिसत होतें. तसेंच त्या वेळीं अंधारांत डोंगर डोंगर राहिले नव्हते, वृक्ष वृक्ष राहिले नव्हते. विश्वांत जें चिरंतन आहे त्याचीं तीं प्रतीकें झालीं होतीं. आणि तीं प्रतीकें पाहून अपुरेपणाची मनांतली जाणीव जागृत होत होती, ओरबाडत होती, मन विद्ध करीत होती आणि मोठेंही करीत होती.

– गंगाधर गाडगीळ : ( गोपुरांच्या प्रदेशांत )

### ईश्वरावर भरंवसा

या सत्यमतप्रसाराच्या कामीं आमच्यावर लहान-मोठीं, बरीं-वाईट कोणतींहि संकटें आलीं, तरी त्यांतून आम्हांला सोडविणारा आमचा परमेश्वर पूर्ण समर्थ आहे ! आमचा वकील परमेश्वर ! आमची फी परमेश्वर ! आमचा जामीन परमेश्वर आणि आम्हांला संकटांतून सोडविणाराहि परमेश्वरच ! – शि. म. परांजपे : ( काळांतील निवडक निबंध )

**आर्थिक विषमता**

एका तांदुळाच्या दाण्यासाठीं गरिबांचीं पोरं तळमळत असतांना आठ हजारांचा खडा श्रीमंतांच्या हातांत अडकलेला पाहिला तर आम्हां दरिद्री लोकांच्या डोळ्यांत तो खड्यासारखाच नाहीं का खुपायचा ?

— भा. वि. वरेरकर : ( धांवता धोटा )

दा. क्र.

**संतांचें महिमान**

संत उंच जीवनावर उभे राहून जगाला मुकेपणानें मार्गदर्शन करित असतात. संत हे भवसागरांतील दीपस्तंभच. — साने गुरुजी : ( श्यामची आई )

**संतांचे श्रेष्ठत्व**

ज्ञानाइतकें पाचक व भक्तीइतकें रोचक दुसरें कांहींच दाखवितां येणार नाहीं. इंद्रायणीच्या पाण्यांत पाचक ज्ञान आणि रोचक भक्ति भरपूर भरलेलीं आहेत अशी इतिहासाची साक्ष आहे. " ज्ञानियांचें गुरु " ज्ञानेश्वर-महाराज आणि भक्तांचे गुरु मुकुटमणि तुकोबा दोघेही इंद्रायणीचे पाणी पिऊन पुष्ट झालेलें. — विनोबा भावे

**अश्रूंची महती**

अश्रूंनीं तुडुंब भरलेल्या हृदयांतच भक्तीच्या कमलाचा जन्म होत असतो. — साने गुरुजी : ( श्यामची आई )

**शुभ संस्कार**

कणकण लक्ष्मी मिळवावी लागते; क्षणक्षण फुकट न दवडतां, विद्यार्जनांत वेचावा लागतो. दरक्षणीं घडणारा संस्कार चांगलाच होत आहे ना, याचा विचार कर. प्रत्येक कृतीची छिनी जीवनाच्या दगडाला आकार देत आहे.

— विनोबा भावे : ( गीता-प्रवचनें )

REFBK-0008374

REFBK-0008374